INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING
UNIVERSITY OF MUMBAI
Re-accredited with 'A' Grade By N AAC

# एम. ए. भाग - एक

# राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका - एक

# आधुनिक भारतीय राजकीय विचार

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. संजय देशमुख**
कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्राध्यापक-नि-संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक आणि संपादक** : **प्रा.डॉ. एस.एम.वाघ**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे

**लेखक** : **डॉ. छाया बकाणे**

**ऑगस्ट २०१५, एम.ए.भाग - एक, राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका - एक, आधुनिक भारतीय राजकीय विचार**

**प्रकाशक** : प्राध्यापक नि संचालक
दूर व मुक्त अध्ययनसंस्था,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई - ४०००९८

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** :

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतातील प्रबोधन | ०१ |
| २. | राजा राममोहन रॉय (१७७२ - १८३३) | १३ |
| ३. | स्वामी विवेकानंद (१८६३-१९०२) | २५ |
| ४. | समता : महात्मा ज्योतीबा फुलेंचे योगदान (१८२७-१८९०) | ३५ |
| ५. | समता - डॉ.भीमराव रामजी आंबेडकर (१८९१-१९५६) | ४९ |
| ६. | उदारमतवाद - महादेव गोविंद रानडे (१८४२-१९०१) | ६४ |
| ७. | गोपाळ कृष्ण गोखले आणि उदारमतवाद (१८६६ ते १९१५) | ७९ |
| ८. | बाळ गंगाधर टिळक - जहाल राष्ट्रवाद | ८९ |
| ९. | जहाल राष्ट्रवाद (१८७२ ते १९५०) | १०१ |
| १०. | महात्मा गांधी - सत्य आणि अहिंसा (१८६९-१९४८) | ११६ |
| ११. | विनोबा भावे आणि सर्वोदय | १३० |
| १२. | जयप्रकाश नारायण आणि सर्वोदय | १४० |
| १३. | जमातवाद (Communalism) हिंदु - मुस्लिम आणि शिख | १५८ |
| १४. | समाजवाद आणि साम्यवादी विचार आणि डॉ. राममनोहर लोहिया | १६४ |
| १५. | समाजवादी आणि साम्यवादी विचार आचार्य देव (१८८९ ते १९५६ आणि पालीदत्त (१८९६-१९७४) | १७८ |
| १६. | श्री. मानवेंद्रनाथ रॉय (१९९३-१९५४) - नवमानवतावाद | १८५ |


❖❖❖❖

# १

# भारतातील प्रबोधन

**घटक रचना :**

१.० प्रस्तावना
१.१ प्रबोधन
१.२ भारतातील प्रबोधन
१.३ राष्ट्रीय चळवळ
१.४ ब्राह्मो समाज
१.५ प्रार्थना समाज
१.६ आर्य समाज
१.७ रामकृष्ण मिशन
१.८ सत्यशोधक समाज
१.९ थिऑसॉफिकल सोसायटी
१.१० काही मुस्लिम धर्मसुधारणेच्या चळवळी
१.११ पारशी समाजातील परिवर्तन
१.१२ भारतीय प्रबोधनाच्या मर्यादा
१.१३ प्रश्न
१.१४ संदर्भग्रंथ

## १.० प्रस्तावना

'आधुनिक भारतीय राजकीय विचार' या पेपर मध्ये १९ व्या आणि २० व्या शतकातील भारतात अस्तित्वात असलेले जे विविध विचारप्रवाह होते त्याचा अभ्यास करण्यात आला आहे. याकाळात अनेक भारतीय विचारवंतानी जीवनाच्या विविध क्षेत्रात आपले योगदान दिलेले आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातील विविध समस्यांवर त्यांनी आपल्या विचारातून उपाय सुचविले. त्यासाठी अनेक 'समाज' आणि 'संस्था' स्थापन केल्या होत्या. त्याचाच अभ्यास या पेपरमध्ये करण्यात आला आहे.

## १.१ प्रबोधन

इंग्रजी 'रेनेसंन्स' या शब्दाला मराठीत प्रबोधन असे म्हणतात. त्याचा थोडक्यात अर्थ म्हणजे जुन्या आचारविचारांना व रुढि परंपराना टाकून देऊन किंवा बदलून, त्यात सुधारणा करुन नव्याने जगण्याचा प्रयत्न करणे. युरोपात १५ व्या शतकापर्यंतच्या काळाला मध्ययुग व अंधारयुग असे संबोधतात. त्यानंतर १६ व्या शतकापासून नव्या युगाची पहाट म्हणजेच प्रबोधन सुरु झाले होते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये एकप्रकारची वैचारिक व सांस्कृतिक क्रांती यातून उभी राहिली. ग्रीक विद्येचे पुनर्जीवन व त्यातून युरोपियनांना प्राप्त झालेली नवी जीवनदृष्टी याअर्थाने 'रेनेसंन्स' हा शब्द तिकडे रुढ झाला. कांट हा तत्ववेत्ता त्यास 'चिकित्सेचे युग' असे संबोधितो. प्रबोधनामुळे साहित्य, संगीत, कला, छंद, तर्क, नैतिकता, समाजकारण, राजकारण इत्यादी सगळ्याच क्षेत्रांत आमूलाग्र ढवळून काढणारे नवे चैतन्य त्यात प्रकटले होते. व्यक्तीला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. मानवतेला अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. चर्चचे वर्चस्व संपुष्टात आले होते. लोक स्वतंत्रपणे विचार करायला लागले होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रबोधन संकल्पना स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १.२ भारतातील प्रबोधन

इंग्रज राज्यकर्ते जेव्हा भारतात आले तेव्हा या प्रबोधनाचे लोण त्यांनी आपल्याबरोबर आणले. इंग्रज भारतात आले तेव्हा भारत लहान लहान राज्यामध्ये विभागला होता. ज्या संस्कृतीने भारताला समृद्ध केले होते ती संस्कृती मोडकळीस आली होती. भारताचे संपन्न जीवन संपुष्टात आले होते. तत्वशून्य कर्मकांड, पाशवी रुढी याला उत आला होता. लोक अविवेकी आणि परिस्थितीचे गुलाम झाले होते. विकास थांबून स्थितिप्रियता आली होती. भारताच्या अशा परिस्थितीत ब्रिटिश राज्यकर्ते आल्यानंतर त्यांची विज्ञाननिष्ठता, विचार यामुळे भारतीय लोकांची जिज्ञासा जागृत झाली. या विवेकजागृतीतून भारतातही प्रबोधनाला सुरुवात झाली.

मानवी जीवनाला केवळ ऐहिक संदर्भ आहे. मरणोत्तर सद्‌गतीसाठी झटण्यापेक्षा जिवंत असेपर्यंतच्या सुखासाठी माणसाने झटावे, विवेकाने वागावे, सामाजिक विषमतेपासून मुक्तीचे प्रयत्न करावेत अशी शिकवण पाश्चात्य प्रबोधनाने भारतीयांना दिली. व्यक्तींची स्वायत्तत्ता, व्यक्तीची धार्मिक, आर्थिक, सामाजिक पिळवणूकीपासून मुक्तता, मानवतावाद, बुद्धिप्रामाण्य,

वैज्ञानिक दृष्टी, इत्यादी वैशिष्ट्ये प्रबोधनाच्या लाटेबरोबर भारतातही आली. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांवर आधारित लोकशाहीची कल्पना आली. या नवीन मूल्यांवर आधारित नवी समाजरचना निर्माण करण्याची आवश्यकता भासली. भारतात प्रबोधनाची सुरुवात अठराव्या शतकाच्या शेवटी व मुख्यत्वे एकोणिसाव्या शतकात झाली.

वैज्ञानिक, तंत्रज्ञानात्मक व औद्योगिक क्षेत्रातील परिवर्तन घडून आले. रेल्वे सुरु झाल्यामुळे जलद दळणवळण सुरु झाले. शेती क्षेत्रात प्रगती झाली. शेतकी क्षेत्रात व्यापारी पिकांची लागवड वाढली. शेतकी अर्थव्यवस्था राष्ट्रीय व जागतिक अर्थव्यवस्थेची घटक बनली. देशातील औद्योगिककरणासाठी अनुकूल परिस्थिती रेल्वेमुळे निर्माण झाली. कापुस, ताग यांच्या गिरण्या व कोळशाच्या खाणी राष्ट्राचे आघाडीचे उद्योगधंदे बनले. औद्योगिकरणातून आधुनिक मोठी शहरे उदयास आली. सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाची ती केंद्र बनली. नव्या सामाजिक शक्तीप्रवाहामुळे भारतीय राष्ट्रवादाला व राष्ट्रीय चळवळीला चालना मिळाली.

भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. या शिक्षणामुळे सुशिक्षितांवर बुद्धिवादाचे, उदारमतवादाचे, प्रबोधनाचे संस्कार झाले. युरोपमधील विचारवंत, युरोपचा इतिहास यामुळे मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्त्वांची त्यांना ओळख झाली. जीवनाच्या सर्व क्षेत्राकडे, सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांकडे वैज्ञानिक व बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टीने पाहण्याची शिस्त लागली. ब्रिटिशांमुळे भारतात इंग्रजी विद्येबरोबरच वृत्तपत्रे, पोस्ट, मुद्रणकला आली. १८३२ साली 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी काढले. 'शतपत्रा' तून लोकहितवादी यांनी अनेक सामाजिक व राजकीय महत्त्वांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला. याप्रमाणे वृत्तपत्रांनी जागृकता आणण्याचे कार्य केले.

अशा प्रकारे ब्रिटिश राज्यकर्त्यांचा सहवास, इंग्रजी शिक्षण, वर्तमानपत्रे इत्यादींद्वारे पाश्चात्य उदारमतवादी तत्वांची ओळख झाल्यानंतर सुधारकांची संख्या वाढली. भारतीय वस्तुस्थितीचे विश्लेषण करुन तिच्यावर समाजिक व धार्मिक सुधारणा सुचविण्यात आल्या. सामाजिक क्षेत्रात जातिसंस्थेविरुद्ध आवाज उठवणे, बालविवाह बंदी, सामाजिक उच्चनिचता भेदभाव नष्ट करणे, स्त्रीपुरुष समान हक्क मागणी करणे, विधवाविवाह, विधवांचे केशवपन प्रथा बंद करणे याची मागणी वाढली.

धार्मिक क्षेत्रात धर्मभोळेपणा, अंदश्रद्धा, मूर्तिपूजा, इत्यादीचे उच्चाटन करणे अगत्याचे मानले गेले.

अशा या जाणिवेतून अनेक 'समाज' व 'संस्था' उदयास आल्या.

ब्राह्मोसमाज (१८२८), प्रार्थनासमाज (१८६७), रामकृष्ण मिशन, सत्यशोधक समाज (१८७३), थिऑसॉफिकल सोसायटी (१८७५) या समाजांचे आणि संस्थांचे कार्य यासंदर्भात अभ्यासणे आवश्यक आहे.

## १.३ राष्ट्रीय चळवळ

भारतीय राष्ट्रीय चळवळीची सुरुवात १८५७ च्या बंडाने झाली असे म्हणता येईल. भारतीय राज्यांनी इस्ट इंडिया कंपनी विरुद्ध केलेले ते बंड होते. राष्ट्रीय चळवळीतील दुसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ची स्थापना होय. ब्रिटिश ऑफीसर ह्यूम यांनी काँग्रेसची स्थापना करण्यामध्ये पुढाकार घेतला होता. त्यावेळी काँग्रेसवर मवाळ गटाचे वर्चस्व होते. भारतीय समाजामध्ये सुधारणा कराव्यात अशी विनंति त्यांनी ब्रिटिश शासनाला केली होती. १९०७ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये, दोन विचारप्रवाहांचे दोन गट निर्माण झाले होते. एक म्हणजे मवाळ आणि दुसरा जहालांचा गट होय. १९२० नंतर महात्मा गांधी राजकारणामध्ये आल्यानंतर त्यांनी काँग्रेस संघटनेमध्ये अनेक बदल केले. राष्ट्रीय चळवळीचे क्रांतीकारी, समाजवादी, साम्यवादी असे आणखी तीन वेगवेगळे प्रवाह होते.

**सामाजिक सुधारणा :** ब्रिटिश राजवट आणि त्यानंतर भारतात सुरु झालेले प्रबोधन आणि त्यांच्या प्रभावातून काही भारतीय तरुणांनी ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला होता. काही तरुणांनी भारतीय समाजामध्ये सुधारणा करण्याला प्राधान्य दिले होते. अनेक नविन संघटना, समाज त्यासाठी स्थापन करण्यात आले होते. या संघटनांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

## १.४ ब्राह्मोसमाज

**राजा राममोहन रॉय** यांनी १८२८ साली कोलकाता येथे या समाजाची स्थापना केली. त्यांची मूळ तत्त्वे पुढीलप्रमाणे होती. प्रपंचास परमार्थरुप मानून चालणे, सामुदायिक ध्यानधारणा, प्रेम आणि लोकसेवा, मूर्तिपूजाविरोध, ईश्वर सर्वांचा पिता व मानवमात्र परस्परांचे बंधू ही भावना इत्यादी.

ब्राह्मोसमाजाच्या या उपक्रमामागे 'हिंदुधर्मावरील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हल्ल्यांचा प्रतिकार करणे हे राजा राममोहन रॉय यांच्या विविध कार्यांपैकी महत्त्वाचे कार्य होते. पण ब्राह्मोसमाज स्थापन करण्यात ख्रिस्ती धर्माचा प्रतिकार करणे ही त्यांची मूळची प्रेरणाबुद्धी नव्हती. हिंदुधर्माची सुधारणा करावी, एकेश्वरी धर्मतत्त्वाचा प्रसार करुन सर्व धर्मांचे अंतरंग एकच आहे हे दाखवून द्यावे आणि जगातील धर्मभेदांचा अंधार नष्ट करणाऱ्या सार्वत्रिक विश्वधर्माचा प्रकाश सर्वत्र पसरावा अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती.'

सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक अशा सगळ्याच क्षेत्रांत या समाजाने महत्त्वाचे कार्य केले आहे. बालविवाह, कन्याविक्रय, सती, विधवा विवाह बंदी अशा अनेक दुष्ट रुढीविरुद्ध संघटित चळवळ समाजाने उभी केली होती. अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला होता. आंतरजातीय विवाहांचे समर्थन केले होते. सामाजिक भेदभावांची कृत्रिम बंधने तोडण्याची प्रेरणा दिली होती. मूर्तिपूजेला विरोध करणाऱ्या या आणि अशाच इतर 'समाजा' बद्दल लिहिताना दि.के. बेडेकर म्हणतात, 'त्यांनी नुसता मूर्तिपूजेला विरोध केला नाही तर 'कर्मबद्ध मानवाच्या' जागी स्वतंत्र विचारक्षम मानवाची कल्पना स्थिर केली.' हे त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे मानावे लागेल. मूर्तिपूजा विरोध, एकेश्वरवाद, सामुदायिक प्रार्थना इत्यादींच्या प्रेरणा राममोहनांना ख्रिस्ती

धर्मातून मिळाल्या असाव्यात. लाला लजपतराय तर ब्राह्मोसमाजाला 'रिफॉर्म्ड ख्रिश्चिअॅनिटी' म्हणत असत.

## १.५ प्रार्थनासमाज

डॉ. आत्माराम पांडुरंग, दादोबा पांडुरंग व भास्कर पांडुरंग या तीन तर्खडकर बंधूनी ३१ मार्च १८६७ रोजी मुंबईस 'प्रार्थना समाजा' ची स्थापना केली. पुढे चंदावरकर, भांडारकर व रानडे ही या प्रयत्नात सहभागी झाले. 'सुबोध - पत्रिका' या नावाचे मुखपत्रही 'समाजा' करवी चालविले जात होते. या समाजाची वैचारिक भूमिका ब्राह्मोसमाजाप्रमाणेच होती. मूळ हिंदू धर्मात अविचाराने, दुरभिमानाने, भ्रमाने वा परंपरेने जे निषिद्ध विधी शिरतात त्यांचा निषेध करणे हे या समाजाचे अंगीकृत कार्य होते. 'हिंदुत्वाचा मेळ प्रगतीच्या प्रवृत्तीशी घालण्याचे प्रयत्न प्रार्थना समाजाने केले.' अनाथालये, रात्रीच्या शाळा, विधवा - आश्रम, विधवा - विवाह-संघ, दलितासाठी निवासस्थाने अशा समाजोपयोगी संस्था या समाजाच्या विद्यमाने चालविण्यात आल्या होत्या.

## १.६ आर्यसमाज

आर्यसमाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वतींनी १८७५ मध्ये पंजाबात केली. आपल्या 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथातून आर्यसमाजाचे तत्त्वज्ञान त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे. आर्यसमाजाची मूलतत्त्वे पुढीलप्रमाणे होत. : ईश्वर एक असून तो सर्वसाक्षी, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आहे. वेदांमुळेच सत्यज्ञान होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक आर्याने वेदांचा अभ्यास करणे हे त्याचे आद्यकर्तव्य ठरते. सर्वांशी प्रेमाने व न्यायाने वागावे. सामाजिक जीवनात कसे वागावे हे ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य व्यक्तीस आहे. आर्यसमाज फक्त वेदांनाच प्रमाण मानतो आणि इतर ग्रंथात जेवढे वेदानुकूल असेल तेवढेच स्वीकारण्याचा आदेश देतो. परमेश्वरभक्तीत मध्यस्थांची गरज नाही, असाही उपदेश करतो. दैववाद, अवतारवाद यांचा त्याग करुन सदैव कर्म करीत राहण्याचा सल्लाही तो देतो, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

विशुद्ध वैदिक पुनरुज्जीवनाची शिकवण देणाऱ्या या समाजाने भारतीय राष्ट्रवादाच्या विकासात अत्यंत महत्त्वाची कामगिरी - विशेषतः पंजाबात - बजावली. हिंदूंमध्ये नवे, झुंजार व आक्रमक चैतन्य त्याने निर्माण केले होते. सामाजिक सुधारणेचाही कसून पुरस्कार केला होता. लाला लजपत राय यांना आर्य समाजापासूनच प्रेरणा मिळाली होती. परधर्मप्रवेश केलेल्यांचे शुद्धीकरण करुन स्वधर्मात घेण्याचेही कार्य या समाजाने मोठ्या प्रमाणावर केले. हिंदूमध्ये आत्मभिमान व आत्मविश्वास निर्माण करण्याचे आणि सुशासन कधीही स्वशासनाहून चांगले असू शकत नाही हा विचार प्रभावीपणे रुजविण्याचे श्रेय आर्यसमाजाला आहे.

## १.७ रामकृष्ण मिशन

हिंदुत्वाला आपले हरवलेले श्रेय परत मिळवून देण्याचा हा एक महान प्रयत्न होता. बंगालच्या आध्यात्मिक व नैतिक पुर्नजागरणात ऋषितुल्य कार्य करणाऱ्या रामकृष्ण परमहंसाच्या

शिष्योत्तमांनी या मिशनची स्थापना केली होती. त्यात पुढाकार स्वामी विवेकानंदाचा होता. सर्व धर्मांना जोडणारे दुवे वेदान्तात मिळतात. या विचारातून सर्व धर्मांच्या मूलभूत ऐक्यावर आणि हिंदुत्वाच्या विश्वात्मकतेवर भर देऊन मिशनने आपले कार्य केले. स्वतः विवेकानंद हे अत्यंत प्रभावी वक्ते आणि विलक्षण बुद्धिमान नेते होते. वेदोपनिषदे आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान या दोहोंवर त्यांच्या कुशाग्र बुद्धीची सारखीच पकड होती. शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेत त्यांनी जागतिक धर्मप्रतिनिधींना हिंदुधर्माची ओळख करुन दिली. हिंदुत्वाला आणि त्या आधारे राष्ट्र म्हणून उभे राहण्याची क्षमता भारतात आहे या विचाराला जगमान्यता प्राप्त करुन देणारे तेच पहिले भारतीय असल्याचा निर्वाळा अनेक पाश्चात्य लेखकांनीही दिला आहे.

रामकृष्ण मिशनमार्फत पाश्चात्य संस्कृतीपासून व सभ्यतेपासून हिंदू संस्कृती - सभ्यतेचे संरक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात असत. दौर्बल्य, भयगंड, आत्मविश्वासविहीनता, स्वाभिमानशून्यता या गोष्टी भारतीय समाजाला एखाद्या शापाप्रमाणे भोवत असून त्यांचा प्रतिकार खंबीरपणे केला पाहिजे ही जाणीव या मिशनने करुन दिली. वेदान्तात रममाण होणाऱ्या संन्याशाच्या भूमिकेत वावरणारे स्वामी विवेकानंद रुढ अर्थाने संन्यासी नव्हतेच; तर जाज्वल्य देशाभिमानाची भावना मनात प्रज्वलित ठेवून ते धार्मिक विषयांवरील निरुपणे करीत असत. त्यांच्या ओजस्वी वाणीमुळे व आवेशपूर्ण आवाहनांमुळे देशाच्या कानाकोपऱ्यात देशप्रमाचे, देशास्तव त्याग करण्याच्या प्रेरणेचे चैतन्य प्रसृत झाले होते. देश खडबडून जागा होऊ लागला होता, अनेक समाजोपयोगी व समाजकल्याणाच्या संस्था - उदा. दवाखाने, अनाथालये, विद्यालये, वसतिगृहे, वाचनालये इत्यादी मिशनच्या वतीने चालविण्यात येत असत, आजही जगभर अशा संस्था मिशनच्या विद्यमाने सुरु आहेत.

## १.८ सत्यशोधक समाज

१८७३ च्या सप्टेंबर महिन्यात महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. समाजातील स्त्री-शुद्रदिकांचे कल्याण हा या समाजाचा हेतू होता. अन्य 'समाजा' तील सभासदांना शेतकऱ्यांच्या व दलित - शुद्रांच्या परिस्थितीचा व व्यथांचा अनुभव नसल्यामुळे कल्पनाही येऊ शकणार नाही आणि त्यामुळे या बहुजन समाजाच्या कल्याणाचे प्रयत्नही त्यांच्या हातून सफल होणार नाहीत ही जाणीव सत्यशोधक समाजाच्या प्रतिष्ठापनेमागे होती. सत्यशोधक समाजाची मूलतत्त्वे पुढीलप्रमाणे होती : ईश्वर एकच असून निर्गुण, निराकार, निर्विकार व सत्स्वरुप आहे, सर्व मनुष्यप्राणी त्याचीच लेकरे आहेत. भक्ती करणे हा प्रत्येकाचा अधिकार असून ईश्वर आणि भक्त यांमध्ये कोणाही मध्यस्थाची वा दलालाची आवश्यकता नाही. व्यक्तीची श्रेष्ठता ही तिच्या जातीवरुन ठरत नसून तिच्या गुणावरुन ठरते. कोणताही ग्रंथ सर्वांशी प्रमाण व ईश्वरप्रणीत नाही. पुनर्जन्म, कर्मकांड, जपतप या अज्ञानमूलक गोष्टी होत. 'सत्यावीण नसे अन्य धर्म' ही जोतिबांची धर्मातीत दृष्टी त्यांच्या काळाचा विचार करता अत्यंत अभिनव व क्रांतिकारकच मानावी लागेल. 'सत्यशोधक चळवळ हीच भारतातील खेड्यांपाड्यांपर्यंत पाहोचलेली पहिली चळवळ होती. ही चळवळ म्हणजे खेडुतांना शिक्षण नि ज्ञान देऊन त्यांच्या ठायी वसत असलेली अज्ञानाची नि पूर्वग्रहांची जळमटे झटकून टाकून आधुनिक संस्कृतीचे आणि ज्ञानाचे लोण त्यांच्यापर्यंत पोहोचविणारी एक सामाजिक प्रबोधिनी होती.'

## १.९ थिऑसॉफिकल सोसायटी

मॅडम ब्लॅव्हॅट्रस्की या रशियन विदुषीने अमेरिकेतील कर्नल हेन्री ऑलकॉट यांच्या सहकार्याने न्यूयॉर्कमध्ये थिऑसॉफिकल सोसायटी स्थापना करुन तिच्यामार्फत भारतीय गूढ विद्यांचा व योगशास्त्राचा अभ्यास व प्रचार सुरु केला होता. १८७९ मध्ये दयानंद सरस्वतींच्या निमंत्रणावरुन ती दोघं भारतात आली आणि त्यांनी मुंबई येथे पहिली थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन केली. भारताला त्याच्या प्राचीन मोठेपणाचे व श्रेष्ठत्वाचे स्मरण देणे हे संस्थेचे ध्येय असल्याचे संस्थापकांनी तेव्हा जाहीर केले होते. पाश्चात्य देशांमध्ये वेदोपनिषदे, गीता - पुराणे व महाभारत इत्यादी ग्रंथांचा प्रचार - प्रसार संस्थेमार्फत करण्यात येत असे. ॲनी बेझंट यांनी सोसायटीचे कार्य पुढे चालवले. चाळीस धर्माचा अभ्यास करुन त्या सर्वांपेक्षा हिंदुधर्मच श्रेष्ठ असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला होता. एकेश्वरवादी तत्त्वज्ञान, सर्व धर्म हे एकाच अंतिम सत्याची विविध रुपे आहेत अशा विचारातून येणारे विश्वबंधुत्व, आधुनिक व चिकित्सक विचारसरणीला पटणारे युक्तिवाद, जीवनविषयक गहन प्रश्नांची सुबोध, संयुक्तिक, समर्पक व सदाचारप्रवर्तक मीमांसा - ही थिऑसॉफिकल सोसायटीची काही मौलिक वैशिष्ट्ये सांगता येतील.

परंतु सोसायटीचे कार्य केवळ धार्मिक वा पारलौकिक क्षेत्रांपुरतेच मर्यादित नव्हते तर तिने शाळा, महाविद्यालयांच्याजवळ वसतिगृहे बांधली, बनारसला सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली. त्याचेच पुढे बनारस हिंदु विद्यापीठ झाले. समाजातील अनिष्ठ रुढींचा प्रतिकार केला. त्यामुळेच 'निव्वळ धर्मपंथाचे स्वरुप या सोसायटीला कधी आले नाही.'

## १.१० काही मुस्लिम धर्मसुधारणेच्या चळवळी

हिंदु - धर्म सुधारणेचे व सामाजिक सुधारणेचे वारे प्रचंड वेगाने वाहत असताना मुस्लिम समाजातसुद्धा काही तशाच हालचाली होणे अपरिहार्य होते. वाहाबी चळवळ, अलिगढ चळवळ, अहमदिया चळवळ या अशाच काही चळवळी म्हणता येतील. वाहावी ही मुळात पुनरुज्जीवनवादी चळवळ होती. महंमद अब्दुल वाहाब हे तिचे अध्वर्यू होते. इस्लामचे पावित्र्य व ऐक्य याआधारे दहशतवादी चळवळी, उभारणे हा त्यांचा मार्ग होता. बंगालमधील मुस्लिम शेतकरी वर्गाला त्यांनी जागृत केले. अहमदिया चळवळीचे पुरस्कर्ते सर सय्यद अहमद यांनी अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचा पाया घातला. मुसलमानांच्या नैतिकतेत व बौद्धिक कुवतीत भर घालण्यासाठी १८८५ साली अंजुमन-ए-हिमायत-इस्लाम नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांच्या खुदाई खिदमदगार चळवळीनेही मुस्लिम समाजात नवजागरणाचे प्रयत्न केले होते.

या सर्व मुस्लिम चळवळी हिंदूंच्या चळवळींइतपतही यशस्वी होऊ शकल्या नाहीत. त्यांना फारच लवकर अनपेक्षित व अनिष्ट वळण लागून राष्ट्राच्या दृष्टीने त्यांचा उपयोग होण्याऐवजी राष्ट्राचे नुकसानच झाले. वाहाबी चळवळ प्रारंभी ब्रिटिशविरोधी होती. मुस्लिमेतरांबद्दलची तिची भावना मैत्रीची व बंधुत्वाची होती. पण नेतृत्व बदलताच - चळवळीचा मोर्चा ब्रिटिशांऐवजी स्वकीय शीखांविरुद्ध वळला. मुस्लिम लीगनेही मुसलमानांची मने व बुद्धी आधुनिक व सहिष्णू करण्याऐवजी संकुचित व कडवी केली. त्यांच्यावर सांप्रदायिकतेचा व भ्रामक राष्ट्रवादाचा ठसा उमटवला, याचे पर्यवसान पाकिस्तानच्या निर्मितीत झाले.

## १.११ पारशी समजातील परिवर्तन

ब्रिटिश सत्तेचे पश्चिम भारतात आगमन व प्रसार झाला तेव्हा या नव्या आर्थिक व राजकीय सत्तेने पारशी समाजाला आकर्षित केले. गुजरातेतील अनेक पारशी कुटुंबे मुंबईत स्थिरावली. एतद्देशीय लोक व पाश्चात्य राज्यकर्ते यांच्यातील मध्यस्थाची फायदेशीर भूमिका; दुभाष्ये, आर्थिक प्रतिनिधी, उद्योजक (एन्टरप्रीनर्स) इत्यादींसाठी भारतीय नोकरवर्गाची राज्यकर्त्यांना भासलेली निकड; नव्या राजवटीखाली पारशांना लाभलेली आर्थिक सुस्थिती व प्रतिष्ठा; ब्रिटिशांच्या राजवटीत उपलब्ध असलेली अधिक वैधानिक सुरक्षितता; नव्या राज्यकर्त्यांचे धार्मिक सहिष्णुतेचे व हस्तक्षेप न करण्याचे धोरण अशा अनेक घटकांचा परिणाम पारशी समाजावर होऊन ते नव्या राजवटीकडे खेचले गेले.

मुंबई विद्यापीठाची प्रतिष्ठापना (१८५७) व औद्योगिकरणाचा प्रारंभ या दोन नव्या घटनांनी पारशांना शैक्षणिक व तंत्रज्ञानात्मक व्यवसायांचे क्षेत्र उपलब्ध झाले. मुंबईच्या औद्योगिक क्षेत्रात विशेषतः कापड धंद्यात आपला पैसा व बुद्धिमत्ता गुंतविण्यास पारशी धनिक व्यापारी सर्वांत पुढे राहिले.

पारशी समाजाच्या परिवर्तनातील अत्यंत महत्त्वाची बाब म्हणून या समाजाच्या परोपकारबुद्धीचा (चॅरिटी) उल्लेख करावा लागेल. आकाराने लहान असून रचनेने एकजिनसी असलेल्या या समाजात सधनांची संख्या तुलनेने मोठी होती. कायम अल्पसंख्यांक समूहाचा दर्जा त्याला लाभल्यामुळे शासनावलंबनापेक्षा स्वावलंबनावर या समाजाचा अधिक भर होता. यापेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे या समाजातील धनिकांना आपल्या सामाजिक दायित्वाची जाणीव सदैव होती. हिंदू व पारशी समाजामधल्या धनिकांच्या वृत्ती - प्रवृत्तींमध्ये एक ठळक फरक होता.हिंदू धनिकांनी आपले मत देवळांवर व धार्मिक उत्सवांवरच बव्हंशी उधळले तर पारशी धनिकांनी दीर्घकालीन सार्वजनिक कल्याणाच्या कार्यासाठी देणग्या दिल्या. पारशी परोपकारबुद्धीच्या या वैशिष्टांच्या प्रत्यय प्रामुख्याने शिक्षणक्षेत्रात दिसून येतो. सर जमशेटजी जीजीभॉय, सर दिनशा माणेकजी पेटिट, सर कावसजी जहांगीर, अशी कित्येक नावे इस्पितळे, शाळा, ग्रंथालये, विद्यापीठ इमारती, कला - दालने इत्यादींशी संलग्न झाली आहेत. इंग्रजी शिक्षण हे इंग्रजी राजवटीचे सर्वश्रेष्ठ वरदान असल्याची त्याची भावना होती. नव्या शिक्षणाबद्दलच्या या जिज्ञासू भूमिकेमुळे साहजिकच हा समाज इतर समाजापेक्षा पुढे सरसावला. वरिष्ठ पातळ्यांवरच्या व्यावसायिक जागा मोठ्या प्रमाणावर त्याला पटकावता आल्या. दुसरा फायदा असा झाला की सामाजिक आणि धार्मिक सुधारणांची निकड या समाजाला तीव्रतेने जाणवली. दादाभाई नवरोजींच्या नेतृत्वाखाली तरुणांचा एक सुधारक संघ उभा राहिला. 'सर जमशेटजी जीजीभाई पारसी बेनव्होलन्ट इन्स्टिटय़ूशन' ने शिक्षण क्षेत्रांत फार प्रचंड कामगिरी केली.

पारशांचे हे कार्य त्यांच्या समाजापुरते मर्यादित नव्हते. इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्स, बंगलोर (१९०९), सर दोराबजी टाटा ग्रॅज्युएट स्कूल ऑफ सोशल वर्क (१९३६), टाटा इन्स्टिटय़ूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (१९४५) अशा अनेक संस्थांची नावे सांगता येतील. यांची प्रतिष्ठापना पारशांनी केली असली तरी त्या सर्व समाजांतील हुशार विद्यार्थ्यांसाठी खुल्या होत्या व आहेत. आपल्या समाजात एका पिढीच्या काळात जी प्रगती घडून आली ती तशाच शिक्षण व प्रचाराद्वारे हिंदू व मुस्लिम समाजातही घडवून आणली जाऊ शकेल अशी पारशांना

आशा होती. पारशी सुधारकांमध्ये अखिल भारतीय समाजाच्या उत्कर्षासाठी धडपड करण्याची जी प्रेरणा दृष्टोत्पत्तीस येते तिचे मूळ, राज्यकर्त्यांच्या संबंधित जबाबदारीचे आपण भागीदार आहोत या जाणिवेत असावे. १८५७ सालीच 'हिंदूमध्ये विधवा पुनर्विवाहास प्रारंभ' अशा विषयांवर पारशी लोक लेख प्रसृत करीत होते. बेहरामजी एम. मलबारी (१८५३-१९१२) या पारशी हिंदू - सुधारकाचे नाव सर्वश्रुत आहे. सामाजिक परंपरांनी पददलित करुन सोडलेल्या भारतीय स्त्रीच्या उत्कर्षासाठी त्याने आपले आयुष्य वेचले. बालविवाह व आनुषंगिक बालवैधव्यावर प्रखर कोरडे ओढले. 'दि इंडियन स्पेक्टेटर' या आपल्या वृत्तपत्राद्वारे सामाजिक सुधारणेच्या कायद्यासाठी प्रयत्न केले.

राजकर्त्यांशी जवळून संबंध आणि त्यांच्या भाषेशी, रीतींशी व संस्कृतीशी दृढ परिचय यामुळे या देशाच्या तत्कालीन राजकारणात पारशी समाजाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. बहुसंख्य संस्थानिकांनी आपल्या प्रशासनातील वरिष्ठ जागा पारशांना दिल्या होत्या, प्रशासन - सुधारणा, ब्रिटिश राज्यकर्त्यांशी राजनैतिक संबंध अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविल्या होत्या. तद्वतच बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन या महत्त्वाच्या संघटनेच्या अध्यक्षपदी सुमारे ५० वर्षे पारशी नेते होते. जीजीभॉय, फिरोजशहा मेहता, डी. डब्ल्यू. वाछा, दादाभाई नवरोजी ही त्यातली काही उल्लेखनीय नावे. काँग्रेसच्या नेमस्त राजकारणातही पारशी नेतृत्त्वाचा महत्त्वाचा ठसा उमटला आहे.

**योगदान :** विविध समाजांसंबंधीच्या वरील चर्चेमधून एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट होते की त्यांनी १) भारतीयांच्या मनांवर आधुनिकतेचे, बुद्धिप्रामाण्याचे व स्वाभिमानाचे संस्कार बऱ्याच प्रमाणात केले. बुद्धी आणि तर्काच्या कसोट्यांवर रुढींचे व अंधश्रद्धांचे कठोर परीक्षण केले. २) विश्वबंधुत्व व धार्मिक सहिष्णुता ही नवी तत्त्वे समाजात रुजवली. राजकीय जागृतीचा पाया घातला. देशभक्तीची भारतीयांना प्रेरणा दिली. कट्टर परंपराभिमानी राष्ट्रकल्पनेने चळवळ जोम धरु लागली.

या चळवळीसाठी अनुरुप अशी भौगोलिक चौकट इंग्रज राज्यकर्त्यांनी आधीच निर्माण करुन ठेवली होती. देशाचे राजकीय एकत्रीकरण करुन एकाच प्रशासनयंत्रणेखाली त्यांनी देशाला आणले होते. देशभर एकसारखी विधिव्यवस्था लागू करुन त्यांनी प्रभावी सामाजिक शासनाखाली सर्व भारतीयांना आणून व त्यांचा पश्चिमी विचारांशी परिचय घडवून तर ब्रिटिशांनी भारतीयांमध्ये राष्ट्रभावना जागवलीच.

उदारमतवाद्यांचे अनेक राजकीय गैरसमज झाले. हिंदुस्थान ही ब्रिटिश भांडवलदारांची एक वसाहत आहे आणि म्हणून इंग्रज राज्यकर्ते या देशाची मुक्त आर्थिक प्रगती कधीच होऊ देणे शक्य नाही ही बाब त्यांनी ओळखलीच नाही. या देशाचा आर्थिक विकास थांबवून धरणेच ब्रिटिश भांडवलदारांच्या हिताचे होत. ब्रिटिशांच्या व भारतीयांच्या हितसंबंधांमधील अंतर्विरोध नेमस्तांच्या ध्यानातच आला नाही. नेमस्तांची अशी मूलभूत गफलत झाल्यामुळे त्यांची कारकीर्द, पूर्ण न झालेल्या मागण्यांची व वाढत गेलेल्या भ्रमनिरासांची कारकीर्द ठरली.

१९०५-०७ पासून काँग्रेसमध्ये जहालांचे वर्चस्व प्रस्थापित होऊ लागले. नेमस्तांचे मार्ग निष्फळ ठरत होते. तेव्हा निराळ्याच मार्गाचा संदेश घेऊन जहाल नेतृत्त्व राजकीय क्षितिजावर उगवले. हा मार्ग क्रांतिकारक होता. सनसनाटी होता नि म्हणूनच आकर्षक होता. जनता त्यांच्या

ओजस्वी आवाहनांमुळे चळवळीकडे खेचली गेली. भारताच्या भूकालीन वैभवाचा व संपन्न परंपरांचा अभिमान, हिंदु धर्मांचे चिरंजीवित्व व स्थलकालाबाधित श्रेष्ठत्व आणि राजकारणांचे धर्मीकरण हे जहालांचे काही मार्ग होते. धर्मभावनेच्या बळावर जनसंघटन करणे व राष्ट्रमुक्तीची प्रेरणा देणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. इतर धर्मांपेक्षा हिंदू धर्म कसा श्रेष्ठ आहे याची परोपरीने भिन्न आधारांवर स्पष्टीकरणे जहाल नेत्यांनी दिली. राष्ट्राची 'भारतमाता' ही प्रतिमा निर्माण करुन त्या मातृभूमीसाठी पडेल तो त्याग करण्याची समर्पणवृत्ती विशेषतः तरुणांमध्ये निर्माण करण्यात जहालांनी यश मिळवले. राष्ट्रवाद हा त्यांच्यासाठी एक ईश्वरदत्त धर्म होऊन बसला होता. पश्चिमेच्या भौतिकवादाचे अंधानुकरण करण्यात स्वत्वाचा, आत्मश्रेष्ठत्वाचा कसा ऱ्हास आहे हे त्यांनी स्पष्ट केले व त्यामधून पाश्चात्य संस्कृतीविरुद्ध व पर्यायाने सत्तेविरुद्ध घृणा निर्माण करण्यात यश मिळवले होते. इंग्लडंच्या उदारमतवादावर त्यांचा विश्वास नव्हता. प्रजेच्या न्याय्य मागण्या चिरडण्यासाठी पाशवी बळाचा वापर करणाऱ्या या राज्यकर्त्यांचा प्रतिकार तितक्याच प्रभावी सामर्थ्याने करण्यासाठी संघटित झाले पाहिजे असा इशारा त्यांनी दिला होता.

नेमस्तांपेक्षा जहालांनी चळवळीला अधिक लोकाभिमुख केले हे खरे; तरी पण, अजूनही ही लोकांची चळवळ झाली नव्हती. जहालांच्या हालचाली भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र व बंगाल या दोन प्रांतापुरत्याच मर्यादित राहिल्या; आणि तिथेही फक्त शहरी मध्यमवर्गांपर्यंतच चळवळ पोहोचू शकली. त्यापेक्षा खाली तिचे अभिसरण झाले नाही. जहालांच्या तत्त्वज्ञानापासून प्रेरणा घेऊन उभ्या राहिलेल्या अधिक संतप्त, झुंजार व ज्वलज्जहाल क्रांतिकारक दहशतवाद्यांच्या राजकारणाच्याही मर्यादा स्पष्ट झाल्या होत्या. नेमस्तांच्या व जहालांच्या परस्परविरुद्ध मार्गांच्या मधून जाणाऱ्या तिसऱ्याच मार्गाची तिला आवश्यकता भासत होती. गांधींच्या नेतृत्त्वाने ही तिची अपेक्षा पूर्ण केली. त्यांनी उदारमतवादी तत्त्वांचा धिक्कार केला नाही. अहिंसा, सत्याग्रह, सविनय कायदेभंग इत्यादी शांततामय प्रतिकाराचे मार्ग त्यांनी पुरस्कारिले. यामुळे उदारमतवाद्यांना ते आपलेसे वाटले. त्याचबरोबर आत्मप्रतिष्ठा व स्वाभिमान इत्यादींवर भर दिल्याने जहालांनाही ते जवळचे वाटले. समन्वय हा गांधींच्या नेतृत्त्वांचा सगळ्याच क्षेत्रांमध्ये एक प्रमुख आधार होता. त्यामुळे त्यांनी ही चळवळ कोट्यवधींची चळवळ करुन टाकली.

## १.१२ भारतीय प्रबोधनाच्या मर्यादा

**१)** या देशातील प्रबोधनात आध्यात्मिकतेचा प्रवाह प्रभावी ठरल्यामुळे, इतर अनेक क्षेत्रांत या प्रबोधनाने स्पर्श केला असला तरी त्याचे स्वरुप मूलतः आध्यात्मिकच राहिले आहे. सामाजिक - राजकीय विचारांत पारंपरिक धार्मिक कल्पनांचेच पुनर्जीवन करण्याचा जोरकस प्रयत्न इथे प्रामुख्याने झालेला दिसतो. बुद्धिप्रामाण्याची कास धरुन नीतिमूल्ये निर्धारित करण्याऐवजी परंपरेतूनच ती शोधण्याचा प्रयत्न इथे केला गेला. त्यामुळे परंपरेला चिकटलेल्या अंधश्रद्धा, पूर्वग्रह व अज्ञान इथल्या समाजमानसात तसेच रुतून बसलेले राहिले. सुधारकांचे प्रयत्न त्यांचे उच्चाटन करण्यास अपुरे पडले आणि प्रबोधनाला मर्यादा पडल्या.

**२)** माणूस स्वतःच स्वतःची मूल्ये निर्माण करतो. आपल्या स्वतःच्या भाग्याचा तो विधाता असतो. त्याला अंगभूत अशी प्रतिष्ठा असते, हा विचार जोपर्यंत या समाजाच्या अंगवळणी पडत नाही. तोपर्यंत हा समाज जन्मनिष्ठ विषमता व कर्मसिदधांतांसारख्या तर्कदुष्ट विचारांच्याच तावडीत अडकून बसेल. प्रबोधन त्याच्यापासून कित्येक योजने दूर राहील. कारण कोणत्याही

गोष्टीकडे पाहण्याचा हा 'मानवी' दृष्टिकोण हाच तर प्रबोधनाचा पाया असतो. माणसाचे आध्यात्मिक जीवन व ऐहिक - जीवन यांच्यात एक अभेद्य भिंत निर्माण करुन नीतिमूल्ये समाजाच्या ऐहिक हिताच्या दृष्टीने ठरविली जाणे ही प्रबोधनाची पहिली निकड आहे. प्रोटेस्टंटवादाने युरोपात हे साध्य केले. भारतात ते पुरेशा प्रमाणात घडू शकले नाही.

**३)** हिंदुधर्मसुधारणेचे प्रयत्न करणारे 'समाज' भारतीय समाजावर चिरकाल टिकू शकणारे परिणाम करण्यास असमर्थ ठरले. त्यांच्या या अपयशाची अनेक कारणे सांगता येतील. उदाहरणार्थ, तत्त्वज्ञान व पद्धती याबाबत त्यांनी केलेल्या ख्रिस्ती अनुकरणामुळे ते 'समाज' लोकांना परके वाटत राहिले. जनतेत स्वतःबद्दल आदर वा आत्मीयता निर्माण करण्याचे त्यांनी खास प्रयत्नही केल्याचे आढळत नाही. त्यांच्या आचारविचारांत एकवाक्यता क्वचितच दिसून येत असे. स्वमतानुसार वागण्याचे ध्येय सामाजिक रोष सोसण्याची त्यांच्या कार्यकर्त्यांपैकी अनेकांची तयारी नव्हती. धर्मक्रांतीचे हे उद्योग लोकापवादाला भिऊन त्यामुळेच गुप्तपणे चालत असत. हे सर्व धर्मसुधारक परसत्तेचे ताबेदार बनले होते.

**४)** स्वतःच्या कूपमंडुक परंपरांच्या जोखडातून मुक्त झाल्याखेरीज कोणत्याच धर्माची व्यक्ती अन्य धर्मांना समजावून घेऊ शकत नाही. 'युरोपात हे घडले. स्वतःच्या परंपरेतून बाहेर पडल्यामुळे युरोपीय समाज इतर सामाजिक परंपरांचे व इतिहासाचे तटस्थतेने आकलन करायला मोकळा व समर्थ झाला.' इथे मात्र हिंदू आणि मुसलमान वर्षानुवर्षे सोबत राहूनही परस्परांना समजावून घेण्यास असमर्थ आहेत. एवढी वर्षे प्रबोधन चालूनही हिंदूमुस्लिम ऐक्याचा प्रश्न अजून सुटू शकलेला नाही. मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाचे पुरेसे प्रयत्नच न झाल्यामुळे सर्वांचे प्रयत्न या संदर्भात तोकडे पडले. जोपर्यंत इस्लामच्या परंपरेचा पगडा मुस्लिम मनावर आहे तोपर्यंत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आणि आधुनिक संकल्पनांचा ते स्वीकार करुच शकणार नाहीत.

**५)** इंग्रजांचा सहवास जसा या देशातील प्रबोधनास कारणीभूत झाला त्याचप्रमाणे त्यांचे साम्राज्य हे प्रबोधन उथळ ठेवण्यास कारणीभूत झाले. त्यांच्यामुळे प्रबोधन शक्य झाले, पण त्यांनीच त्याची वाढ खुरटून टाकली. त्यांचे वासाहतिक आर्थिक धोरण आणि व्यापारी स्वार्थ प्रबोधनविस्ताराला प्रतिबंधक ठरला.

या व अशा अनेक कारणांमुळे या समाजात प्रबोधनाला पाठिंबा देणारा सधन व्यापारी वर्ग पुरेशा प्रमाणात निर्माण होऊच शकला नाही.

**६)** कायद्याने ही सुधारणा व्हायची तर स्वतः राज्यकर्ते तसे कायदे करण्यास नाराज आणि रयतही परकीय सरकारने सामाजिक क्षेत्रात कायदे करु नयेत अशा भूमिकेची! हे नवजागरण पश्चिमेकडून येत आहे म्हणूनही त्याच्याकडे पाठ फिरवणारांचा वर्ग लहान नव्हता. शिक्षण - प्रसार करणारे हे मिशनऱ्यांचे हस्तक आहेत, राज्यकर्त्यांचे पक्षपाती आहेत अशी ही धारणा प्रबळ होती. खरी परंपरा मुद्याम लपवून आधुनिक काळाला सुसंगत असे तिचे स्वरुप मांडून कित्येक सनातनी नेत्यांनी प्रबोधनकारांना वाळीत टाकले होते. म्हणजे प्रबोधनकारांजवळ सत्ता - मालमत्ता नव्हती, समाजातील प्रतिष्ठितांचे पाठबळ नव्हते. राज्यकर्त्यांचा अनुग्रह नव्हता आणि ज्या जनतेसाठी ते करायचे ती रुढिग्रस्त जनता त्यांच्या कार्याला सक्रिय प्रतिसाद देणे तर दूरच, उलट त्या कार्याकडे साधे सहानुभूतीने पाहू सुद्धा शकली नाही. परकीय सत्ता व स्वकीय वर्गवर्चस्व ही प्रबोधनाला उत्तरोत्तर क्षीण करणारी दुष्ट सामर्थ्ये ठरली.

**७)** प्रबोधन कल्पनेत अभिप्रेत विशालता व जिज्ञासा यांचाही एकूण अभावच या देशातील प्रबोधनात जाणवतो. समाजातील बहुसंख्याकांचे त्या प्रबोधनाला पाठबळ नव्हते. म्हणून ते प्रबोधन नेहमीकरिताच वरवरचे, परके आणि दुबळे राहिले आहे. शिक्षण घेतलेला व प्रेरणा पावलेला वर्ग समाजापासून तुटक राहिला आहे. केवळ शालेय, महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन शिक्षण घेऊन या समाजाच्या परंपराकडे ऐतिहासिक समीक्षेच्या चष्म्यातून पाहण्याची कुवत या तरुणांच्या ठिकाणी येऊच शकली नाही.

**८)** पुढे पुढे तर समाजप्रबोधनाच्या कार्याची बव्हंशी उपेक्षाच घडली. स्वातंत्र्याच्या राजकीय उद्दिष्टावरच लक्ष केंद्रित झाले. गांधींच्या कार्यक्रमात काही सामाजिक चळवळी होत्या, पण एकूण त्यांचे स्थान गौण होते. इंग्रजी सत्तेचे उच्चाटण करण्यासाठी हा समाजाचे सामाजिक, वैचारिक व सांस्कृतिक जागरण आवश्यक आहे हा विचार नेमस्तांबरोबरच मागे पडला होता. राजकीय क्रांती जर सामाजिक क्रांतीत परिवर्तित होणार नसेल तर तिचे मूल्य शून्य, हा विचार मानवेंद्रनाथ रॉय यांनी मांडला आणि त्या दोन्ही क्रांतींच्या यशासाठी वैचारिक क्रांतीचे महत्त्व त्यांनी प्रतिपादन केले.

## १.१३ प्रश्न

१) प्रबोधन संकल्पना स्पष्ट करा.

२) भारतीय प्रबोधनामध्ये विविध समाज आणि संघटनांच्या योगदानाचे मुल्यमापन करा.

३) भारतीय प्रबोधनाच्या मर्यादा स्पष्ट करा.

## १.१४ संदर्भ

१) मे. पु. रेगे 'प्रबोधनाचे स्वरुप'.

२) जावडेकर आचार्य - आधुनिक भारत.

३) बेडेकर दि. के. - महाराष्ट्र जीवन, खंड पहिला.

४) मुकर्जी क्षितिमोहन - भारतीय प्रबोधनाची वाटचाल.

५) भणगे, भां. शं. - संपादकीय - भारतीय प्रबोधन.

❖❖❖❖

# २

# राजा राममोहन रॉय (१७७२-१८३३)

**घटक रचना :**

२.० प्रस्तावना - परिचय - राजा राममोहन रॉय
२.१ राजकीय विचारांचा आधार
२.२ ब्रिटिश राजवटीविषयी त्यांची मते
२.३ स्वतंत्रता विषयक मते
२.४ नागरी हक्कविषयक मते
२.५ लेखन व मुद्रण स्वातंत्र्य विषयक मते
२.६ धार्मिक स्वातंत्र्य विषयक मते
२.७ शिक्षणविषयक मते
२.८ स्त्रियांचे हक्क यासंबंधी विचार
२.९ नागरी हक्क सुरक्षित करण्याच्या दृष्टीने सुचविलेले उपाय
२.१० कायद्यासंबंधी विचार
२.११ महसूल व न्यायपद्धती संबंधीचे विचार
२.१२ मुल्यमापन
२.१३ प्रश्न

## २.० प्रस्तावना

**परिचय** - राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगाल प्रांताच्या हुगळी जिल्ह्यातील राधानगर नावाच्या खेड्यात झाला. राममोहन यांचे कुटुंब अत्यंत सनातनी होते. त्यांचे वडील वैष्णव पंथाचे, शास्त्रवचन प्रमाण मानून त्याप्रमाणे आचरण करणारे होते. राममोहन यांचे प्राथमिक शिक्षण गुरुकुलात झाले. त्यांनी इस्लामी अध्यात्मविद्या व समाजशास्त्रांचा अभ्यास केला होता. बुद्धिप्रामाण्यवादी (Rationalism) विचारप्रवाहांनी ते प्रभावित होते. हिंदुमध्ये असलेल्या अंधश्रद्धा, मूर्तिपूजा, अनेकेश्वरवाद याविषयी त्यांना चीड होती. सनातनी वडिलांना राममोहनांचे हे विचार न आवडून त्यांनी त्यांना घराबाहेर घालवले. त्यानंतर राममोहन यांनी सर्व धर्माच्या शिकवणुकींचा तौलनिक अभ्यास केला. आणि त्यानंतर समाजशिक्षणाचे कार्य त्यांनी अंगीकारले. सामाजिक दोष दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे समाजात बुद्धिप्रामाण्याचा विकास करणे हा आहे अशी त्यांची खात्री झाली होती. धार्मिक विचारांच्या क्रांतीपासून सामाजिक

आणि राजकीय प्रगतीची क्रांती होऊ शकेल असा त्यांचा विश्वास होता. धर्मचर्चा करण्याची त्यांची खास शैली होती. शास्त्रवचने घ्यायचे, नंतर त्यांची वैधता आणि अधिकृतताच आव्हानित करायची, फेरतपासणी करायची आणि निष्कर्ष काढायचा ही मीमांसापद्धती त्यांनी यासाठी अंगीकारली होती. ऐतिहासिक सत्यांच्या आधारे युक्तिवाद करणे हाही त्यांच्या शैलीचा खास गुण मानावा लागेल. मध्ययुगीन इतिहासापासून तर समकालीन इंग्रजी राजवटीतील ऐतिहासिक दाखल्यापर्यंतचे आधार देऊन त्यांनी केलेली विवेचने अतिशय प्रभावी झाली आहेत.

वडिलांच्या मृत्यूनंतर मुर्शिदाबादेस येऊन राममोहनने फार्सी भाषेत 'तोअफत-उल-मुवाहिद्दीन' (एकेश्वरवाद्यांसाठी नजराणा) या नावाचा एक प्रबंध लिहिला. त्यात आपल्या भ्रमंतीतील अनुभवांच्या आधारे म्हटले आहे की, इतक्या भिन्न धर्मांची माणसे भेटली तरी एक गोष्ट सर्वांमध्ये समान दिसली आणि ती म्हणजे एका चिरंतन व सर्वश्रेष्ठ शक्तीवर सर्वांचा विश्वास आहे. खरे तर मानवी मनाची ही स्वाभाविक प्रवृत्तीच म्हणता येईल. याच विचारावर पुढे त्यांनी विश्वधर्माची कल्पना मांडली आहे.

हिंदू - इस्लाम - बौद्ध धर्मांचा त्यांचा अभ्यास झालेलाच होता. ईस्ट इंडिया कंपनीत दिवाणाच्या जागेवर लागल्यावर (१८०९) महसूल अधिकारी जॉन डिग्बी यांचे सहाय्यक म्हणून रंगपूर येथे त्यांना जावे लागते. तिथे त्यांनी तांत्रिक वाङ्मयाचा तसेच जैनांचा कल्पसूत्र व इतर धर्मग्रंथांचा अभ्यास केला. इंग्लंड व युरोपच्या राजकीय विकसनाचा परिचय करुवून घेतला. डिग्बींकडे येत असलेली सगळी नियतकालिके वाचून त्यांनी इंग्रजी भाषा उत्तमरीत्या अवगत केली. पाश्चात्य राजकीय विचारप्रवाह समजावून घेतले. डिग्बी मायदेशी परत गेल्यावर त्यांनी कंपनीतली नोकरी सोडली. आपल्या कार्याची सुरुवात केली (१८१४).

१८१५ मध्ये त्यांनी 'आत्मीय सभा' स्थापन केली. कुलीनतेच्या बुरख्याआड मुलींची विक्री करण्याची जी घृणास्पद प्रथा तेव्हा रुढ होती तिचा व जातिभेदाचा पाडाव करणे हे या सभेचे उद्दिष्ट होते. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या अधिकारांच्या पुनर्प्राप्तीसाठीही सभेने प्रयत्न केले. १८१८ साली सतीच्या चालीविरुद्ध पहिला प्रबंध लिहून त्यांनी हिंदु - समाजातील या अत्यंत पाशवी क्रूर पद्धतीवर टीकास्त्र सोडले. ती चाल तर अत्यंत भीषण होतीच पण ती चालू ठेवण्यात आपण पुण्यसंचय करतो अशी समाजाची जी धारणा झाली होती ती रॉयना अधिकच अस्वस्थ करीत होती. त्यामुळे रॉयना स्वाभाविकच विरोध झाला. तो विरोध दुहेरी होता, एकीकडून इंग्रजी सनातनीपणाचे व वासाहतिक वृत्तीचे मुखपत्र असलेले 'जॉन बुल' हे नियतकालिक त्यांच्याविरुद्ध आग पाखडीत होते, तर दुसरीकडून हिंदू सनातनीपणाचे बंगाली मुखपत्र 'समाचार - दर्शन' ही त्यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठवीत होते. हिंदूची धर्मसभासुद्धा राममोहनांचा निषेध करीतच होती. तरी खचून न जाता ते आपल्या कार्याला चिकटून होते. १८२१ साली त्यांनी 'कलकत्ता युनिटेरियन असोसिएशन' स्थापन केली. तिचा आर्थिक भारही स्वतःच पेलला. तिचे प्रायेजन म्हणजे एतद्देशीयांचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे हे होते. संस्थेची उद्दिष्टे अत्यंत आधुनिक होती. राममोहनांचे हे वैशिष्ट्ये होते की, स्वतःते अतिशय धार्मिक वृत्तीचे असूनही त्यांनी भौतिक - आर्थिक बाबींकडे कधीच दुर्लक्ष केले नाही.

हिब्रू, ग्रीक, लॅटिन, इंग्रजी या सर्व भाषा आत्मसात करुन ख्रिस्ती धर्माचा त्यांनी अभ्यास केला. १८२० मध्ये त्यांनी 'दि प्रिसेप्टस ऑफ जीसस दि गाईड टु पीस अँड हॅपिनेस' हा लेख लिहिला त्यात त्यांनी ख्रिस्ती धर्मावर टिका केली. इंग्लंड-अमेरिका इत्यादी राष्ट्रांमध्ये

राममोहनांच्या विचारांचे स्वागतच झाले; कारण तेथील लोकांची खात्री पटली की ख्रिस्ती धर्म परक्यांचा म्हणून काही रॉय त्याच्यावर टीका करीत नाहीत तर सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करताना प्रत्येक धर्मातील व्यंगे छाटणे हा त्यांचा उपक्रमच आहे. हिंदू - इस्लाम, बौद्ध आणि ख्रिस्ती या सर्व धर्मांचा उत्तम तत्त्वांच्या व पद्धतींच्या समन्वयातून त्यांना अखिल मानवांसाठी असलेल्या एका विश्वात्मक धर्माची प्रतिष्ठापना करायची होती. पण ते करीत असताना त्यांची भूमिका भिन्न धर्मांमध्ये तडजोडी करणाराची नव्हती तर समन्वय घालणाराची होती ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. पुढे १८२८ मध्ये त्यांनी स्थापिलेल्या ब्राह्मसभेच्या (पुढे ब्राह्मोसमाज) विद्यमाने जे मंदिर उभारले होते त्यात कोणत्याच देवतेची मूर्ती नव्हती. प्रतिमा - प्रतिष्ठापनेस व बळी देण्यास मनाई होती. ते सर्वधर्मीयांसाठी खुले होते. आपापल्या धर्मांच्या प्रार्थना, तत्त्वचिन्तन व चर्चा इत्यादी करण्याचे सर्वांना स्वातंत्र्य होते. सर्व धर्मीयांना एकत्र भेटता यावे हाच मूळ हेतू यामागे होता.

१५ नोव्हेंबर १८३० रोजी सात समुद्र पार करुन (जे हिंदू - धर्मपरंपरेनुसार महापाप मानले जाई) रॉय इंग्लंडास गेले. दिल्लीच्या बादशहाचे निवेदन इंग्लंडच्या सम्राटाला सादर करणे, हाउस ऑफ कॉमन्ससमोर सतीबंदीबद्दलची विनंतीपत्रके मांडणे त्यांचे हेतू होते.

इंग्लंडमधून ते फ्रान्समध्ये गेले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वत्रीचा उद्घोष करणाऱ्या राष्ट्राबद्दल त्यांना नितांत आदर होता. तेथे दुर्दैवाने त्यांची प्रकृती बिघडली. ते इंग्लडला परतले आणि २७ सप्टेंबर १९३३ रोजी ब्रिस्टल शहरी त्यांचे निधन झाले.

## २.१ राजकीय विचारांचा आधार

रॉय यांच्या बुद्धिवादामुळे, विवेक दृष्टीमुळे व मानवमात्राबद्दलच्या कळवळयामुळे राममोहन बंगालच्या धार्मिक-राजकीय व सामाजिक प्रबोधनाचे अध्वर्यू ठरले. पाश्चात्य राज्यशास्त्राच्या इतिहासात ॲरिस्टॉटलचे जे स्थान आहे ते भारतातील राज्यशास्त्रीय विचारक्षेत्रात राममोहनाना द्यावे लागेल. अनेकदा त्यांच्या सामाजिक व धार्मिक विचारांकडेच आकर्षित झाल्यामुळे अभ्यासकांच्या नजरेतून त्यांचे राजकीय विचार निसटून जातात. त्यांचा मूळ पिंड तत्त्वज्ञानाचा होता. पण तत्त्वज्ञानाला त्यांनी राजकीय चिंतनाचीही जोड दिली. राजपूत वा मुसलमान राज्यकर्ते असताना राजकारण हा केवळ राज्यकर्त्यांचाच प्रदेश असे. जनसामान्यांचा कधीच नसे. जनतेला मतस्वातंत्र्य नव्हते. त्यामुळे लोकमतच अस्तित्वात नव्हते. अशा स्थितीत राजकीय चिंतन होऊच शकत नाही. इंग्रजी राजवट ही त्या मानाने राजकीय चिंतनासाठी अनुकूल ठरली. शिक्षणप्रसार होत होता. इंग्रजी जाणणारा वर्ग देशभर निर्माण झाला होता. सर्वांचे जीवित-वित्त सुरक्षित होते. व्यापक उदारमतवादी विचारांचे प्रवाह या परंपराबद्ध समाजातही नव्याने निर्माण होऊ लागले होते. यातून सामाजिक - धार्मिक - शैक्षणिक व राजकीय कार्यक्रम उभे राहिले व ते पार पाडणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी उभारली गेली. बंगालात राममोहनांभोवती जमलेल्या या समर्पित कार्यकर्त्यांची कित्येक नावे सांगता येतील. उदाहरणार्थ, द्वारकानाथ ठाकूर, कालीनाथ रॉय, वैकुंठनाथ रॉय, गौरीचरण बॅनर्जी, ताराचंद चक्रवर्ती इत्यादी.

राममोहनने आपल्या कार्याचा प्रारंभ धर्माला चिकटलेली बांडगुळे छाटण्यापासून केला. हिंदूच्या भ्रष्ट चालीरीती, भ्रमाधिष्ठित पाशवी रुढी व भारतीय मनाची झालेली कूपमंडुक वृत्ती यांच्यावर हल्ले चढविण्यातून केला. ग्रंथ प्रामाण्याच्या युगाविरुद्ध बंड करण्याचा मान आधुनिक काळात राजा राममोहन रॉय यांना द्यावा लागेल. त्यांनी धर्मसुधारणा करीत असता वेदान्तग्रंथांचा आधार घेतला असला तरी ते वेदांना किंवा कोणत्याच ग्रंथांना ईश्वरनिर्मित मानीत नाहीत. रॉय यांचे ध्येय केवळ धर्मसुधारणेपुरतेच मर्यादित नव्हते. तो त्यांच्या मते केवळ पाया होता. सामाजिक आणि राजकीय प्रगतीच्या उभारणीचा! अपेक्षित बदल धार्मिक व सामाजिक क्षेत्रात घडून आले तर या देशाच्या राजकीय विकसनाला फार मोठी चालना मिळेल अशी त्यांना खात्री होती.

## २.२ ब्रिटिश राजवटीविषयी त्यांची मते (THIS PEPEPTION ABOUT THE BRITISHRAJ)

राममोहनने भारताच्या राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार का केला नाही असे काही टीकाकार विचारतात अन्य देशांच्या स्वातंत्र्यलढ्यांबद्दल विलक्षण आत्मीयता असलेल्या या माणसाच्या विचारात भारताच्या स्वातंत्र्याचा उल्लेख नाही, उलट मराठा व शीख जेव्हा आपापल्यापरीने साम्राज्याशी लढत होते तेव्हा रॉय साम्राज्याचे गुणगान करीत होते.

१) कारण रॉय यांचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोण व्यक्त होतो. स्वप्नरंजनात रमणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. स्वकीयांच्या मर्यादा त्यांना माहीत होत्या. त्या नजरेआड करणे त्यांना अशक्य होत होते. भारतात जागरुक लोकमत आहे वा प्रखर राष्ट्रभक्तीची भावना आहे अशी त्यांची स्वतःचीही खात्री होऊ शकली नसावी. मग स्वातंत्र्य व स्वायत्त विधिमंडळे मागायची तरी कशासाठी? व कशाच्या जोरावर? ज्या गोष्टींसाठी भारतीय पात्र आहेत त्यांच्या (उदा. राजकीय - सामाजिक हक्क वगैरे) मागण्या रॉय करीतच होते. याखेरीज आणखी एक विचार रॉय यांच्या मनात प्रबळ होता आणि तो म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या भारतावर होत असलेल्या व भावी काळातही होणार असलेल्या प्रभावाचा! इंग्रजांनी या देशात प्रथमच कायद्याचे राज्य (रुल ऑफ लॉ) प्रस्थापित केले. कायद्याच्या दृष्टीने सर्व व्यक्ती समान (इक्कालिटी बिफोर दि लॉ) हे तत्त्व रुढ केले.

२) रॉयना ब्रिटिश सत्तेबद्दल खूप आदर होता. तो या जाणिवेमधूनच प्रामुख्याने निर्माण झाला होता की या देशांतील आधीच्या राज्यकर्त्यांपेक्षा हे राज्यकर्ते खूप निराळे आहेत. त्यांनी आधीच्या राज्यकर्त्यांच्या जुलूमांतून एतद्देशीयांना मुक्त केले आहे. पूर्वी कधीच लोक आपल्या नागरी हक्कांचा उपभोग इतक्या समाधानकारकपणे घेऊ शकत नव्हते. कालांतराने जेव्हा भारतीय लोक स्वातंत्र्यास व लोकशाहीस पात्र होतील तेव्हा इंग्रजांनी त्यांना स्वातंत्र्य द्यावे व ते देतीलही अशी खात्री रॉयना होती आणि भोवतालची स्थिती पाहता तीत अपेक्षित सुधारणा घडून येण्यास शतकानुशतके लागतील असे त्यांना (वा कोणालाही) वाटणे अस्वाभाविक नव्हते. म्हणूनच हे साम्राज्य शतकांसाठी या भूमीवर राहावे अशी प्रार्थना या आद्य - प्रबोधनकाराने केलेली दिसते.

३) रॉय यांच्या मनाची बैठक तत्त्वज्ञाची असल्यामुळे क्रांतिकारक मार्गांनी स्वातंत्र्य संपादन करण्याची कल्पना त्यांच्या मनाला शिवू शकली नाही. त्यांना हा विवेक राहू शकला की, कोणत्याही अधिकारांचे अस्तित्व राज्यातच संभवते, राज्याबाहेर नव्हे. आजच इंग्रज या देशाला

स्वातंत्र्य देऊन निघून गेले तर इथे अराजक माजेल. राजकीय तर सोडाच पण सामाजिक, धार्मिक हक्कांनाही अस्तित्व उरणार नाही. म्हणूनही साम्राज्याची तरफदारी त्यांनी केली असावी.

४) एकीकडे इंग्रजी साम्राज्याचे गोडवे गात असतानाच दुसरीकडे भारताला स्वातंत्र्य का गमवावे लागले याची अंतर्मुख होऊन कारणमीमांसाही रॉयनी केली आहे. तत्कालीन राज्यकर्त्यांच्या आपापसातील यादवीमुळे व नामर्दपणामुळे, प्रगत युद्धतंत्राच्या व शास्त्राच्या अज्ञानामुळे, देशात राष्ट्रभक्तीच्या असलेल्या अभावामुळे, धार्मिक व सभ्यताविषयक अतिरेकीपणामुळे, त्याचप्रमाणे जातीयतेच्या संकुचित बंधनांनी समाजजीवन विदीर्ण झाल्यामुळे या देशाच्या स्वातंत्र्याचे अपहरण झाले व इंग्रज या देशात साम्राज्य प्रस्थापित करु शकले. स्वातंत्र्यापहरणाचे हे निदान केल्यानंतर त्यासंबंधी उपाययोजना करण्यातच त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले.

## २.३ स्वातंत्र्यविषयक मते (IDEAS ABOUT LIBERTY)

१) स्वतंत्रता हा मानवाचा अतिमौल्यवान ठेवा आहे याची जाणीव राजा राममोहन रॉय यांना होती. जीवनाच्या विभिन्न क्षेत्रांत रॉयनी जे कार्य केले त्या सर्वामागील अंत:प्रेरणा स्वतंत्रता होती. 'स्वातंत्र्यप्रेम कदाचित त्यांच्या मनाची सर्वात प्रखर भावना असावी. स्वातंत्र्य केवळ शरीराचे नव्हे, तर मनाचेही! केवळ कृतीचेच नव्हे, तर विचारांचेही! समाजातील व्यक्तिगत स्थान, वंश, घराणे, पायंडे, धर्म इत्यादी गोष्टींनी स्वातंत्र्यावर घातलेल्या जाचक बंधनांना तोडून त्यांनी पायदळी तुडवले. त्यांच्या वाटेत जे अडथळे आले त्यांच्यावर त्यांनी मात केली. त्यांच्या मानसिक स्वातंत्र्यावर अप्रत्यक्षपणे जरी कोणी अतिक्रमण केले, तरी त्यांनी त्याचा दुर्दम्य खंबीरपणाने प्रतिकार केला. अशा अतिक्रमणामुळे त्यांना दु:ख होई, अपमान वाटे. त्यांच्या असीम स्वातंत्र्याप्रेमाचाच आविष्कार त्यांच्या विविध कार्यातून प्रत्ययास येतो. धार्मिक क्षेत्रात त्या प्रेमाने मूर्तिपूजाविरोध, अंधश्रद्धानिर्मूलन असे स्वरुप धारण केले. सामाजिक क्षेत्रात सती, बहुपत्नीत्व इत्यादी सामाजिक अनिष्टांशी झुंज करण्यातून ते प्रेम व्यक्त झाले, तर राजकीय क्षेत्रात भारतीयांच्या नागरी व धार्मिक हक्कांना त्यांनी मागितलेल्या संरक्षणाच्या स्वरुपात, स्त्रियांच्या न्याय हक्कांसाठी व समान दर्जासाठी त्यांनी केलेल्या आवाहनांच्या स्वरुपात किंवा या सर्व हक्कांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने न्यायालयीन व प्रशासकीय अधिकारांची विभागणी व्हावी या त्यांनी धरलेल्या आग्रहाच्या स्वरुपात त्यांचे हे स्वातंत्र्यप्रेमच आविष्कृत झालेले दिसून येते.'

त्यांची आदर्श धर्मकल्पना ही जशी विश्‍वात्मक धर्माची आहे त्याचप्रमाणे त्यांची स्वातंत्र्यलालसासुद्धा विश्‍वात्मक स्वरुपाची आहे. कोणत्याही विशिष्ट देशापुरती वा समाजापुरती ती मर्यादित नाही. स्वत:च्या हक्कांबद्दल सावध राहणाऱ्या या विचारवंताच्या मनात भोवतालच्या व्यक्तींच्याच नव्हे तर राष्ट्रांच्याही स्वतंत्रेबद्दल नितांत आदर व सन्मान होता.

२) इंग्लंडमधील १८३२ च्या सुधारणा कायद्याला त्यांनी मन:पूर्वक पाठिंबा दिला होता. त्यांच्या मते तेव्हाचा संघर्ष हा सुधारक व सुधारणाविरोधक यांच्यातला, म्हणजेच पर्यायाने स्वातंत्र्य व जुलूम, न्याय व अन्याय, बरोबर व चूक यांच्यातील जागतिक संघर्षाचा एक भाग होता.

अप्रत्यक्षपणे का होईना या देशाला राजकीय स्वातंत्र्याचा पहिला संदेश राममोहननीच दिला. भारत परतंत्र झाला तेव्हा गुलामगिरीची ती भावना असह्य होऊन रॉय तिबेटात निघून गेले होते अशी बिपिनचंद्र पाल यांनी त्यांच्यासंबंधी सांगितलेली आठवण या संदर्भात लक्षणीय ठरते.

नव्या राजकर्त्यांचा, त्यांच्या चारित्र्याचा, संस्कृतीचा जसजसा जवळून परिचय झाला तसतशी तिरस्काराची ही भावना ओसरत गेली. त्या राज्यकर्त्यांचे गुण त्यांना जाणवू लागले आणि मग त्यांची अशी खात्री झाली की हे राज्य परक्यांचे असले तरी त्याच्यामार्फत भारतीयांचे दीर्घकालीन कल्याण होणार आहे. त्यांनी पुढे राज्यकर्त्यांना भारतसंबंधीच्या त्यांच्या नैतिक जबाबदारीचे नित्य - स्मरण दिले आहे. एवढे नव्हे तर अपेक्षित सुधारणांचे आराखडेही पुरविले आहेत.

## २.४ नागरी हक्काविषयक मते

राजा राममोहन रॉय यांनी इंग्रज राज्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे ती प्रामुख्याने त्यांनी भारतीयांना उपलब्ध करुन दिलेल्या नागरी हक्कांबद्दल! त्यांचे म्हणणे होते की आधीच्या राज्यकर्त्यांच्या काळात प्रजेला स्वातंत्र्य होते. पण राज्यसत्तने संरक्षिलेले नागरी हक्क मात्र नव्हते.

१) नागरी हक्क हे मानवाच्या विकासासाठी अत्यावश्यक असतात. एवढ्या एका अर्थाने ते ‘नैसर्गिक’ असले तरी ते स्वयंसिद्ध वा अंगभूत असू शकत नाहीत. तर लोकशाहीच्या तत्त्वांच्या आधारे सुसंघटित झालेल्या समाजातच त्या हक्कांना स्थान असू शकते. भारत हे तेव्हा सार्वभौम लोकशाही राज्य नव्हते. तरीपण भारतीयांचे नागरी हक्क सुरक्षित होते आणि रॉय यांच्या मते याचे कारण म्हणजे भारताचे नवे राज्यकर्ते हे उदारमतवादी होते. इंग्लंडमधील प्रजेला जे नागरी व धार्मिक हक्क मिळतात ते सारे भारतीयांनाही उपलब्ध असल्याबद्दल रॉय यांनी समाधान व्यक्त केले होते.

२) नागरी हक्कांच्या यादीत ते पुढील हक्कांचा समावेश करतांना आढळतात. जगण्याचा हक्क, स्वतंत्रतेचा हक्क, धार्मिक हक्क, संपत्तीचा हक्क, शिक्षणाचा हक्क, मतस्वातंत्र्य इत्यादी. या सर्वांपैकी मतस्वातंत्र्याला त्यांनी सर्वाधिक प्राधान्य दिलेले दिसून येते. मतस्वातंत्र्य म्हणजे मनाच्या व बुद्धीच्या सर्जनशीलतेचे स्वातंत्र्य, आपली मते विचार विविध माध्यमांतून आविष्कृत करण्याचे स्वातंत्र्य, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य! या स्वातंत्र्याचे म्हणूनच त्यांना अनन्यसाधारण महत्त्व वाटत होते. या स्वातंत्र्यावर कोणीही अतिक्रमण करणे त्यांना सहन होत नसे. शासनाच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण केल्याचे प्रसंग घडताच रॉय यानी राजाकडे, संसदेकडे व सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितल्याची उदाहरणे आहेत. इंग्लंडच्या घटनेच्या मूलतत्त्वांच्या व इतिहासाच्या अध्ययनातून रॉय यांना हक्क सुरक्षित ठेवण्याचे महत्व पटले असावे. इंग्रज नागरिकांना देण्यात येणारे सुरक्षित नागरी अधिकार स्वदेशीयांनाही मिळावेत म्हणून त्यांनी केलेल्या प्रयत्नांची ती सुद्धा एक प्रेरणा असावी. माणूस म्हणून, बरोबरीच्या नात्याने न्याय्य व माणुसकीची वर्तणूक मिळावी, जीवित - वित्त सुरक्षित असावे एवढेच त्या काळचे मागणे होते. रॉय यांनी त्यांच्या जोरकस पाठपुरावा केला आहे.

## २.५ लेखन - मुद्रण स्वातंत्र्य विषयक

१) विचारस्वातंत्र्यावर व आविष्करणस्वातंत्र्यावर रॉय यांचा विशेष भर होता. वृत्तपत्रे ही या आविष्करणाची सर्वात प्रभावी साधने असतात. शासनामध्ये जे काही सर्वश्रेष्ठ व सर्वोत्कृष्ठ असेल ते आणि समाजाचे उद्‌बोधन केवळ स्वतंत्र व मुक्त वृत्तपत्रांद्वारेच शक्य होते असे रॉय

यांचे मत होते. स्वतः त्यांनी १८२१-२२ मध्ये बंगाली भाषेत 'संवाद - कौमुदी' व फार्सी भाषेत 'मीरत - उल - अख्बार' अशी दोन साप्ताहिके काढून संपादित केली होती. लॉर्ड हेस्टिंग्ज निवृत्त झाल्यावर गव्हर्नर जनरल पदावर तात्पुरते आलेल्या जॉन ॲडम्स यांनी वटहुकूम काढून असे जाहीर केले की, सर्व वर्तमानपत्रांच्या संपादकांना वा मालकांना शासनाकडून परवाने घ्यावे लागतील. स्थानिक कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हाती अचानकपणे या निर्णयामुळे एका अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रात अतिव्यापक स्वरुपाची कायदे करण्याची सत्ता येणार असल्यामुळे रॉय यांना तो निर्णय आक्षेपार्ह वाटला. त्या निर्णयाचे सर्वोच्च न्यायालयासमोर शिक्कामोर्तबासाठी आगमन होऊन दोन दिवसही होतात न होतात तोच राजा राममोहन रॉय, देवेंद्रनाथ ठाकूर, प्रसन्नकुमार ठाकूर व इतर तिघांनी सर्वोच्च न्यायालयाकडे व राजाच्या कौन्सिलकडे (किंग - इन् - कौन्सिल) एक विनंती अर्ज (पिटिशन) पाठवून स्थानिक शासनाच्या हाती ही सत्ता न देण्याबद्दल विनवले होते.

मुद्रणस्वातंत्र्याची रॉय यांनी मागणी शास्ते व शासित या दोहोंचेही हित लक्षात घेऊन केली होती. अमर्याद, अनियंत्रित अशा हक्कांचा त्यांनी कधीच पुरस्कार केला नव्हता. बदनामीविषयक कायद्याने (लॉ ऑफ लिबेल) घातलेल्या मर्यादा काढून टाकण्याची ते मुळीच मागणी करीत नाहीत; कारण त्यांचा हेतू शासन उलथून पाडणे हा नसून खरोखरीच त्याला बळकटी आणणे हा होता. स्वतंत्र वृत्तपत्रे हाताशी असली म्हणजे लोकांची मते, अपेक्षा व भावना अभिव्यक्त होऊ शकतात. कायदा लोकानुवर्ती करण्यासाठी या भांडवलाचा वापर राज्यकर्ते करु शकतात. वेळोवेळी लोकांच्या अडचणी मांडल्या जाऊन त्यांचे निराकरण होऊ शकते. त्या दुलर्क्षित राहण्यामधून शासनाबद्दलच्या संताप मनात साचत राहून संधी मिळताच त्याचा जो भीषण उद्रेक होऊ शकतो, त्याची शक्यता दूर होते. आपण प्रस्थापित केलेल्या व्यवस्था अपेक्षित त्या प्रमाणात यशस्वी होत आहेत की नाहीत? जनतेला त्यांचा कितपत उपयोग होत आहे? आपल्याला अत्युत्तम वाटणारे निर्णय काटेकोरपणे अंमलात येत आहेत की नाहीत? इत्यादी प्रश्नांची उत्तरे दूरस्थ शासनाला वर्तमानपत्रांच्या रकान्यांमधून मिळू शकतात.

## २.६ धार्मिक स्वातंत्र्य

१) राजा राममोहन रॉय धार्मिक सहिष्णुतेचे पुरस्कर्ते होते. ते स्वतः विश्वधर्माचे उपासक होते. पण सर्वांनाच या धर्माचे अनुयायित्व स्वीकारणे तत्काळ जमेल असे त्यांना वाटले नाही. त्यामुळे ज्याला त्याला स्वतःला पसंतीच्या धर्माचा अवलंब करण्याचे स्वातंत्र्य असावे असे ते म्हणतात.

२) राज्यसंस्थेने प्रजाजनांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप करु नये असे त्यांचे मत होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांचेही तेच धोरण असल्यामुळे, रॉय यांनी त्यांचे स्वागत केले. पूर्वीच्या सर्व जेत्यांनी पराजितांच्या धर्माचा उपहास केला होता, टर उडवली होती आणि आपला धर्म त्यांच्यावर जुलमाने लादण्याचा प्रयत्न केला होता. इंग्रज राज्यकर्ते त्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांचे अनुकरण करणार नाहीत अशी राममोहनांची अपेक्षा होती.

३) 'ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हिंदू धर्माची निर्भर्त्सना करु नये आणि राजाश्रयामुळे प्राप्त होणाऱ्या दर्जाचा दुरुपयोग करुन लोकांना इंग्रजाविषयी वाटणाऱ्या दराऱ्याच्या दटावणीने अथवा राजाश्रित धर्माचा अवलंब केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या ऐहिक अभ्युदयाच्या आमिषाने दीनदुबळ्या हिंदूचे

धर्मांतर करु नये व उद्धाराच्या मिषाने त्यांचा अधःपात करु नये असे राममोहन यांचे मत होते.' मिशनरी ज्या मार्गांनी धर्मप्रसार करीत होते ते मार्ग विवेक आणि न्याय या दोहोंशीही कसे विसंगत आहेत हे राममोहनांनी दाखवून दिले होते. मिशनऱ्यांनी आपल्या धर्माचा मोठेपणा जरुर पटवून द्यावा. तो पटला तर लोक त्यांच्या पाठी स्वतःच येतील. त्यासाठी हिंदू धर्माची निंदानालस्ती करण्याची मुळीच गरज नाही.

## २.७ शिक्षणविषयक हक्क

देशाच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल झाल्याखेरीज या देशाला त्याच्या शतकानुशतकांच्या निद्रेतून जागे करणे केवळ असंभव आहे हे रॉय यांनी ओळखले होते. संपूर्ण शिक्षणपद्धतीत परिवर्तन करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. इंग्रजी शिक्षणाद्वारे भारतीयांमध्ये नव्या जाणिवा व नवी क्षमता येईल असा त्यांना विश्वास होता. म्हणूनच संस्कृतची थोरवी कळण्याइतपत रसिकता व अध्ययन गाठीशी असूनसुद्धा, सरकारने १७५२ साली स्थापिलेल्या बनारस संस्कृत महाविद्यालयावर त्यांनी कडाडून हल्ला केला होता. हिंदूंच्या कायद्यांचे, साहित्य संपदेचे व धर्माचे रक्षण व प्रसार करण्याचा आपला मानस आहे असे जरी शासनाने जाहीर केले होते तरी त्या महाविद्यालयातून अज्ञानाखेरीज आणखी कशाचाही प्रसार होईल या गोष्टीवर विश्वास ठेवायला रॉय मुळीच तयार नव्हते.

त्यापेक्षा इथल्या नव्या पिढ्यांना पश्चिमेतल्याप्रमाणे वैज्ञानिक व अद्ययावत शिक्षण देण्यात यावे अशी त्यांनी आग्रहाची विनंती केली होती. शालेय अभ्यासक्रमात गणित, नैसर्गिक शास्त्रे, रसायनशास्त्र व शरीरशास्त्र इत्यादी विषयांचा मुख्यत्वे समावेश करण्यात यावा असे त्यांना वाटत होते. १८१६ साली पहिली इंग्रजी शाळा काढताना हाच आदर्श त्यांच्यासमोर होता. पुढे ती शाळा अनेक वर्षे भारतातील उदारमतवादी व प्रागतिक विचारांचा व तत्त्वांचा मूलस्त्रोत ठरली होती.

राममोहनांच्या शैक्षणिक क्षेत्रातील या आग्रहाला त्यांच्या मृत्यूनंतर मान्यता मिळाली. मात्र एक गोष्ट अगदी स्पष्ट व निर्विवाद खरी आहे की या देशात वैज्ञानिक शिक्षणासाठी झालेल्या चळवळीचे आद्य प्रवर्तकत्व राजा राममोहन रॉय यांच्याखेरीज अन्य कुणालाच देता येणार नाही.

## २.८ स्त्रियांचे हक्कांविषयी

स्त्री - दास्यविमोचनाची चळवळसुद्धा सुरु करण्याचा मान रॉय यांनाच द्यावा लागेल.

१) स्त्रियांच्या हक्कांचे ते पहिले पुरस्कर्ते होते. सतीच्या चालीला विरोध करुन, 'स्त्रीला व्यक्ती म्हणून स्वतंत्र अस्तित्व असते, पतीच्या अस्तित्वावर ते अवलंबून नसते. म्हणूनच पतीचे अस्तित्व संपले म्हणजे स्त्रीने स्वतःचेही अस्तित्व आत्मदहनासारख्या क्रूर पाशवी मार्गाने वा कसेही मिटविण्याची गरज नाही. पतिनिधनोत्तरही ती जगू शकते. समाजाचा ती एक घटक आहे. तिच्यावर सती जाण्याची सक्ती करण्याचा त्या समाजालाही काहीच अधिकार नाही. जिवंत राहण्याचा हक्क - मग तो पुरुषाचा असो की स्त्रीचा तो सारखाच महत्त्वाचा आहे.' असा विचार

रॉय यांनी मांडला होता. त्यांच्या मते स्त्री - हत्या समर्थनीय ठरु शकत नाही; कारण तो उघड उघड खून आहे वा आत्महत्या आहे आणि कायद्याच्या दृष्टीने दोन्हीही गुन्हेच आहेत.

त्यांनी विधवा - विवाहाचा पुरस्कार केला होता. विशेषतः बालपणी वैधव्य आलेल्या मुलीविषयी वाटणाऱ्या कळवळ्यातून त्यांनी पुनर्विवाहाला पाठिंबा दिलेला दिसून येतो.

२) १७२८ साली त्यांनी स्त्री - अधिकारांसंबंधी एक पुस्तक लिहिले होते. त्याचे नाव होते, 'ब्रीफ रिमार्क्स रिगार्डिंग मॉडर्न एन्क्रोचमेंटस् ऑन दि एन्शियन्ट राइटस् ऑफ फीमेल्स ॲकॉर्डिं टु दि हिंदू लॉ ऑफ इनहेरिटन्स.' या ग्रंथात त्यांनी आधुनिक काळात स्त्रीच्या अधिकारांवर किती व कशा मर्यादा पडल्या आहेत आणि या सगळ्या मर्यादा पूर्वीच्या ग्रंथानाही कशा धरुन नाहीत याबद्दलचे विवेचन केले आहे. त्या संदर्भात याज्ञवल्क्य, नारद, कात्यायन, बृहस्पती,व्यासप्रभृती अधिकारी ऋषिमुनींची त्यांनी साक्ष काढली आहे. त्यांच्या ग्रंथामधील उतारे देऊन रॉय यांनी हे दाखवून दिले आहे की नवरा मेल्यावर त्याच्या पत्नीला व मुलांना त्याच्या मालमत्तेचा निम्मा निम्मा वाटा मिळावा आणि मुलाच्या वाट्याला येणाऱ्या मालमत्तेचा १/४ भाग मुलीच्या पदरात पडावा, अशी मालमत्तेची विभागणी त्या पूर्वसुरींना अभिप्रेत होती. ती तर आज प्रत्यक्षात राहिलेली नाहीच; उलट स्त्रीला एखाद्या उपभोग्य मालमत्तेचे व ऐषआरामाच्या साधनाचे स्थान प्राप्त झाले आहे, याबद्दल रॉय यांनी खेद व्यक्त केला आहे. द्विभार्या पद्धतीला विरोध करण्यामागेही त्यांची हीच भावना होती.

३) स्त्री ही पुरुषापेक्षा कोणत्याही बाबतीत उणी असते हे राममोहन मान्यच करायला तयार नाहीत. ते म्हणतात, समजूतदारपणा व चारित्र्याची दृढता याबाबत स्त्रिया पुरुषांना हार जाणार नाहीत. आज स्त्रिया पुरुषांपेक्षा ज्या गौण वाटतात, व बुद्धीने दुय्यम दर्जाच्या वाटतात त्याचे कारण आजपर्यंत पुरुषी अहंकारापोटी त्यांना शिक्षणापासून व संस्कारांपासून दूर रहावे लागले हे आहे, त्यांचा अंगभूत कच्चेपणा नव्हे. त्यामुळे त्यांच्या अज्ञानाचा व बुद्धिमांद्याचा उपहास करणे अन्यायकारक ठरेल असे रॉय म्हणतात.

४) व्यक्तीच्या जीवनासाठी व विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या मालमत्तेच्या हक्काला व जिवंत राहण्याच्या हक्कालाही रॉय यांच्या विचारात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

## २.९ नागरी हक्क सुरक्षित करण्याच्या दृष्टीने सुचविलेले उपाय

नागरी हक्क सुरक्षित करण्याच्या दृष्टीने पुढील काही सूचना रॉय यांनी केल्या आहेत. कायद्याचे संहितीकरण करणे, न्यायविषयक व अंमलबजावणीविषयक अधिकार वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या हाती सोपविले जाणे, न्यायाधीशांची कार्यक्षमता, स्वातंत्र्य व सचोटी कायम टिकविण्याच्या दृष्टीने उपाय योजणे, ज्यूरीची पद्धती अमलात आणणे, हेबियस कॉर्पस ॲक्ट, अधिकाऱ्यांना कायदेशीरपणे त्यांच्या कृत्यांसाठी उत्तरदायी ठरविले जाणे इत्यादी. कारण या गोष्टींच्या अभावातून व्यक्तींच्या अधिकारांना धोका संभवतो.

१) कायदे निश्चित आणि काटेकोर असले म्हणजे त्यांचा नागरी स्वातंत्र्याला फार मोठा आधार वाटतो.

२) सत्ताविभागणी (सेपरेशन ऑफ पॉवर्स) जुलमी अधिकारी स्वतःच कायदे करुन राबवू शकत असल्यामुळे तो तर व्यक्तींच्या हक्कांना सर्वात मोठा धोका म्हणावा लागेल. म्हणूनच प्रत्येक

सुसंस्कृत समाजात नियम आणि संहिता करणारी अधिसत्ता व त्यांना राबविणारी अधिसत्ता परस्परस्वायत्त असतात. जिथे त्या तशा नसतात तिथे सत्तेच्या दुरुपयोगाची व जनस्वातंत्र्याच्या ऱ्हासाची उदाहरणे इतिहासात सापडतात.

राजा राममोहनांच्या राजकीय विचारात नागरी स्वातंत्र्याला, व्यक्तीच्या हक्कांना व त्या हक्कांच्या हमींना एवढे जे महत्त्व मिळाले आहे त्याचे कारण म्हणजे त्यांना मानवमात्राबद्दल असलेले आंतरिक प्रेम आणि जिव्हाळा हे होय. मानवतावाद हा या विचारांमागील प्राण आहे. पारंपरिक बंधनांमध्ये जखडल्या गेलेल्या मानवतेला मुक्त करणे हा त्यांचा अंतिम हेतू असून सहिष्णुता, सहानुभूती आणि विवेक या त्यामागील अंतःप्रेरणा आहेत. त्यांचे एतद्‌विषयक विचार वाचताना कित्येकदा असे वाटते की रॉय हे हक्कांविषयीच्या 'नैसर्गिक सिद्धांता' चे पुरस्कर्ते आहेत, व ते हक्कांचा व्यक्तिवादी दृष्टिकोण मांडीत आहेत. पण त्याच वेळी हेही जाणवते की ते रुढ अर्थाने व्यक्तिवादी नाहीत. कारण हक्कांच्या संदर्भात सामाजिक हिताचा ते कधीच विसर पडू देत नाहीत. सामाजिक सुधारणेसाठी व शैक्षणिक पुनरुभारणीसाठी आवश्यक ते निर्बंध या हक्कांवर टाकण्याचा राज्यसंस्थेचा अधिकार ते मान्य करतात. एवढे नव्हे तर अशा निर्बंधाना ते स्वागतार्ह मानतात. सामाजिक उपयोगिता व मानवी कल्याण या दृष्टीने धर्माच्या क्षेत्रातील अनिष्ट रुढींचा व चालीरीतींचा प्रतिकार शासनाने कायद्यांच्या द्वारे करावा, असे ते शासनास विनवितात. तेव्हा अशा हेतूंनी सरकारने केलेला हस्तक्षेप त्यांना हक्कांवरील अतिक्रमण वाटत नाही व म्हणून आक्षेपार्हही वाटत नाही. मात्र त्याच वेळी ते असेही म्हणतात की, 'जर मानवमात्राचे अस्तित्व उपजतच समाजजीवनाच्या सोयींचा व प्रगत मनाच्या आनंदाचा उपभोग घेण्यासाठीच संभवले असेल तर ज्या ज्या सामाजिक, कौटुंबिक वा राजकीय व्यवस्था व्यक्तीच्या आनंदाच्या आड येतात व मानवी बुद्धीला हिणकस ठरवतात त्यांचा प्रतिकार मानवांनी केल्यास तो समर्थनीयच ठरेल.'

## २.१० कायद्यासंबंधीचे विचार (IDEAS ABOUT LAW)

१) इंग्रजी संसदेलाच भारतासंबधी कायदे करण्याचा अधिकार असावा, स्थानिक राज्यकतर्यांना तो असू नये हा विचार रॉय यांनी कधीच सोडला नाही.

सनदी अधिकाऱ्यांची सत्तापिपासू व पूर्वग्रह परिचित असल्यामुळे इंग्लडंच्या अभिजात लोकमताच्या हातीच भारताची विधिनिर्मात्री सत्ता असावी असा राममोहन यांचा आग्रह होता.

२) सत्ताविभाजनाच्या सिद्धांताला रॉय यांच्या विचारात अत्यंत मध्यवर्ती स्थान आहे. याच कारणासाठी प्रत्यक्ष सम्राटांच्या नियंत्रणाखालील वसाहतींचा दर्जाही भारताला नको असे ते म्हणतात. या त्यांच्या मताचे त्यांनी दिलेले समर्थन असे आहे. ते म्हणतात, 'अनुभवान्ती असे दिसते की वासाहतिक शासनामध्ये मंत्र्यांना प्राधान्य येते आणि कॉमन्स सभेतील बहुमताला गौणत्व प्राप्त होते.' म्हणजे पुन्हा तिथेही कार्यकारी मंडळाची निरंकुश हुकूमशाही प्रस्थापित होण्याचा धोका संभवतो.

३) कायद्यासंबंधी रॉय यांनी मांडलेला विचार म्हणजे कायद्यांच्या संहितीकरणाचा (कोडिफिकेशन)! शास्ते आणि शासित या दोघांच्याही दृष्टीने हे होणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. हे संहितीकरण केले जात असताना पाळावयाची काही पथ्येही त्यांनी सांगितली आहेत; एक म्हणजे, देशात वास्तव्य करुन राहणाऱ्या सर्व भिन्न गटांना व टोळ्यांना सामायिक आहेत

आणि मान्य आहेत अशाच तत्त्वांच्या आधारे हे संहितीकरण करण्यात यावे. विश्वमान्य तत्त्वांचा अंगीकार करण्याच्या प्रयत्नात या देशाच्या पारंपरिक व रुढिबद्ध कायद्याशी ही संहिता पार विरोधी अशी होऊ नये. दुसरे असे की ती सोपी असावी, स्पष्ट असावी आणि काटेकोर असावी. संहितीकरणाचा फायदा असा होईल की कायद्यांचे अन्वयार्थ त्यानंतर व्यक्तिसापेक्ष राहणार नाहीत. दरवेळी एखादा कायदा अमलात आणीत असताना वा न्यायालयासमोर तत्संबंधी निवाडा होत असताना संबंधित व्यक्ती हिंदू की मुस्लिम हे पाहून मग, मुस्लिम असल्यास कायद्याच्या स्पष्टीकरणासाठी शरीयतकडे जा, हिंदू असल्यास श्रुतिस्मृतिपुराणांतील संदर्भ शोधा ही सगळी ओढाताण संपेल आणि एकच कायदा सर्वच व्यक्तींना सारखाच लागू ठरेल, अशी रॉय यांची अपेक्षा होती.

४) कायदा, रुढी, नीतिमत्ता यांच्यामधील परस्परसंबंधाविषयीसुद्धा रॉय यांच्या विचारांमध्ये कमलीची स्पष्टता दिसून येते. प्रत्येक समाजातील कायद्यांच्या जन्म त्या समाजातील लोकांच्या पारंपरिक निवडीत अथवा एखाद्या निधर्मी वा अधिसत्तेच्या आज्ञेत दिसून येतो. पण अशा निवडीला वा आज्ञेला कायद्याचे स्वरुप येण्यापूर्वी देशातील सर्वसामान्य व्यवहारामध्ये ती रुढ होणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे न्यायालयीन कामकाजाच्या द्वारेही ती रुढ होणे आवश्यक असते. पुढेही सार्वभौम सत्तेला जरी त्या कायद्यात कोणतेही फेरफार करण्याचा अधिकार असला तरी देशाच्या दीर्घकालीन रुढी ह्या सत्तेलाही सहजासहजी डावलता येत नाहीत; कारण त्यांचा स्वीकार समाज करतो त्याला त्या विवेकी व समाजहिताच्या वाटतात म्हणूनच होय. त्यामुळे खरोखरच विवेकाधिष्ठित व समाजहितप्रवर्तक रुढींचा सार्वभौमसत्तेलाही सन्मान करावाच लागतो. अर्थात ज्या रुढी तशा नसतात, उलट कित्येकदा त्या समाजविषयक व मानवतेला कलंक लावणाऱ्या असतात, त्या जरी दीर्घकालीन असल्या तरी सत्ताधीशांनी त्या प्रयत्नपूर्वक मोडून काढायलाच पाहिजेत. कायदा आणि नीतिमत्ता यांच्यातील सीमारेषा स्पष्ट करीत असतानाही आपल्याला त्या त्या समाजातील सर्वसाधारण परंपरा व रुढी यांचाच आधार घ्यावा लागतो. कारण सर्व समाजासाठी समान अशी नाती - अनीतीची चिरंतन मोजमापे असूच शकत नाहीत. नीतिमत्तेच्या या समाजसापेक्ष चौकटी लक्षात घेऊन केलेले कायदेच समाजात यशस्वी होऊ शकतात. अर्थात कायद्याने प्रस्थापित नीतितत्त्वांचे कोणत्या मर्यादेपर्यंत अनुसरण करावे यासंबंधी सुद्धा रुढीविषयी वर आपण जो विचार पाहिला तोच प्रस्तुत ठरतो. काही बाबी त्या समाजाच्या मते अनैतिक असल्या तरी समाजाच्या सुधारणेच्या व आधुनिकीकरणाच्या दृष्टीने त्या आवश्यक असल्यास कायद्याने त्या स्वीकारायलाच पाहिजेत आणि राबवायलाच पाहिजेत.

## २.११ महसूल व न्यायपद्धतींसंबंधीचे विचार

राजा राममोहन रॉय यांच्या 'ॲन एक्स्पोझिशन ऑफ रेव्हेन्यू अँड ज्युडिशियल सिस्टिम इन् इंडिया' या पुस्तकात प्रस्तुत विषयावरील अत्यंत सखोल आणि मूलग्राही विवेचन आढळते. प्रामुख्याने या विवेचनाचा भर प्रशासकीय व न्यायालयीन कामकाजातील सुधारणांवर आहे.

१) सनदी नोकर म्हणून नियुक्त होणारी व्यक्ती ही किमान बावीस वर्षाची असायलाच हवी.

२) प्रशासक आणि जनता यांना जोडणारे नवे नवे दुवे उपलब्ध व्हावेत.

३) जनतेच्या भाषेत बोलणारे अधिकारी असल्याविना प्रशासन कधीच कार्यक्षम व यशस्वी होऊ शकणार नाही, अशा काही सूचना रॉय यांनी मांडल्या आहेत. न्यायालयीन क्षेत्रासंबंधीच्या

सूचनांची संख्या मोठी आहे. व्यक्तिस्वातंत्र्याला रॉय यांच्या अग्रक्रमांच्या यादीत सर्वश्रेष्ठ स्थान असल्यामुळे त्या स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ कार्यक्षम न्यायव्यवस्थेची निकड त्यांना भासणे साहजिकच होते.

४) त्यांच्या मते योग्य व नि:पक्षपाती न्याय मिळण्यासाठी न्यायदानप्रक्रियेशी एतद्देशीयांचे सहकार्य व जागरुकता त्याचप्रमाणे हिंदी अधिकाऱ्यांचे साहचर्य शासनाने या कार्यात जोडणे हाच सर्वोत्तम मार्ग आहे. अधिकाऱ्याने आपल्या अधिकारपदावरुन केलेल्या प्रत्येक कृत्याचे वेळ पडल्यास न्यायालयासमोर समर्थन देण्याचे बंधन त्याजवर असणे ही गोष्ट रॉय यांना या संदर्भात अत्यावश्यक वाटते.

न्यायालयीन कामकाज अधिक विशुद्ध करण्याच्या दृष्टीने रॉय यांनी काही मूलभूत सुधारणा सुचवल्या आहेत. ते म्हणतात, न्यायालयीन कामकाजावर लोकमताची देखरेख असणे आवश्यक आहे, कारण त्यामुळेच न्यायाधीश न्यायदान करताना कायदा व समन्यायबुद्धीचा कसा वापर करतात हे लोकांना कळेल.

## २.१२ मूल्यमापन

राजा राममोहन रॉय हे भारतीय प्रबोधनाचे प्रतीक, विश्वधर्माचा प्रवर्तक, मानवतेचे पुजारी होते. त्यांनी भारतात आधुनिक युगाचा प्रारंभ केला.

## २.१३ प्रश्न

१) राजा राममोहन रॉय यांना भारतीय प्रबोधनाचे प्रतीक का समजण्यात येते ?

२) आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत असे राममोहन रॉय म्हणतात. विश्लेषण करा.

३) राजा राममोहन रॉयची ब्रिटिश राजवटीविषयी आणि स्वातंत्र्याविषयीची मते स्पष्ट करा.

४) नागरी स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य यावर राजा राममोहन रॉय यांची मते लिहा.

५) स्त्रियांचे हक्क यावर राजा राममोहन रॉय यांचे विचार मांडा.

❖❖❖❖

# ३

# स्वामी विवेकानंद
# (१८६३-१९०२)

**घटक रचना :**

३.१ प्रस्तावना
३.२ प्रभाव
३.३ परिभ्रमन आणि अमेरिकेतील परिषद
३.४ राजकीय विचार
३.४.१ धर्म आणि भारत
३.४.२ सामान्यजनाविषयी कळकळ
३.४.३ जातीव्यवस्था व अस्पृश्‍यता
३.४.४ स्त्रियांची स्थितीविषयी
३.४.५ विवेकानंदाना अभिप्रेत शिक्षण
३.४.६ राज्याचे स्वरुप
३.४.७ राष्ट्रवाद
३.४.८ नवभारत
३.४.९ पूर्वपश्चिम परस्परावंलबन व वैश्विक ऐक्य
३.५ मूल्यमापन
३.६ प्रश्न
३.७ संदर्भ

## ३.१ प्रस्तावना

स्वामी विवेकानंद म्हणून गाजलेल्या या संन्याशाचे मूळ नाव नरेंद्र दत्त होते. नरेंद्र हा प्रतिष्ठासंपन्न अशा थोर क्षत्रिय कुलात जन्मला होता. त्याच्या उभ्या जीवनावर या क्षात्रवृत्तीचा ठसा उमटलेला दिसून येतो. १२ जानेवारी १८६३ रोजी नरेंद्रांचा जन्म झाला. त्यांचे वडील कोलकात्याच्या हायकोर्टात ॲटर्नी - ॲट - लॉ होते. ते स्वभावाने उदार, खर्चिक व वृत्तीने अशांत होते. मानवमात्राविषयी अपार कळवळा त्यांना असल्यामुळे जातिभेदाच्या गोष्टींना त्यांच्या आयुष्यात थारा नव्हता. नरेंद्रांची आईसुद्धा सुविद्य, बहुश्रुत व सुसंस्कृत होती. राजघराणाचे तेज तिच्या चर्येवर व एकूण व्यक्तिमत्त्वावर विलसत असे. आपल्या आईकडूनच आपल्याला सदयता,

स्वंय - प्रभुत्व व उच्च चारित्र्य आदींचा वारसा मिळाला असून आपल्या जीवनाची व कार्याची प्रेरणा तिच्याच शिकवणुकीत असल्याचे स्वतः नरेंद्रांनीच म्हटले आहे.

नरेंद्र अनेक शारीरिक, बौद्धिक गुणांचे वरदान उपजतच घेऊन आले होते. खेळकसरतींपासून स्वररचनेपर्यंत सर्व क्षेत्रांत लीलया संचार करणारी त्यांची बुद्धिमत्ता कुशाग्र व चतुरस्त्र होती. तिला धार्मिक अंतःकरणाची व अतीव पावित्र्याचीही जोड मिळालेली होती. मनाची व देहाची विशुद्धता ही एक मोठी आध्यात्मिक शक्ती आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. तीव्र स्मरणशक्तीच्या बळावर त्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनात मोठी किर्ती संपादिली होती. इंग्रजी विद्येच्या संस्कारामुळे नरेंद्र हे आधीच्या धर्मसुधारकांपेक्षा वेगळे ठरतात. स्पेन्सर, कांट, हेगेल, मिल प्रभुती तत्त्वचिंतकांच्या विचारांचा त्यांना जवळून परिचय घडला होता. पुढे देशोदेशी भ्रमंती करुन त्यांनी पाश्चात्य संस्कृतीचेही सूक्ष्म अवलोकन केले होते.

## ३.२ रामकृष्ण परमहंसाचा प्रभाव

विवेकानंदाच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे श्रेय या शिक्षणापेक्षा त्यांच्या गुरुंना - रामकृष्ण परमहंसाना आहे. दक्षिणेश्वर येथील या संतानेच खऱ्या अर्थाने नरेंद्र दत्ताचा विवेकानंद केला. स्वतः विवेकानंदांनीच असे म्हटले आहे की, मी जो काही आहे तो माझे गुरुदेव श्री रामकृष्ण यांच्यामुळेच झालो.

नरेंद्राला रामकृष्ण भेटले तेव्हा नरेंद्राची मानसिक अवस्था अत्यंत संघर्षमय व व्याकुळ होती. बुद्धिवादाचे त्यांना आकर्षण होते. बाह्य जग व आंतरिक विश्व यांच्यातील स्पष्टीकरण बुद्धिवाद त्यांना देऊ शकत नव्हता. अंतर्यामीची ही ओढ - आकांक्षा विरुद्ध युरोपीय विचारांवर पोसलेली बुद्धी, ब्राह्मसमाजाचा पगडा असा हा अंतसंघर्ष त्यांचे मन पोळीत होता. रामकृष्णांनी तो हळुवारपणे सोडवला.

ईश्वराची उपासना तू सर्व मार्गांनी करीत राहा. ध्यानधारणा आणि प्रत्यक्ष कार्य हे दोन्ही मार्ग अनुसरुन मानवमात्राच्या सेवेत आपल्या ज्ञानाची परिपूर्ती नरेंद्राने अनुभवावी, अशी रामकृष्णांची इच्छा होती.

## ३.३ परिभ्रमण आणि अमेरिकेतील धर्मपरिषद

स्वतः विवेकानंदांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यास कारणीभूत झालेला शक्तिप्रवाह परिभ्रमण हा होता. एका परिव्राजकाला सोबत घेऊन बेरानगर सोडून नरेंद्र निघाले. काही दिवस ते मठात येत असत. पुढे १८९१ साली मात्र कुणालाही सोबत न घेता, दंड - कंमडलू घेऊन व आपले नावही टाकून देऊन, एखाद्या अज्ञात भिक्षेकऱ्याप्रमाणे पायी सारी मातृभूमी त्यांनी तुडवून काढली. संकटे त्यांचा निग्रह मोडू शकली नाहीत.

कोणत्याही पूर्व - योजनेवाचून त्यांची यात्रा चालू होती. जात, गोत्र, घर - सर्व पाश तोडून ईश्वराच्या जनतेच्या सान्निध्यात घालवीत ते हिंडत होते. लोकस्थिती, लोकाचार जवळून न्याहाळीत होते. साऱ्या ग्रंथालयातील पुस्तकांना जे दाखवता आले नसते ते या महान

जीवनग्रंथाने त्यांना उकलून दाखवले. त्यांची भेदक दृष्टी भोवतालची परिस्थिती टिपून घेत होती. दुःख, क्लेश, दैन्य, परसत्तेच्या जुलमाखाली चिरडल्या जाणाऱ्या जनतेचे आक्रंदन त्यांनी अनुभले. देशाच्या प्राचीन शक्तिवैभवाशी त्यांना हे विसंगत वाटले. त्यांना पुनरुज्जीवनाची प्रेरणा मिळाली. समाजातील कमालीची विषमता पाहून त्यांची अशी खात्री झाली की, कोणत्याही माणसाचे आद्य कर्तव्य जर कोणते असेल तर दीनदलितांची सेवा करुन त्यांचा उद्धार करणे हेच होय. देशबांधवांच्या समीपदर्शनाने स्वतः विवेकानंदच भारताची सदसद्‌विवेकबुद्धी झाले.

दक्षिणेकडे भ्रमण करीत करीत ते केप कामोरिनला पोचले. श्रांत, क्लांत, तहानभुकेने व्याकुळ, निष्कांचन, अपमान - उपहास - ग्रस्त अशा अवस्थेत ते असताना त्यांची दृष्टी समुद्रातील एका खडकावर स्थिरावली. शार्क माशांनी भरलेल्या समुद्रातून पोहत जाण्याखेरीज पर्याय नव्हता. ते तिथे पोचले. त्यांना तेथे विलक्षण अनुभव आला. साक्षात्कार झाला. आपल्या भावी जीवितकार्याची दिशा उमगली.

भारताची सगळ्या जगाला गरज आहे, त्यामुळे त्याचे आध्यात्मिक धन नष्ट होऊ देता कामा नये. इतर अनेक संस्कृतींचे हे धन बघता बघता नष्ट झाले आहे. भारताचे तसे होऊ नये. भारताचे स्वास्थ ही अशाप्रकारे जगाने चिंता करावी अशी बाब असल्यामुळे इंग्लंड - अमेरिकादी राष्ट्रांना भारताच्या वतीने आवाहन करण्याची कल्पना नरेंद्राना सुचली. पश्चिमेला भारताने वेदान्ताचा दिव्य संदेश द्यावा आणि मोबदल्यात पश्चिमेने भारताला येथील दारिद्र्य निवारणासाठी लागणारी साधने पुरवावी असे हे आवाहन होते.

याच सुमारास शिकागोला होणार असलेल्या सर्वधर्मपरिषदेची वार्ता त्यांच्या कानी आली. या देशातील गरिबांच्या वतीने पाश्चात्य जनतेशी बोलण्याची ही अत्युत्कृष्ट संधी वाटून, गरिबांनीच दिलेल्या मदतीच्या जोरावर, ३१ मे १८९३ रोजी नरेंद्रानी अमेरिकेसाठी प्रस्थान ठेवले. याच वेळी आपले नाव सोडून विवेकानंद हे नवे नाव त्यांनी धारण केले.

बौद्ध, जैन, ब्राह्मो, थिऑसफी या सगळ्या पंथांचे प्रतिनिधी परिषदेत उपस्थित होते. परंतु त्या सर्वांपेक्षा विवेकानंदांनीच सर्वांचे लक्ष आकृष्ट केले. त्यांच्या तेजस्वी भाषणाने श्रोतृसमुदायाची अंतःकरणे एकदम चेतवून दिली. 'हिंदूधर्म ही सर्व धर्मांची आद्य माता आहे; आणि सर्वधर्मीयांनी परस्परांना समजून घ्यावे' या दोन गोष्टींवर त्यांनी भर दिला. प्रत्येक वक्ता आपापल्या पंथांच्या (Own God) ईश्वराविषयी बोलला असताना फक्त विवेकानंदच सर्वांच्या ईश्वराविषयी (Universal God) बोलले. परिषदेसमोर दिलेल्या दहा बारा व्याख्यानांद्वारे त्यांनी वैश्विक धर्माचा सिद्धांत प्रदिपादित केला आणि धर्मसमन्वयाचा पुरस्कार केला. त्यांच्या व्याख्यानांचा एवढा प्रभाव पडला की, 'धर्मपरिषदेतील सर्वश्रेष्ठ व्यक्ती' म्हणून अमेरिकन वर्तमानपत्रांनी त्यांचा गौरव केला. त्यानंतर तीन वर्षे अमेरिकेतच व्याख्याने, दौरे, नियमित वर्ग असे कार्य त्यांनी केले. अमेरिकेत वेदान्त सोसायटीची स्थापना केली.

त्यानंतर १६ डिसेंबर १८९६ रोजी आपल्या काही शिष्यांसह स्वामी विवेकानंद मायदेशी परतले. कोलंबो ते आलमोरा या प्रवासात ठिकठिकाणी झालेल्या स्वागत - सत्कारांना उत्तर देताना अनेक व्याख्याने त्यांनी दिली. या सर्व व्याख्यांनामधून स्वामींनी आपल्या राष्ट्रीय जीवनाची पुर्नउभारणी आध्यात्मिक आधारांवर करण्याच्या आणि वेदांताच्या शिकवणुकीचा प्रत्यक्ष जीवनात अवलंब करण्याचा सल्ला त्यांनी देशवासीयांना दिला. ज्या गुणांनी पाश्चात्य मोठे झाले

त्या त्यांच्या गुणांचे अनुकरण करीत असतानाच आपले स्वत्व, आपला आध्यात्मिक वारसा भारतीयांनी गमावून बसता कामा नये असेही त्यांनी सांगितले.

भारतात आल्यावर, आपल्या कार्याचा सुसूत्रपणे पाठपुरावा करता यावा म्हणून रामकृष्ण मिशनची त्यांनी स्थापना केली.

## ३.४ राजकीय विचार

रुढ अर्थाने विवेकानंदांना राजकीय विचारवंत वा राजकारणी म्हणता येणार नाही, कारण ते त्यांचे क्षेत्रच नव्हते. राजकारणावर त्यांचा फारसा विश्वासही नव्हता. धार्मिक - आध्यात्मिक क्षेत्रातच त्यांनी प्रामुख्याने कार्य केले होते.

परंतु तरीसुद्धा आधुनिक भारतातील राजकीय विचारांच्या विकासात त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांच्या कार्याचे व विचारांचे जे राजकीय पडसाद उठले वा परिणाम घडून आले ते दुर्लक्षिता येणार नाहीत. पुढे टिळक आणि गांधी प्रभूतींनी जे राजकारण केले व जे राजकीय सिद्धांत मांडले त्यांचे मूळ विवेकानंदांच्या शिकवणुकीत दिसून येते. विवेकानंदांनी या देशाच्या नागरिकांच्या मनात राष्ट्रीय अस्तित्वाच्या जाणिवा निर्माण केल्या. येथील राष्ट्रभावनेला धर्माचे आधार प्राप्त करुन दिले. केवळ धार्मिक क्षेत्रच जरी त्यांनी आपल्या कार्यासाठी निवडले असले तरी समकालीन भारताच्या इतरही समस्यांसंबंधी विचार मांडले.

इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या कार्याबद्दल कुणीतरी त्यांना प्रश्न विचारला असता, आपले क्षेत्र निराळे असल्याचे सांगून ते म्हणाले, 'मी ही चळवळ महत्त्वाची मानतो आणि ती यशस्वी व्हावी असे अंतःकरणपूर्वक इच्छितो. भारतातील विभिन्न मानववंशांचे एक राष्ट्र तीमधून तयार होत आहे.' या चळवळीच्या अंतिम फलश्रुतीबद्दलही त्यांनी आपल्या अपेक्षा नोंदवलेल्या आढळतात. या चळवळीच्या यशामधून 'आपण ज्यांना लोकशाही विचार असे म्हणतो ते स्वीकारले जाऊन भारतात समानता व एकवाक्यता निर्माण होईल. मूठभर सुसंस्कृत लोकांचा बुद्धिमत्तेवर एकाधिकार असता कामा नये, हे लक्षात येऊन येथे बुद्धिमत्ता वरच्या वर्गाकडून खालच्या वर्गाकडे संक्रमित होईल. आज सर्वत्र शिक्षणप्रसाराचे कार्य चालू आहे. लवकरच सक्तीचे शिक्षण सुरु होईल. आमच्या देशातील लोकांची अफाट कार्यशक्ती कारणी लावलीच पाहिजे. भारताची विविध क्षेत्रांतील सुप्त शक्ती फार मोठी आहे ती जाणवली जाईल.' या विधानावरुन विवेकानंदांची राजकीय घडामोडीविषयी असलेली आस्थाच दिसून येते.

### १) धर्म आणि भारत राष्ट्र :

या देशातील राजकीय विचाराला विवेकानंदांनी दिलेली पहिली महत्त्वाची देणगी म्हणजे राष्ट्रीय जीवनासाठी धर्माला त्यांनी दिलेले मध्यवर्ती स्थान ही होय! नवभारताची उभारणी ही धार्मिक - आध्यात्मिक अधिष्ठानावरच होऊ शकते असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी सांगितले होते : 'भारताला जर जिवंत राहावयाचे असेल तर त्याने धर्मालाच आपल्या राष्ट्रीय जीवनाचा मूलाधार करावयास हवा. तसे केल्याखेरीज गत्यंतर नाही.' कारण भारतात धर्म हाच पूर्वापार जीवनाचा केंद्रबिंदू आहे. भव्य अशा या राष्ट्रमंदिराचा तो भक्कम आधार वा कणाच आहे. राजकारण, सत्ता व बुद्धी यांना देखील या देशात दुय्यम स्थान आहे.

त्यांच्या मते, व्यक्तीप्रमाणेच प्रत्येक राष्ट्राचे एक विशिष्ट जीवनध्येय असते. ते त्याच्या जीवनाचे केंद्र असते. भारतात धर्म हाच राष्ट्रजीवनाचा मुख्य सूर आहे (Spirituality is India's personality). India should continue to evolve its spiritual power. पश्चिमेच्या अधिभौतिक संस्कृतीचे भारताने अंधानुकरण करण्यात फार मोठा धोका आहे, असे स्वामी म्हणतात. स्वामींना पुराणमतवादी लोक आवडत नसत, परंतु पाश्चात्यीकृत लोकांपेक्षा ते बरे असे त्यांचे मत होते. कारण पुराणमतवाद्यांना किमानपक्षी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची शक्ती आहे, पाश्चात्यीकृत होणारांना पाठीचा कणा नाही, असे ते म्हणतात.

कित्येकदा काहीजण या देशाच्या तत्कालीन अवनत अवस्थेसाठी व राजकीय गुलामगिरीसाठी धर्माला दोष देतात. विवेकानंदांना हे मान्य आहे की जातिव्यवस्थेच्या ताठरतेमुळे, दैववादामुळे किंवा तशाच ज्या काही गोष्टी त्याकाळी हिंदुत्वाच्या अंगभूत मानल्या जाऊ लागल्या होत्या, त्यांच्यामुळे या देशाला दौर्बल्य प्राप्त झाले, त्यांच्या मते, हा दोष हिंदू धर्माचा नव्हता, तर ज्या लोकांनी हिंदुत्वाचा चुकीचा अन्वयार्थ मांडला त्यांचा होता.

हिंदुना राजनीतीसुद्धा धर्माद्वारे सांगितली तरच समजू शकते. या मूलभूत गोष्टीचा विसर पडून भलत्याच मार्गांनी सुधारणेचे प्रयत्न झाल्यास ते यशस्वी होऊ शकणार नाहीत. प्रत्येक सुधारणेसाठी येथे धार्मिक स्वरुपाची चळवळ प्रथम हाती घेतली पाहिजे. भारतामध्ये समाजवादी किंवा राजकीय कल्पनांचा पूर वाहविण्यापूर्वी प्रथम आध्यात्मिक विचारांचा पूर वाहवणे आवश्यक आहे. विवेकानंदांच्या मते भारतीयांचे पहिले कार्य हे आहे की, त्यांनी आपली उपनिषदे, पुराणे व अन्य शास्त्रे इत्यादींमध्ये पडून राहिलेली आश्चर्यकारक सत्ये या ग्रंथातून बाहेर काढून, मठातून, अरण्यातून व विशिष्ट संप्रदायातून बाहेर काढून सर्व देशभर पसरविली पाहिजेत. नंतर आपल्या सामाजिक दुरावस्थेची खरी कारणे शोधून त्यांवर उपाययोजना केली पाहिजे.

विवेकानंदांच्या मते या सामाजिक दुरावस्थेचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे, स्वतःला संकुचित करुन स्वतःच्या कोषात हा समाज दडून बसला हे आहे. बाहेरच्या जगाशी त्याचा संपर्क उरला नाही. त्याचप्रमाणे या समजांतर्गत जी जातिव्यवस्था होती ती माणसाला माणसापासून दूर ठेवणाऱ्या भिंती निर्माण करुन बसली. अशा या जातिव्यवस्थेमुळे स्वास्थपूर्ण स्पर्धावृती नष्ट होऊन, त्यामुळे भारताचा राजकीय ऱ्हास झाला आणि परकीयांनी त्यांस जिंकून घेतले, संकुचितपणा मोडून काढणे हे त्याचे आद्य कर्तव्य आहे. धर्माला या समाजाने जे स्वयंपाकघरात नेऊन बसवले आणि शिवाशिवीच्या स्तोमांत अडकवून ठेवले, त्यातून धर्माला मुक्त केले पाहिजे. स्पृश्यास्पृश्यतेच्या विकृत कल्पनांमुळे समाजाच्या फार मोठ्या भागाला धर्माचरणापासून या समाजाने वंचित ठेवले.

भारतीयांनी आपल्या राष्ट्रीय जीवनात व आंतरराष्ट्रीय जीवनातही आपली ही धार्मिक भूमिका सोडता कामा नये. राष्ट्रीय जीवनात आपल्या भूतकालीन गौरवाच्या आधारे त्यांनी आधुनिक राष्ट्राची उभारणी करावी आणि उज्ज्वल भवितव्याकडे वाटचाल करावी. येथील राष्ट्रीय जीवनाचे उद्दिष्ट नेहमी आध्यात्मिकच राहिले आहे. विवेकानंदांचा हा धर्म म्हणजे अंधश्रद्धांचा, रुढींचा व कर्मकांडांचा धर्म नाही. भयातून वा लोभातून ज्याचा जन्म होतो असा हा स्वार्थी धर्मही नाही. त्यांच्या मते, धर्म हा केवळ एक शब्द नाही वा सिद्धांतही नाही, तर तो एक प्रत्यय आहे. प्रत्यक्ष जीवनात घेण्याचा तो मार्ग आहे. अनासक्ती व सेवाभाव हे ईश्वरापर्यंत पोचण्याचे मार्ग आहेत. अनासक्तीचा आग्रह पूर्वापार हिंदूच्या धर्मनेत्यांनी धरलेला होता. त्याच्या

जोडीला सेवाभाव हा ईश्वरप्राप्तीचा मार्ग विवेकानंदांनी सांगितला. सामान्य जनतेसाठी काही करणे हे धर्माचरण करणाऱ्या प्रत्येकाचे कार्य असल्याचे त्यांनी सांगितले.

हिंदू धर्माची थोरवी त्यांनी अनेकदा सांगितली पण कटू वस्तूस्थितीही मांडण्यास ते चुकले नाहीत. ते म्हणतात, 'मानवमात्रातील थोरपणाचे माहात्म्य हिंदुधर्माइतके उदात्ततेने दुसरा कोणताही धर्म सांगत नाही, परंतु प्रत्यक्षात हिंदुधर्म दीनदारिद्र्यांना व दलितांना जितका चिरडून टाकतो, तितका दुसरा कोणताही धर्म टाकीत नाही. हा दोष धर्माचा नाही, पण धर्माची विटंबना करणाऱ्यांचा व कर्मकांडाचे अवास्तव स्तोम माजवणारांचा हा दोष आहे.' पुढे त्यांनी असेही म्हटले आहे की, ज्यांचे ईश्वरावर खरे प्रेम आहे त्या सर्वांची - मग ते कोणत्याही धर्माचे वा पंथाचे असोत सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे. कारण 'सर्व जीवात्म्यांचा मिळून झालेला जो ईश्वर आहे, पीडितात जो ईश्वर आहे, सर्व वंशांच्या गरिबात जो ईश्वर आहे आणि ज्याच्यावर माझी संपूर्ण श्रद्धा आहे, त्या ईश्वराची पूजा मला करता आली तर माझ्यावर हजारो आपत्ती कोसळल्या तरी मला पर्वा नाही. मला हजारो जन्म घ्यावे लागले तरी हरकत नाही.'

खऱ्या ईश्वराची आराधना करण्यासाठीच त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली होती. संन्यस्तांच्या प्रयत्नांना समाजाभिमुख दिशा देणारे प्रशिक्षण केंद्र ते व्हावे अशी त्यांची इच्छा होती. आध्यात्मिक साक्षात्काराचा अविभाज्य भाग म्हणून समाजसेवेचे आयुष्य जगण्याचे संस्कार त्या केंद्रातून व्हावेत असे त्यांचे स्वप्न होते. 'व्यक्तिगत प्रार्थनांनी आळवलेला नवनिर्मितीशून्य असा जो देव आहे, त्याचे आजवरचे स्तोम संपवले पाहिजे. आता जिवंत देवाची, सर्वाच्या ह्रदयात वसत असलेल्या विराटाची, त्या भावी देशाची उपासना हवी. प्रत्येकाच्या ह्रदयात जो ब्रह्मसिंह सुप्त आहे तो यांच्या आवाहनाने जागृत झाला पाहिजे,' अशी मिशनमधील आपल्या गुरुबंधूकडून त्यांची अपेक्षा होती.

## २) सामान्यजंना विषयी कळकळ :

त्यांच्या या धर्मकल्पनेतूनच त्यांनी राजकीय विचारांना दिलेल्या दुसऱ्या योगदानाचा प्रादुर्भाव होतो, ते योगदान म्हणजे सामान्य, पददलित समाजाविषयी आस्था, जिव्हाळा. त्यांची राष्ट्रभक्ती दीन सेवेतून आविष्कृत झाली होती. ही सेवाच, त्यांच्या मते, ईश्वरसेवाचा सर्वश्रेष्ठ प्रकार होता. एका गरीब माणसाला शिव समजून जो त्याची सेवा करतो, त्याला मदत करतो आणि जो हे करीत असताना त्या गरिबाची जात, वंश, धर्म वा अन्य कोणत्याही गोष्टीचा विचारसुद्धा करीत नाही त्याच्यावर शिव मंदिरात येऊन भक्ती करणाऱ्यांपेक्षा, अधिक संतुष्ट होईल, असे विवेकानंदांना वाटते. अर्धपोटी, अर्धनग्न अशा या जनसामान्यांची उपेक्षा करणे हे त्यांच्या मते सर्वात मोठे राष्ट्रीय पाप आहे, आणि संबंध राष्ट्राचा निःपात करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी आहे. जनतेला नीट अन्न व जनतेचे नीट संगोपन जोपर्यंत केले जात नाही तोपर्यंत कितीही राजकारण केले तरी ते व्यर्थच ठरणार आहे, अशी त्यांची खात्री होती.

मानवातील ईश्वरावर प्रेम करण्यातूनच मानवावर प्रेम करणे शक्य होऊ शकते, त्याचप्रमाणे मानवात ईश्वराचे दर्शन घडते तेव्हाच खरी ईश्वराची ओळख पटू शकते.

## ३) जातीव्यवस्था व अस्पृश्यता :

भारतीय समाज आणि सामाजिक वर्तन याबद्दल फार जवळून माहिती विवेकानंदांना होती ते म्हणतात या समाजात जातिव्यवस्था वा अस्पृश्यता इथल्या सामाजिक अन्यायाचा कायमचा महास्त्रोत ठरलेल्या संरजामशाही प्रतिगामीपणाच्या मुळावरच आघात केल्यावाचून

कोणतीच सामाजिक प्रगती घडून येऊ शकणार नाही. स्वातंत्र्य, मुक्ती, संधी यांचा फायदा समाजातील मूठभर वरिष्ठांना मिळून चालणार नाही, तो समाजातल्या सर्वच व्यक्तींना लाभला पाहिजे हा विचार विवेकानंदांच्या राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या शिकवणुकीचा व त्यांच्या समाजशास्त्रीय चिंतनाचा गाभा होता.

**४) स्त्रियांची स्थितीविषयी :**

दीनदलितांप्रमाणेच या समाजातील स्त्रियांच्या स्थितीबद्दलची स्वामींनी हळहळ व्यक्त केली आहे. ते म्हणतात, 'एखाद्या देशात स्त्रियांना ज्या रीतीने वागविले जाते त्यावरुन त्या देशाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते.' त्यांच्या मते भारतीय समाजात त्या काळी स्त्रीला जे स्थान दिले जात असे ते स्त्रीत्वाचा अपमान करणारे व येथील प्राचीन आदर्शांनी विसंगत आहे. सुधारकांच्या प्रयत्नांमधून स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत, ते शिक्षणप्रसारातून सुटतील असा त्यांना विश्वास होता.

**५) विवेकानंदांना अभिप्रेत असलेले शिक्षण :**

केवळ पुस्तकी व माहिती संकलित करणारे शिक्षण नाही. जे शिक्षण माणसाला परिपूर्णतेकडे घेऊन जाते, त्याच्या ठायी कमालीचा आदर्शवाद व बळकट सारासारबुद्धी व उत्तम चारित्र्य निर्माण करते; जे त्याला आत्मज्ञान देऊन त्याच्या जीवात्मातच अव्यक्त स्वरुपात वावरणाऱ्या अनंत शक्तींना जागे करते ते खरे शिक्षण होय. असे शिक्षणच इच्छाशक्तीला योग्य ते वळण देऊन सर्व मानसिक शक्तींचा अनुरुप विकास घडवून आणू शकते. अशा शिक्षणाची त्या काळी जनतेला गरज होती, असे विवेकानंदांचे मत होते.

**६) राज्याचे स्वरुप :**

राज्याचे स्वरुप कसे असावे आणि व्यक्ती व समाज यांच्यातील संबंध कसे असावेत इत्यादी विषयांवरील स्वामींचे विचार 'आधुनिक भारत' या शीर्षकाच्या बंगाली भाषेत त्यांनी लिहिलेल्या निबंधात अत्यंत उत्कृष्टपणे व्यक्त झाले आहेत; भारतीय समाजाच्या अतिप्राचीन इतिहासापासून त्यांनी या निबंधाचा प्रारंभ केला आहे. हिंदूच्या व बौद्धांच्या राजवटीतही या देशाच्या राज्यकारभारामध्ये प्रजेला प्रत्यक्ष सहभाग नव्हता. प्रजेची शक्ती नेहमीच अप्रत्यक्ष व अव्यवस्थित होती. प्रजेच्या मताप्रमाणे राज्यकारभार ही कल्पना तशी पाश्चात्त्य असली तरी बीजरुपाने भारतात काही ठिकाणी ती गणराज्यांच्या स्वरुपात व ग्रामपंचायतींच्या स्वरुपात अस्तित्वात होती. समाजसत्तावाद (सोशॅलिझम), अराज्यवाद (अनार्किझम्), नास्तिकतावाद (निहिलीझम्) इत्यादी किंवा यासारख्या इतर प्रणाली ह्या येणाऱ्या नव्या सामाजिक क्रांतीची चिन्हेच होत, असे त्यांना वाटते.

लाखो गरीब श्रमिकांविषयी विवेकानंदांना जिव्हाळा होता. या समाजाने वर्षानुवर्षे श्रमिकांवर अन्याय केला आहे किंवा संख्येने तेच सर्वांहून अधिक आहेत या कारणांमुळे तर होताच, पण त्याहीपेक्षा समाजात असलेल्या मालमत्तचे निर्माते हे श्रमिकच असतात ही जाणीव त्यांच्या या भूमिकेमागे दिसते. या वर्गाच्या सुप्त कर्तुत्वशक्तीवर विवेकानंदांच्या विश्वास दिसतो. शतकांच्या शोषणामुळेच या वर्गाच्या ठिकाणी वाढत असलेल्या परात्मभाव (ॲलीनिएशन) कमाल मर्यादेपर्यंत पोचून त्यानंतर समाजविकासाच्या सिद्धांतानुसार 'शोषित शोषकांचे शोषण करतील' अशा निष्कर्षाप्रत विवेकानंद पोहचलेले दिसतात.

श्रमिक हेच सगळ्या मालमत्तेचे निर्माते आहेत आणि या निर्मात्यांना त्यांच्या निर्मितीचा उपभोग घेण्यापासून वंचित ठेवले जाते असे विवेकानंदांना वाटते.

भारतीयांना हे साध्य व्हायचे तर त्यासाठी त्यांनी राष्ट्रभक्तीची जोपासना करायला हवी, असे ते म्हणतात. त्यांना या राष्ट्रांची उभारणी त्याच्या मूळ पायावर - आध्यात्मिकतेवर करायची होती. त्यादृष्टीने रुढीपरंपरांच्या उथळ धर्माचरणात न रमता आपल्या धर्मग्रंथांचा सखोल अर्थ ध्यानात घ्यायला ते भारतीयांना सांगतात. त्यांना आपल्या धर्माचे यथार्थ आकलन होऊ शकल्यास त्यातूनच त्यांना राष्ट्रीय आदर्श व वर्तणूकीचे मार्गदर्शन मिळू शकेल अशी विवेकानंदांना खात्री होती. या मार्गाने या राष्ट्राच्या शरीरात व मनात नवे चैतन्य, नवे सामर्थ्य खेळू लागेल आणि लवकरच एक प्रबुद्ध प्रदीप्त राष्ट्र म्हणून हा देश साऱ्या जगासमोर उभा ठाकू शकेल असे त्यांना वाटत होते.

**७) राष्ट्रवाद :**

विवेकानंदांचा राष्ट्रवाद पश्चिमेतील राष्ट्रवादाप्रमाणे हिंसक आक्रमकही नाही, रचनात्मक आहे. दीनदलितांचा उद्धार हे तिचे लक्ष्य आहे. कोणाविषयीच्या तिरस्कारावर वा मत्सरावर आधारलेला नसून विश्वाच्या संदर्भातील भारताची भूमिका हा तिचा पाया आहे. आध्यात्मिकतेचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचविण्याचे भारताचे जे कार्य आहे ते त्याला पार पाडता यावे यासाठी त्याला राष्ट्र म्हणून उभे राहणे आवश्यक आहे, अशी स्वामींची धारणा होती. विवेकानंदांना याची पुरेपुर जाणीव आहे की मानवाचे सामाजिक राजकीय प्रश्न आज एवढे प्रचंड व राक्षसी होत आहेत की कोणाच्या सहाय्यावाचून एकेकट्या राष्ट्राला - राष्ट्रपातळीवर ते सोडविता येणेच शक्य राहिले नाही, आंतरराष्ट्रीय दृष्टिकोणातून त्यांचा अर्थपूर्ण विचार होऊ शकतो, व त्यांची उकल सापडू शकते. सत्य आणि न्याय यांच्या आधारे संपूर्ण जग जोपर्यंत एक होत नाही तोपर्यंत मानवाची खरी प्रगती होणेच अशक्य आहे. विश्वात्मक ऐक्याचा जो वेदान्ती आदर्श आहे तो जगाच्या मूर्त प्रश्नांना लागू करणे याचेच नाव, स्वामींच्या मते आंतरराष्ट्रवाद आहे.

पण या आंतरराष्ट्रीय सहजीवनाचा एक सक्रिय घटक जर व्हायचे असेल तर भारताला प्रथम राष्ट्र म्हणून उभे राहता येणे आवश्यक आहे.

**८) नवभारत :**

पाश्चात्त्य विज्ञान व पौर्वात्यांची स्वार्थत्यागी वृत्ती - अशा अंतर्विरोधी शक्तींच्या हेलकाव्यांमधून नवभारताची निर्मिती होणार आहे. पूर्व व पश्चिम परस्परावलंबी असल्यामुळे त्यांचा समन्वय होणे इष्ट आहे व आवश्यकही आहे. पण हा समन्वय असावा. हे केवळ भारताने केलेले पश्चिमेचे अंधानुकरण असू नये. पूर्व व पश्चिम यात मूलतः अंतर आहे. 'पाश्चात्त्यांचे अंतिम ध्येय हे वैयक्तिक स्वातंत्र्य आहे, धन मिळवून देणारी विद्या ही त्यांची भाषा आहे आणि राजकारण हे त्यांचे साधन आहे. भारताचे अंतिम ध्येय मुक्ती हे आहे, वेद ही त्यांची भाषा आहे आणि वैराग्य हे त्याचे साधन आहे' असे विवेकानंदांना वाटते.

आपल्याला उपयोगी ठरतील अशा गोष्टी मिळतील तिथून भारताने अवश्य उचलाव्यात. परंतु आमच्या इतिहासाशी व क्रमविकासाशी इमान राखून नवा भारतवर्ष उभा करण्याचे काम नेहमी आमचे 'आम्हाला'च करावे लागणार आहे, याचा विसर पडु देऊ नये. पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करण्यातील धोका ओळखून बरेवाईट हे तर्काने, बुद्धीने, विवेकाने किंवा बुद्धिप्रामाण्याने ठरवून त्यातील उचिताचा स्वीकार या राष्ट्राने केला पाहिजे.

भारताजवळ बुद्धीची वाण नाही. तो कौशल्यात कमी नाही. त्याची कला, त्याचे गणित त्याचे तत्त्वज्ञान ही सर्व पाहता त्याला कुणीच कोणत्याच बाबतीत कनिष्ठ मानू शकणार नाही. फक्त एकाच गोष्टीची त्याला गरज आहे आणि ती म्हणजे आपली युगायुगांची मोहनिद्रा टाकून जागे होण्याची. राष्ट्रीय जीवनाचा आदर्श त्याच्यासमोर उभा करण्यातूनच हे होऊ शकेल. त्याग आणि सेवा हे भारताचे राष्ट्रीय आदर्श आहेत. ते त्याने उत्कटपणे आपल्या जीवनात आणावेत. म्हणजे सगळ्या इष्ट गोष्टी आपोआप घडून येतील. धर्माचा ध्वज उंच फडकण्यातून या देशाचा उद्धार होईल. आपल्या पूर्वप्रभेसह तो उभा राहील व जगातील राष्ट्रमालिकेत स्वतःचे रास्त स्थान ग्रहण करील. त्यावेळी सारे जगत त्याच्याकडे पाहून स्तिमित होईल अशी खात्री स्वामी व्यक्त करतात.

### ९) पूर्व - पश्चिम परस्परावलंबन व वैश्विक ऐक्य :

मानवमात्रातील समता व मानवमात्राचे हक्क इत्यादींसाठी भारताने पश्चिमेकडे पाहावे, पश्चिमी आदर्श उचलावेत असे स्वामींना वाटत होते. पश्चिमेकडे जे काही अनुकरणीय आहे त्यात सर्वांत महत्त्वाचे त्यांना १) हे लोकशाही तत्त्वज्ञान वाटते. २) आधुनिक विज्ञान, संघटन - कौशल्य आणि अथक परिश्रम करण्याची विलक्षण क्षमता या तीन गोष्टींचा अंतर्भाव विवेकानंद करतात. ३) पाश्चात्यांच्या केवळ भौतिक सुखसोयींना भारतीयांनी अंगीकारु नये तर अनुकरणीय अशा त्यांच्या नैतिक व सामाजिक गोष्टीही घ्याव्यात असे ते पुढे सुचवतात. उदाहरणार्थ गुन्हेगारांना तिकडे तुरुंगात सहानुभूतीने वागवतात, एकाच ट्रॅममध्ये कामकरी स्त्री व एखादा लक्षाधीश खांद्याला खांदा लावून बसतो, अमेरिकन स्त्रिया निरनिराळ्या बौद्धिक क्षेत्रांत नैपुण्य मिळवून, आपल्या स्वातंत्र्याचा त्या सदुपयोग करीत आहेत, इत्यादी. याबाबतीत तुलनेने भारतीय परिस्थिती ही किती खेदजनक आहे हे दाखवून या गोष्टी भारतीयांनी पश्चिमेकडून शिकाव्यात, असे आवाहन स्वामी करतात.

परंतु केवळ भारताने पश्चिमेकडून घेणे अशी एकमार्गी प्रक्रिया स्वामींना अभिप्रेत नाही. पश्चिमेने भारताकडून घ्यावे असेही बरेच काही असल्याचे ते सांगतात. पश्चिमेच्या भौतिक वैभवाची एक काळीकुट्ट बाजू म्हणजे श्रेष्ठत्वासाठी निष्ठुर स्पर्धा ही आहेत. पाश्चात्य राष्ट्रांतील संपन्नतेच्या अवखळपणाच्या बुरख्याआड अत्यंत दारुण दुःख लपलेले स्वामींनी पाहिले होते. त्यांच्या उधळपट्टीमागे एक विलक्षण विकलांग गलितगात्रता त्यांना आढळली होती. भगिनी निवेदिताने लिहिल्याप्रमाणे पश्चिमेचे सामाजिक जीवन जरी वरकरणी हास्याच्या ढिगाऱ्याप्रमाणे दिसले तरी त्याच्याखाली आक्रोश, विलाप आणि आंक्रदन दडले आहे. त्या हास्य-लकेरीचा अंत हुंदक्यात होती. पृष्ठभागावर हास्यविनोद व छचोरपणा दिसत असला तरी अंतःप्रवाह जो आहे तो घोर, प्रखर अशा शोकाचा आहे. भारतात याच्या नेमके उलट आहे. तो वरकरणी दुःखी व उदास वाटला तरी मुळात तो निश्चित व आनंदी आहे. याचे रहस्य भारत पाश्चात्यांना देऊ शकतो. धनसंचय, चैन - चंगळ व बाह्यनिसर्गावर विजय - वाहूनही उच्चतर अशी जी मानवी जीवनाची साध्ये आहेत, ती तो देऊ शकतो. केवळ भौतिकता मानवी आत्म्याला चिरस्थायी समाधान कधीच देऊ शकत नाही. त्यासाठी वेदांतील आध्यात्मिक सत्येच हवीत. ही सत्ये भारत पाश्चात्त्यांना पुरवू शकतो.

## ३.५ मूल्यमापन

विवेकानंदांच्या विचारांचा पल्ला अत्यंत प्रचंड व समावेशक आहे. राष्ट्रप्रेमापासून मानवमात्राविषयीच्या प्रेमापर्यंतची उत्तुंग झेप त्यांच्या विचारांनी घेतलेली आहेत. धर्मतत्त्वांचा

प्रसार या देशात व देशाबाहेर करीत असताना अनेक सामाजिक राजकीय संकल्पनांना त्यांनी आकार दिला आहे.

१) राष्ट्रवादाच्या उभारणीत तर विवेकानंदांच्या विचारांचे महत्त्व पायारुप आहे. योगी अरविंद आणि लोकमान्य टिळकांनी पुढे जो राष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला त्या धर्माचे अत्युच्च व विशुद्धतम आदर्श हे गाभ्याच्या ठिकाणी होते. महात्मा गांधींनी नंतरच्या काळात सत्य - अहिंसेच्या तत्त्वज्ञानाल जे धार्मिक आधार निवडले ते त्यांना स्वामी विवेकानंदांच्या शिकवणूकीतून मिळाले. सत्याग्रहीसाठी सत्यप्रियता, निर्भयता, अहिंसकता इत्यादी गुणांचा जो आदर्श त्यांनी उभा केला त्यातही स्वामींच्या विचारांचे पडसाद उमटलेले आढळतात. मातृभूमीविषयींचे आपले प्रेम आणि आकलन विवेकानंदांच्या विचारांच्या अध्ययनातून वृद्धिंगत झाल्याचे स्वतः गांधीनींच म्हटले आहे.

२) दीनदलितांबद्दल त्यांना विलक्षण कणव व कळकळ होती. गरिबांना अधिक गरीब व श्रीमतांना अधिक श्रीमंत होताना पाहून त्यांनी हळहळ व्यक्त केली होती, दलित सेवकांनी गरिबीत राहून कार्य करावे. श्रीमंतावर अवलंबून राहू नये असेही त्यांनी सांगितले होते. शुद्रांच्या हाती सर्वश्रेष्ठ सत्ता निकटच्या भवितव्यात जाईल कोणीच ती प्रक्रिया थांबवू शकणार नाही. समाजपुरुषाच्या पायाशी लोळण घेणाऱ्या या वर्गांना त्यांच्या होत असलेल्या शोषणाची जाणीव होऊ लागली असून उच्चवर्णीय त्यांना यापुढे फार काळ दाबून ठेवू शकणार नाहीत. जनतेच्या या अदम्य शक्तीचा विस्फोट विवेकानंदानी आपल्या अंतःश्चक्षूंनी पाहिला होता. समाजात या निम्नवर्गांना आपले उचित स्थान प्राप्त करुन देण्यासाठी त्यांची धडपड होती.

३) पाश्चात्त्य साम्राज्यशाहीची विवेकानंदांना चीड होती. अशा राष्ट्रामध्ये असणारी घटनात्मक शासने, स्वातंत्र्य व संसदा हा त्यांना निवळ देखावा वाटत असे. एकीकडे या संस्थांच्या उदोउदो करीत असताना संबंध जगाला आपला स्वार्थी एकाधिकारशाहीकडे आणण्याच्या त्यांचा कल आहे असे ते म्हणत.

## ३.६ प्रश्न

१. भारतीय समाज सुधारणा यावर विवेकानंदाचे विचार मांडा.
२. आधुनिक भारतीय राजकीय विचारांना विवेकानंदांनी दिलेले योगदान सांगा.
३. भारतीय राष्ट्र यावर विवेकानंदांच्या विचाराचे विश्लेषण करा.
४. पूर्व पश्चिम परस्परावलंबन व वैश्विक ऐक्य यासंबंधी विवेकानंदाचे विचारांचे मूल्यमापन करा.

## ३.७ संदर्भ

१) भोळे डॉ. भास्कर लक्ष्मण - आधुनिक भारतातील राजकीय विचार.
२) वर्मा व्ही. पी. "मॉर्डन इंडियन पोलिटिकल थॉट."

❖❖❖❖

# ४

# समता : महात्मा ज्योतीबा फुलेंचे योगदान (१८२७ -१८९०)

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट
४.१ प्रस्तावना
४.२ फुले एक कृतिशील समाजसुधारक
४.३ धर्मचिकीत्सेची आवश्यकता यावर भर
४.४ समताविषयक विचार
४.५ इंग्रजी राजसत्तेविषयी भूमिका
४.६ राजसत्ताविषयक दृष्टीकोन
४.७ फुलेंची स्वातंत्र्य संकल्पना
४.८ वर्तमानपत्रे व पत्रकारिता
४.९ मूल्यमापन
४.१० प्रश्न
४.११ संदर्भ

## ४.० उद्दिष्ट

महात्मा फुले यांच्या विचारांचा अभ्यास करुन समता आणि न्याय स्थापनेसाठी त्यांनी केलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

## ४.१ प्रस्तावना

**परिचय** - महात्मा फुले हे फार मोठे समाजसुधारक आणि विचारवंत होते. असमता आणि अन्यायाविरुद्ध लढवय्ये होते. त्यांचे मूळ आडनाव गोऱ्हे आणि मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुन नावाचे खेडे होते. पण त्यांचे आजोबा पुण्यात स्थाईक झाले होते. पेशव्यांना फुले पुरवण्याच्या व्यवसाय घरात चालत आल्यामुळे त्यांना फुले नावानेच लोक ओळखू लागले.

जोतीराव एक वर्षाचे होण्यापूर्वीच त्यांच्या आईचे निधन झाले. सगुणा क्षीरसागर नामक विधवेने त्यांना आईची माया दिली.

स्वतःला जेमतेम अक्षरओळख असलेल्या गोविंदरावांनी आपला मुलगा जोती याला खूप शिकवायचे ठरवले. पण आप्तस्वकीयांनी व शेजाऱ्यापाजाऱ्यांनी त्यांचा बेत हाणून पाडला. प्राथमिक शिक्षण पूर्ण होताच जोतीराव आपल्या वडिलांसोबत शेतात अंगमेहनतीची कामे करु लागले. त्यांची शिक्षणाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांचे वाचन सुरुच होते. त्यांच्या बुद्धीची चमक पाहून गोविंदरावांना तीन चार वर्षांच्या खोळंब्यानंतर जोतीरावांची पुण्यातला स्कॉटिश मिशनच्या हायस्कुलात प्रवेश घेतला. तिथेच त्यांचा सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल बाळवेकर आणि सखाराम यशवंत परांजपे यांच्याशी स्नेह जडला. जन्मभर या ब्राह्मण मित्रांशी त्यांची मैत्री टिकून होती. वयाच्या तेराव्या वर्षी जोतीरावांचा सावित्रीबाईंशी विवाह झाला.

**प्रभाव** - मिशनरी शाळेत जोतीरावांच्या व्यक्तिमत्त्वाची उत्तम जडणघडण झाली. अठरापगड समाजघटकांतून आलेली मित्रमंडळी या शाळेत होती. त्यांच्याबरोबर मिळून त्यांच्या विचाराच्या कक्षा सर्वसमावेशक झाल्या. आपल्या या परधर्मीय मित्रांकडून हिंदू धर्मावर झालेली टीका ऐकून जोतीरावांना आपल्या धर्मातील अन्याय, उच्चनीचभाव आणि धर्माचरणातील मतलबीपणा याची पहिल्या प्रथम जाणीव झाली आणि आपल्या धर्मसंस्थेचे अंतरंग न्यायनिष्ठुरतेने तपासून पाहण्याची त्यांना गरज भासू लागली. थॉमस पेन या तत्त्वज्ञाच्या 'राइटस ऑफ मॅन' या पुस्तकाने जोतीराव खूप प्रभावित झाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर सरकारी नोकरी न करण्याचा निर्णय जोतीरावांनी घेतला.

देशावर इंग्रजांची राजवट होती. खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांना या राजवटीने दिलेली शांतता व सुव्यवस्था हे वरदान आहे असे वाटत होते. सरकारी नोकरीतील उच्चवर्णीय आणि आर्थिक उत्कर्षाची संधी मिळालेले व्यापारी हेही इंग्रजी राजवटीचे गोडवे गात होते. शिवाजी महाराज व जॉर्ज वॉशिग्टंन यांच्या चरित्रातून फूलेंची देशभक्तीची भावना जागृत झाली होती. स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारे तुरळक क्रांतिकारक देशात होते. प्राणाची पर्वा न करता ते साम्राज्यशाहीविरुद्ध बंडखोरी करीत होते. जोतीरावांना या क्रांतिकार्याचे आकर्षण वाटले. लहुजी मांगाच्या आखाड्यात जाऊन त्यांनी शक्तिसाधना केली. दांडपट्ट्यांचे प्रशिक्षण घेतले आणि इंग्रजी राजवट उलथून टाकण्याचे मनसुबे ते रचू लागले.

**अनुभव** - एका ब्राह्मण मित्राच्या वरातीत त्यांचा सनातनी ब्राह्मणांनी जेव्हा अपमान केला तेव्हा त्या प्रसंगाने जोतीराव प्रथम संतप्त झाले. आणि नंतर अंतर्मुख झाले. तोपर्यंत फक्त मायभूमीच्या राजकीय गुलामीचा त्यांनी विचार केला होता. आता त्यांना जाणवले की समाजातील उच्चवर्णीयांनी शूद्रातिशूद्रांना ज्या सामाजिक व मानसिक गुलामगिरीत ठेवले आहे ती राजकीय गुलामीपेक्षा कितीतरी पटींनी भीषण भयंकर आहे; आणि आधी ती दूर झाल्याखेरीज राजकीय स्वातंत्र्य मिळूनही या शोषित घटकांना काहीच मिळणार नाही. जोतीरावांना आपल्या जीवितांचे जणू प्रयोजनच सापडले. ते म्हणजे जातिव्यवस्थेचे समूळ उच्चाटण करायचे आणि स्त्री - शुद्रातिशूद्रांच्या सर्वांगिण विकासासाठी व हक्कांसाठी झटायचे!

## ४.२ फुले एक कृतीशील समाजसुधारक

### १) हक्कवंचित घटकांच्या दुर्दशचे मुख्य कारण :

अविद्या हे असून ते प्रथम दुर करणे अत्यावश्यक आहे असे निदान जोतीरावांनी केले. १८४८ साली जोतीरावांनी पूर्वास्पृश्य मुलामुलींसाठी शाळा उघडली. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात ही अशी पहिलीच शाळा होती. पूर्वास्पृश्यांच्या शिक्षणाची सोय झालेली पाहून सनातनी समाजाचा जोतीरावांवर रोष झाला. त्या शाळेत शिकवायला कोणी शिक्षक तयार होईनात. जोतीरावांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकवले आणि मुलींना शिकवण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. समाजाकडून त्या पति - पत्नींचा अनन्वित छळ झाला. जोतीरावांना पित्याचे घरही सोडावे लागले. पण हे ध्येयनिष्ठ दांपत्य मुळीच डगमगल नाही. पैश्याअभावी त्यांना काहीकाळ शाळा बंद ठेवावी लागली पण त्यांनी ती पुन्हा सुरु केली. १८५१ साली त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा उघडली. वर्षभरातच मुलींच्या आणखी दोन शाळा सुरु केल्या. सावित्रीबाई ह्या सर्व शाळांमध्ये शिकवीत. सनातन्यांनी दगडा - शेणाचा मारा त्यांच्यावर केला तरी त्यांचा निर्धार कायम होता. १८५२ साली जोतीरावांनी मागासवर्गीयांसाठी एक मोफत वाचनालय सुरु केले. या शैक्षणिक कार्यासाठी त्याकाळच्या कंपनी सरकारने जोतीरावांचा सन्मान केला होता.

जोतीरावांचा प्राथमिक शिक्षणावर विशेष भर होता. ब्रिटिश सरकार उच्चवर्गाच्या शिक्षणावर प्रमाणाबाहेर खर्च करते त्यामुळे सर्व वरिष्ठ सरकारी पदांवर त्यांचीच मक्तेदारी बसते अशी तक्रार जोतीरावांनी केली होती. इतरांसाठी ज्ञानाचे दरवाजे बंद करणाऱ्या ब्राह्मणांना जोतीरावांनी धारेवर धरले. ते शूद्रातिशूद्रांवर जो परोपरीने अन्याय करतात व त्यांचा छळ करतात त्याविरुद्ध जोतीरावांनी जन्मभर संघर्ष केला.

### २) जोतीरावांना स्त्रीमुक्तीचा आद्य प्रवर्तक म्हणावे लागेल :

विधवांचे केशवपन, विधवापुनर्विवाहास बंदी, स्त्रियांचा हीन दर्जा आणि अज्ञान, त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण यांच्या विरोधात पहिला आवाज या देशात जोतीरावांनीच उठवला होता. या प्रथांवर केवळ टीका किंवा त्यांचा केवळ शाब्दिक निषेध करुन ते थांबले नव्हते तर ठोस उपयांचाही शोध आणि अवलंब त्यांनी केला होता. केशवपनाची अमानुष व क्रूर प्रथा बंद करण्यासाठी जोतीरावांनी न्हाव्यांनाच आवाहन केले होते. पुरुषांच्या वासनेला बळी पडलेल्या विधवांना आत्महत्येपासून वाचवण्यासाठी त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृहा' ची स्थापना केली होती. निनावी राहून विधवा तेथे अपत्यांना जन्म देऊ शकत. या अनाथ बालकांचे पालकत्व जोतीराव - सावित्रीबाई यांनी पत्करले होते. त्यांच्यातलाच एक मुलगा यशवंतराव याला या दांपत्याने आपला कुलदीपक म्हणून निवडले होते.

### ३) घरातील हौद अस्पृश्यांसाठी खुला केला :

जोतीरावांच्या कृतिशील सुधारकपणाचा प्रत्यय आणखी एका प्रसंगातून मिळतो. त्याकाळी पुण्यात पाण्याचे अनेक हौद असले तरी पूर्वास्पृश्यांना त्यातून पिण्याचे पाणी घेण्याची मुभा नव्हती. पाण्याअभावी त्यांचे हाल होत. कोणीतरी पाणी ओतून त्यांना द्यावे यासाठी तासनतास त्यांना ताटकळत बसावे लागत असे. जोतीरावांनी आपल्या घरातला हौद त्या

लोकांसाठी खुला केला. काही काळ जोतीरावांनी सरकारी कामांवर कंत्राटदारचे काम केले. खडकवासला धरणासाठी बांधकाम साहित्याचा पुरवठाही त्यांनी केला. सार्वजनिक बांधकाम खात्यातील अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचार, आणि निरक्षर श्रमिकांची ब्राह्मण कारकुनांकडुन होणारी फसवणूक त्यांनी जवळून पाहिली. 'गुलामगिरी' नामक पुस्तक लिहून जोतीरावांनी संवादरुपाने भारतातील ब्राह्मणवर्चस्वाचा इतिहास सविस्तर सांगितला. स्त्री - शूद्रातिशूद्रांची मने गुलामगिरीला अनुकूल करुन घेण्यासाठी जी विविध प्रकारची कारस्थाने स्वतःला भूदेव म्हणवणारांनी केली ती जोतीरावांनी वेशीवर टांगली.

## ४) २४ सप्टेंबर १८७३ रोजी जोतीरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

सर्व स्त्री - शूद्रातिशूद्रांना मुक्त करणे आणि ब्राह्मणी शोषणापासून त्यांचा बचाव करणे हे या संस्थेचे प्रयोजन होते. सर्व मानवप्राणी ही परमेश्वराची लेकरे असल्यामुळे समान आहेत, आणि पृथ्वीवरील सर्व गोष्टींचा उपभोग घेण्याचा सर्वांना सारखाच अधिकार आहे. सर्वांनी आपल्या निर्मिकाची उपासना कोणत्याही मध्यस्थावाचून स्वतःच करावी ही सत्यशोधक समाजाची शिकवण होती. त्याचे सदस्यत्व सर्वांसाठी खुले होते. सार्वजनिक सत्य धर्म नामक आपल्या पुस्तकात जोतीरावांनी आपल्या धर्मविषयक तसेच समाजविषयक चिंतनाचे सार सांगितले आहे.

५) १८७६ मध्ये जोतीरावाचे पुणे नगरपालिकेचे सदस्य म्हणून नामांकन झाले. १८७७ च्या भीषण दुष्काळात त्यांनी ग्रामीण दुष्काळग्रस्तांना मदत केली. झोपडपट्ट्यांना, तसेच पूर्वास्पृश्यांच्या वस्त्यांना पाणीपुरवठा व्हावा, आरोग्याचा व शिक्षणाच्या सोयी व्हाव्यात यासाठीही जोतीरावांनी प्रयत्न केले. दारुचे दुष्परिणाम मुख्यतः याच वर्गातील लोकांचे संसार उद्ध्वस्त करतात म्हणून सरकारने नव्या दारुगुत्त्यांना परवाने देऊ नये असे पत्र जोतीरावांनी नगरपालिकेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना लिहिले होते. त्याकाळात त्यावर बरीच चर्चा झाली होती.

## ६) भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा अभ्यास :

सरकारने नेमलेल्या हंटर आयोगास जोतीरावांनी आपले निवेदन सादर केले.त्यात त्यांनी हे स्पष्ट केले की उच्चवर्णीयांच्या शिक्षणावर खर्च करण्यामागे सरकारची जी अपेक्षा आहे की हे लोक खालच्या स्तरांतील लोकांपर्यत शिक्षणाचा लाभ पोचवतील ती अनाठायी आहे. सरकारने स्वतःच दलित - शोषितांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार व्हावा, व्यवहारोपयोगी अभ्यासक्रम आखले जावेत, आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर शूद्रातिशूद्रांना अग्रक्रमाने नोकऱ्या द्याव्यात याकडे जोतीरावांनी सरकारचे लक्ष वेधले होते. जनसामान्यांच्या शिक्षणातूनच या देशात खरी राष्ट्रबांधणी होऊ शकेल. एरव्ही राष्ट्रवादाच्या गप्पा त्यांना पोकळ वाटत होत्या. स्वतःला 'राष्ट्रीय' म्हणवणाऱ्या अनेक सभा व संस्था खऱ्या अर्थाने राष्ट्रीय नव्हेतच, कारण खऱ्या 'राष्ट्राचे' त्या प्रतिनिधित्व करीतच नाहीत हे जोतीरावांनी वारंवार स्पष्ट केले होते.

पुणे नगरपालिकेने जेव्हा भारताचे तेव्हाचे व्हॉइसरॉय लॉर्ड लिटन यांच्या पुणेभेटीच्या प्रसंगी त्यांचे स्वागत करण्यासाठी शहर सजावटीचा निर्णय घेतला तेव्हा फक्त जोतीरावांनी त्याचा निषेध केला. करदात्यांचा पैसा असा वृत्तपत्रस्वातंत्र्याचा गळा घोटणाऱ्या पाहुण्याच्या

स्वागतार्थ उधळण्यापेक्षा शहरातील गरिबांच्या शिक्षणावर तो सार्थकी लावावा असे त्यांचे म्हणणे होते. हाच निधडेपणा जोतीरावांनी 'ड्यूक ऑफ कनाट' च्या पुणे भेटीतही दाखवला होता. त्यांनी पाहुण्यांना हे बजावले की त्या कार्यक्रमातील वैभवी झगमगाटावरुन त्यांनी या देशाच्या परिस्थतीबद्दल मत बनवू नये. त्यांनी अस्पृश्यांच्या वस्त्यांना किंवा आसपासच्या खेड्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील दैनदारिद्र्य पहावे आणि राणी व्हिक्टोरियाला जाऊन सांगावे की त्यांनी आपल्या या गरीब शोषित प्रजाजनांच्या शिक्षणासाठी काहीतरी करावे.

**७) जोतीरावांनी या देशातील शेतीच्या वाढत्या दुरावस्थेकडेही राज्यकर्त्यांचे लक्ष वेधले होते :**

'शेतकऱ्याचा असूड' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी शेतीचे व शेतकऱ्यांचे कंगालीकरण नुसते वर्णन केलेले नाही तर त्याची मूलगामी कारणमीमांसा आणि त्यावरील उपाययोजना यांचाही ऊहापोह केला आहे. एवढेच नव्हे तर जुन्नरच्या शेतकऱ्यांचे नेतृत्व करुन त्यांनी जमीनदार - सावकार यांच्या विरोधात प्रत्यक्ष आंदोलनही उभे केले होते.

उपस्थित अशिक्षित, कष्टकऱ्यांनी जोतीरावांना 'महात्मा' ही पदवी स्वयंस्फूर्तीने दिली. त्यानंतर काही दिवसांतच जोतीराव अर्धांगवायूच्या व्याधीने ग्रस्त झाले, आणि त्यातच त्यांचे २८ नोव्हेंबर १८९० रोजी निधन झाले.

## ४.३ धर्मचिकित्सेची आवश्यकता यावर भर

स्कॉटिश मिशनच्या शाळेत गेल्यापासूनच जोतीरावांच्या धर्मचिंतनाला चालना मिळाली होती.

**१) ख्रिस्तप्रणीत मानवतावादाने त्यांना विशेष प्रभावित केले होते :**

ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे व्यक्तिगत आचरण आणि समर्पित सेवाभाव यांचीही त्यांच्या मनावर छाप पडली होती. उच्च व उदात्त अशा नीतीमूल्यांची महती हिंदूंच्या धर्मग्रंथानी गायिली असली तरी स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र यांना साधा माणसुकीचा दर्जा किंवा प्राथमिक नैसर्गिक मानवी हक्कही येथील समाजव्यवस्थेने कधी मिळवून दिले नाही याचे वैषम्य जोतीरावांना होते. हिंदू धर्माचे जे कोणी परंपरागत प्रवक्ते म्हणून समाजात वावरत होते त्या शास्त्रीपंडितांच्या व पुरोहितवर्गाच्या ठिकाणी उग्र अहंकाराखेरीज दुसरा भावच आढळत नव्हता.

**२) जोतीराव आस्तिक होते आणि एकेश्वरवादीच होते (Believed in One God):**

पण त्यांची ईश्वरविषयक कल्पना पूर्णपणे निर्गुण - निराकार होती. त्यांचा असा विश्वास होता की अनंत कोटी सूर्यमंडळाचा व ग्रहोपग्रहांसहित सर्व प्राणिमात्रांचा एक निर्माता असलाच पाहिजे. 'निर्मिक' या नावाने ते त्यास संबोधतात. तो जोतीरावांच्या मते सर्व चराचरसृष्टीचा कर्ता, सर्वांचा पोशिंदा, दयाधन, न्यायकर्ता व उद्धारक आहे. पण ते त्याला कोणत्याही धर्मविशिष्ट नावाने संबोधत नाहीत. आराधना, भक्ती, पूजा, नैवेद्य, नवससायास, जपअनुष्ठान, साक्षात्कार वगैरे गोष्टींचा जोतीरावांनी निषेध केला आहे. प्रार्थनेवर जोतीरावांचा विश्वास असला तरी मूर्तिपूजेला ते विरोध करतात. कालबाह्य व अज्ञानजन्य विधी टिकून राहण्यामागे

पुरोहितवर्गाचा ऐतखाऊपणाच आहे असे त्यांचे म्हणणे होते. कर्मकांडे माणसामाणसांत फूट पाडतात या कारणांनी जोतीरावांना ती त्याज्य वाटतात.

फलज्योतिषे, बुवाबाजी, मंत्रतंत्र, पापपुण्य, स्वर्ग-नरक यांचा फोलपणा जोतीरावांनी स्पष्ट केला आहे. समाजाला अज्ञानात ठेवणारी व त्यांच्या मानसिक गुलामगिरीला पुष्टी देणारी मिथके हास्यापद व त्याज्य ठरवून उलटपक्षी त्यांचा स्वाभिमान व आत्मविश्वास वाढवणारी मिथके उभी करण्याचे दुहेरी कार्य जोतीरावांनी केले आहे.

**३) बुद्धिप्रामाण्यवाद, धर्माचे समाजशास्त्रीय विश्लेषण आणि इहवादी दृष्टिकोन ही जोतीरावांच्या धर्ममीमांसेची तत्त्ववैचारिक त्रिसूत्री म्हणता येईल.** विश्वातील इतर सर्व पशुप्राण्यांपेक्षा माणसाचे वेगळेपण त्याच्या सारासार विचार करण्याच्या क्षमतेत आहे. इतर प्राणी हजारो वर्षे एकाच पद्धतीने जगत आले, माणसाच्या जीवनपद्धतीत मात्र सतत सुधारणा झाली याचे श्रेय त्याच्या बुद्धीला देत असतानाच माणसाने या पवित्र बुद्धीचे पुरेसे सार्थक केले नसल्याबद्दल खंतही ते व्यक्त करतात. त्यांच्या मते मानसिक दास्यातून मानवाची मुक्ती करण्याचे अगाध सामर्थ्य बुद्धीच्या ठायी असते, पण बुद्धीच्या निकषावर तपासून न पाहता माणसाने असंख्य गोष्टींवर विश्वास ठेवल्यामुळे तो मानसिक गुलामीत खितपत पडला आहे.

**४) सांस्कृतिक वसाहतवादाविरुद्ध -** जोतीरावांच्या धर्मसुधारणाविषयक प्रयत्नांचे मूळ येथील समाजरचनेतील विषमतापोषक मूल्यांना उखडून फेकून समाजाची सर्वांगीण पुनर्रचना पर्यायी संस्कृतीच्या आधारावर करणे होते. बहुजनसमाजाचे आर्थिक शोषण हा त्यांच्या दृष्टीने एका सांस्कृतिक परंपरेचा अंगभूत भाग होता. सामाजिक विषमता हा केवळ आर्थिक विषमतेचा परिणाम नव्हता. केवळ आर्थिक समानतेच्या उपायांनी सामाजिक विषमतेचे उच्चाटन होणे शक्य नव्हते. त्यासाठी संस्कृतीचे नवे अनुबंधच निर्माण करणे जोतीरावांना आवश्यक वाटत होते. समाजातील भटब्राह्मण ही केवळ धार्मिक - सामाजिक जात नसून एक आर्थिक वर्गही आहे आणि या वर्गाच्या सामाजिक व आर्थिक वर्चस्वामुळेच शेतकरी व शूद्र यांचे दारिद्र्य टिकून राहिले आहे. त्यासाठी पारंपरिक, सांस्कृतिक मूल्यांचा त्यांनी यथेच्छ उपयोग करुन घेतला आहे. इंग्रजी राजवट ही त्यांच्या या वर्चस्वाला छेद देऊ शकलेली नाही हे जोतीरावांच्या ध्यानात आले होते. जातिव्यवस्था ही केवळ समाजरचना नसून ती एक मानसिकता आहे. ती मानसिकता ज्या गृहीतकांवर आधारित होती ती तमाम गृहीतके निकालात काढणे हे जोतीरावांच्या धर्ममीमांसेचे प्रयोजन होते.

फुल्यांच्या लढा हा सांस्कृतिक वसाहतवादाविरुद्ध होता.

**५) ब्राह्मणकपट हे शूद्रातिशूद्राच्या गुलामगिरीचे मुख्य कारण आहे** : या निष्कर्षाप्रत एकदा फुले आल्यावर मग त्यांनी त्या कपटाचे स्वरुप जनतेपुढे मांडण्यासाठी लोकपरंपरेतून रचलेला इतिहास सांगितला आहे. त्यानुसार आर्यब्राह्मण हे मूळचे भारतातील रहिवासी नव्हते. इराणकडून ते येथे आले आणि त्यांनी आपल्या धनुर्विद्येच्या वगैरे कौशल्याद्वारे येथील 'आडहत्यारी' लोकांचा पराभव केला. येथील मूळची लोकसत्तात्मक रचना नष्ट केली. येथील मूळच्या लोकांना कष्ट करायला लावून स्वतः ऐतखाऊ बनले. ही त्यांची सत्ता पक्की करण्यासाठी मूळच्या शूर प्रतिकारकर्त्यांना त्यांनी शूद्र व अतिशूद्र करुन टाकले. वर्णजातिभेदांच्या भिंती बळकट करुन उच्चवर्णीयांच्या ठिकाणी सामाजिक अहंगड व

निम्नवर्णीयांच्या ठिकाणी न्यूनगंड वाढवणारी मानसिकता त्यांनी वाढवली. आपले अधिकार आणि इतरांचे दास्य पक्के व कायमचे करण्यासाठी धर्मग्रंथाचा आधार घेतला, प्रसंगी हिंस्त्र मार्गांचाही अवलंब केला. भ्रामक कल्पनांचे व अंधश्रद्धांचे कुसंस्कार जनमनावर केले. थोडक्यात धर्मातून राजकारण करण्याचे कपट आर्यांनी यशवी केले.

हे राजकारण उघड करुन ब्राह्मण कपटाला छेदणे हे जोतीरावांच्या कार्याचे मध्यवर्ती सूत्र होते. शूद्रांनी विद्या संपादन करुन वर्णजातीभेदावर उभी असलेली ब्राह्मणशाही सरंजामदारी रचना मोडून टाकावी आणि सत्यधर्माच्या समताधिष्ठित, सर्वसमावेशक, विश्वकुटुंबात्मक व कष्टकऱ्यांची सत्ता असलेल्या आदर्श राज्याची स्थापना करावी असे त्यांचे मत होते.

## ४.४ समताविषयक विचार

१९ व्या शतकातील जगभरच्या विचारवंताप्रमाणेच जोतीरावांनाही समतेच्या तत्त्वाने प्रेरित केले होते. त्यांनी समतातत्त्वाचा अत्यंत सखोल, समग्र आणि साक्षेपी विचार मांडला होता. येथील विषय समाजव्यवस्थेची उपपत्ती सांगून ती कशी तर्कदुष्ट आहे हे त्यांनी स्पष्ट केले होते. माणसाचे माणूस म्हणून असलेले हक्क त्याला कधीच कोणी नाकारु शकत नाही असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य यांचा त्यांनी कडाडून विरोध केला. शिक्षण, प्रबोधन, कायदे, व्यवसाय स्वातंत्र्य इत्यादी मार्गांनी पारंपरिक विषमता नष्ट करुन नवा समताधिष्ठित समाज कसा निर्माण करता येईल याचा त्यांनी बारकाईने विचार केला. ब्राह्मणी व वर्णश्रेष्ठत्वाचा पुरस्कार करणाऱ्या विचारप्रणालीला समतावादी शूद्र - विचारप्रणालीचा पर्याय देण्याचा पहिला प्रयत्न जोतीरावांनी केला. त्यामुळेच ते त्यांच्या काळातील समतावाद्याचे सर्वश्रेष्ठ अग्रणी ठरतात.

**१) He condemneddual morality of the Brahman system.** हजारो वर्षापासून येथे प्रचलित असलेली विषमता हे आर्यभटांचे कारस्थान आहे असा जोतीरावांचा निर्वाळा होता. त्यांच्या मते ईश्वराच्या नावाने विषम समाजरचना करुन धार्मिकपणाचा टेंभा मिरवणारे लोभी आर्य हे पशुपक्ष्यादी प्राण्यांपेक्षाही हीन दर्जाचे आहेत. कारण त्यांनी आपल्या सारासार विचारबुद्धीचा गैरवापर इतर माणसांना नाडून खाण्यासाठी केला आहे. त्यांनी येथील मूळ रहिवाशांवर ज्ञानबंदी व स्पर्शबंदी लावली. विषम समाजरचनेला ईश्वरनिर्मित ठरवून बळकट केले. शोषितांनी संघटित होऊ नये म्हणून जातिभेदाचे थोतांड उभे केले, स्वार्थ साधेल असे ग्रंथ निर्माण केले. अशा प्रकारे शूद्रातिशूद्रांची गुलामगिरी कडेकोट करुन हे स्वतः ऐषाराम भोगत बसले. धर्माचे स्तोम अतोनात वाढवून त्याचे प्रभावक्षेत्र त्यांनी अमर्याद विस्तारले. शूद्रातिशूद्रांना ज्ञानार्जन व धनसंचय करण्यास मनाई करुन त्यांना कायम परावलंबी ठेवले.

**२) By birth all are free and equal.** सर्व मानवप्राणी एकाच ईश्वराची लेकरे असल्यामुळे त्यांचे सर्व हक्कही समान असले पाहिजेत. त्यांनी एकमेकांत बंधुभाव आचरावा अशी शिकवणूक जोतीरावांनी सत्यशोधक समाजाद्वारे जनतेला दिली. निसर्गातल्या सर्व गोष्टी निर्मिकाने सर्वांकरवी मुक्त वापर व्हावा यासाठी निर्माण केल्या आहेत. सर्व माणसांना सारखीच पंचेद्रिये व विचारशक्ती दिली आहे. हे स्मरुन माणसांची परस्परांशी समतेचा व्यवहार करावा असे आवाहन जोतीरावांनी केले आहे. निर्मिकाने सर्वांना दिलेले मानवी अधिकार सर्वांना भोगता न येणे हे त्यांना आपल्या समाजरचनेचे सर्वात आक्षेपार्ह वैगुण्य वाटत होते.

**३) He protested against man-made inequality.** माणसांच्या क्षमता जातीगोत्रावरुन गृहीत धरण्याच्या प्रथेला जोतीरावांनी कडाडून विरोध केला आहे. उच्चवर्णीयांना सर्वगुणसंपन्न समजणे आणि व्यक्तिगत गुणवत्ता न तपासता सर्व स्त्रीशूद्रादिकांना जबाबदारीच्या व अधिकाराच्या जागांपासून दूर ठेवणे त्यांना अन्यायाचे वाटते. यातून जी कष्टकरी व ऐतखाऊ अशी विभागणी समाजात होते ती त्यांना आक्षेपार्ह वाटते. राबणारांच्या जीवनावश्यक गरजाही भागू नयेत आणि वरिष्ठ वर्णीय अंमलदारांच्या वेतनांवर व चैनींवर बेलगाम खर्च केला जावा हे त्यांना योग्य वाटत नाही.

जन्मसिद्ध श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व या दोन्ही गोष्टी जोतीरावांनी अग्राह्य ठरवल्या आहेत. राज्यकर्त्यांनी येथे सर्वांना कायद्यान्वये समान हक्क दिले. पण ते तेवढे पुरेसे नाही. कायद्यान्वये सारखेच हक्क मिळाले की सर्वांना खरोखरच प्रत्यक्षात समान संधी मिळतात असे होत नाही. सामाजिक - मानसिक - शैक्षणिकदृष्ट्या मागास ठेवल्या गेलेल्या घटकांचा वेगळा विचार करुन त्यांना इतरांच्या बरोबरीने आणल्याखेरीज समान संधीचा लाभ त्यांना घेताच येणार नाही याचे भान राज्यकर्त्यांनी ठेवावे असे जोतीराव म्हणतात. शिक्षणक्षेत्रात सरकारने या वर्गांसाठी करावयाच्या कामांचे ते ठोस तपशीलही देतात. रयतेला न्याय मिळावा म्हणून न्यायप्रेमी राज्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या यंत्रणा येथील सामाजिक आर्थिक विषमतामुळे कशा कुचकामी ठरतात हेही जोतीरावांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे.

**४) Stress on equality of men and women and empowerment and upliftment of women :** स्त्रीपुरुष - समतेचा सातत्याने पुरस्कार करणारे आणि त्यासाठी अत्यंत मूलगामी युक्तिवाद करणारे जोतीराव हे भारतातील स्त्रीमुक्ती विचारांचे आद्यप्रवर्तक ठरतात. स्त्रीशिक्षण, स्त्रीविषयक अन्याय, रुढींचे निर्मूलन, स्त्रियांच्या व्यवहारिक अडचणींचे निवारण या क्षेत्रांत त्यांनी ठोस कार्य केले होते. त्याचप्रमाणे स्त्रीदास्याच्या कारणांचा खोलात जाऊन त्यांनी शोधही घेतला होता. त्यांनी स्त्रीमुक्तीच्या प्रश्नाकडे एक सुटा प्रश्न म्हणून कधीच पाहिले नव्हते. एकूण हिंदू संस्कृतीचा व विषम समाजरचनेचा एक अविभाज्य भाग म्हणूनच त्यांनी स्त्रियांच्या गुलामगिरीचा विचार केला होता त्यामुळे संपूर्ण समाजव्यवस्था आमूलाग्र बदलणे हाच त्यांना स्त्रियांच्या बंधमुक्ततेचा मार्ग दिसत होता. तुकड्यातुकड्यांनी स्त्रियांच्या कल्याणाचे प्रयत्न अवश्य व्हावेत पण मुख्य रोख सामाजिक पार्यवरण बदलण्यावर आणि कुटुंबरचनेची अधिसत्तावादी चौकट मोडण्यावरच असावा असे ते म्हणतात.

बालविवाह हे जोतीरावांच्या मते, स्त्रियांच्या अनेक अरिष्ठांचे मूळ ठरतात. अल्पवयीन मातांच्या व त्यांच्या बालकांच्या आरोग्याचा प्रश्न तर यातून उद्‌भवतोच, पण स्त्रीशिक्षणासही बालविवाहांमुळे अडथळा येतो. अशिक्षित स्त्रियांना अकालवैभव्य या परित्यक्तेचे, जीवन पत्करावे लागल्यास परावलंबित्वापोटी येणारी सर्व संकटे सोसावी लागतात. बहुपत्नीत्व, बाला - जरठ विवाह, पुरुषवासनेला बळी पडण्याचा धोका, भ्रूणहत्या, गुरासारखे काबाडकष्ट आणि तरीही उपासमार अशी ती संकटे होत.

स्त्री आणि पुरुष दोघांनाही एकाच निर्मिकाने निर्माण केले असून सारखेच अधिकारही दिले आहेत. परस्परांच्या हक्कांबद्दल त्यांनी आदर बाळगावयास हवा. सर्व धर्माची पुस्तके पुरुषांनीच लिहिलेली असल्यामुळे स्त्रियांचे न्याय्य हक्क तर ते त्यांना देत नाहीतच, उलट पुरुषप्राधान्यालाच पुष्टी देतात.

५) जोतीरावांचा जातिव्यवस्थेला सर्वात मोठा आक्षेप होता तो ती विषमतामूलक आणि विषमतेला चिरंजीव करणारी आहे या कारणांनी "शुद्ध" म्हणवणारे प्रत्यक्षात किती भ्रष्ट आचरण करतात हे जोतीरावांनी सोदाहरण सांगितले. शूद्रांनी आपला न्यूनगंड झटकून टाकावा आणि अज्ञान - अंदश्रद्धा मनातून काढून टाकाव्यात असे आवाहनही त्यांनी पुनः पुन्हा केले आहे.

ब्राह्मोसमाज, प्रार्थना समाज वगैरे सामाजिक सुधारकांच्या संस्थांनीही अस्पृश्यांना जवळ केले नाही किंवा त्यांचे मानवी हक्क त्यांना परत मिळवून देण्याचा खटाटोप केला नाही. त्यामुळेच जोतीरावांचा या संस्थांवर राग होता. त्यांच्या मते, या संस्था खऱ्या अर्थाने 'सार्वजनिक' किंवा 'नॅशनल' नसल्यामुळेच समताधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने कामाच्या नाहीत. केवळ ब्राह्मणी मध्यमवर्गाच्या हितसंबंधांपुरताच विचार त्या करीत असल्यामुळे शूद्रातिशूद्रांनी त्यापासून दूर राहिलेलेच बरे असे जोतीरावांनी म्हटले आहे.

६) **जोतीरावांचा मार्ग दुहेरी स्वरुपाचा होता.** एका बाजूने त्यांना भटब्राह्मणांनी शूद्रातिशूद्रांवर लादलेल्या सांस्कृतिक वसाहतवादाचे निराकरण करायचे होते आणि दुसऱ्या बाजूने शूद्रातिशूद्रांनी 'संस्कृतीकरणाची' वाट धरुन आहे त्या विषम चौकटीतच स्वतःचा व्यक्तिगत स्वार्थ साधण्याच्या भरीस न पडता जातिव्यवस्था समूळ नष्ट करण्यासाठीच कटिबद्ध राहावे याची दक्षता त्यांना घ्यायची होती. त्यांना जातीव्यवस्थेची संपूर्ण उतरंडच जमीनदोस्त करायची होती.

७) **न्याय व समतेसाठी सुधारणा आणि सामाजिक बंडखोरी दोन्हीला महत्त्व दिले :** जोतीरावांच्या विचारात वर्णभेद, जातिभेद व लिंगभेद यावर आधारित सामाजिक, आर्थिक विषमतांच्या निराकरणावर विशेष भर दिलेला दिसून येतो. दलित, शोषितांना व स्त्रियांना जी समता मिळावी ती भूतदयेपोटी किंवा परोपकारबुद्धीतून नव्हे तर तो त्यांचा हक्क आहे म्हणून प्राप्त व्हावी. उदारमतवादी विचारातील व्यक्तिप्रतिष्ठा, मानवी हक्क व न्याय या मूल्यांचा जोतीरावांच्या समताविचारावर पगडा असला तरी उदारमतवादी सुधारकांपेक्षा त्यांचे मार्ग मात्र निराळे होते. त्यांच्या मार्गांचे एकूण स्वरुप सुधारणेपेक्षा सामाजिक बंडखोरीच्या जवळ जाणारे होते. आमूलाग्र सामाजिक परिवर्तन आणि नवसमाजरचना ही त्या बंडखोरीची उद्दिष्टे होती.

## ४.५ इंग्रजी राज्यसत्तेविषयी भूमिका

ज्योतीरावांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या सभासदाला जी शपथ घ्यावी लागत असे तीत आपण इंग्रजी सत्तेशी एकनिष्ठ राहू असे एक वाक्य असायचे. इंग्रजी राज्यसत्तेविषयी कृतज्ञताभाव आणि तिच्या विरोधात राजकीय स्वातंत्र्याचा लढा संघटित करु पाहणाऱ्या राष्ट्रवादी प्रवाहाविषयी अढी जोतीरावांच्या मनात होती.

१) ब्रिटिशांच्या सुसंस्कृत, उदार व न्यायशील छत्राखाली कष्टकरी समाजाची सर्वांगीण प्रगती घडून येईल असा विश्वास त्यामागे होता.

इंग्रजी राजवट येथे स्थापन होण्यापूर्वी ज्या पेशवाईचा अंमल होता त्यात शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची होती. साऱ्याच्या ओझ्यामुळे शेतकरी हैराण झाला होता. कष्टकऱ्यांच्या कष्टातून उभा राहिलेला पैसा त्यांच्या कल्याणावर खर्च न करता ऐतखाऊ अन्नछत्रे घालण्यात,

त्यांना शेलापागोटी वाटण्यात आणि देवदेवतांच्या नावाने उभारलेल्या संस्थानांना देणग्या देण्यात खर्ची पडत असे. इंग्रज राजवटीपूर्वीच्या हजार वर्षात कोणतीही राजवट प्रजाहितदक्ष नव्हती. यामुळेच आधुनिक युगाच्या नव्या जाणिवा घेउन आलेल्या इंग्रजी राजवटीचे स्वागत या देशातील अनेकांनी केले होते. ठगपेंढाऱ्याच्या बंदोबस्त करुन या राजवटीने शांतता - सुव्यवस्था स्थापन केली. जनतेवर "द्वेषामुळे, धर्मसंबंधाने, नीतिसंबंधाने, राज्यसंबंधाने आणि दुसऱ्या अनेक गोष्टींच्या संबंधाने जुलूम होत असत" त्यातून ती सुटली याबद्दल जोतीरावांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

या राजवटीने विचारस्वातंत्र्य आणि मुद्रणस्वातंत्र्य मिळवून दिले ही गोष्ट जोतीरावांना दलित - शोषितांच्या दृष्टीने फारच महत्त्वाची वाटते. या स्वांतत्र्यामुळेच आपण शूद्रातिशूद्रांची दुःखे जगासमोर मांडू शकलो अशी त्यांची धारणा होती. ही राजवट म्हणजे कायद्याचे राज्य आहे. तिचा न्याय निःपक्षपाती व सर्वांसाठी सारखा आहे हे त्यांना विशेष महत्त्वाचे वाटते. इंग्रज राज्यकर्त्यांनी स्त्रीशूद्रादिकांसाठी शिक्षणाची दारे खुली केल्यामुळे या समाजघटकांचे डोळे उघडले, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची त्यांना जाणीव झाली, आणि ते त्या अन्यायाविरुद्ध लढण्यास कटिबद्ध झाले, ही त्या राजवटीची सर्वात मोठी देण आहे असे जोतीराव सांगतात. ईश्वरी योजनेनेच इंग्लंडशी आपल्या देशाचा संबंध जुळून आला असून ही राजवट येथे दीर्घकाळ टिकून राहाणेच येथील रयतेच्या दृष्टीने हिताचे होणार याबद्दल त्यांना तीळमात्रही शंका नव्हती.

**२) इंग्रजी राजवट तळागाळातील समाजासाठी सर्वांगीण मन्वंतराचे साधन** ठरणार असल्याचा जोतीरावांचा आत्मविश्वास होता. पाश्चात्य उद्योगप्रधान संस्कृतीशी, आधुनिक मूल्यांशी व विचारप्रणालींशी त्यांची तोंडओळख झाली. आपले हक्क व प्रतिष्ठा यांची त्यांना जाणीव झाली. चिरेबंदी समजण्यात आलेल्या उतरंडवजा जातिव्यवस्थेचा पाया हादरला. प्रवास सोयीचा झाल्यामुळे गावगाड्याच्या बंदिस्त व चाकोरीबद्ध जीवनक्रम खंडित झाला. विकासाच्या नव्या दिशा उपलब्ध झाल्या. समाािजक मन्वंतराची प्रक्रिया अशीच आणखी कित्येक वर्षे सुरु राहायची तर इंग्रजी राजवट टिकून राहिली पाहिजे. ती जाऊन जर पुन्हा स्वकीय सत्ता स्थापन झाली तर प्रगतीची चक्रे उलट्या दिशेने फिरु लागतील अशी भीती जोतीरावांना वाटत होती.

**३) समतेवाचून स्वातंत्र्याला अर्थ नाही :** ब्रिटिश राजवटीच्या विरोधात देशात वेळोवेळी उभ्या राहिलेल्या आंदोलनांशी जोतीराव कधीच जुळवून घेऊ शकले नाहीत. मग ते आंदोलन सशस्त्र क्रांतिकारकांचे असो की कायद्याच्या चौकटीत राहून राजकारण करणाऱ्या राष्ट्रसभेचे असो. जोतीरावांच्या मते या सर्व आंदोलनाचे प्रवर्तक उच्चवर्णीय असून त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान स्थितिवादी व परंपराप्रियतेचे आहे. स्त्री - शूद्रातिशूद्रांच्या हक्कांबद्दल आणि प्रश्नांबद्दल त्यांना काडीमात्रही आस्था नव्हती. आपल्या हाती सत्ता घेण्याइतपत जागृती, संघटितपणा व क्षमता अजून येथील बहुजन समाजाच्या ठिकाणी आलेली नव्हती. राष्ट्राच्या राजकारणात त्याचा अजून पुरता प्रवेशही जेथे झाला नव्हता तेथे त्यांना स्वातंत्र्य कसे पेलणार? असा प्रश्न जोतीरावांना स्वाभाविकपणेच पडत होता. राष्ट्रभक्तींच्या राजकारणांपेक्षा वंचितावरील अन्याय निवारणाचा संघर्ष त्यामुळेच त्यांनी अधिक महत्त्वाचा मानला होता. समतेवाचून स्वातंत्र्याला त्यांच्या मते काहीच अर्थ नव्हता. ब्रिटिश सत्तेकडून आपले हक्क मागणारी मंडळी स्वतः ते हक्क शूद्रातिशूद्रांना द्यायला तयार होत नाहीत, किंबहुना या दलितशोषितांना मानूसपणाची प्रतिष्ठाही देण्याचे त्यांच्या मनात येत नाही यावर जोतीरावांनी अचूक बोट ठेवले.

४) इंग्रजी राजवटीविषयी कृतज्ञताभाव जोतीराव दाखवीत असले तरी तेवढ्यावरुन त्यांना इंग्रजधर्जिणे ठरवता येणार नाही. या राजवटीची त्यांना जाणवलेली वैगुण्येही त्यांनी अत्यंत परखड शब्दांत मांडलेली आहेत.

वरिष्ठ ब्रिटिश अधिकारी ऐषआरामात दंग असतात. शेतकरी - कष्टकऱ्यांची खरी परस्थिती समजून घेण्याची त्यांना सवड नसते, आणि इच्छाही नसते. त्यामुळे त्यांच्या हाताखालच्या ब्राह्मण कर्मचाऱ्यांचे आयतेच फावते. गरिबांची चहूबाजूंनी कोंडी होते. रेव्हेन्यूखाते त्यांना लुबाडते, न्यायखाते त्यांना खेटे घालायला लावून देशोधडीला लावते. कोणत्याही सरकारी खात्यातील लाचलुचपत व भ्रष्टाचार रयतेला न्यायापासून वंचित ठेवतो. या सर्व प्रकारांबाबत जोतीरावांनी आवाज उठवला होता.

कष्टकऱ्यांच्या कष्टांतून उभ्या राहिलेल्या मालमत्तेचा विनियोग कष्टकऱ्यांच्या कल्याणार्थ अग्रक्रमाने व्हावा, त्यांना योग्य ते शिक्षण दिले जावे. समाजातील विषम सत्तावाटपाच्या जागी संतुलित सत्ता यावी, म्हणजेच कष्टकऱ्यांच्या हाती खऱ्या अर्थाने सत्तेची सूत्रे यावीत, लोकसंख्येच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्या दिल्या जाव्यात. राज्यकर्त्यांची हांजीहांजी करुन त्यांच्या अनुग्रहाचे लाभ पदरात पाडून घेण्याची तयारी त्यांनी कधीच केली नाही. राज्यसत्ता जर शोषितांप्रती आपले कर्तव्य करण्यास कचरली तर शोषितांचे नुकसान तर होईलच पण त्याचवेळी ती सत्ता स्वतःच्याही पायांवर धोंडा पाडून घेईल हे जोतीराव तिच्या निदर्शनास आणून देतात.

## ४.६ राजकीय सत्ताविषयक दृष्टिकोन

राजकीय सत्ता या संकल्पनेचा त्याकाळी जेवढा सर्वांगीण विचार जोतीरावांनी केला होता तेवढा दुसऱ्या कोणत्याही समाजचिंतकाने केला नसावा. इंग्रजी राज्यसत्तेचे ध्येयधोरण व प्रशासन एवढ्यापुरता तो सीमित नव्हता. सामाजिक - धार्मिक दिसणाऱ्या बाबींच्या मुळाशी असलेल्या 'राजकीय' सत्तेचाही शोध त्यांनी घेतला होता. राज्यसत्तेचे विशुद्ध स्वरुप आणि भ्रष्ट स्वरुप यांच्यातील तफावतही त्यांनी स्पष्ट केली होती. राज्यकर्त्यांचे गुणदोष आणि त्याचा एकूण समाजावर पडणारा इष्टानिष्ट परिणाम यांचाही ऊहापोह जोतीरावांनी केला होता.

समाजपरिवर्तनाचे एक साधन म्हणून राजकीय सत्ता फार महत्त्वाची भूमिक पार पाडू शकते असे जोतीराव मानत असत. सत्ता हातची गेली की माणसाच्या स्वाभिमान व कर्तृत्व लयास जाते. त्यांचे हे ठाम मत होते की शूद्रातिशूद्रांची धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट होऊन त्यांच्या हाती मोक्याची सत्तास्थाने आल्याशिवाय त्यांना उर्जितावस्था येण्याची मुळीच शक्यता नाही. यावरुन असे दिसते की केवळ राज्यसंस्थेशी संबंधित शिखरपातळीवरच्याच नव्हे तर समाजात सर्वत्र विखुरलेल्या वर्चस्वसंबंधांना गवसणी घालणारी सत्तासंकल्पना जोतीरावांना अभिप्रेत होती.

## ४.७ फुलेंची स्वातंत्र्य संकल्पना

फुल्यांचे विचार आणि त्यांच्या जीवितकार्याचे मुख्य सूत्र मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय हेच होते असे दिसते. सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टीने विषम व विभक्त असलेल्या समाजात वरिष्ठांचे स्वातंत्र्य म्हणजे दीनदुबळ्यांसाठी अंतर्गत गुलामी आणि संघटित जुलुमशाहीच ठरण्याची शक्यता असते. विषम सामाजिक परिस्थिती असलेल्या समाजात सत्तेचे वाटपही विषमच होत असते. त्यामुळे आधी भारतीय समाजाच्या निरनिराळ्या घटकांत सत्तेचे योग्य व न्याय वाटप व्हावे असे फुलेंचे मत होते.

मनुष्याला स्वतंत्रता असणे ही एक जरुरीची गोष्ट असते आणि त्यातही विचारस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्याचे महत्त्व त्यांनी विशद केले होते. दलित शोषितांसाठी तर ही स्वातंत्र्ये अधिकच निकडीची असतात असेही त्यांचे मत होते.

## ४.८ वर्तमानपत्रे व पत्रकारिता

लोकशाही व राज्यव्यवस्थेत वृत्तपत्रांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जोतीरावांच्या काळात सर्व मराठी वर्तमानपत्रकार ब्राह्मण असल्यामुळे तेव्हांच्या वृत्तपत्रांत उच्चवर्णीय समाजाच्याच प्रश्नांना वाचा फुटत असे. खेड्यापाड्यातील गरीब कष्टकऱ्यांवर सरकारी यंत्रणेतील ब्राह्मण कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या अन्यायाची दखल वृत्तपत्रांतील त्यांच्या जातभाईकडून कशी घेतली जाणार? ब्रिटिश सरकारविरुद्ध आकाशपाताळ एक करणारी ही वृत्तपत्रे बहुजनसमाजाच्या समस्यासंबंधी मात्र मूग गिळून असत. इंग्रज राज्यकर्त्यांना मात्र लोकमताचा कानोसा घेण्यासाठी याच वृत्तपत्रांवर अवलंबून रहावेसे वाटत होते. जोतीरावांच्या मते ही सरकारची मोठी चूक होती. त्या वर्तमानपत्रांचे मत हे संपूर्ण समाजाचे मुळीच मत नव्हते. समाजातील बहुसंख्य जनतेशी या विद्वान पत्रकारांचा मुळी संबंधच नव्हता. इंग्रज राज्यकर्त्यांनी वर्तमानपत्रांनी प्रसृत केलेल्या मजकुरांवर भरवसा न ठेवता शूद्रातिशूद्रांवरील जुलमांचे निराकरण करावे अशी अपेक्षा जोतीरावांनी व्यक्त केली आहे.

ज्या समाजाशी आपल्याला संवाद साधायचा आहे तो निरक्षर आहे. "त्यास वर्तमानपत्र काय, कोल्हा का कुत्रा, का माकड, काहीच समजत नाही." तो दरिद्री, ज्ञानहीन व सारासारविचारक्षमता नसलेला असा आहे याची पूरेपूर जाणीव असल्यामुळे आपल्या या समाजाला जागृत व संघटित करण्याचे साधन वर्तमानपत्रे हे असू शकत नाही अशी जोतीरावांची भूमिका होती.

पत्रकारांनी पाळावयाच्या आचारसंहितेबाबतही काही सूचना जोतीरावांनी केलेल्या आढळतात. आडमार्गी, आडमुठे, असमंजस, पोटबाबू, धंदेवाईक अशा शेलक्या विशेषणांचा आहेर समकालीन मराठी पत्रकारांना करीत असतानाच जोतीरावांनी त्यांच्या चुकांवर नेमके बोट ठेवले आहे. स्वतःच्या आचरणात काळेबरे असलेल्या या पत्रकारांनी इतरांवर चिखलफेक करण्यापूर्वी आत्मपरीक्षण करावे, स्वत:ला गैरसोयीची असलेली वस्तुस्थितीही प्रामाणिकपणे मान्य करुन लेखनाद्वारे ती वाचकांसमोर ठेवावी. समाजहिताचे भान कधीही सुटू देऊ नये, पुरावे देऊनच कोणतीही विधाने करावीत. जोतीरावांचा हा हितोपदेश आजच्याही पत्रकारांना उपयुक्त ठरु शकेल.

## ४.९ मूल्यमापन

१) He was first defender of human equality. गुलामगिरीचा अर्थ केवळ राजकीय पारतंत्र्यापुरता सीमित नव्हता तर कष्टकरी स्त्रीशूद्रातिशूद्रांवर येथील पुरुषसत्ताक, ब्राह्मणवादी, सावकारशाहीने जे बहुपदरी दास्य लादले होते ते फुलेना त्यात अभिप्रेत होते. त्यांचा लढा या सर्वांगीण दास्यमुक्तीचा लढा होता. लढतांना अग्रक्रम द्यायचाच तर राजकीय पारतंत्र्यापेक्षा सामाजिक पारतंत्र्याला ते देत असत.

२) आमूलाग्र परिवर्तनाचा विचार घडून नवमूल्यावर आधारित नवसमाज निर्माण होईल तेव्हाच सामाजिक दास्याचे निराकरण होऊ शकेल हीही खूणगाठ जोतीरावांनी आपल्या मनाशी पक्की बांधलेली होती. प्रचलित विषम धर्मव्यवस्था, जनसिद्ध जातिव्यवस्था आणि आर्थिक विषमता या तिन्ही गोष्टींचे उच्चाटन झाल्याखेरीज नवा समाज उभा राहू शकणार नाही हे त्यांनी स्पष्ट ओळखले होते. जातीधर्मभेदाच्या सामंती व्यवस्थेचा धिःकार; समताधिष्ठित आणि सर्वधर्मसमावेशक वैश्विक मानवी ऐक्याच्या कल्पनेचा स्वीकार; लोकसत्ताक राज्यपद्धतीचे समर्थन; सार्वत्रिक, सक्तीच्या व जन्मसिद्ध श्रमविभागणी मोडीत काढणाऱ्या शिक्षणाबद्दलचा आग्रह; व्यापक कृषिविकासाची संकल्पना; विकासकार्यांशी बांधीलकी असलेले पोलीसदल या जोतीरावांच्या कल्पना सामंतशाहीच्या आणि साम्राज्यशाहीच्या संपूर्ण विरोधात जाणाऱ्या होत्या. त्यांच्यातूनच फुल्यांची मूलग्रामी क्रांतिकारी विचारधारा जन्माला आली होती.

३) First leader of downtrodens जोतीरावांनी स्त्रीशूद्रादिकांना जाणीवजागृत करण्याचा प्रयत्न ह्यात भर केला. त्यांच्या शिक्षणासाठी ते अहोरात्र झटले. शिक्षणातून जागृत झालेल्या या वर्गांनी आपल्या हक्कांसाठी संघटितपणे लढावे अशा दृष्टीने त्यांच्या अनेक आंदोलनाचे नेतृत्व जोतीरावांनी केले.

४) शेतकऱ्यांचे व शेतीचे प्रश्न आणि त्यावरचे उपाय यांचा सूक्ष्म अभ्यास करुन त्यांनी त्याचा सविस्तर ऊहापोह केला. स्त्रियांचे प्रश्न आणि त्यावरचे उपाय यांचा सूक्ष्म अभ्यास करुन त्यांनी त्याचा सविस्तर ऊहापोह केला.

५) स्त्रियांचे प्रश्न आस्थेवाईकपणे समजून घेतले. शोषित वर्गाच्या वतीने पहिला संघटित आवाज उठवण्याचे श्रेय निर्विवादपणे जोतीरावांनाच द्यावे लागते. आज दलित शेतकरी आणि स्त्रिया या तिन्ही वर्गाच्या चळवळी देशव्यापी झाल्या असून अनेक आघाड्यांवर संघर्ष करीत आहेत. त्यांची ताकद कैकपटींनी वाढली आहे. पण जोतीरावांचे ऋण मान्य केल्याखेरीज त्यांच्यापैकी कोणत्याही चळवळीचा इतिहास लिहिता येणार नाही.

६) फुल्यांच्या चळवळीचे स्वरुप दुहेरी होते. एका बाजूने ब्राह्मणशाहीस विरोध आणि दुसऱ्या बाजूने स्त्रीशूद्रातिशूद्रांचे संघटन या दोन्ही गोष्टी एकाच वेळी ते करु पहात होते. समाजातील ऐहिक व पारमार्थिक दोन्ही क्षेत्रांतील सर्व सत्तास्थाने ब्राह्मणवर्गाने बळकावली आणि ती टिकवून ठेवण्यासाठी स्त्रीशूद्रातिशूद्रांना गंडवले हे त्यांच्या रोषाचे मुख्य कारण होते.

७) दलित - शोषितांच्या सर्वांगीण मुक्तीचे उद्दिष्ट घेऊन या देशात छेडले गेलेले पहिले जनआंदोलन जोतीरवांचेच होते. समजातील तळागाळापर्यंत फक्त तेच त्याकाळी पोचले होते. शोषित समाजघटकांना बाहेरुन नेतृत्व देऊन नव्हे तर त्यांच्यातूनच नेतृत्वाची फळी उभारुन

त्यांच्याकरवी संघर्ष करवण्याचा पहिला प्रयत्न याच आंदोलनाने केला होता. दलित - शोषितांच्या मनात नवा आत्मविश्वास ते त्यामुळेच निर्माण करु शकले. सामाजिक सुधारणेच्या कक्षा कौटुंबिक सुधारणांच्या पलीकडे विस्तारुन आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाच्या क्रांतिकार्यापर्यंत नेण्याचे श्रेयही जोतीरावांच्या विचार - कार्यालाच द्यावे लागेल.

सामाजिक चळवळींचे जे एक समाजशास्त्र जोतीरावांनी आपल्या विचार आणि कार्यातून मांडले ते आजही परिवर्तनवादी चळवळींना मार्गदर्शक ठरु शकेल. महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगेबाबा आणि शाहू महाराज यांना प्रेरणास्थान महात्मा ज्योतिबा फुले होते.

## ४.१० प्रश्न

१) महात्मा फुले यांचे समतेविषयी विचार सांगा.

२) समतेसाठी लढणारे पहिले कृतीशील समाजसुधारक फुले होते. विवेचन करा.

३) महात्मा फुलेंना धर्मचिकीत्सा आवश्यक वाटली कारणे द्या.

## ४.११ संदर्भ

१) सरदार, गं. बा. महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार : ग्रंथाली प्रकाशन मुंबई - १९८१.

❖❖❖❖

# ५

# समता - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर
# (१८९१ - १९५६)

**घटक रचना :**

५.० उद्दिष्ट
५.१ प्रस्तावना
५.२ समतेसाठी कार्य
५.३ राजकीय विचारांना समतेची जोड
५.४ लोकशाही विषयी विचार
५.५ राज्य समाजवादाविषयी
५.६ शासनाचे स्वरुप आणि कार्य
५.७ अस्पृशतानिवारण यावर डॉ. आंबेडकरांचे विचार
५.८ मूल्यमापन
५.९ प्रश्न
५.१० संदर्भ

## ५.० उद्दिष्ट

जातीव्यवस्था निर्मुलन आणि समता ह्याविषयी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास करणे. त्यांचे सामाजिक आणि राजकीय विचार समजून घेणे.

## ५.१ प्रस्तावना

डॉ. आंबेडकर अस्पृश्यता निवारण करणे, समता प्रस्थापित करणे याला प्राधान्य देणारे आणि तळागाळातील लोकांच्या मानवी हक्कासाठी लढणारे एक क्रांतीकारी समाजसुधारक होय. आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशातील महू नामक गावी १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांचे वडील सैन्यात होते. समाजसुधारणेची व दलितोन्नतीची प्रेरणा भीमरावांना त्यांच्या वडिलांकडूनच मिळाली. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे प्राथमिक व सातारच्या सरकारी शाळेत त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. अनेक अपमानकारक प्रसंगांना त्यांना शैक्षणिक कालखंडापासूनच जातीमुळे तोंड द्यावे लागल्यामुळे जन्मनिष्ठ विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेबद्दल चीड

त्यांच्या मनात निर्माण झाली. गौतम बुद्ध, महात्मा फुले, संत कबीर यांच्या विचाराने मुख्यतः समता तत्वाने ते प्रभावित होते. १९१३ साली ते पदवीधर झाले.

सयाजीराव गायकवाडांच्या आग्रहाने त्यांनी संस्थानी सेवा पत्करली तरी जातीमुळे ऑफिसात व ऑफिसाबाहेरही सन्मानाची वागणूक त्यांना मिळत नव्हती. महाराजांच्या कानावर हे गेले. त्यांनी आंबेडकरांना अमेरिकेत धाडले. तेथे कोलंबिया विद्यापीठात त्यांनी अध्ययन केले. एम. ए. ची पदवी मिळवून नंतर 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या संस्थेत ते प्रविष्ट झाले. परंतु तेथील अभ्यासक्रम पूर्ण न करताच त्यांना मायदेशी परतावे लागले.

परदेशी उच्च शिक्षणाने अलंकृत होऊन बडोद्याच्या महाराजांचे लष्करी सचीव म्हणून ते रुजू झाले तरी सामाजिक प्रतिष्ठा, समतेची वर्तणूक व सह्रदयता त्यांच्या वाट्याला येऊ शकली नाही. १९१७ अखेर त्यांनी बडोदे सोडले. १९१८ साली मुंबईच्या एका महाविद्यालयात अर्थशास्त्राचे अध्यापन त्यांनी सुरु केले. १९२० च्या संप्टेंबर महिन्यात, आपला अपूर्ण राहिलेला अभ्यास करण्यासाठी ते लंडनला रवाना झाले. वर्षभरात त्यांनी 'प्रॉव्हिन्शियल डिसेंट्रलायझेशन ऑफ इम्पीरियल फायनान्स ऑफ ब्रिटिश इंडिया' या विषयावरील आपला प्रबंध लंडन विद्यापीठाकडे सादर केला. त्यांना त्यावर एम्. एस्सी. (इकॉनॉमिक्स) ही पदवी मिळाली. पुढे त्याच विद्यापीठाने आंबेडकरांना त्यांच्या, 'दि प्रॉब्लेम ऑफ दि रुपी : इटस ओरिजिन अँड इटस् सोल्यूशन' या विषयावरील प्रबंधासाठी डी. एस्सी. (इकॉनॉमिक्स) ही सर्वश्रेष्ठ पदवी प्रदान केली.

## ५.२ समतेसाठी कार्य (ACTIVE WORK FOR EQUALITY)

शैक्षणिक यश संपादित असतानाच आंबेडकरांनी आपल्या कार्याचीही पायाभरणी चालविली होती. अस्पृश्य समाजाचा उद्धार हे ते कार्य होते. त्याचा त्यांनी ध्यास घेतला होता. स्वतःच्या वैयक्तिक धकाधकीतही त्यांनी त्या कार्याकडे दुर्लक्ष केले नव्हते. माँटफर्ड सुधारणांची जुळवाजुळव चालू असताना आयोगासमोर साक्ष देऊन त्यांनी

१) अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती.

२) 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' अशी साप्ताहिके चालवून या पददलितांच्या दुःखांना त्यांनी वाचा फोडली होती.

३) 'बहिष्कृत हितकारिणी सभा' काढून तिच्या मार्फत अस्पृश्यांत शिक्षणाचा प्रसार करणे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांना न्याय मिळवून देणे अशी कार्ये त्यांनी सुरु केली. अस्पृश्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात विधिमंडळात व सरकारी नोकऱ्यांत जागा मिळवून देणे, त्यांना सर्व सार्वजनिक ठिकाणांवर मुक्तप्रवेश मिळवून देणे अशी या प्रयत्नांची उद्दिष्टे होती.

४) १९२७ च्या मार्च महिन्यात आंबेडकरांच्या पुढाकाराने घडलेल्या महाडच्या सत्याग्रहाचा या संदर्भात उल्लेख करता येईल. महाडच्या चवदार तळ्याचे पाणी फक्त स्पश्यांसाठीच होते. अस्पृश्यांना तिथे जाऊन पाण्यास स्पर्श करण्याची परवानगी नव्हती. सामाजिक विषमतेचा हा अमानुष आविष्कार होता, बहुमुखी अन्यायाचे ते एक अल्पसे प्रतीक होते. ते मोडून

काढून आपल्या सहबांधवांमधील आत्मक्षमता जागी करणे हे आंबेडकरांचे उद्दिष्ट होते. महाडची अस्पृश्य - परिषद संपवून आंबेडकर आपल्या हजारो अनुयायांसह महाडच्या चवदार तळ्याकडे निघाले. सवर्णांनी दगडफेक केली. मारहाण केली. ठिकठिकाणी याचे प्रतिसाद उमटले. महारवाड्यांवर अत्याचाराचे घाव बसले, परंतु आंबेडकरांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या आत्मविश्वासाच्या व नव्या दिशेच्या ढालींवर अस्पृश्यांनी ते मूकपणे झेलले.

५) २५ डिसेंबरला १९२७ रोजी आंबेडकरांनी, मनुस्मृतीचे जाहीररीत्या दहन केले.

६) नाशिकच्या काळाराम मंदिरात १९३० साली सत्याग्रह करुन अस्पृश्यांसाठी प्रवेश मागितला - या दोन्ही प्रसंगांना आंबेडकरांच्या मते प्रतीकात्मक महत्त्व होते. मनुस्मृती जाळून अस्पृश्यता नष्ट होणार नाही व काळाराम मंदिरातील देव शुद्ध दगडाचा आहे, तो अस्पृश्यांचे दुःख निवारण करु शकत नाही याची स्पष्ट कल्पना आंबेडकरांना होती. पण त्यांच्या लक्षावधी दलित बांधवांचा धीर पक्का करण्याच्या दृष्टीने असे प्रसंग महत्त्वाचे आहेत हे त्यांनी ओळखले होते.

७) एकीकडे समाजमानसाला हादरे देऊन ते जागे करीत असतानाच दुसरीकडे सरकारी यंत्रणेलाही वस्तुस्थितीची जाणीव करुन देण्याचे प्रयत्न आंबेडकरांनी अव्याहतपणे चालू ठेवले होते. 'रॉयल कमिशन ऑन करन्सी अँड फायनान्स', 'सायमन कमिशन', 'गोलमेज परिषदा' इत्यादींसमोर आपले मते त्यांनी स्पष्टपणे मांडले. विधिमंडळाच्या सदस्यत्वाचाही त्यांनी यासाठी उपयोग करुन घेतला. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावेत ही त्यांची मागणी १९३२ च्या 'जातीय निवाड्या' ने मान्य केली होती. अशा तरतुदीमुळे आधीच पृथगात्म असलेल्या भारतीय समाजाचे अधिकच विघटन होईल अशा भूमिकेतून गांधींनी जातीय निवाड्याला प्रतिकार केला. त्याविरुद्ध प्राणांतिक उपोषण सुरु केले. आंबेडकरांनी तडजोड स्वीकारली. गांधींशी करार करुन संयुक्त मतदारसंघ व राखीव जागा अस्पृश्यांसाठी मान्य केल्या. स्वतंत्र मतदारसंघांचा आग्रह सोडला. भारताच्या राजकीय इतिहासात हा करार 'पुणे करार' नावाने ओळखला जातो.

८) अस्पृश्यांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष काढला. मुंबई प्रांतात त्याला यशही चांगले मिळून आंबेडकर विरोधी पक्षाचे प्रमुख झाले. पण यावेळी त्यांच्या प्रत्ययास आले की काँग्रेस पक्षाने पुणे कराराचा उपयोग स्वार्थासाठी करुन घेतला आहे. दलित उमेदवारांना हाताशी धरुन राखीव जागा काँग्रेसने लढवल्या आणि 'काँग्रेसनिष्ठ' अशा अस्पृश्यांचा गट निर्माण केला आहे. आंबेडकरांनी शे. का. फेडरेशनच्या व्यासपीठावरुन पुन्हा एकदा (सप्टेंबर १९४४) विभक्त मतदारसंघाची मागणी केली. पुणे कराराचा निषेध केला. तो रद्द करण्याची सूचना केली. संयुक्त मतदारसंघात अस्पृश्यांची संख्या इतकी अत्यल्प होती की सवर्ण उमेदवार त्यांच्याकडे सहज दुर्लक्ष करु शकत होते. सवर्ण हिंदू अस्पृश्य उमेदवाराला मत देणेही अशक्य होते. त्यामुळे विभक्त मतदारसंघ देणे हाच अस्पृश्य उमेदवारांना योग्य ते स्थान विधिमंडळात देण्याचा एकमेव मार्ग असल्याची आंबेडकरांची खात्री झाली होती.

९) १९४२ च्या जुलै महिन्यात आंबेडकरांची नेमणूक गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात कामगार खात्याचे प्रमुख म्हणून झाली. चार वर्षे त्या पदावर ते होते. कॅबिनेट मिशनचे अस्पृश्यांवर केलेल्या अन्यायाचे निराकरण करुन घेऊन त्यांना त्यांचे हक्क मिळवून

देण्यासाठी १९४६ साली ते इंग्लंडास गेले. त्याच वर्षी शेवटी घटना समितीच्या निवडणुका झाल्या. मुंबईच्या विधिमंडळातून आंबेडकर घटना समितीवर निवडून येऊ शकले नाहीत. बंगालच्या विधिमंडळातून मात्र ते निवडून आले.

१०) ऑगस्ट १९४७ मध्ये त्यांची मसुदा समितीचे प्रमुख म्हणून निवड झाली. त्या पदावरुन आंबेडकरांनी स्वतंत्र भारताच्या दृष्टीने एक अत्यंत मौल्यवान कार्य केले. घटनेच्या कलमांचा मसुदा तयार करणे, त्यांवर होणाऱ्या टीकांना आत्मविश्वासपूर्वक व बिनतोड उत्तरे देणे, घटनासमितीला मार्गदर्शन करणे अशी कामे केली. त्यांचे कायद्याचे ज्ञान, घटनात्मक प्रश्नांवरची त्यांची घट्ट पकड आणि त्यांच्या शब्दरचनेतील नेमकेपणा घटनेच्या मसुद्यात झालेल्या चर्चांमध्ये प्रतिबिंबित झाला आहे. अर्थात त्यांचा घटना समितीत शिरण्याचा प्राथमिक हेतू मात्र अनुसूचित जाती जमातींच्या हितसंबंधांचे संरक्षण करणे हा होता आणि तो त्यांनी बऱ्याच प्रमाणावर सफलही करुन घेतला असे म्हणावे लागेल.

११) स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री होण्याचा मान डॉ. आंबेडकरांना मिळाला. हिंदू कायद्याचे संहितीकरण होणे या समाजाच्या एकत्रीकरणासाठी अत्यावश्यक आहे अशी आंबेडकरांची धारणा होती. पण काँग्रेस सरकार त्या संदर्भात चालढकल करीत आहे असे त्यांना वाटले व त्यावरुन त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१२) मार्क्सवादाला आधुनिक जगात पर्याय शोधायचा तर तो बौद्ध धर्मातच मिळू शकेल अशी आंबेडकरांची ठाम खात्री होती. त्यांच्या मनाचा कल बौद्ध धर्माकडे फार पूर्वीपासून असल्याचे दिसून येते. त्याचे पर्यवसान धर्मांतरात झाले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या असंख्य जातिबांधवांसह आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षा भूमीवर बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

या महापुरुषाचे महापरिनिर्वाण सहा डिसेंबर एकोणीसशे छप्पन्न रोजी झाले.

## ५.३ राजकीय विचारांना समतेची जोड

त्यांना पुस्तकी अर्थाने राजकीय विचारवंत म्हणता येणार नाही. ते आघाडीचे नेते होते, धडाडीचे कार्यकर्ते होते. सैद्धांतिक तात्त्विक चौकटीत बंदिस्त असे विचार त्यांच्या लेखनात आढळतच नाहीत. परंतु या देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय वास्तवाच्या संदर्भात आणि त्याच्याशी निगडीत झालेल्या समस्यांच्या संदर्भात जे चिंतन त्यांनी वेळोवेळी केले आहे, ते अनेक राजकीय विचारांनी परिप्लुत आहे. राष्ट्र आणि राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद, शासनाचे कार्यक्षेत्र, न्याय इत्यादी अनके विषय त्यांच्या विवेचनात विभिन्न संदर्भात आल्याचे दिसून येते.

१) **सामाजिक सुधारणांना प्राधान्य दिले :** आंबेडकरही राष्ट्रभक्त होते व राष्ट्रवादी होते. फरक इतकाच होता की त्यांची राष्ट्र - संकल्पना थोडी निराळी होती. देशाचे स्वातंत्र्य त्यांनाही हवेच होते, पण ते केवळ परकीय राजवटीपासून नव्हे तर स्वकीय सत्ताधारी वर्गाकडूनही हवे होते. एरव्ही जर वरिष्ठ सवर्णच या समाजावर स्वातंत्र्योत्तर काळात राज्य करणार असतील तर ते वेगळ्या अर्थाने पण पारतत्र्यंच असेल. सामान्य माणूस त्यात

स्वतंत्र असणार नाही. सामाजिक समता व सामाजिक न्याय यांवर आधारलेल्या लोकांच्या व लोकांसाठी असलेल्या लोकशाहीची संकल्पनाही आंबेडकरांनी आपल्या लेखनातून मांडली आहे. लोकशाहीच्या संदर्भात मानवी हक्क, पक्षपद्धती, शासनरचना आणि लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक घटक इत्यादी बाबींचीही चर्चा त्यांनी केली आहे.

आंबेडकरांच्या राजकीय विचारांना मानवतावादी तत्त्वज्ञानाची जोड मिळाली आहे. युगानुयुगे या समाजाच्या तळाशी असलेल्या अस्पृशांचे मन्वतंर घडवून आणणे हा त्यांच्या प्रत्येक विचाराचा व कार्याचा कणा असल्यामुळे त्या दलितांच्या दुःखाचे हुंकार त्यांच्या शब्दाशब्दातून कानी येतात. सनातन रुढींच्या कचाट्यातून भारतीयांचे मन मुक्त करणे, सामाजिक संबंधांची मानवी मूल्यांच्या आधारे पुनरुभारणी करणे, कोणत्याही प्रथेचे बरे - वाईटपण सामाजिक प्रयोगाद्वारे व मानवाच्या हिताहिताच्या परिणामद्वारे जोखून घेणे, बुद्धिप्रामाण्य व प्रत्यक्षवाद (इंपिरिसिझम) यांचाच फक्त आधार घेणे, मानवी प्रतिष्ठेवर अढळ निष्ठा ठेवून मानवी कल्याण हेच एकमेव साध्य समोर ठेवणे, मानवाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक समस्यांची उकल शोधणे या आंबेडकरांच्या राजकीय विचाराच्या प्रमुख प्रेरणा होत्या. केवळ सैद्धांतिक, वैचारिक व पुस्तकी चर्चेत वा वादंगात त्यांना रस नव्हता. सामाजिक वास्तव आणि तत्त्वज्ञान यांचा संयोग त्यांना करायचा होता. सामाजिक सत्यांचे अधिष्ठान प्राप्त झाल्यामुळे त्यांचा राजकीय विचार अत्यंत संपन्न झाला आहे. 'आदर्शवाद आणि वास्तववाद (रीॲलिझम), प्रत्यक्षवाद आणि बुद्धिप्रामाण्यवाद, व्यक्तिवाद आणि समाजवाद, राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद या सर्वांचा संयोग त्यांच्या तत्त्वज्ञानात झाला आहे.'

२) **राष्ट्र आणि राष्ट्रवाद :** थॉटस् ऑन पाकिस्तान, स्टेट्स् अँड मायनॉरिटिज, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट, रानडे, गांधी अँड जीना इत्यादी आपल्या ग्रंथांमधून आणि प्रसंगोपात्त केलेल्या भाषणांमधून आंबेडकरांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार व्यक्त झाले आहेत. राष्ट्रवाद ही एक व्यक्तिनिष्ठ भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी आहे. तिचे सामर्थ्य अगाध असून तिची मुळे बळकट आहेत. मोठमोठाली साम्राज्ये ती उलथून पाडू शकते, आणि कुणी कितीही प्रयत्न केला तरी तिचे उच्चाटन होणे अशक्यप्राय आहे. कुणी तिला विवेकशून्य प्रवृत्ती म्हणो वा शुद्ध भ्रामक कल्पना म्हणो एक सत्य उरतेच ते म्हणजे ती एक अतिप्रबल शक्ती आहे.

मानवी इतिहासात राष्ट्रवादाने हाहाःकार केले आहेत. प्रचंड हत्याकांडे व रक्तपात घडवून आणले आहेत; पण त्याचबरोबर त्याने अनेक नव्या राष्ट्रांना जन्मही दिला आहे, अनेक राष्ट्रांचे स्वातंत्र्य सांभाळलेही आहे. म्हणजे राष्ट्रवाद ही केवळ विध्वंसक शक्ती नसून ती एक विधायक रचनात्मक शक्तीही आहे. मानवाला त्या शक्तीने मोलाची शिकवण दिली आहे.

आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचा उगम गोरगरिबांबद्दल व दलित - अस्पृश्यांबद्दल त्यांना असलेल्या कळवळ्यात दिसून येतो. समान संधी व मानवी हक्क अनेक शतकांपासून नाकारले गेल्यामुळे मानवी अस्तित्वालाही पारखे झालेले हे वर्ग दास्यातून व दारिद्र्यातून मुक्त झाल्याखेरीज राष्ट्र - जीवनाशी समरस होऊ शकणार नाहीत अशी आंबेडकरांना खात्री होती. तिन्ही गोलमेज परिषदांमध्ये या उपेक्षितांचे अंतरंग आंबेडकरांनी उघड केले. त्यांची स्थिती केवळ स्वातंत्र्य मिळून सुधारणार नाही हे आंबेडकरांना ठाऊक होते. म्हणूनच

स्वातंत्र्याची एकतर्फी मागणी करणाऱ्या काँग्रेसच्या प्रयत्नांशी ते सहयोग देऊ शकले नाहीत. परकीय वर्चस्वाबरोबरच अंतर्गत छळाच्याही विरुद्ध आंबेडकरांनी आवाज उठवला.

३) राष्ट्राचे स्वातंत्र्य हे जर खरेखुरे स्वातंत्र्य व्हायचे असेल तर ते त्या राष्ट्रातील सर्व वर्गांना विशेषेकरुन दास्यात खितपत पडलेल्या निम्न वर्गांना प्राप्त झाले पाहिजे. गरजा, भय, छळ आणि शोषण या सर्वांपासून स्वतंत्र असलेली जनताच स्वातंत्र्याला खरा अर्थ आणून देत असते. न्याय्य तत्त्वांच्या आधारे सामाजिक व आर्थिक नियमनांना समाजसापेक्ष बदलण्याची धमक असलेले शासनच जनतेला स्वातंत्र्याचा प्रत्यय देऊ शकते.

४) राष्ट्रैक्याच्या या वाटचालीत पहिला अडथळा आंबेडकरांच्या मते जातीयता हा होता. राष्ट्रैक्य व सहजीवनातील आनंद या दोहोंना जातीयता मारक ठरते. संकुचितपणा व समाजविघातक वृत्ती यांची जोपासना ती करते. सामाजिक प्रगती व राजकीय स्थैर्य या दोन्ही गोष्टी जातीयतेमुळे व जमातवादामुळे धोक्यात येऊ शकतात. फुटीरतावाद, प्रांतवाद, भाषावाद, जातीयता व जमातवाद या सर्वांच्या विरुद्ध आंबेडकरांनी युद्ध पुकारले होते. जातीयतेने हा देश सामाजिक व राष्ट्रीयदृष्ट्या दुर्बल झाला आहे असे त्यांचे निदान होते.

५) आंबेडकरांना अभिप्रेत असलेले राष्ट्रैक्य हे केवळ राजकीय ऐक्य नव्हते. तर आत्मिक व सांस्कृतिक स्वरुपाचे ऐक्य त्यांना हवे होते. मनांच्या युतीतून आकारास येणारे सामाजिक ऐक्य हवे होते. भ्रातृभावाच्या प्रखर भावनेने परस्परबद्ध झालेला लोकसमुदाय अशी त्यांनी राष्ट्राची व्याख्याच केली आहे. आर्थिक स्तर व सामाजिक उतरंड यामुळे पडणाऱ्या भेदभावांना अशा राष्ट्रात स्थानच असू शकत नाही. ऐक्याची भावना त्या सर्व तफावतींवर मात करीत असते. जगातील इतर राष्ट्रांहून आपण निराळे आहोत अशा जाणीवेतून हा भ्रातृभाव बळावत जातो.

६) भारत हे एक बहुभाषिक राष्ट्र आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार होण्यास एक अडचण निर्माण होते याची जाणीव आंबेडकरांना होती. त्यांच्यामते एक समान भाषा असणे राष्ट्रनिर्मितीस उपकारक ठरत असते. म्हणूनच, 'सर्व भारतीयांना जर एकत्रित होऊन एक समान संस्कृती उभारावयाची असेल तर त्यांनी हिंदी ही आपली भाषा म्हणून अंगीकारणे हे त्यांचे कर्तव्यकर्म आहे.' असे ते म्हणतात. भाषा ही संस्कृतीचे वाहन असते. समान भाषेतून समान संस्कृती साकार झाल्यास या देशातील सांस्कृतिक व वांशिक संघर्षही विलय पावू शकतील असा त्यांना विश्वास होता. राष्ट्रैक्य व राष्ट्रवाद या उभयतांचा समान भाषा हा मुख्य आधार ठरु शकतो असे त्यांना वाटत होते.

७) हिंदू राष्ट्रवाद वा मुस्लिम राष्ट्रवाद या संज्ञाच त्यांना विपर्यस्त वाटतात. बहुंसख्य असणाऱ्यांच्या धर्माशी राष्ट्रवादाशी निरगाठ घालणे आंबेडकरांना मान्य नव्हते. अल्पसंख्याकांनी सत्तेत भागीदारी मागितली की त्याला जमातवाद म्हणायचे, आणि बहुसंख्याकांनी सत्तेचा एकाधिकार चालविला की त्याला मात्र राष्ट्रवाद म्हणायचे हे आंबेडकरांना मंजूर नव्हते. याला ते 'राष्ट्रवादी पिसाटपणा' संबोधतात. त्यांच्या मते कोणत्याच धर्माला या राष्ट्राचे राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष स्वरुप हिरावून घेण्याचा हक्क नाही. सर्व धर्मांना येथे समान स्थान आहे. राष्ट्रभक्तीच्या व राष्ट्रवादाच्या नावाने दहशतवादी हालचाली करणे, व्यक्तिपूजेचे देव्हारे माजविणे, गुलामगिरीला या ना त्याप्रकारे टिकवून ठेवणे याही गोष्टींना आंबेडकरांनी विरोध केला होता.

## ५.४ लोकशाही

**१) लोकशाहीचा अर्थ :** आंबेडकरांचा लोकशाही विचार भोवतालच्या सामाजिक राजकीय वास्तवव्यातून निघाला होता. भारतात लोकशाहीची उभारणी करणे एवढ्यापुरतेच त्यांचे राजकीय ध्येय नव्हते तर भारताने लोकशाही मूल्यांचे संरक्षण करावे अशीही त्यांची इच्छा होती. लोकशाही जीवनमार्गाचा त्यांनी ध्यास घेतला होता. जुलूम, जातीयता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला मुक्त करणारी शासन व्यवस्था कशी असावी हाच शोध त्यांनी चालविला होता. या देशातील सामाजिक संबंधांची फेररचना फक्त लोकशाही राजवटच करु शकेल असा त्यांना विश्वास होता. 'लोकशाही म्हणजे सहजीवन. लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधातच आढळतात.' अशी त्यांची धारणा होती.

**२) सामाजिक लोकशाही आवश्यक :- (Supported the idea of all round democracy) :** 'ज्या समाजात भिन्न सामाजकि गटांच्या सांस्कृतिक दृष्टिकोनांत प्रबळ तफावती असतात आणि भिन्न लोकसमूहांच्या ठायी सहजीवनाची भावनाच अपुरी असते तेथे (लोकशाही) वातावरण निर्माण होणे अवघड असते.' हा विचार आंबेडकरांच्या लोकशाहीवरील चिंतनाचा केंद्रबिंदू होता. दारिद्र्य, निरक्षरता व जातीयता हे त्यांच्या मते भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील अडथळे होते. जोपर्यंत प्रयत्नपूर्वक या तिघांचे निर्मूलन होत नाही तोपर्यंत या देशात लोकशाही अस्तित्वात येऊच शकत नाही.

सत्तेचा ज्यांना कधी स्पर्श झाला नाही अशा समाजतळी खितपत पडलेल्या पद्दलित वर्गाला सत्ता प्राप्त होणे हीच खरी लोकशाही असते. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या मार्गाने हे साध्य होऊ शकते.

आज निम्नवर्ग ज्या असहाय व उपेक्षित अवस्थेत कालक्रमणा करीत आहे त्यातून त्याला योग्य व मोफत शिक्षणाच्या साह्याने बाहेर काढता येऊ शकेल. त्यांना सुखी, स्वास्थ्यपूर्ण व निवांत जीवनांची हमी मिळणे तितकेच आवश्यक आहे. कारण त्याशिवाय लोकशाही संस्कृतीचा अंगीकार करण्यास त्यांना संधीच मिळणार नाही. लोकशाही हे शेवटी एक सामाजिक संघटन आहे. या देशाची पारंपरिक समाजरचना लोकशाहीला मुळीच पोषक नाही. कारण तीतून श्रीमंत-गरीब, उच्च-नीच, मालक-मजूर असे स्थायी स्वरुपाचे वर्गसमाजात निर्माण होऊन टिकून राहतात.

आधी या सामाजिक रचनेत मौलिक फेरफार केल्याखेरीज व लोकशाहीचे इमले उभारल्यास भरभक्कम पाया नसलेल्या इमारतीप्रमाणे ते कोसळून पडतील याबद्दल आंबेडकरांना यात्किंचितही संशय नव्हता. या मौलिक फेरफारंनाच ते सामाजिक लोकशाहीची मिर्निती असे नाव देतात. 'लोकशाही शासनप्रकार लोकशाही समाजरचना गृहीत धरीत असतो. सामाजिक लोकशाही अस्तित्वात असल्याखेरीज लोकशाहीच्या औपचारिक सांगाड्याला मुळीच किंमत नसते.

एका व्यक्तीला एक मत देऊनच सामाजिक लोकशाही निर्माण होत नाही. सामाजिक लोकशाहीत दोन गोष्टींचा अंतर्भाव होतो. 'पहिली, सहबांधवांबद्दल सन्मान आणि समभाव आणि दुसरी, ताठर अशा सामाजिक बंधनांपासून मुक्त अशी सामाजिक रचना! ..... काही लोकांना

विशेषाधिकार असणे व काहींना ते नसणे यामधून समाजातील काही वर्ग एकाकी व तुटून पडणे लोकशाहीशी विसंगत आहे.' निसर्गाने मानवमात्रात विषमता पेरली असली तरी ही बाब लोकशाहीच्या विकासाआड येऊ शकत नाही. 'एक व्यक्ती : एक मत' यापेक्षा आंबेडकरांना 'एक व्यक्ती एक मूल्य' हे तत्त्व अधिक स्वीकारणीय वाटते. पाच वर्षानी एकदा दिले जाणारे मत उपाशी पोटी माणसाला कवडी किंमतीचे वाटणे अगदीच स्वाभाविक आहे. शोषण, दमदाटी व छळ सदैव ज्याच्या वाट्याला येतात त्याला त्या मताचे काय? ज्याला कधीच कुणाकडून सहानुभूती, प्रेम वा जीवहेतूंचे आदान-प्रदान लाभत नाही त्याचे समाधान हे मत कसे करु शकणार? म्हणून त्यांच्या मते या परिस्थितीत आधी परिवर्तन घडून आले पाहिजे. सर्वांना समान दर्जा समाजमानसात प्राप्त झाला पाहिजे. तरच यशस्वी लोकशाही या देशात उभी राहू शकेल.

**३) मानवी हक्क व त्यांना संरक्षण असावे - आंबेडकरांच्या लोकशाही विचारात मानवी हक्कांना व त्यांच्या संरक्षणांनाही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.** त्यांच्या मते राजकीय लोकशाहीची उभारणी चार गृहीतांवर झालेली असते : (१) व्यक्ती हेच एकमेव साध्य आहे; (२) व्यक्तीला काही अदेय हक्क असतात व घटनेने त्या हक्कांची हमी त्याला दिलीच पाहिजे; (३) कोणत्याही विशेषाधिकारांच्या प्राप्त्यर्थ व्यक्तीला आपल्या घटनादत्त हक्काचा त्याग करावा लागू नये; (४) इतरांवर शासन करण्याची सत्ता राज्यसंस्था कोणाही खाजगी व्यक्तींना प्रदान करणार नाही.' अधिकसत्तावाद (आथॉरिटेरिॲनिझम्); सर्वकष सत्तावाद (टोटॅलिटेरिॲनिझम्) फासिस्टवाद अथवा अराज्यवाद कोणत्याही स्वरुपात असोत, आंबेडकरांचा त्यांना कसून विरोध होता, कारण व्यक्तीची अंगभूत प्रतिष्ठाच या शासनप्रकरांना अमान्य असून व्यक्तीचे व्यक्तित्व चिरडणे हाच त्यांचा स्वभावधर्म आहे.

**४) संसदीय लोकशाहीवर आंबेडकरांचा विशेष भर होता.** त्यांच्या मते संसदीय पद्धती हीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करु शकते. सहकार्य, शिस्त गुणांचा विकास करु शकते. रक्तपात न घडविता सामाजिक आणि आर्थिक मूलभूत स्वरुपाचे बदल घडवून आणण्याचा मूलमंत्र फक्त तिलाच अवगत असतो. दुसरे असे की, विवाद्य मुद्यांसंबंधीचे निर्णय मनमोकळ्या चर्चेअंती, व सर्वांच्या संमतीने घेण्याची तरतूद फक्त संसदीय पद्धतीतच असते. अहिंसक, घटनात्मक व शांततापूर्ण विचारविनिमयालाच या पद्धतीत वाव असतो.

संसदीय पद्धतीत फक्त एवढेच नाही, तर आणखीही दोन गोष्टी आहेत, ज्या आंबेडकरांच्या दृष्टीने अतिमोलाच्या आहेत. पहिली आहे विरोधी पक्ष आणि विरोधी वृत्तपत्रे; आणि दुसरी आहे मुक्त व न्याय्य निवडणुका! समर्थ सत्ताधारी पक्षाइतकाच प्रबळ विरोधी पक्ष संसदेत असणे अत्यावश्यक असते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचे केवळ स्वागत होते एवढेच नाही तर उचित प्रमाणात सन्मानही केला जातो. सत्ताधारी पक्षाला हुकूमशाही वर्तनापासून दूर ठेवण्याचे कार्य फक्त खंबीर आणि प्रामाणिक विरोधी पक्षच करु शकतो.

शांततापूर्ण मार्गांनी सत्तांतर शक्य होणे हे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचे लक्षण आहे. नियतकालीन, मुक्त व न्याय्य निवडणुका हा संसदीय लोकशाहीचा कणाच म्हणता येईल. लोकशाहीत आनुवंशिक शास्ते व आनुवंशिक शासित कधीच असता कामा नये. राज्यकर्तेपणाचा अमरपट्टा कोणत्याच एका वर्गाला असू नये. शास्ते-शासित यांच्यातील सरहद्दींना ताठर स्वरुप येणे लोकशाहीलाच मारक ठरते.

**५) आर्थिक न्याय आवश्यक** - अमर्यादा स्वातंत्र्याला अतिरिक्त महत्त्व दिले गेल्यास संसदीय लोकशाहीचे आर्थिक विषमतेकडे दुर्लक्ष होते. स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी अशी लोकशाही आर्थिक अन्यायासाठी साधनीभूत ठरण्याचा धोका संभवतो. गुंतलेल्या हितसंबंधांना प्राधान्य देऊन गरिबांची व दलितांची उपेक्षा करण्याची चूक अशा लोकशाहीच्या हातून घडू शकते. इटाली, जर्मनी व रशिया या देशांच्या अनुभवांवरुन शहाणे होऊन आर्थिक व सामाजिक लोकशाहीकडे दुर्लक्ष करण्याची चूक भारतीय लोकशाहीच्या हातून घडता कामा नये.

**६) लोकांची सदसद्विवेकबुद्धी हा लोकशाहीचा सर्वात मोठा आधार असतो.** 'अन्याय घडो कोठेही चरफडून उठू आम्ही' अशा आशयाची भावना या विवेकबुद्धीच्या बुडाशी असते. भारतातील शोषित जनतेच्या वेदनांबद्दल या समाजाची ही सदसद्विवेकबुद्धी जागी नसणे हा त्यांच्या मते येथील लोकशाहीच्या वाटेतील सर्वात मोठा अडसर आहे.

**७) राजकीय पक्ष** - या देशातील लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी संघटित व शिस्तबद्ध राजकीय पक्षांचीही नितांत आवश्यकता आहे. टीका करण्याचा हक्क हा संसदीय लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा हक्क आहे. आणि संघटित विरोधी पक्ष अस्तित्वात असल्याखेरीज त्या हक्काला काही अर्थच उरत नाही. राजकीय पक्षांखेरीज लोकशाहीची कल्पनाच करणे अशक्य आहे. 'शासन चालविण्यासाठी राजकीय पक्ष असावा लागतो. पण ते शासक हुकूमशाही व्हायचे नसेल तर (किमान) दोन पक्ष असावे लागतात. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असे दोन पक्ष असल्याखेरीज लोकशाही शासन लोकशाही राहूच शकत नाही.' एकंदरीत आंबेडकरांच्या मते द्विपक्षपद्धती असावी असे दिसते, पण बहुपक्षपद्धतीला त्यांचा विरोध नाही, कारण पक्ष जरी संख्येने अनेक असले तरी सत्ताधारी व विरोधक या दोन गटांत त्यांची वर्गवारी होणे अनिवार्य असते.

परंतु केवळ विरोधासाठी विरोध, किंवा विरोधाच्या नावाखाली विध्वंस व अराजक हे आंबेडकरांना अमान्य होते. सतत संघर्ष, सारखे स्थगन - प्रस्ताव, प्रक्षोभक भाषणे व सभात्याग हे विरोधी पक्षांचे मार्ग लोकशाहीला घातक ठरु शकतात. परस्परांना समजवून घेणे, वैचारिक आदान-प्रदानातून विशिष्ट निष्कर्षाप्रत येणे, परस्परांविषयी आदर बाळगणे अशी पथ्ये सत्ताधारी व विरोधक या उभयतांनी पाळणे लोकशाहीच्या हिताचे असते.

## ५.५ राज्य समाजवादाविषयी (Suggested State - Socialism)

१) आंबेडकराच्या राजकीय विचारात संसदीय लोकशाहीचा समन्वय राज्य-समाजवादाशी (स्टेट सोशलिझम) घालण्यात आला आहे. या दोन संकल्पना वरकरणी विसंगत वाटत असल्या तरी त्यांचा योग्य तो मेळ घातला गेल्यास त्या परस्परपूरक ठरु शकतात हा त्यांच्या 'लोकशाही समाजवादा' च्या मुळाशी असलेला विचार आहे.

२) त्यांच्या समाजवादाचा उगम दारिद्र्याविषयी आंबेडकरांना असलेल्या पोटतिडिकीत आढळतो. त्यांनी दारिद्र्य फार जवळून पाहिले होते, प्रत्यक्ष भोगले होते. म्हणून त्यांना दारिद्र्याची विलक्षण चीड व घृणा होती. दरिद्रीनारायणांचे कल्याण हा त्यांचा निदिध्यास होता. कुणी दारिद्र्याचे उदात्तीकरण करु लागल्यास आंबेडकर चिडत. कारण या मार्गाने हा प्रश्न सुटणार नाही फक्त त्यावर तात्पुरता पडदा पडेल हे त्यांना पक्के ठाऊक होते.

३) आधुनिक औद्योगिक व यंत्रप्रधान पद्धतीमध्ये राज्य समाजवादाची विशेषच आवश्यकता आहे असे आंबेडकरांचे मत होते. या पद्धतीचे काही अनिष्ट सामाजिक आणि आर्थिक परिणाम दृष्टोत्पत्तीस येऊ लागले आहेत. या परिणामांचे अपश्रेय यांत्रिकीकरणाला वा औद्योगीकरणाला खचितच देता येणार नाही. कारण दोष त्यांचा नसून चुकीच्या सामाजिक रचनेचा आहे. त्या समाजव्यवस्थेने खाजगी मालमत्तेला व वैयक्तीक फायद्याला निरंकुश पावित्र्य प्रदान केले आहे. यंत्राचा व वैज्ञानिक सभ्यतेचा निषेध करणे योग्य नाही. तर प्रस्तुत समाजरचना बदलून टाकण्याचा प्रयत्न करणे हा मार्ग योग्य आहे.

४) व्यक्तीच्या जीवनात श्रमांना निश्चित महत्त्व आहे. परंतु नुसते परिश्रम व्यक्तीची सांस्कृतिक पातळी उंचावू शकत नाहीत. माणसाचे वेगळेपण त्यांच्या संस्कृतीत आहे. संस्कृतीमुळे तो पशूंपेक्षा वेगळा आणि श्रेष्ठ ठरत असतो. म्हणून समाजाने व्यक्तीला सांस्कृतिक जीवन उपलब्ध करवून देण्याची आवश्यकता निर्माण होते. यासाठी शारीरिक गरजांच्या पूर्तीसवेच त्यांच्या मनाचाही विकास व्हावा लागतो. तो व्हायचा तर त्यासाठी व्यक्तीला फुरसतीचा मोकळा वेळ असणे आवश्यक ठरते. आपल्या नागरी जबाबदाऱ्या पार पाडून, स्वतःचा व्यक्तिविकास साधण्यासाठी त्याला उसंत मिळली पाहिजे. म्हणजेच त्याच्या कामाचे तास मर्यादित असायला पाहिजेत.

यंत्राचा वापर केल्यावाचून माणसाची श्रमातून सुटका होऊ शकत नाही. म्हणजेच पशुवत जीवनापासून माणसाची मुक्ती फक्त यंत्रयुग व आधुनिक संस्कृतीच करु शकते. याचाच अर्थ असा की, यंत्रे व आधुनिक सभ्यता यांच्याखेरीज लोकशाही वा समाजवाद अस्तित्वात येऊच शकत नाहीत. मूठभरांना विश्रांती व असंख्यांना अविश्रांत परिश्रम - ही लोकशाही नव्हे, आणि समाजवाद तर नव्हेच नव्हे. या युगाचे जे काही दोष संभवतील त्यांचे निराकरण समाजाची शास्त्रीय पायावर फेररचना करुन आणि राज्याच्या हाती काही विशेषाधिकार सोपवून करता येण्यासारखे आहे, असे आंबेडकरांना वाटते.

५) राज्यसत्तेने काही महत्त्वाच्या व मौलिक उद्योगधंद्याची सूत्रे स्वतःकडे घेतलीच पाहिजेत. तसे करण्यातून आर्थिक शोषणाला ती पायबंद घालू शकेल. त्याचबरोबर आर्थिक नियोजनाच्या काटेकोर आखणीतून व प्रभावी अंमलबजावणीतून राज्यसत्ता उत्पादनक्षमता वाढवू शकेल, आणि मालमत्तेची न्याय्य विभागणीही करु शकेल. व्यक्तीचे हक्क खऱ्या अर्थाने सुरक्षित करण्याचा हा मार्ग आहे असे आंबेडकरांना वाटते. समाजाच्या आर्थिक संरचनेवरच व्यक्तिस्वातंत्र्य विसबून असते. दैनंदिन चरितार्थ चालविण्यासाठी ज्यांना घटनादत्त हक्क गहाण टाकावे लागतात; ते लोकशाहीतील नागरिकांच्या जबाबदाऱ्या कधीच पेलू शकणार नाहीत. भयमुक्त, चिंतामुक्त नागरिकच आपल्या मूलभूत हक्कांचा आग्रह धरु शकतो. बेरोजगार असलेल्यांना तो टिकवून ठेवण्यासाठीच अनेकदा आपल्या हक्कांची किंमत मोजावी लागते, अशा वेळी राज्याचे नियंत्रण व हस्तक्षेप आवश्यकच नव्हे तर स्वागतार्ह ठरतो.

६) व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि समाजवाद यांच्यात अंगभूत विसंगती आहे, हा विचार आंबेडकरांना भ्रममूलक वाटतो. त्यांचा राज्य - समाजवाद व्यक्तीला भांडवलशाहीच्या तसेच भूक, बेकारी, भय, टंचाई इत्यादी सामाजिक अरिष्टांच्या कचाट्यातून सोडविण्याचा सिद्धांत आहे. पश्चिमेत प्रचलित असलेला राज्यसमाजवादाचा सिद्धांत ते जसाच्या तसा स्वीकरीत नाहीत. दुर्बल वर्गाकडे विशेष लक्ष देणे व मूठभरांच्या हाती संपत्तीचे केद्रीकरण कायम न ठेवणे या

गोष्टी त्यांना मान्य आहेत; पण ते पाश्चात्य राज्यसमाजवाद्यांचा खासगी मालमत्तेविषयीचा व भांडवलदारीविषयीचा दृष्टिकोण मान्य करीत नाहीत. भारतीय परिस्थितीशी साजेसे असे फेरफार आंबेडकरांनी त्या मूळ सिद्धांतात केले आहेत. मालमत्तेचा हक्क काढून टाकणे किंवा सगळ्यांचा मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण करणे त्यांना मान्य नाही. मजूरवर्गाला कमाल वेतन, सुरक्षितता व मर्यादित कामांचे तास या गोष्टींची हमी देणारी भांडवलदारी चालू राहण्यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. 'या देशाचे द्रुतगतीने औद्योगिकरण करण्यासाठी राज्यसमाजवाद आवश्यक आहे. खासगी प्रयत्नांनी ते होणे शक्य नाही. आणि शक्य झाले तरी त्यामधून सांपत्तिक विषमता निर्माण होईल. युरोपात खाजगी भांडवलशाहीतून असे घडले. आहे, यावरुन भारतीयांनी धडा घ्यावा.' राज्य समाजवादाचा दुसरा हेतू असा की राज्यसत्तेने शांतपणे व कायदेशीर मार्गांनी सामाजिक, राजकीय व आर्थिक विषमतेचे निर्मूलन करावे. वंचित वर्गांना अधिक चांगल्या संधी द्याव्यात. भांडवलशाहीच्या वर्तमान भूमिकेत बदल घडवून आणावा; इत्यादी.

७) आंबेडकरांच्या दृष्टीने समता हे सर्वश्रेष्ठ लोकशाही मूल्य असून त्याला वगळून समाजवादासंबधी विचारच होऊ शकत नाही. धर्म वंश, जात या कोणत्याच कारणाने भेदभाव आंबेडकरांना मान्य नव्हता. विशेषतः भारतासारख्या देशात तर या भेदभावाचे संपूर्ण उच्चाटन होणे त्यांना अत्यावश्यक वाटत होते. कारण येथे त्याचा अवलंब अतिप्रचंड प्रमाणावर व अखंड होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच आबेंडकरांच्या मते, भारतासाठी समाजवादाचा संदर्भ आर्थिकपेक्षा अधिक सामाजिकच आहेत.

८) भारताची सद्द्ःकालीन समाजव्यवस्था आर्थिक, सामाजिक राजकीय वा नैतिक कोणत्याच दृष्टीने समाजवादाच्या आशयाशी सुसंगत नाही. कारण सामाजिक देवाण-घेवाण आणि मानवी समानता या गोष्टीच त्या व्यवस्थेत अनुपस्थित आहेत.

ग्रामीण सुधारणा घडवून आणणे व त्याद्वारे कोट्यावधी खेडुतांना राष्ट्रीय प्रवाहात खेचणे, शहरी व ग्रामीण विकासात समतोल साधणे, जातिमुक्त समाज सर्व पातळ्यांवर निर्माण करणे, सहकारी शेतीला उत्तेजन देणे, युद्ध व अण्वस्त्रांपेक्षा जनकल्याणाला अग्रक्रम देणे, धनिकांचा मानवी घडामोडींकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलून त्यांना त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करुन देणे इत्यादी उपाययोजनांद्वारे समाजाची वाटचाल करता येईल असे आंबेडकरांना वाटते. त्या दृष्टींनी भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांवर त्यांची विशेष भिस्त आहे.

## ५.६ शासनाचे स्वरुप आणि कार्यक्षेत्र

१) शासनाचे स्वरुप हे संघराज्यात्मक आणि संसदीय असण्याखेरीज भारताला गत्यंतर नाही असा त्यांचा ठाम विश्वास होता. आनुवंशिक राज्यकर्त्यांना त्यांच्या शासनपद्धतीत मुळीत स्थान नाही. लोकांच्या प्रतिनिधींची मान्यता असल्याखेरीज कोणत्याच कायद्याची अंमलबजावणी होऊ नये असा त्यांचा कटाक्ष आहे. शासनाने बळाचा वापर अवश्य करावा परंतु औषधाप्रमाणे,

२) स्वयंशासन तर असायलाच हवे; पण त्याचबरोबर ते सुशासनसुद्धा असणे आवश्यक आहे. निःपक्षपातीपणा, न्यायबुद्धी, स्वच्छ प्रशासन व लोकांच्या सुखसोयींची व्यवस्था आणि त्यांच्या मार्फत लोकांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व आध्यात्मिक अभ्युदय साधला जाणे ही त्यांना सुशासनाची पदचिन्हे वाटतात.

३) लोकशाहीतील स्वातंत्र्य ही मुठभरांची मिरासदारी न ठरता त्याचा लाभ प्रत्येक व्यक्तीला झाला पाहिजे. एकाच पक्षाची चिरंतन राजवट आंबेडकरांच्या लोकशाही विचारात बसू शकत नाही. एकपक्षीय लोकशाही हे त्यांना हूमशाहीचेच पर्यायी शीर्षक वाटते. केवळ निवडणुकांचा उपचार पार पडला म्हणून शासन लोकशाही ठरत नाही. जेव्हा निर्वाचित राजकीय पक्षाला सत्ताभ्रष्ट होण्याची सदैव भीती असते तेव्हाच हुकूमशाही प्रवृत्तीला प्रभावी पायबंद बसू शकतो.

४) शासनाच्या आज्ञांचे पालन सक्तीपेक्षा स्वेच्छेने होणे लोकशाहीत आवश्यकत असते. नागरिकांकरवी आज्ञापालन हा लोकशाही राज्याचा मूलाधार असतो, अशी आंबेडकरांची धारणा असल्यामुळे सविनय कायदेभंगाचा मार्ग त्यांना अराजकाचे मार्ग वाटतात. मात्र अन्याय्य काद्यांचे नागरिकांनी निमूटपणे पालन करावे असा याचा अर्थ होत नाही.

५) शासनाचे कार्यक्षेत्र ठरवीत असताना आंबेडकरांनी व्यक्तीचे हक्क व राज्याची सत्ता यांच्यात समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय सामाजात परंपरेने व्यक्तीला जे समाजाच्या तुलनेत दुय्यम स्थान दिले आहे ते आंबेडकरांना अमान्य होते. व्यक्तीला व्यक्ती म्हणन दर्जा प्राप्त न होता समाजाचा वा जातीचा एक घटक एवढेच गौण स्थान दिले जाणे त्यांना व्यक्तिप्रतिष्ठेला मारक वाटते. व्यक्तिस्वातंत्र्याचा येथे एकंदरीत अभावच होता आणि जे काही अल्पस्वल्प व्यक्तिस्वातंत्र्य होते ते फक्त समाजातील उच्चवर्णीयांनाच होते. आंबेडकरांनी सर्व नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. त्यांना अभिप्रेत असलेले स्वातंत्र्य केवळ राजकीय नाही तर त्यात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक स्वातंत्र्यांची राज्याने व्यक्तीला हमी द्यायला पाहिजे असे त्यांना वाटते.

आंबेडकर राज्यसंस्थेकडे व शासनयंत्रणेकडे एक साधन या दृष्टीने पाहतात. व्यक्ती आणि समष्टी यांच्या संबंधातील समतोल राखण्याचे कार्य ते राज्यसत्तेवर सोपवतात. बाह्य आक्रमण व अंतर्गत यादवी यांपासून व्यक्तींचे संरक्षण करुन कायदा व सुव्यवस्था टिकविणे हे त्यांच्या मते शासनसंस्थेचे प्राथमिक कर्तव्य आहे. त्याचबरोबर समाजातील एक गट दुसऱ्या गटाची पिळवणूक करीत नाही वा त्याला त्याच्या हक्कांपासून वंचित करीत नाही हे पाहण्याची जबाबदारीही ते शासनावर सोपवतात.

६) आंबेडकरांच्या मते व्यक्तीला काही अदेय स्वरुपाचे हक्क असतात. त्या मूलभूत व नैसर्गिक हक्कांना संरक्षण देणे हे राज्यसत्तेचे प्रमुख कर्तव्य असते. राज्सत्तेने व्यक्तीच्या हक्कांवर अवाजवी अतिक्रमण करु नये. व्यक्तींशी वागताना भेदभाव करु नये. कायद्याच्या आधारे सामाजिक शांतता व न्याय प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करावेत. कायद्याचे अधिराज्य (रुल ऑल लॉ) ही संकल्पना आंबेडकरांच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू मानावा लागेल. शासनाने सर्व व्यक्तींना कायद्याचे समान संरक्षण द्यावे, कायदेशीर कारणाखेरीज कोणालाही त्यांच्या जीवित, वित्त व स्वातंत्र्यास मुकायला लागू नये. कायदा हा लोकमताला प्रतिबिंबित करणारा असावा; व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र्य असावे, राज्याचा सर्व धर्माबद्दल समभाव असावा. शिक्षणाचा प्रसार समाजाच्या तळापर्यंत करुन शासनाने उत्तम नागरिक घडविण्याचा प्रयत्न करावा. इत्यादी.

शासनाच्या कार्याचे संक्षिप्त विवरण आंबेडकरांनी पुढील शब्दांत केल्याचे आढळते -

१) 'प्रत्येक प्रजाजनाचा जगण्याचा, स्वातंत्र्याचा, सुखशोधनाचा, मुक्त आविष्करणाचा व धर्मोपासनेचा हक्क अबाधित ठेवणे.'

२) 'पददलित वर्गाना विशेष संधी देऊन सामाजिक राजकीय आणि आर्थिक विषमता नाहीशी करणे.'

३) 'टंचाई व भय यांपासून मुक्त अशा स्वातंत्र्याचा उपभोग प्रत्येक प्रजाजनाला शक्य करुन देणे.'

७) आबेडकरांच्या विचारविश्वातील राज्यसत्ता ही केवळ पोलिसी राज्यसत्ता नाही, तर ती कल्याणकारी राज्यव्यवस्था आहे. खऱ्याखुऱ्या समतेवर आधारलेली सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण करणे हे तिचे कार्य आहे. शिक्षणप्रसार, कामगार-कल्याण, औद्योगीकरण अशा अनेक क्षेत्रांत या दृष्टीने शासनाला प्रविष्ट होण्यास ते अनुमती देतात. समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट केवळ खाजगी प्रयत्नांनी साकार होऊ शकणार नाही. उलट त्यामधून विपरीत वस्तुस्थिती निर्माण होईल अशी त्यांची खात्री असल्यामुळे शासनाचे अधिकार विस्तारले तरी चालतील; पण मोठ्या व महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याची ते शिफारस करतात. व्यक्तीचे हक्क आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे ते पुरस्कर्ते असले तरी त्याप्रीत्यर्थ शासनाचे अधिकार कमी करुन त्यास दुर्बल करणे त्यांना मान्य नव्हते.

## ५.७ अस्पृश्यता निवारण यासंबधी डॉ. आंबेडकरांचे विचार

समाजात जातीव्यवस्थेतून अस्पृश्यता अस्तित्वात आली आहे. आपल्या समाजातील या अस्पृश्यतेचे संपूर्ण निवारण झाल्याशिवाय समता प्रस्थापित होणे शक्य नाही. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अनेक चळवळी केल्यात. याशिवाय खालील उपाययोजना त्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या दृष्टीने सुचविल्या होत्या.

### १) शिक्षण :-

अस्पृश्यांना शिक्षणाचा अधिकार नाकरण्यात आला होता. शिक्षण घेऊन अस्पृश्यांनी आपली प्रगती करावी. 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापना करुन त्यांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली होती.'

### २) आर्थिक प्रगती :-

परंपरागत व्यवस्थेतील उद्योग यावरच भर न देता; शहरी भागात जाऊन अस्पृश्यांनी प्रगती करावी. औद्योगीकरणाचा फायदा घेऊन, नविन प्रकारच्या नोकरीच्यां संधीचा फायदा घेऊन आर्थिक प्रगती करावी असा सल्ला त्यांनी अस्पृश्यांना दिला होता.

### ३) स्वंप्रयत्नांवर भर द्यावा :-

अस्पृश्यांनी आपल्या पायातील बेडया झुगारुन द्याव्यात. आत्मविश्वासाने स्वंयप्रयत्नाने प्रगती करावी.

### ४) सत्तेसाठी संघर्ष करावा :-

राजकीयदृष्टीने अस्पृश्यंनी संघटीत व्हावे आणि आपल्या हक्कासाठी लढा द्यावा, सत्तेमध्ये वाटा मागावा असाही सल्ला त्यांनी अस्पृश्यांना दिला होता.

### ५) धार्मिक ग्रंथ :-

धार्मिक ग्रंथ, प्रथा, परंपरा यांच्या बंधनातून स्वतःला मुक्त करावे. जातीव्यवस्थेला ज्या धर्माचा आधार असेल असा धर्म सोडून द्या असे ते म्हणत. त्यांनी स्वतः धर्मांतर केले होते. समते ला प्राधान्य देणारा बौध्द धर्म त्यांनी स्विकारला होता.

६) शासनाने अस्पृश्यता निवारण करणे आणि अस्पृश्यांच्या हिताला प्राधान्य देणे याला शासकीय कार्यात प्राधान्य द्यावे.

७) “Educate, Organise and Agitate” शिका, संघटीत व्हा आणि आक्रमक व्हा असा त्यांचा संदेश होता.

## ५.८ मूल्यमापन योगदान

१) आंबेडकरांच्या चिंतनाचा विषय कोणताही असो त्याचा मध्यबिंदू मानवमात्राविषयी व त्यातही दीनदलीतांविषयी त्यांना असणाऱ्या असीम कळवळ्यातच होती. मग तो विचार राष्ट्रवादाचा असो, लोकशाहीचा असो, समाजवादाचा असो, शासनाच्या कार्याचा असो की सामाजिक न्यायाचा असो. हरहुन्नरी प्रशासक, वस्तुनिष्ठ अभ्यासक, नेता व जबाबदार लोकप्रतिनिधी अशा अनेक भूमिका आंबेडकरांनी पार पाडल्या. पण त्यापैकी प्रत्येक भूमिकेवर त्यांच्या मानवतावादी विचारसरणीची ठळक छाप पडलेली दिसून येते. त्याच्या चिंतनाचा केंद्रबिंदू मानव आणि मानवी मूल्ये समता आणि न्याय आहे.

२) आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीवर भर - राजकीय लोकशाहीचा व राजकीय हक्कांचा विचार करुन आंबेडकर थांबत नाही. त्यांची अनिवार ओढ सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीकडे आहे. आर्थिक सामाजिक क्षेत्रात न्याय, समता, शोषणमुक्ती आणि क्रौर्याचा अभाव आणणे हे त्यांच्या राजकीय लोकशाहीच्या आदर्शाचे परिपूर्ण रुप आहे.

३) सामाजिक न्यायावर आधारलेल्या समाजाची उभारणी करणे हा राज्यसंस्थेचा मुख्य हेतू असल्याचे ते सांगतात. व्यक्तीला परिपूर्ण जीवन जगता येईल अशा सामाजिक पर्यावरणाची निर्मिती राज्यसंस्थेने करायला पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा होती.

४) त्यांच्या विचारांनी समाजात मूलगामी (रॅडिकल) बदल घडवून आणले आणि या समाजाच्या रचनेत व मनोवृत्ती मध्ये घडवून आणले.

## ५.९ प्रश्न

१) डॉ. आंबेडकरांनी समतेसाठी दिलेला लढा थोडक्यात लिहा.

२) लोकशाहीसंबंधीची डॉ. आंबेडकरांची संकल्पनाचे विवेचन करा.

३) शासनाचे स्वरुप आणि कार्ये यासंबंधीच्या डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे विश्लेषण करा.

४) डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा केंद्रबिंदू मानव आणि मानवी मूल्ये आहेत विवेचन करा.

## ५.१० प्रश्न

१) आर. के. क्षिरसागर 'पोलीटिकल थॉट ऑफ डॉ. बाबासाहेब आंबेडकर.'

२) डॉ. छाया बंकाणे 'राजकीय विचार' सेठ पब्लिकेशन्स.

❖❖❖❖

# ६

# उदारमतवाद - महादेव गोविंद रानडे
# (१८४२ -१९०१)

**घटक रचना :**

६.१ प्रस्तावना
६.२ कार्य आणि विचार
६.३ समग्र सामाजिक सुधारणांविषयी
६.४ आधी सामाजिक सुधारणा यावर रानड्यांचे विचार
६.५ रानडयांचा राजकीय उदारमतवाद
६.६ व्यक्तिवाद आणि राष्ट्रवाद याविषयी रानडेचे विचार
६.७ व्यक्तिचे स्वातंत्र व हक्क
६.८ परकिय राजवटी विषयी
६.९ शासनाचे आर्थिक धोरण
६.१० भारताचे स्वातंत्र्य
६.११ मुल्यमापन
६.१२ प्रश्न

## ६.१ प्रस्तावना

महादेव गोविंद रानडे उदारमतवादी विचारवंत आणि आधुनिक महराष्ट्राचे जनक, राजकीय इतिहासाचे प्रवर्तक होते. महादेव गोविंद रानडे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील निफाड या गावी एका सनातनी कुटुंबात १८ जानेवारी १८४२ साली झाला. या सनातनीपणाची छाप रानड्यांच्या विचारांवर व व्यक्तिमत्त्वावर नेहमीकरिताच टिकून राहिली.

त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापुरात व उच्च शिक्षण मुंबईस झाले. शैक्षणिक जीवनातच, त्यांनी वाचनाचा उदंड व्यासंग केला. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल त्यांना उत्युत्कट आदर व जाज्वल्य अभिमान थेट तेव्हापासून होता. एम. ए. व कायद्याची परीक्षा उत्तीर्ण केल्या नंतर दोन वर्षे ओरिएंटल ट्रान्सलेटरचे काम केल्यावर त्यांची मुंबईस प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. पण अध्यापन कार्यात सातत्याने ते काम करु शकले नाहीत. कधी स्मॉल कॉज कोर्टाचे न्यायधीश,

तर कधी पोलीस मॅजिस्ट्रेट अशी कामे त्यांनी केली. अखेर १८७१ साली त्यांची पुण्यास न्यायासनावर कायम नियुक्ती होऊन आयुष्यातील नव्या पर्वास प्रारंभ झाला. न्यायदेवतेबरोबरच समाजदेवतेचीही सेवा त्यांनी आरंभिली. सामाजिक सुधारणेखेरीज हा देश रसातळास जाईल यांची जाणीव त्यांना विद्यार्थी दशेपासूनच झाली होती. इंग्रजी विद्या, कायदा व न्याय आणि मिशनऱ्यांचे कार्य या तिन्ही शक्तिप्रवाहामुळे हा समाज ढवळून निघत असल्याबद्दल एकीकडे समाधान वाटत असतानाच, काही कडवे स्वधर्माभिमानी या नवजागरणाला विरोध करीत असल्याचे पाहून रानडे हळहळत असत.

## ६.२ कार्य आणि विचार

१) कमालीचे अज्ञाने, स्त्रियांची दुरवस्था, बालविवाह अशा अनेक सामाजिक दूषणांविरुद्ध 'इंदुप्रकाशात' रानड्यांनी झोड उठवली. पत्रे पाठवून स्वतः गावोगाव हिंडून त्यांनी सर्वांगिण सुधारणेचा पुरस्कार केला. यासाठी अनेक सामाजिक व कौटुंबिक क्लेश सोसले.

२) प्रार्थना-समाजाच्या प्रतिष्ठपनेत रानड्यांचा वाटा मोठा होता. त्या समाजाची मूलतत्त्वे घडविण्यात त्यांचा हात होता. प्रार्थनासमाज हा एक पंथ नसून स्वदेशबांधवांच्या धार्मिकउद्धाराचे ते साधन आहे, अशी त्यांची धारणा होती. प्रस्तुत समाजाच्या मतांचे समर्थन करण्यासाठी रानड्यांनी 'एकेश्वरनिष्ठांची कैफियत' (थीइस्टस कन्फेशन ऑफ फेथ) नावाचा निबंध लिहिला होता. ख्रिस्तानुकरण करुन हिंदुधर्माची पायमल्ली करणे हा 'समाजा' चा हेतू नसल्याचे त्यांनी तर्क व इतिहास यांच्या आधारे या निबंधात स्पष्ट केले आहे.

३) पुण्याच्या वास्तव्यात रानडयांच्या कर्तृत्वाला बहर आणण्यास सहाय्य झालेली दुसरी संस्था म्हणजे सार्वजनिक सभा! 'विचार माधवरावांचा आणि आचार सार्वजनिक काकांचा असे त्यांचे कार्य सार्वजनिक सभेत होते.' टिळक लिहितात : (अनेक) कारणामुळे महाराष्ट्र देश म्हणजे त्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड गोळ्यास कोणत्या रीतीने ऊब दिली असता तो पुन्हा सजीव होईल व हातपाय हलवू लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करुन अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतीनी त्यास पुन्हा सजीव करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमता : माधवरावजींनीच केली असे म्हटले पाहिजे.

रानड्यांच्या प्रेरणेने सार्वजनिक सभेने केलेले दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे इंग्लंडच्या संसदेकडे 'जबाबदार राज्यपद्धती' ची मागणी करण्यासाठी पाठवलेला अर्ज. लोकशिक्षण हा या उपक्रमागील प्रधान हेतू होता.

४) पुण्याच्या 'वेदशास्त्रोत्तेजक सभे' शीही याच सुमारास रानड्यांचा संबंध आला. वेदांचे अर्थ समजून घेऊन वेदपठण करावे व वेदोक्त धर्माचा प्रसार करावा या हेतूने रानड्यांनी या सभेला सहकार्य केले होते.

५) १८७७ च्या जानेवारीत राणीसरकारचा दरबार भरावयाचा होता. त्याप्रसंगी सभेतर्फे द्यावयाचा मानपत्राचा जो मसुदा रानडयांनी तयार केला होता त्यात त्यांनी भारतीयांच्या राजकीय

हक्कांची मागणी केली होती. 'सदर मानपत्राला राजकीय महत्त्वाकांक्षेचा जाहीरनामा (डिक्लेरेशन ऑफ राइट्स) म्हणतात.' हिंदुस्थानच्या राजकीय भवितव्याची रुपरेषाच रानड्यांनी त्यामध्ये आखली होती. महाराष्ट्रांत दुष्काळ पडला तेव्हा दुष्काळग्रस्त भागात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणे, त्रस्त जनतेला परोपरीने मदत करणे इत्यादी कामे सभेने केली. दुष्काळाचा भर ओसरताच त्या आपत्तीचे तात्पर्य रानड्यांनी सरकारच्या कानी घातले. अवर्षणाने दुष्काळ पडला ही सरकारची समजूत त्यांनी आधी दूर केली व दुष्काळ अन्नधान्याचा नव्हता तर संपत्तीचा होता, धान्य उपलब्ध असूनही लोक अन्नाला मोताद झाले. या दारिद्र्याचे मूळ सरकारी धोरणात दाखवले. पुण्यातील आपल्या सहा वर्षाच्या वास्तव्यात रानड्यांनी अक्षरशः क्रांती घडवून आणली. महाराष्ट्राला तर त्यांनी आपल्या सार्वजनिक सभेद्वारे हलवून सोडलेच, पण इतरही प्रांतांसाठी आदर्श निर्माण केला. राजकीय, धार्मिक, वैचारिक, वाङ्मयीन असा अनेक क्षेत्रांत नवे चैतन्य आणले. ज्ञान, वक्तृत्व, कलाकौशल्य, इत्यादींचे अनेक उपक्रम रानड्यांच्या प्रेरणेने शहरभर सुरु राहिले. नवा आत्मविश्वास व कणखरपणा पुण्याच्या जनतेत दिसून येऊ लागला.

६) रानड्यांच्या आयुष्यात गाजलेले प्रकरण, 'कायद्याने सुधारणा केली जावी की जाऊ नये?' या प्रश्नाभोवती उठलेल्या वादळाचे होते. मुंबईचे एक पत्रकार बेहेरामजी मलबारी यांनी सरकारला कायद्यान्वये हिंदुसमाज - सुधारणा करण्यास विनविणारी दोन पत्रके काढून सर्व नेत्यांना वाटली व सरकारकडेही रवाना केली. रानड्यांनी मलबारी शेटना पूर्ण पाठिंबा दिला.

पुढे रानड्यांची कायदे-कौन्सिलात निवड झाली. सरकारी नोकरी, कायदे -कौन्सिल, सगळ्या सभा आणि उत्सव इत्यादी जबाबदाऱ्या सांभाळून या वर्षी त्यांच्या कर्तृत्वाने एक दालन स्वतःसाठी निर्माण केले, ते म्हणजे सामाजिक परिषदेचे! १८८५ साली राष्ट्रीय सभा स्थापन करायचे ठरले. रानडे त्या प्रयत्नात आघाडीवर होते. पण त्या सभेबरोबरच सामाजिक सुधारणेसाठीही एक संघटना असावी असे वाटल्यावरुन राष्ट्रीय सभेच्या पहिल्याच अधिवेशनात सामाजिक परिषदेची, प्रतिष्ठापना करण्यात आली. याबाबतही रानड्यांचाच पुढाकार होता. या परिषदेच्या व्यासपीठावरुन सामाजिक सुधारणेशी निगडित असलेल्या प्रश्नांची चर्चा होत असे. प्रतिवर्षि देशभर विखुरलेले सुधारणेचे सर्व शक्तिप्रवाह एकत्र आणून त्यांच्यात वैचारिक व कार्यक्रमात्मक देवाण-घेवाण शक्य करणे हा सामाजिक परिषदेचा हेतू होता.

सुधारक आणि विरोधक यांच्यातील फूट मात्र वाढतच गेली. स्वदेशीवरुन टिळकपक्ष व रानडेपक्ष यांच्यात मतभेद झाला, रमाबाईच्या शारदासदनाला रानड्यांनी पाठिंबा दिला तर टिळकांनी विरोध केला. १८९५ साली या वादाने परिसीमा गाठली. सुरवातीपासून कॉंग्रेसच्या मंडपातच होणारे सामाजिक परिषदेचे अधिवेशन तिथे घेण्यास विरोध केला. १८९५ साली पुणे अधिवेशनाच्या वेळी तो अतिप्रखर झाला. टिळकांच्या नेतृत्वामुळे पुराणमतवाद्यांच्या चळवळीला विशेष जोर आला. शेवटी रानड्यांनी सामाजिक परिषदेचे अधिवेशन अन्यत्र घेण्याचा निर्णय जाहीर केल्यावर हे वादळ शमले.

मध्यंतरीच्या काळात 'पंचहौद मिशन' या नावाने गाजलेले एक प्रकारण रानड्यांच्या आयुष्यात घडून गेले. सदर नावाच्या संस्थत चहापाण्याचा कार्यक्रम झाला असता इतरांबरोबर रानडेही उपस्थित होते. मात्र चहा व बिस्किटे यांपैकी कशालाच त्यांनी स्पर्शही केला नाही, तरीपण सनातन्यांनी जेव्हा त्यांच्याकडून प्रायश्चित्ताची मागणी केली तेव्हा ते त्यास तयार झाले. तसे न केल्यास सुधारणेच्या गोटातून माणसे बाहेर पडतील, असे भय त्यांना वाटले.

६) राजकीय विचार : रुढ अर्थाने रानड्यांना राजकारणी व राजकीय विचारवंत म्हणता येत नसले तरी ते राजकारणाचे अभ्यासक होते हे निर्विवाद सत्य नाकारता येणार नाही. पश्चिमेतील उदारमतवादी विचारांचा त्यांच्यावर बराच पगडा होता. जाणीवपूर्वक त्यांनी राजकीय सिद्धांत मांडले नसले तरी विविध प्रश्नासंबधी त्यांनी मांडलेल्या सुसंगत विचारांच्या आधारे काही सिद्धांत उभे करणे अवघड जात नाही. राज्याच्या स्वरुपाविषयी व कार्याविषयी विचार करणारे आधुनिक भारतातील पहिले विचारवंत रानडेच होते. कॉग्रेसच्या राजकारणाला वैचारिक व तात्त्विक अधिष्ठान देऊन राजकीय उदारमतवादाचा पुरस्कार करण्याचे श्रेयही त्यांनाच द्यावे लागेल.

इंग्रजी राज्याचा जम बसत असताना जे या देशात घडले - शिक्षणप्रसार, दळणवळण, कायदा-सुव्यवस्था, सुरक्षितता इत्यादी - त्याबद्दल राज्यकर्त्याबद्दलची कृतज्ञता हा रानड्यांच्या राजकीय विचारांचा मुख्य आधार आहे. सरकारची आर्थिक धोरण व त्यातून उद्‌भवणारी अरिष्टे, इत्यादीसंबंधी सरकारकडे त्यांनी पाठविलेल्या तक्रारअर्जामधून बदलणाऱ्या जनमताचे पडसादही उमटले आहेत. जनतेला आपल्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी व एकंदरीत राजकीय शिक्षण देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांतूनही त्यांचा राजकीय विचार आकारास आला आहे.

'ते स्वतः जरी धार्मिक (वृत्तीचे) असले तरी राजकीय व आर्थिक व्यवहाराचे परीक्षण ते बुद्धिवादी निकषावर करीत.'

## ६.३ समग्र सामाजिक सुधारणां विषयी

**सर्वांगीण सुधारणा :-**

भारताच्या संपूर्ण दुरावस्थेस राजकीय पारतंत्र्यच कारणीभूत असून ते संपुष्टात येईपर्यंत दुसरे काहीही करणे शक्य नाही अशी विचारसरणी रानड्यांना कधीच मान्य होऊ शकली नाही. त्यांच्या मते राजकीय, सामाजिक व आर्थिक बाबींची फारकत करुन कधी विचारच होऊ शकत नाही. सुधारणा जर एकसमयावच्छेदेकरुन सर्व क्षेत्रांत केली गेली तरच ती यशस्वी होऊ शकेल. एकांगी सुधारणा-मग ती कोणत्याही क्षेत्रातली असो-समाजच्या सेंद्रीय (ऑरगॅनिक) सवरुपाशी व ऐक्याशी ती विसंगत ठरते. थोडक्यात समाजसुधारपणा ही सर्वस्पर्शी असावयास पाहिजे असे मत न्या. रानडेचे होते.

'राजकीय हक्कांच्या क्षेत्रांत निम्नस्तरावर असणाऱ्यांची समाजव्यवस्था कधीच सुरळीत असू शकणार नाही व न्याय्य आणि विवेकाधिष्ठित समाजजीवन असल्याखेरीज राजकीय हक्कांचा योग्य उपयोग होणेही अशक्य आहे. समाजव्यवस्थेतच न्यून असेल तोवर अर्थव्यवस्था सफल होणे नाही, आणि मुख्य म्हणजे जर समाजाच्या धर्मकल्पनाच अत्यंत अप्रगत आणि खालच्या दर्जाच्या असतील तर सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था संपूर्णपणे निराधार ठरतील' - अशा शब्दांत रानड्यांनी आपला यासंबंधीचा अभिप्राय नोंदविला आहे. धार्मिक सुधारणा हे त्यांना सर्व सुधारणेचे मूळ वाटते. मानवी शरीराप्रमाणे, समाज वा राज्य नावाने संबोधिल्या जाणाऱ्या सामूहिक अस्तित्वाची विविधांगे म्हणजे हि क्षेत्रे होते. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रातील सुधारणेचा प्रयत्न हा इतर क्षेत्रांना स्वागतार्हच वाटायला हवा. अनिष्ट रुढी जातीय विषमता, स्त्रीदास्य इत्यादी दूषणांनी हा समाजग्रस्त झाला होता. त्या दूषणांचा त्याच्या सामजिक सामर्थ्यावर अत्यंत विपरीत परिणाम झाला होता. कर्मसिद्धांत, मायावाद, ग्रंथप्रामाण्य इत्यादींनी

येथील लोकांना हताश, निरुत्साही व विचारविवेक-शून्य बनवून सोडले होते, तेव्हा आधी या अरिष्टांचे उच्चाटन या समाजातून होण्याची निकड, त्यांना इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मोठी वाटली होती.

सर्वागीण सुधारणेची गरज सोदाहरण पटवून देण्यासाठीच रानडे मराठयांच्या इतिहासाकडे वळलेले आढळतात, हे 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या त्यांच्या ग्रंथावरुन स्पष्ट होते. 'रानड्यांच्या या ग्रंथात धर्म, समाज व राजकारण हे तिन्ही विषय विचारात येऊन सतराव्या शतकात एकटा मराठा समाजच का उदयास आला याची जी तात्त्विक दृष्टीने शहानिशा केलेली आहे. तशी त्यांच्या आधी व त्यांच्या मागूनदेखील कोणी केल्याचे आढळत नाही.

**सुधारणेच्या पद्धती :**

सामाजिक परिवर्तनाची गती ही नेहमी मंदच राहाणार, कारण ती वरील प्रकारे सर्व दिशांनी होणे. आवश्यक असते, हे एकदा गृहीत धरुन रानड्यांनी सुधारणेच्या काही पद्धती पुरस्कारिलेल्या आढळतात. त्यांच्या मते, हमखास व्हावयाची प्रगती ही नेहमी संथच असते.

**अ) सुधारणेबाबत उत्क्रांतीचा सिद्धांतच मार्गदर्शक ठरु शकतो.** सुधारणा ही काही एखादी बाह्य वस्तू नव्हे, ती आंतरिक कार्याकल्पाची प्रक्रिया आहे, आणि स्वतःलाच ती करावी लागते, इतरांनी ती आपल्यासाठी केलीच तरी ती प्रभावी व चिरस्थायी होऊ शकत नाही, अशी रानड्यांनी भूमिका होती.

**ब) त्यांच्या मते सुधारणेच्या चार पद्धती संभवतात.** पारंपारिक पद्धती, विवेक पद्धती, कायदे पद्धती आणि क्रांती पद्धती, यांपैकी पहिल्या तीन पद्धती ते पुरस्कारितात व अवलंबितात. चवथी क्रांतीची पद्धती रान्यड्यांना मान्य होणे शक्यच नव्हते. स्वभावतःच संयमी वृत्ती, त्यात व्यवसाय न्यायाधीशाचा! त्यामुळे तुटेपर्यंत ताणण्याचा कोणताच मार्ग त्यांच्या चौकटीत बसणे शक्यच नव्हते. रुढिप्रिय व सनातनी हिंदूंना सुधारणेचा हा मार्ग रुचणार नाही, ते सुधारणांना पाठिंबा देणे तर दूरच ते उलट प्राणपणाने त्यांचा प्रतिकार करतील, म्हणून रानड्यांना ही पद्धती वर्ज्य वाटते.

परांपारिक पद्धती म्हणजे जुने धर्मग्रंथ घेऊन त्यांचा बदललेल्या परिस्थितीस अनुरुप ठरेल असा अर्थ लावणे, आणि जनसामान्यांना असे पटवून देणे की, सुधारणा म्हणजे नवीनच काही तरी नसून त्यांच्या प्राचीन ग्रंथाशी व परंपरांशी त्या सुसंगतच होत. 'सुधारकांना भूतकालाशी आपले नाते पूर्णपणे कधीच तोडता येणार नाही, आणि तोडता आले तरी त्यांनी ते तोडू नये, कारण दीर्घकालीन परिणामांच्या दृष्टीने ते अतिशय घातक ठरेल, असे रानड्यांचे मत होते. रानड्यांना जुन्यावर नव्याने कलम बांधायचे होते, जुन्याचे समूळ उच्चाटन करुन नव्याची रुजवात करायची नव्हती बालविवाह, विधवाविवाह, स्त्री - शिक्षण इत्यादी विषयांवरील ' रानड्यांच्या विचारांत या मुद्यावर विशेष भर दिसून येतो.

दुसरी पद्धती, समाजाची सदसद्विवेकबुद्धी एखाद्या रुढीच्या वा सामाजिक दूषणाच्या विरुद्ध जागृत करण्याची होती. प्रत्येकाच्या मनात बऱ्या वाईटातील निवड करण्याची जी क्षमता असते त्या क्षमतेला प्रत्यक्ष आव्हान करणारी ही पद्धती होती. सदसद्विवेक म्हणजे मानवी मनातील ईश्वराचा आवाज असतो. त्यांच्या आज्ञा प्रत्येकाने ऐकायलाच हव्यात, असे रानडयांना

वाटत असे. सुधारणेचे प्रयत्न जोपर्यंत विवेकाला जाऊन भिडत नाहीत तोपर्यंत ते वरवरचेच राहणार.

सुधारणेची तिसरी पद्धती - कायद्यान्वये सुधारणा करण्याची - ती त्या काळात अत्यंत विवाद्द ठरली होती. त्यांचे मुख्य कारण परकीयांचे सरकार असणे हे होते. अशा सरकारला एतद्देशीयांच्या सामाजिक - धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप करण्यास या निमित्ताने वाव मिळेल आणि त्यामुळे राजकीय हास्याच्या जोडीला सामाजिक, धार्मिक गुलामगिरीही या राष्ट्राच्या कपाळी येईल. अशी टीका या पद्धतीवर होत असे, रानड्यांची भूमिका अशी होती की जेव्हा आधीच्या दोन्ही पद्धती अपेक्षित सुधारणा घडवून आणण्यात अपयशी होतील तेव्हाच या पद्धतीचा अवलंब व्हावा.

काळानुरुप आपोआप सुधारणा होतील असे मानणाऱ्यांना रानड्यांचे उत्तर असे होते की, 'काळ हे स्वतंत्र साधन नाही. ज्याला आपण कालप्रभाव किंवा कालमहिमा म्हणतो तो वस्तुतः व्यक्तींच्या प्रयत्नांचाच एक परिणाम असतो. ' सामाजिक क्षेत्रात सरकारी हस्तक्षेप झाल्यास नुकसान होईल ही भीती निराधार असून शास्ते-शासित संबंधाबद्दलच्या गैरसमजामधून ती झाली असल्याचे रानड्यांनी सांगितले आहे. ते पुढे म्हणतात. 'सरकार देशाचे नोकर आहे, किंवा लोकांच्या इच्छा अमलात आणणारे ते एक अंमलबजावणी खाते आहे. हिंदू समाजाला जी सुधारणा हवी असेल तिची एक जुटीने निःसंदिग्ध व स्पष्ट शब्दांत मागणी केल्यास सरकार कायद्यान्वये ती सुधारणा अमलात आणील. अशा रीतीने पाहिल्यास कायदा सरकारकडून लादला जाणार नसून लोकच आपल्यावर लादून घेणार आहेत, हे लक्षात येईल.'

पूर्वीच्या काळी नुसत्या धर्मतत्त्वांनी नियंत्रित राहून सुरळीत चालण्याइतपत सामाजिक जीवन साधे व सरळ होते. आज केवळ तेवढया नियमनाने भागणार नाही. शास्त्र व शिष्टसंमती यांच्या जोडीला कायद्याचे बळ आज आवश्यक झाले आहे. ज्या रुढींचे पालन हा सामाजिक गुन्हा आहे अशा रुढींचे पालन करण्यास बंदी करणे व ते करणारास शिक्षा करणे हे आज शासनाचे कर्तव्यकर्म ठरते. मग ते शासन स्वकीय असो वा परकीय असो. त्यांची राज्याच्या कार्यक्षेत्राविषयीची कल्पना पोलिस राज्याची नसून कल्याणकारी राज्याची आहे.

## ६.४ आधी सामाजिक सुधारणा यावर रानड्यांचे विचार

समतोलकृती हा रानडयांच्या या भूमिकेचा ठळक विशेष होता.

**अ) राजकीय व सामाजिक या दोन बाबींचे असे पाणीबंद कप्प्यांमधे विभाजन करणेच त्यांना मान्य नाही.** सुधारणेसंबंधी राजकारण आणि समाजकारण यात विरोध उभा केल्यास आत्मनाश ओढवेल, असे त्यांचे मत दिसते. 'धर्म सध्या मागे पडू द्या, सुधारणेकडे कानाडोळा करा, वाङ्मयाकडे तूर्त पाहण्याची गरज नाही,' असे उपदेशून फक्त राजकारणावर एकाग्र दृष्टी ठेवायला सांगणाऱ्या संप्रदायाचे म्हणणे खोडून काढताना त्यांनी म्हटले आहे. राजकारण म्हणजे काही बक्षिशी व इनामे मिळवण्यासाठी करावयाचे अर्ज नव्हे. आपण त्या इनामांना पात्र नसलो तर ती कवडी-किंमतीची होतात. आत्मोन्नती व धडपड करण्याखेरीज ही पात्रता येणार नाही. कोणत्याही क्षेत्रात व कोणत्याही काल-स्थितीत व्यक्ती व समूह यांना आपल्या स्वतःच्याच प्रयत्नांनी अडचणींवर मात करुन स्वतःचे बळ आधी वाढवावेच लागते. ते काही काळ अधःपतित

राहिले तर त्यांना प्रयत्नपूर्वक आपल्या सर्व भौतिक, नैतिक व बौद्धिक सामर्थ्यानिशी स्वतःच्या पायांवर उभे राहावे लागते.

राजकारणाविषयी, जबाबदार राज्यपद्धतीविषयी उत्साहाने बोलणारेही सामाजिक समस्यांबद्दल मौन पाळतात. राजकारणात अल्पसे यश मिळवणाऱ्यांचा उदो उदो होतो. परंतु सामाजिक सुधारणेसाठी मोठ्यात मोठा त्याग करणाऱ्याकडे मात्र उपेक्षादृष्टीने पाहिले जाते. त्यांच्या प्रत्येक शब्द व प्रत्येक कृती कसून तपासली जाते. ढोंगी, स्वार्थी, धर्मबुडव्या अशा नानाविध कुशब्दांनी त्यांची संभावना करण्यात लोक तत्पर असतात. या वस्तुस्थितीचे रानडयांना खूप दुख होते.

**ब) सामाजिक व राजकीय या दोन्ही सुधारणा महत्त्वाच्या आहेत असे त्यांचे मत असले तरी त्यांच्यात क्रमवारी लावायचीच झाली तर पहिला क्रम ते सामाजिक सुधारणांना देतात.** याचे एक कारण म्हणजे सामाजिक पाया बळकट असल्याखेरीज वर उभारलेला राजकीय रचनेचा इमला चिरकाल टिकूच शकणार नाही, अस रानड्यांचा विश्वास होता. प्रतिपक्षाला या देशासाठी राजकीय स्वातंत्र्य व राजकीय लोकशाही हवी होती, पण रानड्यांचे असे स्वच्छ मत होते की, सामाजिक लोकशाहीची व सामाजिक आधुनिकीकरणाची पायाभरणी झाल्याखेरीज वरील संस्था येथे निर्माण झाल्या तरी यशस्वी होऊ शकणार नाहीत आणि त्यामुळे राजकीय स्वातंत्र्य मिळूनही व्यक्ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकणार नाही कारण डॉ. आंबेडकर म्हणतात, 'अनेक लोकांना हेच कळत नाही की व्यक्तीविरुद्ध समाज जेवढा जुलूम व छळ करु शकतो तेवढा करणे शासनाला शक्य नसते. छळाची साधने व संधी जेवढ्या शासनाला नसतात. त्यामुळे सामजाचा जुलूम शासनाच्या जुलमापेक्षा कितीतरी पटींनी अधिक प्रभावी असतो.' म्हणून समाजरचनेतच इष्ट असे बदल आधी घडून येणे अत्यावश्यक असते.

आपल्या जातिबांधवांना जोपर्यंत आपण समान हक्क द्यावयास तयार नाही, आपल्या घरातील गुलामगिरीला जोपर्यंत आपण आळा घालीत नाही, तोपर्यंत इंग्रज लोकांनी आपणास बरोबरीच्या नात्याने वागवावे, इंग्लंडच्या प्रजेस असणारे राजकीय हक्क त्यानी हिंदी प्रजाजनांना बहाल करावेत. अशी मागणी करण्याचा आपणास बिलकुल हक्क नाही. असे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळेच केवळ राजकीय हक्कांची व स्वातंत्र्याची मागणी करण्यापूर्वी लोकांची पात्रता वाढविण्यावर ते अधिक भर देतात. त्याच संदर्भात रानड्यांची अस्पृश्यता निवारणासंबधीची मतेही विचारात घेता येतील. आपल्या देशातील कोट्यावधी पददलितांना व उपेक्षितांना जोपर्यंत आपण मानव मानायला व गुलामगिरीतून मुक्त करायला तयार नाही तोपर्यंत इंग्रजी साम्राज्यावदाबद्दल तक्रार करण्याचा व त्यापसून मुक्ती मागण्याचा आपणास नैतिक अधिकारच नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते.

## ६.५ रानडयांचा राजकीय उदारमतवाद

सुधारकांच्या प्रयत्नांना तात्वीक अधिष्ठान मिळवून देण्याचा प्रयत्न रानडयांनी केला. त्यांच्या या तत्वज्ञानाला 'राजकीय उदारमतवाद' असे म्हणता येईल. यातूनच रानड्यांच्या संप्रदायाला उदरामतवादी (लिबरल) संप्रदाय असे नाव पडले. त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचाही उगम पाश्चात्य उदारमतवादी विचारप्रमाणलीमध्ये होता. "त्यांच्या सामाजिक तत्वज्ञानातील

बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, परम सहिष्णुता आणि सामाजिक कर्तव्यबुद्धी हीच तत्त्वे राजकीय विचारांतही त्यांनी ग्राह्य मानलेली दिसतात." उदारमतवाद हे त्यांच्या सर्व क्षेत्रांतील विचारांना एकत्र बांधणारे सूत्र आहे.

त्यांच्या काळात ॲडम स्मिथ, बेन्थंम, मिल विचारवंतांनी इंग्लंडमध्ये उदारमतवादास लोकप्रियता मिळवून दिली होती. महाविद्यालयीन व विश्वविद्यालयातील शिक्षणातून रानडयांची त्या विचारसरणीशी तोंडओळख झाली होती. ती त्यांच्या सौम्य, शांत व धीरगंभीर वृत्तीला मानवणारी असल्यामुळे त्यांच्या मनावर तिचा फारच पगडा बसला. पाश्चात्य देशात सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनासाठी प्रचलित असलेल्या ऐतिहासिक व तुलनात्मक पद्धतीचा अवलंब रानडे करीत असत.

१) **हिंदुस्थानची प्रगती येथील लोकांनी पाश्चात्यांकडून उदारमतवादाचे तत्त्वज्ञान स्वीकारल्याखेरीज होऊच शकत नाही.** पश्चिमेत उदारमतवाद, विज्ञानाची वाढ, तंत्रज्ञानाचा विकास, विवेकनिष्ठ जीवनदृष्टी - या सर्व गोष्टी परस्परांशी निगडित आहेत. व्यक्तिस्वातंत्र्य, विवेकप्रधान कार्याचे सर्वश्रेष्ठत्व, सनदशीर शासन आणि स्वातंत्र्यप्रीत्यर्थ राजकारणात सहभाग ही उदारमतवादी विचारसरणीची काही वैशिष्टये म्हणून सांगता येतील. रानड्यांच्या विचाराने त्या सगळ्यांना आपलेसे केले आहे.

२) **मानवी व्यक्तित्त्वाबद्दल पराकोटीचा आदर हा उदारमतवादाचा केंद्राबिंदू** मानता येईल. मनुष्याच्या अंगभूत सुप्त शक्तींच्या परिपूर्ण अविष्करणासाठी व विकासासाठी व्यक्ति-स्वायत्ततेची मागणी करणे ही उदारमतवादी प्रमुख प्रेरणा ठरली. व्यक्तीच्या ऐहिक हिताला उपयुक्त असणे ही सामाजिक व्यवहाराची कसोटी ठरली. समाजव्यवस्था ही ईश्वरप्रणीत व चिरंतन नसून मानवी गरजांमधून आकारलेली व क्रमशः विकसित झालेली आहे.

३) **बुध्दनिष्ठा व व्यक्तिस्वातंत्र्य :-** जी सामजिक नियमने व बंधने व्यक्तीच्या विकासाला मारक ठरत असतील ती पाळण्याची सक्ती व्यक्तीवर केली जाऊ शकत नाही. सामाजिक निर्बधापुढे, विचार न करता निमूटपणे मान तुकविण्याऐवजी बुद्धीच्या निकषावर व समाजहिताच्या कसोटीवर त्या निर्बधाची फेरतपासणी केली गेली पाहिजे. आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात व्यक्तीच्या स्वतंत्र कल्पकतेला व कर्तृत्वाला आणि सुसंस्कृत स्वार्थप्रवृत्तीला (फ्री इनिशिएटिव्ह ॲंड एन्लयाटन्ड सेल्फ इटरेस्ट) अधिकाधिक वाव देण्यावर सामाजिक प्रगती अवलंबून आहे.' अशी श्रद्धा उदारमतवादाच्या मुळाशी आहे. बुद्धिनिष्ठा व व्यक्तिस्वातंत्र्य ही दोन्ही मूल्ये रानड्यांनी युरोपीय विचारवंतांकडून उचलली आहेत.

४) **साधने :- शासनाकडे वेळोवेळी अर्ज, तक्रारी, विनवण्या इत्यादी पाठवून व प्रसंगी शासनावर कठोर टीका करुन** ज्यांनी त्याचा रोष ओढवून घेतला, असे न्या. रानडे उदारमतवादी तत्त्वज्ञान आणले. विचारवंत होणे हे एका परीने अटळच होते. मानव हे त्यांच्या सर्व सुधारणांचे लक्ष्य होते. इंग्रजी संसदेकडे निवेदने पाठविणे, सत्ताधाऱ्यांवर दबाव आणणे व प्रभाव टाकणे इत्यादी उदारमतवादी सनदशीर मार्गच त्यांनी सदैव अंमलात आणले. देशातील जातिव्यवस्था व्यक्तीच्या कुचंबणेस कारणीभूत होते व सद्विवेकाची कास धरुन आचरण करणे व्यक्तीला अशक्य करुन सोडते हे पाहून रानड्यांनी तिच्यावर प्रखर टीकास्त्र सोडले होते. कोणतीही मानवी वा दैवी सत्ता सद्विवेकाच्या आड येणे त्यांना नामंजूर होते.

५) **सामाजिक उत्क्रांती :-** ‘गतानुगतिकता, धर्मभोळेपणा, विहित कर्म, शब्दप्रामाण्य, असहिष्णुता आणि प्रारब्धवाद याऐवजी अंत:प्रेरणा, तत्त्वनिष्ठा, व्यवसायस्वातंत्र्य, बुद्धिवाद, परमतसहिष्णुता व प्रयत्नशीलता यांचे वर्चस्व प्रस्थापित करुन समाजजीवन सुसंघटित व एकात्म बनविणे म्हणजे सामाजिक उत्क्रांती होय, अशी रानड्यांची विचारसरणी होती. धार्मिक क्षेत्रात कर्मठपणा, क्षुद्र, कूपमंडुक वृत्ती यांना त्यांनी कडाडून विरोध केला.‘’वारकरी संतांप्रमाणे लोकांना समतेची, औदर्याची व बंधुबावाची शिकवण दिली.’ धर्माच्या नावाखाली सरसहा चालणाऱ्या अनिष्ट व अमानुष रुढींना त्यानी सर्व शक्तीनिशी प्रतिकार केला; सामाजिक - आर्थिक क्षेत्रांत, या समाजाच्या दारिद्र्याची मूलग्राही चिकित्सा करुन औद्योगीकरण व प्रगत शेती या दोन मार्गानीच या समाजाचा विकास होणे शक्य असल्याचे सांगितले. ‘देशाच्या उत्पादनशक्तींचा विकास करणाऱ्या उद्योगप्रधान संस्कृतीचे त्यांनी स्वागत केले आहे,’ राजकीय क्षेत्रात लोकांच्या न्याय्य हक्कांना उचलून धरुन व त्याच्या रास्त मागण्यांना व आकांक्षांना तोंड फोडण्यासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब वेळोवेळी करता यावा यासाठी सार्वजनिक सभेला त्यांनी हाताशी धरले.

६) **कायद्यासंबंधी रानड्यांची धारणा** अशी होती की कायदा म्हणजे बुद्धिनिष्ठ, विवेकी, सार्वत्रिक आणि शाश्वत अशी सर्वश्रेष्ठ  अधिसत्ता होय. तिच्या श्रेष्ठत्वामुळेच व्यक्तीच्या स्वातंत्र्याला संरक्षण आणि हमी मिळते. कयदा हा ज्याप्रमाणे व्यक्तींच्या ईहांचा आविष्कार असतो त्याचप्रमाणे व्यक्तिईहांच्या पलीकडे असणाऱ्या मुल्यांचाही आविष्कार असतो. व्यक्तिगत ईहा व त्यांच्या पल्याडची ही मूलतत्त्वे यांच्यात अंतर्विरोध निर्माण होऊ शकतो याची जाणीव रानड्यांना अर्थातच होती. इतर उदारमतवाद्यांप्रमाणे त्यांनीही हा अंतर्विरोध दूर करण्यासाठी पुढील विचार मांडला आहे. व्यक्तीच्या ईहेवर फक्त एक, आणि एकच बंधन जर कोणते असेल तर ते असते. व्यक्तीच्या सद्सद्विवेकबुद्धीचे! या विवेकबुद्धीच्या आज्ञा पाळण्यापासून कोणतीच सत्ता त्याला परावृत्त करु शकत नाही. अशा प्रकारे उदारमतवादी विचारसरणीचा मूलाधार असलेली सदसद्विवेकाची संकल्पना रानड्यांनीही स्वीकारलेली दिसते.

७) **सनदशीर शासन** हाच उदारमतवादाचा राजकीय आविष्कार आहे असे रानडे मानतात. कारण त्यांच्या मते अशा शासनातच नियंत्रणाची प्रभावी राजकीय साधने उपलब्ध होऊन त्यांच्याद्वारे ‘कायद्याचे राज्य’ प्रत्यक्षात येऊ शकते.

८) **ब्रिटिश उदारमतवाद्यांप्रमाणेच रानड्यांचीही मानवाच्या बुद्धिनिष्ठेवर अढळ श्रद्धा होती.** बुद्धीच्या बळावर हिंदू समाजातील सर्वच प्रश्नांची सर्वांना मान्य होऊ शकणारी उकल सापडू शकेल असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटीश राजा, संसद, हिंदी नोकरशाही यांना या देशातील वस्तुस्थितीचे यथार्थ दर्शन घडवून दिल्यास त्यांचा हमखास पाठिंबा सुधारणेच्या व इतर कार्यास मिळू शकेल अशी रानडयांची खात्री होती. त्यामुळेच ज्या ज्या वेळी एखादे संकंट उभे राहिले वा सदस्य निर्माण झाली त्या त्या वेळी रानड्यांनी परिश्रमपूर्वक खपून, आकडेवारी व वस्तुस्थिती (फॅक्टस) गोळा करुन त्याच्या आधारे शास्त्रशुद्ध पद्धतींद्वारे घडविलेली आपली मते सौम्य शब्दांत, पण तरीही सडेतोड स्वरुपात सरकारसमोर ठेवली.

९) **ब्रिटिश उदारमतवादी जसे व्यक्तींच्या हक्कांबरोबरच त्यांच्या कर्तव्यावरही भर देतात.** आणि अधिकारांबरोबर जबाबदाऱ्यांचेही प्रतिपादन करतात, तंद्वतच रानडेही त्या दोहोतील परस्परावलंबन गृहीत धरताना दिसतात. जनतेच्या हक्कांच्या मागण्या एकीकडून

शासनाकडे पाठवीत असतानाच, त्या हक्कांना जनता कशाप्रकारे पात्र होऊ शकेल याचाही ते विचार करतात आणि त्या दृष्टीने प्रयत्नही करतात. जनतेच्या हक्कांचे वकीलपत्रे घेतानाच तिला तिच्या कर्तव्याची जाणीव करुन देण्याची जबाबदारीही पत्करतात. लोकशिक्षणावर रानड्यांनी फार मोठा भर दिला आहे. किंबहुना त्यांच्या अनेक सभा, समाज, संस्था, व्याख्यानमाला, अर्ज, निवेदने, मागणीपत्रे सरकारकडे धाडलेली माहिती नि आकडेवारी या सर्वामागील हेतू शासनाला परिस्थितीची यथार्थ जाणीव देणे हा तर होताच. त्याचबरोबर व त्यापेक्षाही महत्त्वाचा अंतस्थ हेतू लोकांमध्ये त्याद्वारे जागृती निर्माणकरणे हा होता.

**१०) अतिरेकी व्यक्तिवादाविरुध्द :-** रानड्यांच्या उदारमतवादाला पाश्चात्य उदारमतवादाच्या तुलनेत काही मर्यादा अपरिहार्यपणे पडल्या आहेत. या मर्यादामुळे त्यांच्या विचारात उदारमतवादाच्या तत्त्वज्ञानाने निराळेच स्वरुप धारण केलेले आढळते. व्यक्तिवादाच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार त्यांनी केला. परंतु त्यांच्यावर झालेल्या 'आध्यात्मिक संस्कारामुळे हे व्यक्तिवादी तत्त्वज्ञान जसेच्या तसे पत्करणे त्यांना श्रेयस्कर वाटले नाही.' उदारमतवादी परंपरेत रानडे हे अशा विचारवंतापैकी एक ठरले, ज्यांनी अतिरेकी भौतिकतेविरुद्ध आणि अतिरेकी व्यक्तिवादाविरुद्ध प्रखर प्रतिक्रिया व्यक्त केली होती.'

अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार न करता व्यक्तींना समाजाचे जबाबदार व कर्तव्यदक्ष घटक बनविण्याच्या प्रयत्नावर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. व्यक्तींच्या हक्कांचे अवास्तव स्तोम त्यानी कधीच माजवले नाही. उलट समाजाच्या सद्भावनेला व कर्तव्यबुद्धीला त्यानी आवाहन केले. भारताच्या प्राचीन संस्कृतीचा त्यांना अभिमान होता. तिच्यातील चांगली मूल्ये नाहीशी होऊ न देण्याची त्यांनी खबरदारी घेतली होती.

**११) रानड्यांच्या उदारमतवादी भूमिकेला एक व्यवहार्य व फलितवादी (प्रॅग्मॅटिक) बाजूही आहे.** शेकडो वर्ष रुढींनी जखडलेल्या भारतीय समाजाच्या, पाश्चात्य उदारमतवाद पूर्णपणे पचनी पडणे शक्य नाही हे रानड्यांनी ओळखले असावे. इथल्या लोकांच्या मनावर जुन्या परंपरेचे दृढ संस्कार होते आणि त्यांच्यावर प्रत्यक्ष व एकदम हल्ला केल्यास सुधारणेच्या प्रयत्नांना प्रतिसाद देण्याऐवजी ते हाणून पाडण्यासच ते प्रवृत्त होतील, त्यांचा बुद्धिभेद होईल अशी रास्त भीती त्यांना वाटत असावी. 'लोकांची तयारी नसताना तात्विक शुद्धतेचा अकारण आग्रह धरणारा मनुष्य बहुधा समाजाकडून बहिष्कृत होण्याचाच अधिक संभव असतो. म्हणून समाजाला बरोबर नेण्यासाठी लोकाग्रणींना कार्यवरी दृष्टी ठेवून तत्त्वांना मुरड घालावी लागते. रानड्यांनीही लोकसंग्रहासाठी आपल्या उदारमतवादाची परंपरावादाशी सांगड घातली.' ध्येयाचा पाठपुरावा अखंड करीत असतानाही वास्तवावरची आपली दृष्टी त्यांनी कधीही ढळू दिली नाही. प्रखर हल्ला नको तरी पण सावकाश इष्ट तो बदल घडून आणावा असा त्यांचा निर्धार होता. त्या निर्धारातूनच त्यांनी हा वैचारिक समन्वय घडवून आणला. त्याच्या उदारमतवादाचे आगळेपण अशाप्रकारे व्यावहारिक तडजोडीतून निष्पन्न झाले होते.

## ६.६ व्यक्तिवाद आणि राष्ट्रवाद याविषयी रानडेचे विचार

व्यक्तिवाद व राष्ट्रवाद या परस्परविरोधी संकल्पना असल्याचे अनेकदा भासविले जाते. या दोन अंतर्विरोधी प्रेरणांचा मेळ घातल्यावाचून कोणत्याही राष्ट्राचा विकास होणेच असंभव असते. सुधारणेचा पुरस्कार करणाऱ्या उदारमतवाद्यांचा इंग्रजविरोध मिळमिळीत ठरत

होता. तर इंग्रजी सत्तेविरुद्ध व आर्थिक पिळवणुकीविरुद्ध आंदोलन उभे करु पाहणारांनी आपल्या लोकांचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी हिंदुस्थानातील प्राचीन सामाजिक संस्थांचा अवास्तव गौरव करुन मूलगामी परिवर्तनाची वाटच अडवून टाकली होती.

रानडे आपल्या विचारत व्यक्तिवाद व राष्ट्रावाद या दोन्ही प्रवृत्तींचा समन्वय घालण्यात यश मिळवू शकले.

समाजाचे स्वरुप त्यांच्या मते करारात्मक असूच शकत नाही. कारण समाज हा व्यक्तीच्या स्वभावातून निर्माण झाला आहे असे ते मानतात. राज्याचा आधार शक्ती नसून जन इच्छा आहे. असे ते म्हणतात. राज्यसंस्थेला ते श्रेष्ठ मानीत असले तरी व्यक्तीचे स्वातंत्र्य हे राज्यपूर्व व समाजपूर्व, स्वयंसिद्ध व अंगभूत असल्याचेही ते मानतात. त्यांच्या मते, राज्यसंस्था श्रेष्ठ आहे, कारण ती आपल्या सामूहिक सामर्थ्यात आपल्या नागरिकांचे बळ, ज्ञान, दया सामावून घेत असते. 'सामुदायिक मानवतेची संकलित कृतिप्रवणता म्हणजे राज्य अथवा समाज' अशी व्याख्या करताना ते आढळतात. हेगेलप्रमाणे, राज्यसंस्थेला ईश्वरी मानण्याच्या मर्यादेपर्यंत ते कधीच जात नाहीत. रानडयांच्या मते, राज्य व समाज यांना जे मोल आहे ते त्या संस्था व्यक्तिस्वातंत्र्याला उपकारक ठरतात, यासाठी आहे! ते म्हणतात, ईश्वर अल्पस्वल्प प्रमाणात का होईना व्यक्तीच्या सद्सद्विवेकातून प्रकट होत असतो. राज्यसंस्था सर्वोत्तम व्यक्तींच्या सद्सद्विवेकाचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे मोठी ठरत असली तरी, व्यत्कीचे खरे स्वातंत्र्य हे आपपल्या सद्सद्विवेकाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येकाने केलेल्या नैतिक विकासातच मूलतः सामावलेले असते.

## ६.७ व्यक्तिचे स्वातंत्र व हक्क

रानडे हे स्त्री-पुरषांच्या हक्कांचे कट्टर पुरस्कर्ते होते. मानवी आयुष्याचा अंतिम हेतू, त्याच्या मते, आत्म्याची मुक्तता - मोक्ष - हा आहे. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी अशी एक शक्ती वसत असते जी आत्मशिस्तीच्या मार्गाने या हेतूची पूर्ती करण्याचा अखंड प्रयत्न करीत असते. ही शक्ती म्हणजेच मनुष्याची नैतिक दृष्टी असून तिच्याच प्रगल्भ अवस्थेला सदसद्विवेकबुद्धी असे म्हणतात. मनुष्याच्या सर्व शक्तींचा सर्व अंगांनी विकास होऊन त्यांच्या आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग मोकळा होणे म्हणजेच स्वातंत्र्य होय, असे रानडे म्हणतात. त्यांच्या मते या मार्गातील सर्वात मोठा अडथळा हा माणसाच्या मनातूनच उद्भवत असतो. तो म्हणजे मनुष्याच्या स्वताःच्याच निम्न व दुर्बल वृत्तीचा अडथळा होय. 'मानवी व्यक्तिमत्त्वातील ईश्वराचा आवाज म्हणजे स्वातंत्र्य' अशी व्याख्या रानड्यांनी केली आहे.

परंतु त्यांची स्वातंत्र्यकल्पना केवळ आध्यात्मिक व नैतिक क्षेत्रापुरती मर्यादित राहत नाही, तर नागरी हक्कांचीही जोड ते तिला देतात. कायदे करणे, कर लावणे, शिक्षा फार्मावणे, अधिकारी नेमणे याबाबतचे अधिकार नागरिकांना प्राप्त व्हावेत अशी मागणी ते करतात. म्हणजेच सांसदीय संस्था व 'कायद्याचे राज्य' या दोन्ही संकल्पना त्यांनी स्वीकारलेल्या दिसतात. स्त्रियांच्या हक्कांचाही त्यांनी जोरदार पुरस्कार केला आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्याला व हक्कांना राज्य व समाज संरक्षण देतात. याच कारणासाठी त्या संस्थांना रानडे मोठेपण बहाल करतात. व्यक्तीला विकासाची संधी समाजात मिळते. राज्यसंस्था विवेकाधिष्ठित कायद्यान्वये हक्कांचा

उपभोग सुलभ करते, या गोष्टिची जाणीव त्यांना होती. राज्याच्या संदर्भात स्वातंत्र्याच्या पुढील व्याख्या ते करतात. 'राज्याच्या संदर्भात स्वातंत्र्य म्हणजे सदसद्विवेकाच्या आज्ञांप्रमाणे व्यक्तिजीवन शक्य करणारी राजकीय व वैधनिक परिस्थिती होय.'

व्यक्तीच्या हक्कांच्या संदर्भात त्यांच्या दृष्टीने राज्य व समाज या दोहोंना महत्त्व असले तरी समाजाला ते अधिक महत्त्व देतात, कारण त्यांच्या मते कायद्यांपेक्षाही हक्कांना अधिक संरक्षण प्राप्त होते ते समाजाच्या सामाजिक व नैतिक सद्सद्विवेकबुद्धीमुळे! जर सामाजिक सदसद्विवेकबुद्धीला कायद्याने पुरस्कारिलेले हक्क मान्य असतील तरच ते सुरक्षित होऊ शकतात. पण जर ते समाजाला मान्य नसतील तर कोणताही कायदा, कोणतीही संसद व कोणतेही न्यायालय त्या हक्कांची खऱ्या अर्थाने हमी घेऊ शकणार नाही.

## ६.८ परकिय राजवटी विषयी

**परकीय राजवट :-**

परकीय राजवटीबद्दल एकनिष्ठतेची व कृतज्ञेची भावना रानड्यांच्या मनात पुरेपूर होती. राज्यकर्त्यांच्या सद्भावावर त्यांचा अढळ विश्वास होता. प्रचंड प्रमाणावर जनतेला राजकीय शिक्षण देण्याची ब्रिटिश सत्तेची क्षमता आणि नियतीचा तसा हेतू हा या देशातील सत्तेचा पाया आहे, अशी त्यांची ठाम समजूत होती. राज्यकर्त्याविषयीची ही भावना केवळ त्यांनी चालवलेल्या प्रचारामुळे निर्माण झालेली नव्हती तर राज्यकर्त्यांच्या उदारमतवादी धोरणांमुळे व कार्यामुळे तसेच हुशारी, चातुर्य व बुद्धिमत्तेमुळे झालेली होती, स्वातत्र्यप्रेमी व गुणी राज्यकर्ते जर या देशाला लाभले नसते तर या देशात प्रबोधनाची प्रभात झालीच नसती व रुढिपरंपरांच्या कचाट्यातून हा समाज सुटूच शकला नसता.

## ६.९ शासनाच्या आर्थिक धोरणावर टीका

सरकारी धोरणांवर टीका करण्यास रानडे कधीच कचरले नाहीत. विशेषतः शासनाच्या आर्थिक धोरणांवर त्यांचा विशेष रोख होता. केवळ या देशाची संपत्ती लुटून परदेशी नेली जाते एवढेच या देशाच्या दारिद्र्याचे कारण नसून या देशातील उद्योगधंद्याचा ऱ्हास व शेतीवर अतिरेकी अवलंबन हेच या देशातील दारिद्र्याचे मूळ आहे. या परिस्थितीला भांडवलाचा तुटवडा, कालबाह्य पतपद्धती, उपक्रमशीलतेचा व धडाडीचा अभाव ही कारणे तर आहेतच पण सरकारची आर्थिक धोरणेही कारणीभूत आहेत. शासनाची धोरणेच या देशातील लोकांना शेतीवर जास्तीत जास्त विसंबून राहणे भाग पाडतात असे त्यांचे मत होते. आयात केलेला माल सोयीच्या वाहतूक साधनांनी खेडयांपर्यत पोचल्यामुळे ग्रामोद्योगांवर कुऱ्हाड कोसळली. लोक दिवसेदिवस अधिकच असहाय्य होऊन शेतीवरच अवलंबून राहू लागले. हे अरिष्ट जर थोपवायचे असेल तर या देशाचे भराभर औद्योगीकरण करण्यावाचून गत्यंतर नाही असे रानड्यांचे मत होते. अशा प्रकारे, संपत्तीच्या विभाजनापेक्षा अधिक उत्पादनावर त्यांनी विशेष भर दिला होता.

१८९२ साली 'इडियन पोलिटिकल इकॉनॉमी' या विषयावर दिलेल्या व्याख्यानांमधून त्यांनी हे स्पष्ट केले की ॲडम स्मिथ आणि रिकार्डो यांचे अर्थशास्त्रीय निष्कर्ष भारताला लागू

ठरत नाहीत. परिणामी, आर्थिक क्षेत्रातील तटस्थतेचे जे धोरण शासन अवलंबात आणीत आहे ते या देशास घातक ठरत आहे. शासनाने या देशात शेतकी व औद्योगिक विकास साधण्याचे धडाडीने प्रयत्न केले पाहिजेत, असे मत रानडयांनी मांडले होते. 'स्मिथ-रिकार्डोचे अर्थशास्त्र हे निरंकुश स्पर्धा, उत्पादन-साधनांची अनिरुद्ध गतिक्षमता, यावर आधारलेले आहे. प्रगत राष्ट्रातील अर्थव्यवस्थेलाही त्यांची तत्वे आज तंतोतंत लागू पडत नाहीत, तिथे हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशाबद्दल बोलायलाच नको.'

## ६.१० भारताचे स्वातंत्र्य

रानड्यांच्या मते, ब्रिटनने भारताला जिकल्यामुळे या देशाला स्वतःच्या आर्थिक व सामाजिक रचनांची दुरुस्ती व फेरबांधणी करायला अवसर, व आधार प्राप्त झाला. आणि दुसरी गोष्ट अशी की, विचारांनी, भावनांनी व समान भवितव्याच्या जाणिवेने एकात्मक झालेले राष्ट्र म्हणून समाधानकारकपणे व संघटितपणे हिंदुस्थान जोवर उभे राहत नाही तोवर त्याने ब्रिटिश साम्राज्यातून बाहेर पडणे म्हणजे स्वातंत्र्याच्या नावाखाली अराजकाला व फाटाफुटीलाच निमंत्रण देणे ठरेल.

भारतासाठी राजकीय स्वातंत्र्याची मागणी रानड्यांनी केलेली नाही, हे खरे आहे, कारण त्याची शक्यता या देशात अजून शेदोनशे वर्षे नाही, त्यांची अशी खात्री होती.

रानड्यांची भूमिका अशी होती की स्वतंत्र लोकशाही शासन या देशात निर्माण होण्याआधी लोकशाही समाज येथे निर्माण झाला पाहिजे. जे तत्काळ पूर्ण स्वराज्याची मागणी करतात ते रानड्यांच्या मते, हे विसरतात की, लोकशाही हा केवळ एक शासनप्रकार नसून तो एक जीवनमार्ग आहे. रानडे म्हणतात, या समाजाला कधी हक्क ठाऊकच नव्हते. त्याला ठाऊक होत्या मूठभरांसाठी सवलती; अल्पसंख्यांकासाठी केवळ अपात्रता व दुबळेपणा! रानड्यांनी येथे हक्कांची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. हिंदू समाजाची मरणोन्मुख झालेली सदसद्विवेकबुद्धी जागी करणे हा त्यांचा हेतू होता. स्थिर व अचूक राजकारण शक्य करणारी खरीखुरी सामाजिक लोकशाही निर्माण करणे हे त्यांचे अंतिम लक्ष्य होते.

आपल्या विरोधकांना ते म्हणतात : 'तुम्ही अर्धवट उदारमतवादी होऊ शकणार नाही. राजकारणात उदारमतवादी व धर्मकारणात सनातनी तुम्हाला होता येणार नाही. हदय आणि डोके यांना सोबतच जायला पाहिजे. बुद्धीची मशागत करायची, मनाला संपन्न करायचे, राजकीय हक्क व सवलती अधिक व्यापक करायच्या आणि त्याच वेळी हदये मात्र बंदिस्त व संकुचित ठेवायची, हे तुम्हाला जमणार नाही. परकीय राज्यकर्त्यापासून हक्क मागणारे स्वतःच्या भ्रमांच्या व सामजिक दूषणांच्या कचाटयात बांधील राहू शकत नाही.' रानड्यांचे शब्द किती सार्थ होते याचा प्रत्यय आजही येऊ शकतो.

## ६.११ मूल्यमापन

स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला अनुसरुन **जबाबदार शासनपद्धतीच्या तात्त्विक कक्षा** त्यांना स्पष्टपणे व पूर्णपणे ठाऊक होत्या; परंतु प्रत्यक्ष लोकांची कुवत आणि पात्रता लक्षात घेता

त्यांनी असे ठरविले की एकदम स्वातंत्र्याची मागणी करण्याऐवजी क्रमाक्रमाने त्या दिशेने वाटचाल करावी. '**स्वराज्यापेक्षा सुराज्यावर त्यांनी अधिक भर दिला** आणि सत्तासंपादनाची हाव न बाळगता लोकांना आपले न्याय्य हक्क सनदशीरपणे प्राप्त करुन घेण्यास प्रवृत्त केले.

**२) आदर्शाची भडक चित्रे रंगवीत बसण्याऐवजी लोकांना राजकीय शिक्षण देण्याच्या दृष्टीने** दैनंदिन जीवनातील लहानसहान पण निकडीचे प्रश्न हाती घेतले; व सरकारी कामकाजात न्याय, निःपक्षपातीपण, कायदेशीरपणा आणि नागरिक स्वातंत्र्य यांच्या जोपासनेसाठी सुधारणा सुचवलया.' कायदेकौन्सिलातील हिंदी लोकांची संख्या वाढवावी, अधिकाधिक हिंदी लोकांना सरकारी सेवेत प्रवेश द्यावा अशा नेमस्तांच्या सगळ्या प्रतिनिधिक मागण्या त्यांनी शासनासमोर ठेवल्या.

## ६.१२ प्रश्न

१) रानड्यांचा सामाजिक विचारांची चर्चा करा.

२) रानड्यांच्या राजकीय उदारमतवादाचे विश्लेषण करा.

३) भारताचे स्वातंत्र्या आणि परकीय राजवटीविषयी रानडेंचे विचार सांगा?

४) टिपा द्या.

१) व्यक्तिवाद आणि राष्ट्रवाद याविषयी रानडेंचे विचार.

२) रानडे आणि शासनाचे आर्थिक धोरण.

३) समग्र सामाजिक सुधारणअंचा रानडेंचा विचार.

४) सामाजिक सुधारणेच्या पध्दती आणि रानडे.

**संदर्भ :-**

वर्गा. व्ही. पी. 'मॉडर्न इंडियन पोलीटिकल थॉट'.

❖❖❖❖

# ७

# गोपाळ कृष्ण गोखले आणि उदारमतवाद (१८६६ ते १९१५)

**घटक रचना :**

७.१ प्रस्तावना
७.२ उदारमतवादी राजकीय विचार
७.३ शासनविषयक विचार
७.४ राजकीय साध्य - स्वयंशासन
७.५ सनदशीर साधने यावर भर
७.६ धर्म निरपेक्ष राज्याची कल्पना
७.७ सार्वजनिक जीवनाचे आध्यात्मिकरण
७.८ मूल्यमापन
७.९ प्रश्न

## ७.१ प्रस्तावना

नेमस्तांचे अग्रणी, न्या. रानड्यांचे शिष्य आणि महात्मा गांधीचे राजकीय गुरु उदारमतवादी विचारक ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील एका खेड्यात ९ मे १८६६ रोजी झाला. प्राथमिक शिक्षणाचे धडे गावी घेतल्यानंतर पुढील शिक्षणाकरिता ते कोल्हापुरास आपल्या बंधूबरोबर राहिले. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी पितृनिधनाचा आघात त्यांना भोगावा लागला. मॅट्रिक झाल्यावर आधी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात, पुढे पुण्याच्या डेक्कन कॉलेजात आणि त्यानंतर मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण घेतले. १८८४ साली ते पदवीधर झाले. गणित विषयात त्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले; त्याचबरोबर इंग्रजी वाङ्मयासंबंधीही त्यांना अनावर ओढ होती. बुद्धी आणि श्रम या दोहोंच्या बळावर त्यांनी आपले शैक्षणिक जीवन संपन्न व यशस्वी केले.

**कार्य :** बी. ए. झाल्यावर वरिष्ठ सरकारी नोकरीच्या वा आर्थिक लाभाच्या मोहाला बळी न पडता, पुण्याला विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी टिळक - आगरकरांच्या सहकार्याने स्थापिलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूलमध्ये' गोखल्यांनी शिक्षकांची नोकरी धरली, त्यावेळी अवघ्या ७५ रुपये मासिक वेतनावर डेक्कन एज्युकेशन संस्थेची सेवा करण्याची त्यांनी शपथच घेऊन टाकली.

या काळातील त्यांचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे डेक्कन एज्युकेशन सोसायटीला आर्थिक स्थैर्य आणून देण्याचे! त्यासाठी तीन वर्षे त्यांनी भ्रमंती केली. त्याच काळात सार्वजनिक सभेचे चिटणीसपद आणि सभेच्या त्रैमासिकाचे संपादकपदही ते सांभाळीत असत. 'लोकहिताचे प्रश्न घेऊन त्यांचा प्रथम आमूलाग्र अभ्यास करणे, सभेच्या बैठकी भरविणे, बैठकीच्या कामाचा अहवाल लिहिणे, त्रैमासिकासाठी लेख तयार करणे वगैरे सारी कामे श्रमाची व वेळ घेणारी होती.' परंतु उत्साहाने गोपाळराव ती पार पाडीत असत.

**कायदेमंडळातील कार्य :** १८९९ साली मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात गोखले निवडून आले. शासनाच्या केंद्रीय यंत्रणेत जनतेचे एक निष्ठावंत प्रतिनिधी म्हणून ते वावरले. आणि ब्रिटिश साम्राज्यातील एक विचारवंत मुत्सदी म्हणून किर्तीमान झाले.

**काँग्रेसमधील कार्य :** १८९९ ते १९१४ या काळात गोखले काँग्रेसच्या अधिवेशनात उपस्थित होते.

**हिंदसेवक समाज :** होतकरु तरुणांनी एकत्र यावे व देशसेवेच्या रुचेल त्या शाखेत झेपेल ते कार्य करण्यासाठी स्वतःला वाहून घ्यावे अशा हेतूने 'सर्व्हन्टस् ऑफ इंडिया' सोसायटीची स्थापना गोखल्यांनी केली होती.

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या त्यांनी समक्ष भेटी घेतल्या. त्यांच्यासमोर भाषणे दिली. गांधींच्या निवेदनाची मदत घेऊन दक्षिण आफ्रिकेच्या मंत्र्यांनाही ते भेटले. आशियाविरोधी कायदा व तीन पौंडांचा कर या दोन्ही गोष्टी रद्द करण्याचे त्यांच्याकडून त्यांनी आश्वासन घेतले. या आश्वासनामुळे चळवळीची न्यायताच प्रस्थापित झाली. दक्षिण आफ्रिका सरकारने आपला शब्द पाळला नाही. मात्र या प्रसंगातून गोखल्यांचे दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांविषयीचे ज्ञान वाढले. तसेच पुन्हा जेव्हा लढा उद्‌भवला तेव्हा गोपाळरावांच्या शब्दाखातर सत्याग्रहनिधीला भरपूर द्रव्यबळ मिळाले.

सार्वजनिक कार्यात अखेरपर्यंत उमेदीने, धडाडीने खंबीरपणे उभे राहिलेले ते आदर्श भारतसेवक होते. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी ते दिवंगत झाले.

## ७.२ उदारमतवादी राजकीय विचार

उदारमतवादी विचारसरणी म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही समता, न्याय, धर्मनिरपेक्षता या विचारांना महत्त्व देणारी विचारसरणी होय. सेवा निष्ठा व त्यागाने भरलेले सार्वजनिक जीवन गोखलेंच्या वाट्याला आले होते. त्यामुळे राज्य वा समाजाविषयी त्यांनी तात्त्विक चर्चा केली नाही. एखाद्या विचारसरणीला हाताशी धरुन 'सिद्धांत' वा 'वाद' (ईझम्स) उभे केले नाहीत. राजकीय विचाराच्या क्षेत्रात त्यांनी एखाद्या ग्रंथाची भर घातलेली नाही. त्यांच्या लेखनाचा बराच मोठा भाग देशाच्या तात्कालिक गरजांच्या संदर्भात व सार्वजनिक जीवनाच्या प्रयत्नात विविध प्रश्नांवर व मुद्यांवर मांडलेल्या विचारांच्याच स्वरुपात आहे. त्या सगळ्या विचारांचा संकलितपणे विचार केला असता गोखल्यांच्या उदारमतवादी राजकीय विचारांची सूत्रबद्ध मांडणी करणे शक्य होते. दैनंदिन समस्यांकडेही गोखले उदारमतवादी दृष्टिकोणातून

पाहतांना आढळतात. पाश्चात्य उदारमतवादातील उत्तमोत्तम तत्त्वे गोखल्यांनी स्वीकारली होती. पण तरीही १) **त्यांचा उदारमतवाद पश्चिमेच्या अंधानुकरणातून आलेला नव्हता.** तत्कालीन भारतीय वस्तुस्थितीला धरुन त्या तत्त्वज्ञानाला त्यांनी मुरड घातली होती. असा हा परिष्कृत उदारमतवाद गोखल्यांच्या राजकीय विचारांचा गाभा मानावा लागेल.

पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारवंतांच्या विचारांचे परिशीलन करुन त्यांनी आपली शासनविषयक मते निर्धारित केलेली असल्यामुळे वेगवेगळ्या प्रसंगीही त्यांनी मांडलेल्या मतांमध्ये आपोआपच एक प्रकारचे सेंद्रीय ऐक्य व सूत्रबद्ध सुसंगती निर्माण झाली आहे. ऐहिक प्रगतीची संकल्पना, मानवाच्या सामूहिक प्रयत्नांतून सामाजिक स्थिती बदलता येणे असल्याबद्दलचा विश्वास, मानवाच्या प्रतिष्ठेला मान्यता, त्यांच्या अंगी वसत असलेल्या ज्ञान व शक्ती या गुणांची जाणीव - अशी काही वैशिष्ट्ये पश्चिमेच्या प्रभावाची म्हणून त्यांच्या उदारमतवादांची सांगता येतील. **२) शासन हे मानवाकरिता असून मानवाला आपल्या इच्छेप्रमाणे व गरजेप्रमाणे ते बदलण्याचा पूर्ण अधिकार आहे** हे गोखल्यांच्या राजकीय विचारांचे हे मूलसूत्र आहे. शासनाच्या मर्यादा व्यक्तींच्या इच्छेनुसार ठराव्यात; शासन कोणत्याही विशिष्ट वर्गासाठी नसून संपूर्ण समाजासाठी आहे व त्यामुळे भिन्न वर्गातील परस्परविरुद्ध हितसंबंधामधील अंतर्विरोध नि:पक्षपातीपणे मिटवणे ही त्यांची जबाबदारी ठरते. शासितांच्या धार्मिक क्षेत्रात शासनाने अतिरिक्त हस्तक्षेप करुन नये. **३) सर्व व्यक्ती राजकीयदृष्ट्या समान आहेत. ४) अति व्यक्तिस्वातंत्र्य गोखल्यांना मान्य नव्हते.**

**५) सनदी सेवेविषयी :** या देशाच्या कारभारात सनदी सेवा ही महान नोकरशाही सत्ता म्हणून अस्तित्वात आली असून ती कमालीची केंद्रीभूत आहे. ती अनेकदा लोकमताला दाद वा प्रतिसाद देत नाही. कर्झनच्या काळात तिने या अमानुष यांत्रिकीकरणाची परिसीमा गाठली होती.

या नोकरशाहीने सुसंस्कृत वडीलकीचा (एन्लायटन्ड पॅटरनॅलिझम) सिद्धांत स्वत:साठी गृहीतच धरला आहे. परिणामी हिंदुस्थानी जनतेचे हित कशात आहे ते फक्त आपल्यालाच कळते आणि त्यासाठी लोकांच्या इच्छा व भावना लक्षात घेण्याची आवश्यकता नाही अशी अधिकाऱ्यांची धारणा होऊन बसली. सनदी सेवांच्या भारतीयीकरणाची आश्वासने अनेकदा मिळाली असली तरी प्रत्यक्षात त्या दिशेने भरीव प्रयत्न झालेलेच नाहीत. त्यामुळे सुशिक्षित हिंदी तरुणांच्या मनात या शासनाबद्दल कमालीचा परात्मभाव (एलीनेशन) वाढील लागला असून या राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेपासून आपण तुटून बाहेर पडलो आहोत असे त्यांना वाटू लागले आहे. त्यांच्या या वैफल्याचे व हताशपणाचे प्रतिध्वनी त्यांच्या बदलत्या राजकीय दृष्टिकोणातून कानी पडू लागले आहेत.

बंडानंतरच्या (१८५७) काळात सापेक्षतः स्थैर्य आले असले तरी या देशाची अर्थव्यवस्था घसरतच जात आहे. लष्कर आणि नोकरशाही यांच्यावर होणारा भरमसाठ खर्च सुशिक्षितांच्या डोळ्यांवर येऊ लागला आहे.

या तीन गोष्टींनी गोखल्यांच्या राजकीय कार्याची चौकट आखली असून त्यांचा राजकीय विचार या तत्कालीन परिस्थितीने परिष्कृत झाला आहे.

या देशाच्या राजकारणात सुशिक्षित मध्यमवर्गाची एक शक्ती पश्चिमी शिक्षणाच्या संस्कारातून उभी राहिली असून तिची उपेक्षा करणे शासनाला धोक्याचे ठरणार आहे, अशी

गोखल्यांची ठाम श्रद्धा होती. या वर्गाच्या एका बाजूला नोकरशाही आहे व दुसऱ्या बाजूला सुस्त अशी सामान्य जनता आहे. नोकरशाहीने आपली पोलादी चौकट खंबीरपणे उभी केली असून, जनकल्याणाबद्दल ती उत्तरोत्तर उदार होऊ लागली आहे; तर सामान्य जनता ही अज्ञानापोटी, आळसापोटी व अनास्थेपोटी कोणत्याच सुधारणाकार्यात पुढाकार घेण्याच्या परिस्थितीत नाही. अशा परिस्थितीत या मध्यमवर्गावरच राष्ट्रउभारणीच्या महत्कार्याची धुरा अपरिहार्यपणे येऊन पडली आहे.

सुशिक्षितांची मने केवळ सरकारी नोकऱ्यांवर खिळून न राहता, सार्वजनिक कार्याची त्यांनी स्वतःला गोडी लावून घेणे आवश्यक झाले आहे. 'पब्लिक सर्व्हिस' चा जो रुढ अर्थ 'शासकीय सेवा' असा झाला आहे तो बदलून 'जनसेवा' असा नवा अर्थ व संदर्भ तरुणांनी समजावून घेणे आवश्यक ठरले आहे. सेवेची निरनिराळी क्षेत्रे शोधून स्वतंत्र प्रयत्नांच्या बळावर तरुणांनी उभे राहिले पाहिजे. विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या तरुणांनी केवळ आत्मोन्नती हे ध्येय न ठेवता स्वार्थत्यागाच्या भावनेने देशकार्याला वाहून घेतले पाहिजे. गोखल्यांच्या सनदी सेवेविषयीच्या विचारातही उदारमतवाद दिसतो.

## ७.३ शासनविषयक विचार

उदारमतवादाशी सुसंगत अशीच गोखल्यांची शासनविषयक भूमिका होती.

१) ब्रिटिश सत्तेबाबत त्यांची भावना रानड्यांप्रमाणेच कृतज्ञतेची होती. ब्रिटिश राज्यसत्तेपासून कायमची फारकत त्यांना कल्पनेतही मान्य नव्हती. साम्राज्यांतर्गत स्वायत्तता एवढेच त्यांचे राजकीय उद्दिष्ट होते.

२) **त्यांनी प्रागतिक शासनाचे चार निकष सांगितले आहे.** त्यांच्या मते, प्रागतिक शासनाचा **पहिला निकष हा की,** जनतेची भौतिक आणि नैतिक सुधारणा त्यात व्हावी. इंग्रजी राज्यसत्तेने स्वतःच्या कारभाराच्या सोयीसाठी निर्माण केलेल्या यंत्रणांचा समावेश गोखले या सुधारणांमध्ये करीत नाहीत. उदाहरणार्थ, रेल्वे, पोष्ट आणि तारखाते व तत्सम इतर गोष्टी. या गोष्टींचा जनतेलाही उपयोग होत असला तरी प्रथमतः व प्रामुख्याने शासनाने त्या स्वतःच्या सोयीकरिता निर्मिल्या होत्या. जनतेच्या भौतिक व नैतिक सुधारणेचा शासनाने प्रयत्न करणे याचा गोखल्यांना अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे शासनाने जनतेच्या शिक्षणार्थ, आरोग्यार्थ, शेतकी - विकासार्थ, औद्योगिक विकासार्थ करावयाचे प्रयत्न होत. गोखल्यांच्या मते प्रागतिक शासनाचा **दुसरा निकष हा की,** शासन स्थानिक स्वराज्याच्या कारभारात जनतेला अधिकाधिक सहभाग देण्याच्या उद्देशाने कोणते व कितपत उपाय योजते?

**गोखल्यांचा तिसरा निकष होता,** विधिमंडळामध्ये - म्हणजे जिथे धोरणांवर विचार होतो अशा चर्चामंडळामध्ये - जनतेच्या आवाजाला शासन कितपत अवसर देते? आणि सार्वजनिक सेवेत भारतीयांना जास्तीत जास्त प्रमाणात प्रवेश देण्यासाठी शासन कितपत वाव देते? शिक्षणावर केलेला खर्च हा शासनाच्या सामर्थ्याचे साधन ठरत असतो असे गोखल्यांचे मत होते. तसेच शिक्षण हे देशाच्या भावी मुक्तीचेही साधन ठरु शकते.

शिक्षणाच्या केवळ प्रमाणाबद्दलच नाही तर प्रकाराबद्दल व गुणात्मक बाजूबद्दलही गोखल्यांनी तक्रार केली आहे. विचार करायला लावण्याऐवजी पाठांतर करुन परीक्षा पास करण्यावरच लक्ष केंद्रीत करायला लावणाऱ्या शिक्षणपद्धतीबद्दल त्यांनी असमाधान व्यक्त केले आहे. शासनाने शिक्षणाकडे अधिक लक्ष घालावे, अधिक खर्च करावा, शिक्षणाचे स्तर उंचवावे, केवळ कारकुनी शिक्षण न देता युरोपचा इतिहास वगैरेसारख्या, लोकशाही तत्त्वांचा परिचय करुन देणाऱ्या विषयांना अभ्यासक्रमात स्थान द्यावे, शासनाचे ते नैतिक कर्तव्य आहे आणि त्याची पूर्ती शासितांप्रमाणे शासकांनाही उपकारक ठरणार आहे, असे ते म्हणतात.

लोकांचा राजकीय सहभाग वाढवून त्यांना राजकीय शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध करुन देण्याचे कार्य शासनाने आपल्या अंगावर घ्यावे, हा विचार गोखल्यांच्या राजकीय विचाराचा एक सुवर्ण धागा आहे.

उत्तम शासनाचा तिसरा निकष, गोखल्यांच्या मते, कौन्सिलांमधील चर्चेत लोकमताच्या आवाजाला वाव मिळणे हा आहे. बदललेल्या काळाच्या अनुषंगाने व हिंदी जनतेमध्ये निर्माण झालेल्या राजकीय आकांक्षा व त्यासंबंधीची अस्वस्थता लक्षात घेता, भारतमंत्र्यांच्या व व्हाईसरॉयच्या कौन्सिलात योग्य हिंदी व्यक्तींची नेमणूक करावी, कायदेमंडळातील हिंदी सभासदांची संख्या वाढवावी, त्यांना अंदाजपत्रकासंबंधी उपसूचना मांडण्याची सवलत असावी, ठराव मांडण्याचा अधिकार असावा अशा अनेक मागण्या गोखल्यांनी शासनाकडे वेळोवेळी पाठवल्या होत्या.

**चांगल्या व प्रागतिक शासनाचा चौथा निकष** - सार्वजनिक सेवांमध्ये जास्तीतजास्त भारतीयांना प्रवेश देणे.

प्रशासनात या नव्या शिक्षित वर्गाला वाटा दिला गेलाच पाहिजे. 'आज प्रशासन केवळ प्रामाणिक व कार्यक्षम असून चालत नाही; तर अधिकाऱ्यांच्या हाती सुशिक्षित हिंदी लोकांच्या प्रतिनिधींच्या त्या प्रशासनाशी सहयोग करविला जाणेही तितकेच आवश्यक झाले आहे.'

चांगल्या शासनाचे आणखी एक वैशिष्ट्य गोखल्यांनी मांडले आहे. ते म्हणजे, शासनाने लोकमताला प्रतिसाद देणे. प्रत्येक प्रश्नासंबंधी हिंदी लोकांचा दृष्टिकोण शासनाने समजावून घ्यायला पाहिजे. त्याच हेतूने गोखल्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्यावर निर्बंध घालणाऱ्या कायद्याला विरोध केला होता. अशा कायद्यामुळे सतत अस्थिरतेचे व संदेहाचे वातावरण कायम राहून प्रामाणिक वृत्तपत्रकारांनाही आपले विचार मांडणे जड जाईल. कोणत्याही क्षणी आपल्यावर राजद्रोहाचा बडगा उगारला जाईल या भीतीने 'अळीमिळीचूप' चे वातावरण सर्वत्र पसरेल. गोपनीयतेच्या नावाखाली नागरिकांना सरकारी कार्यालयात जाण्यास बंदी करणे, एखादी अतिसामान्य बातमी प्रसिद्ध केल्याबद्दल संपादकांना जाब विचारणे, 'गोपनीयते' ची व्याख्या नसल्यामुळे कोणतीही गोष्ट जनतेपासून लपवून ठेवणे इत्यादी गोष्टींवर गोखल्यांनी परखड टीका केली आहे.

**३) शासन साध्य नाही तर केवळ एक साधन आहे.** लोकांच्या जीवनाचे सर्वांगीण परिवर्तन करणे हे त्यांचे ध्येय आहे. शासन हे आधुनिकरणाचे महान साधन असून त्याला आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अशा अनेक बाजू आहेत. इतर प्रगत राष्ट्रांच्या बरोबरीने या राष्ट्राला उभे राहता येण्यासाठी जे आवश्यक आहे ते शासनाने करावे, असे त्यांना वाटते. पाश्चात्य

उदारमतवादाला त्यांनी मूरड घातली आहे. समाजाच्या प्रगतिशील परिवर्तनात शासनाने महत्त्वाची भूमिका पार पाडावी व राष्ट्राची अर्थव्यवस्था भरभक्कम उभी करावी. हा देश अर्धविकसित आहे हीच एक गोष्ट या देशातील शासनावर विशेष जबाबदारी टाकण्यास कारणीभूत ठरते. शेती, शिक्षण, उद्योगधंदे, पाणीपुरवठा, आरोग्य या सगळ्या व अशा कित्येक क्षेत्रांत शसनाच्या उपक्रमाखेरीज व सहकार्याखेरीज या देशात काहीही होणे शक्य नाही. शिक्षणाच्या व उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात शासनाने भरीव कामगिरी करावी. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करावा, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण अधिक दर्जेदार करावे, शिक्षणात युरोपचा इतिहास आदी विषयांचा समावेश करावा, उपयुक्त व वैज्ञानिक शिक्षणावर भर देण्यात यावा; उद्योगधंद्याच्या क्षेत्रात परिस्थितीचे अध्ययन करुन उद्योगधंद्यांच्या वाढीचा प्रयत्न करावा, त्यासाठी लागणारे भांडवल उभे करावे, इत्यादी अपेक्षा गोखल्यांनी शासनाकडून बाळगल्या होत्या.

## ७.४ राजकीय साध्य - साम्राज्यांतर्गत स्वयंशासन

**गोखल्यांना स्वदेश व स्वदेशबांधव याबद्दल अभिमान होता.** भारतीय लोक परसत्तेखाली आले याचा अर्थ ते असंस्कृत वा अर्धसंस्कृत होते असा नाही. धर्म, वाङ्मय व तत्त्वज्ञान तसेच कला आणि विज्ञान या सर्वच क्षेत्रांत हिंदुस्थानातील प्राचीन विद्वानांनी मोलाची कामगिरी केली आहे; आज परकीय राजवटीखाली हे राष्ट्र आहे म्हणजे त्याचे पौरुषच नष्ट झाले आहे, असे नाही; साम्राज्यातर्फे लढणाऱ्या फौजांमध्ये अनेक हिंदी जवान आघाडीवर आहेत. आपण स्वातंत्र्य गमावले असले तरी सुसंस्कृत लोक म्हणून जो सन्मान मिळावा तो गमावलेला नाही.

देशाला पूर्ण स्वराज्य मिळावे, अशी मागणी त्यांनी केलेली आढळत नाही. पुढे जहालांनी ती केली. गोखल्यांचे राजकीय साध्य मर्यादित होते. स्वयंशासन (सेल्फ गव्हर्नमेंट). देशाच्या दुरवस्थेवर त्यांना एकमेव मार्ग दिसतो. त्यांच्या मते स्वयंशासन म्हणजे हिंदी लोकांना प्रशासनाशी सहयोगी करुन घेउन क्रमशः या सहयोगाचे क्षेत्र विस्तारत न्यावे. साम्राज्यांतर्गत वसाहतीचे स्वराज्य या देशाला प्रदान करावे.

**स्वावलंबनाकडे जाण्यास शासनाशी सामोपचाराने वागण्याचे धोरण त्यांना मान्य होते.** कारण त्याखेरीज कायदा, सुव्यवस्था, स्थैर्य व शांतता टिकून राहणे अशक्य आहे हे ते ओळखून होते. त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा फक्त वर्तमानकाळ व निकटचा भविष्यकाळ एवढ्यापुरत्याच मर्यादित होत्या. **क्रमाक्रमाने घडत जाणाऱ्या घडामोडीपैकी जी लगतची असेल तिच्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करण्याचे त्यांचे धोरण होते.** केवळ काल्पनिक आदर्शात रमण्याची गोखल्यांची वृत्ती नव्हती. प्रश्न केवळ वैचारिकदृष्ट्या परिपूर्ण आदर्श उभा करण्याचा नाही तर प्रत्यक्ष पदरात काय पडू शकते याचा आहे. 'इंग्रजी राजवटीत या देशाच्या आधुनिकीकरणासाठी लागणारी प्रत्येक गोष्ट घडू शकते, त्या सत्तेला झुगारण्याची गरज नाही व झुगारणे इष्टही होणार नाही!'

**गोखल्यांच्या मते, इंग्रजी राजवट ही हिंदी लोकांना स्वयंशासनाचे धडे शिकण्याची सर्वोत्तम संधी आहे** हे लक्षात ठेवूनच आपल्या राजकीय वाटचालीचा आराखडा हिंदी नेत्यांनी आखावा असे त्यांचे मत होते. म्हणूनच जहालांची पूर्ण स्वराज्याची मागणी म्हणजे अशक्याचा व्यर्थ आणि भयावह पाठपुरावा आहे असे त्यांना स्वाभाविकच वाटत होते.

## ७.५ साधने : सनदशीर मार्ग

ज्या साधनांचा वापर केला असता राज्यकर्ते दुरावतील अशी साधने वापरण्याला गोखले प्रतिकूल होते. राज्यकर्त्यांना आवाहन करणे, त्यांच्याकडे तक्रारी, गाऱ्हाणी, अपेक्षा व प्रसंगी निषेधही पाठविणे व त्यांचे मन आपल्याला अनुकूल करुन घेण्याचा प्रयत्न करणे हा गोखल्यांना सोयीचा व सनदशीर मार्ग वाटतो.

अर्थात राज्यकर्त्यांना प्रतिकार करुच नये असा मात्र याचा अर्थ नव्हे. प्रसंगी सडेतोडपणे बोलणे हे व्यक्तीचे कर्तव्य असून जुलमी व अन्यायी कायद्यांना प्रतिकार करणे हे नैतिकदृष्ट्या समर्थनीय आहे असे गोखले मानतात. अशा कायद्यांचे पालन करण्याचे नाकारुन त्यासाठी असेल ती शिक्षा पत्कारावी असे ते म्हणतात. अर्थात जहालांचे मार्ग त्यांना पसंत नाहीत. हिंसाचाराच्या कोणत्याही प्रयत्नाचे पर्यवसान परस्परद्वेष, सूडाची भावना व विपत्ती यांत झाल्यावाचून राहत नाही. 'सार्वजनिक जीवन अशा अविचारी पद्धतींचा अवलंब करुन दूषित करणे गोखल्यांना मान्य नाही. कारण त्यातून फक्त दडपशाही आणि शास्ते - शासितांचे तणावपूर्ण, संबंध हेच फलित नेहमीकरिता निष्पन्न होईल, हे त्यांना ठाऊक होते.' लोकांची लायकी वाढविण्यासाठी व त्यांना त्या प्रमाणात हक्क मिळवून देण्यासाठी प्रचलित **राज्यपद्धतीत शांततापूर्वक व क्रमशः बदल घडवून आणणारा सनदशीर मार्गच** त्यांना सर्वात श्रेयस्कर वाटला व तोच त्यांनी अखेरपावेतो अनुसरला.

**सनदशीर चळवळ :** सनदशीर चळवळीची व्याख्या गोखले पुढीलप्रमाणे करतात. 'संघटित अधिसत्तेकडून अपेक्षित असे बदल करवून घेण्यासाठी आपल्या कायदेशीर हक्कांत बसणाऱ्या पद्धतींचा अवलंब करणे म्हणजे सनदशीर चळवळ होय.' सनदशीर चळवळीची ही व्याख्या मान्य केल्यास तिचे क्षेत्र अत्यंत विस्तृत होते. पण दोन अटी पाळल्या जाणे मात्र आवश्यक आहे. एक ही की वापरात आणल्या जाणाऱ्या पद्धती त्यांच्या कायदेशीर हक्कात बसणाऱ्या असल्या पाहिजेत; आणि दुसरी अट म्हणजे, घडून येणारे बदल हे लोकमताने प्रभावित झालेल्या संघटित अधिसत्तेकरवी (कॉन्स्टिट्युटेड अथॉरिटी) घडून यावेत.

**गोखल्यांना अभिप्रेत असलेल्या या पद्धतीत शारीरिक बळाच्या वापराला स्थान नाही.** घटनात्मकतेच्या दोन बाजू गोखल्यांच्या विवेचनातून पुढे येतात - एक सकारात्मक व दुसरी नकारात्मक! घटनात्मकतेच्या सकारात्मक बाजूने तीत प्रार्थना, विनवण्या, आवाहने, मागण्या, वाटाघाटी, निर्भय पण रचनात्मक टीका आणि याचबरोबर कोणतीही शांततामय पद्धती समाविष्ट केली जाऊ शकते. घटनात्मकतेची नकारात्मक बाजू म्हणजे शारीरिक बळाचा वापर, बंड, उठाव, परकीय आक्रमणास मदत वा प्रोत्साहन, गुन्हेगारी वा हिंसाचाराचा अवलंब यांना कधीच जागा मिळू शकत नाही. तत्कालीन परिस्थितीत या घटनात्मकतेच्या मार्गाखेरीज अन्य

मार्ग यशस्वी होऊच शकत नाही. हिंदुस्थानच्या मुक्तीचा मार्ग फक्त घटनात्मक उपायांनीच खुला होऊ शकतो. 'उदारमतवादी आदर्शाचा वा घटनात्मक उपायांचा त्याग करणे म्हणजे अवास्तव विचारसरणीचा आविष्कार ठरेल अशी गोखल्यांची पक्की धारणा होती.'

**स्वदेशी व बहिष्कार :** स्वदेशीची चळवळ गोखल्यांना मान्य होती. ते म्हणतात, खऱ्या स्वदेशीला दोन बाजू आहेत - एक आहे शुद्ध देशभक्तीची आणि दुसरी आहे व्यावहारिक - आर्थिक स्वरुपाची. स्वदेशीत देशभक्तीचा अंतर्भाव होतो. देशभक्ती ही अशी एक विलक्षण उत्कट व गाढ श्रद्धा आहे की, जिच्या उच्चाराने अंतर्भाव होतो. देशभक्ती ही अशी एक विलक्षण उत्कट व गाढ श्रद्धा आहे की, जिच्या उच्चाराने चित्त हेलावते, जिचा स्पर्श आत्म्याला नवे रुप धारण करायला लावतो.

स्वदेशी वस्तूंचा उपयोग हा 'स्वदेशी' चा दुसरा भाग अर्थशास्त्राचा आहे. त्यासाठी समंजसपणा, स्वार्थत्याग, सहकार हे गुण अंगी असले पाहिजेत. स्वदेशीचे व्रत ज्यांनी पत्करले असेल त्यांना आपण अतिशय उच्च दर्जाचे देशकार्य करीत आहोत याची जाणीव हवी. स्वदेशी मालाच्या उत्पादनासाठी भांडवल, साहस व कौशल्यही हवेच. हिंदुस्थानात भांडवलाचा तुटवडा आहे, या आर्थिकदृष्ट्या अतिमहत्त्वाच्या प्रश्नाकडे गोखल्यांनी लक्ष वेधले होते. एवढेच नव्हे तर त्या प्रश्नांचे त्यांनी अत्यंत साधार, आकडेवारीनिशी विवेचनही समोर मांडले होते.

**बहिष्कार :** टिळकांना बहिष्कार ही स्वदेशीचीच दुसरी बाजू वाटते, तर गोखले त्या दोहोंचा स्वतंत्रपणे विचार करुन स्वदेशीचा स्वीकार करतात व बहिष्कार नाकारतात. त्यांच्या मते, बहिष्काराचा मार्ग केवळ अनिष्टच नाही तर धोक्याचाही आहे.

सार्वत्रिक व राजकीय बहिष्काराला तर गोखल्यांचा कसून विरोध होता. असा बहिष्कार अव्यवहार्य तर आहेच, तो शक्य वाटणेही मूर्खपणाचे लक्षण आहे, असे गोखल्यांचे मत होते. शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या खाजगी शाळा व महाविद्याल उभी राहीपर्यंत, राष्ट्रीय शिक्षणाच्या नावाखाली सरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालणे त्यांच्या मते वेडेपणाचे ठरेल. सरकारी नोकरीवर बहिष्कार घालण्याचे एकीकडून ते स्वागत करतात; कारण कधी तरी सरकारी नोकऱ्यांप्रीत्यर्थ होणारी धडपड थांबावी व स्वतंत्र क्षेत्रात तरुणांनी उमेदीने पदार्पण करुन देशसेवेचे विविध मार्ग चोखाळावे असे त्यांचे मत होते.

## ७.६ धर्मनिरपेक्ष, आधुनिक राज्याची संकल्पना

**१) राष्ट्रउभारणी महत्त्वाची :-** आधुनिक राज्याच्या उभारणीसंबंधी गोखल्यांनी बराच विचार केलेला दिसतो. आपसांतील लहानसहान भेद विसरुन, हिंदुस्थानाच्या सेवेसाठी संघटितपणे उभे राहणाऱ्यांचे राष्ट्र येथे निर्माण व्हावे, असा त्यांचा प्रयत्न होता. 'आपण प्रथम हिंदी असून हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती वगैरे भेद नंतर' अशा भावनेतूनच हिंदसेवक समाजाचे कार्य चालावे अशी त्यांची अपेक्षा होती. क्षुल्लक कारणांसाठी आपसात झगडणाऱ्या संकुचित गटांना सामाजिक जीवनात वाव मिळू नये. राष्ट्रउभारणीच्या दृष्टीने तीन तातडीच्या कार्याची आवश्यकता आहे, ती कार्ये म्हणजे, हिंदु - मुस्लिम ऐक्य व हिंदूमधील अंतर्गत दुहीचा अंत; बलवत्तर व उच्चत्तर चारित्र्य - संवर्धन, तसेच दृढ उद्दिष्टे व ती प्राप्त करुन घेण्यासाठी

शिस्तबद्ध कृती; आणि राष्ट्रीयतेची भावना प्रखर करुन जाती - पंथाच्या भावना त्यात विसर्जित करणे, असे गोखल्यांना वाटते.

**२) लोकशाहीशासन :-** आधुनिकीकरणाच्या दृष्टीने गोखल्यांच्या मते पहिली आवश्यक गोष्ट जर कुठली असेल तर ती म्हणजे लोकांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणणे ही होय. त्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अमाप आहे हे त्यांनी ओळखले होते. भारताला जर लोकशाही शासनप्रकाराने वाटचाल करायची असेल तर प्रथम लोकशाही समाजाची निर्मिती प्रथम येथे झाली पाहिजे, इथले राजकारण धर्मनिरपेक्ष झाले पाहिजे आणि येथील सार्वजनिक जीवनाचे आध्यात्मीकरण झाले पाहिजे, असे गोखले म्हणतात. अशा प्रयत्नांखेरीज स्वयंशासन निर्माण होऊच शकत नाही असे त्यांना वाटते. केवळ मागणी करुन कुणालाच कधी स्वातंत्र्य मिळाले नाही, सर्वत्र ते मोठ्या लढ्यातूनच पदरात पडले आहे स्वातंत्र्यलढा नेहमीच रचनात्मक असावा लागतो. 'टिळकांची दृष्टी आपल्या देशाच्या गतकालीन संस्कृती व प्रकृती याकडे अधिक असल्याने गणेशोत्सव आणि शिवाजी उत्सव अशा चळवळींचा त्यांनी उत्साहाने पुढाकार घेतला. गोपाळरावांनी तिकडे कधीच लक्ष दिले नाही. मग त्यामध्ये भाग घेण्याची कल्पनाच करायला नको.. गोपाळरावांनी रुढ धर्माचाराच्या प्रतिष्ठेला वयाच्या पंचविशीपूर्वीच जे एकदा झुगारले ते कायमचेच. टिळक आपल्या जातीला विसरले नव्हते. गोपाळरावांनी आपण हिंदी आहो; हिंदूसुद्धा नाही येथवर आपल्या राष्ट्रीय भावनेची मजल नेऊन ठेवली होती.' टिळकांना हिंदु समाजाचे सामर्थ्य त्याच्या धर्मात व परंपरामध्ये जाणवले आणि त्यांनी राजकीय संघटनासाठी धार्मिक परिभाषेत आवाहन करण्याच्या उपाय स्वीकारला, तर गोखल्यांनी केलेले आवाहन बुद्धीला पटणाऱ्या आणि विवेक जागा करणाऱ्या तर्काच्या माध्यमातून होते. हिंदु - मुस्लिम समस्या सोडविण्यासाठीही उच्च शिक्षणातून अंगी येणाऱ्या उदारमतवादावर व आधुनिकीकरणावरच ते आपली मुख्य भिस्त ठेवतात.

भारताला राष्ट्र म्हणून जर काही भवितव्य हवे असेल तर सहकार्याची टिकाऊ स्वरुपाची भावना या दोन महान जमातींत प्रथम निर्माण होणे आवश्यक आहे. काही चकमकी ह्या उडत राहणारच. पण ज्या शब्दांमुळे व कृत्यामुळे कटुत्व निर्माण होईल वा टिकेल असे शब्द व कृत्ये टाळण्याचा प्रयत्न उभयतांच्या नेत्यांनी केला पाहिजे. या संदर्भात गोखल्यांच्या मते हिंदूंची जबाबदारी मोठी आहे. कारण अधिक शिक्षणप्रसारामुळे आणि त्यामधून राष्ट्रीय भावना जोपसण्याचे महत्त्व त्यांना मुसलमानापेक्षा अधिक कळल्यामुळे दोहोंमधील संबंध सुधारण्याच्या दृष्टीने हिंदूपैकी काहींनी मुसलमानात जाऊन शिक्षणाचे व अन्य महत्त्वाचे कार्य करायला पाहिजे. अशा कार्याचे चीज झाल्यावाचून राहणार नाही. आणि त्यातूनच हिंदु - मुस्लिमांत परस्परांबद्दल विश्वासाची, सदिच्छेची व सहकार्याची भावना बळावत जाऊन त्यांच्यातील अविश्वास, संशय व तुटकपणा नाहीसा होण्यास हे प्रयत्न अवश्य साधनीभूत होतील, असा विश्वास गोखल्यांना वाटतो.

**वांशिक भेदभाव :** मग तो भारतात असो की दक्षिण आफ्रिकेत असो - किंवा संकुचित पंथवाद व जमातवाद यांचा सारखाच धिक्कार गोखले करीत असल्यामुळे त्यांच्या मनात, कोणत्याही नकारात्मक, अमानुष आणि अविचारी संकुचितपणाला थारा देणाऱ्या व्यक्तींबद्दल वा संस्थांबद्दल मुळीच आदर नव्हता.

## ७.७ सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण

गोखले 'शुद्ध धार्मिक वृत्ती' असे जिला संबोधतात ती विशिष्ट धर्मनिष्ठेहून निराळी अशी भावना आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. 'हल्ली कठीण अवनतीच्या काळात शुद्ध धार्मिक वृत्ती कुठेच दिसत नाही. ऋषी, मुनी, साधू इत्यादी नावांनी जे स्वतःला मिरवतात त्यांच्यातसुद्धा अशी वृत्ती फार क्वचितच पाहायला सापडते', ही गोखल्यांची खंत आहे. त्यांचे जीवन खऱ्याखुऱ्या धार्मिक वृत्तीने ओतप्रोत भरलेले होते. गोखलेंच्या मते कालानुसार अध्यात्माचा मार्ग भिन्न असतो. आपली राजकीय स्थिती आजच्या आपल्या अधोगतीची धोतक आहे. आपली राजकीय स्थिती सुधारली की अधःपतनातून आपले डोके वर निघेल ही समजूत लोकप्रिय आहे. ती अर्धवट खरी आहे. राजकीय स्थिती सुधारल्याखेरीज आपला उद्धार होणार नाही. पण ज्या उपायांनी राजकीय स्थिती सुधारेल त्या उपायांवर आपली प्रगती अवलंबून राहील. उपाय जर शुद्ध नसतील तर प्रगतीच्या उलट स्थिती अनुभवास येण्याचा संभव आहे. अशा ठाम विश्वासातून सार्वजनिक कार्यास गोखलेंनी हात घातला होता. देशाचे मुक्ति - आंदोलन धार्मिक - आध्यात्मिक म्हणजेच निःस्वार्थ राहिल्याखेरीज 'मोक्ष' मिळणे शक्य नाही, हे तत्त्व हिंदसेवक समाजाच्या रुपाने गोखल्यांनी राष्ट्रापुढे ठेवले होते. 'राजकीय संन्यासी' निर्माण करणे हा त्या समाजाचा हेतू होता. 'आजच्या काळात राजकीय संन्यासीच आपले ध्येय सफल करुन आपला संन्यास हे देशाचे भूषण बनवतील. बाकीचे संन्यासी बहुधा आपल्या भगव्या वस्त्राची प्रतिष्ठा घालविणारे ठरतील. म्हणजेच ज्याला खरोखरीच्या धर्मनिष्ठेने आयुष्य घालववयाचे असेल त्याने लोकसेवा हे आपले आमरण इतिकर्तव्य मानून राहिले पाहिजे. राजकारणाच्या अध्यात्मीकरणाचा त्यांना अभिप्रेत असलेला हा अर्थ होता. देशोन्नतीचा उद्योग हाच त्यांचा परमार्थ अथवा मोक्षमार्ग होता.

भारताच्या समाजात गुंतागुंत आहे. या गुंतागुंतीतून सुटण्याचा उपाय गोखल्यांच्या मते एकच असुन तो म्हणजे आपण कोणत्याही एका धर्माचे नाही; एका देशाच आहो, या तत्त्वाच्या मनोभावे स्वीकार करणे. आपल्या सार्वजनिक वा राजकीय जीवनाचे अध्यात्मीकरण करण्यासंबंधी गोखल्यांनी मांडलेले प्रमेय हे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे. धर्मभक्त ज्या तळमळीने होमहवन, उपासना, व्रतकैवल्ये, यमनियम, नित्यनेम इत्यादी आचरतात, त्याच भक्तीने व तळमळीने लोकसेवेची कामेही केली जावीत असा त्या प्रमेयाचा अर्थ आहे. अध्यात्माला जसा द्वैतभाव, दुजेपणा, आपपरभाव नको असतो, तसा द्वैत भाव सामाजिक संबंधातही नसावा असे गोखल्यांना सुचवायचे आहे. स्वतः त्यांनी आपले सारे आयुष्य अशा लोकसेवेच्या राजकीय अध्यात्माचरणात वेचले होते.

## ७.८ मूल्यमापन

**१) योगदान :- विचारसरणीच्या दृष्टीने** पाहता गोखल्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून उदारमतवादी कार्यक्रमाला आकार दिला. त्यांनी काँग्रेसला विशिष्ट दिशा दिली, दृष्टी दिली आणि अनेक संघर्षामधून सुखरुप पार केले. मानवी सदसद्विवेकबुद्धीला त्यांनी आवाहन केले आहे. कोणत्याही प्रश्नाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण मानवी प्रतिष्ठेविषयीच्या सन्मानातून व मानवी सुप्त शक्तींच्या सामर्थ्याविषयी ठाम विश्वासातून निष्पन्न झालेला होता. गोखले हे तत्कालीन हिंदुस्थानात सदसद्विवेक होऊनच जगले आणि कार्य करीत राहिले. लोकसेवेच्या आव्हानानेच

त्यांच्या ठिकाणी भारताच्या राजकीय मुक्तीसाठी, सामाजिक - आर्थिक पुनरुज्जीवनासाठी, घटनात्मक विकासासाठी व राष्ट्रीय अभ्युदयासाठी आत्मार्पण करण्याची प्रेरणा व क्षमता निर्माण केली होती. तिला आध्यात्मिक प्रखरतेचा उजाळा देऊन त्यांनी उदारमतवादाच्या स्वरुपात आविष्कृत केले होते.

**२) गोखले मानवतावादी होते.** युरोपीय श्रेष्ठत्वावर व वर्चस्वावर त्यांचा विश्वास नव्हता. त्या वंशातील लोकांना विशेष सवलती व संरक्षण देणे हे साम्राज्यवादाचे व राजकीय स्वार्थाचेच दुसरे रुप आहे. अशाच ठाम धारणेतून दक्षिण आफ्रिकेतील हिंदी नागरिकांच्या हक्कांच्या संरक्षणार्थ गोखले धावून गेले होते. दक्षिण आफ्रिकेतील कार्यामागील त्यांची कळकळ व वृत्ती पाहूनच गांधींनी त्यांना आपले राजकीय गुरु मानले होते. साधनशुचितेचा आग्रह व सार्वजनिक जीवन अध्यात्मनिष्ठ करण्याची तळमळ या दोन तत्त्वांबद्दल गांधींनी हे शिष्यत्व निभावल्याचेही दिसून येते. ३) गोखल्यांच्या उदारमतवादाने त्यांना संघटक व राष्ट्रउभारणीचा प्रवर्तक म्हणून समोर आणले. त्यांनी **उदारमतवादाची प्रक्रिया गतिमान केली** व घटनात्मक हालचालींना नवी दिशा दिली. उदारमतवादी तत्त्वांच्या व्यवहार्यतेची व साध्यतेची शिकवण त्यांनी दिली.

## ७.९ प्रश्न

१) गोखलेंचे शासन व प्रशासन विचार उदारमतवादाकडे झुकणारे होते स्पष्ट करा.

२) गो. कृ. गोखले उदारमतवादाचे प्रवर्तक होते विवेचन करा.

३) गोखले ची धर्मनिरपेक्षची व सार्वजनिक आध्यात्मिकरणाची कल्पना याविषयी मुल्यमापन करा.

४) गोखल्यांच्या उदारमतवादाने उदारमतवादाची प्रक्रिया गतिमान केली विवेचन करा.

❖❖❖❖

# ८

# बाळ गंगाधर टिळक - जहाल राष्ट्रवाद

**घटक रचना :**

८.१ प्रस्तावना
८.२ लोकमान्य टिळकांचे कार्य
८.३ राजकीय विचार
 ८.३.१ समाजसुधारणा विषयी टिळकांचे विचार
 ८.३.२ ब्रिटिश राजवटीविषयी टिळकांचे विचार
 ८.३.३ टिळकांची स्वराज्य कल्पना
 ८.३.४ टिळकांच्या आंदोलनाची चतू:सुत्री
 ८. ३.५ टिळकांचा राष्ट्रवाद
८.४ मूल्यमापन
८.५ प्रश्न

## ८.१ प्रस्तावना

महाराष्ट्रातील दापोली तालुक्यात चिखलगाव नामक गावी २३ जुलै १८५६ रोजी बाळ गंगाधर टिळक जन्मले. अतिशय शिस्तीत धार्मिक व सांस्कृतिक वातावरणात ते मोठे झाले.

पुण्याला त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. १८७६ साली त्यांनी डेक्कन कॉलेजात प्रवेश घेतला. बी.ए. नंतर त्यांनी एल.एल.बी केले. कोणत्याही विषयाच्या मुळाचा वेध घेण्याची ओढ असल्यामुळे वाचनाचा दांडगा व्यासंग त्यांनी या वयात केला. संस्कृत आणि गणितावर त्यांचे विशेष प्रेम होते. विद्यार्थिदशेतच त्यांचा आगरकरांशी स्नेह जडला. आपल्या ध्येयाची पायाभरणी त्यांनी परस्परसहकार्याने केली. लोकसेवेची ऊर्मी हा त्या दोघांना जोडणारा सेतू होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर नवी शाळा काढणार असल्याचे ऐकताच त्यांनी चिपळूणकरांकडे धाव घेतली.

१ जानेवारी १८८० रोजी 'न्यू इंग्लिश स्कूल' सुरु झाली. जनतेने तिला उत्तम प्रतिसाद दिला. टिळक आगरकरांसारखे निःस्वार्थी, ध्येयवादी प्रवर्तक पाठीशी असल्यामुळे ती वाढतच गेली. टिळक मेघदूत आणि गणित हे विषय शिकवीत असत. चिपळूणकरांच्या निधनानंतर संस्थेला अधिक नियमबद्ध व स्थायी स्वरुप देण्याच्या हेतूने डेक्कन एज्युकेशन

सोसायटी स्थापन करण्यात आली. नंतर दोन महिन्यात फर्ग्युसन कॉलेजने मूर्त स्वरुप धारण केले.

शाळा कॉलेजातील मुलांवर संस्कार करीत असतानाच या संस्थांच्या बाहेर असणाऱ्या लक्षावधी देशबांधवांना सुशिक्षित करणेसुद्धा तितकेच निकडीचे आहे हे जाणून, त्यासाठी 'केसरी' आणि 'मराठा' ही मराठी व इंग्रजी नियतकालिके सुरु करण्यात आली.

## ८.२ लोकमान्य टिळकांचे कार्य

'केसरी' ने लोकशिक्षणाच्या हेतूने राजकारण, समाजकारण व अर्थकारण या विविध विषयांवर लेख वाचकांसमोर सदैव ठेवले. ज्या अवगुणांनी या देशाची स्थिती हलाखीची झाली होती त्यांच्यावर कोरडे ओढले. 'लोकांत स्वाभिमान, निष्काम लोकसेवा, स्वावलंबन इत्यादी गुण' वाढीस लागण्याकरिता लेखणी झिजवली. इंडियन नॅशनल कॉंग्रेसमध्ये १८८९ सालापासून ते कार्य करीत होते.

टिळक - आगरकर यांच्यात सामाजिक सुधारणेसंबंधी पूर्वापार मतभेद होते. कायद्याने सुधारणा व्हावी की होऊ नये असा प्रश्न जेव्हा उभा राहिला तेव्हा त्या मतभेदांना विशेषच तीव्रता आली. मलबारी शेटची पत्रके, दादाजी विरुद्ध रखमा हा खटला या प्रकरणांनी मराठी समाजात वादळे निर्माण केली. लोकांमध्ये दोन तट पडून तणाव वाढला. या तटांचे व तणावांचे प्रतिबिंब डेक्कन एज्युकेशन सोसायटीतही पडले. याचे पर्यावसन टिळकांनी संस्था सोडण्यात झाले.

सनातनी व सुधारक यांच्यातील वाद दीर्घकाळ गाजत होता. टिळकांचा सुधारणांना विरोध नव्हता. त्यांनी किमान विवाह वय, विधवा - पुनर्विवाह, बाला - जरठ विवाहबंदी, मद्यबंदी, इत्यादी सामाजिक सुधारणांचा आपल्या लेखनातून पुरस्कारच केलेला दिसून येतो. तथापि राजकीय सुधारणा अधिक अगत्याच्या असून सामाजिक सुधारणानंतर आपोआप घडून येतील अशी त्यांची धारणा होती. वृत्तपत्रांना महत्त्वाचे राजकीय कार्य आहे त्यांनी आपल्या शक्ती धार्मिक व सामाजिक प्रश्नांवर व्यर्थ दवडू नयेत असे त्यांचे सांगणे होते, राजकीय सुधारणेपासूनच कोणत्याही सुधारणेचा प्रारंभ होऊ शकतो; कारण ती सुधारणाच ऐक्य घडवून आणू शकते. इतर सुधारणा या ऐक्याला मारक ठरु शकतात.

हिंदूचे बहुसंख्य सण घरगुती असल्यामुळे गणपती - उत्सवाइतका सार्वजनिक फायदा त्यांच्याद्वारे होऊ शकत नाही. वर्षातून दहा दिवसच का होईना पण एका प्रांतातील सर्व हिन्दू एकाच उपास्यदेवतेच्या उपासनेत गढून जाणे हे 'भावी अभ्युदयाचा पाया घातल्यासारखे' आहे, असे टिळकांना वाटत असे. शिवजयती उत्स्वालाही टिळकांनी पाठिंबा दिला. ज्या शूर पुरुषांनी देशाचे नाव इतिहासात अजरामर केले त्यांच्या विषयी कृतज्ञताबुद्धी व्यक्त करणे ही यामागील एक भावना असली तरी त्यापेक्षा महत्त्वाचा एक हेतू होता तो असा की, 'राष्ट्रातील महापुरुषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राहण्यास एक चांगले साधन आहे.'

१८९५ मध्ये टिळकांनी शिवसमाधीच्या जीर्णोद्धाराकरिता चळवळ सुरु केली. शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव घडवून आणला. 'महाराष्ट्रातील निरनिराळ्या जातींचे प्रेम एकाच

ठिकाणी बसण्यासारखे जर कोणते स्थळ असेल तर ते शिवछत्रपतींचे चरित्र हेच होय' असा विचार त्यांनी केसरीतून मांडला.

प्लेग - निवारणार्थ सरकारने नेमलेल्या समितीच्या अध्यक्षपदी रँड नावाचे अधिकारी होते. त्यांच्या हाताखालील सोजिरांनी अविवेकाची परिसीमा गाठली. टिळकांनी रँडशाहीचे नागडे, बीभत्स स्वरुप केसरीतून उघड केले. त्याच वेळी सरकारी जुलमाचा उग्र प्रतिकार करण्याच्या दृष्टीने हिंदू प्लेग हॉस्पिटल, दुष्काळनिवारण समिती असे सकारात्मक प्रयत्नही त्यांनी केले. रँडशाहीच्या जुलुमाचे पर्यवसान रँडच्या खुनात झाले. या खुनाशी टिळकांचा संबंध जोडण्यासाठी सरकारी यंत्रणेने आकाश पाताळ एक केले. परंतु शासनाच्या प्रयत्नांना यश येऊ शकले नाही. तेव्हा शासनाने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप लावला. टिळकांना दीड वर्षाची सक्तमजुरी झाली.

१८८५ ते १९०५ सालपर्यंत इंडियन नॅशनल काँग्रेस मवाळ गटाच्या नेतृत्वाखाली काम करीत होती. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी घटनात्मक मार्गाचा अवलंब केला होता. उदा. चर्चा, वाटाघाटी, टप्प्याटप्याने स्वातंत्र्य इत्यादी. ब्रिटिशाच्या न्यायबुद्धीवर त्यांचा विश्वास होता. १९०५ नंतर टिळकांच्या नेतृत्वाखाली असलेल्या काँग्रेसने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जहाल मार्गाचा (Radical) अवलंब करण्यास सुरुवात केली होती.

'१९०५ ते १९०८ हा कालावधी हिंदुस्थानच्या इतिहासातील फार महत्त्वाचा टप्पा मानला पाहिजे. या अवधीतील टिळकांची सारी राजकीय कारकीर्द रोमांचकारी घटनांनी भरलेली दिसेल. या चार वर्षात त्यांच्या कीर्तीने प्रांतीय मर्यादा ओलांडून उभ्या देशाचे कानेकोपरे व्यापले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने आता मूर्तिमंत राष्ट्रीय चळवळीचे रुप घेतले होते. येथपासून पुढे टिळक तुरुंगात असोत वा बाहेर असोत त्यांनी उभा देश चैतन्यमय करुन सोडला. राष्ट्रीय वृत्तीला पोषक अशी एकसारखी चेतना त्यांच्याकडून जनतेला मिळत राहिली.'

स्वदेशी - बहिष्काराची चळवळ देशव्यापक झाली होती. या संदर्भातील टिळकांचे कार्य आभाळाएवढे होते. राजकीय अस्त्रे म्हणून स्वदेशी व बहिष्कार या साधनांना धार आणण्याचे कार्य टिळकांनी केले.

मुझफरपूरला बाँबफेक झाल्यावर 'देशाचे दुर्दैव', 'दुहेरी इशारा', 'बाँबागोळ्याचा खरा अर्थ', 'बाँबगोळाचे रहस्य' अशा मथळ्यांचे लेख केसरीतून आले. टिळकांच्या लोकप्रियतेची भीती वाटून सरकारने त्यांना पकडले. त्यांच्या निवासस्थानाची झडती घेता सरकारला तिथे स्फोटक द्रव्याविषयीच्या दोन पुस्तकांची नावे व प्रकाशकाचा पत्ता लिहिलेले कार्ड आढळले. टिळकांना अटक झाली. राजद्रोहाचा खटला त्यांच्यावर चालविण्यात आला, राजद्रोहाच्या या दुसऱ्या खटल्यात टिळकांना सहा वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली. मंडालेच्या एकान्तवासात गीतारहस्यासारखा अद्वितीय ग्रंथ लिहून मंडालेच्या तुरुंगाला त्यांनी कारातीर्थ करुन सोडले.

१९१४ हे जागतिक महायुद्धाचे वर्ष! या वर्षी टिळक सुटून बाहेर आले. मध्यंतरी सगळेच जहाल बंदिवासात होते वा दमनामुळे निष्चेष्ट झाले होते. टिळकांनी पुन्हा त्यांचे चैतन्य जागवले. युद्धकाल ही लष्करी शिक्षणाची नामी संधी समजून हिंदी तरुणांनी लष्करात भरती होऊन युद्धक्षेत्रात जावे असे आवाहन टिळकांनी केले. ॲनी बेझंट यांच्या सहकार्याने राष्ट्रीय सभेतील दुफळी मोडून काढण्याचेही प्रयत्न त्यांनी सुरु केले. गोखले व मेथा असेपर्यंत काँग्रेसवर

नेमस्तांचेच वर्चस्व होते. १९१६ च्या लखनौ अधिवेशनास टिळक आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित होते. हे अधिवेशन हिंदु - मुस्लिम समझौता, काँग्रेसमधील दुहीची समाप्ती, काँग्रेस लीग युती - अशा विविध कारणांनी गाजले. या सर्वातच टिळकांचा वाटा मोठा होता.

टिळकांच्या राजकीय जीवनातील एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख या टप्प्यावर आवश्यक ठरतो. ती म्हणजे होमरुलची चळवळ. आयर्लंडच्या धर्तीवर होमरुल चळवळ उभारण्याची घोषणा टिळकांनी १ मे १९१६ रोजी बेळगावच्या प्रांतिक परिषदेत केली. स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क असल्याची कल्पना या चळवळीने लोकांच्या गळी उतरवली.

## ८.३ राजकीय विचार

जहाल राष्ट्रवादी परंपरेचा राजकीय विचार लोकमान्य टिळकांच्या विपुल, आग्रही व ओजस्वी लिखाणातून आला आहे. १) आधी कोण- सामाजिक की राजकीय? २) ब्रिटिश राज्यपद्धती भारताला शाप. ३) स्वराज्य - संकल्पना, ४) आंदोलनाची चतुःसूत्री ५) सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि जहाल राष्ट्रवाद

### ८.३.१ आधी कोण - राजकीय की सामाजिक सुधारणा याबाबत टिळकांची भूमिका :

महाराष्ट्राच्या वैचारिक इतिहासात - वरील प्रश्नाला मध्यवर्ती महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. 'आधी - राजकीय' वादी (राष्ट्रवादी) आणि 'आधी सामाजिक' - (वादी सुधारक) यांच्यातील हा वाद होता. आधी सामाजिकवाद्यांची भूमिका थोडक्यात अशी होती की, सामाजिक सुधारणेस पूर्वी कधीच नव्हती इतकी अनुकूल स्थिती प्राप्त झाली आहे, राजकीय विषय सामाजिक व धार्मिक विषयांपासून वेगळे काढलेच जाऊ शकत नाहीत. राष्ट्रीय सभा ज्या विद्येचे व प्रबोधनाचे फळ आहे त्याच विद्याप्रबोधनातून सामाजिक परिषदही अस्तित्वात आली आहे. सामाजिक परिवर्तनाखेरिज राजकीय बदल साध्य होणारच नाही आणि झाला तरी तो धोक्याचा ठरेल, आमची गृहस्थिती आधी सुधारुन राजकीय हक्कासाठी आवश्यक असलेली पात्रता सामाजिक सुधारणेद्वारे आम्ही अंगी बाणवली तरच आम्ही राजकीय हक्कांची मागणी करु शकू, वगैरे. आगरकर - रानडे - गोखलेंच्या विचारातून ही बाजू व्यक्त झाली होती. कायदा यशस्वी होण्यासाठी अनुकूल लोकमताची आवश्यकता असते ही ही जाणीव त्यांना होती, मात्र सुधारणेसाठी परकीय शासनाने कायदा करण्यात त्यांना काहीच गैर वा आक्षेपार्ह वाटत नव्हते.

टिळकांची भूमिका याहून अगदीच निराळी होती. सामाजिक दूषणांची व उणीवांची त्यांना पुरेपूर जाणीव होती. त्या दूर व्हाव्यात असेही त्यांना मनापासून वाटत होते. त्यांच्या मते १) सामाजिक सुधारणेचा अर्थ पाश्चात्त्यांचे अंधानुकरण असा होऊ नये. तत्कालीन समाजस्थितीला हिंदू धर्म कारणीभूत नसून धर्माचे विस्मरण कारणीभूत झाले आहे; २) सामाजिक सुधारणा ही जनपाठिंब्यातून व्हावी, केवळ बाहेरुन लादली जाता कामा नये. जनतेच्या पाठबळावर टिळकांचा विश्वास होता आणि ते बळ संघटित करणे हे त्यांच्या सर्वच प्रयत्नांचे साध्य होते. म्हणूनच केवळ समाज - दूषणांवर प्रहार करीत राहून सुधारणांचे आदर्श उभे करण्याचे प्रयत्न करणे त्यांना मान्य नव्हते. ३) सामाजिक बाबतीत सुधारणा करण्याचे त्यांचे मार्ग भिन्न होते व त्यांचे विचारही कित्येक प्रसंगी प्रगतीला विरोधक वाटतात. परंतु त्या सामाजिक विरोधाचा हेतू राजकीय झगड्यावर शक्ती केंद्रित करण्याचा होता. सरकारचे हात ज्यायोगे

बळकट होतील अशा कोणत्याच गोष्टीला पाठिंबा न देण्याचे धोरणच संमतीवयाच्या विरोधास कारणीभूत झाले होते. 'सरकार स्वधर्मी व स्वदेशी असता त्याचे हातात जे अधिकार असणे इष्ट असते ते सर्व अधिकार परधर्मी व परकीय सरकारने हाती घेणे योग्य व इष्ट नाही' असे त्यांचे मत होते. स्वतःच्या फायद्यासाठी या देशात आलेले राज्यकर्ते आमचे प्रश्न सोडविण्यास सहाय्यभूत ठरु शकतील हेच मुळी टिळकांना पटत नव्हते. ४) He was admirer of ancient culture and the values projected by the Hindu religion. बुद्धिवादाच्या आधारे धर्मनिरपेक्ष सुधारणेचा पुरस्कार करताना परंपरागत हिन्दु धर्मशास्त्र ग्रंथांवर आधारलेल्या अनेक धर्मकल्पनांचा मूर्खपणा सुधारक शाबीत करीत. टिळकांचे त्यावर उत्तर होते की सर्वच धर्माच्या ग्रंथामध्ये बुद्धीला न पटणाऱ्या अनेक कल्पना असतात. त्यामुळे केवळ हिन्दुधर्माला त्याबद्दल नावे ठेवणे परधार्जिणेपणाचे लक्षण ठरते. अशा टीकेमुळे लोक स्वत्व नि आत्मविश्वास गमावून बसतात व अधिकच नेभळे होतात. हिन्दुधर्मावरील श्रद्धा ढळली तर एवढ्या मोठ्या संख्येच्या हिन्दूंना एकत्र बांधणारा दुवाच नष्ट होऊन राष्ट्रदृष्ट्या ते दुर्बल व विस्कळीत होतील.

५) सध्याच्या आमच्या देशस्थितीत विद्वान लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा भाग राजकीय सुधारणेकडे लागला पाहिजे असे मत टिळकांनी मांडले आहे. सुधारणेबाबत बखेडा माजविण्याऐवजी आमच्यातील वेदान्ती लोकांनी निरनिराळ्या धर्मपंथांची ज्याप्रमाणे निरभिमानबुद्धीने एकवाक्यता करुन घेतली आहे, त्याचप्रमाणे 'सुधारकांनीही ती करुन घ्यावी असा सल्ला टिळकांनी दिला आहे. आपण हिन्दुस्थानातील सर्व लोक एका राष्ट्राचे घटक असून आपले सर्वांचे काहीतरी एक सामान्य हित आहे व त्या हितप्राप्तीकरिता आपण सर्वांनी सर्व भेद विसरुन जाऊन एक मनाने विचार व प्रयत्न करण्यास शिकले पाहिजे.' ही भावना बळावण्यातूनच पुढे एकराष्ट्रीयत्वाची कल्पना या देशात दृढतर होणार आहे असा टिळकांचा होरा होता. त्यामुळेच सामाजिक सुधारणेपेक्षा या राजकीय बाजूवर ते विशेष भर देतात. राजकीय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी जनसामान्यांचा पाठिंबा असलेल्या झुंजार राष्ट्रवादाची उभारणी टिळक करीत होते.

### ८.३.२ ब्रिटिश राजवटीविषयी टिळकांची मते - ब्रिटिश राजवट भारताला शाप आहेत.

ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढण्यासाठी टिळकांनी जहाल आणि आक्रमक मार्गाचा अवलंब केला.

ब्रिटिश वसाहतवादाचे परिणाम खालीलप्रमाणे झाले होते.

१) राजकीय पारतंत्र्य आणि गुलामगिरी
२) आर्थिक शोषण
३) सांस्कृतिक वर्चस्व
४) पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव

लोकमान्य टिळकांनी या सर्व परिणामांची सविस्तर चर्चा करुन राष्ट्राचे चैतन्य जागे केले आणि स्वराज्य मिळविणे याला प्राधान्य दिले.

परकीय राज्यकर्त्यांच्या अंमलाखाली व्यक्तिस्वातंत्र्याची मुस्कटदाबी होत असून उत्साह, साहस, गुणांची ज्या अधिकारपदासाठी गरज असते त्यांच्यावर फक्त परक्या व्यक्तीच बसतात आणि नेटिव्ह कामगार हे त्यांच्या हुकमतीखाली केवळ मानवी यंत्रे बनत आहेत. त्यांच्या गुणवत्तेचे व श्रमांचे चीज होत नाही. जे हुशार व तरतरीत असतात ते आपले स्वातंत्र्य गुंडाळून ठेवून हांजीहांजी करुन पदोन्नती पदरात पाडण्याचा लाचार प्रयत्न करताना आढळतात. अतिरेकी

सेवाधर्मामुळे नेटिव्ह अंमलदार आपला स्वाभिमान गमावून बसतात. मानसिकदृष्ट्या दुर्बल होतात. परराज्याखाली देशातील बुद्धिमान लोकही कसे नैतिकदृष्ट्या निकृष्टावस्थेत पोचतात हेही टिळकांनी स्पष्ट केले आहे.

शेतकी, जंगल, मीठ, अबकारी, कालवा, ठेवी, रजिस्ट्रेशन, शाळा, पोलिस, गावसफाई आदी सर्वच खात्यांनी रयतेला चहूबाजूंनी कसे भंडावून सोडले आहे हे टिळकांनी स्पष्ट केले. पूर्वी रयतेच्या हाती असणारे सर्व अधिकार सरकारी अधिकाऱ्यांनी धारण केल्यामुळे लोकांचे सर्व स्वातंत्र्य नाहीसे झाले आहे.

'इंग्रजी राज्यात शांतता असली तरी आमची स्थिती अगदी निकृष्ट आहे. दारिद्र्याचा आमच्यावर उत्तरोत्तर जास्त पगडा बसत चालला आहे आणि धैर्य, नीती, अभिमान, साहस वगैरे गुण आमच्यामधून नाहीसे होत चालले आहेत,' या गोष्टीची टिळकांना हळहळ वाटते. आर्थिकदृष्ट्या तर या देशाची अवनती होत आहेच; पण त्याहीपेक्षा दरिद्री होत चाललेल्या या देशाच्या स्थितीबद्दल राज्यकर्ते उदासीन आहेत ही टिळकांची मोठी तक्रार आहे. हा देश या दयनीय दशेत असताना राज्यकर्ते येथे ज्युबिलीचा उत्सव करतात, याचे त्यांना फार दुःख होते. त्यांच्या मते प्रजेचे जसे राज्यकर्त्यांबद्दल काही कर्तव्य असते, त्याचप्रमाणे राज्यकर्त्यांचेही प्रजेबद्दल असते. ते कर्तव्य बजावण्यात राज्यकर्ते चुकल्यामुळे आवश्यक ती प्रगती या देशात घडून येऊ शकली नाही.

एक ना एक दिवस गुलामगिरीतील राष्ट्राचे चैतन्य जागे होऊन स्वराज्याचा ध्यास लागतो. भारतात हेच होणार, स्वराज्य हा, अन्य कोणत्याही राष्ट्राप्रमाणेच भारताचाही जन्मसिद्ध हक्क आहे असे टिळकांनी ठणकावून सांगितले होते.

## ८.३.३ टिळकांची स्वराज्य स्थापना संकल्पना

'स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही' या विधानाचा आशय स्पष्ट करण्याच्या निमित्ताने टिळकांनी 'स्वराज्य' व 'सुराज्य' या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. टिळकांच्या मते स्वराज्य आपला धर्म आहे आणि **स्वराज्य मिळविणे, आपला कर्मयोग आहे.**

**१) 'स्वराज्य' संज्ञेचा शब्दशः अर्थ 'आपले राज्य' असा होतो.** 'आपले' ला अनेक अर्थ संभवतात. 'ज्यावेळी प्रजा आणि राजा दोन्हीही एकाच धर्मातले, देशातले, एकाच जातीचे आणि एकाच प्रकारचा हितसंबंध असणारे असतो राजा प्रजेच्या हिताबद्दल नेहमी तत्पर व दक्ष असतो तेव्हा प्रजेस आपल्यावरील राज्य स्वराज्यच (Self government) आहे असे वाटणे अगदी स्वाभाविकच आहे.' पण राजे लोक अधिकारमदाने अंध होऊन प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करु लागले किंवा जुलमी झाले त्याचे राज्य लोकांस नकोसे होते. **टिळकांच्या मते, 'स्वराज्य' शब्दाचे अर्थ दोन आहेत; एक सुव्यवस्थित राज्य आणि दुसरा, 'सुखकारक राज्य.'**

राज्य जेव्हा प्रजेच्या मताप्रमाणे चालत नाही, तेव्हाही त्याला स्वराज्य म्हणता येणार नाही. स्वराज्य हा शब्द सनदशीर राज्यपद्धतीसच लावणे रास्त ठरते. ज्या राज्यांचा कारभार प्रजेच्या तंत्राने चालतो तेच खरे स्वराज्य असते. ज्या राज्यात प्रजेच्या स्वातंत्र्यसुखाचा लोप होतो ते इतर दृष्टींनी कितीही शिस्तवार असले व निव्वळ स्वदेशी राजाचे असले तरी लोकांस

सुखकारक होऊ शकत नसल्यामुळे ते स्वराज्य होऊ शकत नाही; शिस्तवार असल्याच्याकारणाने फार तर त्याला 'सुराज्य' म्हणता येईल.

१९१४ साली मंडालेहून परतल्यानंतर टिळकांनी होमरुलची चळवळ चालवली. त्यावेळी त्यांची स्वराज्यसंकल्पना अधिकच स्पष्ट झाली. स्वराज्याची मागणी लोकप्रिय करणे, तिला जनपाठिंबा मिळवून देणे हाच मुळी या चळवळीचा हेतू होता. टिळकांनी स्वराज्याच्या मागणीला उच्चतर नैतिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले. स्वराज्य ही केवळ राजकीय गरज न राहता, ती एक नैतिकदृष्ट्या अगत्याची बाब आहे. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी असणाऱ्या दैवी अंशाच्या आविष्कारासाठी तिला आपल्या स्वधर्मानुसार वागण्याचे स्वातंत्र्य मिळणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे समाजातील व्यक्तींच्या स्वधर्माशी जुळणारी राजकीय व्यवस्था त्या त्या समाजात असणेही आवश्यक असते. अशा राजकीय व्यवस्थेचेच नाव स्वराज्य!

**२) दुसरे असे की, स्वराज्य हेच संपूर्ण सामाजिक विकासाचे व प्रगतीचे मूळ असते.** स्वराज्यावाचून औद्योगिक प्रगती, राष्ट्रीय शिक्षण, सामाजिक सुधारणा, व्यक्तिविकास या कोणत्याच गोष्टी घडून येण्याची शक्यता नसते, असेही प्रतिपादन टिळकांनी केले आहे. **३) टिळकांच्या स्वराज्यकल्पनेचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे प्रारंभी जरी ती अरविंद व पाल यांच्याप्रमाणे पूर्ण स्वराज्याची असली** तरी होमरुल चळवळ सुरु करताना ती नेमस्तांच्या साम्राज्यांतर्गत स्वतंत्रतेच्या मागणीच्या अधिक जवळ आली होती, असे दिसून येते.

### ८.३.४ टिळकांच्या आंदोलनाची चतुःसूत्री

टिळक पारतंत्र्याचे स्थूल चार प्रकार पाडतात. राजकीय, धार्मिक, औद्यागिक आणि सामाजिक. या सर्व प्रकारच्या पारतंत्र्यास मोडून काढण्यासाठी १) स्वदेशी २) बहिष्कार, ३) राष्ट्रीय शिक्षण ४) स्वराज्य या चार साधनांचा - चतुःसुत्रीचा - टिळक पुरस्कार करतात. मवाळ आणि जहाल पक्षांच्या या संबंधीच्या धोरणांमधील फरक थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगतात. सरकारची गैरमर्जी ओढवून न घेता जे शक्य ते करण्याच्या मवाळांचा मार्ग होता. इंग्रज सरकार बलिष्ठ, आम्ही दुर्बल, इंग्रज कायदेशीर, सनदशीर, उदार व स्वातंत्र्यप्रिय असून सामर्थ्यशालीही आहेत. त्याकरिता त्यांना गोंजारुन चुचकारुनच आम्ही आपला कार्यभाग साधला पाहिजे. उलट टिळकपक्षीय मतप्रवहानुसार, 'शेतकऱ्यांची जाणूनबुजून दैन्यावस्था करणारी, शंभर वर्षात देशातील उद्योगधंदे बुडवून सर्व बाजूंनी पिळवणूक करणारी, देशाला नागवणारी, बंगालची फाळणी करणारी व हिंदू - मुसलमानांचे दंगे पेटवणारी ब्रिटिश साम्राज्यशाही असल्या भिक्षादेहीच्या मवाळ मार्गाने लोकाभिमुख कधी होणार नाही. स्वावलंबनाचा व प्रतिकाराचाच मार्ग अधिक यशस्वी होऊ शकतो. भीक मागून राजकीय हक्क मिळत नसतात. प्रजेस हक्क पाहिजे असल्यास तिने स्वपराक्रमाने मिळवले पाहिजेत. जिंकलेल्या लोकांनी आपखुशीने (जितांना) स्वातंत्र्य दिल्याचे उदाहरण इतिहासात नाही. स्वातंत्र्य हेच प्रत्येक राष्ट्राचे अंतिम साध्य आहे. तुमच्यातील भेद हेच सरकारचे कवच, तुमची दुर्बलता हे त्याचे बल; तुमचे स्वतःबद्दलचे अज्ञान हे त्याचे सामर्थ्य; (हे) तुम्ही ओळखाल तर सर्व तुमचेच आहे. असे या जहाल म्हणजे राष्ट्रीय पक्षांचे धोरण व कृती असून शरीरद्वारा किंवा द्रव्यद्वारा झीज सोसण्यास हा पक्ष तयार आहे.'

चळवळीसाठी निर्भय, जोरदार, निःस्वार्थबुद्धीची व कडव्या उमेदीची नवी पिढी निर्माण करणे मवाळांच्या मार्गांनी शक्य नाही, ती फक्त जहालांच्या चतुःसूत्रीतूनच उभी राहू शकते, असा त्यांना विश्वास होता.

**१) स्वदेशी :** भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाला एक महत्त्वाचा आर्थिक संदर्भ प्राप्त झाला होता. दादाभाई नवरोजी (पॉव्हर्टी अँड अन्ब्रिटिश रुल इन् इंडिया) यांनी देशाच्या आर्थिक शोषणावर प्रकाशझोत टाकलेला होताच. रमेशचंद्र दत्त, म. गो. रानडे हेही यासंबधी टिका करीतच होते. टिळकांनी तेच विचारसूत्र घेऊन भारताच्या आर्थिक अवनतीसंबंधी लेखन केले. प्रथम त्यांनी आपला मोहरा ग्रामीण भागातील आर्थिक दुरावस्थेकडे वळवला. शेतकऱ्यांच्या पिळवणूकीला व दुःखाला त्यांनी वाचा फोडली. कारण भारताची बहुसंख्य सामान्य जनता खेड्यांतून वास्तव्य करुन आहे. तिची हलाखी म्हणजे संपूर्ण राष्ट्रांची हलाखी आहे, हे टिळकांनी ओळखले होते. 'त्यांचे प्रत्यंतर त्यांच्या स्वदेशी व बहिष्कार या कार्यक्रमावरील लेखांमध्ये पुनःपुन्हा मिळते. सामान्य जनांचे जीवनमान उन्नत झाल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राची उन्नती झाली असे ते मानीत नाहीत.'

लोकांनी या अन्यायाचा प्रतिकार संपूर्ण सामर्थ्यानिशी करावा. 'हिन्दुस्थानचे राज्य हिन्दुस्थानच्या कल्याणाकरिता चालावे, मँचेस्टरच्या नव्हे,' ही गोष्ट प्रत्येकाच्या अंतःकरणात खोल बिंबावी व त्यानुसार त्याचे आचरण व्हावे. अन्यायाला शब्दाने व कृतीने शीघ्रातिशीघ्र वाचा फोडली जाणे आवश्यक आहे.

स्वदेशीच्या संदर्भात मुख्यत्वेकरुन सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची जबाबदारी मोठी आहे, असे टिळकांना वाटते. जे लोक दरिद्री आहेत, व ज्यांना दोन वेळच्या जेवणाचीच चिंता आहे, त्यांना इंग्रजी कपडे परिधान करणे शक्यच नसते. तेव्हा ते स्वदेशीच्या कक्षेबाहेर पडतात. सुशिक्षितांवरच या चळवळीची मोठी भिस्त आहे. त्यांच्यापैकी सर्वांनी निश्चय केल्यास आज होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन तर होईलच; पण सरकार पुन्हा असा अन्याय करण्यास धजणार नाही. त्यांनी तात्काळ देशी कापड वापरायला सुरुवात करावी.

स्वदेशीची चळवळ ही एक दुष्काळनिवारक मात्राच होय. कारण या चळवळीमुळे खेडेगावातील उद्योगधंद्यास उत्तेजन देऊन शेतीवर उदरनिर्वाह करणारांची संख्या कमी होईल, आणि तसे झाले म्हणजे फेमिन कमिशनने म्हटल्याप्रमाणे वारंवार दुष्काळ पडण्याचा संभवही कमी होईल. हा एक स्वावलंबनाचा मार्ग आहे असे ते मानतात. सारांश, औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक यांपैकी एक व अनेक किंवा सर्व दिशांनी विचार केला तरीही स्वदेशी चळवळीची आवश्यकता सिद्ध होते.

**२) राष्ट्रीय बहिष्कार :** टिळकांनी ज्याला आपल्या लिखाणात बहिष्कारयोग असे संबोधिले आहे ती केवळ एक औद्योगिक चळवळ नाही तर राजकीय चळवळ आहे. तीमधून राज्यकर्त्यांना ते अशी ताकीद देत आहेत की, जर असाच बेदरकार व बेपर्वा कारभार तुम्ही करत राहिलात तर आम्ही तुमचे या देशात वास्तव्य अशक्य करुन सोडू. टिळकांनी हे पुरते ओळखले होते की, शास्त्रीय वादविवाद, चर्चा, ऊहापोह इत्यादी सामोपचारांनी वा नुसत्या वाङ्मयीन उपायांनी या बाबतीत यश येणे शक्य नाही.

राज्यकर्त्यांविरुद्ध बंड करणे हा राजकीय गुन्हा ठरु शकतो, पण बहिष्काराचे तसे नाही. विनवणीचा मार्ग सुरुच ठेवायचा, परंतु विनवणीचे जेव्हा अपेक्षित ते पदरात पडत नाहीसे दिसल्यास त्या विनवणीला बहिष्काराचे पाठबळ द्यावे व विनवणी आणि बहिष्कार या जोडगोळीच्या बंदुकीने राज्यकर्त्यांना जेरीस आणून आपली गाऱ्हाणी जनतेने सोडवून घ्यावीत असा कार्यक्रम टिळक जनतेसमोर ठेवतात.

**३) राष्ट्रीय शिक्षण :** परकीय राज्यकर्त्यांच्या सर्वस्वी नियंत्रणाखाली असलेल्या विद्यापीठांचा वापर प्रजेस गुलामगिरीत ठेवणाऱ्या राजकीय धोरणांकडे जेव्हा होतो तेव्हा ती विद्यापीठे विद्यापीठे न राहता दारुची पिठे होतात. पाश्चात्त्य देशातील शिक्षणसंस्था राष्ट्रीय विषयांची चर्चा करतात; राष्ट्र हिताहित समजावून सांगतात, तसे परतंत्र शिक्षणसंस्थात होणे अशक्य आहे, कारण त्या सरकारच्या ताटाखालील मांजरे ठरतात. सरकारला सोयीस्कर ठरेल एवढेच विद्यार्थ्यांना शिकवावे, जास्त उदात्त विचारांचा त्यांच्या मनास स्पर्शही घडू नये यावर त्यांचा कटाक्ष असतो. त्यामुळे या संस्था स्वतंत्र देशात राष्ट्रीय विचारांचे मूलस्त्रोत ठरुन राष्ट्रहितास पोषक ठरतात तर परतंत्र देशात त्याच संस्था राष्ट्राला कायमच्या दास्यत्वात लोटण्यास वा राष्ट्राचे नेतृत्व कमकुवत, विचाराने व बुद्धीने नेभळट करण्यास साधनीभूत होतात. न्याय करणारे न्यायाधीश आणि विद्या शिकवणारे विद्यागुरु हे ज्या देशात राजसत्ताधिकाऱ्यांच्या तंत्राने वागणारे असतात तेथे खरा न्याय किंवा खरी विद्या मिळणे दुर्घभ होय.

राष्ट्रहिताची व उन्नतीची तत्त्वे भारतीयांना शिकविण्यास ही शिक्षणपद्धती केवळ निरुपयोगीच नाही तर विघातक ठरली असल्याचा निर्वाळा टिळक देतात. राष्ट्रभावनेचा विकास व राष्ट्रीय चळवळीचे बीजारोपण सरकारी कॉलेजातून तरुण पिढीच्या मनात होणे त्यांना असंभव वाटते. इंग्रजी शिक्षण अत्यंत एकांगी असून ते फक्त विद्यार्थ्यांना सरकारी नोकरीसाठी आवश्यक प्रशिक्षणच देऊ शकते. धर्म, नीती, शास्त्रीय शोध वगैरे, राष्ट्राच्या प्रगतीस व उत्कर्षास आवश्यक असणाऱ्या ज्ञानाची व कलांची त्या शिक्षणातून मुळीच माहिती मिळत नाही.

यासाठीच टिळकांना राष्ट्रीय शिक्षणाची निकड भासते. राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या करताना टिळक म्हणतात, प्रत्येक स्वतंत्र देशातील सरकार आपल्या प्रजेस जे शिक्षण देते किंवा देऊ इच्छिते ते राष्ट्रीयच असते. देशातील तरुण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढवण्यास समर्थ होईल अशाप्रकारे शिक्षण देणे हे देशातील विद्याखात्याचे कर्तव्य आहे. आणि त्यासच राष्ट्रीय शिक्षण असे म्हणतात.

टिळकांना असे वाटत होते की तत्कालीन सरकार असे शिक्षण देत नसल्यामुळे हिंदी लोक इतर देशाच्या मागे पडत आहेत. प्रजेला सुखी, स्वाभिमानी, निश्चयी, करारी व तेजस्वी करण्याचा प्रयत्न न करणारे सरकार भाडोत्री व आपमतलबी समजले पाहिजे. हिंदुस्थान दुर्दैवाने अशा सरकारच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे त्याला राष्ट्रीय शिक्षणासाठी त्या सरकारवर विसंबून राहून चालणार नाही. काँग्रेससारख्या राष्ट्रीय संघटनेने व तिच्या राष्ट्रभक्त कार्यकर्त्यांनीच हे आव्हान स्वीकारावयाचे आहे. त्या संघटनेमार्फतच उत्तरोत्तर देशभर स्वतंत्र राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था स्थापन होऊ शकतील. अशा शिक्षणसंस्थाना त्यांच्या मते दुहेरी कार्य करावे लागेल. एका बाजूने विद्यार्थ्यांवर उचित संस्कार करणे आणि दुसऱ्या बाजूने, केवळ शिस्तीच्या नावावर विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणू पाहण्याऱ्या सरकारी जुलमाचा व अन्यायाचा प्रतिकार करणे.

टिळकांच्या चतु:सुत्रीतील चवथे तत्व स्वराज्य आहे.

### ८.३.५ जहाल राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद

**१) राष्ट्रभक्ती हा टिळकांच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू आहे :** 'इतिहास व परंपरा, धर्म व तत्त्वज्ञान, कृती व ऐक्य या सर्वांना टिळकांनी देशप्रेमाच्या संकल्पनेतूच अर्थपूर्ण केले.' त्यांच्या मते राष्ट्रप्रेम ही ईश्वराप्रमाणेच प्रांतिकता, जातीयता व पंथवाद यांना छेदून जाणारी प्रेरणा असून तीच कोणत्याही कृतीचे व ऐक्याचे कारण ठरु शकते. लाल - बाल व पाल या त्रयीने एका नव्या युगाला आरंभ केला. हे युग प्रखर राष्ट्रवादाचे होते. ज्यास सांस्कृतिक राष्ट्रवाद म्हणता येईल त्याचा उद्घोष लोकमान्य टिळकांनीच केला.

सांस्कृतिक दृष्ट्या ब्रिटिश वरचढ असून त्यांच्या आगमनाने आपल्या उद्धाराचा मार्ग मोकळा झाला असेच इतर नेमस्तांप्रमाणे रानड्यांनाही वाटत असे. या मनःस्थितीतून राष्ट्राला बाहेर काढण्याचा मोठा प्रयत्न टिळकांनी केला. आणि राष्ट्रवादाचा पाया रचला. राष्ट्रीय चळवळ लोकाभिमुख केली. म्हणूनच टिळकांना 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार' असे म्हटले जाते.

**२) सामान्य उद्दिष्ट गाठण्यासाठी एक व्हावे - स्वातंत्र्याला प्राधान्य दिले :** या देशातील विभिन्न जाती - जमातीना व स्वतंत्र प्रांतांना एका शिस्तीखाली व शिक्षण व्यवस्थेखाली आणून भाषिक व रीतीभातींचे नवे बंध निर्माण केल्याबद्दल व जे आधीच्या राज्यकर्त्यांच्या मनातही आले नव्हते व त्यांना साधलेही नव्हते त्या एकराष्ट्रीयत्वाचे बीज रुजवल्याबद्दल टिळकांनी इंग्रज राज्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. राज्यकर्त्यांनी एवढी अनुकूल स्थिती निर्माण केली असली तरी राष्ट्रभावना अपेक्षित प्रमाणात येथे निर्माण होऊ शकली नाही याचीही टिळकांना जाणीव होती. राष्ट्रसभेने हे कार्य करावे अशी त्यांची अपेक्षा होती. आपापसातील भेदाभेद नष्ट करुन नव्हे तर ते तसेच कायम ठेवून, केवळ सामान्य उद्दिष्ट गाठण्यासाठी एकत्र येणे हे भारतीय राष्ट्रवादाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य बनले. कालांतराने या कल्पनेचा विकास होत गेला. समान शत्रूच्या उपस्थितीमुळे ती उत्तरोत्तर दृढ होत गेली. टिळकांनी भारतीय राष्ट्रवादी विचारसरणीचा पाया घातला.

**३) टिळकांची हिंदु - मुस्लिम प्रश्नासंबंधीची मते :** हिंदु मुस्लिम दंग्यांचा उल्लेख या प्रकरणाच्या प्रारंभी आलेलाच आहे. इंग्रजी शिक्षणाच्या क्षेत्रात हिंदु लोक मुसलमानांच्या पुढे गेल्यामुळे नोकऱ्यांमध्येही त्यांची सरशी झाली. एकेकाळी आपण या भूमीचे राज्यकर्ते ही भावनाही मुसलमानांच्या मनात होतीच आणि अल्पसंख्याक असल्यामुळे असुरक्षितपणाही त्यांना जाणवत होताच. इंग्रजांनी या परिस्थितीचा फायदा घेतला, मुस्लिमांना संरक्षण व फुटीर होण्यास उत्तेजन देऊन त्यांनी त्यांचा अहंगड व वेगळेपणा जोपासला. काही मुस्लिम नेतेही यास जबाबदार होते. हिंदु - मुस्लिम यांच्यातील तणावांचे स्पष्टीकरण देताना यामुळेच टिळकांना सरकारच मुख्यत्वे दोषी दिसते. हिंदु - मुसलमानांत वैमनस्य उत्पन्न होऊन त्यांनी एकमेकांत मारामारी करावी हे कोणाही समंजस मनुष्यास इष्ट वाटणार नाही. पण हल्ली जो प्रकार होत आहे तो समंजस मनुष्याच्या साहाय्याने अगर कानाडोळ्याने होतो, असे मानण्यास मुळीच आधार नाही. मुसलमान लोक जर शेफारले असले तर आमच्या मते त्याचे मुख्य कारण सरकारची फूस हे होय.

**४) सांस्कृतिक राष्ट्रवाद - टिळकांची राष्ट्रवादाची कल्पना हिंदूधर्म तत्वज्ञानाशी जोडलेली होती :** टिळकांनी काँग्रेसच्या चळवळीचा समन्वय हिंदूंच्या धार्मिक विधींशी व समाजसुधारणाविरोधाशी घालून एक गोष्ट साधली ती म्हणजे जे तोपर्यंत काँग्रेसबद्दल उदासीन होते त्यांच्या मनात तिच्याबद्दल तात्कालिक आकर्षण निर्माण झाले. चिपळूणकरांच्या आक्रमक, भावनाप्रधान व संस्कृतिनिष्ठा राष्ट्रवादाला वास्तववादी वळण देण्यासाठी टिळकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. हेतू हा की यातून चळवळीला बळकटी यावी. लोकांच्या परंपरांना व धार्मिक भावनांना आवाहन करुन त्यांना राजकीय कार्यासाठी प्रवृत्त करणे हेच त्यांच्या राष्ट्रवादाचे मुख्य साध्य होते. हिंदुधर्मियांच्या संघटीकरणांवर त्यांचा भर होता. हिंदु - धर्मग्रंथांच्या आधारे हिंदु - संस्कृतीचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करणे हा त्यांचा सर्वाधिक महत्त्वाचा प्रतिपाद्य विषय होता. टिळकांनी जाणीवपूर्वक राष्ट्रवादाला धर्माच्या संकुचित चौकटीत आणून बसविले नाही, तर भोवतालच्या पर्यावरणाचा व परिस्थितीचा त्यांच्यावर अजाणतेपणी जो प्रभाव पडला होता त्याने त्यांना तसे करण्यास भाग पाडले. टिळकांच्या बाजूने एक गोष्ट मान्यच करावी लागते की त्यांनी अरविंदांप्रमाणे राष्ट्रवादाला धार्मिक वा वेदान्ती गूढवादात कधीच बुडवून टाकले नाही.

**५) राष्ट्रीय क्रांतीला प्राधान्य. टिळक राजकीयदृष्ट्या पुरोगामी असण्यापेक्षा क्रांतिकारक होते :** पाश्चात्त्यांच्या जोखडापासून मुक्त झालेल्या देशात लोकशाही स्वातंत्र्य वा व्यक्तीच्या हक्कांची प्रतिष्ठापना करणे हे त्यांच्या प्रयत्नांचे साध्य दिसत नाही, तर पारंपरिक हिंदू रुढिप्रियतेची पुर्नप्रतिष्ठापना हेच त्यांचे लक्षण दिसते. नागरी स्वातंत्र्यापेक्षा व नागरिकांच्या हक्कांपेक्षा समाजजीवनावरील निर्बंध त्यांना महत्त्वाचे वाटतात व हे निर्बंध व नियमने कायम स्वरुपाची होण्यासाठी प्राचीन संस्थांबद्दल गौरवभावना मनात निर्माण होणे त्यांना अगत्याचे वाटते. प्राचीन संस्थांबद्दलची ही गौरवभावनाच टिळकांना पुरोगामी शिक्षण, आधुनिक वैज्ञानिक प्रगती व बुद्धिवाद आणि सामाजिक सुधारणा यांना विरोध करण्यास भाग पाडते. टिळकांचा भर समतेपेक्षा स्वातंत्र्यावर अधिक दिसून येतो. राष्ट्रीय क्रांतीला ते प्राधान्य देतांना दिसतात.

वरकरणी त्यांनी केलेला हा विरोध ब्रिटिश राजवटीला व संस्कृतीला आहे असे वाटत असले तरी परिणामी तो उदारमतवादी मूल्यांच्याच विरुद्धचा लढा ठरला आहे. मॉरिस जोन्सने म्हटल्यानुसार 'जे जे पाश्चात्य त्या सगळ्यांचा जहालांनी केला त्याग हा वस्तुतः उदारमतवादी मूल्यांचाच त्याग होता. त्यांचा राष्ट्रवादसुद्धा पश्चिमेतील राष्ट्रवादाइतकाच विकारवश होता.

## ८.४ मूल्यमापन

लोकमान्य टिळकांच्या राजकीय कार्यक्रमाची तीन उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. राष्ट्राचा तेजोवेध करणाऱ्या सुधारणावादी नेतृत्वास प्रभावी करणे, विविध मार्गांनी राजकीय असंतोष निर्माण करणे आणि त्या असंतोषाला पूर्ण स्वातंत्र्याच्या एकाच ध्येयवादी सूत्रात गोवून एकसंघ जनशक्ती निर्माण करणे.

राजद्रोहात्मक खटल्यामुळे, निरनिराळ्या फिर्यादीमुळे टिळकांच्या राजकीय कार्याला सनसनाटी तर आली होतीच; पन राजकीय नेत्याचा एक नवा आदर्श लोकांना त्यांच्या रुपाने गवसला होता. टिळकांनी परकीय सत्तेविरुद्ध लोकमत तयार केले. गुलामगिरीत होणाऱ्या

मानहानीवर व बौद्धिक - मानसिक कुचंबणेवर तसेच आर्थिक पिळवणूकीवर प्रकाशझोत टाकून त्यांनी राजकर्त्यांविरुद्ध जनमानसात त्वेष जागा केला.

## ८.५ प्रश्न

१) टिळकांचे जहाल आणि आक्रमक राष्ट्रवादासंबधी विचार स्पष्ट करा.

२) टिळकांचे राजकीय विचार जहाल आणि आक्रमक होते विवेचन करा.

❖❖❖❖

# १

# जहाल राष्ट्रवाद
# (१८७२ ते १९५०)

**घटक रचना :**

९.१ प्रास्ताविक
९.२ सशस्त्र क्रांतीकारकांची भूमिका
९.३ राजकीय विचार, कॉंग्रेजसवर टिका, ब्रिटिश शासनावर टिका.
९.४ आध्यात्मिक राष्ट्रवादाची कल्पना
९.५ साध्य आणि साधन (स्वातंत्र्याविषयक)
९.६ अरविंदाचा मानवी ऐक्याचा आदर्श
९.७ मूल्यमापन
९.८ प्रश्न
९.९ संदर्भ

## ९.१ प्रास्ताविक

भारतीय प्रबोधनाचे मूर्तिमंत प्रतीक असलेले श्री. अरविंद घोष हे त्या प्रबोधनातून उद्‌भवलेल्या नव्या भारतीय राष्ट्रवादाचे आद्य उद्‌गाते ठरले. भारतीय राजकीय विचारांच्या इतिहासात नव्याने निर्माण झालेल्या राष्ट्रवादी परंपरेतील एक अग्रगण्य नेते ठरले. या देशाच्या स्वातंत्र्य - आंदोलनाला त्यांनी नवी दिशा दिली.

अरविंदांचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी कोलकत्ता येथे डॉ. कृष्णधन घोष आणि श्रीमती स्वर्णलतादेवी यांच्या पोटी झाला. त्यांचे वडील हे कट्टर 'आंग्ल' वृत्तीचे भोक्ते होते. ते स्वतः सिव्हिल सर्जन असून त्यांचे वैद्यकीय शिक्षण इंग्लंडात झाले होते. मायदेशी परत आल्यावर सनातन रुढीनुसार प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होण्याचे नाकारुन त्यांनी आपले गाव सोडणे अधिक पसंत केले. सवयी, आदर्श व कल्पना या सर्वच दृष्टींनी आंग्लीकृत होऊन ते आले होते. आपल्या मुलांचे प्राथमिक शिक्षणसुद्धा इंग्रजी संस्कारातच व्हावे असा त्यांचा आग्रह होता. त्यानुसार अरविंद व त्यांचे दोन बंधू यांना दार्जिलिंगच्या लोरेंटो विद्यापीठात त्यांनी घातले. पाश्चिमात्यांच्या मुलांसाठी ही संस्था होती. भारतीय भाषांचे तेथे यात्किंचितही अध्ययन होत नव्हते. अरविंद त्यावेळी फक्त पाच वर्षाचे होते. त्यांना आपली मातृभाषाही पुढे १८९६ साली शिकावी लागली. अरविंद सात वर्षाचे असतांना त्यांच्या बंधूंसह त्यांना वडिलांनी इंग्लडास नेले आणि तिथे श्री. व सौ. विल्यम ड्रेवेट यांच्या नियंत्रणाखाली शिक्षणार्थ ठेवले. स्वतः श्री. ड्रेवेट हे

लॅटिनचे उत्तम अभ्यासक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अरविंदांना बायबल, शेक्सपीयर, शेले, कीटस इत्यादिकांचा सखोल अभ्यास करता आला. ड्रेवेट दांपत्याला अशी सक्त ताकीद होती की या मुलांचा भारतीयांशी व भारतीय घडामोडींशी मुळीसुद्धा संपर्क घडू देता कामा नये. पुढे अरविंदांना इंग्लंडच्या सेंट पॉल शाळेत घालण्यात आले. त्या शाळेत इंग्रजीबरोबरच ग्रीक, लॅटिन आदी भाषांवर त्यांनी प्रभुत्व मिळविले. भाषा शिकण्याचे त्यांचे हे अंगभूत कसब त्यांना पुढे अल्पकाळात अनेक भारतीय भाषा शिकण्यास सहाय्यभूत ठरले. आपल्या बुद्धीच्या बळावर वयाच्या सतराव्या वर्षी सिनीयर क्लासिक स्कॉलरशिप संपादन करुन केंब्रिज येथील किंग्ज कॉलेजात प्रवेश मिळवण्यात ते यशस्वी झाले. महाविद्यालयीन अभ्यासाव्यतिरिक्त इंग्रजी व फ्रेंच वाङ्मयाचा व युरोपच्या इतिहासाचा त्यांनी अभ्यास केला.

जवाहरलाल नेहरु म्हणतात, त्याप्रमाणे 'सात ते एकवीस वर्षे वयापर्यंत आयुष्याची चौदा संस्कारक्षम वर्षे भारतापासून दूर इंग्लंडात घालवलेला, युरोपीय अभिजातपणाच्या व तत्कालीन इंग्लंडच्या सहवासात राहिलेला एक माणूस नंतरच्या आयुष्यात भारतीय तत्त्वज्ञानाच्या व आध्यात्मिक विचारांच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या भारतीय राष्ट्रावादाचा प्रभावी पुरस्कर्ता व्हावा हे विशेषच मानावे लागेल. कदाचित या पर्यावरणामधूनच वा त्यास झालेल्या प्रभावी प्रतिक्रियेतूनच अरविंद नंतरच्या काळात भारतीय संस्कृती व परंपरांचे समर्थन करण्यास प्रवृत्त झाले असावेत.'

त्यामुळे वडिलांच्या अपेक्षेप्रमाणे नखशिखांत युरोपीय होऊन ते मायदेशी परत आले नव्हते, तर राष्ट्रभक्तीची व राष्ट्रप्रेमाची धगधगती आग अंतरात्मात घेऊन आले होते. आपल्या वडिलांपेक्षा आईकडून त्यांना मिळालेला वारसा अधिक प्रभावी ठरला होता. त्यांच्या आईचे वडील-ऋषि नारायण बोस - हे ब्राह्मो समाजाचे नामवंत नेते होते.

राष्ट्रावादाची त्यांना प्रेरणा देण्यास त्यांचे वडीलही एका परीने कारणीभूत झाले होते. ते पश्चिमप्रेमी असले तरी भारतद्रेष्टे नव्हते. पश्चिमी शिक्षणाचा व संस्कृतीचा अवलंब करण्याचा त्यांचा आग्रह या धारणेतून बळावला होता की, भारताची प्रगती त्याच मार्गाने होऊ शकेल. भारताचे कल्याण हे त्यांचे ईप्सित होते. म्हणून आपल्या मुलांना लिहिलेल्या पत्रांमधून अत्यंत प्रखर शब्दात ते इंग्रजी राजवटीच्या दोषासंबंधी लिहीत असत. ही सत्ता दिवसेंदिवस कशी अन्यायी, कठोर व हदयशून्य होत आहे यांची वर्णने ते आपल्या पत्रांमधून करीत असत. कधी अधूनमधून 'दि बंगाली' वृत्तपत्राची कात्रणेही आपल्या मताच्या पुष्टर्थ ते धाडीत असत. हेच कदाचित यामुलांना मिळालेले राष्ट्रभक्तीचे सुरवातीचे पाठ असावेत. देशातील वस्तुस्थितीचे व घडामोडींचे यथार्थ आकलन त्यांना या पत्राद्वारे झाले होते.

राष्ट्रभक्तीचे बीजारोपण असे झाले होतेच. आयर्लडच्या स्वातंत्र्यसंगरातून स्फूर्तीही मिळाली होती. मॅझिनी व गॅरिबाल्डीच्या राष्ट्रभक्तीने मने भारावून गेली होती. केंब्रिज येथे असताना 'इंडियन मजलिस' नावाच्या विद्यार्थी संघटनेचे ते काही काळ चिटणीस होते. चर्चा-परिसंवादादी व्यासपीठांवरुन भारतावरील ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध प्रखर शब्दात ते विचार मांडीत असत. कॉंग्रेजच्या मवाळ नेतृत्त्वाबद्दल नापसंती व असमाधान व्यक्त करीत असत.

बडोदा कॉलेजात फ्रेंच भाषेचे अधिव्याख्याते म्हणून व पुढे तेथेच इंग्रजीचे प्राध्यापक व उपप्राचार्य म्हणून अरविंद होते. संस्थानच्या नोकरीत असल्यामुळे राजकारणात उघड व प्रत्यक्ष भाग घेणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे निनावी लेखन करण्यापलीकडे दुसरी राष्ट्रसेवा ते करु शकत नव्हते.

## १.२ सशस्त्र क्रांतीकारकांची भूमिका (Leading Freedom Fighter)

त्यांचे राजकीय विषयावरील **१) प्रारंभीचे लेखन 'इंदुप्रकाश'** नावाच्या मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या आंग्ल-मराठी नियतकालिकातून प्रकाशित झाले. 'जुन्या ऐवजी नवे दीप' (न्यू लॅम्प्स फॉर ओल्ड) हे त्यांनी या नियतकालिकातून लिहिलेल्या लेखमालेचे शीर्षक होते. काँग्रेसच्या जुन्या व सुधारणावादी दिव्यांच्या जागी आता, नव्या क्रांतीने पेटलेल्या दीप्तिमान दिव्यांची योजना करणे हा जो या लेखमालेमागील हेतू होता तो या शिर्षकातून व्यक्त झाला होता. पहिल्या दोन लेखांनीच येथील बुद्धिजीवी वर्गात खळबळ निर्माण केली होती. त्याचप्रमाणे देशबांधवांना आपल्या शतकानुशतकांच्या घोर निद्रेतून उठून मातृभूमीला स्वतंत्र करण्याचे कळकळीचे आवाहनही त्यात होते. असे म्हणतात की ते लेख वाचून न्या. महादेव गोविंद रानडे यांनी 'इंदुप्रकाश' च्या मालकांना असा ईशारा दिला होता की, ही स्फोटक लेखमाला अशीच चालू राहिल्यास त्यांच्यावर सरकारचा रोष ओढवणे अनिवार्य ठरेल, राजद्रोहाचा ठपका येईल. परिणामी ही मूळ योजना अरविंदांना सोडून द्यावी लागली. इंदुप्रकाशातील त्यांच्या सगळ्या लेखांतन तीन विषयांसंबधी मुख्यत्वे चर्चा आढळते. **काँग्रेच्या धोरणांचे परिक्षण, इंग्रजी राज्यकर्त्यांवर टीका आणि राजकीय चळवळीचा रचनात्मक कार्यक्रम.** केवळ लिहून अरविंदाचे समाधान होणे शक्य नव्हते.

**२) राजकारणात सक्रिय सहभागी व्हावे अशीही त्यांच्या मनाची तीव्र ओढ होती.** स्वातंत्र्यलढयांचे प्रयत्न अधिक सुसंघटित व अधिक नेमके कसे करता येतील, हे पाहण्यासाठी ते बंगालात गेले. बंगालात ठिकठिकाणी काही गुप्त संघटना स्थापन झाल्या होत्या. लोकांमध्ये राजकारणाची आवड आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा निर्माण करणे हा त्यांचा हेतू होता. स्वातंत्र्याचा आदर्श जनतेसमोर ठेवून त्यांना त्यागप्रवृत्त करुन, सशस्त्र क्रांतीची शिकवण देण्याचा कार्यक्रम त्यांनी समोर ठेवला होता. गावोगाव अशा संघटना उभ्या करुन त्यांच्या कार्यात सुसंवाद निर्माण करावा, क्रांतिकारकांत उत्साह पेटवावा व उचित वेळ येताच सगळीकडून सशस्त्र उठाव करावा अशी ही तीस वर्षाच्या दीर्घ पल्ल्याची योजना होती. अरविंदांचा या गुप्त संघटनांशी सततचा व जवळून संपर्क होता. बडोदा लष्करातील जतीन बॅनर्जी बंगाली सैनिकाला त्यांनी विशिष्ट कार्यक्रम व योजना देऊन बंगालात धाडले होते. १९०२ मध्ये आपले बंधू बरींद्रकुमार घोष यांनाही जतीनला मदत करण्यासाठी त्यांनी रवाना केले. टिळकांशी संधान बांधून बंगाल व महाराष्ट्र या दोन प्रांतांमधील क्रांतिकारक गटांमध्ये संपर्क ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. दरवर्षी उन्हाळी सुट्टयांमध्ये अरविंद बंगालात जाऊन प्रत्यक्ष कार्याची आखणी-उभारणी करीत असत. डाक्का, मिदनापूर इत्यादी केंद्रावर - जिथे लाठीयुद्ध, मुष्टियुद्ध, अश्र्वारोहण, शिकार इत्यादीचे नियमित शिक्षण दिले जात असे, त्याचप्रमाणे भगवद्गीतेबरोबरच मॅझिनी वगैरे क्रांतिकारकांच्या चरित्रांचीही पारायणे चालत असत तिथे जाऊन अरविंद त्यांच्या कार्याची पाहणी करीत. बंगालच्या या क्रांतिकारकांना राष्ट्रकार्य हा एक धर्मच वाटत होता. या क्रांतिप्रयत्नात अरविदांनी प्रत्यक्ष भाग जरी घेतला नसला तरी 'या संघटनांना येऊन मिळू इच्छिणारांचे नैतिक बळ संकलित व प्रेरित करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी निश्चितपणे पार पाडले होते.' क्रांतीच्या दिशेने विचार करणाऱ्या तरुणांबद्दल त्यांना अपार आस्था व प्रेम होते. शस्त्रविद्या व लष्करी - मुख्यत्वे बॉम्ब -रिव्हाल्वर्स तयार करण्याचे - शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडास गेलेल्या माधवराव जाधवला अरविंदांनी अर्थसहाय्य केले असल्याचे नमूद आहे.

**३) 'भवानी मंदिर' उभारण्याची एक योजना होती.** बंकिम चंद्रांच्या 'आनंदमठ' कांदबरीतल्याप्रमाणे पर्वतराजींच्या आडोशाला अज्ञात स्थळी भवानीचे मंदिर उभारुन तिथे तरुणांना आध्यात्मिकतेचे व क्रांतीचे शिक्षण देण्याच्या या कल्पनेसंबंधी व तिच्या हेतूसंबंधी अरविंदानी एक चोपडे लिहून प्रसृत केले होते.

मात्र सशस्त्र क्रांतीच्या दिशेने होणारी ही वाटचाल अरविंदाच्या आयुष्यात अल्पकालीन ठरली. कारण पुढे जेव्हा प्रत्यक्ष राजकारणात अरविंदांनी उघडपणे उडी घेतली तेव्हा या भूमिगत चळवळीपेक्षा अधिक उपयुक्त व प्रभावी अशा नव्या उपायांचा त्यांना शोध लागला. परंतु तरीही त्यांच्या वैचारिक उत्क्रांतीच्या दृष्टीने हा काळ व हे प्रयत्न मोलाचे ठरतात. तेरा वर्षाच्या या घडणीच्या काळानंतर, वयाच्या चौतिसाव्या वर्षी, राजकारणाच्या धकाधकीत उडी घेण्याच्या जय्यत तयारीनिशी अरविंद बडोद्यातून बाहेर पडले.

**४) पूर्ण स्वराज्याचे उद्दीष्ट :-** कॅंग्रेस आपली मवाळ धोरणेच पुढे चालवीत होती. परंतु कॅंग्रेसला आतून व बाहेरुनही कडक टीकेला तोंड द्यावे लागत होते, बडोदा सरकारच्या सेवेत असतानाही अरविंद कॅंग्रेस अधिवेशनांना (अहमदाबाद - १९०२, मुंबई - १९०४ व बनारस - १९०५) उपस्थित राहिले होते आणि दरवेळी **कॉंग्रेसच्या नेत्यांनी 'पूर्ण स्वराज्य' हे आपले उद्दिष्ट म्हणून स्वीकारावे असा प्रयत्न** त्यांनी केला होता.

सखाराम गणेश देऊस्करांनी बंगालीत लिहिलेल्या शिवचरित्रातून स्वराज्याची कल्पना वाचकांपर्यत पोहचविली. 'स्वराज्य' शब्दाचा त्यांनीच प्रथम वापर केला होता. याच लेखकाच्या 'देशेर कथा' या पुस्तकाने इंग्रजांच्या शोषणप्रधान अर्थनीतीवर झगझगीत प्रकाशझोत टाकला. लोकक्षोभ वाढत होता. रशियाचा जपानच्या हातून पराभव, आयर्लंडचे स्वाातंत्र्यासंगर, इटालीच्या देशभक्तांचा पराक्रम या देशांबाहेरच्या घटनांचाही प्रभाव त्या असंतोषाला धार लावीत होता. तुंबत चालेल्या या असंतोषाला वंगभंगाने तोंड फोडले. पूर्ण देशातून निषेधाच्या घोषणा उठल्या. स्वदेशी चळवळीला जोर आल, परदेशी कापडांच्या होळया झाल्या. बारीसाल येथे अश्विनीकुमार दत्त यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड निषेधमोर्चा निघाला. राजाज्ञेचा भंग करुन निघालेला, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील हा पहिलाच मोर्चा मानावा लागेल. अरविंद त्या मोर्चाच्या पहिल्या रांगेत होते. पोलिसांनी लाठीचार्ज करुन मोर्चा पांगवला. परंतु लोकांचे चैतन्य ते दडपू शकले नाहीत. लोकक्षोभाच्या लाटा उत्तरोत्तर उत्तुंग व समर्थच होत राहिल्या.

**५) 'वंदेमात्रम' या इंग्रजी साप्ताहिकात लेखन -** कॉंग्रेस नेतृत्व अजूनही मवाळांच्याच हाती होते. जहालांचे वजन वाढत होते. त्यांनी कॉंग्रेसला, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व बहिष्कार ही आपली चतुःसूत्री मान्य करणे भाग पाडले. अरविंद अजूनही कोषातून पुरते बाहेर पडले नव्हते. बरींद्राने चालवलेल्या वृत्तपत्रात निनावी लेखन ते करीत होते. पुढे बिपिनचंद्रांच्या विनंतीवरुन 'वंदे मातरम' या इग्रजी साप्ताहिकात ते लिहू लागले. **त्यांचे मुख्य कार्य बंगालातील जहालमतवाद्यांना संघटित करुन मवाळ नेत्यांना आव्हान देणे हे होते.** स्वदेशीच्या चळवळीला चालना मिळण्यास आणि सरकारने जो जो दडपली तो तो देशभक्तीची भावना उफाळण्यास 'वंदे मातरम्' मधील अरविंदांचे लेखन बरचसे कारणीभूत होते. यावेळी त्यांच्यावर राजद्रोहाचे दोन खटले झाले. पण संबंधित लेखांचे लेखक तेच हे सिद्ध करण्यात शासन यशस्वी होऊ न शकल्यामुळे ते मागे घेतले गेले. या खटल्यांनी अरविंदांना फायदाच

झाला. जनमानसातील त्यांचे स्थान उंचावले. ते आणि त्यांचे 'वंदे मातरम्' ही तरुणांची आराध्यदैवते बनली.

**६) १९०७ च्या उत्तरार्धात सुरत काँग्रेसच्या वेळी बंगालातील जहालांचे नेतृत्व अरविंदाकडे होते.** ते अधिवेशन कोलमडल्यानंतर झालेल्या जहालांच्या सभेत मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची व पूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत न थांबण्याची शपथ उपस्थितांना त्यांनी दिली. अरविंद या सभेच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांच्या नेतृत्वाला यातून नवी झळाळी प्राप्त झाली. या अधिवेशनानंतर सरळ कलकत्त्यास न जाता बडोदा, मुंबई, पुणे, नाशिक व अमरावती इत्यादी शहरी जाऊन त्यांनी प्रेरक-प्रक्षोभक व्याख्याने दिली. त्यामधून राष्ट्रवादाच्या दिव्यसंदेशावर त्यांनी भर दिला. आता केवळ बंगालचेच नव्हे तर संपूर्ण देशाचेच तरुण त्यांच्याकडे अपेक्षेने पाहू लागले.

सरकार या घडामोडींकडे वेगळ्याच दृष्टीने पाहत होते. काँग्रेसमधील दुहीचा फायदा घेऊन जहालांना दडपण्याचे प्रयत्न त्यांनी सुरु केले. सगळ्या जहालांना सशस्त्र क्रांतिकारकांच्या प्रयत्नात गोवून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यावर त्यांचा कटाक्ष होता. माणिकताळा येथे सापडलेल्या बॉंब फॅक्टरीच्या संदर्भात बरींद्र - अरविंद प्रभृती नेत्यांना अटक झाली. अरविंदांना दोराने बांधून कैदेत नेण्याचा प्रयत्न झाला. जेलमधील या वास्तव्याच्या काळात अरविंदांच्याजीवनाला नवीन कलाटणी मिळाली. राजकारण व अध्यात्म या समांतर वाहणाऱ्या प्रवाहांपैकी अध्यात्मप्रवाहाचा जोर वाढला. आध्यात्मिक अनुभवाच्या शिखरापर्यंत ते पोचले. जेलमधून ते बाहेर पडले तेव्हा शासनाचे दमनयंत्र जोरात होते. जहाल नेते हद्दपार झाले होते, त्यांचे आवाज, लेखण्या दडपल्या गेल्या होत्या, ७) तरीही हताश वा निराश न होता अरविंदांनी **'कर्मयोगी' नावाचे इंग्रजी व 'धर्म' नावाचे बंगाली, अशी दोन साप्ताहिके काढली.** पण त्यावेळी आध्यात्मकतेचा पगडा मोठा होता.

राजकीय विचारांत त्यांनी या काळात मोलाची भर घातली. भारतीय संस्कृतीचा अन्वयार्थ, राष्ट्रवादाचा संदेश आणि अध्यात्माचा जीवनमार्ग इत्यादी विषयांवर त्यांनी लेखन केले. राष्ट्राच्या कोसळत चाललेल्या नीतिधैर्यास सावरण्याचा खंबीर प्रयत्न केला. राष्ट्रवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. 'माझ्या देशवासीयांना अनावृत्त पत्र' लिहून त्यादवारे स्वावलंबन, शांततामय संबंध विश्वकल्याणाशी जोडून मानवमात्राच्या उन्नतीसाठी भारताने काय करावे ते सांगितले. जगातील मानवमात्राच्या ऐक्याने स्वप्न चितारले आणि ते साकार करण्याच्या मार्गाचीही चर्चा केली.

५ डिसेंबर १९५० रोजी भारताचा हा महायोगी महासमाधीत निमग्र झाला.

## ९.३ राजकीय विचार :-

भारतात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुरु झालेल्या क्रांतिकारक चळवळीमागील राजकीय विचारांवर त्यांच्या लेखानातून झगझगीत प्रकाशझोत पडतो. त्यांचे 'इंदुप्रकाशा'तील लेखन म्हणजे भारतीय राजकाराणातील नव्या क्रांतिपर्वाची सुप्रभात होती. परकीय भ्रष्ट सत्तेप्रमाणेच, काँग्रेसच्या मवाळ धोरणावर व साधनांवरही त्यामधून आग पाखडलेली होती. पर्यायी मार्ग सोधण्याची त्यात धडपड होती.

**काँग्रेसवर टीका :-**

अरविंदबाबू काँग्रेसी राजकारणाचे कठोर परीक्षक होते.

अरविंदांनी काँग्रेसच्या दोषांवर नेमके बोट ठेवून तिच्या प्रयत्यनांच्या दिशा व अंतिम साध्ये कशी चूक आहेत हे दाखवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

१) काँग्रेसवर अरविंदांनी केलेली टीका ही अत्यंत प्रखर, कठोर निर्भीड अशी आहे. या **संघटनेच्या नेत्यांनी आपल्यासमोर कोणतीही निश्चित उद्दिष्टे न ठेवता काही गौण गोष्टींवरच लक्ष केंद्रित केले** हा त्यांचा महत्त्वाचा आक्षेप होता. काँग्रस इतक्या वर्षाच्या कार्यवाहीनंतरही भरीव असे काहीच करु शकली नाही असे अरविंदांना वाटत होते. काँग्रेसची ध्येये चुकीची आहेत. त्या ध्येयांच्या प्राप्तीसाठी ज्या वृत्तीने काँग्रेस प्रयत्न करते ती वृत्ती आणि तिने निवडलेल्या पद्धतीही योग्य नाहीत.

२) अरविंदांच्या मते, **काँग्रेसच्या मागण्या कुणालाही लाज वाटावी इतक्या मवाळ आहेत,** त्यांची परिपूर्ती तर त्याहूनही लाजिरवाणी आहे. इंग्रज राज्यकर्त्याविषयी तिने बाळगलेल्या भावना संतापजनक आहेत. स्वतःच्या अंगभूत साम्यर्थ्याला जागे करण्याचे प्रयत्न करण्याऐवजी राज्यकर्त्यांना खूष करण्याचे व त्यांची कृपा-मर्जी संपादित करण्याचेच लाचार राजकारण काँग्रेस करीत असल्यामुळे तिची प्रतिष्ठा कमी होत आहे, असे त्यांना वाटत होते. इंग्रजी राजवटीला भारतावरील दैवी अनुग्रह मानणाऱ्या मवाळ नेत्यांना धारेवर धरुन अरविंद म्हणतात. की यातून काँग्रेसचा भित्रेपणा, आणि राज्यकर्त्याच्या अवकृपेची तिला वाटणारी भीतीच व्यक्त होते.

३) **राज्यकर्त्यांच्या दयाघनतेला व न्यायबुद्धीला आवाहन करण्याऐवजी राष्ट्राच्या पौरुषाला आवाहन केले पाहिजे.** राष्ट्रावासीयांच्या मनात परस्परांविषयी व विशेषतः दलितांविषयी भ्रातृभाव निर्माण केला पाहिजे. भारतीय कामगार वर्गाचा पाठिंबा मिळवण्याचा, त्यांना संघटित करण्याचा प्रयत्न न करता काँग्रेस केवळ एक मध्यमवर्गाची संघटना होण्यातच स्वतःला कृतार्थ मानते. **४) अरविंदांच्या मते, 'ती एक मध्यमवर्गीय संघटना आहे.** राष्ट्रभक्तीच्या तिच्या वल्गना पोकळ आहेत.' कामगारवर्ग आणि इतर सामान्य जनता हेच खरे या देशाचे सामर्थ्य आहे. ते सामर्थ्य आज सुप्त व निद्रिस्त वाटत असले, तरी एक निश्चित की ज्याच्या अंगी त्या सामर्थ्याला जागे करण्याची क्षमता असेल तोच भावी काळाचा कर्ता ठरु शकणार आहे, हे अरविंदांनी ओळखले होते.

परंतु या अगाध सामर्थ्याची काँग्रेसच्या हातून हेळसांड व उपेक्षाच अधिक झाली आहे. शेतकरी, कामगार, मजूर इत्यादींसाठी या संघटनेने काहीच केले नाही. केवळ काही ठराव पास करणे, मागण्या करणे, फार तर निषेध नोंदवणे एवढेच कार्य ती करीत आली आहे. अरविंदाच्या मते, या मार्गानी कधीच स्वातंत्र्य प्राप्त होणार नाही.

५) **ब्रिटिश राजवटीला त्यांनी ईश्वरी वरदान मानले.** परवशतेच्या पाशाची, गुलामगिरीत होणाऱ्या मानहानीची जाणीवच त्यांना होत नसल्यामुळे राष्ट्राच्या स्वतंत्र्याची आकांक्षाही त्यांच्या मनात निर्माण होत नाही. परिणामी, पारतंत्र्यातील नैतिक अधःपतनाची व स्वातंत्र्याकांक्षेची ही

भावना ते सामान्य जनतेच्या मनात कशी संक्रमित करणार? कॉंग्रेसचे यश त्यामुळे साहजिकच मर्यादित राहाणार.

६) **भारताच्या जनसमुदायाला जागे करण्याचा एकच मार्ग म्हणजे त्याच्यासमोर पूर्ण स्वराज्याचे साध्य उभे करणे** आणि त्या साध्याच्या पूर्तीसाठी तनमनधनसर्वस्वानिशी स्वतःच्याच पायावर उभे राहण्यास प्रेरित करणे हा आहे. कॉंग्रेसी विचारसरणीवर व पद्धतींवर अरविंदानी प्रखर टीका केली आहे. घटनात्मक मार्गांचा अवलंब करणे घटना अस्तित्वात असतांना ठीक आहे. या देशात घटनाच अस्तित्वात नाही.

अरविंद म्हणतात की परकीय राजवट मग ती कितीही उदार,दयावादी असो, आपल्या अंमलाखालील देशाच्या जीवनात सामर्थ्यकेंद्राचा कधीच विकास होऊ देत नसते. कारण त्या देशाशी तिचे असलेले संबंध केवळ परोपजीवी (पॅरासाइट) पणाचे नसतात तर आपल्या आठही नांग्या भक्ष्याच्या पोटात खुपसून रक्तशोषण करणाऱ्या 'ऑक्टोपस' चे असतात. ब्रिटिश राज्यसत्तेबद्दलही हेच खरे आहे. तेव्हा हा परकीय ऑक्टोपस या देशाच्या राज्यशरीरातून उपसून काढून टाकल्याखेरीज या देशाला राष्ट्र म्हणन अभिमानाने कधी जगताच येणार नाही, असे त्यांना वाटले. मवाळ कॉंग्रेसचे प्रयत्न यादृष्टीने फारच थिटे पडतात असे त्यांचे मत होते. तिचे सारे प्रयत्न इंग्लंड व भारत यांच्यातील दैवी संबंध, ब्रिटिश जनतेच्या न्यायबुद्धीवर नितांत श्रद्धा, घटनात्मक मार्गाच्या अपरिहार्यतेवर व परिणामक्षमतेवर अंधविश्वास याच भ्रामक कल्पनांभोवती होताना आढळतात.

**इंग्रजी शासनावर टीका :**

**१)** इंग्रजी शासनावर अरविंदांच्या आधिही अनेकांनी टीका केली होती. इंग्रजी सत्तेबद्दल आदर व सद्भाव बाळगूनही मवाळ नेत्यांनीसुद्धा गंभीर स्वरुपाची टीका त्या सत्तेवर केलेली आढळते. परंतु अरविंदांचे आगळेपण जर कशात असेल तर यात आहे की त्यांनी सरकारवर केलेली टीका प्रत्यक्ष, व सडेतोड होती. आपल्या टीकेला त्यांनी समाजशास्त्रीय व ऐतिहासिक विश्लेषणाचे अधिष्ठान दिले होते. त्यामुळे या टीकेने राष्ट्रभर खळबळ निर्माण केली. अशी टीका करण्यामागे अरविंदांचा दुहेरी हेतू होता; एक तर या खरमरीत टीकेतून भारतीयांना त्यांना हे दाखवून द्यायचे होते की राज्यकर्त्याबद्दल विनाकारण ज्या उच्च व श्रेष्ठ कल्पना तुम्ही बाळगल्या आहेत त्या वस्तुस्थितीला मुळीच धरुन नाहीत. तुम्ही समजता तेवढे निःस्वार्थ, व उत्तुंग पात्रतेचे हे राज्यकर्ते नाहीत! त्यांची राज्ययंत्रणाही तुम्ही समजता तेवढी निर्दोष व परिपूर्ण नाही. दुसरा हेतू असा होता की, राज्यकर्त्यांचे व त्यांच्या हेतूंचे जसजसे ओंगळवाणे दर्शन भारतीय जमानसाला होईल तसतशी त्या राज्यकर्त्याविषयी घृणा, तिरस्कार व संतापाची भावना बळावत जाऊन प्रक्षिप्त शक्ती जागी करणास हातभार लागेल.

**२) अरविंदांच्या टीकेचे दुसरे लक्ष्य होते इंग्रज राज्यकर्त्यांची धोरणे आणि इंग्रजी अधिकाऱ्यांचे वर्तन.** राज्यकर्त्यानी या देशात राबवलेल्या धोरणांचे दुष्परिणाम सर्वच क्षेत्रामध्ये प्रत्ययास येऊ लागले होते. या धोरणांमुळे भारतीयांची मानखंडना होऊ लागली होती, त्याचे आर्थिक अधःपतन व ऱ्हास कमाल वेगाने होत होता. अरविंदांनी या सर्वांगीण अनवस्थेचे अपश्रेय इंग्रज राज्यकर्त्याच्या पदरात घालून जनतेला या गोष्टीची जाणीव करुन दिली की येथे जे घडते त्याला हे शासन जबाबदार आहे. एतद्देशीयांच्या एखाद्या स्वभावदौर्बल्यामुळे हे घडत नाही. ज्या

भयंकर न्यूनगंडाने या राष्ट्राला पछाडले होते त्यातून बाहेर पडण्यासाठी अरविंदांच्या या लेखनाचा खूपच उपयोग झाला असावा.

**३)** इंग्रजांची या देशातील प्रशासनव्यवस्था येथील लोक-देश-काल परिस्थितीला मुळीच साजेशी नाही. 'आमची शिक्षणपद्धती म्हणजे मानवी मूर्खपणाने शोधून काढलेले एक अपूर्व व अतिचातुर्यपूर्ण खून करण्याचे यंत्र आहे. केवळ माणसाच्या शरीराचाच नाही तर त्याच्या आत्म्याचाही, त्याच्या मर्त्य अस्तित्वापेक्षा कित्येक पटींनी मौल्यवान व पवित्र असलेल्या त्यांच्यातील अस्मितेच्या स्फुल्लिंगाचाही खून ही शिक्षणपद्धती करते.' या शिक्षणपद्धतीतून जो 'आंग्लीकृत वर्ग या समाजात निर्माण झाला होता त्याच्यावरही टीकेचे आसूड ओढतात. या वर्गाला त्याकाळी खूप भाव होता, प्रतिष्ठा होती, मानमरातब होता. तो उच्चपदे विभूषित करीत होता. काँग्रेसवर त्याचे वर्चस्व होते. कायदेकौन्सिलात तो वांदग माजवीत होता, अरविंदाच्या संपूर्ण लिखाणातून या वर्गावर त्यानी निर्घृण टीकेचे प्रहार केले आहेत.'

## १.४ आध्यात्मिक राष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला : (Nationalism with Spirituation)

### १) भारताने स्वतंत्र व्हावे आणि आध्यात्मिक नेतृत्व करावे :-

पाश्चात्त्य राष्ट्रकल्पना आणि अरविंदाच्या लेखन व्यक्तिव्यांतून व्यक्त होणारी राष्ट्रकल्पना यात मूलतःच महदंतर आहे. पाश्चात्त्य आदर्शाची भुरळ पडून भारताने जर त्यांच्याप्रमाणे होण्याचा प्रयत्न केला तर तो त्याचा आत्मघात ठरेल. प्राचीन वारसा त्याला कायमचा गमावून बसावा लागेल आणि ती मोठीच शोकांतिका होईल, त्याबद्दल अरविंदांना मुळीच शंका नव्हती. भारताने 'राष्ट्र' व्हावे म्हणजे 'इतर राष्ट्राप्रमाणे समृद्ध व्यापारधंदे व व्यापार यांची वाढ करावी, भयंकर लष्करी सामर्थ्य वाढवावे, अत्यंत यशस्वीपणे राजकारण करावे - असे नाही' तर स्वतःचा आध्यात्मिक वारसा त्याने पुढे चालवावा. जगाला त्याची नितांत आवश्यकता आहे. समर्थ व स्वतंत्र भारत हवाच आहे, पण केवळ भौतीकदृष्टया संपन्न होऊन जगातील श्रेष्ठ राष्ट्र त्याने व्हावे एवढ्याचसाठी नव्हे तर आपल्या प्राचीन आध्यात्मिकतेच्या बळावर मानवमात्रांना त्याला सहाय्य व मार्गदर्शन करता यावे यासाठी ! स्वामी विवेकानंदांप्रमाणेच अरविंदांच्या अंतर्मनाची ओढ ही राजकारणापैक्षा अधिक अध्यात्माकडे होती. प्रत्यक्ष राजकारणात त्यांनी भाग घेतला तो सुद्धा उच्चतर अशा ध्येयाच्या प्राप्तीसाठीच, केवळ राजकारण करायचे म्हणून नव्हे! भारताला त्याची जी नियत भूमिका आहे - मानवी सभ्यतेच्या विकासातील सर्जनशील समन्वयाची दिशा दाखवणे, जगाला आध्यात्मिक नेतृत्व पुरविणे वगैरे - ती परतंत्र व परवश असताना हा देश पार पाडू शकत नाही. त्यासाठी त्याला स्वतंत्र, संघटित व समर्थ व्हायला पाहिजे. म्हणजेच अरविंदांच्या मते भारताचे स्वातंत्र्य हे काही अंतिम साध्य नाही, तर उच्चतर साध्याप्रत नेणारे हे केवळ एक साधन आहे. किंबहुना त्यामुळेच ते त्या चळवळीत पडताना आढळतात.

### २) For Him India was a Mtoherland :-

अरविंदांच्या मते, जोपर्यंत जनसामान्याचा अंतःचक्षूसमोर मातृभूमी केवळ भौगोलिक भूभाग व लोकसंख्या यापेक्षा अधिक व्यापक, अधिक जिवंत-दैवी आणि शक्तिमातेचे रुप घेऊन उभी राहात नाही, आपल्या सौंदर्यने जोपर्यंत त्यांची हदये व मने व्याप्त आणि काबीज करीत

नाही, तोपर्यंत त्या मातेची सेवा करण्याच्या बलवत्तर भावनेपुढे त्यांच्या इतर लहानसहान भीती व आशा गळून पडणार नाहित आणि तोपर्यंत मोठमोठाले चमत्कार घडवून आणणारी, राष्ट्राला त्याच्या दैन्यातून बाहेर काढणारी राष्ट्रभक्तीही निर्माण होऊ शकणार नाही. त्यामुळेच मातृभूमीची शरीरधारिणी, तेजस्विनी प्रतिमा जनमानसात प्रतिष्ठापित करण्यावर अरविंद भर देतात. 'वंदे मातरम्' मंत्राला प्रेरक व संजीवक मंत्र मानतात. ज्या मातेने युगायुगापासून आपल्या पुत्र-पौत्रांना जोपासले, पोसले ती माता आज परदास्याच्या शृंखलांनी बद्ध आहे. तिचा अभिमान, तिचा गौरव आज मातीत मिळत आहे. अशी तिची अवस्था असतांना तिच्या सुपुत्रांनी काय करावे? असा सवाल टाकून ते मातृभूमीच्या पायावर प्रसंगी आपले शिरकमळही अर्पण करण्याचे, आपल्या रक्ताने भारतमातेचे पाय धुण्याचे आवाहन तरुणांना करतात. त्यांच्या मते, मातृभूमीच्या स्वांतत्र्याची कशाशीच तडजोड होऊ शकत नाही.

**३) राष्ट्रीय मुक्तिसंग्राम, त्यांच्या मते एक महान आणि पवित्र असा यज्ञ आहे.** बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण वा अशाच इतर काही गोष्टी म्हणजे त्या महान यज्ञातील लहानमोठे विधी आहेत, या यज्ञाच्या वेदीवर भूमातेच्या चरणी केलेल्या बलिदानामधून अपेक्षित असलेले फलित म्हणजे स्वतंत्रता हे आहे. या यज्ञकुंडातल्या सात धगधगत्या अग्निजिव्हांवर आपण आपल्या सर्वस्वाचे, रक्तमांसासह आयुष्याचे, आप्तस्वकीयांच्या सुखसमाधानाचेही समर्पण केले पाहिजे. दुबळ्या वा अर्धवट बलिदानाने संतुष्ट होणारी ही देवता नाही.

## १.५ साध्य आणि साधन (स्वातंत्र्याविषयक)

**अरविंदांचे साध्य :-**

मवाळांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस जेव्हा वासाहतिक स्वायत्तेची मागणी करीत होती तेव्हा अरविंदांनी राष्ट्राच्या पूर्ण स्वराज्याची मागणी केली. कारण स्वातंत्र्य आंदोलनाला जनसामान्यांची चळवळ करण्याचा तेवढा एकच मार्ग त्यांना दिसत होता. त्याचप्रमाणे भारताची उपरोल्लेखित आंतरराष्ट्रीय भूमिका त्याला पार पाडता येण्यासाठीही त्याला पूर्णपणे स्वतंत्र होणे त्यांना आवश्यक वाटत होते. परिपूर्ण स्वातंत्र्याचे पहिले प्रमुख पुरस्कर्ते अरविंद हेच होत.'

दीडशे वर्षाच्या परवशतेने या देशाची केलेली आर्थिक, नैतिक व भौतिक दुरवस्था जनतेला जाणवू लागली, आपले राष्ट्र सर्वच दृष्टींनी इतक्या वाईट स्थितीला आले. स्वातंत्र्याखेरीज कोणत्याही लहानसहान गोष्टींचा पाठपुरावा करु नये, कारण तशाने मूलभूत प्रश्न सुटणार नाहीत, मवाळांच्या माफक मागण्या देशाच्या वर्तमान परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्रद्रोहात्मकच ठरतात - असा विचारही अरविंदांनी त्यांच्यासमोर मांडला.

'आमचे उद्दिष्ट स्वराज्याचे म्हणजे इंग्रजी सत्तेपासून व नियंत्रणापासून संपूर्ण स्वायत्ततेचे आहे. जगातल्या प्रत्येक राष्ट्राला स्वतःचे जीवन स्वतःच्या शक्तीच्या बळावर, स्वतःच्या स्वभावानुसार व आदर्शानुसार व्यतीत करण्याचा हक्क असायला हवा.' दीर्घकालीन दास्यामुळे या देशवासीयांच्या शक्तीवर विपरीत परिणाम झाला असला तरी ते आपल्या शक्तींना पुन्हा जागवू शकतात. फक्त त्यांना योग्य ती संधी मिळण्याचा अवकाश आहे. अशी संधी, त्यांचे स्वतःचे शासन असताना, मुक्त समाज असताना व भारताच्या श्रेष्ठ संस्कृतीचे येथे वर्चस्व असतानाच मिळू शकेल असे अरविंदांचे ठाम मत होते.

जेव्हा जग भौतिकतेच्या गर्तेत सापडून विकलांग होईल तेव्हा तेव्हा त्याला आपल्या दिव्य प्रकाशाचा आधार भारताला द्यावा लागणार असल्यामुळे त्याचे अस्तित्व कधीच संपुष्टात येणार नाही. जगाला भारताची गरज आह - स्वतंत्र समर्थ भारताची गरज आहे. 'अशाप्रकारे, स्वातंत्र्य हे अरविंदांसाठी केवळ एक राजकीय साध्य नव्हते, केवळ घटनात्मक तरतुदींची ती फरेरचना नव्हती, तर ती अशी एक सखोल आणि मूलभूत स्वरुपाची अध्यात्मिक गरज होती.'

त्यांची अशी खात्री होती की या देशाचा - आर्थिक, सामाजिक, प्रशासकीय इत्यादी क्षेत्रांतील - सर्वांगीण विकास जोपर्यंत हा देश परकीय राजवटीतून संपूर्णपणे मुक्त होत नाही तोपर्यंत घडून येणे अशक्य आहे. कोणत्याही प्रगतीचा मूळ आधार राजकीय स्वातंत्र्य हा असतो. म्हणून मवाळांप्रमाणे सामाजिक - आर्थिक मागण्यांभोवती वेळ दवडण्याऐवजी राजकीय मुक्तीच्या साध्यावर अरविंद आपले सारे लक्ष व साऱ्या शक्ती केंद्रित करताना आढळतात.

**स्वातंत्र्याची साधने -** मवाळांच्या 'प्रार्थना, अर्जविनंत्या व निषेध' इत्यादी मार्गाचा अरविंदांच्या लिखाणात अनेक जागी धिक्कार केलेला दिसून येतो. त्यांच्या मते, मवाळांचे मार्ग केवळ निष्फळच नाहीत तर भारताच्या आत्मसन्मानाला ते मारकही आहेत. राज्यकर्ते या मार्गाचे केव्हाही स्वागतच करणार, कारण किरकोळ सुधारणांचे काही तुकडे भिरकावून भारतीय नेत्यांच्या आदरास व भक्तिभावास ते विनासायास प्राप्त होऊ शकत असत. राज्यकर्त्यांची करुणा भाकण्यापेक्षा राष्ट्राचे पौरुष जागे करण्यावर अरविंदांचा जास्त भर होता. इंग्रजांना कळते ती केवळ राजकीय गरजेची भाषा! ते कोणतीही गोष्ट करायला तेव्हाच तयार होतात, जेव्हा ती करण्याखेरीज दुसरे गत्यंतरच त्यांना नसते.

त्यामुळे, ज्या मार्गानी भारताला स्वराज्य देणे या राज्यकर्त्यांना भाग पडेल असे स्वाभिमानी मार्ग या चळवळीने अवलंबिले पाहिजेत असे त्यांचे सांगणे होते. ते मार्ग घटनात्मकच हवेत असा आग्रह धरण्यातही त्यांना फारसे हशील वाटत नाही. कारण, ते म्हणतात, एक तर या देशात घटनाच नाही त्यामुळे घटनात्मक मार्गाची भाषा व्यर्थ आहे, आणि दुसरे असे की मवाळांचे हे मार्ग, जेव्हा शासक आणि शास्ते हे एकाच संस्कृतीचे असतात - म्हणजेच येथे स्वयंशासन असते - तेथेच यशस्वी होऊ शकतात. पुढील मार्ग अरविंदांना अधिक उचित व प्रभावी वाटतात. ते त्यांचा वारंवार पुरस्कार करतात. ते असेः

१) प्रत्यक्ष क्रांतिकारक कृतीचा मार्ग.

२) राष्ट्राच्या उज्जवल परंपरांचे व संपन्न वारशाचे स्मरण देऊन जनतेचा स्वाभिमान व राष्ट्रीय जागृत करणे.

३) सविनय प्रतिकाराचा मार्ग.

**प्रत्यक्ष क्रांतिकारक कृती : दहशतवाद आणि सशस्त्र उठाव :**

अरविंदांच्या मते चळवळीची साधने ही परिस्थितीसापेक्ष असतात किंवा तशी ती असावीत. गुलामगिरीची जी अवस्था व जशी स्थिती असेल त्यानुसार योग्य साधने अंमलात आणली गेल्यासच ईप्सित साध्य होऊ शकते; एरव्ही नव्हे.

चळवळीच्या अनेक मार्गांपैकी सशस्त्र उठाव हा एक मार्ग आहे. जगाच्या इतिहासात अनेक गुलामांनी व पीडितांनी या मार्गाचा अवलंब केला होता. आणि जेव्हा जेव्हा यशाची खात्री असेल तेव्हा तेव्हा तो मार्ग नेहमीच अवलंबिला जाणार आहे. कारण तो अत्यंत सोयीचा व गतिमान मार्ग आहे. परिणामांच्या दृष्टीने विलक्षण प्रभावी आहे. जनतेकडून दीर्घकालीन सहनशक्तीची व छळ सोसण्याची अपेक्षा तो ठेवीत नाही, तसेच कमीत कमी व अल्पकाळ बलिदानाने तो यशस्वी होऊ शकतो. अशी त्या मार्गासंबंधी अरविंदांची धारणा होती. स्वाभाविकच भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला सशस्त्र उठावाचे स्वरुप देण्याचे प्रयत्न त्यांनी केले होते.

**राष्ट्राचे निद्रिस्त चैतन्य जागे करणे :**

राष्ट्राचे सुप्त चैतन्य जागे करुन राष्ट्राबांधवांच्या मनात स्वतंत्र होण्याची ऊर्मी उफाळून आणणे हा तो मार्ग होता. त्याखेरीज जनतेचे शैथिल्य, अनास्था, नैराश्य नाहीशी होऊन ती ताजीतवानी व क्रियाशील होणार नाही हे अरविंदांनी ओळखले. जनतेची तत्कालीन अवस्था हाच एक मोठा मानसिक अडथळा या देशाच्या स्वातंत्र्यप्रयत्नांच्या वाटेत असल्याचे त्यांना जाणवले. त्यामुळेच 'आमची मने प्रथम स्वतंत्र केली पाहिजेत' असा आदेश त्यांनी दिला.

ते करण्याचा पहिला मार्ग, त्यांच्या मते, देशवासीयांच्या मनात आपल्या उज्जवल सांस्कृतिक वारशासंबंधी जाज्वल्य अभिमान निर्माण करणे, प्राचीन काळात भारत किती विविध क्षेत्रांत कीर्तीच्या उत्तुंग शिखरावर विराजमान होता याचे स्मरण देणे, धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, स्थापत्य, विविध कला, राजकीय व सामाजिक संघटन, राजकारण इत्यादी असंख्य क्षेत्रांत भारताने मिळवलेल्या यशाची जाणीव करुन देणे हाच होता. प्रबोधनात सुरु झालेल्या आध्यात्मिक - बौद्धिक पुनर्जीवनाचा उपयोग राष्ट्राकार्यासाठी करुन घेण्याचा हा मार्ग होता. चळवळीत मोठ्या संख्येने जनतेला सहभागी करुन घेणे, भवितव्यातील महात्मतेची पायाभरणी भूतकालीन महात्मतेद्वारे करणे, भारतीय राजकारणात भारतीय धर्माची कळकळ व अध्यात्मिकतेचे सामर्थ्य ओतणे असे अनेक हेतू या साधनांचा अवलंब करण्यामागे होते. 'वंदे मातरम्' मधील लिखाणातून फार प्रचंड प्रमाणावर हे कार्य अरविंदांनी केले. राष्ट्रीय सणांचा व उत्सवांचा 'राष्ट्राची थोर प्रतीके' म्हणून त्यांनी गौरव केला. टिळकांनी महाराष्ट्रात सुरु केलेल्या गणपती उत्सव व शिवजयंतीउत्सव या सार्वजनिक कार्यक्रमांचे राष्ट्रीय महत्त्व त्यांनी प्रतिपादित केले.

**सविनय प्रतिकार :-**

सविनय प्रतिकार - अरविंद काही जागी 'बचावात्मक प्रतिकार' अशीही संज्ञा वापरतात - हा भारताच्या मुक्तिसंग्रामासाठी सर्वोत्तम मार्ग आहे असे अरविंदांना वाटते. कारण या मार्गाने राज्यकर्त्यांना तर कोंडीत पकडता येतेच पण या देशातील नागरिकांवरही स्वावलंबनाचे व आत्मनिर्भरतेचे संस्कार केले जाऊ शकतात. शासनामधील आक्षेपार्ह भाग काढून टाकणे वगैरे. बंगालात प्रथम सविनय प्रतिकाराचा अवलंब बंगालाची फाळणी रद्द करविण्यासाठी करण्यात आल होता; तर कित्येकदा सविनय प्रतिकार हा अधिक व्यापक आणि पद्धतीत मूलगामी बदल घडवून आणण्यासाठी केला जातो. उदाहरणार्थ, बंगालच्या चळवळीला पुढे देशाच्या स्वातंत्र्यचळवळीचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते.

आक्रमक आणि बचावात्मक प्रतिकारांमधील फरक स्पष्ट करताना अरविंद लिहितात की, जेव्हा प्रतिकार आक्रमक असतो तेव्हा प्रतिकारकर्ता अशा काही गोष्टी करतो की ज्यांच्यामुळे शासनाला भरीव स्वरुपाचे नुकसान सोसायला लागावे. याउलट बचावात्मक अथवा सविनय प्रतिकारकर्ता अशा गोष्टी करण्यापासून परावृत्त होतो, ज्या केल्या असता शासनाला मदत होईल. दोन्ही पद्धतींचा हेतू एकच : तो म्हणजे शासनाला वठणीवर आणणे! जेथील शासन - प्रशासन हे मुख्यत्वे प्रजाजनांनी स्वेच्छेने दिलेल्या मदतीवर व मुकसंमतीवर चालते, अशा देशासाठी सविनय प्रतिकाराची पद्धती विशेष उचित ठरते. अरविंदांच्या मते भारातातील इंग्रजी राजवटीची स्थिती अशीच होती. त्यामुळे भारतीयांनी जर आपला पाठिंबा व मूकसंमती काढून घेतली तर ती राजवट या देशात चालू राहणे अशक्यप्राय होऊन जाईल. तिच्या मुळावरच घाव बसेल. 'नव्या प्रवाहाने आपल्या कार्यक्रमाच्या अग्रस्थानी ठेवलेल्या सविनय प्रतिकारातील पहिले तत्त्व म्हणजे, आहे त्या परिस्थितीत, ज्यायोगे या देशाचे शोषण करणाऱ्या ब्रिटिश व्यापाराला वा या देशावर प्रशासन करणाऱ्या ब्रिटिश व्यापाराला वा या देशावर प्रशासन करणाऱ्या ब्रिटिश नोकरशाहीला मदत होईल अशी कोणतीही गोष्ट करण्यास संघटितपणे नकार देऊन व्यापार व प्रशासन अशक्य करुन सोडावे - आणि जोपर्यंत परिस्थितीत लोकांना अपेक्षित बदल, अपेक्षित प्रमाणात घडून येत नाही तोपर्यंत हे असेच चालू ठेवावे. एका शब्दात हे तत्त्व सांगायचे तर त्याला 'बहिष्कार' असे म्हणतात येईल.' या बहिष्काराच्या अवलंबातून भारत जगासमोर, नैतिक शक्ति वा शांततापूर्ण दडपणाच्या द्वारे क्रांती घडवून आणल्याचे एक अभूतपूर्व उदाहरण ठेवू शकेल असे अरविंदांना वाटत होते.

हा बहिष्कार प्रभावी व्हायचा तर शासकीय कामकाजाच्या सर्वच आघाडयांवरुन तो लढला जायला पाहिजे. त्याचप्रमाणे बहिष्काराच्या यशासाठी दुसरी आवश्यक गोष्ट म्हणजे शासकीय कामकाज बंद पडल्यामुळे निर्माण होणारी पोकळी भरुन काढण्यासाठी राष्ट्रीय यंत्रणा व सेवा तयार पाहिजेत. राज्यांतर्गत दुसरे असे पर्यायी राज्य उभे केल्याखेरीज सविनय प्रतिकार होऊच शकणार नाही असे अरविंदाचे मत होते.

सविनय प्रतिकाराचा अवलंब केल्यानंतरही हिंसाचाराची व बलप्रयोगाची शक्यता त्यांनी कायमची बाद केलेली नाही हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. बहिष्काराच्या चळवळीबाबत शासन कशा प्रकारची भूमिका घेते यावरुन हिंसाचाराचा प्रयोग करावा की करु नये हे ठरावे असे अरविंदांचे मत होते. मातृभूमीचा सन्मान व कीर्ती धुळीत मिळवली जात असताना, तिचे क्रूर शोषण चालू असताना तिच्या सुपुत्रांनी तिच्या मुक्तीचे प्रयत्न करताना अवलंबिण्याच्या मार्गाच्या सूक्तासूक्ततेसंबंधी विचार करीत वेळ दवडणेच त्यांना नामंजूर आहे. हिंसाचार त्यांच्या राष्ट्रकल्पनेशी पूर्णतया सुसंगतच आहे.

सविनय प्रतिकाराला मर्यादा आहे. जोपर्यंत सरकार प्रतिकारकर्त्यांशी शांततेने व सौजन्याने वागेल तोपर्यंत प्रतिकारकर्ताही सविनय राहील. पण सरकारने जर आपली मर्यादासोडली तर त्यालाही स्वतःची मर्यादा सोडवी लागेल. सरकारच्या दडपेंगिरीला व क्रूर सक्तीला कायदेशीर कृती मानून तिच्यासमोर मान तुकवणे हे कृत्य भडकपणाचे ठरेल, राष्ट्राच्या पौरुषाचाच तो अवमान ठरेल, मातृदेवतेशी केलेली ती घोर वंचना ठरेल. शासनाकडून बळाचा वापर घडताच प्रतिकाराचे सविनय स्वरुप संपुष्टात येऊन त्याला सक्रिया स्वरुप येणे भाग ठरेल.

## ९.६ अरविंदाचा मानवी ऐक्याचा आदर्श :

जगाच्या इतिहासाचे अंतिम पर्यावसन हे मानवी ऐक्य हेच असू शकते. मानवमात्राच्या इतिहासातून या उत्क्रांतीची पावले ठळक दिसतात आणि यापुढे घडणाऱ्या इतिहासातूनही ती वाटचाल अखंड चालू राहाणार आहे. ही उत्क्रांती म्हणजे निसर्गाची योजना आहे. कितीही बलिष्ठ मानवी शक्ती तिला बदलू शकणार नाही वा अडवू शकणार नाही - असे अरविंदांना वाटते. पहिल्या महायुद्धाच्या विदारक, विध्वसक व संहारक परिणामांचा अनुभव घेतल्यावर आणि युद्धोत्तर परिस्थितीत राष्ट्राराष्ट्रातले संबंध कसे संशयपूर्ण व तणावपूर्ण झाले हे पाहिल्यानंतर तर त्यांच्या मनात ही खूणगाठ पक्की बसली की मानवमात्राच्या ऐक्याखरीज मानवमात्राचे अस्तित्व टिकवून ठेवू शकण्याचा दुसरा तरणोपायच नाही. अरविंदांनी त्यावेळी आपली जागतिक संघटनेची कल्पना मांडली 'दि आयडियल ऑफ ह्यूमन युनिटी' या नावाने तो ग्रंथ विख्यात आहे.

माणसाला माणसाकडे खेचणारी एक अदृश्य शक्ती असून तिच्याचमुळे मनुष्य समूहात राहतो. कुटुंब, वंश, ग्राम...... इत्यादी समूहांची उदाहरणे पाहता त्यावरुन एक निष्कर्ष काढता येतो की लहान समूहाकडून जाणे ही मानवी प्रवृत्ती आहे आणि या प्रवृत्तीपोटीच आज अस्तित्वात असलेल्या राज्यसंस्थेपेक्षा मोठी संघटना केल्याशिवाय मानवप्राणी राहणार नाही. ती संघटना कशी असेल ते आजच सांगता येणार नसले तरी ती अत्यंत गुंतागुंतीची असेल एवढे निश्चितपणे म्हणता येईल. कदाचित पुढीलप्रमाणे चार राष्ट्रसंघ (कॉन्फेडरेशन्स) त्यातून उभे राहू शकतील असे. अरविंदांना वाटते. युरोपची संयुक्त राष्ट्रे, दोन्ही अमेरिकांची संयुक्त राष्ट्रे, आशियाची संयुक्त राष्ट्रे आणि आफ्रिकेतील संयुक्त राष्ट्र, या चार राष्ट्रसंघाचे मिळून जागतिक संघराज्य अस्तित्वात येऊ शकेल असे ते अपेक्षितात.

राष्ट्राच्या या मानसिक एकजिनसीपणाचे अरविंदांना महत्त्व वाटते तेही आंतरराष्ट्रीय ऐक्याचा एक आवश्यक घटक या दृष्टीनेच! त्यांच्या मते, प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात दोन महत्त्वाचे टप्पे असतात. पहिला असतो राष्ट्रीय एकीकरणाचा व संघटीकरणाचा! आणि त्या टप्प्यावर राष्ट्र जेव्हा जाते तेव्हा दुसरा टप्पा त्याच्या दृष्टिपथात येतो. तो म्हणजे आंतरराष्ट्रीय सहअस्तित्वात स्वतःचे योग्य स्थान ग्रहण करण्याचा.

जागतिक संघटन अस्तित्वात येण्याच्या मार्गातील अडचणीची अरविंदांना पुरेपूर कल्पना होती. राष्ट्रराज्ये या जागतिक संघटनेला प्रतिकार करतील. राष्ट्रराज्ये ही सामूहिक आत्मप्रौढीवर उभी असतात ही आत्मप्रौढी पालटली पाहिजे. मानवतेच्या आध्यात्मिक धर्माचा प्रसार करुन व त्या धर्माचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हे करता येईल. तो आदर्श म्हणजे एक विराट असे दैवी अस्तित्व असून त्यात सगळी मानवजात एक आहे. पृथ्वीवरील मानवता हे तिचे वाहन आहे. मानवी वंश आणि मानवप्राणी ही तीच्या इथल्या प्रकटीकरणाची साधने आहेत. ज्ञानकक्षांच्या पत्नीकडे जाऊन पृथ्वीवर दैवी चैतन्याचे अधिराज्य निर्माण करणे हे तिचे साध्य आहे. मानवमात्रातील आध्यात्मिक ऐक्याच्या जाणिवेतून त्यांना मानसिक ऐक्याकडे घेऊन जावे लागेल. भारत हे करु शकेल.

हे होणार, एक दिवस निश्चित घडून येणार, याबद्दल अरविंदांना मुळीच संशय नाही. मानवाचा मूर्खपणा व स्वार्थ कितीही मोठा असला तरी निसर्गक्रमाची वाट अडविण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी नाही. मानवमात्राच्या मनात वसत असलेली ऐक्याची ओढ व परस्परसहानुभूती जागी झाली म्हणजे झाले.

## १.७ मूल्यमापन

भारतीय जनतेसमोर संपूर्ण स्वराज्याचा आदर्श ठेवण्याचे व तिला पारतंत्र्यातील नैतिक अध:पतनाची पहिली जाणीव करुन देण्याचे भारतीय राष्ट्रवादाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे कार्य अरविंदांनी केले आहे. राष्ट्रवादाचे प्रणेत म्हणून लाल, बाल आणि पाल हे त्रिकूट पुढे देशभर प्रसिद्ध झाले. अरविंदांचीच तशी इच्छा होती. कोणीतरी चळवळीची धुरा पुढे न्यावी या हेतूनेच ते त्यातून निवृत्त झाले व अधिक मूलगामी चिंतनासाठी पाँडेचरीच्या आश्रमात निघून गेले. तरीपण इतिहासाला याची नोंद घ्यावीच लागेल की, या त्रिकुटाइतकेच किंबहुना थोडे अधिकच कार्य भारतीय राष्ट्रावादासाठी अरविंदांनी केले आहे. राष्ट्रवाद ही त्यांच्या आत्म्याची सर्वश्रेष्ठ प्रेरणा होती; भौतिक पातळीवरुन उचलून स्वातंत्र्य आंदोलनाला त्यांनी उच्चतर आध्यात्मिक पातळीवर नेऊन बसवले. केवळ आर्थिक संपन्नता व विकास वा राजकीय स्वातंत्र्य या अर्थानेच भारताला स्वतंत्र व्हायचे नाही तर 'मुक्ती' च्या सर्वांगीण अर्थाने त्याने स्वतंत्र व्हावे.

### १) महत्वाचे स्थान असणारा स्वतंत्र्य सैनिक-(Leading freedom fighter) :-

सुभाषचंद्र बोस यांना सरकारी सेवा सोडून भारतीय स्वातंत्र्याचे प्रयत्न करण्याची प्रेरणा अरविंदांच्याच शिकवणुकीतून मिळाली. बोस यांनी स्वतःच असे लिहिले आहे की, 'अरविंद घोष यांचे सुप्रसिद्ध उदाहरण माझ्या दृष्टीसमोर सदैव आहे. ते उदाहरण ज्या त्यागाची अपेक्षा माझ्याकडून करते तो करावयास मी तयार आहे असे मला वाटते.'

या देशाच्या राजकीय जीवनाला त्यात प्रत्यक्ष सहभागी होऊन जी देणगी अरविंदांनी दिली आहे, ती या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक अविस्मरणीय सोनेरी पान म्हणून नेहमीच अजरामर राहील. त्यांचे राजकारण हे देशभक्तीचे राजकारण होते, सत्तेच्या राजकारणाला त्यात वावच नव्हता. मातृभूमीसाठी जास्तीत जास्त निःस्वार्थ सेवा कशी करता येईल, मोठ्यात मोठा त्याग कसा करता येईल आणि अधिकाधिक सोसण्याची संधी कशी मिळवता येईल यासाठी चाललेला हा प्रयत्न होता.

### २) अध्यात्मिक राष्ट्रावादाची संकल्पना - (Spiritual Concept of Nationalsim) :-

अध्यात्माला त्यांच्या विचारात मध्यवर्ती स्थान आहे. परंतु त्यांचे अध्यात्म पलायनवादी अध्यात्म नसून कृतिप्रवण अध्यात्म आहे. बडोद्याला गायकवाडांच्या सेवेत असल्यापासून ते पाँडेचरीच्या आश्रमातील विजनवासान येईपर्यंत ते क्रियाशून्य कधीच नव्हते. सक्रिय राजकाराणतून बाहेर पडल्यानंतरही त्यांनी भारतीय संस्कृतीच्या पुनर्मूल्यांकनाचे व भारतीय सांस्कृतिक वारशाच्या थोरवीचे निरुपण करुन या राष्ट्राचा स्वाभिमान जागवण्याचा प्रयत्न चालू ठेवला. सक्रिय राजकारणात असताना त्यांनी मांडलेल्या आध्यात्मिक राष्ट्रवादाशी सुसंगत असेच त्यांचे हे कार्य होते. धर्म आणि राजकारणाचे दोन्ही प्रवाह त्यांच्या आयुष्यात समांतर वाहत राहिले होते.

## १.८ प्रश्न

१) भारताच्या संदर्भात क्रांतीकारी राजकीय विचारांना अरविंदाच्या योगदानाची चर्चा करा.

२) भारतीय स्वातंत्र्य चळवळीला अरविंदानी केलेल्या योगदानाचे विवेचन करा.

३) अरविंदाची आध्यात्मीक राष्ट्रावादाची कल्पना स्पष्ट करा.

## १.९ संदर्भ

१) वर्मा व्ही. पी., 'द पोलीटिकल फीलॉसॉफी ऑफ श्री अरविंदो'.

२) कपूर एक, 'श्री. अरविंद घोष आणि बाळ गंगाधर टिळक'.

❖❖❖❖

# १०

# महात्मा गांधी - सत्य आणि अहिंसा (१८६९-१९४८)

**घटक रचना :**

१०.१ प्रस्तावना
१०.२ गांधीतत्वज्ञानाचे आधार
१०.३ गांधीचे राजकीय विचार
१०.४ गांधीची स्वराज्य कल्पना
१०.५ व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजवाद
१०.६ अहिंसा तत्वाचा सविस्तर अर्थ
१०.७ सत्याग्रह
१०.८ राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद
१०.९ मूल्यमापन
१०.१० प्रश्न
१०.११ संदर्भ

## १०.१ प्रस्तावना

राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर नामक गावी झाला. काठियावाड संस्थानच्या पदरी दिवाण म्हणून त्यांच्या पूर्वजांनी काम केले होते. घरचे वातावरण अत्यंत धार्मिक होते. धर्मश्रद्धेचा वारसा त्यांना प्रामुख्याने त्यांच्या मातेकडून मिळाला. वैष्णवपंथाचे संस्कार त्यांच्या मनावर अगदी बालपणापासून झाले. परंतु त्याच वेळी त्यांच्या घरात इतर पंथीयांना व इतर धर्मीयांनाही मुक्तद्वार असल्यामुळे सर्व धर्माबद्दलच्या सहिष्णुतेचेही बाळकडू त्याना तेथेच मिळाले.

त्यांचे बालपण पोरबंदरातच गेले. त्यांचे विद्यार्थी जीवन फारसे उज्ज्वल म्हणता येणार नाही. 'कोठल्याशा शाळेत मला घातले होते, कसेबसे काही पाढे शिकलो.. दुसरे काही एक आठवत नाही. त्यावरुन मी अनुमान करतो की माझी बुद्धी मंद असावी, आणि स्मरणशक्ती कच्च्या पापडासारखी असावी.' प्रकृतीने यथातथाच व स्वभावाने कच्चखाऊ असल्यामुळे त्यांना सवंगडीही फारसे लाभले नाहीत. घरकोंबडेपणा व एकलकोंडेपणा हे स्थायीभाव झाले. पुढे त्यांच्या बंधूनी त्यांना शिक्षणार्थ परदेशी पाठवले. विलायतेत त्यांची गाठ दोन थिऑसॉफिस्ट

मित्रांशी पडली. त्यांचा सहवास गांधीजींच्या जीवनाला नवी दिशा दाखवण्यास कारणीभूत झाला. त्यांच्या प्रेरणेने गांधी गीताध्ययनास प्रवृत्त झाले. त्याच त्यांच्या मित्रांनी बुद्धचरित्राशीही गांधींचा परिचय करुन दिला. एका ख्रिस्ती मित्राच्या सौजन्याने बायबलच्याही अंतरंगात त्यांना शिरता आले. या अनेक धर्मग्रंथांच्या समन्वयानेच गांधीच्या भावी जीवनाची तात्त्विक पायाभरणी झाली आणि पुढे सत्याग्रहाच्या त्यांच्या प्रयोगाला लागणारी साधनसामुग्री गोळा झाली. विलायतेतील वास्तव्याची दुसरी एक जमेची बाजू म्हणजे कायद्याची पदवी त्यांनी पदरात पाडून घेतली.

काठियावाडला काही दिवस वकिली केली पण तिथल्या वातावरणाला ते लवकरच विटले. इतक्यात पोरबंदरच्या एका मेमण पेढीतर्फे दक्षिण आफ्रिकेतील दावा चालवण्यासाठी जाण्यांची संधी त्यांना मिळाली. गांधींच्या जीवनाला महत्त्वाचे वळण देणारी ही त्यांची दुसरी परदेशयात्रा ठरली. तिथे टॉलस्टॉय, रस्किन आणि थोरो यांच्या विचारवैभवाशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांच्या जीवनावर, कार्यावर व तत्त्वज्ञानावर या त्रयीच्या विचारांचा खोल ठसा उमटला व तो पुढे जन्मभर टिकला. आपल्या आत्मकथेत एक संपूर्ण प्रकरण त्यांनी रस्किनच्या 'अन् टु धिस लास्ट' नामक पुस्तकाच्या आपल्यावर झालेल्या प्रभावाचे वर्णन करण्यासाठी खर्चिले आहे. पुढे त्यांनी त्या पुस्तकाचे गुजराती भाषांतर 'सर्वोदय' या नावाने केले. ते म्हणतात सर्वोदयाचे सिद्धांत मी समजलो ते असे :

१) सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.
२) वकील काय किंवा हजाम काय, दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.
३) साधे, अंगमेहनतीचे, शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.

अर्थात रस्किनशी त्यांचे असे नैतिक - आध्यात्मिक सख्य जडले असले तरी राजकीय विषयावर त्या दोघांमध्ये मौलिक स्वरुपाचे मतभेद होते. रस्किन लोकशाहीपेक्षा सुज्ञांच्या शासनाची तरफदारी करीत होता. गांधींना हे पटणेच शक्य नव्हते. राज्याचे स्वरुप आणि कार्य याबद्दलही त्या दोहोंत मतभेद होते.

राजकीय क्षेत्रांत गांधींच्या असहकारविषयक मतांना थोरोच्या विचारांनी पुष्टी दिली. 'दक्षिण आफ्रिकेत मी जे कार्य आरंभिले होते त्याला थोरोलिखित 'ड्यूटी ऑफ सिविल डिस्ओबिडियन्स' या निबंधामुळे शास्त्रीय दृढता प्राप्त झाली.' अशा शब्दांत स्वतः गांधींनीच थोरोंचे ऋण मान्य केले आहे.

टॉलस्टॉय यांचाही गांधींवर अधिक खोल प्रभाव पडलेला आढळतो. आपल्या आयुष्यातील बऱ्याच गोष्टींचे श्रेय गांधी टॉलस्टॉयना देतात. टॉलस्टॉयच्या 'किंगडम ऑफ गॉड' ग्रंथामधील 'ईश्वराचे साम्राज्य तुमच्यात आहे' या संदेशामुळे गांधी भारावून गेले. मे ३०, १९१० रोजी गांधींनी 'टॉलस्टॉय फार्म' ची स्थापना केली. सविनय प्रतिकाराचे मार्ग व तत्त्वज्ञान यांच्या प्रयोगाची ती प्रयोगशाळा व्हावी अशी गांधींची अपेक्षा होती.

दक्षिण आफ्रिकेत गांधींना सत्याग्रहाचा मार्ग गवसला. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना न्याय मिळवून देण्याचे त्यांचे सर्व प्रयत्न म्हणजेच 'सत्याचेच प्रयोग' होते. वर्षभर राहण्याच्या इराद्याने तेथे गेलेले गांधी वीस वर्षे तिथे राहिले. १८६३ ते १९१४ त्यांचा गोऱ्या सरकारविरुद्ध

अहिंसात्मक लढा सुरु होता. आत्म्याच्या शस्त्राने त्यांनी जुलुमाशी झुंज दिली आणि शेवटी ते यशस्वी झाले.

भारताच्या राजकारणात गांधींजीनी प्रवेश केला तो काळ प्रथम महायुद्धाच्या समाप्तीचा काळ होता. त्यावेळी भारतीय स्वातंत्र्य चळवळीची अवस्था द्विधा झाली होती. मवाळ आणि नेमस्त यांच्यातील संबंध दुरावलेले होते. मात्र गांधींबद्दल त्या दोन्ही गटांना सारखाच आदर होता. गोखल्यांना गांधी आपले राजकीय गुरु मानतात. साधनशुचितेचा आग्रह आणि राजकारणाचे आध्यात्मीकरण इत्यादी संकल्पना गोखल्यांपासून गांधीनी उचलल्या होत्या. गोखले - टिळक या दोन्ही प्रवाहांच्या समन्वयातून एक तिसराच अभिनव प्रवाह गांधींनी निर्माण केला यातच त्यांच्या यशाचे रहस्य होते. गांधी - उदयापूर्वी फक्त दोनच मार्ग होते. एक, सनदशीर व शांततामय चळवळीचा आणि दुसरा हिंसक उठावाचा. गांधींनी प्रथमच, जी सनदशीर असेल वा नसेलही पण शांततापूर्ण असेलच अशी अभिनव चळवळ जनतेसमोर मांडली.

रौलट कायदा व जालियनवाला बाग हत्याकांड या प्रकरणी सरकारविरुद्ध गांधींनी १९२१ साली सुरु केलेल्या असहकाराच्या अहिंसात्मक आंदोलनाने देशात नवचैतन्याची लाट उसळली. चौरा - चौरी येथे चळवळीने हिंसक वळण घेताच गांधींनी असहकार मागे घेतला. कारण केवळ सत्य - अहिंसा या नैतिक शस्त्रांच्याच बळावर चळवळ चालावी असा त्यांचा आग्रह होता. त्या दृष्टीने त्यांच्या पहिल्या चळवळीत अपयश आले. त्यानंतर त्यांनी अधिक जोमाने, अधिक पद्धतशीरपणे व सूत्रबद्धरीत्या चळवळ उभी करण्याचा प्रयत्न सुरु केला. रचनात्मक कार्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. खादीग्रामोद्योगास उत्तेजन दिले. 'यंग इडिया' नामक साप्ताहिक काढून निरनिराळ्या विषयांवर लेखन केले. त्यानंतर 'हरिजन' नावाचे बहुभाषीय नियतकालिक सुरु केले.

१९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये पूर्ण स्वराज्याचे ध्येय जाहीर झाले. गांधीजींच्या हाती दुसऱ्यांदा अहिंसात्मक आंदोलनाची सूत्रे आली. १९३० साली देशव्यापक सविनय कायदेभंगाचा आदेश त्यांनी दिला. गांधींना अटक झाली तरी पाऊल मागे हटले नाही. याच सुमारास लॉर्ड आयर्विन यांच्याशी एक करार त्यांनी केला. गांधी - आयर्विन करार म्हणून तो प्रसिद्ध आहे. त्यानुसार लंडनच्या गोलमेज परिषदेस ते उपस्थित राहिले. परंतु जातीय समस्येवर तोडगा काढण्यास परिषदेस यश येऊ शकले नाही. गांधींनी पुन्हा सत्याग्रह सुरु केला. तो १९३४ पर्यंत चालला. गांधी त्यावेळी हिंदुस्थानचे एकमेवाद्वितीय नेते ठरले होते. एवढ्या प्रचंड देशातील विराट चळवळीचे नेतृत्व एकट्या व्यक्तीच्या हाती असण्याचा जगाच्या इतिहासातील हा पहिलाच प्रसंग होता. १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वये प्रांतांमध्ये मंत्रिमंडळे अस्तित्वात आली. द्वितीय महायुद्धाच्या वेळी भारतीयांच्या इच्छेविरुद्ध हिंदुस्थान युद्धात सामील असल्याचे इंग्रज सरकारने जाहीर केले. याच्या निषेधार्थ काँग्रेसी मंत्रिमंडळांनी राजीनामा दिला आणि काँग्रेसने गांधींजीच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह (१९४०) चालवला. गांधीजींच्याच प्रेरणेने १९४२ साली 'चले जाव' ची चळवळ सुरु झाली. त्या चळवळीने या देशातील साम्राज्याचा पाया खिळखिळा केला. गांधींना अटक झाली. कारागृहात त्यांनी २१ दिवसांचे आत्मशुद्धीस्तव उपोषण केले. १९४४ साली त्यांना सोडण्यात आले. त्यावेळी जिनांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानच्या मागणीने मूळ धरले होते. आपला द्विराष्ट्र सिद्धांत ते आग्रहाने प्रतिपादीत होते. गांधीजींना फाळणीची कल्पना पसंत नव्हती. अस्पृश्योद्धारा इतकेच हिंदु - मुस्लिम ऐक्य हे त्यांचे अत्यंत प्रिय स्वप्न होते. जिनांशी त्यांनी वाटाघाटी केल्या. पण त्या फसल्या. १९४६ मध्ये काँग्रेसचे अंतिम शासन सत्तेवर आले.

माउंटबॅटन योजनेनुसार हिंदुस्थानची भारत व पाकिस्तान अशी फाळणी होऊन १९४७ साली ते दोन्ही देश स्वतंत्र झाले. गांधीजींचे एक स्वप्न स्वातंत्र्यरुपात साकार झाले

**गांधीचे लिखाण :-** 'द इंडियन ओपीनियन', 'द यंगइंडिया', 'हरिजन' या साप्ताहिकांमध्ये ते आपले विचार मांडीत असत. 'माझे सत्याचे प्रयोग' गांधीचे आत्मचरित्र आहे. 'हिंद स्वराज्य' या पुस्तकातही त्यांनी विचार मांडले.

## १०.२ गांधीतत्वज्ञानाचे आधार

१) सत्य, २) अहिंसा, ३) साध्य आणि साधनाची सूचिता या तीन तत्त्वांवर संपूर्ण गांधीतत्त्वज्ञान आधारलेले आहे.

सत्य म्हणजेच परमेश्वर; जो सद्सद्विवेकाच्या रुपात प्रत्येक व्यक्तिमध्ये असतो. सत्याच्या प्राप्तीसाठी प्रार्थना, मानवतेची सेवा, व्यक्तिगत जीवनात अहिंसा तत्वाचे पालन करुन आचार, विचार, कृती शुद्ध ठेवणे म्हणजेच अहिंसातत्वाचे पालन गांधींना आवश्यक वाटत होते. कोणतेही साध्य प्राप्त करण्यास साधनही शुद्ध असावे असे गांधीचे मत होते.

गांधीचे संपूर्ण राजकीय विचार, त्यांची विकेंद्रीकरणाची, स्वराज्याची व्यक्तिस्वातंत्र्याची आणि सत्याग्रह कल्पना, राष्ट्रवाद इत्यादी सर्वच तत्वज्ञान आणि त्यांचे कार्य सत्य अहिंसा आणि साध्य साधन सूचिता या तत्वांवर आधारलेले आहेत.

## १०.३ राजकीय विचार

आधुनिक भारतातील बहुसंख्य विचारवंतांप्रमाणेच गांधींनीसुद्धा कोणताही राजकीय सिद्धांत मांडला नाही, तत्त्वज्ञानात्मक प्रमेय मांडले नाही. अनेक विषयांवर स्फुट विचार त्यांनी आयुष्यभर मांडले. ते राजकीय सिद्धांती नव्हतेच, ते राजकीय कर्मयोगी होते. राजकीय सत्तेच्या कार्याचे व स्वरुपाचे पद्धतशीर व मुद्देसूद विवेचन त्यांच्या लेखनात, भाषणांत आढळणार नाही. विशिष्ट वस्तुस्थितीवरील माध्यमांच्या स्वरुपात त्यांचे विचार अभिव्यक्त झाले आहेत. घटनांना व प्रसंगांना नवे वळण, नवा आशय प्राप्त करुन देणे हा त्या विचारांचा हेतू होता, किंवा माणसाला नैतिक माणूस बनवणे ही त्यांच्यामागील प्रेरणा होती.

१) **राजकारणाचे नैतिकीकरण :-** राजकारणाचे आध्यात्मीकरण व्हावे असा गोखल्यांप्रमाणे गांधीचांही आग्रह होता. राजकारणाचे आध्यात्मीकरणाचा गांधींना अभिप्रेत असलेला अर्थ राजकारणाचे नैतिकीकरण असा होता. त्यामुळेच त्यांनी राजकीय साध्ये मिळवताना शक्ती व संघर्ष यांच्यापेक्षा जनसामान्यांचा अभ्युदय, मानवी गुणांची जोपासना, सामाजिक समता व न्याय यांच्यावर अधिक भर दिला. राजकारणात सत्याची व न्यायाची, मूल्यांची प्रतिष्ठापना करणे हे 'आध्यात्मीकरणा' चे प्रयोजन होते.

२) **साध्यसाधन सूचिता :-** राजकीय साध्य-साधनांबद्दलची गांधींची मते ही त्यांच्या धार्मिक आणि नैतिक मनोवृत्तीतूनच निष्पन्न झाली आहेत. 'साधन हे बीजसारखे आहे व साध्य म्हणजे त्या बीजातून निर्माण होणारा वृक्ष. बीज - वृक्ष यांचा संबंध जितका अभेद्य आहे तितकाच साधन-साध्य यांचा आहे.' त्यांच्या मते भ्रष्ट साधनांची परिणती भ्रष्ट साध्यात होते. असत्य व अप्रामाणिकपणा यांच्याद्वारे सत्याचा साक्षात्कार होऊ शकत नाही. ज्या प्रमाणात आपली साधने विशुद्ध असतील त्या प्रमाणात अधिक वेगाने साध्याकडे आपली वाटचाल शक्य होईल. अशी त्यांची राजकीय विचारांची आध्यात्मिक - नैतिक बैठक होती. आत्मसाक्षात्कार हे गांधींच्या मते अंतिम साध्य होते. ज्या प्रमाणात राजसत्ता व तिच्याशी संलग्न असलेल्या इतर संस्था ज्या साध्याप्रत पोचण्यास कारणीभूत होतात तितक्याच त्या समर्थनीय ठरतात;

३) **शासनाला कमीतकमी सत्ता असावी :-** राजसत्तेच्या कक्षेत वाढ होणे व्यक्तिस्वातंत्र्याला मारक ठरेल अशी त्यांना भीती होती. आदर्शतः राज्यसत्ता व राज्यसंस्था अस्तित्वातच असू नयेत अशी अ-राज्यवादी भूमिका त्यांची होती. परंतू मानवी स्वभावाच्या कच्चेपणामुळे व त्रुटींमुळे तो आदर्श प्रत्यक्षात येणे शक्य नाही याचीही त्यांना जाणीव होती. म्हणून आदर्शांशी तडजोड करुन राज्यसत्तेच्या अस्तित्वाला ते मान्यता देतात. शक्तीवर, सत्तेवर आणि हिंसाचारावर आधारलेल्या निरंकुश राज्यसत्तेला त्यांचा विरोध मात्र कायम होता.

त्यामुळेच थोरोप्रणीत 'जे शासन कमीत कमी सत्ता चालवते ते सर्वोत्तम शासन होय' या विचाराचा पुरस्कार गांधी करताना आढळतात.

४) **व्यक्तिस्वातंत्र्य :-** व्यक्तींच्या उपक्रमशीलतेला वाव मिळण्याच्या दृष्टीने व्यक्तिस्वातंत्र्याची नितांत आवश्यकता असते. व्यक्तीच्या व व्यक्तीच्या हक्कांचाही विचार गांधी तिच्या सर्व सामाजिक संबंधाच्या संदर्भात करतात. माणसाला आपल्या सुप्त शक्तींचा परिपूर्ण विनियोग करता येऊन सामाजिक हितातील आपला वाटा उचलता यावा हे हक्कांचे प्रयोजन असून अशा हक्कांचे संरक्षण करणे हे प्रत्येक शासनाचे कर्तव्य आहे असे गांधीना वाटते. व्यक्तीचे हक्क गांधींजीच्या मते नैसर्गिक असतात. मात्र व्यक्तीची कर्तव्येही ते तितकीच नैसर्गिक मानतात. व्यक्तिहित समाजहितापासून वेगळे काढले जाऊ शकत नाही. खरे तर सामाजिक हिताला ते प्राधान्य देताना आढळतात. त्यांच्या मते 'प्रत्येक हक्क हा शेवटी आपापले कर्तव्य बजावण्याचा हक्क ठरतो. ते म्हणतात, आपले कर्तव्य बजावण्याचा हा एकमेव असा हक्क आहे की ज्यासाठी माणसाने जगावे आणि प्रसंगी मरावेही! त्यात इतर सर्व कायदेशीर हक्कांचा अंतर्भाव होतो.' हक्कांचा मूलस्त्रोत कर्तव्य हा आहे. हा संदेश गीतेच्या 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या वचनातून त्यांना मिळाला असावा. राज्यसंस्था हक्क काढून घेऊ शकत नाही; कारण ती त्यांची निर्माती नाही. हक्कांना राज्याने फक्त संरक्षण द्यावे अशी गांधींची अपेक्षा होती.

५) **राज्याचा पाया :-** गांधींच्या मते राज्याचा पाया केवळ राज्याची शक्ती वा व्यक्तींनी केलेले मूक आज्ञापालन नसून व्यक्तींचे सक्रिय सहकार्य हा आहे. सरकार कितीही जुलमी असो, शासितांच्या संमतीवाचून ते अधिकारावर राहूच शकत नाही. कित्येकदा ही संमती हुकूमशहा सक्तीने मिळवतात हे खरे असले तरी ज्याक्षणी त्यांची जनतेला भीती वाटेनाशी होते

त्याक्षणी त्यांची साम्राज्ये मातीमोल होतात. जेव्हा जेव्हा जनता राज्यकर्त्यांच्या जुलमी, अन्यायी आज्ञा मूकपणे करते तेव्हा राज्यकर्त्यांच्या त्या पापात तीही वाटेकरी असते. तिने अशावेळी आपला सहभाग, आपले सहकार्य नाकारले पाहिजे.

६) **विकेंद्रीकरण :-** स्वराज्याकडे जाणारा सर्वात निकटचा मार्ग गांधींच्या मते विकेंद्रीकरण हा आहे. प्रत्येक खेडे हा या नव्या रचनेचा केंद्रबिंदू असेल. कारण त्यांच्या मते 'भारताचे दर्शन मूठभर शहरांमध्ये नव्हे तर त्याच्या सात लाख खेड्यांमध्ये' घडते. केंद्रबिंदू असलेल्या खेड्याच्या केंद्रस्थानी व्यक्ती असेल. राज्याचि रचना खाली रुंद व वर निरुंद होत गेलेल्या पिरॅमिडप्रमाणे नसेल तर सागरी वर्तुळाप्रमाणे असेल. त्या वर्तुळाचा मध्यबिंदू व्यक्ती असुन ती नेहमी खेड्यासाठी आत्मसमर्पण करायला तयार असेल. आर्थिक विकेंद्रीकरणलाही गांधीच्या विचारात महत्त्वपूर्ण स्थान ्हे. मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण न करता, शेती व ग्रामोद्योगांचा विकास यावर भर द्यावा यावर त्यांचा भर होता.

७) **पाश्चात्य लोकशाही गांधींना मान्य नव्हती.** भांडवलशाहीला महत्त्व देणारी, भौतीकरणाला महत्त्व देणारी पद्धती त्यांना मान्य नव्हती. भारतात खरी लोकशाही स्थापन होण्यासाठी खालील तत्वांवर त्यांनी भर दिला होता.

१) राजकीय आणि आर्थिक विकेंद्रीकरण.
२) मुलोद्योगांवर आणि मूल्यांवर आधारीत शिक्षण.
३) अस्पृश्यतेचे उच्चाटन.
४) जातीय सलोखा.
५) राजकारणाचे आध्यात्मिकरण आणि नैतिकीकरण.
६) स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी ग्रामीण व्यवस्था.
७) साध्य साधन सूचिता यावर आधारीत प्रतिकारतंत्र - सत्याग्रहमार्ग.

## १०.४ स्वराज्याची कल्पना

हिंदुस्थानाला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज आपली सामाजिक, आर्थिक व राजकीय ध्येये साध्य होणार नाहीत हे गांधींना पूर्णपणे ठाऊक होते. 'इंग्रजी राजवटीतून मुक्ती व्हावी असे मला व्यक्तिशः वाटते.. त्यासाठी वाटेल ती किंमत देण्याची तयारी आहे. या राजवटीच्या मोबदल्यात इथे अराजक आले तरी मला चालेल. कारण या राजवटीतील शांतता ही स्मशानशांतता आहे. देशातील सर्व जनतेच्या या जिवंत मरणापेक्षा दुसरी कोणतीही स्थिती उत्तमच असेल. या सैतानी राजवटीने या सुंदर भूमीला भौतिक-नैतिक आणि आध्यात्मिक या तिन्ही दृष्टींनी जवळजवळ उद्धवस्त केले आहे. प्रत्येक राष्ट्राला जसा आपल्या पद्धतीने आपले जीवन जगण्याचा हक्क आहे तसाच आपले शासन चालवण्याचाही आहे, असे गांधींचे मत होते. त्यामुळे त्यांच्या 'स्वराज्य' कल्पनेत 'राजकीय स्वातंत्र्याचा' समावेश होता.' युरोपातील अनेक राष्ट्रे अशी स्वतंत्र आहेत, पण तिथे सर्वत्र स्वराज्य नांदते असे समजणे चूक ठरेल असे गांधी म्हणतात. आशिया - आफ्रिकेतील जनतेची स्वार्थासाठी पिळवणूक करणारी ही राष्ट्रे स्वतःही विशिष्ट सत्ताधारी वर्गाच्या वा जातीच्या हातून पिळली जात असतात. आणि हे लोकशाहीच्या नावाखाली चालू असते. हिंदुस्थानला असे स्वातंत्र्य नको. म्हणून गांधींनी स्वतःला एकाच वेळी दोन कार्यांना वाहून घेतले. एका बाजूने राजकीय स्वातंत्र्याप्रीत्यर्थ चाललेल्या लढ्याचे नेतृत्व केले व त्यासाठी परकीय राजवटीला व शोषणाला विविध मार्गांनी प्रतिकार केला, आणि दुसऱ्या

बाजूने खादीग्रामोद्यागादी मार्गांनी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना, अस्पृश्यतानिवारण, मूलाद्योग शिक्षण, किसानांचे व कामगारांचे संघटन इत्यादी मार्गांनी या राष्ट्राच्या सामाजिक - आर्थिक जीवनाचा घाट बदलण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी मूलभूत रचनात्मक कार्याचा एक सधन कार्यक्रम त्यांनी हाती घेतला.

प्रातिनिधिक संस्थापेक्षा त्यांचा भर लोकशक्तीवर आहे. खरे स्वराज्य मूठभरांच्या हाती सत्ता आल्याने अस्तित्वात येणार नाही, तर त्या सत्तेचा गैरवापर होताच तिला प्रतिकार करण्याची क्षमता सर्वांच्या अंगी निर्माण झाल्यानेच ते येणार आहे. म्हणजेच 'सत्तेवर नियमन व नियंत्रण ठेवण्याच्या आपला क्षमतेची जनसामान्यांना शिकवण देण्यातूनच स्वराज्याची स्थापना होऊ शकते' असे गांधीचे मत होते. लोकांकडे संसदेकडून सत्तेचा ओघ येतो हा समजच चुकीचा आहे. सत्य असे आहे की सत्ता जनतेच्याच ठायी कायम वास्तव्य करुन असते. काही काळाकरिता ज्यांना आपले प्रतिनिधी म्हणून ती निवडते त्यांच्या हाती ती सत्ता जनता तात्पुरती सोपवते. लोकांपासून निराळी अशी कोणतीच सत्ता - नव्हे अस्तित्वच - संसदेला संभवत नाही, हे साधे सत्य गांधीना लोकांच्या मनावर बिंबवायचे होते. देशातील एकूणएक व्यक्तीने अन्याय कायद्याला प्रतिकार करायचे ठरवल्यानंतर जगातील कोणतीही सत्ता आज्ञापालनाची सक्ती करण्यास समर्थ नसते. असा कायदा मोडून त्यासाठी असणारी शिक्षा भोगण्याची तयारी जनतेने दाखवल्यास ती संपूर्ण कार्यकारी सत्तेला लगाम घालू शकते. राज्य आपल्या पाशवी बळाचा वापर अल्पसंख्येत असणारांवर करु शकते परंतु लोकांच्या निर्धारशक्तीपुढे त्या बळाचे काहीच चालत नाही.

स्वराज्य हे, गांधीच्या मते, केवळ काही सुशिक्षित व धनिक लोकांची मिरासदारी असून चालणार नाही. कोणत्याही वांशिक - धार्मिक भेदभावाला त्यात जागा असणार नाही. ते सर्वांसाठी असेल. सुशिक्षित धनिकांसाठी जितके असेल तितकेच, किंबहुना अधिकच ते अंधांसाठी, पंगूंसाठी,घाम गाळूनही उपासमार भोगणाऱ्या लक्षावधींसाठी असेल.

गांधीजींची स्वराज्यकल्पना चौरसाकृती होती. चौरसाच्या एका कोपऱ्यावर राजकीय स्वातंत्र्य, दुसऱ्यावर आर्थिक स्वातंत्र्य, तिसऱ्यावर नैतिक - सामाजिक आणि चवथ्या कोपऱ्यावर धार्मिक स्वातंत्र्य असेल, यापैकी कोणताही कोन बिघडल्यास स्वराज्याच्या चौरसाचा आकारच पार बिघडेल असे गांधी मानीत असत. गांधीचे स्वराज्य म्हणजे सदाचाराचे राज्य होते. स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय यांनी परिपूर्ण असा तो अहिंसक समाज होता.

श्रमिकांचे राज्य जगात प्रस्थापित व्हायचे असेल तर श्रमनिष्ठ जीवन जगणे हे पायाभूत मूल्य म्हणून समाजात रुजले पाहिजे' असे गांधींना वाटत होते. यंत्रांना त्यांचा विरोध होता कारण यंत्रे ही भांडवलदारी शोषणाची साधने ठरतात. जी यंत्रे श्रमनिष्ठ जीवनाच्या अप्रतिष्ठेस व कोणाच्या ना कोणाच्या शोषणास कारणीभूत होत नाहीत त्यांना गांधींचा विरोध नव्हता. चरखा हे गांधींच्या मते स्वयंपूर्णतेचे प्रतीक होते. समजाच्या दुबळ्या वर्गांना समर्थपणे ज्याचा वापर करुन शोषणाशी लढा देता येईल असे ते साधन होते. आपण आपल्या प्रत्यनांनी आपली उन्नती करु शकतो व आपल्या इच्छेनुसार आपले भवितव्य ठरवू शकतो असे बहुजनसमाजाला जेव्हा वाटेल तेव्हाच भारताला पूर्ण स्वराज्य मिळाले आहे असे म्हणता येईल असे गांधींना वाटते. जेव्हा राजकीय स्वातंत्र्य हेच स्वयमेव साध्य मानले जात असे, अशा काळात गांधींनी जनता हीच सार्वभौम सत्तेची अधिष्ठात्री असून दीनदलितांचे कल्याण स्वराज्यांचे साध्य आहे ही अभिनव कल्पना मांडली.

## १०.५ व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजवादाचामेळ

१) समाजजीवनात, गांधींच्या मते, **व्यक्ती ही केंद्रस्थानी असावी.** ज्या ठिकाणी व्यक्तीची उपेक्षा होते तो समाज व्यर्थ होय. राज्याच्या व शासनाच्या अस्तित्वाचे व सत्तेचे मूळ व्यक्ती असून, व्यक्तीलाच मूलभूत घटकांचे महत्त्व आहे. व्यक्तीच्या अंतिम अधिसत्तेच्या या संकल्पनेतूनच गांधींचा अहिंसक असहकाराचा सिद्धांत आकारास आला आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या आड येणाऱ्या शोषणव्यवस्थेविरुद्ध व राज्यसत्तेविरुद्ध व्यक्तीला संरक्षण देणे हा अहिंसक असहकाराचा हेतू होता. 'खरीखुरी लोकशाही किंवा जनतेचे स्वराज्य, अप्रामाणिक व हिंसात्मक मार्गांनी कधीही साध्य करता येणार नाही याचे कारण या मार्गाचा अवलंब करणे म्हणजे आपल्या विरोधकांना दडपून टाकून किंवा त्यांचे निर्मूलन करुन सर्व विरोधच नष्ट करुन टाकणे. हे व्यक्तिस्वातंत्र्याला पोषक नाही. विशुद्ध अहिंसेच्या पालनातच व्यक्तिस्वातंत्र्याला पूर्ण आविष्कार होऊ शकतो. सबळ दुर्बळांना समान संधी अहिंसेखेरीज अन्य कोणत्याच मार्गाने मिळू शकणार नाही. व्यक्तीचे हे नैतिक मूल्य हा गांधी तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. आधुनिक यंत्रयुगीन सभ्यतेला, आधुनिक सार्वभौम केंद्रीभूत राज्यसत्तेला गांधीजी विरोध करतात ते व्यक्तिविषयक वरील धारणेतून.' व्यक्ती मग ती कितीही सामान्य असो, तिला न्याय मिळणे ही गांधीच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट असून बाकी सगळ्या गोष्टी गौण आहेत.

व्यक्तिस्वातंत्र्य नाकारुन कोणत्याही समाजाची उभारणी करता येणे संभवनीय नाही, असे गांधींचे मत होते. ते म्हणतात, स्वराज्य हे अंतिमतः व्यक्तीचेच असते - 'लोकांचे स्वराज्य' म्हणजे व्यक्तींच्या स्वराज्याची बेरीज. व्यक्तींनी नागरिक म्हणून आपापली कर्तव्ये बजावली तरच असे स्वराज्य स्थापन होऊ शकेल.

२) **व्यक्तिस्वातंत्र्याचा असा जोरदार पुरस्कार गांधीनी केला असला तरी अनियंत्रित व्यक्तिवादाचे ते पुरस्कर्ते नाहीत.** त्यांच्याच शब्दात हे सांगायचे तर, 'वैयक्तिक स्वातंत्र्य मी बहुमोल समजतो; परंतु माणूस हा निःसंशय एक सामाजिक प्राणी आहे हे तुम्ही विसरता कामा नये. सामाजिक प्रगतीसाठी लागणाऱ्या गोष्टींशी आपल्या व्यक्तीवादाचा मेळ कसा घालायचा हे शिकून तो आजच्या दर्जाला येऊन पोचला आहे. अनियंत्रित व्यक्तिवाद म्हणजे जंगलातील पशूंचा कायदा आहे. **व्यक्तिस्वातंत्र्य व सामाजिक निर्बंध यांच्यातील सुवर्णमध्य साधायला आपण** शिकलो आहोत. संपूर्ण समाजाच्या हितासाठी स्वेच्छेने सामाजिक निर्बंध स्वीकारल्याने व्यक्तींचा तसेच व्यक्ती ज्या समाजाची घटक असते त्या समाजाचाही फायदा होतो.'

३) **व्यक्तिस्वातंत्र्यवादाबरोबरच समाजवादावरही गांधीजी भर देताना आढळतात.** परंतु त्यांचा समाजवाद पाश्चात्य समाजवाद साम्यवादाहून निराळा आहे.

प्रत्येकाला आपल्या स्वाभाविक गरजा भागवता येण्याइतपत साधने उपलब्ध असणे म्हणजे समान वाटप, असे सांगून **समान वाटप हा समाजवादाचा गाभा असल्याने गांधी सांगतात.** अशी आदर्श अवस्था येण्यासाठी संपूर्ण समाजव्यवस्थेची फेररचना करावी लागेल,

याची गांधींना कल्पना होती. आणि म्हणूनच समकालीन समाजाला पर्यायी ठरु शकेल अशी आदर्श अहिंसाधिष्ठित समाजरचना त्यांनी कल्पनेत उभी केली होती. अहिंसेच्या मार्गाने समान वाटप कसे करता येईल हे सांगताना, प्रत्येक भारतीय माणसाने देशाची परिस्थिती लक्षात घेऊन **आपल्या गरजा कमी करायला शिकले पाहिजे.** जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सचोटी, प्रामाणिकपणा व संयम दाखवून आचारप्रचारात सुंसगती ठेवली पाहिजे, ज्यांच्याजवळ अनावश्यक संपत्ती आहे अशा **श्रीमंतानी आपण तिचे विश्वस्त आहोत असे मानून वागले पाहिजे,** म्हणजे स्वतःसाठी वापरुन उरलेला पैसा समाजहितार्थ त्याने खर्चिला पाहिजे, इत्यादी गोष्टींवर गांधींनी भर दिला आहे. श्रीमंतांनी जर आपली भूमिका बदललीच नाही तर अहिंसा - असहकार - सविनय प्रतिकार ही साधने आहेतच. 'समजातील गरीब लोकांच्या सहकार्यावाचून श्रीमंत धनसंचय करु शकत नाहीत, याचे ज्ञान गरिबांना झाले तर ते सामर्थ्यसंपन्न होतील व ज्या दारुण विषमतेमुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी येते, तिच्यापासून मुक्त कसे व्हावे हे त्यांना समजेल' असे गांधी म्हणतात. त्याचप्रमाणे 'श्रीमंत लोकांनी आपण होऊन आपल्या पैशाचा व पैशामुळे प्राप्त होणाऱ्या सत्तेचा त्याग केला नाही व संपूर्ण समाजाच्या हितासाठी आपल्या पैशाचा उपयोग केला नाही तर एक दिवस हिंसात्मक रक्तरंजित क्रांती झाल्यावाचून राहणार नाही' असा गंभीर इशाराही ते करतात.

## १०.६ अहिंसा

सत्य आणि अहिंसा परस्परांपासून अविभाज्य आहेत असे गांधी मानतात. तरीपण अहिंसा हे साधन आहे व सत्य हे साध्य आहे असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. आणि त्यामुळेच अहिंसा हे मानवाचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य ठरते असे गांधींना वाटते. हिंसेच्या साम्राज्यात ज्यांनी अहिंसेच्या सिद्धांताचा शोध लावला त्या ऋषींना ते न्यूटनपेक्षाही अधिक थोर संशोधक मानतात.

**अहिसेंची व्याख्या -** 'पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही वस्तुमात्राला व प्राणिमात्राला विचाराने, शब्दाने वा कृत्याने संभवणारी दुखापत टाळणे अशी अहिंसेची व्याख्या गांधींनी 'हरिजन' मधील एका लेखात केली आहे क्रोधाने, स्वार्थासाठी व हेतुपूर्वक कुणाला इजा करणे वा ठार मारणे ही जशी हिंसा आहे, तशीच कुणाविषयी मनात दुष्ट भावना बाळगणे ही सुद्धा हिंसाच आहे, कारण केवळ संधी मिळत नसल्यामुळे वा समाज भयामुळेच ती भावना प्रत्यक्षात आणली जात नसते असे गांधी म्हणतात. त्यांच्या मते, अशा कोणत्याही स्वरुपाच्या हिंसेला मनात थारा मिळता कामा नये, अहिंसा म्हणजेच जाणीवयुक्त क्लेश. दुष्टासमोर शरणागती पत्करणे असा अहिंसेचा अर्थ नाही तर दुष्टाच्या मनोदयाचा विरोध करण्यासाठी आपल्या संपूर्ण आत्मबलाचा उपयोग करणे म्हणजे अहिंसा अशीही व्याख्या गांधी करतात.

अहिंसेला ते 'आत्मिक शक्ती' म्हणतात. पाशवी शक्तीचा प्रतिकार करणे हे कार्य ते या आत्मिक शक्तीवर सोपवतात. पण अहिंसेचे कार्य केवल नकारात्मक नाही तर सकारात्मक आहे. काँग्रेसने केवळ सत्तेला चिकटून हिंसेची कास धरण्यापेक्षा रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा 'लोकसेवक संघ' या स्वरुपात कार्य करावे. काँग्रेसने सत्ता हे स्वयमेव साध्य मानून चालू नये. तर अहिंसात्मक समाजाची उभारणी हे साध्य मानून राजकीय सत्ता हे त्यांचे साधन मानावे, असे त्यांनी सुचवले होते.

परिपूर्ण अहिंसा ही केवळ ईश्वरालाच साध्य होऊ शकते. मनुष्यमात्र हा संपूर्णपणे अहिंसक होऊच शकत नाही. मानवी अपरिपूर्णतेमुळे काही ठिकाणी हिंसा अनिवार्य ठरते. समाजाच्या अस्तित्वातच अंगभूत असलेली हिंसा, व्यक्ती जोवर त्या समाजाची घटक आहे तोवर तिला टाळता येणे शक्य नाही.

भारत दुबळा आहे, म्हणून त्याला अहिंसेचाच मार्ग योग्य असा विचार गांधीनी केला नव्हता. किंबहुना त्यांची अहिंसा ही दुर्बलाची अहिंसा नव्हतीच. उलट भारताला आपल्या आत्मिक – आध्यात्मिक सामर्थ्याची जाणीव व्हावी आणि आत्मविश्वासपूर्वक या लढ्यात तो उभा राहावा अशी गांधींची अपेक्षा होती. अहिंसा हे ते सर्वश्रेष्ठ बल मानीत असत. त्याला ते 'आत्मबल' किंवा 'माणसातील ईश्वरी बल' असे संबोधतात. त्यांच्या मते, 'अपूर्ण असलेला माणूस तिचे पूर्ण आकलन करु शकत नाही. तिचे प्रखर तेज त्याला सहन करता येणार नाही. परंतु तिचा अत्यल्प अंशसुद्धा आपल्यात जेव्हा जागृत होतो तेव्हा चमत्कार घडून येऊ शकतो.'

स्वतःमधील ईश्वरी अस्तित्वाची जाणीव असणे ही त्यादृष्टीने पहिली आवश्यक गोष्ट आहे. तसेच ज्या माणसाच्या अंगी अहंभाव, अहंमन्यता असेल तेथे अहिंसेचे वास्तव संभवत नाही. विनम्रतेखेरीज अहिंसा अशक्य आहे. मात्र त्या विनम्रतेला कुणीही दौर्बल्य समजू नये. 'माझा अहिंसेचा सिद्धांत ही एक अत्यंत प्रभावी शक्ती आहे. तेथे भीरुतेला किंवा दुर्बलतेलासुद्धा मुळीच स्थान नाही. हिंसक माणूस केव्हातरी अहिंसक होईल अशी आशा करता येईल परंतू भेकड माणसाच्या बाबतीत मात्र अशी (म्हणजे अहिंसक होण्याची) आशा बाळगता येणार नाही. कारण, अहिंसा ही शौर्याची चरमसीमा आहे.'

युद्धासाठी जशी तयारीची गरज असते तशीच ती अहिंसक मार्गाने संरक्षण करण्यासाठीही असते, आणि ती तयारी म्हणजे देशाचे आर्थिक आणि सामाजिक जीवन आधी सुरळीत लावावे लागते. रचनात्मक मार्ग व सत्याग्रह यांच्याद्वारे सामाजिक संबंध बदलावे लागतात. त्याच मार्गांनी धारिष्ट्य, निग्रह, सोशिकता इत्यादी गुणांचीही जोपासना करावी लागते. मग कोणतेही शस्त्रबळ, कोणतेही अण्वस्त्रसामर्थ्य अहिंसक सत्याग्रहींना नमवू शकणार नाहीत. अहिंसेचे बळ हिंसेप्रमाणे बाहेरुन दिसत नाही. परंतु तरीही हिंसेपेक्षा ते कितीतरी पटींनी प्रभावी असते. असा अहिंसक प्रतिकार मानवमात्रास शक्य आहे काय? या प्रश्नाचे उत्तर गांधींनी होकारार्थी दिले आहे अर्थात अडचणींची जाणीव त्यांनाही होती. अशा प्रतिकारास लागणारे गुण पुरेशा प्रमाणात मानवाच्या ठायी नाहीत हे त्यांना माहित होते. पण त्यांची अशी खात्री होती की, जोपर्यंत मानवमात्र असा धीटपणाचा मार्ग अनुसरत नाहीत तोपर्यंत शस्त्रास्त्रस्पर्धा व हिंसाचार यांना या जगात अंत नाही. म्हणून अहिंसक मार्ग परिश्रमपूर्वक अंगी बाणवण्यापासून गत्यंतर नाही.

## १०.७ सत्याग्रह - मानवतेला गांधींनी केलेले सर्वात मोठे योगदान म्हणजे सत्याग्रहतंत्र होय.

साध्य आणि साधन सूचिता, सत्य, अहिंसा या तत्त्वावर गांधीची सत्याग्रह कल्पना आधारलेली आहे. सत्याग्रह हे आत्मिक सामर्थ्य असून येश ख्रिस्त, सॉक्रेटिस हे त्याचे मूर्तिमंत आविष्कार आहेत ज्यांनी न्यायासाठी अहिंसने लढा दिला, स्वतःचा प्राण गमविला होता.

**सत्याग्रहाची तत्त्वे :-** सत्याग्रहाचे पहिले तत्त्व म्हणजे, 'सत्याचा शोध करायचा झाल्यास विरोधकाशी वागताना **हिंसेचा अवलंब करता कामा नये.** तर धीर धरुन व सहानुभूती

दाखवून, त्याला चुकीपासून परावृत्त केले पाहिजे. जी गोष्ट एकाला सत्य वाटते ती दुसऱ्याला चुकीचि वाटू शकते आणि धीर धरणे म्हणजे आत्मक्लेश सहन करणे.'

शरीराहून निराळे असे आत्म्याचे अस्तित्व मान्य असायला पाहिजे. ती शरीरापेक्षा श्रेष्ठ व चिरंतन आहे अशी श्रद्धा पाहिजे. या श्रद्धेतूनच सत्याग्रही आपल्या विरोधकांवर विश्वास ठेवू शकेल. आत्मबळाने अन्यायाशी लढा देणे होय. **२) आंतरिक विश्वास** हा सत्याग्रहधर्माचा गाभा आहे. याच श्रद्धेतून विरोधकाच्या मताबद्दल सहिष्णुता बाळगून खुल्या मनाने त्याचा विचार करण्याची तयारी सत्याग्रही ठेवू शकतो. प्रत्यक्ष कृतीचा मार्ग अवलंबण्यापूर्वी चर्चा, विचारविनिमय इत्यादी मार्गांचा तो अवलंब करतो. तत्त्वांशी तडजोड न करता तपशिलात तो फेरफार मान्य करु शकतो. सत्याग्रह हा प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग असल्यामुळे त्याचा अवलंब करण्यापूर्वी, संबंधित अधिकाऱ्यांना सतत भेटणे, लोकमताला आवाहन करणे, लोकमत जागे व अनुकूल करणे, आपली बाजू शांतपणे प्रत्येकाला समजावून देणे इत्यादी सर्व शक्य त्या मार्गाचा तो वापर करील. शेवटी आपली चूक असल्याचे आढळून आल्यास ती तो मोकळ्या मनाने कबूल करील. अन्याय आणि अन्याय करणारा यांच्यात सत्याग्रही फरक करु शकेल. अन्याय करणाऱ्या व्यक्तीविषयी त्याच्या मनात द्वेषभाव वा वैमनस्य राहणार नाही. सत्याग्रही नेहमी जे 'असत्' असेल त्याला 'सत्' ने क्रोधाला प्रेमाने, असत्याला सत्याने व हिंसेला अहिंसेने जिंकायचा सदैव प्रयत्न करील. **३) त्याच्या अंत:करणाला आवाहन** करुन, त्याचा ह्रदयपालट करण्याचा प्रयत्न करुन सत्याग्रही कार्य करीत राहील. तुरुंगात जाईल तर तिथेही आपले निरपराधित्व त्यांना दाखवून त्यांच ह्रदयपालट घडवून आणण्याचा तो प्रयत्न करील. मनुष्यस्वभावातील श्रद्धेतूनच वरील सगळ्या गोष्टी सत्याग्रहीला शक्य होतील, म्हणून ती श्रद्धा हे त्याच्या विचारसरणीचे सारसर्वस्व आहे. प्रत्येक व्यक्ति मुळात चांगली असते. तिच्यातील माणूसकीला जागृत करुन सुधारणा घडवून आणता येतात यावर विश्वास आवश्यक आहे. ४) आत्मसंयमन, अनासक्ती व अपरिग्रह जोपासणे, गीतेतील कर्मयोग आचरणे इत्यादी गोष्टी सत्याग्रही होण्यासाठी लागतात.

**सत्याग्रहाचे प्रकार :-**

**असहकार - कायदेभंग :**

सर्व प्रकारच्या वाईट गोष्टींचा मुकाबला असहकाराने केला जाऊ शकतो असे गांधीना वाटते. जिथे जिथे अन्याय असेल, मग ते घर असो की शाळा, महानगरपालिका असो कि सरकार, व्यक्तीने तिथून स्वत:चे अंग काढून घ्यायला पाहिजे. सत्शी सहकार्य करणे हे जसे व्यक्तीचे कर्तव्य आहे, तसेच असत्शी असहकार करणेही तिचे कर्तव्यच ठरते.

असहकारामागील गांधींचे तर्कशास्त्र असे आहे की जो दुष्ट असतो तो आपल्या दुष्टपणाच्या प्रयत्नात, इतरांच्या सहकार्यावाचून यशस्वी होऊ शकत नाही. हे सहकार्य काढून घेण्याचे हरताळ, सामाजिक बहिष्कृती, बहिष्कार, उपोषण आणि कायदेभंग असे काही मार्ग गांधींनी सुचविले आहेत. त्यांपैकी कायदेभंगाचा मार्ग फारच जपून आणि इतर सर्व उपाय थकल्यानंतरच केला जावा, कारण तो प्रभावी उपाय आहे असे त्यांना वाटते.

सविनय कायदेभंग हा असहकाराचाच एक प्रकार आहे, कारण त्यामागील सूत्रही वरीलप्रमाणेच आहे. व्यक्ती प्रशासनाच्या आज्ञा व नियमने पाळूनच प्रशासनाला अप्रत्यक्षपणे

सहकार्य करीत असतात. ते सहकार्य त्यानी काढून घ्यायचे म्हणजेच अन्याय व अनैतिक अशा कायद्यांचे पालन करण्याचे नाकारुन त्यासाठी नियत असलेली शिक्षा भोगण्याची तयारी दाखवायची आणि अहिंसक पद्धतीने, स्चेच्छेने ती शिक्षा न डगमगता भोगायची. 'जी गोष्ट करणे हा कायद्याच्या दृष्टीने सर्वात मोठा दंडपात्र गुन्हा ठरतो पण जी मला नागरिकाच्या सर्वश्रेष्ठ कर्तव्यापैकी एक वाटते ती मी करणारच आणि जी काही कठोरतम शिक्षा असेल ती भोगायला स्वच्छेने व हसतमुखाने तयार राहणारच' अशा शब्दांत गांधींनी सविनय कायदेभंगाचा आशय व्यक्त केला आहे. सविनय कायदेभंग करणे हा व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे असे त्यांचे मत होते. जो कायदेभंग गुन्हेगारीच्या स्वरुपात असेल त्यावर राज्यसंस्थेने जरुर निर्बंध लादावेत त्यांच्या मते, 'सविनय कायदेभंग दडपण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सद्सद्विवेक बुद्धीलाच बंदिवासात टाकणे होय!' सत्याग्रहाचा मार्ग नैतिक दडपण आणण्याचा असतो; जबरदस्तीचा नव्हे.

सत्याग्रह खालील गृहीतांवर आधारलेला असतो.

१) सत्याचाच विजय होतो.
२) प्रत्येक व्यक्ती मूळात चांगली असते.
३) कोणतीही व्यक्ती सत्याग्रहाद्वारे लढा देऊ शकते.
४) सर्व प्राणीमात्रांची व मानवतेची एकता असते.
५) देवावर विश्वास.

## १०.८ राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद

राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद यांचा संगम गांधींच्या राजकीय विचारात पाहण्यास मिळतो. गांधी राष्ट्रवादी होते. स्वराष्ट्र, स्वदेश, स्वबांधव यांच्याबद्दल त्यांना उत्कट प्रेम आणि अभिमानही होता. जन्मभूमीची सेवा हाच मानवजातीच्या सेवेचा मार्ग त्यांनी मानला. संकुचितपणा, स्वार्थ, आक्रमकपणा यांनी त्यांचा राष्ट्रवाद मुळीच कलुषित होऊ शकला नाही. पाश्चात्त्य राष्ट्रवादापेक्षा भारतीय राष्ट्रवादाने वेगळी वाट चोखाळावी अशी गांधींची अपेक्षा होती. 'कोणालाही राष्ट्रवादी न होता आंतरराष्ट्रवादीची होता येणे अशक्य आहे. जेव्हा निरनिराळ्या देशांचे लोक संघटित होतील व एकमुखाने कार्य करु शकतील तेव्हाच आंतरराष्ट्रवाद संभवनीय होईल. या निष्ठेमुळे गांधी राष्ट्रवादी झाले होते. त्यांचा पिंड मूलतः आंतरराष्ट्रवादाचा होता. संपूर्ण मानव जातीच्या व सर्व देशाच्या मुलभूत ऐक्यावर त्यांची श्रद्धा होती. जगाशी मैत्री हे त्यांचे ध्येय होते. आक्रमक वा 'प्रखर' राष्ट्रवादाचा पुरस्कार त्यांच्या हातून होणे शक्यच नव्हते.'

एकात्मतेच्या दिशेने वाटचाल करताना या राष्ट्राच्या वाटेत येणाऱ्या सामाजिक अडथळ्यांची जाणीव गांधींना पुरेपूर होती. ते दूर करण्यासाठी केवळ शासनाच्या प्रयत्नांवर विसंबून राहणे गांधींना मान्य नव्हते. लोकांच्या सामाजिक शक्ती जाग्या करण्यावर त्यांचा विशेष भर होता. त्यांचा रचनात्मक कार्यक्रम हा त्यांच्या राष्ट्रवादी तत्त्वज्ञानाच्या व राष्ट्रीय ऐक्याच्या प्रयत्नांचा केवळ एक भाग होता. सामूहिक अस्तित्वाची भावना मुळापासून बळकट करणे हा त्या कार्यक्रमाचा हेतू होता. अस्पृश्यतेचा विचार त्यांनी प्रामुख्याने राष्ट्रैक्याच्या दृष्टीने केला होता, त्याचप्रमाणे मूलाद्योग शिक्षणाचाही मूळ हेतू मूठभर सुशिक्षित व कोट्यवधी निरक्षर यांना परस्परांच्या जवळ आणणे हा होता.

पाश्चात्य जगाच्या अंधानुकरणातून त्यांचे कारखाने, त्यांच्या राज्ययंत्रणा, त्यांची संस्कृती व सभ्यता यांचा भारतीयांनी स्वीकार केला तर या देशाचे स्वातंत्र्य म्हणजे फक्त इंग्रजी माणसे जिथे नाहीत अशी इंग्रजी राजवटच ठरेल. 'त्यांचा राष्ट्रवाद साम्राज्यशाही पद्धतीविरुद्ध नव्हता तर त्या मूल्यव्यवस्थेविरुद्ध आणि सभ्यतेविरुद्ध होता. जिच्या ठिकाणी आमचे अस्तित्व चिरडून टाकण्याची प्रचंड सुप्त शक्ती त्यांना दिसत होती.' म्हणून त्या शक्तीविरुद्ध भारताने आपले सर्व सामर्थ्य एकवटून उभे राहिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. ते भारतीयांना या गोष्टीचे स्मरण देतात की, काही पाश्चात्य विचारवंत व स्वकीय सुशिक्षित म्हणतात त्याप्रमाणे 'राष्ट्रवाद' ही भावना भारतात इंग्रज राज्यकर्त्यांनी निर्माण केलेली नाही. हजारो वर्षापासून ती या देशात उपस्थित आहे. देशाच्या चार टोकांवर चार तीर्थक्षेत्रे उभी करुन चारी धाम यात्रा करण्यावर भर देणाऱ्या पूर्वजांना या भावनेचा साक्षात्कार झाला होता असे ते मानतात. कोणत्याही दोन इंग्रजांपेक्षा कोणतेही दोन भारतीय हे स्वभावतःच परस्परांच्या अधिक जवळ असतात असे गांधींना वाटते.

भारतात निरनिराळ्या धर्मांचे लोक राहतात म्हणून हे एक राष्ट्र होऊ शकत नाही हा युक्तिवादही गांधींना मान्य नाही. या देशात परकीयांना आत्मसात करण्याची क्षमता फार पूर्वीपासून असल्यामुळे अनेक धर्माचे लोक येथे सहभावाने राहू शकतात. गांधीजी हिंदुराष्ट्रवादाच्या विरुद्ध होते. हा देश सर्वधर्मीयांसाठी आहे. ज्यांना राष्ट्रीयत्वाची जाणीव आहे ते एकमेकांच्या धर्मात हस्तक्षेप करीत नाहीत.

## १०.९ मूल्यमापन

**योगदान :-**

१) गांधींनी या देशातील आणि विश्वातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय चिंतनाला व कार्याला एक नवीन दिशा दिली आहे.

२) राजकीय प्रश्नांकडे व दैनंदिन अडचणींकडे नैतिक दृष्टीने पाहिल्यावर त्यांनी दिलेला भर मोलाचा आहे. बळ व हिंसा यांच्याऐवजी सत्य अहिंसेद्वारे वापरलेले सत्याग्रह साधन राजकीय विचारांच्या क्षेत्रातील मोठी कामगिरी आहे.

३) धर्म, नीती, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती कोणतेही क्षेत्र असो, वैयक्तिक आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत, गावापासून विश्वापर्यंत असा प्रचंड आवाका गांधी विचाराने व्यापला आहे.

४) पाश्चात्य जीवनशैलीतील विलासीकरण, आक्रमकता, तंत्रज्ञान शरणता, निधर्मपणा इत्यादी वैशिष्ट्ये त्यांना पसंत नव्हती. वस्तुसंचयाचा आत्यंतिक सोस या संस्कृतीत असल्यामुळे मूल्यांचा ऱ्हास या सभ्यतेत अटळ ठरतो असे त्यांचे मत होते. निसर्गाच्या जवळ जाणारी, निसर्गाशी जुळवून घेणारी, स्वेच्छेने स्वीकारलेली साधेपणाची संस्कृती खरी मानवी संस्कृती होय असे गांधींचे मत हाते.

जगातील कोणत्याही देशापेक्षा भारतीय संस्कृतीमध्ये सत्य अहिंसेसारख्या मानवी नीतिमूल्यांच्या दृष्टीने तसेच विश्वधर्माच्या स्थापनेच्या दृष्टीने विशेष मोलाचे आहे. मानवाचे स्वातंत्र्य, समता, शांतता, बंधुता या मूल्यांवर आधारित विश्वकुटुंबाचे स्वप्न साकार होण्यासाठी भारताला स्वतंत्र व्हायचे आहे असे त्यांचे मत होते.

५) ग्रामस्वराज्याच्या यंत्रणेद्वारे आर्थिक व राजकीय विकेंद्रीकरण सार्थ व फलदायी होऊ शकेल हा गांधीवादी विचारातील एक मौलिक सिद्धांत आहे. भांडवलशाही लोकशाहीत संपत्तीचे तर समाजवादात सत्तेचे केंद्रीकरण झाल्यामुळे खऱ्या लोकशाही स्वराज्याला या दोन्ही व्यवस्था मारत आहेत असे त्यांचे मत होते.

## १०.१० प्रश्न

१) गांधीतत्वज्ञानाचे आधार स्पष्ट करुन त्यांचे राजकीय विचारांचे विवेचन करा.

२) स्वराज्य, व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजवाद यावरील गांधीविचारांचे टीकात्मक मुल्यमापन करा.

३) सत्य आणि अहिंसा तत्वांची गांधीची संकल्पना स्पष्ट करा.

## १०.११ संदर्भ

व्ही. पी. वर्मा 'मॉर्डन इडियन पोलीटिकल थॉट'.

❖❖❖❖

# ११

# विनोबा भावे आणि सर्वोदय

**घटक रचना :**


११.१ प्रस्तावना - जीवनपरिचय

११.२ सर्वोदय संकल्पना आणि भूदान चळवळ

११.३ आधुनिक राज्यव्यवस्थेविषयी

११.४ मूल्यमापन

११.५ प्रश्न


## ११.१ प्रस्तावना

जीवनपरिचय-विनोबा यांचे पूर्ण नाव विनायक नरहर भावे. ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा कुलाबा जिल्ह्यातील गागोदे नामक गावी जन्म झाला. त्यांचे आजोबा उदार, धर्मपरायण व तेजस्वी पुरुष म्हणून प्रसिद्ध होते. वडीलही तीक्ष्ण बुद्धीचे व महत्त्वाकांक्षी होते. विनोबांचे लहानपण खेड्यातच गेले. तिथल्या निसर्गाइतकेच मोलाचे संस्कार त्यांच्या मातोश्रींनी त्यांच्या बालमनावर केले.

अध्ययनाचा श्रीगणेशा पुणे शहरी झाल्यानंतर १९०५ साली ते बडोद्यास गेले. तेथे त्यांचे वडील सरकारी नोकरीत होते. लहानपणापासूनच तीक्ष्ण बुद्धी व असामान्य स्मरणशक्ती यांचे वरदान विनोबांना लाभलेले होते. अध्ययनशीलतेची त्यात भर पडली. मराठी, संस्कृत, फ्रेंच आदी भाषांबरोबरच गणितांची त्यांना खूप आवड होती. १९१४साली शालान्त परीक्षा पास झाल्यावर महाविद्यालयात त्यांनी प्रवेश केला.

पण पुढे त्यांचे मन शिक्षणात रमेना, राष्ट्रीय चळवळीने त्यांना आकर्षित केले. बंगालच्या क्रांतिकारकांच्या कार्याने त्यांना प्रेरित केले. एकीकडे अध्यात्माची ओढ दुसरीकडे स्वातंत्र्यासंग्रामाची ओढ यात त्यांनी अभ्यास सोडून दिला. काशीला जाऊन त्यांनी संस्कृतचे व धर्मग्रंथांचे सखोल अध्ययन केले. राजकीय पुढाऱ्यांशीही त्यांनी संपर्क ठेवला.

गांधीविचारांनी प्रभावित - १९६६ साली हिंदू विश्वविद्यालयाच्या समारंभानिमित्त महात्मा गांधीचे काशी येथे भाषण झाले. विनोबांना त्या भाषणातील काही मुद्यांनी आकर्षित केले. ते गांधीच्या कोचरब येथील आश्रमात दाखल झाले. 'आश्रमातील सरळ पवित्र जीवनक्रम आणि

वागण्यात अभेदभाव, देशभक्ती आणि त्याग' तपस्व्यासारखे जीवन पाहून विनोबांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. जे उद्देश मनात धरुन त्यांनी घर सोडले होते ते क्रांती आणि अध्यात्म हे दोन्हीही गांधींच्या जीवनात त्यांना एकत्र लाभले. आश्रमाच्या जीवनाशी ते समरस झाले. शरीरश्रमाच्या प्रत्येक गोष्टीत सहभागी झाले.

त्यांनी वाई येथे नारायणशास्त्री मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे, शांकरभाष्य, मनुस्मृती, पांतजलयोगदर्शन, वगैरे ग्रंथांचा अभ्यास केला.

१९२१ साली गांधींच्या आज्ञेनुसार वर्ध्याला आश्रम स्थापन करण्यासाठी विनोबा गेले. अहिंसाव्रती समर्पित कार्यकर्ते निर्माण करणारा हा आश्रम या भागातील रचनात्मक कार्याचा केंद्रबिंदू ठरला.

१९२३ साली नागपूरच्या झेंडा सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल विनोबांना शिक्षा झाली. ती भोगून बाहेर येताच १९२४ साली त्यांनी गांधीच्या आज्ञेवरुन केरळ प्रांतातील 'बायकोम' येथील सत्याग्रहाचे नेतृत्व केले. हरिजनांना देवळाजवळून जाण्यासही मनाई करणाऱ्या सनातन्यांचा ह्रदयपालट करण्यात त्यांना तेथे यश मिळाले. १९३० साली वर्धा भागात झालेल्या जंगल सत्याग्रहात त्यांनी सक्रिय भाग घेतला. १९३२ च्या चळवळीत भाषणे केल्याबद्दल त्यांना धुळ्याच्या कारावासात ठेवले असता तेथे त्यांनी गीतेच्या अठरा अध्यायांवर प्रवचने दिली,

त्यावेळी त्यांनी तुरुंगात असताना ग्रामसंघटनेच्या कार्याचा संकल्प केला. त्या संकल्पाच्या सिद्ध्यर्थ ते प्रयत्न करु लागले. खेड्यापाड्यात पायी फिरुन खेडुतांना सफाई व सूतकताई यांचे धडे ते देऊ लागले. ग्रामोद्योग संघ त्यांच्या प्रेरणेने उभा राहिला.

दुसऱ्या महायुद्धाच्या प्रसंगी भारतीयांनी राज्यकर्त्यांना कोणत्याच प्रकारचे सहाय्य करु नये यासाठी गांधींनी सुरु केलेल्या व्यक्तिगत सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून विनोबांना त्यांनी मुक्रर केले. त्यात विनोबांना तीनदा शिक्षा झाली. १९४२ साली 'चले जाव' च्या चळवळीत पुन्हा एकदा त्यांना पकडण्यात आले. त्यांचे आश्रमही जप्त करण्यात आले. यावेळी त्यांना वेलोर जेलमध्ये ठेवण्यात आले असता तेथे तेलगू, कानडी, तामीळ मल्याळम् वगैरे दाक्षिणात्य भाषा विनोबांनी आत्मसात केल्या. भाषांबद्दल प्रेम हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. लोकांच्या अंतःकरणात सुलभ प्रवेश मिळविण्याचा सर्वात सुलभ मार्ग म्हणजे त्यांच्याशी त्यांच्या भाषेत बोलणे हा होय अशी विनोबांची खात्री होती. भारतातल्या जवळपास सगळ्या भाषांमध्ये विनोबा बोलू शकत.

सर्वोदयसमाज स्थापना - ३० जानेवारी १९४८ रोजी गांधींचा खून झाला. त्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या अनुयायांचे एक संमेलन सेवाग्राम येथे झाले. त्यावेळीच 'सर्वोदय समाज आणि सर्वसेवासंघ' यांची स्थापना करण्यात आली. गांधींच्या अपुऱ्या कार्यांना तडीस नेणे हे स्थूल उद्दिष्ट या संस्थांच्या पाठीशी होते.

यानंतर विनोबांनी गांधींची अपुरी कार्ये हाती घेतली. हिंदु - मुस्लिम शांततेचे कार्य, निर्वासितांचा प्रश्न, इत्यादी कार्यात काही दिवस व्यग्र राहिल्यावर पुनश्च ते परंधाम आश्रमात परतले. त्यांना जाणवले की शरीरश्रमांना प्रतिष्ठा प्राप्त होणे व लोक स्वावलंबी होणे हा सर्वोदय व्यवस्थेसाठी प्रथमावश्यक बाबी होत. त्या स्वतः आधी आचरणात आणण्याच्या हेतूने त्यांनी आश्रमात कांचन - मुक्तीचा प्रयोग करण्याचे ठरविले.

स्वतः कष्ट न करता पैशाच्या बळावर इतरांचे श्रम जेव्हापासून माणूस विकत घेऊ लागला तेव्हापासून अनेक सामाजिक दूषणे प्रादुर्भूत झाली. विषमता अस्तित्वात येऊन वाढीस लागली. पैशावर प्रतिष्ठा ठरु लागल्यामुळे धनसंचयाची प्रवृत्ती फोफावली. मूठभर अनुत्पादक वर्गाच्या हाती पैशामुळे जमीन आणि उत्पादनाची साधने केंद्रीभूत होऊन बसली. उत्पादक श्रमाची प्रतिष्ठा नष्ट झाली. जोपर्यंत श्रमांना सन्मानाची जागा प्राप्त होत नाही तोपर्यंत गरीब - श्रीमंतांतील विषमता नाहीशी होणे व सर्वांचे कल्याण होणे अशक्य आहे. 'सध्याच्या विकारग्रस्त समाजव्यवस्थेत प्रत्येक वस्तूचे मूल्य पैशाने ठरत असते आणि त्यामुळे वस्तूची खरी किंमत नजरेस येत नाही' अशी खंत विनोबांनी व्यक्त केली आहे. पैशाला मुळीच किंमत न देता श्रमांना महत्त्व देणे यालाच त्यांनी कांचन - मुक्ति योग असे नाव दिले आहे.

## ११.२ सर्वोदय संकल्पना आणि भूदान चळवळ

महात्मा गांधी यांनी रस्किनचे "अन टू धिस लास्ट" पुस्तक वाचल्यानंतर त्यातील विचारांनी ते अतिशय प्रभावित झाले. त्या पुस्तकाचे त्यांनी गुजराथी मध्ये भाषांतर केले त्याला त्यांनी 'सर्वोदय' असे नाव दिले. सर्वोदय म्हणजे 'good for all' 'सर्व लोकांचा सर्व प्रकारचा उदय व विकास होय'.

विनोबा भावे गांधींच्या सर्वोदय विचारांनी अतिशय प्रभावित होते. विनोबा भावे यांनी सर्वोदय संकल्पना भूदान चळवळ, संपत्तीदान, श्रमदान, बुद्धिदान, ग्रामदान या स्वरुपात वास्तवात आणल्या होत्या. गांधीच्या 'अहिंसा' आणि 'विश्र्वस्तता' या संकल्पनांवर सर्वोदयाची संकल्पना आधारलेली होती.

**भूदानचळवळ** - १९५१ च्या सुमारास तेलंगणात जमिनीचा प्रश्न अतिभयंकर स्वरुपात व्यक्त झाला होता. साम्यवाद्यांनी जमीनदारांविरुद्ध बंडे पुकारली होती. अनेक जमीनदारांना कापून काढून त्यांच्या जमिनी गरिबांना वाटून देण्याचा सपाटा चालविला होता. सरकार सशस्त्र उपायांनी बंडाचा नायनाट करु पाहात होते, साम्यवादी व सरकार या उभयतांच्या अत्याचारात सामान्य जनता भरडून निघत होती. यावेळी हैद्राबादजवळच्या शिवरामपल्ली गावी सर्वोदय समाजाचे तिसरे वार्षिक अधिवेशन भरले होते. विनोबांनी भोवतालची परिस्थिती पाहिली, समजावून घेतली व त्या प्रांतात पदयात्रा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. विचाराचा प्रसार पदयात्रेनेच होऊ शकतो असा त्यांचा दृढविश्वास होता.

१८ एप्रिल रोजी नलगुंडा जिल्ह्यातल्या पोचमपल्ली गावी विनोबा पोचले. साम्यवाद्यांचा या भागांत खूप जोर होता. वस्ती तीन हजाराची, पैकी दोन हजार भूमीहीन हरिजनांची स्थिती अगदीच शोचनीय होती. हरिजनांनी विनोबांना जमीन मिळवून देण्याची विनंती केली. ऐंशी एकर जमीन ते मागत होते. गावकऱ्यांच्या सभेत विनोबांनी आवाहन केले. रामचंद्र रेड्डी नावाचे गृहस्थ शंभर एकर जमीन द्यायला तयार झाले.

विनोबांनी विचार केला, 'अशा तऱ्हेने पायी यात्रा करीत जमीन मिळवीत गेलो तर जमिनीचा प्रश्न सुटेल, अशी कल्पना त्यांच्या मनात उदय पावली. या जमिनी मिळविण्याच्या कार्याला त्यांनी 'भूदान यज्ञ' असे नाव दिले. याप्रमाणे भूदान - यज्ञाच्या चळवळीचा उगम झाला. हिंसेने पीडलेल्या, रक्ताने न्हालेल्या तेलगंणातल्या घरोघर फिरुन भूदान यज्ञाचा संदेश सांगण्याचा त्यांनी संकल्प केला.' दोन महिन्यात बारा हजार एकर जमीन त्यांना मिळाली.

१९५२ मध्ये सर्व सेवा संघाने या आंदोलनास सक्रिय पाठिंबा दिला आणि हे आंदोलन अखिल भारतीय झाले. ठिकठिकाणी भूदानसमित्या बनल्या. विविध राजकीय पक्षांना तसेच रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्थांना विनोबांनी याकामी सहकार्य मागितले आणि ते त्यांना मिळाले. १४ सप्टेंबर १९५२ रोजी विनोबा बिहारात पोचले. तिथली परिस्थिती बिकट होती. सरंजामशाही परंपरा तिथे पक्या झाल्या होत्या. एका बाजूने लाखो एकरांची मालकी असणारे जमीनदार आणि दुसऱ्या बाजूने असंख्य गरीब शेतमजूर अशी स्थिती होती. या राज्याला आपली प्रयोगभूमी करण्याचा निर्णय विनोबांनी घेतला. एप्रिल १९५४ मध्ये बोधगया येथे सहावे सर्वोदय संमेलन झाले. तोपर्यंत जवळपास अठ्ठावीस लाख एकर जमीन भूदानात मिळाली होती. याच संमेलनात जयप्रकाश नारायण यांनी भूदान आंदोलनासाठी स्वतःचे जीवनदान घोषित केले. बिहार पाठोपाठ ओरिसा, आंध्र असे प्रांतामागून प्रांत भूदानाच्या यज्ञाने पादाक्रांत केले. जमिनीचा प्रश्न सोडविता आल्यास विचारातही क्रांती घडवून आणता येईल हे सूत्र भूदान चळवळीच्या बुडाशी होते. १९५७साली भूदान चळवळीचा दुसरा टप्पा सुरु झाला. या वर्षाच्या बुद्धगयेच्या संमेलनानंतर मिळालेल्या जमिनीच्या वितरणावर भर देण्यात आला. कारण जमिनीचे व्यवस्थित व त्वरित वाटप केल्यावाचून ग्रामराज्याची पायाभरणी करता येणार नाही याची विनोबांना खात्री होती. पण तिथेच या आंदोलनाला अपेक्षित यश साधता आले नाही. आणि हे आंदोलन अपयशी ठरले.

**भूदानचळवळीचा हेतू :-** १) सर्वोदयवृत्तीचा विकास करणे - भूदान यज्ञाचा मूळ हेतू भूमिहिनांना जमीन मिळवून देण्याइतका सीमित नव्हता. भूदान यज्ञाचा हेतू त्यांच्या मते कसेही करुन जमिनीचे फेरवाटप करणे हा नव्हता, तर सर्वोदयाची वृत्ती जनतेत बळावणे हा होता. गांधींच्या ट्रस्टीशिप सिद्धांताचा तो प्रत्यक्षातील प्रयोग होता.

त्यांना भूदानात एकोणपन्नास लाख एकर - जमीन मिळाली पण वितरण कोणी, कोणाला व कसे करायचे याबद्दल एकवाक्यता होऊ शकली नाही. विनोबांचा भर फक्त विचारप्रसारावर होता. कार्यकर्ते संख्येने कमी आणि या कार्यात अनभिज्ञ होते. शासनयंत्रणेची साथ नव्हती.

'संपूर्ण भूमी ईश्वराची आहे. भूमी सर्वांची माता आहे.' या भावनेतून जमिनीची मालकी विसर्जित करण्याचा सल्ला भूदान आंदोलन देते. शेकडो वर्षापासून आर्थिक दुरवस्थेमुळे जमीन ही मूठभरांची मिरासदारी होऊन बसली आणि त्यातूनच समाजात विषमता बोकाळली. जमिनीची ही अन्याय्य व्यवस्था मोडून काढून प्रत्येक कसणाऱ्या भूमिहीनाला जमीन मिळवून देणे हे कार्य त्यासाठी भूदानाने अंगीकारिले आहे आणि हे कार्य सक्तीने वा हिंसेने होणे शक्य नाही. शांती व प्रेम या दोनच मार्गानी ते साध्य होऊ शकेल असा भूदानाचा ठाम विश्वास आहे. साधनशुचितेवर त्याचा भर आहे.

जमिनीची फेरवाटणी हे केवळ पहिले पाऊल आहे. अंतिमतः नव्या माणसाची, नव्या दृष्टिकोणाची निर्मिती करणे हे क्रांतिकारक उद्दिष्ट भूदान यज्ञाचे आहे. त्याचे कार्य प्रारंभी जरी या देशापुरते असले तरी त्यांचा संदेश संपूण विश्वासाठी असून सगळीकडच्या मनुष्यमात्रांना तो आज ना उद्या प्रभावित करणारच आहे अशी प्रवर्तकांना खात्री आहे. भूदान चळवळ ही क्रमशः होणारी क्रांती आहे. प्रथम विचारात नंतर शब्दात आणि शेवटी आचरणात असा त्या क्रांतीचा क्रम आहे. प्रथम हृदयपरिवर्तन, नंतर जीवन - परिवर्तन आणि शेवटी समाजपरिवर्तन, अशा क्रांतीच्या अवस्था विनोबांनी सांगितल्या आहेत. हृदयपरिवर्तन आणि विचारक्रांती न करता ज्या ठिकाणी जमीन श्रीमंतांच्या हातून काढून घेतली जाते त्या ठिकाणी प्रतिक्रांती वा हिंसक प्रतिक्रिया होण्याचा संभव असतो. तेलगंणा, रशिया इत्यादी उदाहरणे देऊन विनोबा हे स्पष्ट करतात की,

हिंसेने ही समस्या सुटणारी नाही. सक्तीने जमिनी हिरावून घेण्यापेक्षा जमीनदारावर अपरिग्रहाचे संस्कार करणे विनोबांना श्रेयस्कर वाटते.

भूदान म्हणजे योग्य वाटप. आपल्याजवळ जे असेल त्याचे योग्य वाटप करणे, हे करताना दात्याच्या ह्रदयाचे परिवर्तन होत असते. मनुष्याला प्राप्त होणाऱ्या प्रत्येक गोष्टीत समाजाचे सहाय्य असतेच, म्हणजेच व्यक्ती समाजाची ऋणी असते. आपला वाटा समाज व्यक्तीला केव्हाही परत मागू शकतो ही या दानामागील भूमिका आहे. केवळ जमीन गोळा करणे एवढेच भूदानाचे लक्ष्य नाही तर सर्वोदयाची मनोवृत्ती त्याला निर्माण करावयाची आहे. गरिबांनी प्रेमपूर्वक जमीन दिल्यास तिचाही स्वीकार आनंदाने करण्यास विनोबा तयार आहेत. कारण भूमिहीनपेक्षा ज्यांच्याजवळ थोडीशी जमीन आहे ते सुखी आहेत. त्यांनीही आपल्या जमिनीचा तुकडा काढून द्यावा यात गैर काहीच नाही. 'दुसरी गोष्ट भूदानयज्ञाचा उद्देश स्वामित्वविसर्जनाची दीक्षा देणे हा आहे.'

**संपत्तिदान :** भूदान यज्ञाबरोबरच संपत्तिदान यज्ञही विनोबांनी सुरु केला होता. कारण त्यांच्या मते, संपत्तिदानाशिवाय भूदान यज्ञ सफल होणार नाही. जमिनीबरोबरच साधनांकडून त्यांच्या संपत्तीचा अंश न मागितल्यास चळवळीचा हेतूच साध्य होणार नाही. त्यांनी लोकांना आपल्या वार्षिक उत्पन्नाचा सहावा भाग संपत्तिदान यज्ञात देण्यास विनवले. धनसंचयास आपले श्रम जसे कारणीभूत होतात तसेच परमेश्वरी अनुग्रहही कारणीभूत होत असतात. धनार्जनाची जी प्रमुख साधने - बुद्धी, शक्ती व पुरुषार्थ आहेत ती परमेश्वरानेच मानवाला दिलेली आहे. म्हणूनच व्यक्तीची संपत्ती ही केवळ त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठी असूच शकत नाही. ती सर्वांच्या उपयोगासाठी ईश्वराने त्याच्याजवळ ठेविली आहे. संपत्तिदान यज्ञात द्यावयाचा पैसा हा दात्याजवळच राहील आणि विनोबाच्या मार्गदर्शनानुसार तो त्याचा विनियोग करील. गांधींच्या 'ट्रस्टीशिप' कल्पनेतच विनोबांच्या संपत्तिज्ञान यज्ञाचे बीज आहे. भूदानाप्रमाणे एकदा जमीन देऊन मोकळे होण्याची सोय संपत्तिदानात नाही; कारण ते प्रतिवर्षी करायचे आहे. 'म्हणून ती एक जीवनाची निष्ठा असे समजायचे. त्यामुळे अतःकरणातल्या निष्ठेचा विकास झाला पाहिजे,' असे विनोबांनी म्हटले आहे, संपत्तिज्ञान - यज्ञाचा मूळ विचार अपरिग्रह आणि अस्तेय या तत्त्वांवर आधारलेला आहे. श्रमदानाद्वारे श्रमाला प्रतिष्ठा येऊन प्रत्येक जण जमिनीवर घाम गाळण्यास तयार होईल अशी विनोबांची खात्री आहे. **प्रेमदान** व **बुद्धिदान** हेही या यज्ञाचे दोन महत्त्वाचे मार्ग विनोबांनी पुरस्कारिले आहेत. त्याखेरीज कार्यकर्त्यांसाठी सर्वात मोठा एक यज्ञ त्यांनी सांगितला आहे. तो म्हणजे **जीवनदान.**

**ग्रामदान :-** ग्रामदान हा भूदान चळवळीतील अंतिम टप्पा आहे. गाव म्हणजे एक व्यापक कुटुंब, असे मानून गावाचे सगळे व्यवहार कौटुंबिक आदर्शांनुसार व कौटुंबिक वातावरणात पार पाडले जावेत असे विनोबा म्हणतात. 'प्रत्येक गाव गोकुळ बनावे, गावातील सर्वांनी एका कुटुंबाप्रमाणे मिळून मिसळून राहावे, गावची सारी जमीन सर्वांची बनावी, आणि सर्वांनी वाटून खावे' असा ग्रामदानाचा आदर्श आहे. त्यात जमीन व्यक्तीच्याच हाती राहील, परंतु जमिनीची मालक ग्रामपंचायत असेल. प्रत्येक कुटुंबाला पाच एकर याप्रमाणे शेती करायला जमीन दिली जाईल, आणि त्यातून उरेल त्यात सामूहिक शेती करण्यात येईल. गावचा फाळा या सामुदायिक जमिनींच्या उत्पन्नातून देण्यात येईल. शिक्षण, आरोग्य वगैरेंचा खर्च त्यातूनच केला जाईल. गावची सर्व सार्वजनिक कामे सामुदायिक जमिनींच्या उत्पन्नातूनच होतील. कुटुंबाच्या सदस्यसंख्येच्या प्रमाणात त्या कुटुंबाकडे जमीन सोपविली जाईल. आठदहा वर्षांनी त्यासाठी जमिनीची फेरवाटणी केली जाईल. त्या काळात संबंधित व्यक्तीच त्या जमिनीची मालक असेल.

ग्रामदान हे अशाप्रकारे प्रत्येकाकडून आपल्या कुवतीनुसार व प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार देणारी व्यवस्था आहे. ग्रामदानातून अनेक आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक लाभ संभवतील, व्यक्तिगत मालकी जाऊन गावाची जमीन गावाच्या मालकीची केल्याने पहिला लाभ होईल तो असा की गावचे अन्नोत्पादन वाढेल. कुठे, काय, किती पेरावे हे विनिमयपूर्वक गावकरी ठरवतील. बाहेरुन मिळणारी मदत गावाला मिळेल, व्यक्तीला नव्हे. कर्ज देखील व्यक्तिगत राहणार नाही. म्हणजेच गावाला ग्रामदानामुळे आर्थिक स्वातंत्र्याचा लाभ होईल. गावाचे एक कुटुंब झाल्याने जीवनातील स्नेहभाव, आनंद वाढेल.

जमिनीबरोबरच ग्रामोद्योगांवरही या ग्रामदानी गावांमध्ये भर देण्यात येईल. स्वतःच्या गरजा स्वतःच्या प्रयत्नांनी भागविता आल्याखेरीज गाव स्वावलंबी होऊच शकणार नाही. सूतकताई आणि कापड-विणकाम यांना प्राधान्य असेल; पण इतरही जीवनोपयोगी ग्रामोद्योगांना उत्तेजन दिले जाईल. यातून सर्वांना काम तर मिळेलच, पण गावातील लक्ष्मी गावातच राहील. सर्व मुला - मुलींना समान शिक्षण मिळेल. त्याचप्रमाणे प्रौढांनाही शिक्षण दिले जाईल. व्यसनांचे निर्मूलन केले जाईल. सामाजिक क्षेत्रात जातिभेद, अस्पृश्यता, स्त्री - परुष - भेदभाव वगैरेंना स्थान राहणार नाही. सर्व माणसे परमेश्वराची लेकरे, तेव्हा सर्वांचे हक्क समान. सगळ्या तऱ्हेच्या उद्योगांची त्याचप्रमाणे समाजहिताच्या सर्व कामांची सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा समान राहील. 'वसुधैव कुटुंबकम्' हा या ग्रामपरिवाराचा आदर्श असले. प्रत्येकाचे मन आपल्या गावाएवढे, आपल्या समाजाएवढे विस्तृत होईल. यातूनच विश्वैक्याचे स्वप्न साकार होऊ शकेल.

**मूल्यमापन** - 'ग्रामदानाच्या क्रांतीत मालकीहक्काचे विसर्जन कोणत्याच प्रकारच्या सक्तीतून झाले नाही तर लोकांनी स्वेच्छेने ते केले आहे. बाह्य सामाजिक परिवर्तनाला आंतरिक मानवी परिवर्तनाची जोड मिळाली आहे. गांधींना अभिप्रेत असलेली दुहेरी क्रांती ती हीच!

## ११.३ आधुनिक राज्यव्यवस्थेविषयी विनोबांचे विचार

सर्वोदयप्रणीत आदर्श राजकीय व्यवस्थेची घडण करण्याआधी अस्तित्वात असलेल्या शासनपद्धतीचे परीक्षण विनोबांच्या विचारात आले आहे. सध्याच्या तथाकथित लोकनिर्वाचित शासनाप्रमाणेच त्याप्रीत्यर्थ निर्माण करण्यात आलेल्या निवडणूका, राजकीय पक्ष, लष्कर वा पोलिस बळ, कायदे इत्यादी संस्थांवर देखील विनोबांनी टीकेचे कठोर प्रहार केले आहेत.

१) त्यांच्या मते राज्यसंस्थेचे मूळ माणसाच्या सत्ता-लोभात, लालसेत आणि इतरांवर ताबा गाजविण्याच्या महत्त्वाकांक्षेत आहे.

२) 'सरकार' ही इतकी भयंकर वस्तू आहे की तिच्याहून भयंकर वस्तू दुसरी नाही, आजच्याइतके प्रबल सरकार जगात पूर्वी कधी नव्हते. सरकार चालविणारांचे म्हणणे असे की जनकल्याण करण्यासाठी त्यांनी सत्ता आपल्या हाती ठेवली आहे. सामान्य जनता पंगू आहे, दीन आहे, तिला वाटते सरकारशिवाय आमचे कसे चालणार? परंतु प्रत्यक्षात राज्यसंस्थेच्या हिंसाचाराचे साधन सरकार हे असते.

३) प्रशासनाद्वारे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे अपहरणच प्रायः होत असल्यामुळे समाज शासन-मुक्त होणे हा एकमेव मार्ग व्यक्तिस्वातंत्र्याला अभय देऊ शकेल. पोलिस, न्यायालये आणि बहुमताचे राज्य इत्यादी अनेक साधनांनी राज्यसंस्था आपले छळ-कार्य चालवीत असते.

४) बहुमताच्या शासनावर विनोबांचा फारसा विश्वास नाही. कारण त्यात मूठभरांच्याच हाती सत्ता जाते. लोकांचे सार्वभौमत्त्व हे फक्त तत्त्वतःच शिल्लक राहाते. विनोबा म्हणतात, 'आजच्या तथाकथित लोकशाहीत जनतेला मत देण्याचा नाममात्र अधिकार मिळालेला आहे. हा अधिकार म्हणजे मेंढरांनी धनगर निवडण्याच्याच प्रकार आहे. त्यामुळे मेंढरांच्या स्थितीत जराही फरक पडत नाही. असे हे नाटक चालू आहे आणि सरकारात सत्तेचे केंद्रीकरण होत आहे.' त्यामुळे निवडणुकांमधून लोकांचा राजकीय प्रक्रियांमधील सहभाग वाढतो., हा एक केवळ भास आहे असे त्यांना वाटते. एक तर निवडणूका लढविण्याचा हक्क जरी प्रत्येकाला असला तरी प्रत्यक्षात श्रीमंत व्यक्तीच तो भोगू शकतात. सामान्य माणसे फक्त पाच वर्षांनी मते टाकून 'लोकशाही महाजन सत्ता' निर्माण करतात, 'सहभागी लोकशाही' त्यातून उभी राहू शकत नाही. या निवडणूक - पद्धतीमुळे बाष्फळ भाषणबाजी करणाऱ्या पुढाऱ्यांना वाव मिळतो. मते मिळविण्यासाठी नाना असत्ये व अर्धसत्ये लोकांपुढे ते फेकीत जातात. लोकांच्या निम्न विकारांना आवाहने करतात. लोकांना आवडतील व भुरळ पाडतील अशी अप्रामाणिक आश्वासने देऊन ते लोकांच्या अपेक्षा अनाठायी उंचावून ठेवतात. प्रत्येक राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये यशस्वी होण्यासाठी गुंडांच्या पलटणी बाळगून असतो. लोकांना दमदाटी करुन मते मिळविली जातात. लाच देऊन मते घेण्याचाही प्रकार चालतोच. अशा प्रकारे सध्याच्या निवडणुका, सत्तेचा गैरवापर, गुंडगिरी आणि भ्रष्टाचार या तिन्ही गोष्टींनी अलंकृत असतात.

अशा लोकशाहीत फक्त उंच केलेले हातच मोजले जातात; मन आणि ह्रदय यांकडे लक्षच दिले जात नाही. या निवडणूका फार तर 'मात्रात्मक (क्वान्टिटेटिव) लोकशाही स्थापन करु शकतील; गुणात्मक (क्वालिटेटिव) लोकशाही निर्माण करणे त्यांना शक्य नाही.'

५) राजकीय पक्षाबद्दलही स्वाभाविकच विनोबांचे मत प्रतिकूल आहे. ते पक्ष मानीतच नाहीत. त्यांच्या मते इतिहास, वर्तमान अनुभव आणि बुद्धी या तिन्हींच्या आधारे हेच दिसते की राजकीय पक्ष काही भले मिळवू तर शकत नाहीच, पण दूरचा विचार करता ते अशा गोष्टी मिळविण्याच्या मार्गातील अडसरच अधिक ठरतात. एकदा पक्ष म्हणून उभे राहिल्यावर त्यांना आपल्या विचारसरणीशी काहीच कर्तव्य उरत नाही. संघटना, शिस्त व प्रचार याच गोष्टींना प्राधान्य प्राप्त होते. राजकीय सत्तेचे पक्ष हे एक साधन मात्र ठरते. सत्तेला अग्रक्रम मिळतो, विचार गौण होतात. सत्तेच्या राजकारणातील स्पर्धेत विचारांचे स्थान केवळ 'सोयीच्या ट्रेड मार्का' प्रमाणेच राहाते.

निवडणूक आल्यावर जनहितापेक्षा पक्षहितावर डोळा ठेवूनच राजकीय पक्षाच्या सर्व हालचाली चालतात. विनोबांना पक्षांना विरोध याहूनही अधिक महत्त्वाच्या कारणाने आहे. समाजात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता पक्षाच्या अंगी नसते अशी त्यांची खात्री आहे. कारण एक तर अशा परिवर्तनासाठी समाजातील सर्वांची संमती लागते. पक्ष हा एक गट असतो. दुसरे असे की परस्पर - विश्वास आणि विचारांची स्पष्ट देवाण - घेवाण झाल्यावाचून क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणता येत नाही. पक्षा - पक्षातील संबंध आज तसे नाहीत.

आत्मनिर्भर अशा जनशक्तीची निर्मिती करण्याऐवजी तिचा नाश करण्यासच राजकीय पक्ष साधनीभूत ठरतात असाही आरोप विनोबांनी केला आहे.

६) खऱ्या लोकशाहीची उभारणी शासनाद्वारे होऊच शकत नाही. लोकशाही पद्धती काही नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांवर आधारलेली असते. या मूल्यांच्या अभावी लेखी संविधाने,

राजकीय पक्ष, निवडणुका व निर्वाचित विधिमंडळे कुचकामाची ठरतात. म्हणजे लोकशाही हे आवश्यतः एक नैतिक तत्त्व आहे. सत्य, अहिंसा, स्वार्थत्याग, सेवाभाव, स्नेह आणि सहिष्णुता इत्यादी मूल्यांवर त्याचे यशापयश अवलंबून असते. उचित अशा संस्कारातून व शिक्षणातून या मूल्यांची जोपासना करणे अशक्य नसले तरी राज्यसत्तेच्या कक्षेत आणि क्षमतेत ते येत नाही. विनोबांना असेही वाटते की राजसत्तेचे कार्य नितीमत्तेला पूरक तर ठरत नाहीच, उलट अधिकारपदस्थांचे नीतिधैर्य कोसळून, त्यांना भ्रष्ट करवून राजसत्ता नैतिक दुष्कार्य करीत असते. सत्तेची खुर्चीच अशी मंतरलेली असते की त्यावर कुणीही जो बसेल तो भ्रष्ट झाल्यावाचून राहात नाही.

७) ग्राम हे विनोबांच्या स्वप्नातील सर्वोदय समाजाचे एकक (युनिट) आहे. ग्राम हेच एकक का? विनोबांचे उत्तर असे की, कुटुंबात प्रस्थापित झालेले नैतिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय समतेचे तत्त्व दिसून येते. कुटुंबीयाबद्दलची जी व्यक्तीची भावना व जवळीक असते ते कुटुंबाबाहेर आपल्या गावच्या व्यक्तीविषयीच दिसते. म्हणून एकतेची जाणीव कुटुंबापासून शेज्यार्‍यापर्यंत अर्थात गावापर्यंत वाढविणे मनुष्याला सुलभ होईल. दुसरे असे की शासनमुक्त समाजव्यवस्था स्थापन करण्याकरिता सत्तेचे विकेंद्रीकरण अत्यावश्यक आहे. राष्ट्रातील सर्व प्रकारचे प्रश्न गावापुढेही उभे राहू शकतात आणि राहाताततही. शिवाय सामाजिक जीवनाच्या क्षेत्रात गावच सगळ्यात खालच्या स्तरावर आहे. म्हणून विकेंद्रीकरणाची शेवटची मर्यादा गाव हेच ठरविण्यात आले आहे. ग्रामोद्योगांच्या आधारे आर्थिक क्षेत्रातील विकेंद्रीकरण साध्य होईल म्हणूनही ग्राम हा एकक सोयीचा ठरतो. केंद्रीय व्यवस्थेत जर कुठे काही चुकले तर त्याचा परिणामसर्व समाजावर व देशावर होतो. म्हणून व्यवस्थेचे क्षेत्र गावाएवढे मर्यादित करणे इष्ट ठरते. एका गावाच्या चुकीवरुन इतरांना शिकता येते. प्राचीन काळी गाव हेच या देशातील आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेचे केंद्र होते. स्वातंत्र्य आंदोलनासाठी ज्या केंद्रीकरणाची आवश्यकता स्वातंत्र्यपूर्व काळात होती ती आज राहिलेली नाही. कालमानाप्रमाणे देशाच्या गरजाही बदलतात. जमिनीचे समान वाटप आणि समता ही आजच्या शासकीय प्रयत्नांची लक्ष्ये आहेत. ती केंद्रीकरणातून लाभणारी नाहीत.

आदर्श राज्यव्यवस्था ही अशा स्वायत्त व स्वयंपूर्ण खेड्यांची मिळून झालेली असेल. गांधींनी वर्णिल्याप्रमाणे प्रत्येक खेडे हे एक गणराज्य असेल. स्वावलंबी व स्वतःचा कारभार स्वतःच्या पायावर उभे राहून करणारे असेल. आत्मसंरक्षणासाठीही ते स्वतःवरच अवलंबून राहील. स्वतःचा कारभार ही खेडी गावकर्‍यांपैकी पाच जेष्ठांच्या हाती सोपवतील. सगळीच विधिविषयक, कार्यकारी व न्यायालयीन सत्ता याच पाच व्यक्तींच्या हाती असेल. गावकर्‍यांचा जीवनाच्या सगळ्या प्राथमिक गरजा आणि बर्‍याचशा दुय्यम गरजाही त्यांच्या खेड्यातच भागल्या पाहिजेत. उरलेल्या गरजा राज्यसंस्थेने समर्थाकरवी भागवून द्याव्यात. शेतीला पूरक अशा ग्रामोद्योगाचे जाळे खेड्याखेड्यांतून निर्माण झाले पाहिजे. संपत्तीची न्याय्य विभागणी, जनतेचे स्वावलंबन, समर्थांची सेवापरायणता आणि जनतेतील सहकार्य भावना या सर्वांकरिता ग्रामोद्योगांइतकी सहज, सुलभ आणि समर्थ योजना दुसरी नाही असे विनोबांना वाटते.

पक्षातील लोकशाही अस्तित्वात येण्याच्या दृष्टीने सर्व राजकीय पक्षांनी आपसातील मतभेद विसरुन लोककल्याणाच्या प्रयत्नात परस्परांशी सहकार्य करावे असे आवाहनही विनोबा करताना आढळतात. भूदान, ग्रामदान आदी त्यांच्या कार्यक्रमांचे तेच लक्ष्य आहे. सर्वोदयाची क्रांती घडून येण्यासाठी ही पूर्व अटच आहे.

८) शासनमुक्त समाज : शासनमुक्त समाज ही सर्वादय चळवळीची अंतिम फलश्रुती असेल. म्हणजे समाज केवळ राज्य मुक्त (स्टेट-लेस) होईल एवढाच याचा अर्थ नाही तर सामाजिक सत्तेपासूनही मुक्त असा हा समाज असेल. 'प्रत्येक माणूस आपापल्या विवेकबुद्धीने चालेल. परंतु प्रत्येकाची विवेकबुद्धी अशा तऱ्हेने विकसित होईल की, कोणाच्याही स्वार्थाचा दुसऱ्या कोणाशी संघर्ष होणार नाही. अर्थात काही झगडा अथवा विवादही उत्पन्न होणार नाही.'

शासनमुक्त समाजाचा आदर्श स्वीकारण्यामागे सर्वोदयाची विशिष्ट दृष्टी आहे. अहिंसक समाजरचना हा सर्वोदयाचा आदर्श आहे. याचा अर्थ हिंसेपासून मुक्ती. समाजाची केंद्रीभूत उत्पादनव्यवस्था हे शोषणाचे साधन असते. व्यक्तिगत वा खाजगी भांडवलशाहीच्या हाती संपूर्ण उत्पादनव्यवस्था असणे जसे घातक तसेच सरकारी भांडवलशाहीच्या हाती असणेही घातकच होय. कल्याणकारी राज्याच्या नावाने जी सरकारी भांडवलशाही अस्तित्वात येते तीत लोकांचे कल्याण तर बाजूलाच राहाते; उलट सर्वकष पद्धतीची शासनप्रणाली मात्र अस्तित्वात येते. 'अशा प्रकारे सरकारच आज समाजाचे शोषण करणारी व हिंसक संस्था बनली आहे. म्हणून समाजाला हिंसेतून मुक्त व्हायचे असेल तर त्याने शासनमुक्त म्हणजेच सरकारच्या सत्तेतून मुक्त झाले पाहिजे.शासनसंस्थेवर प्रत्यक्ष आघात करुन तिचा विलोप करणे शक्य नाही. शासनाची जोपर्यंत गरज असेल तोपर्यंत तिचा लोप होत नाही म्हणून आधी शासनाची गरज नष्ट केली पाहिजे. पहिला घाव श्रममूलक स्वावलंबन आणि सहयोगी अथवा सहकारी वृत्ती यांचा विकास झाला पाहिजे. म्हणजेच केंद्रित उत्पादनव्यवस्थेच्या जागी विकेंद्रित आणि श्रममूलक उत्पादनव्यवस्था सुरु केली पाहिजे. त्यातून जनशक्ती उभी राहू शकेल. सरकार जर शेवटी लुप्त करायचे असेल तर विकेंद्रित जनशक्तीच्याच आधारे हे घडून येऊ शकते.'

९) विनोबा राष्ट्रीय नियोजनाऐवजी ग्रामीण नियोजनावर भर देतात. किंबहूना त्यांच्या मते ग्रामीण नियोजन हेच या राष्ट्रात राष्ट्रीय नियोजन ठरु शकते. ग्रामीण नियोजनाला जी मदत लागेल ती देणे एवढेच कार्य केंद्रसत्तेचे आहे, असे त्यांना वाटते. ग्राम हा या नियोजनाचा केंद्रबिंदू असेल. गावकऱ्यांना आत्मनियंत्रणाची सत्ता असेल त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून अमुक एक वस्तू आम्ही बनविनार, तेव्हा बाहेरुन ती गावात येण्यास बंदी असावी असा निर्णय घ्यावा. तो शासनास कळवावा. सरकारने जर बंदी घातली नाही वा ते घालू शकले नाही तर त्या सरकारच्या विरुद्ध उभे राहण्याची गावच्या लोकांनी हिंमत धरावी. हे जनशक्तीचे लक्षण ठरेल.

## ११.४ मूल्यमापन

**योगदान :-**

**१) ग्रामीण स्वयंशासन कल्पना :-** काही विचारवंतांच्या मते सर्वोदय हे राजकीय आणि सामाजिक फेररचनेची उभारणी आध्यात्मिक आदर्शवादाच्या पायावर करण्याच्या बौद्धिक प्रयत्नांचे नाव आहे. गांधींच्या कल्पनांचा मेळ आधुनिक भारतातील वास्तव्याशि घालण्याचा त्यात प्रयत्न आहे. ग्रामीण स्वयंशासन व पक्षविरहित लोकशाही या संकल्पना म्हणजे सर्वोदयाने राजकीय विचारांच्या व कार्याच्या क्षेत्रात दिलेले मौलिक योगदान ठरतील. या देशाच्या

एकसत्ताक परंपरेला कल्याणकारी राज्यकल्पनेची जोड मिळाल्यामुळे इथे अतिकेंद्रीकृत राज्यव्यवस्थेचा फार मोठा धोका संभवत असल्याचा इशारा सर्वोदय तत्त्वज्ञानाने केला आहे.

**२) सर्वोदयाचे तत्त्वज्ञान भारतीय परंपरेतील मूल्यांवर आधारलेले आहे.** राधाकृष्णन् यांनी म्हटल्याप्रमाणे 'भारतीय जीवनमार्गात अंतर्भूत असलेल्या परंपरा सर्वोदयाने अधोरेखित केल्या आहेत. कुटुंबाचा विस्तार म्हणजे समाज ही कल्पना सर्वोदयाने पुन्हा एकदा उचलून धरली आहे. जे पार्थिव मिळकतींना चिकटून बसणार नाहीत त्यानांच आध्यात्मिक स्वातंत्र्य प्राप्त होईल असे आवाहन आमच्या धार्मिक सहजप्रेरणेला सर्वोदयाने केले आहे.'

३) 'आधी सर्वाचा उदय व्हावा त्यातच माझाही उदय आहे. सर्वाचा उदय जोपर्यंत होत नाही तोपर्यंत माझ्या उदयाची मला इच्छा नाही. सर्वांच्या कल्याणासाठी त्याग करण्यास तयार असले पाहिजे आणि त्या त्यागात होणाऱ्या बाह्य दुःखाने आंतरिक सुखाचा अनुभव आला पाहिजे.' असा अत्यंत उदात्त विचार सर्वोदयाच्या मुळाशी आहे.

**टिका :-** भूदान आंदोलनातील स्वप्नरंजनाचा व अव्यवहार्यतेचा भाग म्हणजे तेलंगणातील सशस्त्र साम्यवादी उठावांना पर्याय देण्याच्या प्रयत्नांतून सुरु झालेली चळवळ प्रारंभी खूपच क्रांतिगर्भ वाटली, पण जसजसा काळ गेला तसतशी तिची आकार्यक्षमता व परिणामशून्यता उघड होत गेली पुढे सर्वसेवासंघात फूट पडली आणि चळवळीतही जोम उरला नाही. ४४ लाख एकर जमीन भूदानात मिळाली, पण निम्मी म्हणजे २२ लाख एकर जमीन लागवडीयोग्य नव्हती या क्रांतीमुळे जमिनीचा प्रश्न सुटला नाही की सर्वांगीण क्रांतीही झाली नाही. सरकारी यंत्रणेपासून हे आंदोलन स्वतंत्र ठेवण्याचा प्रारंभीचा मनोदयही पुढे टिकला नाही. भ्रष्ट सरकारी यंत्रणेद्वारे भूदानाच्या जमिनीचे वाटप सुरु जाले तेव्हाच विनोबांना हव्या असलेल्या सर्वांगीण परिवर्तनाची कल्पना संपुष्टात आली. 'आंदोलनाचे रुपांतर मेळाव्यात झाले व सर्वसेवा संघ हा परिवर्तन घडवून आणणारा क्रांतिकारी संघ न बनता मठ बनला.' भूदानात ग्रामदान झाले, पण त्यातून अपेक्षितपणे लोकशक्ती जागी झाली नाही. भूदानाने जमिनीच्या मालकीतील विषमतेवर नेमके बोट ठेवले असले तरी आर्थिक हितसंबंधांचा हा प्रश्न केवळ दानप्रक्रियेने सुटणारा नसतो.

## ११.५ प्रश्न

१) विनोबा भावेंच्या भूदान चळवळीचे महत्त्व सांगा.

२) सर्वोदय संकल्पना भूदान आणि ग्रामदानाच्या स्वरुपात विनोबा भावें यांनी वास्तवात आणली विवेचन करा.

३) आधुनिक राज्यपद्धती विषयी विनोबांचे विचार स्पष्ट करा.

४) सर्वोद्यप्रणीत आदर्श राजकीय व्यवस्थे संबंधी विनोबा भावे यांचे विचारांचे मूल्यमापन करा.

❖❖❖❖

# १२

# जयप्रकाश नारायण आणि सर्वोदय

**घटक रचना :**

१२.१ प्रस्तावना
१२.२ जयप्रकाश नारायण यांचे कार्य
१२.३ जीवनाचे उद्दिष्ट आणि विचारांची वाटचाल सर्वोदयाकडे
१२.४ लोकशाही विषयी विचार
१२.५ समग्र क्रांतीचा विचार
१२.६ प्रश्न
१२.७ संदर्भ

## १२.१ प्रस्तावना

जीवनपरिचय-जयप्रकाश नारायण यांच्या कार्याचा व वैचारिक भूमिकेचा प्रवास मार्क्सवाद, समाजवाद, सर्वोदय आणि समग्र क्रांती याप्रमाणे झाला आहे. एका मध्यमवर्गीय दुय्यम दर्जाच्या सरकारी अधिकाऱ्याच्या घरात जयप्रकाश यांचा १९०२ साली जन्म झाला. उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यांच्या सरहद्दी जोडणाऱ्या व शरयू - गंगा संगमावरील सिताब दायरा हे त्यांचे जन्मस्थान होते. १९१९ साली शालान्त परीक्षा पाटण्याच्या एका माध्यमिक शाळेतून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यावर तिथल्याच विज्ञान महाविद्यालयात ते प्रविष्ट झाले. जेपींना या वयात बंगालच्या क्रांतिकार्याचे विशेष आकर्षण होते. जेपींचे श्वशुर बाबू ब्रजकिशोर प्रसाद राष्ट्रीय चळवळीच्या अग्रणींशी जवळून संबंधित होते. जेपींना राजेंद्र प्रसाद, जवाहरलाल नेहरु, मौलाना आझाद प्रभृतीच्या सहवासात आणण्यास हे संबंध कारणीभूत ठरले.

१९२१ साली जेपींनी गांधींच्या आवाहनानुसार महाविद्यालय सोडले. ते चळवळीत पडले. परंतु वर्षभरातच चौरीचौरा प्रकरणांमुळे गांधींनी सत्याग्रह मागे घेतला. जेपींनी पुन्हा शिक्षणात लक्ष घातले. ते इंटर सायन्स झाले. अमेरिकेत जाऊन शिक्षण घेण्याची त्यांना ओढ होती. परिस्थिती नसतानाही तिथे पोचले. तऱ्हेतऱ्हेची शारीरिक श्रमाची कामे करुन शिक्षण घेतले. अमेरिकेत जेपींनी निसर्गविज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास केला. मार्क्स आणि लेनिन यांच्या वाङ्मयाचे त्यांनी सूक्ष्म परिशीलन केले. रॉय, ट्रॉटस्की प्रभृतीचे विचार आणि साम्यवादी क्रांतीच्या देशाबद्दल त्यांच्या मनात जबर कुतूहल निर्माण झाले. या भांडवलशाही देशात सात वर्षे राहून श्रमप्रतिष्ठा, समता, श्रमीकांचे संघटन, क्रांती इत्यादी विचार आणि ओहियो विद्यापीठाची समाजशास्त्राची बी.ए. पदवी संपादून जेपी मायदेशी परत आले. मार्क्सवादी समाजवादी विचारांनी त्यावेळी ते भारलेले होते.

जेपी भारतात आले तेव्हा स्वाभाविकच गांधींच्या राजकारणाविषयी व राजकीय शैलीविषयी त्यांचे मत फारसे अनुकूल नव्हते. परंतु भारतातील व जगातील काही घडामोडींमुळे जेपींच्या मार्क्सवादी विचारसरणीला हादरे बसले. रशियातील मार्क्सवादाचा प्रत्यक्ष प्रयोग, भारतातील साम्यवादी पक्षाचे वर्तन इत्यादी गोष्टी जवळून पाहिल्यावर त्यांनी आपल्या मार्क्सवादी भूमिकेची फेरतपासणी केली. साम्यवादी चळवळीपासून मनाने ते दुरावले. परंतु समाजवादाचे त्यांच्या मनाला असलेले आकर्षण उणावले नाही. स्वतंत्र भारत हा समाजवादी भारतच असायला हवा अशी त्यांची खात्री होती. त्या दृष्टीने काँग्रेसला समाजवादाच्या दिशेने नेण्याच्या प्रयत्न करणे त्यांना अगत्याचे वाटले. अशोक मेहता, आचार्य नरेंद्र देव, राम मनोहर लोहिया, अच्युत पटवर्धन, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, सहकाऱ्यांसवे जेपींनी असा निर्धार केला की, राष्ट्रीय चळवळीला वर्गलढ्याच्या तत्त्वावर संघटित करुन औद्योगिक कामगार, शेतकरी, भूमिहीन मजूर, विद्यार्थी व अन्य तरुण या सर्वांना एकत्र आणायचे. कारण त्याखेरीज परकीय राज्यकर्त्यांना घालविण्याचा, स्वातंत्र्यसंपादनाचा व या सरंजामी व बूर्झ्वा समाजरचनेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा दुसरा मार्गच त्यांच्या मते नव्हता. लोकशाही समाजवादावर त्यांचा नितांत विश्वास होता. किसान सभा, कामगार संघटना अशी कार्यक्षेत्रे ते धुंडाळीत होते. या काळात जेपी हे कामगारांचे व किसानांचे नेते म्हणून मान्यता पावलेले होते. अतिरिक्त राजकीय हस्तक्षेपापासून सुरक्षित अशी कामगार चळवळ उभी करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत समाजवादी पक्षाला फार मोठा पराभव पत्करावा लागला. १९५४ साली त्यांनी पक्षीय व निवडणूकप्रधान राजकारण सोडले.

## १२.२ जयप्रकाश नारायण यांचे कार्य

**१) विनोबांच्या भूदान - ग्रामदान - ग्रामस्वराज्य या चळवळीत** त्यांना वरील रचनात्मक कार्याची शक्यता दिसली. त्या चळवळीच्या क्रांतिकारक आशयाने त्यांना ओढून घेतले. त्यांनी स्वतःला जीवनदानी म्हणून या चळवळीस आजन्म वाहून घेतले.

**२) मानवी स्वातंत्र्याची गळचेपी, हिंसाचार, साम्राज्यवाद इत्यादींविरुद्ध त्यांनी सदैव आवाज उठवला होता.** १९५३ पासून भारत शासनाने शेख अब्दुल्लांना दीर्घकाळ कारावासात ठेवल्याबद्दल परखड शब्दांत त्यांनी निषेध नोंदवला होता; १९५६ मध्ये रशियाने हंगेरीत रणगाडे पाठविले असता हा ‘साम्यवादी साम्राज्यवाद’ असल्याची टीका करुन त्यापासून जगाने सावध राहण्याचा इशारा जेपींनी केला होता. पोर्तुगीजांच्या वसाहतवादाला त्यांचा विरोध होता; तरीपण भारतात त्याची अखेर करण्यासाठी भारत सरकारने गोवा, दीव -दमण भागात सैन्य पाठविणे त्यांना रुचले नव्हते. अहिंसक मार्गांनी गोवा भारतात विसर्जित केला जावा असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी परखड शब्दांत ही आपली भूमिका जाहीर केली होती. शेजारी राष्ट्रांशी युद्धे करण्याऐवजी शांततेच्या मार्गाने वाटाघाटी करुन समस्यांवर इलाज शोधावेत असे त्यांनी वेळोवेळी सुचविले होते. १९६३ साली चीनकडे मैत्रीचा मोर्चा त्यांनी नेला होता. नागा समस्येचा मुकाबला शासनाने शस्त्रबळावर करण्याऐवजी शांततापूर्ण बोलणी करुन करावा हे त्यांनी नुसतेच सांगितले नाही तर त्याप्रीत्यर्थ सर्वोदय पीस मिशनचे सहकार्यही शासनास मिळवून दिले. १९६६ च्या बिहार दुष्काळाच्या प्रसंगी परोपरीची सक्रिय मदत जेपींनी विविध संघटनांच्या मार्फत आपदग्रस्तांना केली होती. १९७० साली बांगला देशाला मदत मिळविण्यासाठी ते देशोदेशी हिंडले होते. मुजफ्फरपूरच्या नक्षलवाद्यांनी जिल्हा सर्वोदय मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना खुनाच्या

धमक्या दिल्याचे कळताच स्वतः मुसाहरी येथे राहून नक्षलवादी आव्हानाची मुळेच निपटून काढण्याचा प्रकल्प जेपींनी चालवला होता. १९७१-७२ साली चंबळ घाटीतल्या शेकडो दरवडेखोरांनी त्यांच्या समक्ष स्वतःला समर्पित केले होते.

**३) समग्रक्रांतीचा प्रयोग :** सर्वोदय विचारातील व कार्यातील त्रुटी त्यांना जाणवू लागल्यानंतर त्या दूर करण्याच्या दृष्टीने त्या तत्त्वज्ञानाचा व उपक्रमाचा समन्वय गांधीप्रणीत सत्याग्रह कल्पनेशी घालण्याची नितांत आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आणि यामधूनच त्यांच्या 'समग्र क्रांती' च्या प्रयोगाचा प्रारंभ झाला. डिसेंबर १९७३ मध्ये जेपींनी 'यूथ फॉर डेमॉक्रासी' या अपक्षीय व्यासपीठावरुन शिक्षण व निवडणूक प्रणालींमध्ये सुधारणा करण्याचा कार्यक्रम मांडला होता. त्यानंतर महिन्याभरातच गुजरातेत विद्यार्थ्यांचा व अन्य तरुणांचा जो उठाव झाला, त्यात जेपींना नवी दिशा दिसली. गुजरात आंदोलन जेपींच्या योजनेनुसार घडले नव्हते. शेवटच्या अवस्थेत तिथे जाऊन जेपींनी विद्यार्थ्यांना अहिंसक राहण्याचा व दीर्घकालीन उद्दिष्टांवरुन लक्ष न ढळू देण्याचा सल्ला दिला होता. गुजरातच्या युवकांना या दोन्ही मुद्यांचे विस्मरण झाले. पण एवढे निश्चित की तरुणांच्या सुप्त सामर्थ्यांचा व क्रांतिक्षमतेचा प्रत्यय या फसलेल्या आंदोलनातून जेपींना मिळाला.

बिहारच्या विद्यार्थी नेत्यांनी जेपींना आपल्या आंदोलनाचे 'मित्र, मार्गदर्शक व तत्त्वज्ञ!' होण्याची विनंती केली. सर्वोदयाचा मेळ सत्याग्रहाशी घालण्याची व सर्वोदयाला स्वतःच्या स्वयंनिर्मित कोषातून काढून अधिक वास्तवदर्शी करण्याची ही संधी आहे असे जेपींना वाटले.

४) बिहार आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारल्यापासून जयप्रकाश नारायण यांच्या आयुष्यात एक नवे पर्व सुरु झाले. देशात इंदिरा गांधींनी लागू केलेल्या आणीबाणीच्या युगात एकमेव दीपस्तभांचे महत्कार्य जयप्रकाशांनी केले. १९७५ ते १९७७ या दोन वर्षात त्यांनी राष्ट्रजीवनात जी भूमिका पार पाडली तिची तुलना केवळ महात्मा गांधींशीच होऊ शकेल.

जयप्रकाशाच्या चळवळीचे सामर्थ्य उत्तरोत्तर वाढल्याचे पाहिल्यावर काँग्रेसी सत्ताधाऱ्यांनी ती चळवळ दडपण्यासाठी आणीबाणीचा आधार घेतला. त्यांनी जेपींना राष्ट्रद्रोही, फॅसिस्ट व प्रतिक्रांतिकारक ठरवून अन्य जेष्ठ नेत्यांबरोबर तुरुगांत डांबले.

सर्व विरोधी पक्षांच्या एकीकरणातून निर्माण झालेल्या परिस्थितीवर तोडगा शोधता येईल हे जयप्रकाश यांनी लक्षात घेतले. जयप्रकाशांच्या निमंत्रणावरुन समाजवादी, जनसंघ, संघटना काँग्रेस या पक्षांच्या नेत्यांची बैठक मुंबईला भरली होती. जेपींनी आवाहन केले की, आजचा कोणताही एक पक्ष पर्यायी पक्षाची भूमिका वठवण्याइतका बलवान नाही. सर्वांचा मिळून एक पक्ष उभा केला पाहिजे. जेपींच्या या आवाहनाचे प्रेरित होऊन नव्या पक्षांच्या निर्मितीच्या हालचाली सुरु झाल्या. यातून जनतापक्षाची उभारणी झाली. मार्च १९७७ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या बरोबरीने लढत देऊ शकेल अशी नवी संघटित राजकीय शक्ती प्रथमच भारतीय मतदारांसमोर उभी राहिली. आणीबाणीचे स्वरुप लक्षात आल्यामुळे भ्रमनिरास झालेल्या मतदाराने जयप्रकाशांच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद दिला. मतपेटीतून घडून आलेल्या या शांततापूर्ण सत्तांतराचे व हुकूमशाहीच्या उच्चाटनाचे विभूतिमत्त्व जयप्रकाशांकडे होते याबद्दल दुमत संभवत नाही.

जनता पक्षाने संसदीय निवडणुका जिंकल्या. उत्तरेकडच्या सर्व राज्यांमध्येही तो पक्ष सत्तेवर आला. परंतु एवढ्याने जेपींचे संपूर्ण क्रांतीचे स्वप्न पूर्णत्वे साकार झालेले नव्हते. केवळ सत्तांतर झाले होते, क्रांती नव्हे. नवे सरकार संपूर्ण क्रांतीच्या उद्दिष्टांशी परिबद्ध राहील अशी जेपींची अपेक्षा होती. पण केवळ सरकारी प्रयत्नांमधून ही क्रांती घडून येणार नाही हेही त्यांना पक्के ठाऊक होते. राजसत्तेला वेसण घालणारी, तिला भ्रष्ट न होऊ देणारी व समाजाचा वैचारिक जिवंतपणा टिकवून ठेवणारी लोकशक्ती उभी करणे हे त्यांना अभिप्रेत असलेल्या समग्र क्रांतीचे लक्ष्य होते. पण ते दृष्टिक्षेपात येण्यापूर्वीच ८ ऑक्टोबर १९७९ रोजी जेपींचे निधन झाले.

त्यांच्यासाठी सर्वोदय हे सुद्धा व्यापक अर्थाने राजकारणाचेच क्षेत्र होते. शासकीय पदांपेक्षा, जनतेत मिसळून आपले ईप्सित कार्य अधिक प्रभावीपणे करता येईल या जाणिवेतून ते राजकीय पदांपासून दूर राहिले तेव्हा ती पदे मिळाल्याचा हताशपणा त्यांच्या वाट्याला येणे संभवतच नव्हते.

## १२.३ जीवनाचे उद्दिष्ट मानवमुक्ती त्याप्रमाणे विचारांची वाटचाल

जयप्रकाश साम्यवादाकडून समाजवादाकडे व समाजवादाकडून सर्वोदयाकडे याप्रमाणे वाटचाल करीत राहिले त्यामागे चिद्शक्ती म्हणजे मानवमुक्तीची प्रेरणा होती. सगळीकडच्या मानवांची सर्व प्रकारच्या बंधनांतून मुक्ती तीत अभिप्रेत होती. क्रांतीपासून अहिंसक क्रांतीपर्यंतचा त्यांचा वैचारिक आलेख समजावून घ्यायचा झाल्यास मुळाशी असलेले हे सत्य नजरेआड होऊ देऊन चालणार नाही. जयप्रकाश नारायण यांच्या विचारांची वाटचाल खालीलप्रमाणे झाली होती.

१) **सुरवातीच्या काळात मार्क्सवादाचे आकर्षण** त्यांना वाटण्याचे पहिले महत्त्वाचे कारण हेच होते की देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी गांधीप्रणीत मार्गापेक्षा मार्क्सप्रणीत क्रांतीचा मार्ग अधिक नेमका, निश्चित आणि शीघ्र ठरेल असे त्यांना वाटले. लेनिनच्या यशाने भारावल्यामुळे क्रांतीचा मार्क्सवादी मार्ग हा सर्वोत्तम असून रशिया हे क्रांतीचे सर्वोत्कृष्ट व आदर्श उदाहरण आहे अशी त्यांची खात्रीच झाली होती. रशियाची क्रांती लोकक्रांती म्हणून सुरु झाली असली तरी तिची फलश्रुती मूठभरांच्या शासनातच झाली. समाजवादाचे विकृतीकरण तेथे झाले असे जेपी म्हणतात. रशियातील साम्यवादी पक्षाच्या राजवटीमुळे मार्क्सवादाचे सिध्दात पुन्हा एकदा तपासून पाहण्याची गरज जेपीनां जाणवली.

२) **समजावादाकडे वाटचाल -** सोवियेत रशियाच्या अनुभवाने जेपींना लक्षात आले की, समाजवाद म्हणजे केवळ भांडवलदारीचा अभाव नाही. कदाचित भांडवलदारी नष्ट होईल, उद्योगधंदे, व्यापार, बँका, शेती इत्यादींचे राष्ट्रीयीकरण वा सामूहीकरणही होईल, आणि तरीही समाजवादी ध्येय्य खूप दूरच राहील. आशियायी देशांना स्वतःचा समाजवाद व स्वतःचे औद्योगीकरण स्वतःच्या मार्गांनी करावे लागेल या जाणिवेतून जेपी विकेंद्रीकरणाचा व राज्यसंस्था क्रमशः दुर्बल करण्याचा विचार करु लागले. सामूहिक वर्तनाचे व सामाजिक नियंत्रणाचे पर्यायी उपाय शोधू लागले. हा शोध त्यांना गांधीवादाच्या जवळ नेण्यास कारणीभूत झाला. आशियाई देश प्रामुख्याने ग्रामप्रधान व शेतकी समाज आहेत. येथे युरोपीयनधर्तीचा समाजवाद आणणे अशक्य आहे.

'व्हाय सोशॅलिझम' नामक आपल्या ग्रंथात जेपींनी आपले समाजवादावरील विचार मांडले आहेत.

**जयप्रकाश नारायण यांच्या मते समाजवादाचा अर्थ :**

समाजातील सर्व प्रकारच्या विषमतेचा विनाश होऊन, एका बाजूला आज जे ऐश्वर्य, आराम, संस्कृती सत्ता आणि दुसऱ्या बाजूला दारिद्र्य, उपासमार, रोगराई, गलिच्छता व अज्ञान असे चित्र आढळले ते बदलणे हा समाजवादाचा आद्य हेतू असावा. सामाजिक - आर्थिक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन व पुनर्निर्माण करण्याचा समाजवाद हा मार्ग आहे. मनुष्यामनुष्यात निसर्गाने ठेवलेल्या तफावतीवर सामाजिक विषमता आधारलेली नसून उत्पन्नाची साधने व अर्थसत्ता काही मूठभर व्यक्तींच्या हाती केंद्रित होण्यातून उद्‌भवलेली आहे. या साधनसत्तेची समान फेरवाटणी झाल्यास दारिद्र्य व आर्थिक विषमता नाहीशी होण्यास वेळ लागणार नाही.

**जेपींच्या मते समाजवादाची साधने :**

उत्पादनसाधनांच्या सामाजीकरणातून विषम वाटणीचे व शोषणाचे दोष दूर केले जाऊ शकतात. कसेल त्याची जमीन असावी. सहकारी पद्धतीने शेती केली जावी. शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या सर्व स्वार्थी शक्तींचे निर्दालन व्हावे. कुळांना सगळ्या जमिनी देऊन त्यांना संघटित केले जावे व संयुक्त शेती अस्तित्वात आणावी. शेतीला पूरक असलेले उद्योगधंदे सहकारी तत्त्वावर सुरु केले जावेत. बँकांवर परिवहनसाधनांवर व व्यापारावर राजकीय नियंत्रण बसवावे.

**३) सर्वोदयवादी जयप्रकाश :**

**जयप्रकाश सर्वोद्यवादी झाले कारणे :-** समाजवादी देशांचे अनुभव, पक्षपद्धतीतील दोष आणि राज्यसंस्थेच्या साह्याने केल्या जाणाऱ्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांच्या मर्यादा, समाजवादी तत्त्वज्ञानातच अनिवार्यतः संभवणारे धोके इत्यादींबद्दलच्या परिशीलनातून जेपींना पुन्हा दुसरा पर्याय शोधण्यास प्रवृत्त केले. त्यांना असे जाणवले की मानवमात्राला स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि शांती प्राप्त करण्याची क्षमता समाजवादी विचारप्रणालीत नाही. समाजवाद जोपर्यंत सर्वोदयात परिवर्तित होत नाही तोपर्यंत ती ध्येये माणसाला असाध्यच राहातील. पक्षीय राजकारणातून सामाजिक क्रांती घडून येणार नाही. लोकशाही प्रत्यक्षात पक्षशाही होते. जनतेचे उमेदवारही जनता निवडीत नाही तर राजकीय पक्षच निवडतात. पक्षपद्धती जनतेला भित्री बनविते. जनतेची शक्ती आणि उपक्रमशीलता नाहीशी करते. पक्षांना फक्त सत्ता हवी असते. जनतेला मेंढ्याप्रमाणे आपल्यामागे फरपटत न्यायचे असते. यात जनतेचे स्वातंत्र्य कसे टिकणार ? अतिराज्यवादातूनही समाजवाद येणे असंभव आहे. कल्याणकारी राज्याच्या स्वरुपात मांडला जाणारा समाजवाद अतिराज्यवादात प्रवर्तित होतो. राज्यवादी समाजवादाऐवजी जनतेचा समाजवाद हे जेपींनी आपले साध्य यापुढे ठरवून टाकले.

**२) भौतिकवादाचा अतिरेक** - या मार्गपालटास आणखी एक विचार कारणीभूत झाला. समाजातील प्रत्येक अनिष्ट गोष्ट ही आर्थिक विषमतेतून आलेली आहे किंवा भांडवलदारी हे समाजावरील एकमेव संकट आहे किंवा वर्गलढा हा एकमेव मार्ग आहे हे प्रत्यक्ष अनुभवाने खोटे ठरत होते. जीवनाकडे पाहण्याचा आर्थिक हा एकमेव दृष्टिकोण असू शकत नाही. त्याला महत्त्व आणि संदर्भ असला तरी तो एका मर्यादेतच आहे. भौतिकवादाचा अतिरेक हे जेपींच्या मते आजच्या समाजावरील मोठेच संकट आहे. समाजवाद, साम्यवाद व लोकशाही या सर्वांचा मुख्य भर फक्त उत्पादनवृद्धी व भौतिक समृद्धी यांवरच राहिला. मानवाची भौतिक समृद्धी अवश्य

व्हायला हवी, त्याचे जीवनमान उंचावयालाच हवे पण केवळ भौतिक भुका भागविण्यातच सर्व शक्ती खर्ची पाडणे इष्ट होणार नाही. कारण त्यातून माणसामाणसांत व राष्ट्राराष्ट्रांत स्पर्धा होऊन हिंसा व युद्धे अनिवार्य ठरतील. स्वातंत्र्य, समता, बंधुत्वादी मूल्ये भौतिकतेच्या महापुरात बुडून जातील. 'भौतिकता कोणत्याही प्रकारची असो ती माणसाला 'मानवी' होण्यापासून दूर ठेवते. चांगुलपणाकडे माणसाला नेणाऱ्या विवेकी प्रेरणा भौतिक सभ्यतेत असत नाहीत.'

**३) या दृष्टीने गांधीविचाराचे मूल्य त्यांना जाणवू लागले होते.** १९४९ सालीच त्यांनी आपल्या पक्षबांधवांना उद्देशून म्हटले आहे की, 'सामाजिक बदलाची एक अभिनव पद्धती गांधींनी सुचविली आहे. दलदलीत फसलेल्या आपल्या लोकजीवनाला वर काढू शकतील अशा मूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला आहे.' राजनीतीकडून लोकनीतीकडे जेपींचा वैचारिक प्रवास सुरु झाला होता.

तेलंगणात एका आडगावी भूदान आंदोलनाला प्रारंभ झाला या घटनेने जेपींच्या मनातील असंख्य प्रश्नांना उत्तरे मिळाली. विचारांना नवी दिशा मिळाली. त्यांनी विनोबांची भेट घेतली. त्यांचा आर्थिक दृष्टिकोण जेपींना मूलगामी वाटला. १९५२ मध्ये उत्तर प्रदेशातील 'मंगरोठ' नामक गावाने ग्रामदान घोषित केले. तिथे जे पाहायला मिळाले त्यातून जेपींच्या मनातल्या सगळ्यात महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. तो प्रश्न असा होता, 'गांधीजींच्या तत्त्वविचारात सामाजिक क्रांती तडीस नेण्याचा व्यावहारिक मार्ग उपलब्ध आहे काय?' विनोबांनी भूदान चळवळी द्वारे गांधी विचारांचा विस्तार करुन या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर दिले होते.

**जयप्रकाशनारायण यांच्या मते सर्वोदयाची वैशिष्ट्ये:-**

**अ) सर्वोदय म्हणजे जनतेचा समाजवाद होय :** जनतेच्या स्वैच्छिक समाजवाद जसजसा वाढत जाणार तसतसा राज्याने लादलेला समाजवाद ओसरत जाणार. समाजवादही उत्तरोत्तर अधिक पूर्ण आणि यथार्थ होत जाणार असा जेपींचा दृढ विश्वास झाला.

**ब) सर्वोदयाचा आशय दुमार्गी आहे हे जेपींना जाणवले :** एक मार्ग ज्याला गांधी 'परिवर्तन' (कंव्हर्जन) म्हणतात तो आहे. सर्व वर्ग, वंश, जाती, धर्मादिकांच्या व्यक्तींना आवाहन करुन, जी मूल्ये, ज्या कल्पना व जे मार्ग चूक आणि घातक सिद्ध झाले आहेत ते सोडून अन्य ग्रहण करण्यास सांगायचे यातून **विचार आणि मूल्ये यांच्या संदर्भात क्रांती सुरु होते.** त्याच वेळी नव्या विचारांची व मूल्यांची निवड करीत असताना एक खबरदारी घेतली जावी की ज्यांचा महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाशी प्रत्यक्ष संबंध असेल व जे स्वीकारल्यानंतर आचरल्यानंतर तो प्रश्न सुटण्यास मदत होईल आणि समाजाच्या आमूलाग्र परिवर्तनाचीही प्रक्रिया घडून येईल अशाच विचारांची व मूल्यांची निवड व्हावी. भावी समाजाची मूल्ये आज आणि इथेच आचरणात आणणे हाच परिवर्तनाचा मार्ग असतो. **इतर क्रांत्या फसल्या कारण ज्यांनी त्या घडवून आणल्या त्यांनी अंतिम साध्यांशी विसंगत साधने हाताशी धरली.** उदाहरणार्थ, राज्यविहीन समाज अस्तित्वात आणण्याच्या हेतूने राजसत्तेत अमाप वाढ केली, भ्रातृभाव पदरात पाडून घेण्यासाठी वर्गलढ्याचा मार्ग निवडला. सर्व मालमत्ता समाजाची आहे हे अंतिम साध्य मिळवायचे तर त्यासाठी आज व्यक्तीने आपल्या मालमत्तेबद्दल विश्वस्ताची भूमिका स्वीकारायला लावण्यातून ह्या क्रांतीचा प्रारंभ होतो. सर्वोदयाचे विचार आचरणात आणणे अवघड असले तर टप्प्याटप्प्याने हा कार्यक्रम पार पाडावयाचा असल्यामुळे अडचण येणार नाही, अशी जेपींची खात्री झाली.

**क) सर्वोदयाला कोणतीच ताठर चौकट नाही :** गरजांपासून, संघर्षापासून शोषणापासून मुक्त अशी समाजव्यवस्था उभारण्यासाठी ज्या मूल्यांचे जतन होणे आवश्यक असते त्यांच्याशी सर्वोदयाला कर्तव्य आहे. समाजाचे प्रश्न सोडविण्यात सर्वोदय हा अंतिम शब्द आहे असे गांधीजींनी मानले नाही व त्यांच्या शिष्यांनीही मानले नाही, असे प्रतिपादन जेपींनी केले आहे. भूदान ही एका सर्वांगीण सामाजिक व मानवी क्रांतीची सुरुवात आहे. समाजाबरोबर माणसालासुद्धा बदलण्याचे उद्दिष्ट तिजसमोर आहे. गांधीजींच्या अहिंसक क्रांतितंत्राचा अवलंब तीत केला आहे. माणसांच्या मनात आणि त्यांच्या परस्परांशी असलेल्या संबंधात जिवंत व साक्षात क्रांती ती घडवून आणीत आहे. आपल्याजवळ जे असेल ते आपल्या सहबांधवाबरोबर वाटून घेण्याचे शिक्षण ती माणसांना देत आहे.

**३) सर्वोदयावर आधारत समग्र क्रांती :** गुजरातच्या फसलेल्या आंदोलनानेही जेपींच्या लक्षात एक गोष्ट आणून दिली की या देशातील तरुण विद्यार्थी आज जागे होत आहेत. ते बदल मागत आहेत. प्रस्थापिताविरुद्ध बंड करण्याच्या स्फोटक मनःस्थितीत ते आहेत. त्यांच्यात उद्रेक आहे. ते परिवर्तनाचे प्रवर्तक होऊ शकतात. पक्षीय राजकारण्यांप्रमाणे स्वतःच्या फायद्यावर डोळा ठेवून ते कृतिप्रवण होणार नाहीत. त्यांना योग्य ते नेतृत्व व मार्गदर्शन फक्त मिळाले पाहिजे. बिहारच्या युवकांनी जेपींना अशा नेतृत्वाची व मार्गदर्शनाची विनंती केली. जेपींनी ती मान्य केली. सर्वोदयाचा गांधीप्रणीत सत्याग्रहाशी समन्वय घालून 'समग्र क्रांती' ची व्यापक योजना त्यांनी या देशासमोर मांडली. बिहारच्या मंत्रिमंडळाचा राजीनामा व विधानसभेचे विसर्जन या त्या चळवळीच्या तात्कालिक मागण्या होत्या. नवी शिक्षणव्यवस्था, निर्वाचनव्यवस्था, भ्रष्टाचार - निर्मूलन आणि सहभागी लोकशाही ही या चळवळीची अंतिम ध्येये होती.

अंतिम आदर्शांच्या दृष्टीने पाहता समाजवादी आणि सर्वोदयी जयप्रकाशांमध्ये, या मार्क्सवादी आणि गांधीवादी जयप्रकाशांमध्ये मुळीच फरक नाही. समाजवादी समाज आणि सामुदायिक समाज दोन्ही त्याच आदर्शावर उभारलेल्या रचना आहेत. त्यांच्या सामुदायिक समाजाच्या संकल्पनेत समाजवाद आहे, लोकशाही आहे, सर्वोदय आहे, सत्य - अहिंसा आहे, मार्क्सप्रणीत राज्यविहीन, वर्गविहीन समाज आहे, गांधीप्रणीत ग्रामीण- गणराज्यांवर आधारलेला समुद्र - वलयांसारखा समाज आहे. 'मार्क्सची वैज्ञानिकता, गांधी - विनोबांची आध्यात्मिकता आणि स्वतःची सामाजिकता एकत्र आणून ते एका नव्या समाज - शास्त्राची निर्मिती करु पाहात होते.'

## १२.४ लोकशाहीविषयक विचार

जगातील लोकशाहीची वस्तुस्थिती बघून जयप्रकाश सांगतात की, लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले शासन. जगात कधीच आणि कुठेच लोकांनी स्वतःचे शासन चालविलेले नाही. सर्व प्रकारचे शासन हे अल्पलोकसत्ताकच असते, पश्चिमेत लोकशाहीचा बराच विकास झाला असला तरी तिथेही निर्वाचित अल्पलोकच सत्ताधारी असतात. लोक अशा शासनापासून नेहमीकरिता संतुष्ट राहातील असे जेपींना वाटत नाही.

**१) सहभागी लोकशाही असावी :-** लोकशाही सहभागी होत जाणे हाच सर्वकष सत्तेला आवर घालण्याच्या व तिचे निर्मूलन करण्याचा एकमेव मार्ग असे जेपींचे मत आहे.

**२) लोकांमध्ये नैतिक गुण असावे :-** घटना, शासनप्रणाली, पक्ष, निवडणुका या सगळ्या गोष्टी लोकशाहीसाठी आवश्यक आहेत. परंतु जर लोकांच्या अंगी आवश्यक ते नैतिक व आध्यात्मिक गुण नसतील तर उत्तमोत्तम घटना आणि राज्यपद्धती लोकशाही कार्यान्वित करण्यास पुरेशा पडणार नाहीत. जेपींच्या मते, लोकशाहीसाठी आवश्यक असलेले नैतिक गुणधर्म व मानसिक भूमिका पुढीलप्रमाणे होत - सत्याची चाड, स्वतंत्रताप्रेम आणि अन्याय - जुलुमांचा प्रतिकार करण्याचे धारिष्ट्य, सहकार्यभावना, स्वहिताचा समन्वय व्यापक हिताशी घालण्याची तयारी, इतरांच्या मतांबद्दल आदर आणि सहिष्णुता, मानवमात्राच्या मूलभूत समानतेवर दृढ विश्वास, जबाबदारी स्वीकारण्याची तयारी, मानवी स्वभाव हा शिक्षणक्षम आहे यावर अढळ निष्ठा.

हे गुण आणि भूमिका मागण्याच्या ठिकाणी उपजत नसतात. त्यांचे शिक्षण प्रशिक्षण दिले जावे लागते. राज्यसंस्थेला हे जमत नाही. अस्तित्वात असलेली सामाजिक नीतिमत्ता, कुटुंबसंस्था, धार्मिक व शैक्षणिक अधिसत्ता व संस्था, श्रेष्ठींचे जीवनादर्श, लोकमताची माध्यमे - या सर्वांना संकलितपणे लोकशाहीस अनुकूल असे वातावरण निर्माण करावे लागते. हे कार्य राजकीय असण्यापेक्षा अधिक शैक्षणिक असते.

**३) गरजा सीमित करणे :-** आजच्या भौतिकयुगात माणसाच्या भौतिक गरजा अमर्याद वाढल्या असून माणसाची बरीचशी धडपड त्या गरजा भागविण्यासाठी असते. तो कधीच पूर्ण समाधानी होऊ शकत नाही; कारण त्या गरजा वाढतच जातात मानवी व्यवहारांमधील समतोल ढळून संपूर्ण आयुष्य भौतिक होऊन जाते. पश्चिमेत हेच घडले. लोकशाहीसाठी असे होणे इष्ट नाही. माणसाला जर खरोखर स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायचा असेल आणि स्वयंशासनाचा अवलंब करायचा असेल तर त्याला आपल्या गरजा सीमित करणे आवश्यक आहे. नाहीतर 'अधिक', 'आणखी अधिक' या लोभाचे पर्यवसान आपापसातील संघर्ष, बळजबरी, लूट - दरवडे, युद्ध इत्यादींत होणे अटळ होईल.

**४) जबाबदारीची जाणीव :-** स्वतंत्रता व जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत या चिरंतन सत्याचा विसर पडून व्यक्ती जेव्हा सामाजिक जबाबदाऱ्या नाकारतात, स्वतंत्रतेचा वापर स्वतःच्या भरभराटीसाठी करतात, इतरांच्या हितसंबंधाकडे कानाडोळा करतात वा त्या हितसंबंधांना बाधा करतात तेव्हा राज्यवाद (स्टेटीझम) या ना त्या प्रकारात अनिवार्य ठरतो. राज्यवादाच्या समस्येला लोकशाही स्वरुपाचे उत्तर गांधींच्या विश्वस्त कल्पनेने दिले आहे. आपली मालमत्ता सहबांधवांबरोबर वाटून भोगणे माणसाला तेव्हाच शक्य होईल जेव्हा तो स्वतःच्या गरजा मर्यादित करु शकेल.

**५) लोकशाही संस्था :- लोकशाही म्हणजे केवळ काही औपचारिक संस्थांचे असणे नव्हे.** तर लोकशाही म्हणजे लोकांचे विशिष्ट प्रकारचे जगणे आहे. आशिया खंडातील व अन्यत्रचीही अनेक राष्ट्रे याची साक्ष देतात की नुसती लोकशाही घटना असणे, विधिमंडळे निर्वाचित असणे, किंवा काही राजकीय पक्ष असणे लोकशाहीसाठी पुरेसे नसते. कैरोपासून जकार्तापर्यंतच्या सर्व राज्यव्यवस्था या ना त्या प्रकारच्या घटनांवर आधारलेल्या होत्या, त्यांच्या निरनिराळ्या पक्षपद्धती होत्या. विधिमंडळे होती. पण एवढे असूनही हुकूमशहांनी वा लष्करी नेत्यांनी त्या मोडून काढल्या. यावरुन हेच दिसते की, घटना, विधिमंडळे वा पक्ष यांच्याइतके किंबहुना अधिकच महत्त्व लोकशाहीच्या रुजलेल्या मुळांना (ग्रासरुटस्) आहे.

**६) मतदान :- प्रौढ मतदान हा राष्ट्रीय संसदा निवडण्याचा मार्ग मुळीच लोकशाही नाही.** मतदार आपले मत देतो ते समजून - उमजून देतो व त्याला सर्व गोष्टींचे यथार्थ ज्ञान असते असे जगात कुठेच आढळत नाहि. आपण आपले राज्य चालवितो असे समाधान मतदाराच्या मनात आणि प्रौढांना मतदानाचा अधिकार देऊन आपण आदर्श राज्यव्यवस्था चालवीत असल्याचा भ्रामक गर्व राज्यकर्त्यांच्या मनात प्रौढमतदान पद्धती निर्माण करते.

**७) निवडणूकांचे स्वरुप :-** आजच्या निवडणुका ह्या जनसामान्यांच्या (मास) निवडणुका असल्यामुळे केंद्रीभूत, केंद्रनियंत्रित राजकीय पक्षांना आपली कारस्थाने करण्यास त्यात भरपूर वाव मिळतो. पक्षांजवळ अमाप पैसा असतो, त्यांना धूर्त मार्ग ठाऊक असतात. प्रचाराची प्रभावी माध्यमे त्यांना उपलब्ध असतात. स्वाभाविकच त्यांच्या प्रभावामुळे निवडणुकांमधून लोकमताचा आविष्कार होण्याऐवजी पक्षांच्या पाठीशी असलेल्या शक्ती व हितसंबंधच प्रकट होत असतात. जेपींच्या मते संसदीय लोकशाहीतील पुढचा दोष तिच्या निवडणूक पद्धतीत आहे. ही पद्धती अतिखर्चाची आणि भयानक उधळपट्टीची आहे. निवडणुकांना लागणारा अफाट पैसा पाहता लोकशाही धनिकांकडे आहे असे म्हणावे लागते, हा खर्च कोणत्याही प्रकारे जनहितासाठी न होता उलट त्या हितास मारकच होतो. लोकशिक्षण, प्रबोधन तर दूरच राहिले उलट भावना भडकवून व विकारांना चेतवून मतदारांची विवेकशक्ती व विचारशक्ती संमोहित केली जाते. राजकीय व आर्थिक समस्यांचा विचार पक्षलढ्यापासून दुर, शांत व निर्विकार मनाने जर केला जायचा असेल तर त्यासाठी जेपींच्या मते सार्वत्रिक निवडणुका बंद झाल्या पाहिजेत. निर्वाचित विधिमंडळे, कायम अस्तित्वात असावीत. फक्त त्यांच्यापैकी काही जागांच्या ठराविक मुदतीनुसार क्रमाक्रमाने निवडणुका व्हाव्यात.

**८) राजकीय पक्षांचा खोटेपणावर प्रकाश :-** संसदीय लोकशाही पक्षपद्धतीवाचून संभवत नाही. राजकीय पक्षांबद्दल जेपींचे मत फार आधीपासून अनुकूल नव्हते. 'चुरशीतून पुढारीपणा फोफावतो, राजकीय नीतिमत्ता दडपली जाते, सारासार - विवेकशून्यतेला प्राधान्य प्राप्त होते. धूर्तपणा व कारस्थानीपणाकडे कल जातो. जिथे ऐक्याची गरज असते तिथे पक्ष फूट पाडतात, जिथे मतभेद मिटवले जावेत तिथे पक्ष त्यांना वाढवून देतात. राष्ट्रीय हितापेक्षा पक्षहिताला ते अधिक जपतात' असे आपले मत त्यांनी नोंदविले आहे. 'सत्तेसाठी आप्पलपोटेपणा व भ्रष्टाचार जीत अंगभूत असतो त्या पक्षपद्धतीने मला दिवसेंदिवस अधिकच अस्वस्थ केले आहे. पैसा, संघटना व प्रचार साधनांच्या बळावर स्वतःला जनतेवर लादताना मी पक्षांना पाहिले आहे; जनतेचे राज्य परिणामतः पक्षाचे होताना आणि पक्षाचे राज्य हे मूठभर नेत्यांचे होताना पाहिले आहे; लोकशाही म्हणजे फक्त मतमोजणी हे समीकरण, प्रबळ पक्षांनी आपले उमेदवार उभे करुन त्यांनाच मते देणे मतदारांना भाग पाडून प्रत्यक्षात काढून घेतलेला मतदानाधिकार.' हे सारे पाहिले आहे. माझ्या दृष्टीने पक्षपद्धती लोकांना नपुंसक बनवते. त्यांचे सामर्थ्य व पुढाकार वाढेल असे कार्य ती करीत नाही किंवा स्वयंशासनाचे, आपल्या गोष्टी स्वतः करण्याचे संस्कार लोकांवर करण्याचेही प्रयत्न ती करीत नाही.

आज भारतातील लोकशाहीचे स्वरुप पश्चिमेतील लोकशाहीप्रमाणेच आहे. ते निराळे असूही शकत नव्हते; कारण तोच आदर्श भारतीय घटनेच्या शिल्पकारांसमोर होता. संसदीय लोकशाहीचे सर्व दोष भारतात आहेतच. पण त्याखेरीज भारतात प्रादुर्भूत झालेले काही खास दोषही त्यांच्या जोडीला आहेत. या देशाची पक्षपद्धती अधिकच असत्याधिष्ठित आहे. देशातील सगळ्या मतप्रवाहाचे प्रतिनिधित्व ती करीत नाही. प्रत्येक पक्ष स्वतःला समाजवादी म्हणवून

घेण्यात इतरांशी स्पर्धा करतो. आमची घटना अनेक पाश्चात्य लोकशाही देशांच्या घटनांच्या आधारे गिरविण्यात आली आहे. नागरिकांच्या ठायी दुभंगलेली व्यक्तिमत्त्वे ती निर्माण करते. ती सर्वोदयाकडे कधीच घेऊन जाऊ शकणार नाही.

**९) सहभागी लोकशाही व सामुदायिक समाज :** स्थानिक शासनाद्वारे - आज अस्तित्वात असलेल्या लोकशाहीत वरीलप्रमाणे अनेक दोष असल्यामुळे ती जनतेचे राज्य होऊ शकत नाही. मूठभर सुशिक्षितांच्या व भांडवलदारांच्याच हाती सत्तेची सूत्रे राहिली आहेत. समाजवादी देशांमध्ये मध्यमवर्गाच्या हाती सत्ता आली असली तरी तिथेही तंत्रज्ञशाही (टेक्नॉक्रसी) उद्‌भवून व्यवस्थापक, विशेषज्ञ व प्रशासकांच्याच मर्जीप्रमाणे शासन चालले आहे. अशा प्रकारे जनतेचे राज्य सर्वत्रच योजने दूर राहिले आहे. जेपींच्या मते, जनतेचे राज्य जर यायचे असेल तर तळापासूनच स्वराज्याचा विकास झाला पाहिजे. गांधींच्या सामुद्रिक वर्तुळाकार समाजरचनेचा आदर्श समोर ठेवून त्यानुसार ग्रामराज्याची उभारणी करण्यातून या स्वराज्यांचा श्रीगणेशा होऊ शकतो. लहान लहान समुदायांना अधिकाधिक अधिकार देऊन वरवरच्या पातळ्यांवर क्रमशः ते कमी कमी करावेत. जीवनाचे मूलभूत प्रश्न लहान समुदायांवर सोपविले जावेत. जनता जसजशी स्वतःचा कारभार करु लागेल तसतसे जनता राज्य अवतरेल अशी जेपींची खात्री आहे. केंद्रीभूत कारभार जनतेच्या राजवटीला ठार करीत असतो. जनता राजवटीचा एकमेव मार्ग विकेंद्रीकरण हा आहे. औपचारिक लोकशाहीचा एकमेव पर्याय सहभागी लोकशाही हा आहे. जेवढी सत्ता कमी तेवढी लोकशाही अधिक. 'जे सरकार न्यूनतम राज्य करते ते सर्वोत्तम असते.' हा गांधीचा विचार जनतेच्या सहभागी लोकशाहीचा प्राणभूत आधार आहे. केवळ जन-मान्यता (कन्सेन्ट) असलेले शासन म्हणजे लोकशाही, यांच्या पुढे एक पाऊल टाकून जनतेचे प्रत्यक्ष योगदान असलेले - योगदानमूलक लोकतंत्र (पार्टिसिपेटिव्ह डेमॉक्रसी) म्हणजे खरी लोकशाही हे भारताने जगला दाखवून दिले पाहिजे असे जेपींना वाटते. त्यासाठी आपल्या प्राचीन स्थानिक शासनाच्या परंपरा पुनरुज्जीवित केल्या पाहिजेत.

कल्याणकारी राज्याच्या नावाने लोकशाही राज्यसंस्थाही सर्वकष राज्यव्यवस्थेइतकीच माणसाला गुलाम करण्यास कारणीभूत ठरते. लोकांना पंगुत्व आणणाऱ्या या प्रक्रियेला प्रयत्नपूर्वक थांबवायला पाहिजे. मोठमोठाल्या घोषणा केल्या जातात; परंतु त्यांच्यापैकी अनेक त्रिशंकूसारख्या अधांतरी राहतात. खेड्यात आजही विलक्षण दारिद्र्य, दुःख, विषमता, शोषण, मागसलेपणा, गतिशून्यता आणि नैराश्य दिसते. सरकारी कायदेकानून व योजना कोट्यवधीचा खर्च होऊनही समाजजीवनात मूलभूत परिवर्तन घडवून आणू शकल्या नाहीत. औद्योगिक विकास अवश्य झाला आहे, देशाच्या संपत्तीत वाढही झाली.परंतु प्रश्न असा आहे की या सगळ्यांचा लाभ कुणाला झाला आहे? गरीब अधिक गरीब होत आहेत आणि श्रीमंत अधिक श्रीमंत! बेरोजगारांची संख्या वाढते आहे. असंख्यांना पोटभर अन्न नाही, वस्त्र नाही, निवारा नाही. हजारो गावांत पिण्याचे साधे पाणीसुद्धा नाही. योजनेचा फायदा बव्हंही धनिकांना, उच्च मध्यम वर्गाला व मोठ्या शेतकऱ्यांना झाला आहे. छोटे दुकानदार, मध्यमवर्ग, गरीब, भूमिहीन, आदिवासी इत्यादिकांची स्थिती होती तशीच राहिली किंवा पहिल्यापेक्षा बिघडली आहे. खेड्यात शेतीच्या नव्या पद्धती आल्या, बी - बीयाणे, साधन - सामग्री आली. उत्पादन वाढले. पण हे सारे घडूनही खेड्याचे रुपरंग नाही बदलले. श्रीमंत - गरिबांतील दरी रुंदावतच राहिली आहे. आधी वरच्या पातळीवर विकास झाला की मग आपोआपच तो खाली झिरपेल असे मानणे चूक आहे. विकासाच्या योजनांचे मुख्य लक्ष्य प्रत्येक व्यक्तीला जीवनावश्यक अशी प्रत्येक गोष्ट उपलब्ध करुन देणे हे असायला पाहिजे ते फक्त विकेंद्रित व्यवस्थाच देऊ शकते. त्या विकेंद्रित व्यवस्थेचा आदर्श

पश्चिमी असून चालणार नाही तर स्वतःच्याच भूतकाळाचा मागोवा घेत भारताला तो शोधावा लागणार आहे.

खेडे हे पूर्वापार या देशातील प्रशासनाचे केंद्र राहिले आहे. ग्राममंडळाच्या वा सभा - समितींप्रमाणे काही यंत्रणांच्या मार्फत खेड्यांचा कारभार चाले. निवडणुका घेऊन सामाजिक जीवनात दुही पाडून घेण्यापेक्षा गावकऱ्यांच्या सर्वसाधारण मान्यतेनुसार व मतैक्यानुसार (कन्सेन्सस) या यंत्रणा निवडल्या जात. केंद्रीय शासन केवळ निगराणी करीत असे. आज कोणत्याही देशातील स्थानिक संस्था उपभोगत असतील त्यापेक्षा अधिकच सत्ता या यंत्रणा चालवीत होत्या. केवळ भारतीय राज्यकारभाराच्याच नव्हे तर येथील समाजजीवनाच्याही फेररचनेसाठी या यंत्रणांचे पुनरुज्जीवन होणे जयप्रकाशांना आवश्यक वाटते.

**१०) लोकसामित्यांवर भर :-** लोकसमित्या हा जेपींच्या सहभागी लोकशाही संकल्पनेचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्रारंभी या समित्या ग्रामपातळीपासून मतदारसंघ पातळीपर्यंत स्थापन केल्या जाव्यात. सर्वात प्राथमिक आणि पायाभूत स्थान ग्राम लोकसमितीस असावे. सर्व गावकऱ्यांनी एकत्र येऊन तिची निवड करावी. सर्व मोहोल्ले व जातिजमाती, आदिवासी व महिला यांना तीत योग्य ते प्रतिनिधित्व मिळावे. कोणत्याही राजकीय पक्षाशी ती संलग्न असू नये. त्याचप्रमाणे वरच्या पातळ्यांवर क्रमाक्रमाने पंचायत - लोकसमित्या, गट - लोकसमित्या, निर्वाचनक्षेत्र लोकसमित्या असाव्यात, अशी जयप्रकाशांची योजना आहे. शहरांसाठीही असाच आराखडा त्यांनी दिला आहे. त्यांच्या मते, अशा समित्यांच्या द्वारे जनशक्तीचे एक नवे माध्यम तयार केले जाऊ शकेल. त्याला अनेक कामे करावी लागणार असल्यामुळे ते शक्तीशाली असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जनतेच्या विश्वासासही ते पात्र ठरले पाहिजे. सरकारी कामकाज त्याच्या घोषित धोरणानुसार चालते आहे की नाही, लोककल्याणकारी कायदे व कामे अंमलात येत आहेत की नाहीत हे दक्षतापूर्व पाहणे, मुलभूत हक्कांची विशेषतः दुर्बल घटकांच्या हक्कांची पायमल्ली होणार नाही हे पाहणे, दर तीन महिन्यांनी लोकप्रतिनिधींकडून त्यांच्या कार्याचा अहवाल मिळवणे व त्यांना मार्गदर्शन करणे, प्रतिनिधींना त्यांच्या उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब मागणे; अनीती व अन्याय यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असल्यास शांततापूर्ण मार्गाने प्रतिकार करणे, आपापसांतील तंटे वाटाघाटीतून सोडवणे, विकास आणि नवनिर्माण यांच्या कार्यात पुढाकार घेऊन रोजगार व स्वावलंबन वाढण्यावर भर देणे; आपापल्या क्षेत्रातील मतदारांना शिक्षण व कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे अशी कामे समित्यांनी करावीत अशी जेपींची अपेक्षा आहे. पण या कार्यात पुढाकार जनतेच्याच विशेषतः युवकांचा असावा, अन्त्योदयावर सर्वाधिक लक्ष असावे, सरकारी मदत मिळवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. पण सर्वस्वी सरकारच्या मदतीवर विसंबून राहू नये. या गोष्टींवर त्यांचा विशेष कटाक्ष आहे.

**११) अहिंसक क्रांती :** निवडणूकबाजी, घोषणाबाजी, दहशतवाद असे क्रांतीचे रुढ लघुमार्ग जेपींना मान्य नाहीत. आज सुप्त असली तरी क्रांतीची खरी शक्ती जनतेत असल्याबद्दल त्यांची खात्री आहे. त्या शक्तीला प्रकट करणे हे क्रांतिकारकाचे त्यांच्या मते कार्य आहे. लोकशक्ती ही क्रांतीची तद्वतच शांतीचीही शक्ती आहे. सामाजिक परिवर्तनाचा एकमेव मार्ग अहिंसक सर्वोदयाचा आहे असे जयप्रकाश म्हणतात.

आज भारताला आणि खरे तर साऱ्या जगालाच क्रांतीसाठी गांधीवादाकडे वळण्याखेरीज जेपींच्या मते गत्यंतर नाही. म. गांधींनी सामाजिक क्रांतीला एक नवीच नीती प्राप्त करुन दिली

आहे. ते पुढे येईपर्यंत सामाजिक परिवर्तनाचे दोनच मार्ग उपलब्ध होते. एक, हिंसेचा वा प्रेमाचा आणि दुसरा, खड्गाचा वा कायद्याचा. गांधींनी प्रेमाचा, व्यक्तीच्या पुढाकारास व जनसहभागाचा मार्ग पुरस्कारिला. विनोबांनी तोच पुढे चालवला. ह्रदयपरिवर्तन या मार्गाची भिस्त आहे. माणूस परिवर्तनशील असतो हे या मार्गाचे गृहीत आहे. बळजोरीने समाजाच्या बाह्यरचना बदलतील, माणूस बदलणार नाही.

**१२) वर्गसंघर्षावर भर :** शांततापूर्ण सत्याग्रह हे जयप्रकाशांच्या वर्गसंघर्षाचे स्वरुप आहे. सर्वोदयाच्या चळवळीत 'राजसंन्यस्त' वृत्तीने राहणाऱ्या जयप्रकाशांनी वर्गसंघर्षाविरुद्ध भूमिका घेतली होती आणि विनोबांच्या वर्ग - निराकरणाचा मार्ग त्यांनी पुरस्कारिलाही होता. परंतु १९७७ च्या सुमारास त्यांना आपल्या या भूमिकेची फेरतपासणी करुन वर्गसंघर्षाच्या भूमिकेचा पुन्हा पुरस्कार केला होता.

भारतीय खेड्यांत वर्ग आणि जाती जवळपास एकरुप आहेत. उच्चजातीचेच लोक आर्थिक दृष्ट्याही संपन्न असून कनिष्ठ जातीयांना ते साधी माणुसकीची वागणूक द्यायलाही तयार नाहीत; संरजामशाहीचे अनेक अवशेष आजही सामाजिक संबंधात पूर्ववतच आहेत. मजूर जिथे संख्येने कमी तिथे त्यांना जास्त मजुरी व जिथे ते संख्येने जास्त तिथे कमी मजुरी दिली जाते. शिवाय मजुरांना अमानुषपणेही अनेक ठिकाणी वागवले जाते. ही परिस्थिती वर्गसंघर्षाशिवाय पालटू शकत नाही. वर्गसंघर्ष सर्वोदय विचारांशी सुसंगत नाही म्हणून तो करायचा नाही, आणि योग्य त्या परिस्थिती अभावी ह्रदयपरिवर्तन होण्याची शक्यता नाही, यात चिरडला जातो आहे तो सर्वहारवर्ग! तात्त्विक काथ्याकूट करण्याऐवजी बदलत्या परिस्थितीचा मागोवा घेऊन मार्गही बदलले पाहिजे, अशी जेपींची भूमिका आहे.

## १२.५ जयप्रकाशनारायण यांचा समग्र क्रांतीचा विचार

जयप्रकाश नारायणांची समग्र क्रांतीची कल्पना म्हणजे सर्वोदयाच्या विचारांत एक महत्त्वाची भर मानावी लागेल. 'विनोबांचा भूदान चळवळीचा अहिंसक क्रांतीचा सिद्धांत निर्दोष होता. पण प्रत्यक्षात वर्तमान सामाजिक - आर्थिक संरचनेत क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचा दृष्टीने तो भरीव असे काही करु शकला नाही. ग्रामदान - ग्रामस्वराज्य हे कार्यक्रम जनआंदोलनाच्या पातळीपर्यंत कधीच उंचावू शकले नाहीत. पुढे पुढे तर त्यांचा ऱ्हास होत होत निराशाजनक अशा स्थानिक चळवळीच्या रुपात ते शिल्लक उरले.'

भूदानान्वये जमिनीचे फेरवाटप, ग्रामदानान्वये स्वयंशासन आणि ग्रामप्रधान मौलिक लोकशाही या सर्वोदयी मागण्या शासनाच्या धोरणावर पुरेसा प्रभाव टाकू शकल्या नाहीत. 'प्रस्थापित' गांधीवाद शासकीय कृपेवर व सहिष्णुतेवर दिवस काढीत होता. 'जयप्रकाशांनी गांधीवादाला नवे जीवन देऊन राष्ट्राला लोकशाहीकडे जाण्याची आणखी एक संधी उपलब्ध करुन दिली.'

**समग्र क्रांतीचे उद्दिष्ट :** लोकांची निष्क्रियता आणि हताशपणा घालवून विद्यार्थी, राजकीय नेते, पक्ष, क्रियाशील सर्वोदयी, राज्यकर्ते यांच्यात शक्तिशाली सख्य निर्माण करण्यात जेपींना यश आले. चळवळीची भूमिका अशी होती की आजच्या राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेचा सडलेपणाविरुद्धचा केवळ निषेध, वा त्यात दुरुस्त्या मागणारे आंदोलन एवढ्यापुरती मर्यादित

तिची उद्दिष्टे नाहीत; तर **१) देशात एक मूलगामी राजकीय व सांस्कृतिक क्रांती घडवून आणण्यासाठी** प्रत्यक्ष अहिंसक कृती करण्याची तिची योजना आहे. या चळवळीद्वारे जेपींनी एक गोष्ट नक्कीच सिद्ध केली आहे आणि ती म्हणजे या देशात गांधीवाद मेलेला नाही. त्याच्या पुनरावताराची सिद्धता झाली आहे.

**२) अंतर्गत आणि बाह्य बदल घडविणे :-** जेपींच्या मते, समाजाच्या मूल्यांचे परिवर्तन करण्याचे हे कार्य करण्याची मुख्य जबाबदारी तरुणांची आहे. आज गरज आहे **ती दुहेरी क्रांतीची.** आजपर्यंत झालेल्या क्रांत्या एकेरी होत्या. त्यांनी फक्त समाजाच्या बाह्य रचनामध्येच फेरफार केले. आजची अभिनव क्रांती माणसाच्या मनात सुरु होणार असून अखेरीस ती समाजाच्या बाह्य रचनेत बदल घडवून आणील. मानवी मनात, जीवनमूल्यांत, जीवनविषयक दृष्टिकोणात; वस्तुमात्र, मानवमात्र विषयीच्या दृष्टिकोणात ती बदल घडवून आणील.

निरनिराळ्या कारणांमुळे समाजात धुमसणाऱ्या लोकक्षोभाला तात्कालिक समस्यांच्या वर उठवून समग्र क्रांतीच्या ध्येयाला जोडण्याची जेपींची योजना होती. 'लोक आपली स्वतःची शक्ती विकसित करुन स्वतःच लोकशाहीचे संरक्षक व्हावेत अशा तऱ्हेचे क्रांतिकारक मार्गदर्शन मला लोकांच्या या चळवळीस करावयाचे आहे. सत्ता बळकाविण्यात मला रस नाही, तर सत्तेचे नियंत्रण लोकांच्या हाती देण्यात आहे.' त्यांच्या मते हे केवळ बिहारच्या जनतेने बिहार विधानसभा विसर्जित करण्यासाठी चालविलेले आंदोलन नव्हते. 'त्या चळवळीचे स्वरुप केवळ राजकीय नव्हते, तर सार्वजनिक आणि अनुषंगाने वैयक्तिक जीवनाच्या सर्वांगाना स्पर्श करणारे होते. मानवी अस्मितेला आणि सत्प्रवृत्तींना आवाहन करणाऱ्या नीतितत्त्वांचे तिला अधिष्ठान होते.' **३) सत्ताकेंद्राभोवती व संपत्तीच्या प्रभावाखाली फिरणाऱ्या राजकारणाचा भेद करुन जनहिताचे राजकारण बांधणे हा तिचा हेतू होता.** गांधीप्रणीत क्रांतीतील त्याग, सेवा, अन्याय - प्रतिकार इत्यादी मूलतत्त्वांना निराळ्याच संदर्भात पुनरुज्जीवित करण्याचा तिचा प्रयत्न होता. लोकक्षोभाला शिस्तबद्ध, शांततामय व हेतूगर्भ मार्गांनी वाट करुन देणे तिला साधायचे होते.

**समग्र क्रांतीचा अर्थ :** जयप्रकाश या क्रांतीला समग्र क्रांती असे संबोधतात याचे कारण ती एकाच वेळी अनेक क्षेत्रांत मूलगामी परिवर्तन घडवून आणू इच्छिते. शांततामय, निर्भय आणि उघड अशा लोकसहभागामुळे या क्रांतीचे यश निश्चित होणार होते. या देशातील औपचारिक लोकशाहीच्या डोलाऱ्यात ती आशय आणि प्राण भरणार होती. जेपी म्हणतात, 'समग्र क्रांती या संज्ञेतून मला असे सुचवायचे आहे की शैक्षणिक, नैतिक, सांस्कृतिक, वैचारिक क्षेत्रांत मूलगामी सुधारणा घडवून आणून त्याद्वारे जातिविहीन व वर्गविहीन समाजाची आकारणी केली जाणार आहे. पण हे सगळे साध्य व्हायचे तर त्याचा एकमेव मार्ग म्हणजे लोकांमध्ये जागृतीची लाट पसरवून त्यांचा संपूर्ण सहभाग या चळवळीत मिळविणे हाच आहे.'

**समग्र क्रांतीचे स्वरुप :** १) राजकारणाचे शुध्दीकरण करणे - देशाच्या वर्तमान दुरावस्थेचे निदान करणारे तीन लेख 'एव्हरीमन' या साप्तहिकात जेपींनी लिहिले होते. त्यांच सारांश असा - सार्वजनिक जीवनातील नैतिक अधःपतन हे देशाच्या वर्तमान दुरवस्थेचे मूळ कारण आहे. सर्व क्षेत्रांना, सर्व पक्षांना या रोगाची लागण झाली. सामान्य माणसावरील श्रद्धा हा लोकशाहीचा पाया आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचे हक्क व निर्भय आणि मुक्त निवडणुका त्यासाठी अत्यावश्यक आहेत.

भ्रष्टाचार, पुतणेगिरी, अफरातफर, खोटेपणा हे लोकशाहीचे शत्रू आहेत त्यांचा भारतीय लोकशाहीत सुळसुळाट आढळतो. विकासाच्या व इतर साऱ्याच योजना केवळ कागदोपत्री राहातात. सार्वजनिक पैशाचा अपव्यय होतो. काळा पैसा फोफावतो. प्रतिनिधी स्वार्थासाठी पक्षांतरे करतात. पक्ष निवडणुकांसाठी सूक्तासूक्त मार्गांनी निधींचे डोंगर उभे करतात. त्याचा पक्षावर, राजकारणावर व एकूणच नीतिमत्तेवर विपरीत परिणाम होतो. तद्वतच नोकरशाही, खाजगी व्यवसाय, मतदारवर्ग व राष्ट्र या सर्वांवर अनिष्ट संस्कार होतात. भूक, भ्रष्टाचार, लाचलुचपत, गुलामी, कारकुनीचे शिक्षण, बेकारी - अशा असंख्य समस्या जनजीवन असह्य करुन सोडतात. त्यांच्याविरुद्ध करण्यात येणाऱ्या उपाययोजना केवळ संस्थात्मक व कायदेकानूंच्या स्वरुपाच्या असतात. 'राजकीय व नोकरशाही श्रेष्ठींच्या ठायी सुधारणेची आंतरिक इच्छा असल्यावाचून असे उपाय यशस्वी होत नाही.'

तत्कालीन बिहार शासनाबद्दल जेपींच्या काही तक्रारी होत्या. दमनतंत्राचा व पाशवी शक्तीचा अतिरेकी वापर हे शासन करते, जनतेच्या शांततामय कार्यक्रमांवर बंदीहुकूम, गोळीबार वगैरे केले जातात व अडथळे आणले जातात, हे सारे विधानसभेच्या संमतीनेच घडत असल्यामुळे तिचे विसर्जन झालेच पाहिजे अशी त्यांची मागणी होती. शासन 'अँटीपीपल' आहे, त्याचे मार्ग लोकशाहीशी विसंगत आहेत. 'विकसित देशांच्या लोकशाही समाजात ज्या प्रतिप्रभावी शक्ती (काऊंटरव्हेलिंग फोर्सेस) असतात, जनमताचा प्रतिनिधींवर जो सतत व प्रबळ प्रभाव पडत असतो, स्वतंत्र व साहसी वृत्तपत्रे, शिक्षित समुदाय यांचा जो वैचारिक व नैतिक परिणाम असतो त्या सगळ्या अंतःसंरचनांचा (इन्फ्रास्ट्रक्चर्स) इथे नितांत अभाव आहे.' इथली जनता फक्त मतदान करते. त्यामुळे मंत्री व प्रतिनिधी निरंकुश व स्वच्छंद होतात. पैसे, जात, बल - प्रयोग, मिथ्याचरण इत्यादी आयुधे त्यांच्यापाशी असल्यामुळे त्यांना निवडणुकांचीही भीती वाटेनाशी होते. अशा जनताविरोधी शासनाला एक दिवसही सत्तेवर राहण्याचा नैतिक, घटनात्मक वा लोकतंत्रात्मक अधिकार नाही असे जेपींचे मत होते. त्यांच्या मते, त्यांचा लढा व्यक्तीविरुद्ध नसून त्यांच्या धोरणांविरुद्ध व सिद्धान्ताविरुद्ध होता.

पक्षांनी देऊ केलेले सहकार्य स्वीकारले असले तरी केवळ तेवढ्यावरुन हे विरोधी पक्षांचे आंदोलन ठरत नाही असे जेपींचे मत होते. पक्षांना असे आंदोलन चालविणे शक्यच नसल्याचे सांगून ते म्हणतात 'हे तरुणांचे, विद्यार्थ्यांचे, सर्वसामान्य जनतेचे आंदोलन आहे. जयप्रकाश नारायणचे नव्हे, कोणत्याही पक्षाचे नव्हे.' त्यांना या आंदोलनातून काँग्रेसला पर्यायी पक्ष उभा करायचा नव्हता. कारण काँग्रेस पक्षच भ्रष्ट व स्वार्थी आहे व इतर पक्ष नाहीत असे त्यांचे मत वा अनुभव नव्हता. खरीखुरी लोकसत्ताक, निर्मळ राजवट हेच या आंदोलनाचे अंतिम साध्य होते. अशी क्रांती घडवून आणणे कोणत्याही एका पक्षाला वा सर्वपक्षीय संघटनेला असाध्यच होते.

**२)** जेपी म्हणतात, 'हे आंदोलन सत्ताधारी विरुद्ध अशा पक्षांमधले भांडण नाही तर **छात्रशक्ती जनशक्ती विरुद्ध राज्यशक्ती असा हा संघर्ष आहे.** हा सत्तासंपादनार्थचा लढा नाही तर शासनाचे व राजकारणाचे विशुद्धीकरण करण्यासाठीचा आहे. शासन राजकारणात सत्ताधाऱ्यांप्रमाणे विरोधकही समाविष्ट आहेत. सत्ता कोणत्याही पक्षाची वा पक्षांची असो, त्या सत्तेला माणसाळविण्याची व नियंत्रित करण्याची साधने धारदार करण्यासाठी हे आंदोलन आहे. केवळ क्षणिक झगमगाट नसून सतत चालणारी क्रांतिकारी बदलाची ती प्रक्रिया आहे.'

**३) निबडणूक सुधारणा :** सध्याच्या निवडणूक पद्धतीत मतांचे जागांशी समप्रमाण असत नाही. अल्पमतात असणारा पक्ष संसदेत आणि विधानसभेत प्रचंड सभासदसंख्येने निवडून येतो. कॉंग्रेस पक्षाबाबत हे नेहमीच घडत आले आहे आणि असे घडण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कॉंग्रेस - उमेदवाराच्या विरोधात अनेक उमेदवार उभे राहतात. त्यामुळे त्यांची मते आपापसात विभागली जातात. याचा फायदा प्रतिपक्षाला होतो. या दृष्टीने जेपी अशी सूचना करतात की,

**१) जनता उमेदवार असावा -** विधानसभेच्या पुढच्या निवडणुकीत आमच्या छात्रसंघर्ष आणि जनसंघर्ष समित्यांनी मिळून एकमताने आपले उमेदवार उभे करावेत किंवा उभे असलेल्या उमेदवारांपैकी एकास 'आपला' म्हणून मान्य करावे. अशाप्रकारच्या निवडणुकीत जनतेची फार मोठी भूमिका असेल. असे जनता उमेदवार हमखास निवडून येतील. त्यांचे विधानसभेत बहुमत होईल. मग त्यांनी एकमताने मुख्यमंत्र्याची निवड करावी. विरोधी पक्षांना विश्वासात घ्यावे. विरुद्ध मतांबद्दलही सन्मान बाळगावा आणि सत्तेवर येताच जमीनसुधारणांविषयीचे कायदे शासकीय यंत्रणेमार्फत तसेच विभिन्न पातळ्यांवरील लोकसमित्यांमार्फत प्रभावीपणे अंमलात आणावेत.

**४) जनसमित्यां असाव्यात - जनसंघर्ष समित्यांना** अत्यंत मध्यवर्ती व महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची होती. विद्यार्थी व विरोधी पक्षांनी देशाच्या सर्व भागांत पंचायतीपासून तर जिल्हा पातळीपर्यंत अपक्ष व सन्माननीय अशा व्यक्तींच्या जनसंघर्ष समित्या स्थापन करायच्या होत्या. या समित्यांनी मुक्त आणि न्यायपूर्ण निवडणुका होण्यासाठी मोहीम काढायची, लोकांना त्यांच्या लोकशाही हक्कांचे व जबाबदाऱ्यांचे शिक्षण द्यायचे म्हणजे कालांतराने लोक स्वतःच्या हितसंबंधांचे संरक्षक होऊ शकतील. प्रत्येक मतदारसंघात या समित्या मतदारांना निवडणूक याद्या अद्ययावत करण्याची मागणी करायला सांगतील. त्यांना निवडणुकीसाठी तयार करतील. दक्ष जबाबदारीचे धडे शिकवतील. आपल्या अध्यक्षांना व सचिवांना मतैक्याच्या तत्त्वावर उपलब्ध असलेल्या सर्वोत्तम व्यक्तींची उमेदवार म्हणून निवड करायला सांगतील. तो उमेदवार जनतेचा उमेदवार असेल. तो कोणात्याच पक्षाचा नसेल. जे उमेदवार निवडून येतील त्यांच्या भावी क्रार्यक्रमांवर कडक नजर ठेवण्याचे काम या संघर्ष समित्या करतील. प्रतिनिधी जर वाममार्गाने जात असेल तर त्याला राजीनामा द्यायला भाग पाडतील. अशा प्रकारे जनतेचा अंकुश प्रतिनिधींवर राहील. ते आजच्यासारखे उच्छृंखल, निरंकुश व स्वच्छंद राहू शकणार नाहीत अशी जेपींची अपेक्षा होती.

जेपींच्या मते, या संघर्ष समित्यांचे काम शासनाशी केवळ संघर्ष करण्याचेच असणार नाही. समाजातील प्रत्येक अन्यायाविरुद्ध व अनीतीविरुद्ध संघर्ष करणे हेही त्यांचे काम असेल. म्हणून निवडणूक संपल्यानंतरही एक महत्त्वपूर्ण भूमिका त्यांच्यासाठी राहीलच. खेड्यातील छोट्या अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या - ते पोलीस असोत वा अन्य कोणी - लाचखोरीविरुद्ध त्यांना संघर्ष करावा लागेल. ज्या मोठ्या शेतकऱ्यांनी बेनामी ताबे घेतले आहेत त्यांना रस्त्यावर आणण्यासाठी संघर्ष करावा लागेल. हरिजनांविरुद्ध वगैरे लहानमोठे अन्याय खेड्यांमध्ये चालतात त्यांना त्या आवर घालतील.

या स्थायी संघर्ष समित्या फक्त लोकशाहीसाठीच नव्हे तर सामाजिक, आर्थिक, नैतिक क्रांतीसाठी, किंवा संपूर्ण क्रांतीसाठी फार महत्त्वपूर्ण कार्य करतील. एकदा या जनसमित्यांचे सामर्थ्य जागे झाले व त्याला आवश्यक ती किमान अधिमान्यता कायद्याने प्राप्त झाली की व्यापारी, विक्रेते, शासकीय अधिकारी आणि इतर सर्वांमध्ये माजलेल्या भ्रष्टाचाराचा परिणामकारक मुकाबला करणे कठीण राहणार नाही.

**५) शिक्षणात सुधारणा :** सदोष शिक्षणपद्धतीमुळे आज अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. सुशिक्षित बेकारीच्या प्रश्नांचे प्रमाण आणि गांभीर्य पाहता शिक्षणपद्धतीचा पुनर्विचार करणे अधिकच अगत्याचे वाटू लागते. विद्यार्थी म्हणून युवकांच्या काही समस्या आहेत. त्यांना अभ्यासक्रमात बदल हवेत. शिकविण्याच्या व परीक्षेच्या पद्धतीत बदल हवेत. त्यांच्या पदव्यांना काही मान व महत्त्व हवे. विद्यार्थ्यांमधील खळबळ वाढण्याचे कारण या समस्यांकडे समाजधुरीणांनी आजपर्यंत दुर्लक्ष केले हेच आहे असे जेपींना वाटते. त्यांच्या मते,

१) सध्याची शिक्षणपद्धती अनैसर्गिक व निस्संदर्भ आहे. तीत नैतिक मूल्ये नाहीत, आध्यात्मिक साध्ये नाहीत. पुस्तकी घोकंपट्टीवरच भर देऊन प्रत्यक्ष कामाच्या शिक्षणाकडे ती कानाडोळा करते. श्रमप्रतिष्ठेचे संस्कार ती करीत नाही. विद्यार्थ्यांना महागड्या सवयी लावते. जीवनाकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोण ती बदलू शकत नाही. निर्जीव, अनुत्तेजक अशा या पद्धतीत विद्यार्थ्यांसमोर काही आव्हानेच नसतात. शिक्षक विद्यार्थ्यांचे संबंध मैत्रीपूर्ण नसतात. सुट्यांचा सुकाळ असून त्या काळात रिकाम्या राहणाऱ्या या मनुष्यबळाचा उपयोग करुन घेतला जात नाही.

२) शिक्षणसंस्थांमध्ये धंदेवाईकपणा आला आहे. ही शिक्षणपद्धती समाजात कायम स्वरुपाचे सामाजिक व आर्थिक बांध घालीत आहे.

३) कालबाह्य परीक्षापद्धतीवर ती आधारलेली आहे.

४) दरवर्षी बाहेर पडणाऱ्या हजारो पदवीधरांना रोजगाराचीही हमी नसते.

५) संपूर्ण शिक्षणव्यवस्था शासनाच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष नियंत्रणाखाली असल्याने तिचे स्वातंत्र्य संपुष्टात आले आहे.

६) हे सारे चित्र बदलणे हा समग्र क्रांतीचा एक महत्त्वाचा भाग होता. शिक्षणात असे बदल करत असतानाच त्याच्याशी संबंधित असलेला बेरोजगाराचा प्रश्न मिटविण्याच्या दृष्टीने कामगारप्रधान अशा उद्योगधंद्यांना दीर्घकाळ उत्तेजन देऊन तदनुसार तंत्रांचा वापर करावा लागेल. अनेक नव्या योजना हाती घेऊन खंबीरपणे राबवाव्या लागतील, अशी जेपींची अपेक्षा होती.

**६)** एकीकडे असे रचनात्मक प्रयत्न करीत असतानाच दुसरीकडून चळवळ **भ्रष्टाचाराविरुद्ध, कुशासनाविरुद्ध** तद्वतच काळाबाजार, नफेबाजी इत्यादींविरुद्धही मोहिमा उघडणार होती. नवी नवी क्षेत्रे क्रांतीच्या कक्षेत आणून जेपींनी तिची व्याप्ती वाढविली होती. निवडणुकांमध्ये पैसा ओतून उद्योगपती व इतर लक्ष्मीधरांनी या देशातील लोकशाहीचे विडंबन चालविले आहे. चोरटे धंदे व आयात करुन गडगंज काळा पैसा गोळा करणारेसुद्धा शासनाचे मुखलेपन करुन स्वतःविरुद्ध कारवाई करणे त्यास अशक्य करुन सोडतात. हे दुष्ट व्यवहार बंद पाडण्याचा दृष्टीने, राजकारणी, नेत्यांशी संगनमत करणाऱ्या उद्योगभवनांचा कारभार लुळा पाडण्यासाठी वा काही काळ थांबविण्यासाठी अहिंसक सामुदायिक चळवळ करण्याचा मार्ग जेपींनी सांगितला होता.

**७) समग्र क्रांतीची साधने :** जास्तीत जास्त लोक ज्यात भाग घेऊ शकतील असे जे क्रांतीचे बंद, सत्याग्रह, पिकेटिंग, मोर्चा इत्यादी गांधीप्रणीत मार्ग आहेत त्या सर्वांचा वेळोवेळी यशस्वी वापर करुन जयप्रकाशांनी हे आंदोलन व्यापक केले. शहरी, मध्यम - विशेषतः निम्नमध्यम

वर्गातील आंदोलकांबरोबरच ग्रामीण शेतकरी व शेतमजूर हजारोंच्या संख्येने कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असता क्रांतीचा एक चार कलमी कार्यक्रम जेपींनी दिला होता. त्यात पुढील गोष्टींचा समावेश होता.

१) गटपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंतचे शासकीय कार्यालयीन काम बंद पाडणे, दारुच्या दुकानांसमोर धरणे धरणे.

२) जिथे लोकांची चळवळ पुरेशी समर्थ व गतिमान झाली असेल अशा ठिकाणी ग्रामस्वराज्याचा कार्यक्रम सुरु करणे. म्हणजे ग्रामसभा, पंचायत जनसभा, गट जनसभा इत्यादी स्थापन करुन चालविणे. शासकीय प्रशासनाची जागा घेणारे 'लोक प्रशासन' उभे करणे. शासनाला कर नाकारुन लोकांच्या प्रशासनाला स्वेच्छेने अर्थसहाय्य देणे इत्यादी.

३) शासनाला आंदोलनाच्या सामर्थ्याचा व लोकांच्या पाठिंब्याचा प्रत्यय आणून देण्याच्या हेतूने मोठमोठाले जनता मोर्चे काढणे.

४) शासनाला पर्यायी अशी जनता सरकारे अस्तित्वात आणणे.

**जनता सरकार :** जेपींच्या मते जे शासन आंदोलनाविषयी ताठर व अडवणुकीच्या भूमिका घेते त्याच्याशी असहकार करणे हे जनता सरकारच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असेल. उदा. लोकांनी आपली भांडणे पोलिस ठाण्यावर अथवा कोर्टात नेऊ नयेत, तर जुन्या पंचपद्धतीप्रमाणे सोडवावी. सरकारी कचेऱ्यांतील - थेट सचिवालयापर्यंतच्या कचेऱ्यांतील - कामकाज बंद पाडावे. याबरोबरच निवडक प्रकारच्या असहकाराचेही कार्यक्रम चालू ठेवावेत. सरकारला कर नाकारावेत. सध्यापुरते काही निवडक कर बंद पाडण्याचा कार्यक्रम घ्यावा; उदा. जमिनीचा कर, सर्वप्रकारचे उपकर (सेस) तकावी कर. यातून धरपकडी होतील. स्थावर- जंगम इस्टेटीचे लिलाव होतील. पण घाबरु नये. नवे सरकार येताच ते लिलाव रद्द होतील, लोकांना आपली जमीन व संपत्ती परत मिळेल याविषयी निःशंक राहण्यास जेपी सांगत होते. त्यांच्या योजनेनुसार जनता सरकारात जी जन-विधानसभा असेल तिचे सभासद निवडून देण्यासाठी प्रत्येक मतदारसंघात एक मतदारसंघ परिषद असेल. त्या मतदारसंघातील सर्व पंचायतींनी व जनसंघर्ष व छात्र संघर्ष समित्यांनी या परिषदेचे सभासद निवडलेले असतील. ते आपल्यामधूनच जनविधानसभेच्या सभासदांची निवड करतील. अशा पद्धतीने तयार झालेली विधानसभा ही खरोखरीची जनविधानसभा असेल. कारण मतदारसंघातील लोकांनी तिचे सदस्य निवडलेले असतील राजकीय पक्षांनी ते त्यांच्यावर आजच्याप्रमाणे लादलेले असणार नाहीत. ग्राम व जिल्हा पातळ्यांवरील केंद्रे अन्याय व जुलूम याविरुद्ध लोकशक्तीने चालविलेल्या लढ्याची आयुधे ठरतील आणि त्यावेळी दुसऱ्या अंगाने समताधिष्ठित समाजाच्या व दारिद्र्य, छळ आणि शोषण निर्मूलनाच्या कार्यात साधनीभूत ठरतील, अशी जेपींची अपेक्षा आहे.

**क्रांती - पोलिस आणि लष्कराचा सहभाग :** जेपींच्या मते, हा संघर्ष जनतेचा असेल तितकाच तो पोलिसांच्या व सैन्यातील जवानांचाही असेल. कारण ते जनतेचेच घटक असून सामान्य जनतेला टंचाई, भ्रष्टाचाराचे जसे चटके बसतात तसे त्यांनाही बसतात. तेव्हा त्यांनीही या आंदोलनात सहभागी होणे मुळीच गैर नाही. ते म्हणतात, 'तुम्ही वरच्या अधिकाऱ्यांचे आदेश पाळू नका हे मी या पोलिस शिपायांना, छोट्या अधिकाऱ्यांना म्हणत नाही. जरुर पाळा, परंतु गांधीजींनी म्हटले होते त्याप्रमाणे, जे आदेश अनुचित आणि अन्यायपूर्ण आहेत असे तुमचा अंतरात्मा सांगेल, त्यांना मुळीच पाळू नका. मी काही पोलिसांना बंड करायला शिकवत नाही; मी तर केवळ कर्तव्याकर्तव्याचा त्यांना बोध करुन देत आहे. त्यांच्या मते, शांततामय मार्गाने सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तींवर केवळ वरिष्ठांची आज्ञा प्रमाण मानून लाठ्या वा गोळ्या चालविणे

जर सदद्विवेकबुद्धीला पटणार नाही, तर पोलिसांनी ते करु नये. हिंसाचारी प्रयत्न त्यांनी बळप्रयोगान्वये अवश्य मोडून काढावेत. रायफलींचा उपयोग सीमांच्या रक्षणासाठी करावयाच्या लढाईत असतो. स्वदेशबांधवांविरुद्ध त्यांचा वापर होऊ नये. देशाची इभ्रत वाढविणाऱ्या भारतीय सेनेचा उपयोग देशातील लोकांवर गोळीबार करण्यासाठी होणे ही अत्यंत लाजिरवाणी स्थिती आहे, असे जेपींना वाटते. या दृष्टीने जेपींनी लष्करालासुद्धा या समग्र क्रांतीत स्वतःचा वाटा उचलावा लागेल असा इशारा केला होता.'

**मूल्यमापन :**

योगदान - जेपींची समग्र क्रांतीची चळवळ म्हणजे समाजनिर्मितीचे आंदोलन वाटत होते. जेपींनी जन्मभर लोकशाही व स्वातंत्र्य या मूल्यांशी निभवलेली बांधीलकीच त्यांच्या मूलभूत स्वातंत्र्यासाठी केलेल्या आंदोलनात जाणवत होती. प्रासंगिक प्रश्नांकडून मौलिक मुद्यांकडे झालेली आंदोलनाची वाटचाल पाहता ते भारतीय लोकशाहीच्या गंभीर व्याधी दूर करु शकेल असा विश्वासही अनेकांना वाटत होता. जेपींनी विद्यार्थ्यांच्या व जनतेच्या प्रांसगिक आंदोलनाच्या कक्षा विस्तारुन अन्य राजकीय पक्ष, घटनातज्ज्ञ, पत्रकार व विचारी नागरिक यांना चळवळीत सामावून घेतले.

टीका - चळवळीची बांधणी एकखांबी असल्यामुळे तिच्या भवितव्यावर गंभीर मर्यादा होत्या. जेपींचे नेतृत्व सोडल्यास चळवळीच्या घटकांना एकत्र धरुन ठेवणारा कोणताच तत्त्वैचारिक बंध नव्हता. किंबहुना जेपींच्या लोकप्रियतेचा स्वार्थी राजकारणासाठी फायदा करुन घेणाऱ्यांचाच चळवळीत मोठा भरणा होता. त्यातील अनेकांचे चारित्र्य भ्रष्ट, संशयास्पद व आक्षेपार्ह होते. काँग्रेसवर ज्या दोषांचा आरोप जेपींनी केला होता त्यांच्यापासून वस्तुतः देशातील कोणताच राजकीय पक्ष मुक्त नव्हता. तेव्हा अशा बरबटलेल्या पक्षांना हाताशी धरुन लोकशाहीच्या शुद्धीकरणाची चळवळ चालवण्याचा जेपींचा प्रयत्न अंगलट येणारा आहे असा टीकाकारांचा होरा होता. तळपातळीवर प्राथमिकही बांधणी न होताच देशव्यापी झालेल्या चळवळी काहीकाळ प्रबळ व प्रचंड असल्या तरी हवेतल्या मनोऱ्यांप्रमाणे तात्पुरत्याच राहतात. सत्तांतर झाले. काँग्रेसची सत्ता जाऊन जनता पक्षाच्या हाती सत्ता आली आणि चळवळ कायमची संपली.

## १२.६ प्रश्न

१) जयप्रकाश नारायण यांच्या विचारांची वाटचाल साम्यवादाकडून सर्वोदयाकडे कशी झाली ते स्पष्ट करा.

२) लोकशाहीसंबंधी जयप्रकाश नारायण यांचे विचार स्पष्ट करा.

३) जयप्रकाश नारायण यांची समग्रक्रांतीच्या कल्पनेचे विवेचन करा.

## १२.७ संदर्भ

१) घोष शंकर, 'मॉर्डन इंडियन पोलीटिकल थॉट'

२) भोळे भा. ल. 'भारतीय राजकीय विचार'.

❖❖❖❖

# १३

# जमातवाद (COMMUNALISM)
# हिंदु - मुस्लिम आणि शिख

**घटक रचना :**


१३.१ जमातवादाचा अर्थ आणि कारणे

१३.२ हिंदू जमातवाद

१३.३ मुस्लिम जमातवाद

१३.४ शिख जमातवाद

१३.५ प्रश्न


## १३.१ जमातवादाचा अर्थ आणि कारणे

न्यूवेबस्टर डिक्शनरी मध्ये जमातवादाची व्याख्या अशी आहे. "A sense of belonging to the community". नकारात्मक दृष्टीकोनातून साऊथएशियाच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या संदर्भात जमातवाद म्हणजे 'सामाजिक आर्थिक व राजकीय सत्ता मिळविण्यासाठी धर्माचा दुरुपयोग करणे होय.'

धर्माचे राजकीयीकरण म्हणजेच जमातवाद किंवा सांप्रदायिकता वाद होय. जमातवादाची कारणे - भारतातील जमातवादासाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताने धर्म निरपेक्षतेचे धोरण स्विकारले आहे. भारत अनेक धार्मियांचा देश आहे. अनेकतेतून एकता भारतात आस्तित्वात आली आहे. तरीही जमातवादाची समस्या भारतात आढळते त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

### १) ब्रिटिश राज्यकर्त्यांचे धोरण :

हिंदू - मुसलमान यांच्यात फूट पाडण्यासाठी आणि त्यांच्यात दुही निर्माण करण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्ते निश्चितच जबाबदार होते. या दोन्ही जमातींमध्ये फूट पाडणे या उद्देशाने त्यांची धोरणे होती. १९०९ साली ब्रिटिशांनी मुसलमानांना वेगळा मतदारसंघ दिला होता. मुस्लिम लीग या पक्षाची स्थापना करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले होते. हिंदू मुस्लीम जमातवादाला खतपाणी मिळते गेले. 'डिव्हाईड ॲन्ड रुल' या ब्रिटिश धोरणामुळे भारतात जमातवादाला प्रोत्साहन मिळत गेले.

**२) जमातवादी संघटना आणि पक्षांची स्थापना :**

१९०६ साली मुस्लिम लिगची स्थापना झाली त्यानंतर हिंदू महासभा स्थापना झाली. या जमातवादी संघटना आणि पक्ष जमातवादाला प्रोत्साहीत करीत असतात. स्वातंत्र्यापूर्वी मुस्लिम लिग आणि हिंदु महासभा या जमातवादी पक्षांची स्थापना झाली होती. मुस्लिम लिग मुस्लिम लोकांचे हितसंबंध जोपासण्यावर भर देत होती. हिंदुमहासभा हिंदुचे हितसंबंध जोपासण्याला महत्त्व देत होती. यातूनच जमातवाद फोफावत गेला आणि परिणाम देशाची फाळणी झाली. जमातवादी संघटना आणि पक्ष आपआपल्या गटाच्या हितसंबंधासाठी जातिद्वेष वाढवितात. क्षुल्लक कारणांवरुन लोकांच्या भावना भडकविण्याचे काम करतात.

**३) सत्तास्पर्धा** - राजकीय पक्ष आणि पक्षाचे श्रेष्ठी सत्तेसाठी आणि आपल्या गटाच्या हितसंबंधासाठी आणि सत्तेसाठी सतत संघर्ष करतात. भारत विविध धर्मिय देश आहे. भारतात धर्मनिरपेक्षता तत्त्वाचा स्विकार करण्यात आला आहे. तरीही अल्पसंख्य धर्मियांमध्ये असुरक्षिततेची भावना दिसून येते. त्यांच्या या भावनेचा फायदा धर्मावर आधारित पक्ष व संघटना घेतात. मुस्लिम लिग, हिंदुमहासभा, विश्वहिंदू परिषद, अकाली दल या संघटना व पक्ष सत्तास्पर्धेमुळे धर्माचा उपयोग करुन जमातवादी राजरकारणाला खतपाणी देतात असे दिसून येते.

**४)** असुरक्षिततेची भावना. आपल्याच देशात आपण उपेक्षित आहोत अशी भावना अनेकदा भारतात हिंदुमध्ये दिसून येते. त्यामुळे इतर धर्माच्या नेत्यांकडे, आणि संघटनांकडे संशयाने व पूर्वग्रहदूषित नजरेने बघण्यात येते. त्यातून दोन धर्मामध्ये अविश्वासाचे आणि द्वेषाचे वातावरण निर्माण होते.मुस्लिम धर्मियांना हिंदूविषयी सशंय वाटतो. अशा प्रकारे त्यांच्यात निर्माण झालेल्या संशयास्पद भावनेला जमातवादी नेते प्रोत्साहन देतात. अनेकदा मुसलमानांची संख्या जास्त असणाऱ्या शहरात भारतीय राष्ट्रीयत्वासंबंधी संशयास्पद गोष्टी मुद्दाम मुस्लिम नेते घडवून आणतात. साधारणपणे जेथे मुसलमान धर्मियांची संख्या जास्त आहे. अशा उत्तरप्रदेश, बिहार, महाराष्ट्र या राज्यातील काही प्रदेशात हिंसक दंगली झालेल्या आहेत असे दिसून येते.

**५)** बेकारी दारिद्र्य असे घटक आहेत की ज्याच्या अगितकतेमुळे अनेक तरुण वाटेल त्या गोष्टी करण्यास तयार होतात. राजकीय श्रेष्ठी, मुल्लामौलवी, जातीयवादी नेते बेकारी व दारिद्र्याने ग्रासलेल्या तरुणांना हाताशी धरतात. तरुणांच्या मनात धार्मिक कट्टूतेचे बिज पेरण्यात येते आणि जमातवाद घडविण्यात येतो.

**६) आर्थिक स्पर्धा** - काही शहरांमध्ये दोन धर्मियांमधील व्यापारी गटांच्या स्पर्धेतून जमातवाद निर्माण झाला आहे. नाशिकजवळ येवला येथे हिंदु - मुस्लिम दंगली झाल्या. त्या दंगली च्या अभ्यासावरुन असे दिसून आले की दंगलीचे प्रमुख कारण हिंदु मुसलमान व्यापारी व त्यांच्यातील व्यापारी आर्थिक स्पर्धा हे कारण होते. व्यापारी गटाच्या वैमन्यासातून तेथे दंगल झाली होती. मालेगाव येथे झालेल्या हिंदु मुस्लिम यांच्यात झालेल्या दंगलीचे विश्लेषन केले असता हिंदू - मुस्लिम यांच्यातील आर्थिक स्पर्धा हेच जातीयवादाचे कारण होते. असे दिसते.

**७) जमातवादी राजकारण** - सत्तेमध्ये वाटा मिळावा यासाठी जमातवादी राजकारणाचा आधार बरेचदा घेण्यात येतो. धर्म भावनेचा उपयोग करुन बाबरी मश्जिद, रामजन्मभूमिवाद, रथयात्रा, धर्मश्रेष्ठतेसंबंधीचा विचार मुद्दाम पेरुन त्याला खतपाणी घालण्यात येते. अशा अनेक कारणांमुळे सांप्रदायिकतावाद अस्तित्वात येतो.

अशा प्रकारचे जमातवादी राजकारण वास्तविकपणे अतिशय धोक्याचे असते. भारतीय स्वातंत्र्याच्यावेळी देशाची फाळणी आणि त्यानंतर झालेले दंगे, अशांतता, प्राणहानी जमातवादी राजकारणामुळे घडले होते. स्वातंत्र्यानंतर सुद्धा जेव्हा जमातवादी राजकारणाला महत्त्व देण्यात येते तेव्हा तेव्हा त्यामुळे संपूर्ण राजकीय प्रक्रिया दूषीत झाली आहे. संधीसाधू राजकारण अस्तित्वात आले, कायदा सुव्यवस्था धोक्यात आली आणि समाजात तणावाचे, अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे, जिवीतहानी, वित्तहानी झाली. काश्मीरप्रश्न, पंजाबप्रश्न यासारखे प्रश्न देशासमोर येतात आणि देशाच्या एकतेला आणि अखंडतेला धोका निर्माण होतो. द्वेषाचे राजकारण उदयास येते.

सांप्रदायिकतावाद ही राजकीय विचारसरणी आहे. जी धर्माशी जोडण्यात येते. राजकीय श्रेष्ठी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक सत्ता मिळविण्यासाठी त्याचा उपयोग करतात. सांप्रदायिकतावाद धर्माशी जोडण्यात येत असला तरी बरेचदा सामाजिक आर्थिक, राजकीय मागण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येतो. राजकीय शस्त्र म्हणून त्याचा उपयोग करण्यात येतो.

## १३.२ हिंदू जमातवाद

ब्रिटिशांचे ‘फोडा आणि राज्य करा’ ‘divide and rule’ धोरण हिंदू जमातवादासाठी कारणीभूत असले तरी भारतीय स्वतः सुद्धा त्यासाठी जबाबदार आहेत. आधुनिकता म्हणजे भौतिकता, अनैतिकता आणि आत्मनाश आहे. अशा समजुतीतून भारतात हिंदु पुनरुज्जीवनवादी विचारप्रवाह निर्माण झाला होता. स्वामी श्रद्धानंद, मदनमोहन मालवीय, भाई परमानंद, हेडगेवार, श्यामाप्रसाद मुखर्जी, सावरकर, मुंजे इत्यादी विचारवंत पुढारी आणि आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, हिंदू महासभा, अखिल भारतीय शुद्धी संघटना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यासारख्या संघटना हिंदुत्ववादी विचारांचा प्रचार करत होत्या. वेद, उपनिषद, भगवद्गीता इत्यादी ग्रंथाच्या आधारे या देशाला पुन्हा ऊर्जितावस्था आणता येईल असा त्यांचा विश्वास होता. त्या सर्वांच्या विचारात बरीच तफावत असली तरी हिंदूंच्या प्राचीन सनातन तत्वांच्या बळावर राष्ट्रैक्य व प्रगती साध्य होऊ शकेल याबद्दल त्यांच्यात एकवाक्यता होती. अशा प्रकारे गतेतिहासातून प्रेरणांचा शोध घेणे, हिंदुत्वावर राष्ट्रभावनेची उभारणी करणे, हिंदू धर्मग्रंथांनी पुरस्कारलेल्या समाजव्यवस्थेत व मूल्य प्रणालीला शिरसावध मानणे ही हिंदु पुनरुज्जीवनवादी विचारांची वैशिष्ट्ये होती. दयानंद सरस्वती यांनी १८७५ साली आर्य समाजाची मुंबईत स्थापना केली. आर्यसमाजाच्या तत्वज्ञानात आणि चळवळीत मूर्तिपूजेला विरोध होता. एकेश्वरवादाचे worship of a single unseen god चे समर्थन त्यांनी केले होते. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेला त्यांचा विरोध होता. आर्यसमाजाने शुद्धी चळवळ सुरु केलि होती. अर्थात इतर धर्मियांवर त्यांचा प्रभाव पडला होताच. दयानंदाची राष्ट्रवादाची कल्पना हिंदूधर्म आणि वेद यांच्या विश्वासावर आधारलेली होती. आर्यसंस्कृतीचे शत्रू मुस्लिम आणि ख्रिश्चन आहेत असे उघडपणे त्यांनी घोषीत केले होते. त्यामुळे काही टिकाकारांच्या मते आर्यसमाजाची चळवळ हिंदु पुर्नज्जीवनाची चळवळ होती. त्यानंतर राष्ट्रवादाच्या नावाखाली हिंदू राष्ट्रवादाला चालनाच मिळत गेली. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रवादाची भावना विकसित होण्याच्या दृष्टीने गणेश उत्सव, शिवजयंती सुरु केले परंतु त्यामुळेही हिंदू राष्ट्रवादाला आणि जमातवादाला चालना मिळाली असे अनेक टीकाकारांचे मत आहे. १९१५ ला अखिल भारत हिंदु महासभा हिंदुत्व विचारसरणी आणि हिंदुराष्ट्र निर्माण करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आली.

१९२५ ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (R.S.S.) स्थापना हिंदु राष्ट्रवादाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने स्थापन झाली. केशव बळीराम हेडगेवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक होते. राष्ट्रीय सेवक संघापासून प्रोत्साहीत होवून अनेक महत्त्वपूर्ण संघटना उदयास आल्या. उदा. विश्व हिंदू परिषद, द बजरंग दल, राष्ट्रीय सेविका समिती, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सेवा भारती इत्यादी. राष्ट्रीय सेवक संघ प्रत्यक्ष निवडणूकांमध्ये भाग घेत नाही परंतु भारतीय जनता पक्षाशी त्यांचा जवळचा संबंध आहे. १९५१ साली शामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली होती. जनसंघाची स्थापना हिंदूराष्ट्र निर्माण करण्याच्या दृष्टीने राजकीय व्यासपीठ मिळावे या उद्देशाने करण्यात आली होती. भारतीय जनसंघ आज भारतीय जनता पक्षामध्ये समाविष्ट झाला आहे. अनेक जातीय दंगली झाल्यात उदा. १९६९ मध्ये झालेला अहमदबादचा दंगा, १९८९ मध्ये भागलपूर येथे झालेला दंगा, २००२ मध्ये गुजराथ येथे झालेला दंगा जातीयवादामुळे झालेले दंगे होते.

## १३.३ मुस्लिम जमातवाद

हिंदू पुनरुज्जीवनवादी विचारप्रवाहाप्रमाणे मुस्लिम विचारवंताचाही एक पृथक प्रवाह आधुनिक भारतातील राजकीय विचारात निर्माण झाला होता. धर्माच्या आधारे राजकारण करण्यावर त्यांचाही भर होता. काँग्रेसच्या मुख्य प्रवाहाला त्यांचा विरोध होता. काँग्रेसी नेते बद्रुद्दीन तय्यबजी, मौलाना आझाद हे त्या विचाराशी सहमत नव्हते. तर सय्यद अहमद यांचा मात्र काँग्रेसशी मतभेद होता. हा देश एकाच धर्माचा, एकच भाषा बोलणाऱ्या आणि सारखीच विचारसरणी असणाऱ्या व्यक्तींचा तसेच समान ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या व्यक्तींचा आहे असे गृहीत धरुन काँग्रेस राजकारण करीत आहे असा त्यांचा काँग्रेसवर आक्षेप होता. सर सय्यद अहमदांच्या प्रेरणा जमातवादी नव्हत्या परंतु पुढे इकबाल, मौहूदी प्रभृतींनी मांडलेल्या धार्मिक राष्ट्रवादाला अप्रत्यक्षपणे त्यांचे विचार पोषक ठरले होते. इस्लामी राष्ट्रवादाला फुटीरतेकडे घेऊन जाणारे महंमद अली जिना होते. मुस्लिम बहुसंख्येचा बागुलबोवा उभा करुन मुस्लिम जमातवाद उभा करण्यात त्यांना मौलाना महंमद अली, शौकत अली यांची साथ मिळाली.

मुस्लिम धर्मसुधारणेच्या चळवळी वाहाबी चळवळ, अलिगढ चळवळ, अहमदिया चळवळ मुस्लिम समाजात झाल्यात. वाहाबी ही मुळात पुनरुज्जीवनवादी चळवळ होती. महंमद अब्दुल वाहाब हे तिचे प्रमुख होते. प्रेषितांच्या काळात होते तसे विशुद्ध स्वरुप इस्लामला प्राप्त करुन देणे हे वाहाबीचे ध्येय होते. इस्लामचे पावित्र्य व ऐक्य या आधारे दहशतवादी चळवळी उभारणे हा त्यांचा मार्ग होता. बंगालमधील मुस्लिम शेतकरी वर्गाला त्यांनी जागृत केले.

अहमादिया चळवळीचे पुरस्कर्ते सर सय्यद अहमद यांनी अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचा पाया घातला. मुसलमानांच्या नैतिकतेत व बौद्धिक कुवतीत भर घालण्यासाठी १८८५ साली अंजुमन - ए - हिमायत - इस्लाम नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. सरहद्द गांधी अब्दुल गफारखान यांच्या खुदाई खिदमदगार चळवळीनेही मुस्लिम समाजात जनजागरणाचे प्रयत्न केले होते. १९०६ ला मुस्लिम लिगची स्थापना झाली.

१९०९ साली मुस्लिमांना वेगळा मतदारसंघ देण्यात आला. पुढे महमंद अली जीनाच्या मुस्लिम लीगचा ही हेतू तोच होता. परंतु या सर्व मुस्लिम चळवळींना अनपेक्षित व अनिष्ट वळण लागून राष्ट्राच्या दृष्टीने त्यांचा उपयोग होण्याऐवजी राष्ट्राचे नुकसानच झाले. मुस्लिम लीगने

मुसलमानांची मने संकुचित व कडवी केली. १९३२ साली द्विराष्ट्राचा सिद्धान्त मांडला. त्यांच्यावर सांप्रदायितेचा ठसा उमटला याचे पर्यवसान पाकिस्तानच्या निर्मितीत झाले.

स्वातंत्र्यानंतर २५ एप्रिल १९७७ साली "स्टूडंट्स इस्लामिक मुव्हमेन्ट ऑफ इंडिया" (SIMI) अलिगढ येथे स्थापन करण्यात आली. अर्थात आपले हेतू आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सीमीने दहशतवादी मार्गांचा अवलंब केला. सीमीवर आता बंदी घालण्यात आली असली तरी इंडियन मुजाहुद्दीनच्या नियंत्रणाखाली ती कार्यरत असल्याचे दिसून येते. मुस्लिम जमातवादाचा विकास आणि परिणाम लक्षात घेता असे दिसून येते की मुस्लिम जमातवाद सुद्धा अतिशय धोकादायक आहे.

## १३.४ शिख जमातवाद

जगातील अनेक मुख्य धर्मापैकीच शिख धर्म एक आहे. १६ व्या शतकामध्ये जेव्हा भारतात मुगल होते तेव्हा पंजाबमध्ये हा धर्म उदयास आला. शिख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी होते. हिंदू आणि मुसलमान या दोन धर्मांमधील धार्मिक वैरभाव लक्षात घेऊन हिंदू आणि इस्लाम यांच्यात मेळ घालून शिख धर्माची स्थापना करण्यात आली. ऐतिहासिक दृष्टीने शिख जमातवादाची सुरुवात १७ व्या शतकात झाली आहे. मुस्लिम बादशहांकडून शिख गुरुना बराच त्रास झाला त्यातून शिख जमातवाद विकसित होत गेला आहे.

१९४७ ला भारताच्या विभाजनाच्या वेळी पंजाब प्रांत विभागला गेला. त्यानंतर भाषिक पुनर्रचना राज्यांची झाल्यानंतर हरियाणा आणि हिमाचल प्रदेश पंजाबपासून वेगळे करुन त्यांना स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्यात आला. पंजाबी सुभ्यातील शिख श्रेष्ठी असमाधानी होते. त्यातूनच अकाली दल या राजकीय पक्षाची स्थापना झाली. एक प्रकारे शिखांची ती एक धार्मिक संघटना होती. अकाली दल पक्षाची उद्दीष्ट भारताच्या धर्मनिरपेक्ष लोकशाही तत्वांशी फारशी समांत्तर नव्हती. त्यातूनच शिख जमातवादाचा उदय झाला. अकाली दल पक्षाचे मत होते की शिख धर्मियांचे धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक हितसंबंध सुरक्षित करणारी प्रातिनिधीक संघटना फक्त अकाली दल होते. मास्टर तारा सिंग अकाली दल चे वर्चस्ववादी नेते आणि शिख गुरुद्वारा प्रतिबंधक समितीचे अध्यक्ष त्यांनी ऑल इंडिया शिख यांची १९५३ साली सभा घेतली. त्या सभेत तारा सिंगानी मत व्यक्त केले होते की, स्वातंत्र्य मिळाले पण आपल्याला खरे स्वातंत्र्य मिळालेच नाही. फक्त गोरे मालक गेले आणि आता काळे मालक आले. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली आपला धर्म आपले स्वातंत्र्य नष्ट झाले आहे. अशाप्रकारे शिख जमातवाद विकसित झाला.

शिख जमातवादामुळे काही अकाली पक्षाच्या नेत्यांनी शिखांसाठी 'खलिस्तान' या स्वतंत्र प्रदेशाची मागणी केली. १९८० च्या दरम्यान त्यावरुन पंजाबमध्ये हिंसाचार सुरु झाला. जर्नल सिंग भिंद्राणवाले यांनी गोल्डन टेम्पल या पवित्र स्थानाचा उपयोग करुन खलिस्तान या स्वतंत्र प्रदेशाची मागणी राज्याकडे केली. शेवटी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना ऑपरेशन ब्लू स्टार करुन भिंद्रनवाल्याचा नायनाट करण्यात आला. त्यातूनच १९८४ साली इंदिरा गांधी यांची त्यांच्याच शिख सुरक्षागार्डकडून हत्या झाली. आज शिख जमातवाद आणि दहशतवाद नियंत्रणाखाली आहे. परंतु शिख जमातवाद पंजाबमधील राजकारणात कार्यरत असल्याचे दिसून येते.

## १३.५ प्रश्न

१) जमातवादाचा अर्थ आणि कारणे स्पष्ट करा.

२) टिपा द्या.

अ) हिंदू जमातवाद

ब) मुस्लिम जमातवाद

क) शिख जमातवाद

❖❖❖❖

# १४

# समाजवाद आणि साम्यवादी विचार आणि डॉ.राममनोहर लोहिया (१९१० ते १९६७)

**घटक रचना :**

१४.१ प्रस्तावना
१४.२ लोहियांचे भांडवलशाही आणि साम्यवादा संबंधी विचार
१४.३ स्वातंत्र्य कल्पना
१४.४ समता संकल्पना
१४.५ लोहियांची समाजवादाची आणि चौखंबाराज्याची संकल्पना
१४.६ आंतरराष्ट्रवाद
१४.७ मूल्यमापन
१४.८ प्रश्न
१४.९ संदर्भ

## १४.१ प्रस्तावना

जीवनपरिचय - उत्तर प्रदेशातील फैजाबाद जिल्ह्यातील अकबरपूर येथे एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात राम मनोहरांचा २३ मार्च १९१० रोजी जन्म झाला. ते लहान असतांनाच आईचे छत्र हिरावले गेले. चुलती व आजी यांनी त्यांचा सांभाळ केला. वडील हिरालालजी व्यापारक्षेत्रात होते, शिवाय ते काँग्रेसचेही कार्यकर्ते होते. त्यामुळे घराबाहेरच त्यांचा बहुतेक काळ जात असे. राममनोहरांचे बालपण त्यामुळे बरेसचे एकाकी होते. त्यांच्या चिंतनशील व्यक्तिमत्त्वाचे मूळ त्यांच्या या एकाकीपणात असावे.

जन्मगावानजीक असलेल्या टंडन पाठशाळेत प्राथमिक आणि विश्वेश्र्वरनाथ हायस्कुलात माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर राममनोहरांना मुंबईस जावे लागले कारण तोपर्यंत त्यांच्या वडिलांनी मुंबई हे आपल्या व्यावसायाचे केंद्र म्हणून निवडले होते. सलग एका ठिकाणी शिक्षणाची संधी लोहियांना कधीच मिळाली नाही. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षणही प्रारंभी काहीकाळ अलाहाबादला बनारस हिंदू विद्यापीठात झाले आणि नंतर कोलकाता विद्यापीठात ते बी.ए. झाले. चार भिंतीतील पुस्तकी शिक्षणाबरोबरच विविध प्रदेशांतील या भ्रमंतीमुळे प्रत्यक्ष जनजीवनाचे विविधांगी धडे लोहिया गिरवू शकले. या शिक्षणाचा त्यांना जन्मभर खूप उपयोग झाला. १९२९ साली ते पदवीधर झाले.

उच्च शिक्षणासाठी इंग्लडंला जावे ही त्याकाळी बहुतेक होतकरु तरुणांची स्वप्न असायची तशी लोहियांचीही महत्त्वाकांक्षा होती. पण आर्थिक परिस्थिती त्याला मुळीच अनुकूल नव्हती. पण हितचिंतकाकडून पैसे गोळा करुन लोहियांनी आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण केली. ते इंग्लंडला गेले. पण स्थलांतराची प्रक्रिया अद्यापही थांबलेली नव्हती. इंग्लंडातून ते जर्मनीत गेले. तिथे त्यांनी अर्थशास्त्रात संशोधन करुन पीएच्.डी. पदवी संपादन केली. त्यांच्या प्रबंधाचा विषय 'सॉल्ट अँड सिव्हिल डिस्ओबिडियन्स' असा होता. १९३३ साली बर्लिनहून परतल्यानंतर बनारस हिंदू विद्यापीठात प्राध्यापकी मिळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यात यश न आल्यामुळे काहीशा नाराजीनेच त्यांनी रामेश्र्वरदार बिर्लांच्या स्वीय सचिवाचे काम पाहिले.

**राजकारणाची गोडी** लोहियांना विद्यार्थीदशेतच लागली होती. १९२६ च्या गोहाती काँग्रेसला ते स्वयंसेवक म्हणून हजरही राहिले होते. १९३४ साली जेव्हा काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्षाची स्थापना झाली तेव्हा त्यांनी स्वतःला पूर्ण वेळ राजकारणात झोकून दिले. **'काँग्रेस सोशॅलिस्ट' या नियतकालिकाच्या संपादकपदाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली.** लखनौ अधिवेशनात जवाहरलाल नेहरुंनी लोहियांची नेमणूक राष्ट्रसभेच्या परराष्ट्र विभागाचे सचिव म्हणून केली. त्या पदावर ते १९३८ पर्यंत होते. दरम्यानच्या काळात त्यांनी कोलकात्याहून अलहाबादला आपले मुख्यालय हलवले. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी त्यांनी प्रखर युद्धविरोधी भूमिका स्वीकारली. साम्राज्यशाहीविरोधी व युद्धविरोधी भाषणे केल्याबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना अटक केली.

तेव्हापासून राम मनोहर लोहियांच्या आयुष्यात जे अटकसत्र सुरु झाले ते अखेरपावेतो चालू राहिले. स्पष्टवक्तेपणा, आक्रमक वक्तृत्व आणि प्रचंड प्रतिसाद या कारणांमुळे स्वातंत्र्यपूर्वकाळातच नव्हे तर स्वातंत्र्योत्तरकाळातही वारंवार लोहियांना कारावास घडला. एकूण एकोणीस लहानमोठे कारावास त्यांनी भोगले. त्यापैकी काही कारावासांत त्यांना अनन्वित छळाला तोंड द्यावे लागले. पण लोहिया कधीच डगमगले नाहीत किंवा विचारपूर्वक घेतलेली आपली भूमिका त्यांनी कधी सोडली नाही. लोहियांची भाषणे आवेश पूर्ण असायची, स्वातंत्र्य व समता या मूल्यांचा त्यात जोरदार पुरस्कार असायचा. त्या मूल्यांवर संकट आल्याचे आढळताच लोहिया अन्यायाविरुद्ध व अन्यायकर्त्यांविरुद्ध उभे राहायचे.

**१) समाजवादी विचारांवर त्यांची दृढ श्रद्धा होती.** समजावादी विचारात त्यांनी स्वतःची वेगळी भर घातली आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील निवडक मूलगामी व देशी विचारवंतांत लोहियांची गणना करता येते. स्वातंत्र्याच्या पाश्चिमात्य परंपरा पचवून त्यांचा भारताच्या प्राचीन परंपरांशी मेळ घालण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी जन्मभर पार पाडले. **मार्क्सवादाचे त्यांना आकर्षण होते. पण त्यांच्या विचारांचा पाया गांधीवादाचा होता.** त्यांच्या समाजवादात या दोन्ही विचारसरणींचा समनव्य आढळतो.

१९४२ च्या आंदोलनात अच्युतराव पटवर्धन व जयप्रकाश नारायण यांच्याबरोबर लोहियांनी भूमिगत राहून कार्य केले. 'आझाद दस्त' साठी जयप्रकाशांसोबत ते नेपाळला गेले असता तिथे त्यांना अटक झाली (१९४४). दोन वर्षे ते तुरुंगात होते. देशातच नव्हे तर परदेशातही अमेरिका, इंग्लंड, म्यानमार, गोवा वगैरे ठिकाणी कारावास लोहियांना भोगावा लागला होता. देशाच्या फाळणीला त्यांचा विरोध होता. हिंदू - मुस्लिम एकजुटीचे ते खंदे समर्थक होते.

फाळणीनंतर हिंदू - मुस्लिम दंगलींचा जो आगडोंब देशात उसळला त्यावेळी शांतता प्रस्थापित करण्याच्या उपक्रमात गांधींसोबत लोहियाही होते.

२) **नेहरुंशी लोहियांचे तीव्र मतभेद होते.** समाजवाद, भाषिक धोरण, अलिप्ततावादी धोरण अशा अनेक प्रकरणी हे मतभेद वारंवार व्यक्त झालेले दिसून येतात.

१९४८ साली समाजवादी पक्ष काँग्रेसच्या बाहेर पडला, तेव्हा समजावादी पक्षाचे नेतृत्व स्वाभाविकच लोहियांकडे आले. पुढे तो पक्ष कृषक मजदूर पक्षात विलीन होऊन प्रजा समाजवादी पक्ष अस्तित्वात आला (१९५२), १९५५ साली त्याहून बाहेर पडून लोहियांच्या पुढाकाराखाली हैदराबाद मुक्कामी समाजवादी पक्षाची स्थापना झाली. तो पक्ष पुन्हा प्रजा समाजवादी पक्षात विलीन होऊन संयुक्त समाजवादी पक्ष १९६४ साली अस्तित्वात आला. फाटाफुटीची ही क्रिया पुढेही सुरुच राहिली. विद्यार्थी असल्यापासून समाजवादाशी बांधीलकी पत्करलेल्या लोहियांसाठी या घडामोडी अत्यंत क्लेशकारक होत्या. त्यांचे टीकाकार लोहियांच्या स्वभावदोषांना अंशतः त्या घडामोडींसाठी जबाबदार धरतात. मे १९५२ मध्ये पंचमढीला भरलेल्या समाजवादी परिषदेत लोहियांच्या आर्थिक विचारांवर कडक टीका झाली होती. जून १९५३ मध्ये अशोक मेहतांनी पोलिटिकल कम्पल्शन्स ऑफ अ बॅकवर्ड इकॉनॉमी (मागास अर्थव्यवस्थेच्या राजकीय निकडी) हा आपला सिद्धांत मांडला. काँग्रेसची विचारसरणी समाजवादाच्या जवळ जाणारी असल्यामुळे त्या पक्षाशी सहकार्य करण्यातच समाजवादी पक्षाचा शहाणपणा आहे. फटकून राहण्यात कोणाचेच हित नाही. देशाच्या मागासपणामुळे समाजवाद्यांना दुसरा पर्यायच उपलब्ध नाही असा मेहतांच्या प्रबंधाचा आशय होता. लोहिया या विचाराशी सहमत नव्हते. समाजवादी पक्षाने काँग्रेस आणि कम्युनिस्ट या दोहोंपासून समानांतरावर रहावे असे त्यांचे म्हणणे होते.

३) स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय भाग घेतलेल्या लोहियांनी स्वातंत्र्योत्तरकाळातही आपल्या निष्ठांशी इमान राखून **विविध आघाड्यांवरील संघर्षात झोकून दिले.** शेतकऱ्यांचे लढे, जाती तोडो आंदोलन, अंग्रेजी हटाव चळवळ, हिंदी राष्ट्रभाषा व्हावी म्हणून संघर्ष, गोवा मुक्ती आंदोलन, नेपाळच्या स्वातंत्र्यलढा अशा अनेक संघर्षामधील लोहियांचा सहभाग लक्षणीय होता. इंग्रजीची जागा हिंदी भाषेने तात्काळ घ्यायला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. प्रशासनाची भाषा जोपर्यंत इंग्रजी राहील तोपर्यंत, ती भाषा मुळीच न येणारी बहुसंख्य जनता देशात असल्यामुळे, येथे खरी लोकशाही अस्तित्वात येऊच शकणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. १९५४ साली त्रावणकोर कोचीन राज्यात त्यांच्या पक्षाचे पट्टम थाणू पिल्ले यांचे सरकार असताना भाषावार प्रांतरचनेसाठी आंदोलन उभे राहिले. सरकारने आंदोलकांवर गोळीबार केला असता लोहियांनी निषेध केला आणि पिल्ले सरकारचा राजीनामा मागितला. लोहिया भाषाप्रभू होते, भाषेचे सांस्कृतिक महत्त्व जाणून होते. स्वतः त्यांना इंग्रजी, हिंदी, उर्दू, बांगला, फ्रेंच व जर्मन या भाषा उत्तम अवगत होत्या.

१९५१ च्या पहिल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेसाठी लोहिया जर्मनीत फ्रँकफुर्टला गेले होते. १९५३ च्या रंगून येथील आशियायी समाजवादी परिषदेच्या आयोजनाची जबाबदारी त्यांनीच घेतली होती. प्रत्यक्ष परिषदेत मात्र ते हजर राहू शकले नव्हते. १९६३ साली फरुखाबाद मतदारसंघातून लोकसभेवर ते निवडून आले. मरेपर्यंत ते त्या पदावर होते. सभासदत्वाच्या काळात प्रमुख विरोधी पक्षाचे नेते म्हणून त्यांनी पार पाडलेल्या भूमिकेला या देशाच्या संसदीय इतिहासात तोड नाही.

**४) लोहियांच्या प्रतिपादनातील प्रमुख सूत्रे:-** निवडणुकांचे राजकारण करुन विधिमंडळे गाजवणे एवढ्यावर लोहियांनी कधीच समाधान मानले नव्हते. निवडणुकांद्वारे फारतर सत्तापालटाचे राजकारण साध्य होईल. सामाजिक परिवर्तनासाठी सत्याग्रहादी मार्गांनी संघर्ष करण्यावाचून गत्यंतर नसते. अर्थात केवळ संघर्ष करुनही स्थायी स्वरुपाचे बदल घडवून आणता येत नाहीत. त्यासाठी संघर्षांना रचनात्मक कार्यांची जोड घ्यावी लागते. मतपेटी, तुरुंग आणि फावडे ही तीन प्रतीके अनुक्रमे निवडणुका, लढे व रचनात्मक कार्य यासाठी योजून लोहियांनी आपली भूमिका मांडली होती. राजकारणात सत्तेचे विकेंद्रीकरण, अर्थकारणात अल्पाकारी यंत्रांवर आधारित लघुद्योग, समाजकारणात स्त्री - पुरुष समानता व मागासवर्गीयांना विशेष संधी आणि पक्षकारणात काँग्रेसविरोध ही लोहियांच्या प्रतिपादनातील प्रमुख सूत्रे होती. या सर्वच विषयांवर त्यांनी विचारप्रवर्तक लेखन केले आहे.

लेखन - त्यांच्या लेखनापैकी विशेष उल्लेखनीय म्हणून पुढील पुस्तकांचा उल्लेख करता येईल : मिस्ट्री ऑफ सर स्टॅफर्ड क्रिप्स (१९४२), आस्पेक्टस् ऑफ सोशालिस्ट पॉलिसी (१९५२), व्हील ऑफ हिस्ट्री (१९५५), गिल्टी मेन ऑफ इंडियाज् पार्टीशन (१९६०) मार्क्स, गांधी अँड सोशलिझम् (१९६२), दि कास्ट सिस्टीम (१९६४), फ्रॅग्मेन्टस् ऑफ वर्ल्ड माइंड (१९६६). अन्तहीन यात्रा, ललित लेणी, इतिहासचक्र, भारतीय फाळणीचे गुन्हेगार, दोन हत्यारे सत्ताधाऱ्यांची : भाषा आणि जाती ही त्यांची मराठीत भाषांतरित झालेली पुस्तकेही वाचकांच्या पसंतीस उतरली आहेत.

## १४.२ लोहियां भांडवलशाही व साम्यवादासंबंधी विचार

लोकशाही, स्वातंत्र्य, समता, समाजवाद, सत्तेचे विकेंद्रीकरण, आंतरराष्ट्रीय सहजीवन व शांतता हे त्यांच्या सर्व समकालीनांनी हाताळलेले विषय राम मनोहर लोहिया यांच्या लेखनातही विस्ताराने मांडलेले आहेत. लोहिया पाश्चिमात्य विचार विश्वातील संकल्पनांचे सखोल मूल्यमापन करुन स्वतःचा वेगळा विचार मांडतात. भांडवलशाही व साम्यवाद या एकमेकांचे पर्याय म्हणून जगासमोर आलेल्या दोन्ही व्यवस्थांची चिकित्सा करुन त्यांच्यातील दोषांचे दिग्दर्शन लोहिया करतात आणि तिसऱ्याच पर्यायी नव्या विचारांची रुपरेषा मांडतात. समाजवादाच्या प्रचलित प्रतिमानापेक्षा भारतीय समाजवादाची वेगळीच आवृत्ती ते साकार करतात. लोहियांच्या राजकीय विचारांचे हेच वेगळेपण आणि नवेपण आहे.

### १) जुनी सभ्यता : नवी सभ्यता यांचा मेळ असावा :

आध्यात्मिकता आणि भौतीकता यांचा मेळ असावा. व्यक्ती व तिचे पर्यावरण या दोहोंचा संतुलित विचार आवश्यक आहे. भांडवलशाहीने फक्त व्यक्तीचाच विचार केला तर साम्यवादने फक्त पर्यावरणाचाच केला. गांधीवादानेही पर्यावरणापेक्षा व्यक्तीवरच अधिक लक्ष केंद्रित केले. साम्यवाद - समाजवाद यात हे गृहीत धरण्यात आले की की पर्यावरण सुधारले आणि शासन - प्रशासन व कायदेप्रणाली यात बदल केले की व्यक्ती आपोआप बदलेल. वस्तुतः दोहोंवरही सारखाच भर देण्याची गरज आहे अशी लोहियांची भूमिका होती.

साम्यवाद व भांडवलशाही या दोन्ही व्यवस्थांचा प्रयत्न व्यक्तीची कार्यक्षमता वाढवण्याचा असतो, संकुल (टोटल) कार्यक्षमता प्रत्यक्षात आणण्याचा कधीच नसतो अशी तक्रार लोहियांनी केली आहे. त्यांच्या मते व्यक्तीचा एकमितीय विचार या प्रणालींनी केला आहे,

सर्वांगांनी नव्हे. भांडवलशाहीने मुक्त स्पर्धेतून निर्माण होणाऱ्या समाजरचनेचे जे चित्र रेखाटले ते साम्यवादाने रंगवलेल्या राष्ट्रांच्या समतेच्या आणि व्यक्तीच्या परिपूर्ण विकासाच्या कल्पनेइतकेच मायावी व निरर्थक असल्याचे लोहिया सांगतात. पूर्वीच्या सभ्यता माणसांना आध्यात्मिक समतेच्या शिखरावर घेऊन गेल्या होत्या पण सामाजिक आणि आर्थिक विषमतांकडे दुर्लक्ष केले होते. याउलट आधुनिक सभ्यतांचे आहे. सामाजिक आणि आर्थिक समतेचा शोध घेताना त्यांनी आध्यात्मिक समतेची उपेक्षा केली. भौतिक व आध्यात्मिक यांचे मिळून माणसाचे संपूर्ण व्यक्तिमत्व होत असते. प्राचीन सभ्यतेतील आध्यात्मिकता आणि आधुनिक सभ्यतेतील भौतिकता यांचा मेळ घालून नवा समाज निर्माण करणे शक्य होईल अशी लोहियांना उमेद होती.

**२) साम्यवाद व भांडवलशाही या दोन्ही व्यवस्था अप्रस्तुत ठरल्या.** गरिबी, भीती आणि युद्ध या आजच्या ज्वलंत प्रश्नांना त्या उत्तर देऊ शकलेल्या नाही असा लोहियांचा आक्षेप आहे. जगाचा प्रचंड मोठा भाग दरिद्री असून दारिद्र्यातून सुटण्याची त्याची आशा संपली आहे. भांडवलशाहीला आपली आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करता आलेली नाही. साम्यवादही आपली आर्थिक उद्दिष्टे गाठण्यात उणा पडला आहे. त्याने खाजगी मालमत्ता नष्ट केली पण त्यानंतर मात्र तो भांडवलशाहीचीच तंत्रज्ञानात्मक पुनःस्थापना करु लागला आहे. विशेषतः जगातील जे दोनतृतीयांश लोक आफ्रिका व आशिया खंडात राहतात त्यांच्या दुःखदैन्याच्या समस्यांना भांडवलशाही व साम्यवाद या दोहोंपाशीही काही सोडवणूक नाही अशी लोहियांची खात्री होती. त्यांच्या मते जगातील दोन तृतीयांश लोकसंख्येसाठी गरिबी आणि उरलेल्यांसाठी युद्ध ही भांडवलशाहीची अपत्ये आहेत. अशा परिस्थितीत मुक्त व्यापारातून नैतिकता व तडजोडींमधून लोकशाही साध्य होणे केवळ अशक्य आहे.

**३) साम्यवाद अमान्य :** खाजगी मालमत्ता नष्ट करुन मालमत्तेचे सामाजीकरण करणे ही साम्यवादाची काही तत्त्वे लोहियांना स्वागतार्ह वाटत होती. पण राजकीय सत्तेचे केंद्रीकरण, मुलभूत हक्कांचा संकोच, परिबद्ध न्यायव्यवस्था, एकपक्षपद्धती, राज्यविलयाची घोषणा वगैरे साम्यवादी वैशिष्ट्ये त्यांना अमान्य होती. या व्यवस्थांची लोकशाही तत्त्वे केवळ कागदोपत्री व संविधानात असतात. प्रत्यक्षात नागरिकांना मुळीच स्वांतत्र्य नसते, विरोधी पक्षांचे अस्तित्वच नसते. साम्यवाद्यांच्या हिंसक कार्यपद्धतींनाही लोहियांनी विरोध केला होता. जागतिक स्तरांवर निर्माण झालेल्या साम्यवादी साम्राज्यवादाचाही त्यांनी निषेध केला होता. पण त्यांचा मुख्य आक्षेप असा होता की साम्यवादी व्यवस्थांनी भांडवलशाही समाजांच्याच उत्पादनपद्धतींचा अवलंब केला असून प्रचंड प्रमाणावर उत्पादन सुरु केले आहे. तेथील आर्थिक सत्ता भांडवलदारांऐवजी राज्यसंस्थेच्या हाती असल्यामुळे तिथे खाजगी उत्पादन किंवा भांडवलशाही उत्पादनसंबंध नाहीत. पण त्या तंत्रज्ञानाचेच जो परिणाम जगातील दोनतृतीयांश लोकांच्या पदरात गरिबीच्या स्वरुपात टाकला आहे. त्याकडे मात्र साम्यवाद्यांनी लक्ष दिले नाही याची लोहियांना खंत वाटते. त्यांच्या मते दोन तृतीयांश मानवमात्रांना स्वातंत्र्य व भाकरी मिळवून देण्यातही साम्यवाद अपयशी ठरला.

साम्यवाद व भांडवलशाही प्रणालींना स्वातंत्र्य व समता या मूल्यांचे नीट संतुलन साधता आलेले नाही, त्याचप्रमाणे त्यांना असेही वाटले की व्यक्तीचे हित आणि समाजाचे हित यांच्यातही योग्य तो मेळ त्या प्रणालींना घालता आला नाही. किंबहुना समता, स्वातंत्र्य आणि शांतता या तिन्ही बाबी साम्यवाद व भांडवलशाही यांच्या कक्षेत येतच नाहीत आणि त्यामुळे त्या दोन्ही व्यवस्था नव्या सभ्यतेच्या संदर्भात गैरलागू ठरलेल्या आहेत अशा निकषावर लोहिया आलेले आहेत.

**४) नवी सभ्यता निर्माण करताना - साम्यवाद, भांडवलशाही व गांधीवाद यातील तत्वांवर** लोहियांचा भर होता. उत्पादनसाधनांचे सामाजीकरण, खाजगी मालमत्तेचे उच्चाटन आणि माणसाकरवी होणाऱ्या माणसाच्या शोषणावर बंदी ही साम्यवादातील तत्त्वे लोहियांना ग्राह्य वाटतात, तर भांडवलशाहीतील व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, मानवी हक्क, सांविधानिक कार्यपद्धती आणि जागतिक शांतता या गोष्टी त्यांना हव्याशा वाटतात. विकेंद्रित अर्थव्यवस्था व राज्यपद्धती आणि अहिंसक कार्यपद्धती या गांधीवादातील आदर्शांचे त्यांना आकर्षण वाटते.

## १४.३ स्वातंत्र्य संकल्पना

**१) व्यक्तिस्वातंत्र्य आवश्यक परंतु व्यक्तिहित व समाजाहित यांचा मेळ असावा :-**

व्यक्तिला स्वातंत्र्य मिळायचे तर सामाजिक क्रांतीच घडून यावी लागते. व्यक्तित्वाचा परिपूर्ण विकास या गोष्टी स्वातंत्र्याचे वातावरण असल्याखेरीज असाध्य असतात असे लोहिया सांगतात. त्याचबरोबर ते हेही स्पष्ट करतात की व्यक्तीच्या आत्मभानाइतकेच महत्त्व समाजसंबंधभानालाही असते. व्यक्तिहित आणि समूहहित यांचा मेळ संबंधभानातूनच व्यक्ती घालू शकते.

**२) लोहियांनी स्वातंत्र्याचे दोन भाग केले आहेत.** त्यासाठी माणसाच्या आयुष्यातील बाबींचे संपत्तीविषयक आणि बिगरसांपत्तिक असे वर्गीकरण करुन लोहिया असे म्हणतात की बिगरसांपत्तिक बाबतीत व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य असावे, मात्र संपत्तीविषयक बाबतीत मात्र व्यक्तीच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार ते राज्यसत्तेला देतात. बिगरसांपत्तिक बाबी कोणत्या याची यादी मात्र त्यांनी दिलेली नाही. फक्त विवाह, जगण्या - मरण्याचा हक्क, कुटुंबाचे व्यवहार, चरितार्थाचे साधन, मनोरंजन, पक्षसदस्यत्व अशा काही बाबींचा उदाहरणादाखल उल्लेख त्यांनी केला आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की बिगरसांपत्तिक क्षेत्रात लोहियांची भूमिका निखळ व्यक्तिवादी आहे.

संपत्तीविषयक बाबतीत व्यक्तीचे वर्तन हस्तक्षेपमुक्त किंवा संपूर्णरीत्या खाजगी असूच शकणार नाही लोकशाहीचे व भांडवलशाहीचे समर्थक संपत्तीच्या क्षेत्रातही खाजगीपणाची तरफदारी करतात. संपत्तीचा व तिच्या विनियोगाचा व्यक्तीचा हक्क अबाधित राहिला पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. लोहिया मात्र त्यांच्याशी सहमत नव्हते.

**३) साम्यवादीधोरण अमान्य :-** मालमत्तेच्या सार्वजनिक मालकीच्या नावाखाली राज्यसत्तेने नागरिकांच्या जीवनातील कौटुंबिक व्यवहारांपासून आविष्कारस्वातंत्र्या पर्यंत प्रत्येक बाबतीत ढवळाढवळ करण्याचे साम्यवादी धोरणही लोहियांना मान्य नव्हते. साम्यवादात बिगरसांपत्तिक व सांपत्तिक अशा सर्वच बाबतीत सरकारचे व राज्यसंस्थेचे संपूर्ण नियंत्रण असते, तर भांडवलशाही व्यवस्था ह्या दोन्ही बाबतीत व्यक्तीला अमर्याद स्वातंत्र्य देतात. लोहियांच्या मते त्यामुळेच या दोन्ही व्यवस्था संतुलित व अचूक अशी व्यक्तिस्वातंत्र्याची संकल्पना विकसित करु शकल्या नाहीत. व्यक्तीचे व समाजाचे असे दोहोंचे हित ज्यात सामावलेले असेल असे स्वातंत्र्य बिगरसांपत्तिक व सांपत्तिक अशा वर्गीकरणातूनच शक्य होईल असे त्यांचे प्रतिपादन होते.

## १४.४ समता संकल्पना

**१) स्वातंत्र्यात समता गर्भित असते आणि समता राज्यसंस्थेची मागणी करते.** या एका विधानात राम मनोहर लोहिया यांचा संपूर्ण राजकीय विचार संक्षेपाने मांडता येतो. स्वातंत्र्य नसेल तर मानवी जाणिवेचा विकास होऊ शकत नाही. समतेखेरीज स्वातंत्र्य संभवत नाही आणि राज्यसंस्था नसेल तर समता प्रत्यक्षात येऊ शकत नाही. स्वातंत्र्य व समता यांच्यात लोहियांना अंतर्विरोध दिसत नाही. प्रत्येक व्यक्तीला समान संधी देणारा समाजच त्यांना स्वातंत्र्यपूर्ण व न्याय्य समाज वाटतो. समाजातील सर्वांच्या प्राथमिक गरजा तर पूर्ण व्हाव्यातच पण दर्जा व प्रतिष्ठा याबाबतीतही समानता असावी, भौतिक समानता व आध्यात्मिक समानता दोहोंना सारखेच महत्त्व असायला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

**२) समाजातील विषमतेचे उच्चाटन करण्यासाठी लोहियांनी सप्तक्रांतीची गरज सांगितली आहे.** त्यांच्या मते सात प्रकारचे अन्याय व विषमता जगातल्या सर्वच समाजात आणि विशेषतः आफ्रिका व आशिया खंडात आढळतात. त्यांचा मुकाबला करण्यासाठी पुढील सात प्रकारच्या क्रांत्यांची आवश्यकता असते :

१) स्त्री - पुरुष समता प्रस्थापित करणारी क्रांती.

२) वर्णभेदावर आधारित राजकीय, आर्थिक आणि आध्यात्मिक विषमता दूर करणारी क्रांती.

३) प्रदीर्घ परंपरेपायी मागास आणि उच्च वर्ण किंवा जाती यांच्यात दृढमूल झालेल्या विषमतांचे उच्चाटन करुन मागासांना विशेष संधी देण्याची क्रांती.

४) परकीय गुलामगिरीच्या विरोधात आणि स्वातंत्र्याच्या व जागतिक लोकशाहीच्या समर्थनार्थ क्रांती.

५) आर्थिक समतेसाठी, नियोजित उत्पादनासाठी आणि खाजगी भांडवलाबद्दलच्या आसक्तीच्या विरोधातील क्रांती.

६) खाजगी आयुष्यात अन्याय्य ढवळाढवळ करण्याच्या विरोधात आणि लोकशाही कार्यपद्धतीच्या आग्रहासाठी क्रांती.

७) शस्त्रास्त्रांच्या विरोधात आणि सत्याग्रहाच्या बाजूने करावयाची क्रांती.

देश जेवढा गरीब असतो तेवढे तेथील विषमतांचे प्रमाण मोठे असते असे सांगून लोहिया म्हणतात. नफ्याच्या आकर्षणावर चालणाऱ्या भांडवलशाही व्यवस्था आणि दहशत गाजवून अस्तित्वात राहणाऱ्या साम्यवादी व्यवस्था या दोहोंमधून विषमतांचे निराकरण होणे तर दूरच ठरते, उलट विषमतांचे पोषणच होते. लोकशाही आणि समता समानार्थी असतात, समताधिष्ठित समाजातच खरी लोकशाही भरभराटीस येत असते. समतेचा योग्य अर्थ जेव्हा लोकांच्या लक्षात येतो तेव्हाच विषमताविरोधी सातही क्रांत्या यशस्वी होण्याची शक्कता निर्माण होते.

**३) चौफेर दृष्टींनी समतेचा विचार करणे आवश्यक आहे** असे लोहियांना वाटते. त्यांनी स्वतः तसा समतेचा सर्वांगीण विचार केला आहे. त्यांच्या मते समता ही अमूर्त संकल्पना असते तशीच ठोस वस्तुस्थितीही असते. ती अंतर्गत तशीच बहिर्गतही असते; भौतिक तशीच

आध्यात्मिकही असते. ती देशांतर्गत असते तशीच आंतरराष्ट्रीयही असते. ती वैधानिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक अशी चौफेर स्वरुपाची असते.

**समता : अंतर्गत, बहिर्गत, भौतिक व आध्यात्मिक :**

अनुकूल व प्रतिकूल दोन्ही परिस्थितीत किंवा हारजीतच्या प्रसंगी समचित राहण्याची व्यक्तीची क्षमता म्हणजे अंतर्गत समता होय. त्यांच्या मते अशी आंतरिक समता साध्य झालेलीच व्यक्ती बाह्य वर्तनातही समतेचे तत्त्व आचरु शकते. समत्व प्राप्ती झालेली व्यक्ती कोणाशी खोटे व्यवहार, फसवणूक किंवा हत्या असे वर्तन करु शकणार नाही; तसेच तिचा आत्मा भीती, गर्व किंवा शोषणेच्छा यापासून अधिकाधिक मुक्त होईल असे लोहियांना वाटते.

भौतिक समतेचे लोहिया राष्ट्राराष्ट्रांमध्ये अंमलात येणारी समता आणि राष्ट्रांतर्गत अस्तित्वात आणावयाची समता असे दोन भाग करतात. आध्यात्मिक समतेत बहिर्गत वर्तनातील भावंडभाव आणि आतंरिक स्थिरमनस्कता यांचा अंतर्भाव करतात. समतातत्त्व प्रत्यक्षात उतरायचे तर या चारही प्रकारच्या समता समाजजीवनात समांतरपणे प्रवाहित झाल्या पाहिजेत असे त्यांना वाटते. स्थिर चित्तवृत्ती, भावंडभाव, भौतिक समता यांचा एकात्मिक आविष्कार राष्ट्राराष्ट्रांमध्ये आणि राष्ट्रांतर्गत व्हावा हेच लोहियांच्या मते मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट असेल. जगात जर समता नसेल तर विश्वाची चिरंतन एकात्मता साध्य होणारच नाही. कुटुंबात असतो तसा एकजिनसीपणा विश्वात केवळ समतेतूनच निर्माण करता येऊ शकेल असे लोहियांचे मत होते.

**४) देशांतर्गत समतेचे वैधानिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक असे चार पैलू लोहियांनी चर्चिले आहेत.** सक्ती, अनुनय आणि अनुकरण या तीन मार्गांनी समता साध्य होईल असे ते म्हणतात.

**५) समाजातील उपेक्षित व शोषित वर्गाचा लोहियांनी समतेच्या संदर्भात वेगळा विचार केला आहे.** परंपरेने हक्कवंचित राहिलेल्या स्त्रिया, आदिवासी, पूर्वास्पृश्य व मागासवर्गीय या वर्गांसाठी विशेष संधी व संरक्षणे दिल्याने समतातत्त्वाला मुळीच बाधा येत नाही अशी स्पष्ट भूमिका लोहियांनी घेतली आहे. या सर्व गटांची संख्या भारताच्या एकूण लोकसंख्येत नव्वद टक्के असून ते सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिकदृष्ट्या मागास आहेत.

स्त्री - पुरुष समतेचा भारतात ज्यांनी जोरदार पुरस्कार केला त्या अग्रणींमध्ये राम मनोहर लोहियांना फार वरचे स्थान द्यावे लागते. स्त्रिया आणि पुरुष हे त्यांच्या आदर्श राज्याच्या रथाची दोन चाके त्यांनी मानली होती. ती सारख्या आकाराची व गतीची असतील तरच हा रथ सुरळीत चालू शकणार होता. स्त्रियांचे या देशातील हजारो वर्षांचे सर्वांगीण दास्य केवळ स्त्रियांनाच नव्हे तर संपूर्ण देशाला आणि मानवतेला व मानवी सभ्यतेलाही हानिकारक ठरले आहे अशी खात्री असल्यामुळे लोहियांचे असे ठाम म्हणणे होते की जगात बहुसंख्या असलेल्या स्त्रियांच्या दास्यमुक्तीचा विचार केल्याखेरीज राजकीय व सामाजिक पुर्नवसनेचा कोणताही जागतिक प्रकल्प यशस्वी होण्याची मुळीच शक्यता नाही. वर्गभेद संपवण्याइतकीच लिंगाधारित भेदभाव व शोषण नष्ट करण्याचीही गरज लोहियांना दिसते. त्यादृष्टीने स्त्रियांना प्रत्येक बाबतीत विशेष संधी देण्याची शिफारस त्यांनी केली आहे.

स्त्रियांप्रमाणेच आदिवासींचा आणि अल्पसंख्याकांचाही वेगळा विचार लोहियांनी केला आहे. आदिवासींची आर्थिक परिस्थिती दयनीय आहे. आधुनिक सभ्यतेचे व संस्कृतीचे वारे त्यांना लागलेले नाही. जंगल व जंगलनिवासी यांच्याविषयी वैमनस्य मनात बाळगूनच तयार करण्यात आलेले कायदे निकालात काढून त्यांच्या जागी नवे कायदे करुन मैत्रीपूर्ण संबंध जोडण्याची शिफारस लोहियांनी केली आहे. आदिवासींचे जंगलसंपत्तीवरचे सर्व पारंपारिक हक्क मान्य करुन त्यांची कर्जे माफ करावीत, ठेकेदारीची प्रथा मोडून सहकारी तत्त्वावर जंगलाधारित उद्योगांची उभारणी करावी अशाही सूचना ते करतात. जे अल्पसंख्याक गट या ना त्या कारणामुळे राष्ट्रीय मुख्य प्रवाहाशी एकरुप होऊ न शकल्यामुळे विकासाच्या वाटेवर मागे पडले आहेत त्यांनाही विशेष संधी व संरक्षणे देऊन इतरांच्या बरोबर आणण्याची गरज लोहियांनी अधोरेखित केली आहे.

**६) समजात समता आणण्यासाठी उपयुक्त ठरु शकेल अशा उपायांची एक अकरा कलमी यादीही लोहियांनी दिली आहे. ती अशी :**

१) प्राथमिक शिक्षण, शिक्षकांचे पगार आणि शैक्षणिक खर्च सर्वत्र सारखाच असावा. सर्व विशेष प्रकारच्या शाळा बंद कराव्यात.

२) न परवडणाऱ्या शेतजमिनींवरचे कर व महसूल माफ करावा.

३) संपूर्ण शेतजमीन सिंचनाखाली आणावी. त्यासाठी शेतकऱ्याला खर्च पडू नये किंवा कमीत कमी खर्च पडावा.

४) सार्वजनिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून इंग्रजीचे माध्यम म्हणून उच्चाटन व्हावे.

५) कोणत्याही व्यक्तीला एक हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च करता येऊ नये.

६) येत्या दहा वर्षासाठी रेल्वे प्रवासात सर्वांसाठी एकच श्रेणी असावी.

७) येती वीस वर्षे ऑटोमोबाईल उद्योगाची संपूर्ण शक्ती फक्त बसेस, ट्रॅक्टर्स किंवा टॅक्सीज तयार करण्यावरच खर्ची पडावी, खाजगी वापराच्या गाड्यांचे उत्पादन बंद ठेवावे.

८) वीस टक्क्यापेक्षा जास्त खालीवर कोणत्याही पिकाचे भाव होऊ नयेत. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती उत्पादनखर्चाच्या दीडपटीपेक्षा जास्त नसाव्यात.

९) साठ टक्के विशेष संधी व सवलती स्त्रिया, आदिवासी, मागास जाती वगैरेंना द्याव्यात.

१०) दोनपेक्षा अधिक घरे असल्यास त्यांचे राष्ट्रीयीकरण करावे.

११) प्रभावी जमीनवाटप जमिनीच्या किंमतीवर नियंत्रण ठेवावे.

## १४.५ लोहियांचा समाजवाद

**१) राज्यसंस्थेबद्दलचा लोहियांचा दृष्टिकोन** प्रतिकूल नव्हता. त्यांना ती एक उपयुक्त व अनिवार्य संस्था वाटत असे. राज्यसंस्था समाजातील दोन तृतीयांश लोकांच्या हिताखातर जर राबायची असेल तर त्या दृष्टीने समाजवादाचा विचार त्यांना ग्राह्य वाटतो. पण समाजवादी म्हणून विख्यात असलेल्या राज्यांमध्ये सत्तेचे जे अफाट केंद्रीकरण झाले आहे ते मात्र त्यांना अग्राह्य वाटते. **लोहिया विकेंद्रित राज्यव्यवस्थेचे कट्टर पुरस्कर्ते होते.** केंद्रीकरणातून सत्ता

मूठभरांच्या हातात एकवटते आणि तिचा गैरवापर त्यांच्या हातून घडण्याची शक्यता वाढते. सत्तेच्या केंद्रीकरणामुळे व्यक्तींची उपक्रमशीलता, साधनसमृद्धता, धाडसीपणा आणि निर्मितिक्षमता कमी होते आणि स्वयंशासनाच्या तसेच अन्यायप्रतिकाराच्या संधी कमी होतात. सत्तेचे केंद्रीकरण जेवढे जास्त तेवढे लोकशाहीचे प्रमाण कमी असे सरळ समीकरण लोहियांनी मांडले आहे.

राजकीय व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा ते सर्वश्रेष्ठ सद्‌गुण मानतात. हा सद्‌गुण खरीखुरी राजकीय सत्ता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हाती सोपवून प्रत्यक्ष लोकशाहीच्या रुपाने हाताळण्यातून व्यक्त व्हायला पाहिजे, तसेच ज्यांच्याद्वारे कष्टकरी माणूस उत्पादनप्रक्रियांवर जाणीवपूर्ण नियंत्रण ठेवू शकेल अशा आर्थिक रचना उभारुन आणि योग्य तंत्रज्ञान आत्मसात करुन तो सद्‌गुण प्रत्ययास यायला पाहिजे असे लोहिया म्हणतात.

**२) लोहियांच्या समाजवादाची साध्येः-** साम्यवादी व्यवस्थांमध्ये प्रचलित असलेला समाजवादाचा नमुना लोकशाहीसाठी कामाचा नाही हे ध्यानात आल्यामुळे लोहियांनी नवा, सुधारित आणि स्वतंत्र असा समाजवाद मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या समाजवादाची चार साध्ये त्यांनी नमूद केली आहेत. ती अशी :

१) साध्य होऊ शकेल तेवढी अधिकतम समता आणि समतेने प्रभावित न्याय.

२) भांडवलशाही भौतिकता टाळून माणसाच्या भौतिक आणि नैतिक गरजांमध्ये संपूर्ण सुसंवाद साध्य करु शकेल असे उत्तम जीवनमान.

३) माणूस आणि त्याचा शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकास यांनाच समर्पित असलेले औद्योगिक आणि शेतकी तंत्रज्ञान.

४) सर्वसामान्य माणसापर्यंत राजकीय व आर्थिक सत्ता पोचावी अशाप्रकारे तिचे विकेंद्रीकरण आणि सर्वच क्षेत्रांत - विशेषतः राष्ट्रीय उत्पादनाची निर्मिती, वितरण आणि उपभोग या क्षेत्रांत - सहकारी तत्त्वाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देऊन नोकरशाहीस घालण्यात आलेला पायबंद.

**३) बेकारीच्या समस्येला प्राधान्य :-** लोहियांच्या समाजवादी विचारात बेरोजगारीच्या प्रश्नाला प्राधान्य दिलेले होते. त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी त्यांनी एक चारसूत्री कार्यक्रम सुचवला होता. ते म्हणतात, सर्वात पहिली आवश्यक बाब **जमिनीचे फेरवाटप करणे** आणि स्वयंसेवी श्रमातून छोटे छोटे जलसिंचन प्रकल्प उभे करणे ही आहे. दुसरे कार्य म्हणजे नव्याने लागवडीखाली आलेल्या जमिनी पिकवण्यासाठी एक लाख व्यक्तींची अन्नधान्यसेवा उभी करणे हे आहे. जिल्हा मॅजिस्ट्रेटचे पद नष्ट करणे हे तिसरे अधिकतम शक्य होईल तेवढी समता प्रस्थापित करणे, विजेचा व छोट्या यंत्राचा वापर करुन चालणारे कुटिरोद्योग उभे करणे हा चौथा कार्यक्रम लोहियांनी सांगितला होता. भारतासारख्या अविकसित देशाला लागू पडेल असा आकृतिबंध देण्याचा प्रयत्न करताना ते म्हणतात की येथे जर समाजवादाला कृतिशील व परिणामकारक व्हायचे असेल तर भारताने स्वतःचा समाजवादी सिद्धांत विकसित केला पाहिजे. भांडवलशाही आणि साम्यवाद या दोहोंमध्ये मोठ्या प्रमाणावरील उत्पादनतंत्रेच वापरली गेली. अशा प्रकारच्या उत्पादनास आवश्यक ते भांडवल अविकसित देश पुरवू शकत नाहीत. शिवाय या देशातील लोकांचे राहणीमान इतके खालच्या दर्जाचे आहे की सतत वाढते राहणीमान हे जे भांडवलशाही व साम्यवाद या दोन्ही व्यवस्थांचे ध्येय आहे त्याचे या देशातील लोकांना मुळीच आकर्षण नसते. त्यामुळे भारतासारख्या अविकसित देशांनी आपल्या समाजवादाचा आकृतिबंध

अल्प - प्रमाण - यंत्रावरच आधारित ठेवावा. अशा यंत्राला फार भांडवल लागणार नाही. छोटी गावे, वस्त्या, खेडी अशा ठिकाणीही ती यंत्रे उपलब्ध होतील. ती तयार करण्यास व चालवण्यास फार प्रगत तंत्रज्ञानाची गरज भासणार नाही. आर्थिक ध्येयाबरोबरच स्वातंत्र्य व शांतता ही सर्वसाधारण ध्येयेही अशा उत्पादनातून साध्य होतील. विकेंद्रित अर्थव्यवस्थेला ही उत्पादकपद्धती पोषक ठरेल.

जेथे मजूर ठेवण्याची गरज नसेल अशा सर्व प्रकारांतून खाजगी मालमत्ता जाईल. परंतु संपूर्ण मालमत्ता केंद्रसरकारच्या मालकीची होणार नाही तर काही प्रकारात ती गावाच्या, जिल्ह्याच्या, प्रांताच्या आणि सहकारी संस्थांच्या मालकीची होईल. भारतीय समाजवादाने फक्त अर्थव्यवस्थेतच नव्हे तर राजकारणातही विकेंद्रीकरणाचा आग्रह धरला पाहिजे. लोहियांचे चौखंबा राज्य हे अशाच विकेंद्रीकरणाचे प्रतिमान आहे.

### ४) चौखंबा राज्य संकल्पना (Four Pillar State) :

स्वातंत्र्योत्तर भारतासाठी जी राज्यव्यवस्था संविधानकारांनी तयार केली तिच्याबद्दल राम मनोहर लोहिया यांची तक्रार अशी होती की येथील परंपरांचा आणि देशविशिष्ट परिस्थितीचा जेवढा विचार त्यांनी करायला पाहिजे होता तेवढा केला नव्हता. प्रत्येक संस्था तिच्या स्वतःच्या मातीत वाढते आणि तेथील हवामान व पर्यावरण यातून तिला पोषकद्रव्ये प्राप्त होत असतात. परस्परांकडून देवाणघेवाण करण्यात चूक काहीच नसते, किंबहुना सामाजिक विकासात देवाणघेवाण नेहमीच सुरु असते. पण उधार उसनवार घेतलेल्या संस्थांनाही येथील परिस्थितीशी जुळवून घेतले व एकजीव केले तरच त्या नीट वाढतात, एरव्ही त्यांची वाढ खुरगटते. अनेक शतकांच्या वाटचालीत या देशात काही संस्था विकसित झाल्या असून त्यांना भारतीय चेहरामोहरा प्राप्त झाला आहे. अशा ज्या देशाच्या दृष्टीने उपयुक्त गोष्टी आहेत त्यांना नव्या स्वरुपात उभारुन क्रियाशील करणेही लोहियांना अगत्याचे वाटते.

### ब) चौखंबा राज्याची वैशिष्ट्ये :

**१**) संविधानाने निर्माण केलेल्या राजकीय प्रशासकीय संस्थांविषयी असमाधान व्यक्त करुन लोहियांनी देशकालपरिस्थिती व परंपरा यांना अनुरुप असे काही बदल त्यात सुचवले होते. त्यांच्या चौखंबा राज्य वा संकल्पनेत ते व्यक्त झाले आहेत. **या व्यवस्थेत १) खेडे, २) जिल्हा, ३) प्रांत, ४) केंद्र** या प्रत्येक स्तरावर सत्ताकेंद्र अस्तित्वात असेल आणि त्या सर्वांना पातळीनुसार कार्य सोपवलेली असतील, त्याचप्रमाणे स्वायत्ततेची हमीही दिलेली असेल. लोहियांच्या मते यातून लोकांच्या जीवनावश्यक गरजा भागवण्याचे आर्थिक ध्येय तर साध्य होईलच पण त्याचबरोबर त्यांचे स्वातंत्र्य टिकवले जाण्याचे ध्येयही त्यांच्या पदरात पडेल.

**२) शांततामय प्रतिकार आणि रचनात्मक कार्य हाच चौखंबा राज्य प्रत्यक्षात आणण्याचा योग्य मार्ग** लोहियांना दिसत होता. त्यांच्या मते प्रौढमताधिकारावर आधारित लोकशाही आणि केंद्र व राज्ये यांच्यातील अधिकारविभागणी या दोन्ही गोष्टी गरजेच्या आहेत पण पुरेश्या मात्र नाहीत. त्यांच्याबरोबरच लोकांच्या सत्याग्रही संघर्षाची आणि गावपातळीपर्यंत खरीखुरी सत्ता सोपवण्याची गरज आहे. चौखंबा राज्यात ती गरज पूर्ण होऊन विकेंद्रीत समाजवादी राज्यव्यवस्था निर्माण होईल असा त्यांना विश्वास होता.

**३**) सध्याच्या शासनप्रणालीत स्थानिक स्वराज्य संस्थांची तरतूद असली तरी खरी सत्ता संविधानाने फक्त केंद्र व राज्यसरकारांनाच दिली असून स्थानिक स्वराज्य संस्थांना केवळ

राज्यसरकारांची उपांगे बनवले आहे. संघराज्याचे तत्त्व लोहियांना मान्य होते पण ते फक्त राज्यपातळीपर्यंतच लागू करणे त्यांना मंजूर नव्हते. आताच्या संघराज्यात जी दोनस्तरीय रचना आहे तिच्या जागी चारस्तरीय रचना त्यांना आवश्यक वाटत होती. स्थानिक **स्वराज्य शासनांच्या संस्थांनाही देशाच्या संविधानातूनच अधिकार दिले जायला पाहिजेत** अशी मागणी लोहियांनी त्या काळात केली होती. आज ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्तीद्वारे तशी तरतूद झाली आहे. केंद्र व राज्य सरकारांच्या कायद्यांमधून नव्हे तर खुद्द संविधानातूनच स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार मिळाले म्हणजे त्यांचा दुय्यम दर्जा संपेल, त्यांची प्रतिष्ठा उंचावेल आणि त्यांना कारभारात स्वायत्ततेची हमी मिळेल असे लोहियांचे प्रतिपादन होते.

लोहियांच्या मते तत्कालीन स्थानिक स्वराज्यसंस्थांवर सोपवलेली कामे अगदीच दुय्यम स्वरुपाची होती. दिवेलावणी, रस्तेसफाई, पाणीपुरवठा, सार्वजनिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण आणि असेच आणखी काही 'अधिकार' स्थानिक स्वराज्य संस्थांना होते; आणि त्यातही त्यांना आर्थिक मदतींसाठी राज्य वा केंद्र सरकारवर अवलंबून राहण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. त्यांना वैधानिक किंवा खऱ्या अर्थाने कार्यकारीही अधिकार नव्हते. फक्त वरच्यांनी सुपूर्द केलेली सत्ता त्यांच्याजवळ होती. संविधानात तिचा उल्लेखही नव्हता. लोकांना जुजबी सुविधा उपलब्ध करुन देण्यापलिकडे जनजीवनांशी त्यांचा संबंधच नव्हता. शिक्षण - आरोग्यादी बाबतीतही वरच्या सरकारांनी घालून दिलेल्या कायदेशीर चौकटींमध्येच राहून त्यांना काम करावे लागत होते. वेगळे काही करुन दाखवण्याची मुभा किंवा स्वायत्तता नव्हती. अशा स्थानिक स्वराज्यात औपचारिक मतदानापलिकडे नागरिकाचा कोणत्याच प्रकारे सहभाग नव्हता. लोकशाहीच्या पाठशाळा किंवा लोकशाहीच्या पाया अशा शब्दांत ज्यांचा गौरव केला जाई त्या स्थानिक स्वराज्यसंस्थांची त्यादृष्टीने स्थिती लोहियांना असमाधानकारक वाटत होती.

त्यांना असे वाटत होते की देशाच्या लोकशाहीचा पाया जर भरभक्कम करायचा असेल तर स्थानिक शासनाचे अधिकार संविधानातच नमूद केलेले असले पाहिजेत. संविधानानेच स्थानिक स्वराज्यसंस्थांना वैधानिक व कार्यकारी अधिकार दिले पाहिजेत कारण जनसामान्य जेथे प्रशासनात प्रत्यक्ष व सक्रिय भाग घेऊ शकतील अशा त्याच प्राथमिक संस्था आहेत.

**४) सार्वभौमत्वाचा मक्ता केंद्र किंवा राज्य सरकारांकडे असू नये तर चारही स्तरांवर सार्वभौमत्व क्रियाशील असावे.** देशाची एकात्मता व अखंडता सांभाळून जेवढे जास्तीत जास्त अधिकार गावपातळीवरच्या किंवा शहर पातळीवरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना देता येतील तेवढे द्यावेत. गावसरकाराला जेवढे अधिक अधिकार असतील तेवढे लोकांना स्वराज्याचे मोल जास्त समजेल आणि लोकशाही समाजवादाच्या दिशेने पावले टाकण्याची त्यांना प्रेरणा मिळेल. स्वतःचे भवितव्य स्वतःच साकार करु असा आत्मविश्वास लाभेल. ग्राम, जिल्हा, प्रांत आणि केंद्र हे राज्यसंस्थेचे चारही आधारस्तंभ सारख्याच डौलाने आणि प्रतिष्ठेने मिरवतील.

चौखंबा राज्य ही केवळ प्रशासकीय व्यवस्था नसून चार स्तरांवर वैधानिक व कार्यकारी अधिकार असलेल्या सार्वभौम सत्ताकेंद्रांची ती उभारणी असेल. राज्यकारभाराच्याच नव्हे तर उत्पादन, नियोजन, शिक्षण, मालकीहक्क, प्रशासन आणि तत्सम अनेक मानवी जीवनाशी संबंधित क्षेत्रांत चौखंबा राज्याकरवी निर्णय घेतले व राबवले जातील. त्या अर्थाने चौखंबा राज्य ही नवी जीवनप्रणाली असेल, नवा जीवनमार्ग असेल. सामुदायिक जीवनाच्या पद्धतीने त्याचा कारभार चालेल.

**५) चारपैकी प्रत्येक स्तरावरच्या सत्ताकेंद्राला स्वतःची जीवनशैली ठरवण्याचे स्वातंत्र्य राहील** सामुदायिकतेच्या भावनेने ते सत्ताकेंद्र अन्य सत्ताकेंद्रांशी जोडलेले असेल अशी लोहियांची अपेक्षा होती. विभिन्न जीवनशैलींचे एकात्म सहजीवन असे चौखंबा राज्याचे स्वरुप अशी लोहियांची अपेक्षा होती. त्यातील प्रत्येक लहान समुदाय सांघिक जीवन जगत असतानाच समाजाशी एकात्म व अखंडरीत्या संलग्न राहील असे ते म्हणतात.

**६) चौखंबा राज्यातील चार सत्ताकेंद्रांच्या अधिकारांची स्पष्ट वाटणी** संविधानातच अंतर्भूत असावी अशी सूचना करुन त्या संदर्भातील काही सूचनाही लोहियांनी केल्या आहेत.

त्यांच्या मते **सशस्त्र सैन्यदलांचे नियंत्रण केंद्राच्या अखत्यारीत असावे.** सशस्त्र पोलीस प्रांताच आणि उर्वरित पोलीस खाते जिल्हा आणि गाव यांच्या नियंत्रणाखाली असावे. रेल्वे, पोलाद आणि लोखंड असे उद्योग केंद्राच्या तर लघु कापड उत्पादन उद्योग जिल्ह्याच्या व गावाच्या मालकीचे असावेत. त्यांचे व्यवस्थापन त्या त्या पातळीवरच व्हावे. भावनिर्धारण हे कार्य केंद्राच्या अधिकारकक्षेत असावे, तर शेतकी संरचना आणि त्यातील भांडवल व श्रम यांचे गुणोत्तर ठरवणे जिल्हा व गाव यांच्या स्वाधीन असावे. सहकारी सोसायट्या, ग्रामीण व शेतकी विकास विभाग, जलसिंचन, बी - बियाणे, महसूल वसुली वगैरे कामे त्यातील कर्मचाऱ्यांसह जिल्ह्याकडे व गावाकडे हस्तांतरित केली जावीत. राज्य महसुलाचा मोठा भाग खालच्या दोन सत्ताकेंद्रांना मिळावा. आर्थिक नियोजन ही केवळ केंद्राच्या अधिकाराची बाब असू नये, संमिश्र अर्थव्यवस्थेऐवजी सामाजिक मालकीचे तत्त्व अमलात यावे अशाही अपेक्षा लोहियांनी व्यक्त केल्या आहेत.

**७) प्रशासनातील भ्रष्टाचार निपटून काढण्याचा मार्ग -** ग्रामीण भागातील निरक्षरता, गरिबी, मागासलेपणा, अंदश्रद्धा, जातीयता व स्वार्थ वगैरे अनिष्ट गोष्टींचा प्रादुर्भाव पाहता चौखंबा राज्य फार सहजासहजी अस्तित्वात येणे कठीण आहे याची लोहियांना जाणीव होती. पण प्रशासनातील भ्रष्टाचार निपटून काढण्याचा आणि लोकांच्या हाती खरीखुरी सत्ता देऊन त्यांची निष्क्रियता झटकण्याचा चौखंबा राज्याखेरीज दुसरा मार्गच त्यांना दिसत नव्हता. सत्तेचे केंद्रीकरण व त्यातून अपरिहार्यतः संभवणारा जुलूम दूर करायचा असेल तर जिल्हा व गाव पातळीवर होऊ शकणाऱ्या वैधानिक सत्तेच्या गैरवापराचा धोकाही पत्करायची तयारी आपण ठेवली पाहिजे असे लोहियांचे म्हणणे होते.

## १४.६ आंतरराष्ट्रवाद

तळपातळीपर्यंतच्या लोकशाहीबद्दल नितांत आस्था बाळगणारे लोहिया हे खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रवादी होते. देशांतर्गत जशी त्यांनी चौखंबा राज्याची कल्पना रेखाटली होती तशीच आंतरराष्ट्रीय पातळीवर विश्वराज्य, विश्वसंसद आणि विश्वनागरिकत्वाचे आदर्शही त्यांनी मांडले होते. खरा आंतरराष्ट्रवाद सद्यःपरिस्थितीत अस्तित्त्वात येऊ शकत नाही कारण आजच्या परराष्ट्रधोरणाचा संघर्ष राष्ट्रांच्या सरहद्दींना व हितसंबंधांना छेदून जगभरच्या माणसांचे मनोमीलन झाले तरच या पेचप्रसंगातून सुटका होऊ शकेल. आंतरराष्ट्रवादाखातर ज्या तत्त्वांचा आधार घ्यायचा ती जरी विशिष्ट राष्ट्रीय स्वार्थाला किंवा अनेक राष्ट्रांच्या आघाड्यांच्या हिताला मारक ठरत असली तरीही त्यांचा पुरस्कार करण्याची माणसांची तयारी त्यासाठी झाली पाहिजे. माणसांमधली समता केवळ राष्ट्रांतर्गतच नव्हे तर जगभर मान्यता पावली पाहिजे. नव्या आंतरराष्ट्रवादाचा पाया राष्ट्रापेक्षा माणूस आणि त्याचे जग हा असला पाहिजे. संपूर्ण शोषित

मानवता हा तिचा आधार असून प्रत्येक घटनेची इष्टानिष्टता त्या आधारावरच्याच कसोटीवर तपासली जावी अशी लोहियांची अपेक्षा होती. राष्ट्रांच्या निरंकुश सार्वभौमत्वावर यातून आपोआपच मर्यादा पडतील असे ते म्हणतात.

ते साम्राज्यवादाचे आणि वसाहतवादाचे कट्टर विरोधक होते. वसाहतवाद कोणत्याही प्रकारचा असो तो माणुसकीला कलंक आहे आणि समताधिष्ठित विश्वव्यवस्थेआड येणारा अडथळा आहे असे सांगून लोहिया म्हणतात की वासाहतिक पारतंत्र्यात खितपत पडलेले सर्व देश मुक्त झालेच पाहिजेत. समाजवादी आंतरराष्ट्रवादाने त्यांना त्या कामी सर्व शक्य ती मदत केली पाहिजे. प्रत्येक राष्ट्र ज्यात आपल्या कुवतीनुसार योगदान करील आणि आपल्या गरजेनुसार ज्यापासून घेईल अशा जागतिक विकास प्राधिकरणाची स्थापना करण्याचीही एक अभिनव सूचना लोहियांनी केली होती. परकी अर्थसाहाय्याचे सध्याचे एकमार्गी स्वरुप बदलून ते दुमार्गी होणेही निकोप आंतरराष्ट्रवादासाठी त्यांना आवश्यक वाटत होते. त्याचप्रमाणे रचनात्मक कार्यासाठी आंतरराष्ट्रीय पुनर्रचना दलाची स्थापना करावी. त्या दलात विभिन्न संस्कृतींच्या स्त्री - पुरषांनी एकत्र येऊन पृथ्वीवर शांतता प्रस्थापित करावी आणि सध्याच्या भ्रष्ट व कुजक्या सभ्यतेच्या ठिकाणी प्रेम, प्रगती व ऐक्यावर आधारित नवी सभ्यता उभी करावी हे लोहियांचे स्वप्न होते. विश्वनागिरिकत्व हा त्यांच्यापुढील आदर्श होता.

## १४.७ मूल्यमापन

योगदान - लोहियांनी भारतासारख्या अविकसित देशाला लागू पडेल असा समाजवादाचा आराखडा तयार केला. भांडवलशाही व साम्यवाद या दोन्ही व्यवस्थांच्या गुणदोषांची मांडणी करुन त्या दोघांना पर्यायी अशा समाजवादाची संकल्पना मांडली.

## १४.८ प्रश्न

१) लोहियांचे साम्यवादा संबंधीच्या विचारांचे परिक्षण करा.

२) स्वातंत्र्या आणि समता यासंबंधी लोहियांचे विचार स्पष्ट करा.

३) लोहियांची समाजवादाची संकल्पना विवेचन करा.

४) टिपा द्या;

   १) चौखंबाराज्य संकल्पना आणि लोहिया.

## १४.९ संदर्भ

१) राजकुमार, 'मॉडर्न इडियन पोलीटिकल थॉट'

२) वर्मा एस. पी, 'मार्डन इंडिअन पोलीटिकल थॉट'

❖❖❖❖

# १५

# समाजवादी आणि साम्यवादी विचार आचार्य नरेंन्द्र देव (१८८९ ते १९५६) आणि पालीदत्त (१८९६-१९७४)

**घटक रचना :**

१५.१ प्रस्तावना - आचार्य नरेंन्द्र देव.
१५.२ देव यांनी केलेले मार्क्सवादाचे विश्लेषण
१५.३ शेतकऱ्यांविषयी विचार
१५.४ नरेंद्र देवांची लोकशाही समाजवादाची संकल्पना
१५.५ मूल्यमापन
१५.६ पार्लम दत्त यांचा परिचय
१५.७ दत्त यांच्यामते भारतीय दारिद्र्याची कारणे.
१५.८ प्रश्न
१५.९ संदर्भ

## १५.१ प्रस्तावना

रशियात १९१७ साली समाजवादी क्रांती झाल्यानंतर मार्क्सवादी विचारांचे आकर्षण जगभर निर्माण झाले. भारतातही १९२० ते १९३० या दशकात समाजवादी विचार मोठ्या प्रमाणांत लोकांत पसरले. भारतीय अनेक तरुण मार्क्सवादाने व समाजवादी विचारांनी प्रभावित होते. भारतात समाजवादाच्या तीन परंपरा १९३० च्या आसपास निर्माण झाल्या. पहिली परंपरा ही कम्युनिस्टांची होती. त्यांचा मार्क्सवाद लेनिनवादावर त्यांचा विश्वास होता.

दुसरी परंपरा मानवेंन्द्र रॉय व त्यांच्या सहकाऱ्यांची होती. रॉय यांनी मूलगामी मानवतावादाचा म्हणजेच नवमानवता वादाचा पुरस्कार केला.

तिसरा प्रवाह काँग्रेसच्या लोकशाही समाजवाद मानणाऱ्या नेत्यांचा होता. या प्रवाहामध्ये दोन गट होते. त्यात पंडित **१) जवाहरलाल नेहरु यांचा गट होता.** जो काँग्रेसमध्ये राहून समाजवादाचा पुरस्कार करत होता. या **२) प्रवाहातील दुसरा गट लोकशाही समाजवादी**

**पक्षाचा होता.** त्यात जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, डॉ. राममनोहर लोहिया यांचा होता. या परंपरेवर मार्क्सप्रमाणेच महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी काँग्रेसमध्ये राहूनच काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन केला होता. आचार्य नरेंद्र देव या पक्षाचे अध्यक्ष होते.

भारतीय समाजवादी चळवळीचे एक मोठे नेते मार्गदर्शक आचार्य नरेंद्र देव होते. त्यांचा जन्म ३१ आक्टोंबर १८८९ सीतापूर येथे झाला होता. नरेंद्र देव तत्वज्ञानाचे अभ्यासक होते. अलाहाबाद विद्यापीठातून पदवी घेऊन बनारस येथे त्यांनी एल. एल. बी. केले होते. त्यांनी गांधी, मार्क्स व बुद्ध यांच्या तत्वज्ञानाचे गहन असे अध्ययन केलेले होते. गांधीच्या सत्याग्रह तंत्राने ते प्रभावित होते. १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली, त्यावेळी नरेंद्र देवांनी अध्यक्षीय भाषण केले होते. या काळात त्यांच्या विचारांवर मार्क्सप्रमाणेच लेनिनच्या विचारांचा प्रभाव होता. कारण भांडवलशाही आणि साम्राज्यशाही यांचे खरे स्वरुप समजावून घेण्यासाठी लेनिनचे विचार महत्त्वाचे आहेत असे देव यांचे मत होते. त्यांच्या मते भांडवलशाही आणि फॅसिझमला फक्त समाजवाद हाच पर्याय होता.

भारतात शेतकरी चळवळ (peasant movement) व्हावी असे त्यांचे मत होते. भारतात "ऑल इंडिया किसान सभा" स्थापन करणारे ते एक होते.

नरेंद्र देव an ethical socialist होते. नैतिक तत्त्वांना प्राधान्य देणे त्यांना आवश्यक वाटत होते. त्यामुळेच त्यांनी समाजवादाला मानवतावादाची जोड देण्यावर भर दिला होता. He emphasized the humanistic frundations of socialism. १९५४ साली ते प्रजा समाजवादी पक्षाचे अध्यक्ष होते. १९५५ साली गया येथे प्रजा समाजवादी पक्षाचे संमेलन भरले असतांना नरेंद्र देव यांचा 'लोकशाही समाजवाद' यावरील थिसीस स्विकारण्यात आला होता.

## १५.२ मार्क्सवादाचे विश्लेषण

नरेंद्र देव हे नैतिक समाजवादी (an ethical socialist) होते. त्यांच्यासाठी समाजवाद ही एक सांस्कृतिक चळवळ (cultural movment) होती. समाजवादाला मानवतावादाचा humanistic आधार देण्यावर त्यांचा भर होता. मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादावर त्यांचा विश्वास होता. मार्क्सची धर्म विषयक मते ते म्हणजे 'धर्म म्हणजे अफुची गोळी' आहे हे मत नरेंद्र देवांना मान्य होते. मार्क्सने मनाच्या जडणघडणीत व नैतिक मूल्यांना त्याचा विचारात महत्त्वाचे स्थान दिले होते, असे नरेंद्र देव मानत. मार्क्स हा समतेचा पुरस्कर्ता होता, पण पूर्ण गणिती समता त्यास अभिप्रेत नव्हती. त्याला वर्गसमाजाचे विघटन करायचे होते. समाजात भांडवल व श्रम यांच्यातील वर्गसंघर्ष अपरिहार्य आहे. कारण त्यातून निर्माण झालेली विषमताच या संघर्षाचे पोषण करते, त्यामुळे कामगारांनी आपल्या वर्गजाणिवा विकसित करण्यास संघटित व्हावे आणि राजकीय सत्ता ताब्यात घ्यावी असे नरेंद्र देव यांचे सांगणे होते.

आचार्य नरेंद्र देव यांची मार्क्सवादी तत्त्वज्ञानावर श्रद्धा असली तरी, साध्य व साधन यांतील संबंधाबाबत त्यांनी गांधींच्या विचारांचा पुरस्कार केला होता. कोणताही बदल व्यक्तिगत

स्तरावर आणि सामाजिक स्तरावर एकदमच झाला तरच बदल घडतो. स्वातंत्र्यासाठी होणाऱ्या चळवळी बरोबरच समाजवादाची चळवळ व्हावी असे नरेंद्र देव यांचे मत होते. भारतात समाजवादी क्रांती त्यांना हवी होती. परंतु साम्यवादाप्रमाणे त्यांचा हिंसेवर विश्वास नव्हता. लोकशाही पद्धतीने त्यांना भारतात समाजवाद आणायचा होता. देव हे समाजवाद व लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. साम्यवादी क्रांती सोव्हिएत युनियनमध्ये होऊनही जनतेला खरे स्वातंत्र्य मिळाले नाही असे ते म्हणत.

नियोजित अर्थव्यवस्था व उत्पादनसाधनांचे सामुदायिकीकरण यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप होऊ नये म्हणून लोकशाही पद्धतीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांनी राज्यसंस्थेच्या बाहेर स्वतंत्रपणे काम करणाऱ्या लोकशाही संस्थाची आवश्यकता नमूद केली. त्याचप्रमाणे त्यांनी अर्थव्यवस्थेच्या विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला. उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनासाठी बिगर शासकीय निगमांची स्थापना, स्वतंत्र मजूर संघटना व वर्गीय संघटना यांची निर्मिती या मार्गाने स्वातंत्र्याच्या मार्गात येणारे धोके टाळता येतील.

नरेंद्र देव यांच्या मते मार्क्सचे तत्त्वज्ञान हे संपूर्ण स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान होते. भांडवलशाही कामगारास पूर्णपणे गुलाम करते म्हणून त्याने त्याविरुद्ध संघर्ष सुरु केला. मार्क्स थोर मानवतावादी होता आणि अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य त्याने मान्य केले होते. त्यांचा साम्यवाद ही संपूर्ण लोकशाही होती. नरेंद्र देव यांच्या मते लोकांना रोजगाराची साधन देऊन त्यांचे मूलभूत हक्क हिरावून घेणारा साम्यवाद मार्क्सला अभिप्रेत नव्हता.

## १५.३ शेतकऱ्यांविषयी विचार

देशातील शेतकऱ्यांविषयी आणि त्यांच्या स्थितीविषयी काळजी नरेंद्रांच्या विचारांमध्ये दिसून येते. एकतर शेतकरी अतिशय कमी पगारावर काम करतो आणि दुसरी बाजू म्हणजे जातीव्यवस्थेमुळे अतिशय कमी दर्जाची वागणूक शेतकऱ्यांना मिळते. त्यासाठी शेतकऱ्यांच्या सामाजिक दर्जा सुधारावा म्हणून प्रयत्न व्हायला पाहिजे. जोपर्यंत शेतकऱ्याची भौतिक आणि नैतिक परिस्थिती सुधारीत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे राजकीयीकरण होता कामा नये. जमीनदारी पद्धती नष्ट व्हायला पाहिजे.

## १५.४ नरेंद्र देवांची लोकशाही समाजवादाची कल्पना

१९५५ ला गया येथे प्रजा समाजवादी पक्षाचे वार्षिक संमेलनामध्ये नरेंद्र देव यांनी “Democratic Socialism” वर प्रबंध दिला होता. ह्या प्रबंधातील नरेंद्र देवांची लोकशाही समाजवादाची कल्पना भारतात समाजवादी चळवळ आणणाच्या दृष्टीने उपयोगी ठरली होती. त्या प्रबंधातील नरेंद्र देव यांनी मांडलेले मुद्दे खालील होते.

**नरेंद्र देवांचा लोकशाही समाजवाद :**

१) राज्याची राजकीय, आर्थिक सत्ता कोणत्याही एका व्यक्तिकडे किंवा विशेषाधिकार असलेल्या एका गटाकडे असू नये. म्हणजेच भांडवलशाही, सरंजामशाही, हुकुमशाही या शासनप्रकरांना त्यांचा विरोध होता.

२) लोकशाही स्वातंत्र्य आणि संपूर्ण मानवतेचे हक्क व स्वातंत्र्याचे समर्थन त्यांनी केले होते. त्यामुळे साम्राज्यवाद आणि परकीय राजवटींना त्यांचा विरोध होता.

३) सामाजिक, आर्थिक, राजकीय सत्तांवर कामगार वर्गाचे नियंत्रणाचे समर्थन केले होते.

४) सर्व क्षेत्रात system of self - government असावी. सत्ता आणि जबाबदारी दोन्ही बाबतीत लोकशाही विकेंद्रीकरण असावे. अशी सामाजिक व्यवस्था आणावी की जी समता, स्वातंत्र्य, न्याय, आणि सामाजिक सुख आणि व्यक्तिगत सुख आणणारी असेल.

५) सत्तेचे अंतिम उगमस्थान जनता असावी.

६) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जागतिक शांतता असावी आणि आंतरराष्ट्रीय संस्था लोकशाही आधारावर असाव्यात यावर भर असावा.

७) लोकशाही समाजवादाने प्रचलीत विचारसरणी. उदा. साम्यवाद, भांडवलवाद, व्यक्तिवाद यांना विरोध केला होता. साम्यवाद हुकुमशाहीला, सर्वंकषवादाला चालना देणारा म्हणून साम्यवादाला त्यांनी विरोध केला होता. भांडवलशाही व्यवस्था समाजामध्ये वर्ग निर्माण करणारी, असमता आणि शोषणाला चालना देणारी व्यवस्था म्हणून भांडवलशाहीला त्यांचा विरोध होता. व्यक्तिवादी विचारसरणीत अति व्यक्तिवादाला महत्त्व देतात आणि सामाजिक बाजूकडे संपूर्ण दूर्लक्ष करतात.

८) लोकशाही समाजवाद नोकरशाहीला विरोध करतो.

अ) राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या उद्योगांचे नियंत्रणामध्ये कामगारांच्या सहभाग असावा.

ब) खाजगी मालमत्तेचा हक्क लोकांना असावा पण त्यावर मर्यादा असाव्यात.

९) सर्व मानवी हक्कांचे स्वरुप सामाजिक आणि उत्क्रांतीवादी असते. सर्वच मानवी हक्कांवर सामाजिक आबंधनाच्या मर्यादा असतात आणि असाव्यात.

१०) सार्वजनिक कारणांसाठी खाजगी मालमत्तेवर बंधने टाकण्याचा राज्याला अधिकार असावा. राज्याने नियोजित अर्थव्यवस्था आणावी. या नियोजनामध्ये मानवी आणि भौतिक साधनसंपत्ती चा पूर्ण उपयोग कसा करता येईल यावर भर असावा.

११) लघुउद्योगांना राज्याने प्रोत्साहन द्यावे. मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करावे. सहकारी तत्त्वावर शेती, बहुउद्देशीय सहकारी संस्था यावरही राज्याने भर द्यावा असे नरेंद्र देव यांचे मत होते.

१२) नरेंद्र देव यांच्या लोकशाही समाजवादावर गांधीतत्त्वांचाही प्रभाव दिसतो. कारण लोकशाही समाजवाद आणण्यासाठी त्यांनी साधनसूचिता या गांधीतत्त्वावर भर दिलेला दिसून येतो. समाजवादी क्रांती क्षणात घडणारी क्रांती नाही. लोकशाही तत्त्वांवर देवांचा विश्वास होता. त्यांना आशा वाटत होती की प्रौढ मताधिकाराच्या आधारावर समाजवादी पक्ष सत्ता प्राप्त करुन लोकशाही समाजाद प्रत्यक्षात आणणे हे साध्य प्राप्त करेल.

## १५.५ मूल्यमापन

नरेंद्र देव यांचे लोकशाही समाजवादाचे स्वप्न साकार झाले नाही. कारण त्यांच्या मृत्युनंतर जयप्रकाश नारायण यांनी राजकारणातून अंग काढून घेतले. समाजवादी पक्षात फाटाफूट झाली. परंतु नरेंद्र देव यांच्या लोकशाही समाजवादाच्या प्रभावामुळे शासनाने अनेक लोककल्याणकारी उपाययोजना केल्या होत्या.

नरेंद्र देव यांचे समाजवादी विचार त्यांच्यावरील असलेले प्रभाव, त्यांचे वाचन, युरोपमध्ये झालेले समाजवादाचे प्रयोग आणि भारताची परिस्थिती यातून विकसित झाले होते. भारताच्या संस्कृतीप्रमाणे आणि परिस्थितीप्रमाणे 'मानवतावादाला' त्यांनी त्यांच्या समाजवादी विचारांमध्ये प्राधान्य दिले होते. मानवतावादाच्या दृष्टीने पाश्चात्य समाजवादापासून ज्या गोष्टी घेण्यासारख्या आहेत त्याला त्यांचा विरोध नव्हता.

## १५.६ पालर्म दत्त यांचा परिचय

विसाव्या शतकाच्या दरम्यान भारतीय राजकीय क्षेत्रात साम्यवादी आणि समाजवादी विचारसरणींचा प्रभाव दिसुन येतो.

आर. पाल्र्य दत्त हे इंग्लंडमध्ये एक वृत्तपत्रकार होते. ते साम्यवादी पक्षाचे होते. त्यांचा जन्म १८९६ मध्ये इंग्लंडमध्ये झाला होता. त्यांचे वडील उपेंन्द्र सर्जन होते. ऑक्सफोर्ड आणि केंब्रिज येथे दत्त यांनी शिक्षण घेतल्यानंतर लेबर रिसर्च डिपार्टमेन्ट लेफ्ट विंग येथे ते सहभागी झाले. ग्रेट ब्रिटन मध्ये स्थापन झालेल्या साम्यवादी पक्षा (CPGB) चे ते आणि त्यांची पत्नी प्रतिनिधी होते. १९२१ मध्ये मजुरांसाठी असलेल्या मासिकाचे संपादकत्व पाल्र्य दत्त करीत होते. ते त्यांनी त्यांच्या मृत्युपर्यंत केले. कामगारांसाठी जे वृत्तपत्र होते त्याचेही संपादकत्व ते करीत. 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ ग्रेट ब्रिटन' CPGB या पक्षाच्या कार्यकारी समितीमध्ये ते १९२३ ते १९६५ पर्यंत काम करीत होते. सोव्हिएत युनियन आणि साम्यवादी आदर्शाला ते सतत प्रामाणिक होते. स्टॅलीनच्या धोरणाचेही समर्थन त्यांनी केले होते.

## १५.७ भारतीय दारिद्र्याची कारणे

भारतात ब्रिटिशांचा साम्राज्यवाद असतांना भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्यांसंबंधी दत्त यांनी आपल्या "इंडिया टूडे" या पुस्तकात विश्लेषण केले, या समस्यांप्रती त्यांनी मार्क्सवादी दृष्टीकोन घेतल्याचे दिसून येते. दत्त यांचे सामाजिक आणि राजकीय विचार खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) भारतीयांच्या सामाजिक मागासलेपणा, अज्ञान, लोकांच्या अंधश्रद्धा यामुळे भारतात दारिद्र्य दिसून येते, असे ब्रिटिश म्हणतात. परंतु दत्त यांच्या मते निम्न दर्जाचा आर्थिक विकास आणि राजकीय गुलामगिरी भातीय दारिद्र्याचे मुख्य कारण आहे. नियोजीत आर्थिक विकास करुन या मागासलेपणावर उपाय करता येतील. साम्राज्यवाद आणि संरजामशाही नष्ट केली तर भारताची

भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीला चालना मिळेल असे दत्त म्हणतात. कामगार आणि शेतकरी यांनी एकत्रित येऊन शोषण करणाऱ्यांना घालविले तर प्रगती शक्य आहे.

**२)** भारतीय दारिद्र्याचे दुसरे कारण अतिलोकसंख्या आहे असे ब्रिटिश म्हणतात. परंतु दत्त यांच्या मते भांडवलशाहीचे दोष झाकण्यासाठी ब्रिटिश तसे म्हणतात. वास्तविक ब्रिटिशांनी **भारतात भांडवलशाही स्विकारल्यामुळे भारतात दारिद्र्य आले आहे.**

**३)** लोकांच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने शेती उत्पादन अपुरे आहे असे ब्रिटिश म्हणत असे. परंतु दत्त यांच्या मते **ब्रिटिश शासनाच्या धोरणांमुळे शेती उत्पादन कमी झाले आहे** व कमी पडत आहे. ब्रिटिशांनी भारताचे लघुउद्योग बंद केलेत, हातमाग बंद केले त्यामुळे शेती व्यवसायावर सर्व भार आला. दुसऱ्या महायुद्धानंतर जी परिस्थिती निर्माण झाली. उपासमार, दारिद्र्य इत्यादी ती होण्यास जमीनदार आणि व्यापारी कारणीभुत होते.

**४) भ्रष्टाचारी नोकरशाही** त्यासाठी कारणीभुत झाली.

**भारतातील शेती विषयक समस्या:-**

ब्रिटिश साम्राज्यवादी धोरणांमुळे भारतात शेतीविषयक समस्या निर्माण झाल्या असे दत्त म्हणतात. ब्रिटिश येण्यापूर्वी आणि ब्रिटिश आल्यानंतर भारतीय शेतकऱ्यांच्या सामाजिक रचनेत फार मोठे बदल झाले आहे. ब्रिटिश आल्यानंतर त्यांनी जमीनदारी पद्धती सुरु केली. अनेक शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे तेव्हा आपली जमीन गमावली होती. दत्त यांच्या मते स्वातंत्र्यानंतर सुद्धा या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही.

काही शेतकऱ्यांनी याविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला पण तो उठाव संघटीत चळवळीच्या स्वरुपात नसल्यामुळे यशस्वी झाले नाहीत. त्यानंतर शेतकऱ्यांच्या समस्या आणि दुःख हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वातंत्र्याच्या चळवळीमध्येच समाविष्ट करुन घेतल्या. १९३६ साली भारतीय शेतकरी संघटनेने 'ऑल इंडिया किसान सभा' स्थापन केली. इंडियन नॅशनल काँग्रेस बरोबरच त्यांचे अधिवेशनही फैजपूर येथे १९३६ साली घेण्यात आले होते. जवळजवळ २०००० शेतकऱ्यांनी त्या अधिवेशनाला उपस्थिती दिली होती. १९३९ पर्यंत त्यांची संख्या ८०,००० पर्यंत वाढली. तेलंगणा येथे किसान संभा जवळजवळ २००० खेड्यांमध्ये काम करीत होती. दत्त यांच्या मते विनोबांची भूदान चळवळ शेतकऱ्यांनी बंड करु नये म्हणूनच झाली होती.

**६)** स्वातंत्र्यानंतर दत्त यांनी ब्रिटिश काळातील भारतीय परिस्थितीचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून विश्लेषण केले होते. १९४७ ला भारतात सत्तेचे सत्तांतर भारतीय उच्च वर्गातील लोकांकडे जे साम्राज्यवादाशी संबंधीत होते त्यांच्याकडे झाले होते. त्यामुळे खरे स्वांतत्र्य आले नाही असे दत्त चे मत होते.

त्यांच्या मते भारतात तीन प्रकारचे कल दिसून येतात. एक परंपरांगत विचारांचा कल ज्यांना भारताच्या परंपरांगत भारतीय संस्कृतीप्रमाणे रचनात्मक कार्यक्रम उभारायचा होता. आणि ते आधुनिक औद्योगिक संस्कृतीकडे संशयाने पाहत होते.

दुसरा काळ औद्योगिक भांडवलदारांचा होता. ज्यांना आधुनिक भांडवलवाद भारतात आणायचा होता. वर्ग समझोता आणून त्यांना मानवतावादी समाजवाद आणायचा होता.

तिसरा कल समाजवादचा होता. या गटाद्वारे कामगार वर्गाच्या समस्यांचा विचार केला जात होता आणि भारतीय समाजात मूलभूत परिवर्तन घडवून आणणे त्यांचे ध्येय होते. दत्त च्या मते कामगार आणि शेतकरी एकत्रित येऊन साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली क्रांती होऊन या तिसऱ्या गटाचा विजय होईल.

शेतकरी आणि कामगार वर्गाचे शासन अस्तित्वात येईल हे दत्त यांचे स्वप्न प्रत्यक्षात आले नाही.

## १५.८ प्रश्न

१) भारतीय समाजवादी विचारांच्या विकासामध्ये नरेंद्र देव यांच्या भूमिकेचे टीकात्मक परिक्षण करा.

२) नरेंद्र देव यांची लोकशाही समाजवादाची संकल्पना स्पष्ट करा.

१) पार्लम दत्त यांनी भारतीय परिस्थितीचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून विश्लेषण केले आहे, चर्चा करा.

❖❖❖❖

# १६

# श्री. मानवेंद्रनाथ रॉय (१८९३ - १९५४) - नवमानवतावाद

**घटक रचना :**

१६.१ प्रस्तावना - जीवनपरिचय
१६.२ रॉय यांचे राजकीय विचार
१६.३ रॉय आणि मार्क्सवाद
१६.४ रॉय यांचा नवमानवतावाद
१६.५ रॉय यांचे लोकशाही विषयी विचार
१६.६ रॉय आणि राष्ट्रवाद
१६.७ रॉय यांची आंतरराष्ट्रीय संबंधावरची मते
१६.८ रॉय आणि गांधीवाद
१६.९ मूल्यमापन
१६.१० प्रश्न
१६.११ संदर्भ

## १६.१ प्रस्तावना

जीवनपरिचय - राष्ट्रवादापासून मानवतावादापर्यंत ज्यांच्या राजकीय विचारांनी झेप घेतली असे विचारवंत श्री. मानवेंद्रनाथ रॉय होय. यांचा जन्म १८९३ साली ६ फेब्रुवारी रोजी झाला. पं. बंगालातील अर्बालिया नामक खेड्यात त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ भट्टाचार्य असे होते. कॉलेजमध्ये शिकताना ते भूमिगत क्रांतिकारक चळवळीचे एक नते प्रकाशचंद्र डे यांच्या संपर्कात आले. त्यातून राष्ट्रावादाने त्यांच्या मनाची पकड घेतली. लवकरच ते चळवळीत पडले, ब्रिटिशांच्या पंजातून मातृभूमीची सुटका करणे हा त्यांचा एकमेव ध्यास झाला होता. भूमिगत चळवळीद्वारे आखिल भारतीय व्याप्तीचा सशस्त्र उठाव करण्याच्या योजनेचे नेते जतीन मुकर्जी यांचे ते उजवा हात झाले होते. १९१५ पर्यंत ते राष्ट्रावादी होते.

पहिल्या महायुद्धाच्या वेळी जर्मन शस्त्रांच्या साहाय्याने मातृभूमीला दास्यमुक्त करण्याची स्वप्ने अनेक क्रांतिकारक पहात होते. त्यांच्यात नरेंद्रनाथ आघाडीवर होते. क्रांतिकारकांना लागणारा पैसा उभारण्यासाठी घातलेल्या दरोड्यांमध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता. जर्मनीशी

संधान साधण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून नरेन्द्रनाथाला पाठवण्याचा निर्णय हिंदी क्रांतिकारकांनी घेतला. एप्रिल १९१५ मध्ये सी. मार्टिन हे नवे नाव धारण करुन नरेन्द्रनाथांनी भारताचा किनारा सोडला. पंधरा वर्षानी म्हणजे १९३० साली ते पुन्हा मायदेशी परत आले. पंधरा वर्षाच्या या कालावधीत त्यांचा पूर्ण वैचारिक कायापालट झाला होता. हा काळ त्यांच्या आयुष्यातील दुसऱ्या पर्वाचा काळ मानता येईल. जर्मन राजनैतिक वर्तुळात प्रत्यक्ष वावरल्यानंतर आणि श्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्यानंतर नरेन्द्रनाथांना आढळून आले की भारतीय स्वातंत्र्याबद्दल जर्मनांना आंतरिक कळकळ नाही १९१६ च्या उन्हाळ्यात ते अमेरिकेस गेले. तिथे आपले जुने सहकारी धनगोपाल मुकर्जीना भेटले त्यांनी नरेन्द्रनाथांना आपला भूतकाळ विसरुन नव्याने जीवनाला प्रारंभ करण्याचा सल्ला दिला. त्यांनीच नरेन्द्रनाथांचे मानवेद्रनाथ रॉय असे नवे नामकरणही केले.

मार्क्सवादी समाजवादाने प्रभावित - १९१५ ते १९४६ हा काळ रॉय मार्क्सवादी होते. अमेरिकेत समाजवादी, अराज्यवादी इत्यादी नव्या विचारसरणींच्या प्रवर्तकांशी रॉय यांची भेट झाली. रॉयनी समाजवादाचे अध्ययन केले व ते त्या विचारसरणीकडे आकृष्ट झाले. भौतिक तंत्रज्ञान वजा जाता समाजवाद त्यांनी ग्राह्य ठरवला. अशा प्रकारे जर्मनीकडून शस्त्र मिळवण्याच्या प्रयत्नात अपयश, मायदेशी भूमिगत क्रांतिकारकांची सरकारने केलेली धूळधाण अशा निराशहताश मनोवस्थेत समाजवादी विचार त्यांना आकर्षक वाटणे साहजिकच होते.

**लेखन** - १९२२ मध्ये त्यांनी आपले 'इंडिया इन ट्रांझिशन' नावाचे सुप्रसिद्ध पुस्तक लिहिले. त्याच वर्षी 'इंडियाज प्रॉब्लेम अँड इटस् सोल्यूशन' हेही पुस्तक लिहिले. १९२० मध्ये त्यांनी लिहिलेले 'द फ्यूचर ऑफ इंडियन पॉलिटिक्स' हे पुस्तकही लक्षणीय आहे. या काळात 'मॉस्को इस्टिट्यूट' च्या प्राच्याविभागाचे अध्यक्षपद त्यांच्याकडे होते. कॉमिन्टर्नच्या वतीने त्यांना चीनमध्ये कार्य करण्यासाठीही पाठविण्यात आले होते.

त्यानंतर १९३० साली वेषांतर करुन ते मायदेशी परतले. जुलै १९३१ मध्ये सात वर्षापूर्वीच्या एका वारंटाद्वारे त्यांना अटक झाली. बारा वर्षे कैदेची शिक्षा झाली. पुढे ती सहा वर्षानी कमी करण्यात आली. २० नोव्हेंबर १९३६ रोजी ते सुटले. १९३६ ते १९४६ हे त्यांच्या राजकीय विचारातील तिसरे मन्वंतर-पर्व ठरले. भारतीय क्रांतीचे पवित्रे, हेतू, व्यूह, विचारसरणी, दृष्टिकोण इत्यादीसंबंधीची त्यांची मते बदलली, काही मतांमध्ये तर मौलिक फेरफार झाले. आधी मांडलेली आपली मते त्यांनी बदलली. परदेशी राहून त्यांनी भारतीय क्रांतीसंबधी, इथल्या कामगार वर्गासंबंधी ज्या गोष्टी गृहीत धरल्या होत्या, त्या प्रत्यक्ष अनुभवान्ती तशा नसल्याचे जेव्हा त्यांना दिसून आले तेव्हाच त्यांना रुढ मार्क्सवादी मार्गाने या देशात क्रांतीची शक्यता नाही हे कळून चुकले. भारतीय क्रांतीला आपला वेगळा मार्ग चोखाळावा लागेल हे त्यांनी ओळखले. गांधीवादाचा मार्ग त्यांना मान्य नव्हता. त्याचप्रमाणे या क्रांतीचे अंतिम साध्य म्हणून सांसदीय लोकशाही जशी त्यांना अमान्य होती त्याचप्रमाणे कामगारांची हुकूमशाहीही अमान्य होती. पुढे (१९४४) त्यांनी स्वतंत्र भारतासाठी घटनेचा आराखडा तयार केला. त्यात या दोन्ही राज्यव्यवस्थांना पर्यायी अशी 'रॅडिकल' लोकशाही राज्यव्यवस्था' ची कल्पना मांडली आहे. भारतीय क्रांतीचे साध्य अशी लोकशाही असावी, व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकास ह्याच तिच्या प्रेरणा असाव्यात असे त्यांचे मत होते. साम्यवाद्याप्रमाणे केवळ आर्थिक दृष्टीने विचार व कार्य न करता सांस्कृतिक व वैचारिक अंगांनीही क्रांतीची उभारणी

करण्यासाठी त्यांनी 'प्रबोधन चळवळ' सुरु केली. कँाग्रेसला क्रांतिकारक असे पर्यायी नेतृत्व मिळवून देणे हा या चळवळीचा हेतू होता.

१९३९ साली त्यांनी 'लीग ऑफ रॅडिकल काँग्रेसमेन' ची स्थापना केली. १९४० साली काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक हरल्यावर काँग्रेसत्याग करुन रॅडिकल डेमॉक्रॉटिक पक्षाची संघटना त्यांनी बांधली. काँग्रेसतर्फे गांधीच्या नेतृत्वाखाली झालेल्या चले जावच्या चळवळीलाही त्यांनी पाठिंबा दिला नाही कारण ती काँग्रेसमधील उद्योगपती व भांडवलदार यांनी उभारलेली चळवळ होती, असे तिजविषयी त्यांचे मत झाले होते.

## १६.२ रॉय यांचे राजकीय विचार

रॉय यांचा राजकीय विचार तीन ठळक अवस्थांमधून पार पडला आहे. १) राष्ट्रावाद, २) मार्क्सवाद मूलग्राही मानवतावाद (रॅडिकल ह्यूमॅनिझम) या त्या तीन अवस्था होत. १९०२ ते १९१५ हा काळ पहिल्या अवस्थेचा असून कट्टर राष्ट्रावादी नेत्याच्या भूमिकेत, भूमिगत क्रांतिकारी चळवळीत रॉय या काळात वावरले. स्वाभाविकच राजकीय विचारात ते फारसे महत्त्वाचे योगदान या काळात देऊ शकले नाहीत. १९१५ ते १९४६ हा त्यांच्या राजकीय विचारातील मार्क्सवादी कालखंड म्हणता येईल. १९४६ ते १९५४ या काळात नवमानवतावाद मांडला. भारतातील राजकीय वास्तवामुळे आणि पुढे दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीमुळे साम्यवादावरचा त्यांचा विश्वास ओसरला आणि मग त्यांच्या वैचारिक उत्क्रांतीमधील तिसरा टप्पा, मूलग्राही मानवतावाद सुरु झाला. तो अखेरपर्यंत टिकला. मूलग्राही मानवतावाद ही रॉय यांनी राजकीय विचाराला दिलेली महत्त्वाची देणगी मानावी लागेल. त्यांच्या राजकीय विचारात त्या तिघांना जोडणारा एक अखंड अंतःप्रवाह आढळतो. तो अंतःप्रवाह किंवा ते समान सूत्र म्हणजे मानवाच्या स्वातंत्र्यांचे तत्त्व व मानवी मुक्तीचा शोध.

## १६.३ रॉय आणि मार्क्सवाद

मार्क्सवादाच्या पगड्याखाली अर्थशास्त्रीय दृष्टीने व सामाजाचा वर्गविग्रहाच्याच दृष्टीने त्यांनी विचार केला. भारतीय समाजातील विभिन्न वर्गाचे स्थान आणि भूमिका त्यांनी विशद केली. त्याचप्रमाणे लढ्यामागील आर्थिक प्रेरणाही शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

देशातील सरंजामदरांची राजकीय सत्ता ब्रिटिशांनी काढून घेतली. भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या वाढीबरोबरच हस्तव्यवसाय संरजामी अर्थव्यवस्था लयास गेली. उत्पादनाचे अधिक चांगले प्रकार या देशात अस्तित्वात आले नाहीत. इंग्लंडच्या औद्योगिक विकासावरचसारे लक्ष केंद्रित राहिले परक्या राज्यकर्त्यांनी या देशात आपला 'सामाजिक पाया' निर्माण करण्याच्या हेतूने करदात्या जमीनदारांचा एक नवा वर्ग निर्माण केला. त्यांचा उगम साम्राज्यवादात असल्यामुळे स्वाभाविकच वसाहतिक अर्थव्यवस्थेला त्यांचा बिनशर्त पाठिंबा होता. कॉमिन्टर्नने वासाहतिक देशांमध्ये औद्योगिक कामगार व गरीब शेतकरी यांचे संघटन करुन साम्यवादी पक्षांची उभारणी केली पाहिजे. अर्थातच हे त्यांचे मत भारताबद्दलही होते.

युद्धानंतर ब्रिटिश राज्य कर्त्यांनी या देशाच्या औद्योगीकरणासंबंधीचे आपले धोरण बदलले. कारण येथील बूर्झ्वा व सामान्य जनता समान आघाडी उघडून लढा देतील अशी त्यांना भीती वाटली. बूर्झ्वा वर्गांना युद्धोत्तर काळात शासनाकडून मिळालेल्या सवलतींचा अर्थ रॉयच्या मते क्रांतीचे संघटित प्रयत्न फोडणे एवढाच होता. जनतेतील जागृतीमुळे सरकार अधिकच खळबळून उठले होते. जमीनदारांचा आधार अपुरा वाटून बूर्झ्वा वर्गाचाही पाठिंबा मिळवण्याच्या प्रयत्नात्स ते लागले;

इंडियन नॅशनल काँग्रेस ही भारतीय बूर्झ्वा वर्गाची यंत्रणा असून १९२०-२२ च्या असहकाराच्या चळवळीपर्यंत ती याच एका वर्गाच्या नियंत्रणाखाली राहिली आहे. असे रॉय यांचे मत होते. त्या चळवळीचेही स्वरुप बहुवर्गीय वाटत असले तरी प्रामुख्याने तीही छोटी बूर्झ्वा चळवळच होती. तिचा राजकीय दृष्टिकोण सुधारणावादी असून, सामाजिक विचारसरणी प्रतिगामी होती, असे त्यांचे मत होते.

पुढे कॉमिन्टर्नचे व रॉय यांचे संबंध दुरावले. मार्क्सवाद आणि रशियातील साम्यवादी राजवट यांच्यातील अंतर्विरोध त्यांना जाणवू लागला. मार्क्सवादातील मर्यादा लक्षात आल्या. मानवमात्राच्या शोषणाविरुद्ध प्रखर टीका करणाऱ्या मार्क्सवादातील व्यक्तीची उपेक्षा करणारी सर्वाधिकारशाही शासनयंत्रणा रशियात निर्माण होत असल्याचे पाहून त्यांचा भ्रमनिरास झाला. मार्क्सवादाला प्राप्त होत असलेले सांप्रदायिक व पोथीनिष्ठ स्वरुप रॉय यांच्या वैज्ञानिक दृष्टीला मानवणारे नव्हते. त्यामुळे मार्क्सवादाला नवा आशय देण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला, He went beyond communism and discovoped radical humanism.

यातूनच त्यांच्या मूलगामी नवमानवतावादाचा जन्म झला. द्वितीय महायुद्धाच्या अनुभवाने त्या नव्या तत्त्वज्ञाला अधिक बळकटी आणली. फॉसिझम हे मानवतेवरील महान संकट असून साम्यवादाशी त्याचे सख्य होत असल्याने ते अधिकच भयंकर झाले आहे. उदारमतवादी त्याच्याशी झुंज देत आहेत. त्यांची प्रेरणा मानवी व सांस्कृतिक मूल्यनिष्ठा ही आहे हा अनुभव मानवतावादाचा पाया ठरला. 'इतिहासानिर्मितीत आर्थिक घटकांपेक्षा मानवी विचार व मूल्ये अधिक प्रभावी ठरल्याचे पाहून रॉय अर्थवादाच्या तत्त्वज्ञानाकडून मानवतावादाच्या तत्त्वज्ञानाकडे वळले.'

## १६.४ रॉय यांचा नवमानवतावाद (The concept of New Humanism or Radical Humanisiom)

रॉय यांना मूलग्राही मानवतावादाची मूळ प्रेरणा एंजेल्सच्या लेखनातून मिळाली आहे. मार्क्सच्या मूळ मानवतावादाने व समाजवादी साध्यानेही रॉय प्रेरित झाले होते.

मानवतावादाला मानवेंद्रनाथ 'नव', 'मूलग्राही' रॅडिकल, किंवा 'शास्त्रीय' (सायंटिफिक) इत्यादी विशेषणे लावताना आढळतात. कारण त्यांच्या मते त्यांचा मानवतावाद हा अधिक संपन्न, अधिक बळकट आणि शास्त्रीय ज्ञानाने निर्मिती असा आहे.

**१) केंद्रबिंदू माणूस -** मानवतावादी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा **केंद्रबिंदू माणूस** आहे. रॉयनी माणसाचा सर्व सामाजिक प्रगतीचे मूळ मानवी विचारांमध्ये व आकांक्षांमध्ये शोधले. व्यक्तीच्या

कल्याणाला व स्वातंत्र्याला पोषक ठरेल अशा नव्या सामाजिक व्यवस्थेची कल्पना केली. The Human being and his freedom were central ideas of Roy's Philosophy.

**२) स्वातंत्र्य सर्वोच्च मूल्य** - रॉय यांच्या विचारात **स्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य होते.** (Urge for freedom) इतर सर्व मूल्य-निर्णयांचा तो निकष होता. ज्या गोष्टीमुळे स्वातंत्र्याला चालना मिळते ती उत्तम, ज्यामुळे बाधा येते ती वाईट अशी त्यांची धारणा होती. स्वातंत्र्य हे त्यांच्या मते स्वंयमेव साध्य होते. या विज्ञाननिष्ठ समाजात धर्मकुंठीत नीतिकल्पना फार तर व्यक्तीचे खाजगी जीवन नियंत्रित करु शकतील. धर्मनिरपेक्ष वैज्ञानिक नितिमूल्यांची जोपासना करण्याखेरीज गत्यंतर नाही असे रॉयना वाटते.

**३) राज्यएक साधन स्वातंत्र्य**-ऊर्मी हीच समाजिर्मितीमागील आणि राज्यनिर्मितीची प्रेरणा आहे. सुव्यवस्था रक्षण करणे आणि सामाजिक मानवी निर्मिती असून सार्वजनिक जीवनाच्या क्षेत्रामध्ये सुसंवाद राखणे या दोन गरजांची पूर्ती हे राज्यनिर्मितीचे उद्दिष्ट होते. राज्यसंस्था अशा प्रकारे, बाहेरुन कोणीही लादलेली संस्था नसून स्वतःच्या स्वातंत्र्यसंपादन कार्यासाठी ती पोषक ठरेल या अपेक्षेने माणासाने ती निर्माण केली आहे असे रॉय म्हणतात. म्हणूनच मानवी स्वातंत्र्याशी तिचे अस्तित्व विसंगत असू शकत नाही. राज्यसंस्था रॉयना, 'वर्गशोषणाचे साधन' वाटत नाही.

अशाप्रकारे रॉय यांच्या मते माणूस हा समाज व राज्य यांचा निर्माता असल्यामुळे त्यांच्याहून मोठा व महत्त्वाचा आहे, त्याच्या स्वातंत्र्य-संपादनाची समाज व राज्य साधने आहेत. याचाच अर्थ सामाजिक संघटनापेक्षा व्यक्तिस्वातंत्र्य हे अधिक मोलाचे आहे. सामूहिक हिताच्या नावाखाली व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा व निर्बध घालण्याचे कोणतेही प्रयत्न हे भयावह आहेत. समाज व राज्य यांचे महत्त्व रॉय नाकारीत नाहीत. ते फक्त त्यांना साधनमूल्य देतात. समाजाखेरीज व्यक्ती राहू शकत नाही हे जितके खरे तितकेच समाज म्हणजे शेवटी व्यक्तीचाच समुदाय हेही करे असे ते मानतात. समाजातील व्यक्तींच्यापेक्षा निराळा हितसंबंध त्या समाजाचा असू शकत नाही असे त्यांना वाटते. राज्यासंबंधीचा आदर्शवादी व आधिदैविक दृष्टिकोण रॉयना अमान्य आहे. कारण हे सिद्धांत राज्यसंस्थेला सर्वशक्तिशाली करुन व्यक्तीला केवळ तिचा एक परमाणुएवढा घटक ठरवतात. उलट त्यांच्या मते व्यक्तीला प्राधान्य असले पाहिजे. सामाजिक व सामूहिक कल्याणाचा कारणावरुन व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर निर्बध येता कामा नये. तसे झाल्यास समाजनिर्मितीमागील हेतूच नष्ट होतील.

**४) कायद्यांचे स्वरुप :-** त्यांच्या मते कायदा व स्वातंत्र्य यात मूलतः अंतर्विरोध नाही. राज्याचे कायदे मानवी स्वातंत्र्य मूर्त करण्याच्या दिशेने वाटचाल करविणारे असावेत अशी त्यांची अपेक्षा होती. अशा कायदयाचे पालन नागरिक स्वेच्छेने करतात; कारण त्यांच्याच विवेकी स्वभावाचे ते आविष्कार असतात. हेच कायद्यामागील खरे अधिबलन (सँक्शन) असते.

**५) लोकशाहीकशी असावी - इतर सर्व शासनप्रकारांपेक्षा लोकशाही हा सर्वोत्तम शासनप्रकार आहे** असे रॉय यांचे मत होते. लोकांचे व लोकांनी चालवलेले शासन असणे हे त्यांच्या मते लोकशाहीचे लक्षण आहे. खरी लोकशाही व खरे व्यक्तीस्वातंत्र्य जगाच्या पाठीवर कुठेच अस्तित्वात येऊ शकले नाही, असे त्यांचे निरीक्षण होते. खरेखुरे जनसार्वभौमत्व प्रकट

करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते फेरफार ठरविण्यापूर्वी, अस्तित्वात असणाऱ्या लोकशाही पद्धतींमधील उणिवावर त्यांनी बोट ठेवले आहे.

संसदीय लोकशाहीने व्यक्तीच्या सार्वभौमत्वास औपचारिक मान्यता दिली, पण प्रत्यक्षात मात्र मूठभर व्यक्ती वगळल्यास सर्वांना सार्वभौमत्वाच्या प्रभावी वापरापासून वंचित ठेवले. आर्थिक क्षेत्रातील व्यक्तिवादी विचारसरणीचेही तेच झाले.

प्रतिनिधिक लोकशाहीवर रॉय यांचा विश्वास नव्हता. कारण खरी लोकशाही जनसार्वभौमत्वाच्या प्रत्यक्ष व अखंड वापरातूनच उभी राहू शकते असे त्यांचे मत होते. सत्ता सदैव जनतेच्या हाती राहणे हीच लोकशाहीची एकमेव हमी आहे. प्रतिनिधिक लोकशाही जनसार्वभौमत्वाचे तत्त्व गृहीत धरीत असली तरी तीत फक्त निवडणुकांच्या वेळीच जनता आपली सत्ता धारण करते. एरवीच्या काळात ती त्या सत्तेला मुकते व आपल्या प्रतिनिधींवर तिचे यात्किंचितही नियंत्रण राहत नाही. अशी व्यवस्था ही कधीच लोकांचे व लोकांनी चालवलेले शासन होऊ शकत नाही.

संसदीय लोकशाही ही पडद्याआडची बूर्झ्वा हुकूमशाही असते. कामगारांची उघड हुकूमशाही हा लोकशाहीला उचित पर्याय ठरु शकत नाही. सदोष संसदीय लोकशाहीच केव्हाही हुकूमशाहीपेक्षा अधिक स्पृहणीय ठरते, कारण एकपक्षीय राजवटीपेक्षा बहुपक्षीय राजवटीत व्यक्तींचे नागरी हक्क केव्हाही अधिक सुरक्षित राहू शकतील असे रॉय म्हणतात. परंतु संसदीय लोकशाही वा हुकूमशाही या दोन्हीही असमाधानकारक असल्यामुळे तिसऱ्या एखाद्या समाधानकारक प्रकारच्या शोधात रॉय होते आणि तो त्यांनी मूलग्राही लोकशाहीच्या स्वरुपात पुढे मांडला.

**६) पक्षपध्दती - प्रतिनिधिक लोकशाहीमधील ठळक दोष हे पक्षपद्धतीमुळे निर्माण झाले** असून त्या दोषांमुळे तिचे लोकशाही स्वरुप नष्ट झाले आहे असे रॉय यांना वाटत होते. पक्षपद्धतीचे स्वरुपच मुळात लोकशाहीविरोधी असून, भ्रष्टाचाराला तीतून प्रचंड वाव मिळतो या कारणांसाठी त्यांचा पक्षपद्धतीस विरोध होता. पक्षपद्धती लोकशाहीविरोधी आहे, कारण एकतर तिच्या द्वारे मूठभरांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होते. प्रतिनिधी निवडल्यानंतर लोकांची सार्वभौम सत्ता नष्ट होते, तसेच पक्षपध्दतीमुळे प्रतिनिधींचेही स्वातंत्र्य नष्ट होते. पक्षयंत्रणेच्या नियंत्रणाखाली त्यांना राहावे लागते. प्रतिनिधिक शासन हे एका पक्षाचेच प्रतिनिधित्व करीत असून तो पक्ष कितीही मोठा असला तरी एकूण जनसंख्येच्या मानाने अगदीच लहान गट असतो. म्हणजेच ते शासन अल्पसंख्यांचे शासन असते. याउलट लोकशाहीच्या तत्त्वानुसार सत्ता ही लोकांमध्ये विखुरलेली असायला पाहिजे. आजच्या लोकशाही प्रत्यक्षात पक्षीय हुकूमशाही असतात. राजकीय पक्ष व्यक्तींना राजकीय कृती करण्यास वावच सोडीत नाहीत. निवडणुकीसाठी उभे राहणारे उमेदवार व्यक्ती म्हणून पुढे न येता पक्षसदस्य म्हणून येतात. निवड होते ती पक्षांमध्ये, व्यक्तींमध्ये नाही. भावना भडकवून मते मागितली जातात. भडकलेल्या भावानांच्या आहारी गेलेल्या व्यक्ती विवेकपूर्ण निवड करु शकत नाहीत. व्यक्तिगत मतदाराला वा त्यांच्या विवेकबुद्धीला निवडणूक प्रचारात आवाहन नसते तर समूहाच्या भावनांना त्यात आवाहन असते अशाप्रकारे व्यक्तीला राजकारणात स्थानच उरत नाही. म्हणून ही व्यवस्थाच रॉयना लोकशाही वाटत नाही. याखेरीज पक्षांचा उल्लेख भ्रष्टाचाराची साधने म्हणून रॉय करतात. सत्तेवर येण्यासाठी कोणतेही मार्ग वापरण्याची स्पर्धाच पक्षांमध्ये लागते. नीतिमत्तेला

पक्षराजकारणात स्थानच नसते. या सत्तास्पर्धेत सचोटी व प्रामणाणिकपणा यांचे मूल्य शून्य असते. पक्षपद्धतीतच हा दोष असल्यामुळे तिचे विशुद्धीकरण होणे केवळ अशक्य आहे असे रॉयना वाटते. पक्षविहीन लोकशाहीचा ते पुरस्कार करतात.

## १६.५ रॉय यांचे लोकशाही विषयी विचार

प्रतिनिधिक लोकशाहीचा विकास होण्यास रॉय यांच्या मते दोन बाबी प्रामुख्याने कारणीभूत झाल्या. पहिली ही की आधुनिक लोकशाहींमध्ये प्रचंड मोठी लोकसंख्या आढळते. एवढया प्रचंड जनसंमदा याकरीता प्रत्यक्ष लोकशाही राबवणे अशक्य असून प्रतिनिधिक लोकशाही अनिवार्य ठरते आणि दुसरी बाब अशी की सार्वभौम सत्ता व प्रशासन चालविण्यासाठी लागणारी कुवत जनसामान्यांजवळ असत नाही.

प्रचंड जनसंख्येच्या आधुनिक राष्ट्रातही प्रत्यक्ष लोकशाहीच असावी अशी सूचना रॉय करतात, कारण त्याखेरीज लोकांच्या हातून सार्वभौमत्वाच्या अखंड वापराचा दुसरा मार्गच त्यांना दिसत नाही. प्रतिनिधींवर सत्ता न सोपवता ती लोकांनी चालवायची तर महत्त्वाचे संस्थात्मक बदल करावे लागतील असे त्यांना वाटते. नवी संस्थात्मक रचना रॉय यांनी सुचविली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

**१) लोकसमिती असाव्यात** - लोकसमिती (पीपल्स कमिटी) म्हणजे स्थानिक लोकांचे हे संघटन असल्यामुळे त्यावर आधारलेल्या लोकशाहीला ते ‘संघटित लोकशाही’ असे नाव देतात. एकट्या व्यक्तीवर भर दिल्यानेच जनसार्वभौमत्व प्रत्यक्षात उतरु शकत नाही. कारण एकेकटी व्यक्ती आपली सार्वभौम सत्ता वापरण्याचा विचारही करु शकत नाही. लहान सुसंघटित गटांद्वारेच व्यक्ती ती राबवू शकेल. त्या समितीचा निश्चित आकार रॉय सांगत नाहीत, फक्त एवढेच म्हणतात की, त्या भागातील एकूण मतदारसंख्येच्या एकपन्नासांशाहून तेथील लोकसमिती मोठी नसावी. त्या समितीने एकीकडे स्थानिक स्वराज्यसंस्था म्हणून काम करायचे व दुसरीकडे राज्यसंस्थेवर नियंत्रण ठेवून मार्गदर्शन करायचे. राष्ट्रीय संसदेसाठी आपले उमेदवार या समितीने नामनिर्देशित करावयाचे. निवडून आल्यावर ते आपापल्या समित्यांना जबाबदार राहतील, त्यांचे मार्गदर्शन घेतले, समित्यांच्या सतत संपर्कात राहातील. अडचणी लोकांच्या आणि लोकसमित्यांचे निर्णय राज्य विधिमंडळाकडे व राष्ट्रीय संसदेकडे पोचवतील. परिणामी या विधिमंडळातर्फे बहुमताची मागणी पोचू शकेल व त्यांनी केलेले कायदे लोकमताचेच आविष्कार असतील असे रॉयना वाटते.

**२) सत्ता लोकसमितींकडे** - खरी सत्ता लोकसमित्याच्या हाती असेल. विधिमंडळ सदस्य हे केवळ त्यांचे प्रवक्ते म्हणून असतील. राज्यसंस्था ही केवळ माहितीकेंद्र होऊन बसेल. निवडणुकांच्या वेळी जरी काही राजकीय पक्षांनी आपले उमेदवार उभे केले तरी त्यांना अजिबात मत न देण्याचा निर्णय लोकसमित्या घेऊ शकतील व आपापल्या उमेदवारांनानिवडून आणू शकतील असे रॉयना वाटते. त्यांच्या मते असे निवडून आलेले उमेदवार कोणत्याच पक्षाला जबाबदार वा कोणत्याच पक्षाच्या नियंत्रणाखाली असणार नाहीत, ज्या स्थानिक लोकशाहीचे ते घटक असतील त्या स्थानिक लोकशाहीलाच ते कायम जबाबदार राहतील जे त्यांना निवडून देतात त्यांनाच ते प्रत्यक्षपणे उत्तरदायी राहतील. प्रतिनिधी त्यांचे सभागृहातील वर्तन आपल्या

मतदारांनी दिलेल्या कौलानुसार ठरवील, कोणत्याही बाह्य सत्तेच्या आज्ञेबरहुकूम नव्हते. याउपरही लोकसमितीला प्रत्यावर्ताचा (रिकॉल); जनोपक्रामाचा (इनिशिएटिव) आणि जननिर्णयाचा (रिफरेन्डम) असे तिन्ही अधिकार असतील. प्रत्येक नागरिकाला राज्याकारभाराची माहिती असेल, प्रत्येकाचा त्यात सल्ला घेतला जाईल. राज्य व समाज समकक्ष होतील.

**३) जनतेची जबाबदारी** - प्रत्यक्ष लोकशाहीची अशी ही योजना यशस्वी व्हायची तर त्यासाठी जनतेला राजकारणात कमालीचा रस असेण व तिच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ असणे अत्यावश्यक असते.

**४) लोकांसाठी विशिष्ठ प्रकाराचे शिक्षण** - व्यक्तींना त्यांच्या आंतरिक विवेकबुद्धीची वा स्वातंत्र्य ऊर्मीची जाणीव करुन देणे अत्यावश्यक असून शिक्षणाद्वारेच ते घडू शकते असे रॉय यांचे मत होते. शिक्षणाद्वारे असे ते म्हणतात तेव्हा त्यांना प्राथमिक - माध्यमिक शिक्षणाखेरीज दुसरेच शिक्षण अभिप्रेत आहे. 'जैसे थे' अवस्था टिकवून ठेवणारे शिक्षण त्यांना नको, तर व्यक्तिसमुदायाला आपल्या सुप्त शक्तीचे स्मरण देणारे शिक्षण हवे. बुद्धिप्रामाण्यपूर्वक विचार करुन आपल्यासमोरील समस्यांकडे चिकित्सिक दृष्टीने पाहायला शिकवणारे शिक्षण हवे. समाजव्यवस्थेचे निर्माते आपणच असून आपण त्यात इष्ट ते परिवर्तन घडवू शकतो असा आत्मविश्वास वाढवणारे शिक्षण हवे. असा आत्मविश्वासाचा अभावच आजच्या सभ्यतेच्या सर्व समस्यांच्या मुळाशी आहे. प्रारब्धवाद, नेतिवाद यांच्या कचाट्यातून सोडविणाऱ्या सांस्कृतिक चळवळीचेही महत्त्व रॉयनी या संदर्भात सांगितले आहे.

आजच्या राजकारणाच्या भ्रष्ट-स्वार्थी स्वरुपामुळे जे राजकीय क्षेत्राबाहेर आहेत पण जे खरोखरच प्रबुद्ध व मुक्त असे स्त्रीपुरष आहेत ते जनतेच्या आदरास प्राप्त ठरुन आपोआपच नेतेपदी येतील. पण जनता तशी हुशार होईपर्यंत काय? संक्रमणकाळात केंद्रीय विधिमंडळात एक द्वितीय सभागृह निर्माण करुन त्यात सर्व व्यावसायिकांच्या प्रतिनिधींना बसवण्याची सूचना रॉय यांनी केली आहे.

अशाप्रकारे पक्षराजकराणाला वगळण्याच्या प्रयत्नात सत्ताविरहित राजकारणाची संकल्पना रॉय यांनी मांडली आहे. लोकशिक्षण व लोकसंघटन हे त्यांच्या राजकाराणाचे मुख्य हेतू होते. ती कार्ये पक्ष करु शकत नाही. 'पक्षपध्दतीचा एक ठळक दोष असा की, राजकीय घडमोडी सहभागी होणाऱ्या व्यक्तीची संख्या ती मर्यादित करते, मोठ्यात मोठ्या राजकीय पक्षाचीही सभासदसंख्या ही एकूण लोकसंख्येचा अंशमात्र असते. पक्ष फार तर सदस्यांना साचेबद माहिती देतील (इंडॉक्ट्रिशेन करतील), लोकशाही शिक्षण देऊ शकत नाही असे रॉयना वाटते. त्यांच्या मते लोकांना स्वत:चे प्रश्न सोडविण्यास समर्थ करणे व असानावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची त्यांची सवय मोडणे यासाठी लोक-संघटनासारखा दुसरा उपाय नाही. शासनावलंबनातून असहायता येते व असहातेतून स्वातंत्र्यानाश घडतो, असे त्यांचे मत होते. लोकशाहीची निमिर्ती कायदे करुन वा बाहेरुन लादून होऊ शकत नाही कारण ती मुख्यत्वे लोकशाही मनोवृत्तीवर व तज्जन्य लोकशाही समाजावर अवलंबून असते.

**मूल्यमापन :- टिका** - १) रॉय यांच्या मूलग्राही लोकशाहीच्या संकल्पनेवर काही टीकाकरांनी असा आक्षेप घेतला आहे की शेवटी त्यांची ही लोकशाहीसुद्धा संपूर्ण जनतेची लोकशाही

असणारच नाही. लोकसमित्यांमध्ये त्या त्या भागातील मतदारसंख्येच्या एकपन्नासांश सदस्य असणार म्हणजेच ९८ टक्के लोकांना या अभिजात लोकशाहीतही प्रत्यक्ष सहभाग मिळणार नाहीच. म्हणजे प्रत्यक्षात ती लोकशाही अप्रत्यक्ष व प्रतिनिधिकच राहणार.

**२)** दुसरे असे की ती पक्षपद्धतीच्या दोषापासून मुक्त राही असेही टीकाकरांना वाटत नाही. त्यांच्या मते, लोकसमित्यांवर पक्ष आपले प्रभुत्व प्रस्थापित करु पाहतील, त्यांच्यातर्फे सत्ता काबीज करण्याचे प्रयत्न करतील व त्यात यशस्वीही होऊ शकतील असे ते म्हणतात.

**३)** तिसरा आक्षेप संघटित लोकशाहीच्या मानसशास्त्रीय संयुक्तिकतेबाबत घेण्यात येतो. माणूस हा केवळ राजकीय प्राणी नसतो आणि म्हणून देशभरातील सगळे लोक राजकारणात अखंड व मन:पूर्वक रस घेतील असे मानणे चूक ठरेल.

**४)** पक्षविहिन राजकारणातून अराजक येईल व अराजकाइतके, सर्वाधिकारशहीस पोषक असे दुसरे कोणतेच वातावरण नाही.

**५)** याखेरीज या योजनेत अनेक व्यवहार्य अडचणी असल्याचेही टीकाकारांचनी निदर्शनास आणून दिले आहे. खरी प्रबुद्ध व मुक्त माणसे राजकाराणात अग्रेसर असावीत हे ठीक, पण ती शोधायची कशी? एकेका व्यवसायाने त्यांची निवड केल्यास प्रत्येक व्यवसायातील कुशल व्यक्तीचे फार तर सहकार्य सरकारला मिळेल, परंतु त्या व्यक्ती 'मुक्त' व अभ्रष्टनीय असतीलच हे कशावरुन? शासनाचे अनेक प्रश्न गुंतागुंतीचे असून त्यांच्या सोडवणुकीसाठी विशेष ज्ञानाची व कसबाची आवश्यकता असते. ते लोकसमित्यांजवळ कुठून येणार? पक्षाला जसा राष्ट्रव्यापक व दीर्घकालीन दृष्टीकोणातून कोणत्याही गोष्टीचा विचार शक्य होतो तसा तो स्थानिक लोकसमितीला करता येणे अशक्यच आहे, इत्यादी अनके अडचणी सांगता येतील.

संसदीय लोकशाहीतील व पक्षपद्धतीतील दोष दाखवून रॉयनी अत्यंत अपयुक्त कार्य केल्याचीही ग्वाही काहींनी दिली आहे.

## १६.६ रॉय आणि राष्ट्रवाद

आयुष्यातील प्रारंभीची काही प्रखर राष्ट्रवादाची वर्षे वगळता रॉय सुरुवातीस मार्क्सवादी व नंतर मानवतावादी राहिले. या दोन्ही भूमिका राष्ट्रवादविरोधी अशाच भूमिका होत्या. राष्ट्रावाद स्वभावत:च प्रतिगामी असून प्रत्येक देशाने व सामाजाने त्यापासून स्वत:ला जपले पाहिजे असे त्यांचे मत होते. राष्ट्रवादामुळे लोकशाही भ्रष्ट होते आणि त्याच्या प्रभावाखाली लोकशाहीचा कारभार व्यक्तिवादाच्या तत्त्वज्ञानाविरुद्ध चालतो. लोकशाहीची राष्ट्रवादाशी युती झाल्याने तीमधूनच लोकशाही संकल्पनेला सर्वाधिकारशाही संदर्भ चिकटला आहे असे त्यांचे मत होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी राष्ट्रवादी भारताने मित्र राष्ट्रांच्या बाजूने लढायला नकार दिला तेव्हा रॉयना दु:ख झाले. त्यांच्या मते हे युद्ध लोकशाहीला फॉसिस्टवादापासून व इतर संकटांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी युद्ध होते व भारताने आपल्या सर्व शक्तिनिशी त्यात उडी टाकणे हे त्यांचे कर्तव्य होते. अशा कसोटीच्या प्रसंगी राष्ट्रवादी सरकारच्या मागणीवर अडून

बसणे त्यांना योग्य वाटले नाही. राष्ट्रीय गौरव व प्रतिष्ठेच्या बुरख्याआड काँग्रेस ही सरळसरळ राजकीय सौदेबाजी करीत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. काँग्रेसलाच फासिस्ट संघटना ठरवूण त्यांनी, 'चलेजाव' ची चळवळ निर्घृणपणे दडपून टाकण्याची सूचना सरकारला केल्याचेही नमूद आहे. भारतीय राष्ट्रवादाची उभारणी ही केवळ इंग्रजविरोधावर व इंग्रजघृणेवर झाली आहे; कोणत्याही भावात्मक पायावर नाही अशीही रॉय यांची धारणा झाली होती.

राष्ट्रवाद एक भावना व ऊर्मी आहे. तिला वेगवेगळे रुपे व आशय देतात. जर्मनांनी व फॉसिस्टांनी तिला आक्रमक रुप दिले.

## १६.७ रॉय यांची आंतरराष्ट्रीय संबंधावरची मते

रॉय हे सुरुवातीपासून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सूक्ष्म निरीक्षक होते. आधुनिक भारतातील अन्य कोणत्याही विचारवंतापेक्षा त्यांच्या विचारावर आंतरराष्ट्रीय घडामोडींचा प्रभाव जास्त पडला आहे. युद्धोत्तर काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील युद्ध व शांतता - यासंबधी रॉय यांचे विचार मननीय आहेत.

**१)** तिसरे महायुद्ध झाल्यास ते इतके संहारक होईल की मानवतेचाच विनाश अटळ ठरेल अशी इतर अनेक विचारवंतांप्रमाणेच रॉय यांची सुध्दा खात्री झाली होती. त्यामुळे शीतयुद्धावर ते प्रखर टीका करतात. त्यांच्या मार्क्सवादी काळात शीतयुद्धाला ते क्रांतीचे पदचिन्ह मानीत मानवतावादाचा पुरस्कार केल्यानंतर त्यांचे हे मत बदलले. मानवतेवरील हे महाभयंकर संकट टाळण्यासाठी मानवाने आपल्या सर्व शक्ती पणाला लावाव्यात असे ते म्हणू लागले.

**२)** शीतयुद्धाच्या दोन पक्षांपैकी अमेरिका व रशिया - रॉय यांचा कल या काळात अमेरिकेकडे होता. स्वातंत्र्यप्रेम व व्यक्तीच्या हक्कांविषयी यामधून त्यांचा साम्यवादविरोध आकारला होता. मात्र साम्यवादाला विरोध करण्याच्या अमेरिकन पद्धती त्यांना अमान्य होत्या. लष्करी बळावर साम्यवादाचा प्रतिकार करताना लोकशाहीचाच अपघाती मृत्यू घडून येईल अशी त्यांना भीती वाटते. अमेरिकेचे परराष्ट्रधोरण हे केवळ लष्करी गरजांप्रमाणे ठरते असे त्यांचे मत होते. अमेरिकेच्या आक्रमक धोरणावर याच कारणाने ते सडकून टीका करतात. प्रत्येक राष्ट्राला स्वयंनिर्णयाचा हक्क मिळाल्याखेरीज जागतिक शांतता अशक्य आहे असे त्यांचे मत होते. दुर्बल लोकशाही राष्ट्रांना मदत करण्याच्या नावाखाली अमेरिका आक्रमक पवित्रे घेते, किंवा त्यांच्या विकासासाठी मोठमोठया रकमा देऊन त्यांना आर्थिक व राजकीय दृष्टया कायमचे बांधील करुन टाकते. वसाहतवाद हा, रॉय यांच्या मते, नवा अविष्कार होता.

**३)** शीतयुद्धाचे दोन्ही पक्ष वाईटच असून त्यांच्यापैकी कोणाही एकाची निवड करणे केवळ अशक्य आहे. इकडे आड-तिकडे विहीर अशा परिस्थितीत जग सापडले आहे. एकीकडे साम्यवादी हुकूमशाही आहे तर दुसरीकडे अमेरिकन साम्राज्यवाद आहे. यातून सुटकेचा एकच मार्ग आहे तो म्हणजे 'तिसऱ्या जगा' ची ताकद वाढविणे हाच आहे.

**४)** भारताने कोणतीच बाजू न घेता 'खरीखुरी' तटस्थता वा असंलग्नता आपल्या परदेशधोरणात पाळावी. त्या दृष्टीने त्याला आधी आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण झाले पाहिजे.

५) नेहरुंना खऱ्या अर्थाने असंलग्न राहायचे असेल तर, आपली स्वतंत्र मते बाळगण्याचा भारतीय साम्यवाद्यांचा हक्क त्यांनी मान्य केला पाहिजे. तसे केल्याने काही भारत साम्यवादी गोटात जाणार नाही, तर लोकशाहीचा अवलंब करील. बाह्य साम्यवाद्यांबद्दलचे भारताचे धोरणही शांततेचे व लोकशाही असावे, असे रॉयना वाटते.

६) आधुनिक मानवी संस्कृतीला सर्वात मोठा धोका साम्यवादाचा असून त्याला प्रतिकार करण्याचे मार्ग मानवाने शोधलेच पाहिजेत. ७) युद्धांचे ते कट्टर विरोधक असून, पडेल ती किंमत मोजूनही मानवाने शांतताप्रस्थापनेसाठी झटावे असे त्यांना वाटते. युद्धखेरीज लोकशाहीला बचावण्याचा दुसरा मार्गच नसेल तर लोकशाहीचा पराभव मानायलाही ते तयार आहेत. जागाला निरर्थक विध्वंसाच्या व मृत्यूच्या सापळ्यात ढकलणाऱ्या युद्धापेक्षा साम्यवादही बरा!

७) राष्ट्रवाद झिडकारुन मानवतावदाचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तींची मोठी संख्या प्रत्येक देशात वाढल्याखेरीज जागतिक शांतता प्रस्थापित होणार नाही. जागतिक राज्य स्थापन झाल्याखेरीज युद्धे बंद होणार नाहीत व राष्ट्र-राज्ये मोडल्याखेरीज जागतिक राज्य स्थापन होणार नाही. राष्ट्र-राज्य व आंतरराष्ट्रीय सहकार्य कधीच एकत्र नांदू शकत नाही. म्हणूनच राष्ट्र-राज्ये अस्तित्त्वात असेपर्यंत आंतरराष्ट्रीय संघटनाही यशस्वी होऊ शकत नाहीत असे त्यांचे मत होते.

८) युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय संबंधात मानवी मूल्यांना महत्त्वाचे स्थान मिळावे असा रॉय यांचा मानस वरील विचारांवरुन स्पष्ट होतो.

## १६.८ रॉय आणि गांधीवाद

रॉय हे गांधीवादाचे अत्यंत कठोर टीकाकार होते. गांधीवादी राजकारणाला भारतात भवितव्य आहे असे त्यांना कधीच वाटले नाही. आपल्या मार्क्सवादी कालखंडात गांधीच्या असहकाराला त्यांनी विरोध केला होता. त्याला त्यांनी 'पोथीनिष्ठ शांततावाद्यांचा असहकार' असे नाव दिले होते व तो अपयशी होणे अपेक्षितच होते असे म्हटले होते, भारतीय क्रांतीचे नेतृत्व फक्त निस्सीम धारिष्टयवान क्रांतिकारकच करु शकतील. तेच शेतकरी कामगारांचा जनता पक्ष उभारु शकेल. गांधींचे जन जागृतीचे (मास मोबिलायझेशन) मार्ग साम्राज्यविरोधी लढ्याच्या दृष्टीने रॉयना तोकडे वाटत होते.

गांधीची अर्थविषयक मतेही रॉयना अमान्य होती. आर्थिक विकासाच्या दृष्टीने साम्राज्याचा अंत होणे आवश्यक आहे. याबद्दल त्यांचे एकमत होते. परंतु गांधीचा चरख्यावरील भर, औद्योगीकरणाला विरोध, व मानवी गरजा मर्यादित ठेवण्याचा आग्रह या गोष्टींना रॉय यांचा विरोध होता. त्यांच्या मते मानवी गरजा मर्यादित ठेवण्याची गांधीची शिकवण तर राष्ट्राच्या आर्थिक विकासातील स्वंयमेव अडथळा आहे. सूतकताई, हातमाग, खादीचा वापर, राष्ट्रीय शाळा, अस्पृश्यतानिवारण इत्यादी सगळेच गांधीवादी कार्यक्रम रॉयना 'विशुद्ध सुधारणावादी व बिन-क्रांतिकारी' वाटतात.

रॉय यांच्या मते गांधीचा दुसरा भ्रम जर कोणता असेल तर तो हा की ते भारतातील सर्व वर्गाचे जमीनदार व कुळे भांडवलदार व कामगार-ऐक्य अपेक्षित आहे. हे सगळे वर्ग स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी एकत्र येणे राय़ना अशक्य वाटत होते. असहकाराचा प्रभावी वापर गांधीवादी करुच

शकणार नाहीत, राष्ट्रव्यापक कामगार संघटनाच तो करु शकतील असे त्यांचे मत असल्याने भारतात असहकार अपयशी झाला असे रॉय म्हणत नाहीत, तर असहकाराचा खरा अवलंबच झाला नाही असे ते म्हणतात. क्रांतिकारक मार्गानी असहकाराचा अवलंब करायचा तर आधी त्याला गांधीप्रणीत अहिंसेच्या तत्त्वज्ञानापासून वेगळे काढायला हवे, कारण अहिंसक मार्गानी क्रांती कधीच संभवत नाही असे रॉय यांचे मत होते. जे सरकार हिंसेवर व पाशवी बळावरच उभे आहे त्याचे उच्चाटन करण्यासाठी हिंसा आणि बळच हवे; तेथे आत्मक्लेश, अहिंसा, सत्याग्रहादी मार्ग व्यर्थ आहेत - असे रॉय म्हणतात.

अर्थात एक गोष्ट खरी की आपल्या आयुष्यातील मार्क्सवादी कालखंडात रॉय जितके गांधीविरोधक होते तितिके ते पुढे राहिलेले नाहीत. विकेंद्रित राजकीय व आर्थिक व्यवस्थेचे जे रेखाटन रॉयनी केले आहे तेही गांधीप्रणीत आदर्श व्यावस्थेशी जुळणारे असेच आहे.

## १६.९ मूल्यमापन

योगदान - रॉय यांनी आधुनिक भारतीय राजकीय विचारांत मूलग्राही मानववादाच्या पुढील चार मौलिक तत्त्वांची भर घातली : समाजात व्यक्तीला प्राधान्य; नैतिकतेचा धर्मनिरपेक्षतेशी मेळ, व्यक्तीचे बुद्धिप्रामाण्यावादी व मुक्त चिंतन, आणि तळापासून लोकशाहीची उभारणी. विवेकी व शास्त्रीय चितनाच्या बळावर या देशात एका वैचारिक क्रांतीची पायाभरणी रॉय यांनी केली हे त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे.

## १६.१० प्रश्न

१) मानवेन्द्र रॉय यांच्या राष्ट्रावाद, मार्क्सवाद आणि नवमानवतावाद या संकल्पनाच्या विकासाचे विवेचन करा.

२) मानवेंन्द्र रॉय यांच्या नवमानवतावाद या संकल्पनेचे मूल्यमापन करा.

३) टिपा लिहा.

१) रॉय आणि मार्क्सवाद.

२) रॉय आणि नवमानवतावाद.

३) रॉय यांची लोकशाही विषयी मते.

४) रॉय आणि राष्ट्रवाद

५) रॉय आणि आंतरराष्ट्रीय संबंध

६) रॉय आणि गांधीवाद

## १६.११ संदर्भ

डॉ. भोळे भा. ल.'आधुनिक भारतातील राजकीय विचार'.

❖❖❖❖